# महानगरपालिका औरंगाबाद

## स्थायी समिती इतिवृत्तांत

**दिनांक ०९-१०-९६ ते दिनांक ०७-०१-९७**

## रजिष्टर क्र. ४

# औरंगाबाद महानगरपालिका औरंगाबाद

**दिनांक ०९-१०-९६ रोजी संपन्न झालेल्या स्थायी समिती सभेचे इतिवृत्त. मा. सभापती स्थायी समिती श्री. गिरजाराम हाळनोर यांचे अध्यक्षतेखाली ठिक ११.३० वाजता अंदाजे " वंदे मातरम् " या गिताने सभेस सुरुवात झाली. या सभेस स. सदस्य महापालिका अधिकारी उपस्थित होते.**

| | | |
|---|---|---|
| १) | स. स. श्री. गौतम खरात | स. सदस्य |
| २) | स. स. सौ. रजनी जोशी | -//- |
| ३) | स. स. डॉ. भागवत कराड | -//- |
| ४) | स. स. कु. माया लाडवाणी | -//- |
| ५) | स. स. श्री. विजयकुमार मेहेर | -//- |
| ६) | स. स. श्री. महादेव सुर्यवंशी | -//- |
| ७) | स. स. श्री. हमीदउद्दीन ताबा | -//- |
| ८) | स. स. श्री. भगवान घडामोडे | -//- |
| ९) | स. स. श्री. सुभाष टाकळकर | -//- |
| १०) | स. स. श्री. त्र्यबंक तूपे | -//- |
| ११) | स. स. श्री. अभिमन्यु भालेराव | -//- |
| १२) | स. स. श्री. कचरु नवपुते | -//- |
| १३) | स. स. श्री. विकास जैन | -//- |
| १४) | स. स. श्री. अ. रशिद खान | -//- |

**संवाद :**

**श्री. महादेव सुर्यवंशी :** वयोवृध्द स्वातंत्र्य सेनानी स्व. भाऊराव खैरे यांचे नुकतेचदु:खद निधन झाले. त्यांना सभागृहास श्रध्दांजली वाहण्यात यावी.

**श्री. गौतम खरात :** यास माझे अनुमोदन आहे.

( ००.०२) मिनिटे सभागृहात श्रध्दाजंली वाहण्यात आली.)

**श्री. अ.रशिदखान :** सभागृहास श्रध्दाजंली वाहिल्यानंतर संबंधिताच्या नातेवाईकांना शोक संदेश पाठविण्यात यावा.

**मा. सभापती** : याबाबतची कार्यवाही सचिवांनी करावी.

**सहा. अभियंता :** महापालिकेमध्ये एकूण ११६ गाडया आणि वाहन चालक १२३ आहेत.

**श्री. अ. रशिद खान (मामू) :** असे निदर्शनास आले आहे की, जे वाहन चालक परमनंट आहेत त्यांना स्केअर म्हणून बसवून ठेवले जाते व जे वाहन चालक रोजंदारीवर आहेत त्यांना कामावर घेतले जाते याचे कारण काय

**सहा. अभियंता :** श्री. बिहारीलाल यांना झोनच्या ट्रीपवर कामाला दिलेले होते ते आता झोन ४ ला जीपवर बदली केलेली आहे. दुररे शब्बीर अली यांना दुपारच्या शिफ्टवर गाडया चालतात त्यात काही वाहन चालक येत नाही किंवा गाडया फेल होतात. त्यावेळेस कामे देण्यात येते.

**मा. सभापती** : जे वाहन चालक परमनंट आहेत त्यांनाच रेग्युलर गाडी चालविण्यास द्यावे व जे रोजंदारीवर वाहन चालक आहेत त्यांना स्वेअर मध्ये ठेवून लागेल त्यास वेळेस घ्यावे.

**श्री. हमीदउद्दीन ताबा :** काही वाहन चालक असे आहेत की, डयुटीवर आल्यानंतर सही मारतात व निघून जातात तर काही वाहन चालक धौंस व शिव्या देतात त्यांना त्या प्रकारे कामे देतात. जे वाहन चालक गप्प बसतात त्यांना काहीच नाही.

**मा. सभापती** : उप अभियंता मेकॅनिकचे काम कोण पाहतो. या पदाचे श्री. जी. बी. सोनी आहेत तर त्यांना याबाबतचा कारभार का दिला जात नाही. महापालिकेचा यांत्रिकी विभाग हा फार मोठा असल्याने प्रभारी मेकॅनिक अभियंता यांचे एकटयावर सोपवून चालणार नाही. तर त्यासाठी उप अभियंता पदाचे जे कार्यरत आहेत त्यांचेकडे ही काही कार्यभार सोपविण्यात बाबत शहर अभियंता यांनी चौकशी करुन कार्यवाही करावी.

**श्री. कचरु नवपुते :** चिकलठाणा येथे एकंदर २५ पोल टाकलेले आहेत. परंतु त्या भागात गुत्तेदार श्री. वेंडाळे यांनी अर्ध्या पोलवरील वायर ओढून ठेवलेले आहेत व बाकी काम तसेच आहे. त्यामुळे त्या भागात सर्वत्र अंधाराचे साम्राज्य आहे. याचा फायदा चोरटे घेत असतात. अशाच वेळेस एक व्यक्ती श्री. किसनराव चौधरी यांना चोरांनी मारल्याने मृत्युमुखी पडलेले आहेत. यांचे प्रमुख कारण म्हणजे महापालिकेची दिरंगाई व गुत्तेदाराचे नाव ब्लॅक लिस्ट टाकून संपूर्णपणे चौकशी व्हावी.

**मा. सभापती** : याबाबतच्या कामाचे किती दिवसाचा कालावधी गुत्तेदारास दिलेला आहे.

**उपअभियंता (विद्युत) :** एका महिन्याचा कालावधी दिलेला होता.

**श्री. कचरु नवपुते :** एक महिन्याचा कालावधी देवूनही ३-४ महिन्याचा कालावधी जरी दिला तरी सुध्दा होणार काय संशय आहे.

**मा. सभापती** : संबंधित गुत्तेदाराचे नाव ब्लॅक लिस्ट टाकून दुसऱ्या गुत्तेदारास सदरचे काम देण्यात यावे.

**श्री. कचरु नवपुते :** हे काम किती दिवसात होणार आहे याची माहिती द्यावी.

**मा. सभापती** : किती दिवसात पूर्ण करुन घेणार याची माहिती दयावी.

**उप अभियंता (विद्युत) :** २० तारखे पर्यंत संपूर्ण वायर ओढण्याचे काम पूर्ण करण्यात येईल.

**मा. सभापती** : २५ तारखेपर्यंत हे काम पुर्ण करुन स. सदस्यांना सांगावे.

**सौ. रंजनी जोशी :** पिसादेवी रोडवरील गेल्या ९४ सालापासून पोल पडलेले असूनही वायर ओढण्यात असलेले नाहीत. सायंकाळ ०७.०० नंतर त्या भागातून जाणे येण्यास नागरिकांना चोरांपासून भिंती वाटते. तेव्हा तेथील वायर ओढावे.

**मा. सभापती** : उप अभियंता विद्युत यांनी खुलासा करावा.

**उप अभियंता** : संबंधित कामाबाबतचे अंदाजपत्रक तयार करण्यात आले असून, कामधेनू सोसायटी बाबत विभागाकडे पाठविण्यात आले आहे.

**मा. सभापती** : याबाबत लेखा विभागाने त्वरीत कार्यवाही करावी.

**लेखाधिकारी - १ :** ठिक आहे.

**श्री. अभिमन्यु भालेराव :** माझ्या वॉर्डातील लाईट बंद अवस्थेत आहेत. याबाबत दोन तीन वेळेस सांगण्यात आले परंतु अद्यापही कार्यवाही झालेली नाही. येथील स्मशान भूमीत सुध्दा लाईट नसल्याने अत्यांविधी सारखे संस्कार अंधारातच टेंभे लावून करावे लागते. तेव्हा अशी शंका येते की, विद्युत विभाग शहरातील लाईटचे काम करतो किंवा नाही.

**मा. सभापती** : संबंधित अधिकाऱ्यांनी यांनी खुलासा करावा.

**उप अभियंता :** मागील वेळेस २३ तारखेलाच बंद दिवे चालू केलेले आहेत. परंतु पुन्हा काही दिवे बंद असल्यास पाहणी करुन त्वरीत चालू करण्यात येईल.

**श्री. हमीद ताबा :** विद्युत विभागातील भांडारातून साहित्य आलेले दिसत नाही.

**श्री. उप अभियंता (विद्युत) :** मटेरीयल (साहित्य) आलेले आहे.

**श्री. कचरु नवपुते :** येथील टायनर बसविण्यात यावे.

**श्री. भगवान घडामोडे :** कोणत्या भागातील कोणत्या पोलचे काम झाले याचा कसा अंदाज येणार.

**मा. सभापती** : संबंधित कामाबाबत पोलवरील काम झाल्यानंतर संबंधित वार्डातील स. स. ची स्वाक्षरी घ्यावी.

**श्री. अ. रशिद खान (मामू) :** मी मागील वेळेस पासून सुचना करीत आहे की, प्रत्येक पोलवर नंबर टाकावे. त्याबाबत कार्यवाहीच होत नाही.

**मा. सभापती** : याबाबत अति शहर अभियंता यांनी माहिती दयावी.

**अति. शहर अभियंता :** ठिक आहे. पोलवर महापालिकेचे नंबर्स टाकण्यात येतील. यासाठी ४-५ महिन्याचा कालावधी लागेल.

**श्री. भगवान घडामोडे :** माझ्या वार्डात एम. एस. ई.बी. ने मिटर बसविलेले हा महापालिकेने टयुब लावूनही चालु होत नाही. म्हणजे स.स. दिशाभूल होत आहे.

**उप अभियंता (विद्युत) :** एम. एस. ई. बी. ची परवानगी मिळाल्यास त्वरीत कार्यवाही करण्यात येईल.

**मा. सभापती** : लाईट लावण्यासाठी गाडया होऊन लाईनमन जातात. तेव्हा त्यांचेवर देखरेख कोण ठेवतो.

**उप अभियंता** : कनिष्ठ अभियंता यांचे देखरेखीखाली कामे होत असतात. एका हॅड्रीलीक गाडीवर २५ पोलचे काम घेतात.

**मा. सभापती** : लाईनमनने किती काम केले याचा दैनंदिन अहवाल कनिष्ठ अभियंता यांनी घेवुन आमच्याकडे पाठविण्याची दक्षता घ्यावी.

**श्री. अ. रशिद खान (मामू) :** मी यापुर्वी सुध्दा सुचना केलेली होती की, खांबावरील विद्युत दिवे लावण्यासाठी आपले लाईनमन सोबत एम. एस. ई. बी. चे लोकांवर अवलंबून रहावे लागते. आणि आपले लाईनमन एक हैड्रोलीक गाडीवर दिवसातून ४-५ च खांबावरील दिवे लावू शकतात त्यापेक्षा नाही असे लक्षात येते. तसेच दिवसा लावलेले व दुरुस्ती केलेले दिवे रात्री चालू असतात किंवा नाही याकडे कोणी लक्ष द्यावे. यासाठी रात्री सुध्दा संबंधितांनी पाहणी करावी जेणे करुन समजून येईल.

**मा. सभापती** : कनिष्ठ अभियंता यांनी याबाबत दक्षता घ्यावी व त्याप्रमाणे कार्यवाही करावी.

**श्री. गौतम खरात :** शहरातील लाईटच्या बाबतीत महापालिकेच्या कर्मचाऱ्यांचे चुकते असे नाही आपल्याकडे १५०० पोलवर टयुब लावलेले असून, या सर्व कामाबाबत एम. एस. ई. बी. कडून जाणुन बुजून त्रास होतो. यासाठी मी स्वतः संबंधित अधिकाऱ्यांशी चर्चा केली परंतु काहीही दाब देत नाही. एम. एस. ई. बी. चे अधिकारी श्री. घुगे यांचे महापालिकेस कोणत्याही प्रकारचे सहकार्य होत नाही. आपल्याकडे नविन १५०० पोल बसविण्यात आले. त्यांना ते नजरेत भरतात म्हणून सहकार्य नाही. यासाठी महापालिकेतर्फे असा प्रस्ताव शासनाकडे व मा. उप मुख्यमंत्री यांना श्री. घुगे यांच्या बाबतपाठवून कळवावे की, एम. एस. ई. बी. महापालिकेस सहकार्य करीत नाही व

प्रत्यक्षात श्री. घुगे या अधिकाऱ्यांशी येथून बदली करुन त्यांना इतरत्र हलविण्याची कार्यवाही करावी. व महापालिकेतर्फे आपले सर्व स. सदस्यांनी जाऊन त्यांच्या बाबतीत निवेदन दयावे. त्या शिवाय सहकार्य शक्य नाही. शिवाय आपल्याकडे आणखी दोन गाडयांची मंजुरी मिळाली होती त्याचे काय झाले.

**सहा. अभियंता** : टेंडर रिकॉल केलेले आहे. चेसीस आलेले आहे.

**मा. सभापती** : याबाबात त्वरीत कार्यवाही करावी. जर मा. आयुक्त नसतील तर उप आयुक्त-१ यांचे कडून कार्यवाही करावी.

**श्री. गौतम खरात** : मी पुन्हा एकदा सांगतो की, एम. एस. ई. बी. चे श्री. घुगे अधिकारी यांचे बाबतीत सर्व स. सदस्यांनी ठराव घ्यावा.

**डॉ. भागवत कराड** : नविन पोल टाकण्यात आले परंतु काही ठिकाणी बसविलेले नाहीत काय?

**अति. शहर अभियंता** : या सर्वाबाबत माझ्याकडे कर्मचाऱ्यांचा अपुरा वर्ग असल्यामुळे त्रास होत आहे या विभागाकडे एकूण २ उप अभियंता पदे व ३ कनिष्ठ अभियंता आहेत. या सर्वांचे संपूर्ण शहरावर लक्ष केंद्रीत राहणे शक्य नाही. यासाठी २ उप अभियंता पदासाठी १० कनिष्ठ अभियंता पदाची आवश्यकता आहे आणि त्यानुसार लाईनमनही वाढतील व नंतरच शहराच्या लाईटच्या तक्रारी कमी होण्याची शक्यता आहे. शिवाय रात्रीचे सुपर विजनही करणे सोईस्कर होईल. या सर्वांची संख्या वाढ होणे अत्यंत गरजेचे आहे.

**श्री. विजयकुमार मेहेर** : दोन महिन्यापुर्वी मी स्वत: उप अभियंता यांना विचारणा केली होती की, आपल्याकडे कर्मचारी वर्ग पुरेसा आहे काय? त्यावर त्यांनी काहीही म्हटलेले नाही आणि आज अति शहर अभियंता म्हणतात की, विद्युत विभागात कर्मचारी अपुरा आहे म्हणजे नेमके काय? मी वारवांर जकात नाक्यावरील कर बसविण्याची सुचना करीत होतो. परंतु आता त्याठिकाणी लाईटची व्यवस्था नाही याचे कारण काय? याबाबत गांभिर्याने लक्ष द्यावयास पाहिजे.

**श्री. अब्दुल रशिदखान मामु** : शहराचा वाढता व्याप लक्षात घेता येथील कर्मचारी फक्त चार झोनचेच काम करतात व उर्वरीत झोनचे काम करण्यासाठी एखादया प्रायव्हेट एजन्सीला काम देवून महापालिकेचे काम लवकर करावीत. कारण आपल्याकडे जी. आय. पोल आहेत परंतु त्यावर टयुब लावण्यासाठी पुरेसा शिडया नाहीत. त्यामुळे आपले कर्मचारी कडून पाहिजे तितके कामे येत नाहीत. शहरात डी. पी. रोड सोडल्यास अनेक भागात ५-५ फुटाच्या गल्या आहेत या सगळया भागात आपल्या गाडया जाऊन कामे करु शकत नाही. यास्तव तशा प्रकारची व्यवस्था व्हावी.

**मा. सभापती** : मा. आयुक्तांशी मागेच मी चर्चा केलेली आहे. आपल्याकडे दोन उप अभियंता व आणखी कनिष्ठ अभियंता यांची पदे भरुन कार्यवाही करावी.

**श्री. अ. रशिद खान** : विद्युत लाईनमन यांनी कोणत्या वार्डात जाऊन कामे करतात. याची एका रजिस्टरमध्ये नोंद ठेवणे आवश्यक आहे.

**मा. सभापती** : याबाबत उप अभियंता यांनी कार्यवाही करावी.

**श्री. भागवत कराड** : नविन कर्मचारी घेणे पेक्षा एका झोनला ट्रायल म्हणून प्रायव्हेट एजन्सीला लाईटचे काम दिल्यास हरकत नाही.

**मा. सभापती** : ठिक आहे. कॉट्रॅक्ट बेसीसवर झोनसाठी काम देण्यास हरकत नाही.

**श्री. विकास जैन :** माझ्या वार्डात फार मोठया प्रमाणात नवरात्र महोत्सव साजरा होतो. या भागात फोकस लावून देण्याची कार्यवाही करावी.

**मा. सभापती** : अशा प्रकारचे फोकस आपल्या नगरसेवक निधीतून लावावे. नसता अनेक स. स. अशाच प्रकारची मागणी करतील. दुसरे असे की, ऐनवेळचे प्रस्ताव असतील तर, नंबरींग टाकण्यासाठी ताबडतोब ठेवावे नसता चर्चा करता येणार नाही.

**श्री. कचरु नवपुते :** माझ्या वॉर्डात प्लाय ठिकाणी दलित व मुस्लीम स्मशानभूमी आहेत याबाबत मा. आयुक्त यांचेशी चर्चा केलेली होती. परंतु अद्यापही कार्यवाही झालेली दिसत नाही. स्मशान भूमी सारख्या ठिकाणी दोन समाजात वाद घेणे इष्ट वाटणार नाही. यासाठी सहा. संचालक नगर रचना यांनी ताबडतोब लक्ष घालून कार्यवाही करावी.

**मा. सभापती** : पुढील बैठकीत सहा. संचालक नगररचना यांनी सविस्तर माहिती दयावी.

**श्री. गौतम खरात :** शहरात स्मशान भूमीसाठी ज्या ज्या समाजांनी मागण्या केलेल्या असतील त्या बाबत महापालिकेने निगोशिएशन्स करुन ताबडतोब कार्यवाही करावी.

**मा. सभापती** : ठिक आहे.

**श्री. अभिमन्यु भालेराव :** माझ्या वॉर्डातील मसनतपूर येथील शाळेच्या बाबतीत सर्वसाधारण सभेने प्रस्ताव मंजूर केलेला आहे परंतु अद्यापही कार्यवाही झालेली नाही.

**मा. सभापती** : संबंधित अधिकाऱ्यांनी खुलासा करावा.

**उप अभियंता (विद्युत) :** करारनामा झालेला आहे ताबडतोब कार्यवाही करण्यात येईल.

**मा. सभापती** : सदरचे काम अद्यापही का सुरु झालेले नाही.

**उप अभियंता** : संबंधित गुत्तेदाराचे दर १० कमी दराचे असल्याने सदरचे काम निगीशिएन्स करुन कार्यवाही करण्यात येईल.

**मा. सभापती** : सदरील काम उद्यापासून सुरु व्हायला पाहिजे.

**डॉ. भागवत कराड :** शहर सौंदर्यीकरणासाठी महापालिकेने १.२५ लाख देवून शहराचे मेंटेनस करतात. परंतु आपल्या महापालिके समोरील फाउँटन बऱ्याच दिवसा पासून बंद दिसते त्याचे काही पत्रकार फोटो घेत होते. परंतु मीच नाकारल्याने ते थांबले यासाठी मेंटेनन्सचा खर्च या कामी लावून शहरातील माऊन्टन काऊंटंन्स चालु करुन ठेवावे.

**मा. सभापती** : संबंधित अधिकाऱ्यांनी खुलासा करावा.

**अति. शहर अभियंता :** याबाबतची कार्यवाही चालू आहे. शहरातील सौंदर्यीकरणाचे लाईनमन्सचे बाबतीत काही मेंटनेन्स असल्यास ती तात्काळ करण्यात येतील. परंतु महापालिकेचे समोरील टाऊन हॉल येथील कांउटन्सचे बाबतीत थोडेसे लिकेज असल्याने पाणी थांबत नाही. यासाठी दुरुस्ती करण्यात येईल.

**मा. सभापती** : तसेच शहरातील विविध पुतळयाचे बाबतीत सुध्दा व्यवस्थित निगा व स्वच्छता राहील याबाबी झोनचे संबंधित स्वच्छता निरिक्षक यांनीच लक्ष देऊन स्वच्छता बाहगण्याची कार्यवाही करावी.

**श्री. अभिमन्यु भालेराव :** माझ्या वॉर्डात ज्या मंदिरा समोर वॉल कंपाऊंडचे काम चालु आहे ते काम कशासाठी चालू आहे. त्याची पाहणी करावी या कामाबाबत कमीत कमी येथील स. सदस्यांना माहिती सुध्दा नाही आणि काम सुरु आहे. ते कसे आहे. त्याची पाहणी करावी.

**मा. सभापती** : स. स. नी. सुचना केल्याप्रमाणे संबंधित अधिकाऱ्यांनी सुचित करण्यात येते की, वॉर्डातील कोणत्याही भागात काहीही कामे होत असल्यास संबंधित स. स. ना याची कल्पना दयावी शिवाय स. स. नी सुचना केल्याप्रमाणे ( उप आयुक्त-१ ) यांनी प्रत्यक्षात पाहणी करावी.

**श्री. सुभाष टकाळकर :** महापालिकेतर्फे बरेचसे कामे शहरात डिवायडिंगचे होत आहेत. जालना रोडवरील डिवायडरचे कामाबाबत आतापर्यंत किती खर्च झालेला आहे. याची माहिती दयावी. या रोडवर डिवयाडर करुन कामे होत आहेत. त्या डिवायडरचे काम कधी झालेले आहे व कोणत्या गुत्तेदाराकडून कामे करवून घेतल्या जाते. त्या ठिकाणी अशी परिस्थिती आहे की, एका वर्षात त्याचा निघत आहे. ही एका महापालिकेची शोंकातिका आहे म्हणजे महापालिकेने दरवर्षी असाच खर्च करावयाचा ठरविलेला आहे काय? याचा खुलासा उप आयुक्त-१ यांनी करावा. सिमेंट मध्ये माती मिळवून केलेली कामाची पध्दत योग्य वाटत नाही व संपूर्ण काम अशाच प्रकारे होत राहिल्यास महापालिकेचा खर्च प्रत्येक वर्षी विना कारण होत राहील. हा गंभर आहे. याकडे विशेष लक्ष दयावे.

**श्री. हमीद उद्दीन ताबा :** सदस्यांनी सुचित केल्यानुसार संबंधित कामाची चौकशी करुन कार्यवाही व्हावी.

**श्री. सुभाष टाकळकर :** अशा प्रकारे डिवायडरच्या कामाबाबात बोगस काम होत असल्यास त्याची पाहणी करण्याकरीता एक समिती गठण करावी.

**मा. सभापती** : प्रथमतः संबंधित कामाचे व्हेरीफाय करुन नंतरच कार्यवाही करता येईल. आपण सुचना केल्याप्रमाणे समिती गठण करता येईल. परंतु व्हेरीफाय करावे.

**उप आयुक्त १ :** याबाबत मा. आयुक्त यांचेकडे तांत्रिक विभागाची बिंत्र आहे. त्यांनी याबाबतची पाहणी केलेली आहे.

**मा. सभापती** : डिवायडरचे एकूण किती कामे व किती रक्कमेचे कामे चालू आहेत.

**अति शहर अभियंता :** १४ ते १५ लाखाचे कामे चालू आहेत.

**सौ. रजनी जोशी :** विवेकानंद स्मारक हडको येथील गार्डन मध्ये रेल्वे चालू करणे तसेच नामांतर व पुतळया बाबतची काय कार्यवाही झाली.

**श्री. सुभाष टाकळकर :** समिती गठण करण्याबाबत काय झाले?

**मा. सभापती** : डिवायडरच्या कामा संदर्भात १) भगवान घडामोडे, २) महादेव सुर्यवंशी, ३) सुभाष टाकळकर, ४) डॉ. भगवान कराड, ५) अभिमन्यु भालेराव, ६) सौ. रजनी जोशी, इ. स. सदस्यांची एक समिती गठण करण्यात येईल. याबाबत तांत्रिक विंगसाठीचे जे अधिकारी आहेत. त्यांनी या समिती बरोबर संपर्क साधून दोघांनीही संपर्काच्या एकमेकांच्या साहय्याने एका महिन्यांच्या आत स्थायी समितीला अहवाल सादर करेल. तोपर्यंत संबंधित गुत्तेदारास कामाचे पैसे अदा करु नये.

**उप अभियंता (उद्यान) :** एजन्सीज मार्फत स्थायी समिती समोर प्रस्ताव ठेवण्यात येत आहे. संबंधित कामाबाबत त्याच वेळेस कार्योत्तर मंजूरी दिलेली आहे. मग हे काम सुरु का केले नाही. त्याच वेळेस कै. बनकर बाई यांनी पुतळा महापालिकेस बसविण्यासाठी दिलेला होता. त्याबाबत अद्यापही कार्यवाही झालेली नाही. मागेच स्थायी समितीने असा निर्णय दिलेला आहे की, जो गुत्तेदार चांगले काम करतो त्यांचेकडे हे काम सोपवावे त्यास मंजूरी दिलेली होती. परंतु

पुन्हा त्या कामाबाबात स्थायी समितीकडे प्रस्ताव का येतो हे कळत नाही. म्हणजे स्थायी समितीने दिलेला निर्णय आपण मानत नाही काय? असे जर असेल तर आम्हाला आमचा अधिकार वापरुन काम करवून घ्यावे लागेल याची नोंद घ्यावी.

**सौ. रजनी जोशी :** मजनू हिल येथील उद्यानाचे नामांतर करुन स्वामी विवेकांनद उद्यान नामकरण करणे बाबत काय झाले.

**मा. सभापती** : सर्वसाधारण सभा व स्थायी समितीमध्ये जो ठराव होतात त्यांची अंमलबजावणी झाली पाहिजे. नसता आम्हाला आमचा अधिकारानुसार कार्यवाही करावी लागेल.

**सौ. रजनी जोशी :** तसेच उद्यानात मिनी ट्रेन बसवून त्यास तिकीट लावावे जेणे करुन महापालिकेस लाभ होईल.

**उप अभियंता :** रु. ५.०० लाखाची तरतूद या कामी करण्यात आली आहे. ट्रेन कुठे बसवायची याची पाहणी चालू आहे. काल सिडको हस्तांतरणाच्या बैठकीत अशी चर्चा झाली की, मिनी ट्रेन खालच्या सिडकोच्या गाईड मध्ये बसवावे.

**मा. सभापती** : आपल्या महापालिकेच्या गार्डन हे उंच भागात आहे व त्याभागी जर मिनी ट्रेन बसविल्यास उंच भागातून लहान मुलांना पाहण्याचा मोह वेगळा दिसेल.

**डॉ. भागवत कराड :** मागील वेळेस मी सुचना केलेली होती व त्या सुचना बाबत सर्वसाधारण सभेत प्रस्ताव मांडला होता आणि कर आकारणी बाबत नोटीस (पास बुक प्रकारची) त्याबाबत गेल्या दिड वर्षापासून काय कार्यवाही झाली याची माहिती दयावी.

**मा. सभापती** : महापालिका ज्या वेळेस पासून अस्तित्वात आली. त्यावेळेस पासून कर आकारणीसाठी नोटीसा द्याव्यात अशी स्थायी समिती शिफारस सर्वसाधारण सभेला करते.

**डॉ. विजयकुमार मेहेर :** सिडको भागातील जे मालक आहेत. त्यांचेकडून कर आकारणीचे पैसे वसुल करावेत भोगवटा धारकाकडून नाही.

**मा. सभापती** : आपण सिडको सेवा करण्यासंबंधी नोटीसा बजावण्याची शिफझरस केलेली आहे निर्णय मात्र सर्वसाधारण सभा घेईल. या ठिकाणी चर्चा करुन नये. हा प्रस्ताव मंजूर.

**डॉ. विजयकुमार मेहेर :** कर आकारणीच बाबतीत चालू वर्षाचे टॅक्स बाबतची माहिती दिसते. परंतु मागील वर्षाचे रेकॉर्ड किंवा माहिती मिळत नाही. रजिष्टर मात्र आहे.

**मा. सभापती** : याबाबतची माहिती पाहिजे असल्यास आपणास मिळू शकेल.

**डॉ. भागवत कराड :** स. नगरसेवक स्वेच्छा निधी रु. १.५० बाब आहे. त्यातून ज्याची इच्छा असेल त्या सदस्यांनी रु. १० हजार निधी आपल्या वॉर्डातील शाळेच्या नावे डिपॉझीट करावा की, त्या शाळेतील इयत्ता ४ थी बोर्ड परीक्षेत प्रथम आल्यास त्यास रु. १० हजाराचे डिपॉझिटेच व्याज दर रु. १२००/- असल्यास त्या पैशाचे बक्षिस पण देण्यात येईल. असा प्रस्ताव मागेच संमत करण्यात आला होता. त्याची अमंलबजावणी व्हावी.

**मा. सभापती** : फक्त महापालिकेच्या शाळेतील इयत्ता ४ थी पास प्रथम असलेला विदयार्थीसच याच लाभ होईल. प्रस्ताव मान्य.

**डॉ. भागवत कराड :** आपल्या वॉर्डातील नगरसेवक आहेत त्यांना कार्यालय किंवा मदत केंद्र म्हणून महापालिकेची मोकळी जागा ज्या वॉर्डात आहेत त्यांना तो महापालिकेतर्फे बांधून दयावीत. कारण आज ही मदत केंद्र मी नगरसेवक

असेपर्यंत कार्य करेल. उदया दुसरे कुणी निवडून आल्यास त्यांना याचा वापर करण्यासाठी किवा संपर्कासाठी उपयोग होईल. हा एक प्रयोग होईल.

**मा. सभापती** : यात वेगळी दुरुसती करण्यात येते. प्रत्येक वॉर्डात दोन रुमचे बांधकाम करावे व त्याचा उपयोग कर्मचाऱ्यांचा हजेरी सेंटर म्हणून करावे पाच वर्षाच्या कालावधीत स. स. त्याच संपर्क कार्यालय म्हणून उपयोग येतील.

**अ. रशिद खान (मामु)** : बरेचसे सरकारी घरे केंद्रीय मंत्री महोदय यांनी कब्जात घेऊन रिकामे करीत नाहीत तशी परीस्थिती होऊ नये याबाबत तुम्हाला काय माहिती आले. आपण नविन आहात.

**श्री. रजनी जोशी** : सर्वांना सारखे समजणार काय?

**श्री. अ. रशिदखान (मामू)** : मला म्हणावयाचे आहे की, बारापुल्ला भागात जुना नाका होता तो एकाचे कब्जा करुन राहतो आहे यास आपण काय समजायचे.

**मा. सभापती** : बारापुल्ला भागातील जुना नाका आहे तो एका कर्मचाऱ्यांला भाडयाने दिलेला आहे बत्तशा बाबतीत आपण निर्णय घेऊ शकते की, त्या रुम्सचा आपण कोणत्या व कुणाला भाडयाने दयावयाचे काय याचा निर्णय आपण ठरवू शकतो.

(त्यावेळी स. स. श्री. रशिदखान मामू व सौ. रजनी जोशी यांच्यात जोरजोरात चर्चा होते. काहीही ऐकू येत नाही.)

**मा. सभापती** : स. स. श्री. रशिद खान (मामू) मी आपणास विनंती करतो की, आपण आपसात स. स. सदस्य या महिला आहेत. त्यांचेशी अपमानकारक बोलू नये. सभागृहास सर्व स. स. बोलायचा अधिकार आहे. त्यानुसार सर्वांनी वागावे.

**श्री. हमीदउद्दीन ताबा** : स. स. चे म्हणणे आहे. ते ऐकून घ्यावे त्यांचे म्हणणे आहे की, बारापुल्ला भागातील नाल्याच्या कामामध्ये एक कर्मचारी कब्जा करुन राहतो व तो पिढयान पिढया राहतो काय? यासाठी स. सदस्य पोटतिडकीने मुद्दा मांडून बोलत आहेत त्याची दखल घ्यावी.

**मा. सभापती** : प्रत्येक वार्डात रुम बांधून त्याचा हजेरी सेंटर किंवा संपर्क कार्यालय म्हणून वापर करता येईल व हे कार्यालय संबंधित झोनच्या आवाक्यात राहील. स. सदस्यांनी मांडलेला प्रस्ताव एकमताने मंजूर करुन सर्वसाधारण सभेस शिफारस करण्यात येते.

**डॉ. भागवत कराड** : जालना रोडवर रहदारी फारच मोठया प्रमाणात वाढलेली आहे. सिग्नल ठिकठिकाणी वाढलेले आहेत. त्यासाठी क्रांतीचौक, मोंढा नाका वगैरे ठिकाणी प्लाइंग पूल (ओव्हर ब्रिज) तयार करण्याबाबत अंदाजपत्रकीय प्रस्ताव येत्या मंत्रीमंडळाच्या समोर ठेवावे.

**मा. सभापती** : सदरील प्रस्ताव विचारार्थ घेण्यास हरकत नाही. परंतु जालना रोड असूनही आपल्याकडे हस्तांतरण झालेले नाही. तो सार्वजानिक बांधकाम कार्यालयाकडे आहे.

**श्री. रशिद मामू** : जालना रोडच्या संदर्भात सहा. संचालक नगर रचना यांनी कार्यवाही करावी.

**मा. सभापती** : या संदर्भात सहा. संचालक नगर रचना, मालमत्ता अधिकारी आणि करमुल्य निर्धारण अधिकारी यांच्या तिघांच्या सल्ल्याचे काम हाती घ्यावयाचे आहे. सदरचा प्रस्ताव तयार असून, मा. आयुक्त यांची सही होईल. याबाबत नुकताच स्थायी समितीच्या स. क. चा दौरा झालेला होता. त्या पाहणी

दौऱ्यात प्रशासकीय कामाचा अहवाल आम्ही प्रशासनास सादर केलेला आहे आणि त्याप्रमाणे ही तांत्रिक विंग आपण तयार करुन विंगमधुन कुणाच्याही बदल्या आपल्याला करता येणार नाहीत. ही विंग एकत्रिक काम करेल.

**श्री. हमीद ताबा :** झोन १ व ६ उप आयुक्त-१ यांनी धाड टाकली त्याबाबत काय झाले? याची माहिती दयावी

**मा. सभापती :** याबाबत संबंधित अधिकाऱ्यांनी खुलासा करावा.

**उप आयुक्त - १ :** मी झोन ३ या विभागीय कार्यालयाची तपासणी केलेली होती. मी धाड वगैरे टकली नाही. मी ज्या कार्यालयाशी संपर्क करतो त्यावेळी त्या कार्यालयातील कोणकोणत्या कर्मचाऱ्यांचे काय झाले काम आहे त्याची पाहणी करतो व विचारणा करतो व तेथील कॅशिअरची कॅश किती आहे याची तपासणी केली. तेव्हा कॅश कमी झालेली नाही. परंतु संबंधितांनी दिलेल्या जबानी नुसार समजा रु. ५० हजार कॅश जमा झालेली असेल तर, २५ हजार रु. मुख्य कार्यालयात जमा करावे व उर्वरीत रु. २५ हजार ठेवायचे हे कशा करीता असे करायचे असे विचारल्यानंतर संबंधिताने सांगितले की, मागील वर्षी आम्हास मुख्य कार्यालयात विचारणा व्हायची की आज किती कॅश पाठविली. तर त्याप्रमाणे भाकडा असावा किंवा त्याही पेक्षा वाढीव आकडा असावा. एखादे वेळेस जर ८० हजार कॅश पाठविली आणि दुसऱ्या दिवशी जर रु. १० हजार कॅश जमा केली तर कार्यालयातून लेखी खुलासा मागविण्यात येत असे मला समजले. म्हणून मला असे वाटले की, दैनंदिन जी रक्कम झोनमध्ये वसूल होती ती संपूर्ण रक्क्म मुख्य कार्यालयात जमा व्हावी. हाच माझा उद्देश होता. दूसरे काही एक कारण नाही.

**श्री. हमीद ताबा :** मला असे समजले की, ज्या दोन झोनला आपण भेट दिली तर एका झोनमध्ये रु. १० हजार रक्क्मेत कमी निघाले. परंतु त्यांचे बाबतीत काहीच केलेले नाही, आणि झोन -३ च्या कर्मचाऱ्यांचे आपणास माहिती सांगितली तर आपण त्यांना निलंबित केले. अशी मेहेरबानी का केली. ही काय पध्दत आहे काय?

**उप आयुक्त - १ :** मागील जी काही पध्दत आहे झोन कार्यालयाची ती मी बंद केली आणि ज्या दिवशी मी तपासणी केली त्या दिवशीच्या कॅशबुकमध्ये नोट आहे की, त्यांचेकडे पैसे किती आलेले आहेत, किती जमा आहेत व किती असावयास पाहिजे. परंतु कमी कुठेही आलेली नाही. त्यावेळेस संबंधित झोन अधिकारी त्यावेळी उपस्थित होते आणि आपण म्हणता संबंधित कर्मचाऱ्यांवर कार्यवाही केली तसे नसून मी फक्त बदली केलेली होती. आपल्या माहितीस्तव सांगतो आणि मा. आयुक्त आल्यानंतर जी काही कार्यवाही करायची असते ते मा. आयुक्त करतात. परंतु याबाबत मी काही कार्यवाही केलेली नाही. त्यानंतर मा. आयुक्त यांनी त्यांना निलंबित केले निलंबनाचे अधिकार माझे नाहीत. आतासुध्दा मी अंतिम अहवाल मा. आयुक्तांकडे ठेवील. त्यानुसार मा. आयुक्त जो काही निर्णय घेतील तो त्यांचा राहील.

**मा. सभापती :** झोन ३ च्या कॅशिअरची स्पष्ट लिहून दिलेले होते की, होय पैसा मी माझ्या खाजगी कामासाठी वापरला आहे आणि दुसऱ्या झोनमधील कर्मचाऱ्याने कॅश आजचे उदया भरलेले आहे. हा फरक आहे. त्यांनी वैयक्तिक काहीही केलेले नाही.

**श्री. हमीद ताबा :** संबंधित झोन - ३ च्या कॅशिअरचे खरे न सांगता अशाच प्रकारे आजचे उदया भरती असे म्हणाला असता तर झाले असते. परंतु तो खरा बोलला म्हणून त्याला निलंबित करण्यात आले. ही पध्दत आहे काय?

**उप. आयुक्त - १ :** संबंधित कर्मचाऱ्यांने स्पष्ट सांगितले की, मी गेले ३ महिनेपासून रु. १२,०००/- माझ्या खाजगी कामासाठी खर्च केले. त्यावेळी मी त्यास समज दिलेली होती. कॅश कमी निघाली नाही.

**मा. सभापती** : ही बाब गंभीर स्वरुपाची आहे.

**श्री. हमीदउद्दीन ताबा :** काही अधिकाऱ्यांच्या आजच बदल्या केलेल्या आहेत ज्या की ते स्वत: दोषी आहेत. त्यांचे बाबतीत आजच चौकाशी करावी नसता मी उपोषणचा मार्ग पत्करीन.

**उप आयुक्त - १ :** नुकत्याच मा. आयुक्त यांनी वर्ग - २ च्या अधिकाऱ्यांना बदल्या दिल्या त्यांचे बाबतीत बढत्या देत असतांना गोपनीय अहवाल सी. आर. पाच वर्षाचे व इतर कामाची तपासणी केली जाते. त्यानंतरच बढती बाबत प्रशासन विचार करते. त्या व्यतिरिक्त आणखी काही असल्यास सांगावे त्यांची चौकशी करण्यात येईल.

**श्री. गौतम खरात :** काही अधिकाऱ्यांना कार्यालयाने निलंबित केल्यानंतर सहा महिने चौकशी अधिकारी चौकशी पूर्ण करीत नसेल व त्याही पेक्षा दोन दोन वर्ष लावत असल्यास त्या चौकशीसाठी प्रमोशन थांबवावे का? संबंधित चौकशी अधिकाऱ्यांने दोषी असल्याचे अहवाल वेळेच्या आत द्यावयास पाहिजे या कामी वरीष्ठाच्या सुध्दा चुका आहेत त्याकडे लक्ष दयावयास पाहिजे.

**मा. सभापती** : म्हणून श्री. जयवल यांचे बाबतीत जो निर्णय घेतला त्यासाठीच शासनाचा जी. आर. नुसार आपण निर्णय घेतला आहे. एका वर्षाच्या आंत जास्तीत जास्त चौकशी होणे आवश्यक आहे. नसता ती चौकशी खारीज होते.

**डॉ. भागवत कराड :** एखादया कर्मचाऱ्याने गुन्हा केलेला असल्यास त्याबाबत चौकशी एका महिन्याच्या आत व्हायला पाहिजे किंवा वेळ वाढवून घ्यावा त्याची पूर्णपणे चौकशी होईपर्यंत कामावर घेऊ नये.

**मा. सभापती** : ज्या कर्मचाऱ्यांना प्रशासन निलंबित करतो त्याची चौकशी सहा महिन्यांच्या आंत करावयास पाहिजे.

**श्री. गौतम खरात, श्री. हमीद ताबा :** ज्या अधिकाऱ्यांना चौकशी अधिकार म्हणून नेमणूक दिली जाते त्यांचीच चौकशी चालू असते हे लक्षात दयावे.

**उप आयुक्त - १ :** ज्या अधिकाऱ्यांकडे चौकशी दिलेली आहे. त्यांनी एक तर सहा महिन्यांच्या आत चौकशी पूर्ण व्हावयास पाहिजे किंवा उशीर लागत असल्यास वेळ वाढवून मागावा.

**डॉ. भागवत कराड :** मागे सुचना केल्याप्रमाणे चौकशी प्रकारात एखादया बाहेरील डेप्युट केलेला अधिकारी नेमावा व नंतर चौकशी करावी. कारण येथीलच अधिकारी असल्यास कर्मचाऱ्यांचे एकमेकांशी लागे बांधे असू शकतात. त्यासाठी रिटायर्डजज असतात त्यांची नेमणूक व्हावी व वेळवेतच चौकशी होईल.

**मा. सभापती** : सदरील चर्चेचा प्रस्ताव मंजूर करावा व मानधनावर हे काम दोन रिटयर्ड जन यांना देवून प्रशासनाने कार्यवाही करावी.

**उप आयुक्त - १ :** इतर कार्यालयामध्ये विभागीय चौकशी कार्यालय वेगळे स्थापन केलेले आहे. त्यामध्ये चौकशी अधिकारी एक व त्यानंतर सादरकर्ता अधिकारी एक

आणि त्यानंतर त्यांचा लिपिक वर्गीय कर्मचारी वर्ग असतो. हा त्या कार्यालयातीलच स्थापन केलेला विभाग वेगळा असतो.

**श्री. अ. रशिद खान (मामू) :** यासाठी शासनाची मंजूरी घेणे आवश्यक आहे.

**डॉ. भागवत कराड :** उप आयुक्त साहेबांनी सांगितल्याप्रमाणे आपल्याच कार्यालयात विभागीच चौकशी कार्यालय असावे. परंतु त्यात बाहेरील डेप्युट केलेला रिटायर्ड जजच असावयास पाहिजे. तरच चौकशी निपक्षपणे होऊ शकेल.

**मा. सभापती** : याबाबत विधी सल्लागार यांनी अभिप्राय द्यावेत.

**विधी सल्लागार :** याबाबतचा निर्णय सर्वसाधारण सभाच घेऊ शकते. याच उदाहरण द्यावयाचे झाल्यास मुंबई महानगरपालिकेने तेथील उप आयुक्त श्री. गो. रा. खैरनार यांचे बाबतीत सर्वसाधारण सभेनेच निर्णय घेतलेला होता.

**मा. सभापती** : ठिक आहे. याबाबतचा निर्णय सर्वसाधारण सभेत घेण्यात येईल. त्यापुर्वी पुढील बैठकीत सर्व तपशीलासह स्थायी समितीस माहिती सादर करावी.

**श्री. हमीदउद्यीन ताबा :** बालवाडी शिक्षिका भरतीत फार मोठया प्रमाणात भ्रष्टाचार झालेला आहे. कारण या मुलाखतीस इयत्ता ४ थी, ७ वी व मॅट्रीक तथा ग्रॅज्युएट वाल्यानांही बोलावण्यात आले होते. तसेच डी. एड. पास असलेल्यांनाही बोलाविले आणि परीक्षा मात्र तोंडी घेण्यात आली. ही. मुलाखत लेखी स्वरुपाची घ्यावयास पाहिजे होती. तेव्हा अधिकृत मुलाखती घेतल्या गेल्या त्यामुळे या मुलाखती रद्द करण्यात याव्यात.

**मा. सभापती** : तुमची मागणी विचारार्थ घ्यावयास हरकत नाही. परंतु महापालिकेची रिक्रुटमेंट आहे काय?

**उप आयुक्त - २ :** महापालिकेमध्ये बालवाडी शिक्षकांचे भरती करीत आहोत त्या परमंट पदावर असून महापालिका फंडातून " मानधनावर " भरती करीत आहोत. रु. ५००/- दरमहा मानधनावर.

**श्री. हमीदउद्दीन ताबा :** प्रश्न तो नसून आपण जी जाहिरात दिली त्यामुळे फार मोठया प्रमाणात अशी आहे. त्यामध्ये ४ थी पास पासून ग्रॅज्युट व डी. एड. वाले सुध्दा आलेत. त्यामध्ये संबंधिताची लेखी व तोंडी परीक्षा घ्यावयास पाहिजे होती. परंतु प्रत्यक्षात तोंडी परीक्षाच घेतली. ती अनाधिकृत आहे व ती रद्द करावी.

**मा. सभापती** : सदरची भरती महापालिकेची असेल तर नियमानुसारच व्हायला पाहिजे प्रथमतः लेखी व नंतर तोंडी परीक्षा घेऊनच.

**उप आयुक्त - २ :** बालवाडी शिक्षिका यांची शैक्षणिक पात्रता कमी एस. एस. एस. पास आहे. आणि मानधनावरील असल्याने आतापर्यंत तरी लेखी परीक्षा न घेता तोंडी परीक्षा घेऊनच भरती केलेली आहे जर तसे आदेश दिल्यास त्याप्रमाणे कार्यवाही करता येईल.

**श्री. हमीदउद्दीन ताबा :** गेल्या तीन दिवसापासून बालवाडी शिक्षकांच्या मुलाखती झाल्या व त्यामुळे एकच गर्दी झाली होती. मुलाखतीच्या पध्दती काय असतात. प्रशासनास माहिती नाही काय तेव्हा झालेली मुलाखत योग्य नसून प्रशासनाने मनमाणी केलेली आहे व त्यामध्ये फार मोठया प्रमाणात भ्रष्टाचार झालेला आहे. हा माझा आरोप आहे.

**डॉ. भागवत कराड :** माझ्याकडे सुध्दा काही लोक आलेत मी सुध्दा निवड समिती सदस्यांना भेटावे असे वाटले परंतु असे समजले की, बालवाडी शिक्षकांच्या मुलाखतीसाठी ज्या विद्या

र्थ्यांनींना एस. एस. सी. मध्ये ८०% कमी च्यापुढे मार्कस आहेत त्यांना १ मार्क असे ७० पर्यंत व पुढेही एक प्रमाणे मार्कस देणार म्हणजे ७०% कमी पर्यंत गृहीत धरल्यास ३० मार्कस होतात व तोंडी मुलाखती साठी निवड समितीस प्रत्येकी दोन मार्कस असे जर असेल तर, भ्रष्टाचार झाला असे म्हणणे योग्य नाही.

**उप आयुक्त -१ :** आयुक्त साहेबांचा प्रतिनिधी म्हणून मी सांगतो आपल्याकडे बालवाडी शिक्षकांची २० जागांची भरती करावयाची होती व त्याप्रमाणे जाहीरात देण्यात आली त्यात शैक्षणिक पात्रता म्हणून एस. एस. सी. पास व बालवाडी कोर्स पास असावा. त्याप्रमाणे आपल्याकडे अर्ज प्राप्त झालेत व त्याही पुर्वी काही ४०० अर्ज आलेले होते. त्यानुसार अर्जाची छाननी केली. काही अर्जदारांनी सोबत प्रमाणपत्र तर काहींना दिलेले नव्हते. वेळ कमी असल्याने व स्क्रुटनीस उशीर होत असल्याने सगळयांच उमेदवारास मुलाखतीसाठी बोलाविण्यात आले आता, आपण म्हणता की, १) जे अपात्र व्यक्ती आहेत त्यांना नजर चुकीने मुलाखत पत्र गेलेली असे गृहीत धरुया २) मा. सभागृह नेता यांनी मागणी केली की, या भरती बाबत लेखी परीक्षा ८ घ्यावी. या भरतीचे निवड समितीचे अध्यक्ष उप आयुक्त -२ , मी स्वतः व मुख्य लेखा परीक्षक, शिक्षणाधिकारी तसेच प्रकल्प संचालक यांनी मिळून मा. आयुक्त यांचेशी चर्चा केली. मुलाखतीचे पत्र वाढविण्यात आलेले आहे. आता मुलाखत घेण्याकरीता वेळ नाही. तेव्हा बालवाडी शिक्षिका या तीन तासासाठी काम करतात व ४ ते ५ वर्ष वयोगटातील मुलांना शिकवितात तेव्हा त्यांचे बोलण्यावरुन व त्यांना एस. एस. सी. मध्ये मिळालेल्या गुणांवरुन तसेच बालवाडी कोर्सला कोणत्या ग्रेडने पास आहे. त्यावरुन मुलाखत घेण्याचे ठरले ते खालील प्रमाणे.

**१)** एस. एस. सी. पास ४०% असल्यास एकही मार्क नाही. व त्यावर ४१ पासून पुढे जितके असल्यास व मार्कस वाढवावे. म्हणजे ७०% पर्यंत ३० मार्कस.

२) बालवाडी कोर्स व ग्रेडने असल्यास १० मार्कस व ब ग्रेडने असल्यास ५ मार्कस सी ग्रेडला एकही मार्क नाही.

३) निवड समितीच्या पाच सदस्यांना प्रत्येकी दोन मार्कच देण्याचा अधिकारी प्रत्येकी ठेवलेला होता. यामध्ये प्रत्येकांना जास्तीत जास्त ४ ते ७ मार्कस सदस्यांकडून मिळालेले आहेत म्हणजे ५० मार्कसपैकी ही तोंडी परीक्षा घेण्यात आली होती.

४) यातही शासनाने ठरवून दिलेल्या शेस्टर पध्दत अवलंबण्यात आली.

५) निवड समितीने अंतिमरित्या यादी तयार करुन नोटीस बोर्डवर १५ दिवसांचा कालावधी पर्यंत कुणाचे काहीही असल्यास ते नोंदविण्यासाठी जाहीर करण्यात आले.

**श्री. हमीदउद्दीन ताबा :** काही अर्जावर नांवे डुप्लीकेट व मार्कस जादा वाढवून आपल्या समोर मुलाखतीसाठी आलेले आहेत त्यांचे काही फोटो त्याठिकाणी प्रमाण पत्रावर नाहीत. ही पध्दतच मुळात चुकीची आहे.

**उप आयुक्त - १ :** यासाठीच काही आक्षेप असल्यास देवू शकत वेळ गेलेला नाही. ही मुलाखत ऐनवेळी घेऊन एस. एस. सी. चे मुळ मार्कस पाहावयाचे ठरले.

**डॉ. विजयकुमार :** बालवाडी शिक्षिकेला लिहीता वाचता येणे आवश्यक आहे. त्यासाठी शुध्दलेखन म्हणून त्यांची लेखी परीक्षा घ्यावयास हवी होती.

**श्री. भगवान घडामोडे :** कॉप्या करुन पास झालेले बरेचसे विद्यार्थी आहे.

**श्री. हमीद ताबा :** माझे एकच म्हणणे आहे की, जी मुलाखत झाली त्यास भ्रष्टाचार झालेला आहे. बऱ्याचशा व्यक्तींनी मार्कस वाढवून आणलेले होते व त्यांचीच निवड केलेली आहे. यास्तव केलेली भरती रद्द व्हावी.

**उप आयुक्त - १ :** स. स. श्री. घडामोडे यांनी सांगितल्याप्रमाणे एस. एस. सी. मध्ये कॉप्या करुन पास झालेले आहेत व मार्कस जास्तीचे मिळाले आहेत. असे जर असेल तर मेडीकल व इंजिनिअरींगला नंबर लागल्या जातो तो शासनाने हीच पध्दत मेरीट लिस्टप्रमाणेच नंबर लावतात मग ती पध्दत चुक आहे काय? तेथे लेखीपरीक्षा घेण्यात येत नाही.

**सौ. रजनी जोशी :** २० जागांसाठी ४०० लोकांचे अर्ज आलेत तेव्हा बेकारी किती वाढली हे लक्षात येते.

**श्री. रशिद मामू :** आपण जाहिरात काय म्हणून दिल. एस. एस. सी. पास म्हणून आणि मुलाखतीसाठी ४ थी पास वाल्यांना का बोलाविले?

**उप आयुक्त - १ :** अवधानाने मुलाखतपत्र दिल्या गेलेले असेल.

**श्री. हमीद ताबा :** आमची एकच मागणी आहे. ही निवड केलेली यादी रद्द करावी.

**श्री. रशिद मामू :** एस. एस. सी. पास असणारे व्यक्तीच बालवाडी शिक्षकांना सांभाळतात मग ४ थी पास वाले शिक्षिका सांभाळून शकत नाही.

**डॉ. भागवत कराड :** प्रशासनाने केलेली पध्दत माझ्या मते योग्य वाटते.

**मा. सभापती :** प्रशासनाने बाबतचा गांर्भीयाने विचार करुन यापुढे अशा चुका होणार नाही. याची दखल घ्यावी.

**श्री. हमीद ताबा :** मी प्रशासनाचा निषेंध करतो की, या बालवाडीत भरती झाली ती पुन्हा मुलाखती घेऊन निवड करावी त्यासाठी मी सभात्याग करीता आहे. (वेळ अंदाजे १.२५)

**मा. सभापती :** ००.५ मिनीटांसाठी सभा तहकूब करण्यात येते. (स. सदस्य श्री. हमीद ताबा यांचा सभागृहात प्रवेश १.३० वा प्रवेश)

**श्री. रशीद मामू :** बालवाडी शिक्षिका म्हणून संगिता देवरे यांना कोणत्या जातीत घेतलेले आहे याची माहिती दयावी.

**उप आयुक्त - ३ :** संगिता देवरे या एस. टी. या जातीतील म्हणून यादीत समाविष्ट आहेत.

**श्री. रशीद मामू :** त्या एस. टी. जातीत येत नाहीत. एन. टी. मध्ये येतात आपण त्यांचे कागदपत्रे पून्हा तपासवीत व चौकशी करावी.

**उप आयुक्त - २ :** ठिक आहे तसे काही आढळल्यास चौकशी करण्यात येईल.

**श्री. सुभाष टाकळकर :** पाणी पुरवठा लाईनमनच्या ५० जागा रिक्त होत्या पैकी त्यातील ४० जागांवर लाईनमनच्या लोकांना का भरले.

**मा. सभापती :** संबंधित अधिकाऱ्यांनी खुलासा करावा.

**उप आयुक्त - २ :** शासनमान्य ५० जागा लाईनमनच्या आहेत त्यातील १३ जागा रिक्त आहे. मा. आयुक्त साहेब आल्यानंतर त्याबाबत कार्यवाही करण्यात येईल.

**मा. सभापती :** माझ्याकडे संबंधित कर्मचाऱ्यांनी दिलेले निवेदन दिले त्यामुळे मला माहिती मिळाली.

**उप आयुक्त - २ :** ८० जागा शासनाने ठरवून दिलेल्या बिंदूप्रमाणे भरण्यात आलेल्या आहेत. व मनपा सेवा भरती नियमाप्रमाणे कार्यवाही करण्यात येईल.

**मा. सभापती :** आपल्याकडे पाणी पुरवठा मध्ये काम करणारे लाईनमन असे आहेत तसेच मेकॅनिक विभागात सुध्दा दुरुस्तीसाठी काम करणारे लाईनमन म्हणून दहा

वर्षापासून कार्यरत आहेत. त्यांनाही मनपाचे सेवा भरती नियमान्वये घ्यावयास पाहिजे व समय श्रेणी / निवड श्रेणी द्यावयास पाहिजे. त्यांना विना कारण त्रास देऊ नये. नियमाप्रमाणे कार्यवाही करावी.

**श्री. हमीद ताबा :** शिक्षण विभागात गेल्या १५ वर्षापासून चौकीदाराच्या पदावर कर्मचारी काम करीत आहेत. परंतु त्यांचे बाबत अद्यापही कार्यवाही का झालेली नाही.

**श्री. महादेव सुर्यवंशी :** मनपाचे सेवा भरती नियमान्वये कर्मचाऱ्यांसाठी समयश्रेणी / निवड श्रेणी भरती करतो काय?

**मा. सभापती** : आपण मनपात सेवा भरती नियमान्वये कार्यवाही करतो काय?

**श्री रशिद मामू :** आपल्याकडे शासनाने मान्य केलेले ११ वर्षाचे की ७ वर्षाचे कर्मचाऱ्यांसाठी समयश्रेणी / निवडश्रेणी देण्याचे बाबतीत मान्य करतो याची माहिती दयावी.

**उप आयुक्त - १ :** शासनाने मान्य केल्याप्रमाणेच कार्यवाही होत आहे.

**श्री. महादेव सुर्यवंशी :** वर्ग ३ व वर्ग ४ च्या कर्मचाऱ्यांना आर. आर. प्रमाणे नियम लागू करुन कार्यवाही सध्या येत आहे काय?

**मा. सभापती** : आपल्याकडे सन १९९४ पासून आर. आर. लागू करण्यात आलेले आहेत. तेव्हा लाईनमनची पदोन्नती देतांना नियमाप्रमाणे ते लागले तेव्हापासून दहा वर्षाचे धरले की आतापासून धरले याची माहिती दयावी.

**उप आयुक्त - २ :** पाणी पुरवठयाचे लाईनमनचे पदाकरीता पदोन्नती बाबत त्यांची सेवा अंखडीत दहा वर्षाची झालेली असेल त्यांनाच याबाबत विचार करण्यात येतो.

**श्री. रशिद मामू, श्री. महादेव सुर्यवंशी :** वर्ग - ३ व वर्ग - ४ च्या कर्मचाऱ्यांना मनपाचे आर. आर. प्रमाणे कार्यवाही करावी. कुणावरही अन्याय होता कामा नये. सर्व कर्मचाऱ्यांसाठी सारखाच नियम असावयास पाहिजे.

**मा. सभापती** : मनपा सेवा भरती नियम ही सर्व कर्मचाऱ्यांसाठी सारखीच असावयास पाहिजे.

**श्री. गौतम खरात :** दि. ३०-०७-९६ रोजी स्थायी समिती सभेची बैठक झाली. तीत मनपाचे आर. आर. बाबतीत निर्णय झालेले आहे. त्याची अंमलबजावणी व्हावी.

**मा. सभापती** : बरोबर आहे. एकदा प्रस्ताव पारीत झालेला आहे. त्याप्रमाणे प्रशासनाने कार्यवाही करावी.

**उप आयुक्त - १ :** वर्ग - ३ व वर्ग - ४ चे कर्मचाऱ्यांबाबत शासनाकडून आलेल्या सेवा भरती नियमाबाबत एका समितीची बैठक घेऊन ज्या कुणा कर्मचाऱ्यांना काही आक्षेप घ्यावयाचे किंवा नियमान्वये बदल करावयाचा आहे काय? याबाबत कर्मचाऱ्यांसाठी परीपत्रक काढूम माहिती मागविलेली आहे. ही माहिती यासाठी मागविली की, अनेक कर्मचारी विविध प्रकारे मागण्या करीत होते. त्याबाबत मा. आयुक्त यांचेशी चर्चा करुन असे सांगितले की, शासनाने नियमा प्रमाणे १२ वर्षाचे कर्मचाऱ्यांना पदोन्नतीनुसार समयश्रेणी / निवडश्रेणी द्यावी. परंतु आपल्या मनपामध्ये सेवा भरती नियम ७ वर्षाची केलेली आहे. त्यासाठी आर्थीक बोजा होणार असल्याने पुन्हा सर्वसाधारण सभेकडे मंजुरीस्तव पाठवावे असे म्हटले आहे. त्यानुसार कार्यवाही करण्यात येईल.

**मा. सभापती** : याबाबत प्रशासन नव्याने पॉलीसी डिसाईड करीत आहे काय? आर्थिक बाबींचा प्रश्न आहे तर, कुणाकडे जाते. स्थायी समितीने जेव्हा आर्थिक बाबीचा विचार करुनच कर्मचाऱ्यांचे सेवा भरती नियमान्वये एकमताने प्रस्तावास मंजूरी दिली आहे. तेव्हा पुन्हा सर्वसाधारण सभेकडे पाठविण्याचा

प्रश्न करता येतो. नियमाप्रमाणे सदरील प्रस्ताव स्थायी समितीच्या अखत्यारीतच आहे आणि तो स्थायी समंत केलेला आहे. प्रशासनाने त्याची अंमल बजावणी करावी. नाहीतर स्थायी समितीला न विचारात घेता सर्वसाधारण सभेकडे प्रस्ताव पाठविला जातो. आर्थिक बाबतीत निर्णय घेण्यासाठी आम्हास अधिकार नसेल तर सरळ सर्वसाधारण सभेकडे प्रस्ताव प्रशासनाने पाठवित जावे. वेळ काढूपणा करु नये.

**श्री. महादेव सुर्यवंशी :** ज्यावेळेस ४० लाईनमनला बढती आर. आर. प्रमाणे दिली १९९४ ला त्यावेळेस हा प्रश्न दुरुस्तीचा प्रशासनाला भेडसावला नाही काय? आज हा प्रश्न आता का येतो. आता सर्वसाधारण सभेकडे प्रस्ताव पाठविला जाईल नंतर इतिवृत्त कायम होईल त्यानंतर पुन्हा शासनाकडे असा प्रवास घेऊन लांबणीवर पडण्यापेक्षा यापुर्वीच दुरुस्त्यासाठी आक्षेप वगैरे मागवून प्रशासनाने कार्यवाही का केली नाही. आता आक्षेप मागविण्याचे कारण काय?

**मा. सभापती :** एखादा प्रस्ताव मंजूर झालेला आहे. आता आर. आर. वरती आक्षेप वगैरे कोणत्या नियमाच्या आधारे मागतो. कोणत्या नियमान्वये मनपा काम करते. ज्यावेळेस आर. आर. प्रारुप मध्ये होते. त्यावेळेस आक्षेप मागविले गेले होते. त्यावेळेस हिअरींग घेऊन आर. आर. फायनल झाले. आता फायनल आलेला आर. आर. ज्यावर राज्यपालांची स्वाक्षरी आहे व तो शासनाने अध्यादेश काढून बाहेर काढलेला आहे तो मान्य करुन त्यामुळेच कर्मचाऱ्यांना प्रमोशन व भरत्या करता व आता वर्ग - ३ व वर्ग - ४ च्या प्रश्नाबाबत तुम्हाला चौकशी करावीशी वाटली. शिवाय सर्वसाधारण सभेकडे प्रस्ताव पुन्हा पाठविण्याचा विचार प्रशासन करते आहे. या मागचा विचार काय आहे. आणि कारण काय? काही दुरुस्त्या किंवा अमेंडमेंन्ट करावयाचे असतील तर प्रशासनाने प्रस्ताव सर्वसाधारण सभेपुढे ठेवावे ते होत राहतील. परंतु त्यांनी समितीने दिलेला निर्णय अंतिम आहे.

**उप आयुक्त - १ :** आपणच त्यावेळी आम्हाला विचारात न घेता प्रशासनाने मनमानी केली याची चौकशी व्हावी असे सुचित केल्यामुळे.

**मा. सभापती :** आर. आर. मध्ये अमेंडमेंट करुन कुणाला काम दयावयाचे ते ठरवावे आर. आर. १९९४ नंतर दिलेले सर्वांचे रद्द करावे. म्हणजे एकाला आर. आर. लावायाचे व दुसऱ्याला दुसरा नियम लावायचा हे योग्य वाटत नाही. व ते मनपामध्ये आम्ही चालू देणार नाही. या प्रकरणात कर्मचाऱ्यांच्या सेवा भरती नियमांस ७ वर्षाची निवडश्रेणी व १५ वर्षाची समयश्रेणी मध्ये जर कर्मचारी आंदोलन करण्याचे पावित्र्यात असतील तर या मनपाचा सभापती म्हणून उदयाला कर्मचाऱ्या सोबत याची नोंद घ्यावी. मी प्रशासनाला मदत करणार नाही. कारण प्रशासन दोन बाजूने चालते ते मी काहीही मान्य करणार नाही.

**श्री. गौतम खरात :** आर. आर. ७ वर्षाचे लागू करणेबाबत खर्चाचा बोजा किती पडणार आहे याचा खुलासा व्हावा.

**मा. सभापती :** याबाबत अनेकदा विचारणा करण्यात आलेली आहे.

**श्री. गौतम खरात :** मागील वेळेस २.८० लाख बोजा पडणार आहे. अशी माहिती मिळाली होती. असे जर असेल तर कर्मचाऱ्यांना याचा लाभ देण्यास काही हरकत नाही.

**मा. सभापती** : विधी सल्लागार यांनी अभिप्राय द्यावेत.

**विधी सल्लागार** : कर्मचारी सेवा भरती बाबत आधी स्थायी समिती व नंतर सर्वसाधारण सभेत चर्चा झालेली आहे.

**मा. सभापती** : आर. आर. अगोदर मंजूर करावे व नंतर दुरुस्त्या करावे. अगोदर निवडश्रेणी / समयश्रेणी देवून नंतरच शासनाला पाठवावे.

**विधी सल्लागार** : यामध्ये दुरुस्ती करावी असे स्थायी समिती आणि सर्वसाधारण सभेत स. स. चे गफलत झालेली आहे. याबाबत मा. आयुक्त यांचेशी चर्चा झालेली आहे की, याबाबत काही कर्मचाऱ्यांचे आक्षेप आहेत काय? याबाबत एक समिती तयार करुन कर्मचाऱ्यांकडून या दुरुस्त्या बाबत परिपत्रक काढुन मागविण्यात आले आहे. आणि त्यानुसार एकदा बदल किंवा दुरुस्ती झाली की, स्थायी समिती व नंतर सर्वसाधारण सभेकडे विचारार्थ राहील. यामध्ये काही बदल करावयाचे असेल तो अधिकार सभागृहाला आहे. त्याच्यात बदल आपल्या भावने प्रमाणे बदल प्रस्तावित केलेला आहे. जो पर्यंत नविन नियम (अमेंडमेंट) होत नाहीत, तो पर्यंत हे नियम तसेच राहणार आहेत त्यात बदल होणार नाही. त्याप्रमाणे याचा फायदा कर्मचाऱ्यांना देणे आवश्यक आहे.

**मा. सभापती** : प्रशासनाच्या मनात येईल तेव्हा फायदा कर्मचाऱ्यांना देणार काय? स्थायी समिती सांगेल तेव्हा नाही. ते आम्हाला मान्य नाही. स्थायी समितीने मंजूरी दिली त्याप्रमाणे कार्यवाही व्हावी.

**विधी सल्लागार** : सदरच्या बाबतची संचिका मा. आयुक्त यांचेकडे गेलेली आहे.

**श्री. महादेव सुर्यवंशी, श्री. गौतम खरात** : लेखा विभागाने खर्चाचे बाबतीत अद्यापही माहिती दिलेली नाही.

**मा. सभापती** : अमेंडमेंट दुरुस्तीसाठी आमचा विरोध नाही स्थायी समितीमध्ये गेल्या ३-४ महिन्यांपासून सारखा प्रश्न गाजतो व आम्ही यावर निर्णय देतो की, या कर्मचाऱ्यांना सर्व सुविधा महानगरपालिकेतर्फे द्या सर्व एरिअर्स देवून टाका हे न करता आर. आर. प्रमाणे लाईनमनची भरती करुन घेतली. मग बाकीच्यानाच का त्रास दिल्या जातो. बाकी कर्मचारी घडीघडी निविदने देऊन विचारणा करतात व आम्ही निर्णय देवून मोकळे झालो तरीही प्रशासनाने कार्यवाही केलेली नाही. म्हणजे स्थायी समितीच्या आदेशाला अर्थ नाही.

**श्री. रशीद खान (मामू)** : शासनाकडील (एफ. डी.) फायनान्स डिपार्टमेंट ची आर. आर. ला मंजूरी नाही. त्यामुळे अडचणी येत आहे. असे समजले आपल्याकडे काही आर्थिक बाबतीत अडचणी येतात तर एफ. डी. ची मंजुरी न घेतल्यास शासन विचारणा करेल यासाठी गेल्या दोन तीन महिन्यापासून यावर उशीर होत आहे.

**मा. सभापती** : शासनाकडी फायनान्स डिपार्टमेंट (एफ. डी.) ने मंजुरी दिलेली आहे की, नाही यावर राज्यपालांनी स्वाक्षरी करुन अध्यादेश काढलेला आहे. याची पाहणी करण्याचे काम शासनाचे.

**श्री. गौतम खरात** : इतिवृत्तातील पान क्र. ४ वर सभापतींच्या तोंडी आर. आर. बाबत सर्वसाधारण सभेत शिफारस करण्यात येईल असे वाक्य आहे त्याच काय?

**मा. सभापती** : हे वाक्य मी वाचलेले आहे. आणि चुकीचे शब्द माझ्या वाक्यात टाकण्यात आलेले आहे असे मी बोललो नाही यात दुरुस्ती करावी.

**श्री. रशिद खान (मामू) :** पैठण रोडवर सिल्क मिल कॉलनी आहे. त्या ठिकाणी एक शाळा आहे. शाळेच्या पाठीमागे फार मोठा ग्रांऊंउ आहे. आता सध्या आपल्याला त्याचे रेकॉर्ड मिळत नाही आणि १ रु. किरायाने त्यांना जमिन दिलेली होती आणि आपली जमिन सदरील संस्था घेत आहे आणि या बाबतचा रेकॉर्ड आपणास मिळत नाही आहे. त्यांचे कडे आहे.

**मा. सभापती** : स. संचालक नगर रचना यांनी खुलासा करावा.

**स. स. नगररचना :** सदरची जागा शासनाकडून महानगरपालिकेस प्राप्त झाली आहे.

**मा. सभापती** : याबाबत उप आयुक्त - १ यांनी सविस्तर चौकशी करुन पुढील बैठकीस माहिती द्यावी.

**श्री. रशिद खान (मामू) :** सदरची जमिनी बाबत महानगरपालिकाचा हक्क आहे. शासकीय नियमा प्रमाणे १९७१ ॲक्ट सेक्शन ५, ६, ७, ८ नुसार आपण ही जमिन होऊ शकतो या जमिनी बाबत जिल्हाधिकारी कार्यालयाकडे पत्राने कळवावे की, ही जमिन आमच्या ताब्यात देण्यात यावे सदरची जमिन रिझर्वेशनची असून, शासनाचे डायरेक्शन नुसार जिल्हाधिकारी कार्यालयाकडे संपर्क साधून पत्राने कळवावे १९८३ ला ही जमिन महानगरपालिकास देवू केली होती पुन्हा नंतर १९८८ ला शासनाने परत मागितली परंतु आता असे झाले आहे की, ही जमिन सदरील संस्था स्वत:चा फायदयासाठी वापरुन जमिन बळकाविण्याचा प्रयन्त करेल. यासाठी त्याच्या बाजुला महानगरपालिकेतर्फे आरोग्य केंद्र होणार आहे. आणि त्या ग्रांउडचा उपयोग खेळण्यासाठी येईल. विनाकारण संस्था शासनाकडून विकत घेईल आणि महानगरपालिकेच्या मालकिची जागा ताब्यातुन निघुन जाईल यासाठी महानगरपालिका व जिल्हाधिकारी यांना दोघांनाही पार्टी करुन कोर्टात जाण्याची तयार आहे याबाबत महानगरपालिकेतर्फे मा. जिल्हाधिकारी यांना या संदर्भात पत्राने कळवून कार्यवाही करावी किंवा आपणास काही स. स. एकत्र जाऊन बोलणी करावी. याबाबत सहा संचालक नगर रचना व विधी सल्लागार यांना याची कल्पना आहे.

**मा. सभापती** : सहा संचालक नगर रचना उप आयुक्त - २ व मालमत्ता अधिकारी यांनी एकत्रिक माहिती पुढील बैठकीत द्यावी व मा. जिल्हाधिकारी यांचेकडे पत्राने विचारणा करावी.

**श्री. रशिद खान (मामू) :** स. स. श्री. विखारोधीन यांचे सुचने नुसार काही स. स. ना सोबत घेऊन मा. जिल्हाधिकारी कार्यालयात भेट घेऊन चर्चा करावी.

**मा. सभापती** : ठिक आहे काही स. स. आपल्या सोबत येतील आपण जाऊन प्रत्यक्षात चर्चा करावी या बाबत आपल्या कडे जमिन विकल्याचे रेकॉर्ड आहे घेतल्याचे नाही.

**श्री. रशीद खॉन :** अशा प्रकारे दोन जमिनी देण्यात आलेले आहे. १) बारुदगर नाल्याची जमिन व दुसरी सिल्कमिल कॉलनीतील जमिन महानगरपालिकेची शासनाने घेतली यामध्ये काहींना काही तरी झालेले आहे. रु. १/- किरायाने कुणी जमिन देणे आहे काय? याबाबतचा सर्व रेकॉर्ड आहे काय ते पहावे.

**श्री. हमीदउद्दीन ताबा :** बारुदगर नाल्याची बाबत चौकशी व्हायला पाहिजे व त्याची माहिती पुढील बैठकीत द्यावी.

**मा. सभापती** : एम. आय. टी ची ॲक्ट प्रमाणे शासनाला अधिकार आहेत सिल्क मिल कॉलनीची जागा ओरीजनल आपली आहे मी आताच उप आयुक्त यांचेशी

चर्चा केली तीतही संपूर्ण माहिती पुढील बैठकीत घेण्यात येईल. कर्मचाऱ्यांचे आर. आर. बाबतीत समय श्रेणी / निवडश्रेणी साठी अमेंडमेंट करावयाचे असल्यास सर्वसाधारण सभेत करावे परंतु कर्मचाऱ्यांनी जी मागणी केलेली आहे की, सात वर्ष ज्या कर्मचाऱ्यांला एकाच पदास १९९४ ला पुर्ण होतात त्यास त्याला वेतनश्रेणीचा वेतनश्रेणी व त्याला १५ वर्ष झाले त्यास समय श्रेणीची वेतनश्रेणी देण्यात यावी. हे आपल्या आर. आर. प्रमाणे आहेत. त्याची अंमलबजावणी त्वरीत व्हावी हे प्रकरण सर्वसाधारण सभेकडे पाठविण्याची आवश्कता नाही कारण हे आर्थिक प्रश्नाचा भाग असल्याने आम्ही त्यास मंजुरी देत आहोत. तसेच आर. आर. च्या प्रति सर्व स. स. ना द्याव्यात व हे प्रकरण त्वरीत निकाल काढावे.

**श्री. रशीद खान (मामू) :** ड्रायव्हरच्या बाबतीत काय झाले?

**मा. सभापती** : ड्रायव्हरच्या बाबती प्रशासकीय प्रस्ताव यावयास पाहिजे होता.

**श्री. गौतम खरात :** शासनाचा नियमाप्रमाणे जे उप अभियंता अधिकारी / कर्मचारी आहेत. त्यांना पुढील वेतन श्रेणी देणे बाबत कार्यालयाने अद्याप काहीही कार्यवाही केलेली नाही आणि १६ अधिकाऱ्यांचे वेगवेगळे आहे.

**श्री. महादेव सुर्यवंशी :** बऱ्याचशा संचिका लेखा विभागाकडून विलंब होतांना दिसतात एखादया कामाची संचिका अंदाजपत्रकान्वये तयार झालेली असल्यास ती संबंधित उप अभियंता नंतर कार्यकारी अभियंता किंवा शहर अभियंता यांचेकडे येते व नंतर लेखा विभागाकडे बऱ्याच कालावधी पर्यंत पडून राहते याचे कारण काय? म्हणजे कार्यकारी अभियंता किंवा शहर अभियंताचे कडून कामाची फाईल आल्या नंतर त्यांची तपासणी करण्याचा अधिकार कुणाचा असतो.

**मा. सभापती** : विधी सल्लागार यांनी खुलासा करावा.

**विधी सल्लागार :** पुढील बैठकीत देण्यात येईल. कायदयान्वये ही माहिती देता येईल.

**श्री. महादेव सुर्यवंशी :** एखादी संचिका कामाची सुरुवात झाल्यानंतर जवळपास एक ते पाऊण दोन महिने लेखा विभागात पडून राहते यास जबाबदार कोण याची माहिती दयावी.

**मा. सभापती** : याबाबत लेखाधिकारी यांनी खुलासा करावा.

**लेखाधिकारी - १ :** स. स. श्री. सुर्यवंशी यांनी विचारणा केल्यानुसार दि. १६-०८-१९९६ ला संचिका माझे कडे आल्या नंतर दि. १७-०८-१९९६ ला शहर अभियंता व कार्यकारी अभियंता अति शहर अभियंता यांना पत्राने कळविले की, अर्थ संचिका तरतुदीबाबत सदरील माहिती प्राप्त झाल्यानंतरच आलेल्या कामाची संचिका मंजुरी शिफारस करण्यात येईल त्या अनुषंगाने परत मा. आयुक्तांच्या स्वाक्षरीने दि. २-९-९६ ला सुध्दा पत्र पाठविले होते. त्यानंतर माझ्याकडे माहिती प्राप्त झाली. स. स. श्री. सुर्यवंशी म्हणाले की, ३-१०-१९९६ ला माझ्याकडून फाईल आली. त्यांचे म्हणणे बरोबर आहे. त्यात लेखा शिर्षकाखाली अर्थसंकल्पीय तरतुद उपलब्ध नव्हती देखभाल दुरुस्ती मधील संचिका होती त्यास आपण रु. २५ लाखाची तरतुद केलेली होती आणि व जर रिअपुप्रिअेरा करण्यसाठी कार्यकारी अभियंता यांनी जो प्रस्ताव सादर केलेला होता तो टिपनी आम्ही मा. आयुक्त यांचेकडे सादर केला आणि मा. आयुक्त यांचेकडे सादर केला आणि मा. आयुक्त यांना दि. २९-०९-९६ ला बजेट रिअप्रुप्रिअेशन करण्यासाठी आणि त्यानंतर पुर्ण प्रस्ताव माझ्याकडून

वाढविलेले आहे. परंतू सप्लाय आणि ड्रेनेज बाबत तरतुद नव्हती म्हणून फाईल प्रस्तावीत करता आले नाही. मा. आयुक्तांच्या मंजुरी नुसार रु. १ कोटी ८० लाखाचे शिर्षातून बजेट तरतुद करण्यासाठी मला वाटते कार्यकारी यांनी याच सभेत ऐनवेळी ठेवलेला आहे.

**मा. सभापती** : स. स. चे असे म्हणणे आहे की, अंदाजपत्रकाचे व्हेरीफिकेशनचे अधिकार कुणाचे आहे.

**लेखाधिकारी - १ :** १९८३ पासून किंवा इतर महानगरपालिकेची कार्यपध्दती आहे. अंदाजपत्रक कार्यकारी अभियंता यांनी प्रस्तावित केल्यानंतर लेखा विभागात येते व लेखा मार्फत अभिप्राय होऊन मा. आयुक्त यांचेकडे जाते ही पध्दत येथील नसुन १२ ही महानगरपालिकेच्या आहेत. त्यामध्ये कॅशकुमक व जे. एस. आर. दरप्रमाणे आहे काय याची प्रशासकीय करतो.

**श्री. महादेव सुर्यवंशी :** कार्यकारी अभियंता व अति शहर अभियंता यांचे कडील निविदा पध्दती व आताच्या पध्दतीवरच कसा झाला.

**लेखाधिकारी - १ :** पुर्वीची पध्दत अशी होती की, जेव्हा अभियंता विभागामार्फत वेगवेगळया निविदा काढल्या जायच्या आणि त्यामुळे जाहिरातीचा प्रचंड खर्च वाढला जायचा भोगे साहेब प्रशासक असतांना ही जाहिरातीचा खर्च कमी व्हावा म्हणून कन्सोलेटेड टेंडर काढण्याचे पध्दत सुरु केली त्यानुसार लेखा विभागाकडे निविदाचे काम देण्यात आले. तिन्ही विभागाकडून एकदमच १५-२० कामाची एकच निविदा तयार करुन वेगवेगळया वर्तमान पत्रात वेगवेगळया जाहिराती जाण्यासाठी व खर्च आवाढव्य न होण्यासाठी लेखा विभागामार्फत कन्सोलेटेड केला जातो यावरुन मागील वर्षी जवळजवळ रु. २७.०० लाखचा जाहिरातीचा खर्च कमी झालेला आहे.

**श्री. महादेव सुर्यवंशी :** टेंडर मागविल्या नंतर संबंधित गुत्तेदाराने विभागाचे काम असले त्या विभागाच्या अखात्यारित निविदा उघडल्या पाहिजे.

**श्री. सुभाष टाकळकर :** कामाचे संचिके बाबत एक किंवा २ महिने कालावधी पर्यंत संचिका पडून राहिल्यास नागरीक ओरडतात. यासाठी त्वरीत काम झाले पाहिजे जे गुत्तेदार निविदा भरतात ते लायसेन्स होल्डर आहेत की नाही ते पहावे लागते व त्याला काम येवो अथवा न येवो त्याला काम दयावेच लागते नाही तर उद्या ला तो कोर्टात जाऊ शकेल.

**श्री. महादेव सुर्यवंशी :** ज्या विभागाच्या उप अभियंताने अंदाजपत्रक तयार करुन कामाची आखणी करता जर त्याला बजेट मधून काहीही सांगता येत नसल्यास त्यास काय अधिकार आहेत.

**श्री. डॉ. कराड :** त्यांना कामाची क्वॉलीटी पहावी निविदा घेणारा एक विभाग व काम करुन घेणारा दुसरा विभाग ही अशीच कामाची पध्दत ठीक राहील व चांगली राहील फक्त सुधारण म्हणजे एकदा निविदा निघाल्यानंतर लेखा विभाग कडून मंद गतीने होणारो काम जलद गतीने व्हावे.

**श्री. रशीदखान (मामू) :**कामाची तुर्तता लक्षात घेता मा. आयुक्त यांना २.०० लाख आणि उप अभियंता यांना इमरजन्सी म्हणून रु. २५,०००/- अधिकार दयावे म्हणजे कामे तात्काळ होतील.

**मा. सभापती** : ठिक आहे. लेखाधिकारी यांनी त्यांचेकडे आलेल्या कोणत्याही संचिका अधिक कालावधी पर्यंत न ठेवता कमीत कमी वेळेत मंजुरीसाठी पाठवावी याची दखल घ्यावी.

**लेखाधिकारी :** मा. आयुक्ताचें सहाय्यक कडून डायरेक्ट पत्र लेखा विभागाकडे येतात की, स. स. चे कामाबाबत आपण लेखा विभागांशी संपर्क साधावा. त्यामुळे पत्र जाण्यास विलंब लागतो यासाठी हे पत्र संबंधित विभागाकडे गेल्यास इतका विलंब लागणार नाही. काही प्रकरणे स्वेच्छा निधीचे असतात. त्यामुळेच उशीर होतो. आता सध्या माझ्याकडे स्कुटी प्रकरण विलंबित नाही तरी ३-४ दिवसात मी संचिका पाहून काढत असतो.

**श्री. रशीद खॉन (मामू) :** लेखा विभागाकडे प्रत्येक संचिका येणे आवश्यक आहे तसेच मागे प्रोफार्मा होता त्याप्रमाणे कार्यवाही व्हावी.

**मा. सभापती** : माजी महापौर यांनी सिडको एन-२ जे सेकटर येथील पाण्याचे पाईप लाईन बाबत पत्र दिलेले आहे. त्या बाबत काय झाले?

**कार्यकारी अभियंता :** निविदा काढावयाचे काम चालू आहे.

**मा. सभापती** : रु. ४०,०००/- काम असल्यास त्यास कार्योत्तर मंजुरी घेऊन तात्काळ काम सुरु करावे.

१) ठराव क्र. २२६/५, २३५/१४, २६१/४० हे प्रस्ताव पाहणीसाठी ठेवले होते याचा अहवाल प्राप्त झालेला ठराव मंजूर करण्यात येते.

२) प्रस्ताव क्र. २६८/४७ ते २७४/५३ हे झोनवाईज एमएन्डआर चे प्रस्ताव शॉर्ट टेंडर काढून लवकरात लवकर कामास सुरुवात करावी याचे कारण बिल्डींग मेटेंनन्ससाठी रु. ५.०० लाखाची तरतुद केली आहे. झोनवाईज त्या मध्ये महानगरपालिकेच्या आर्थिक फायदा होतो.

**विषय क्र. १/२९२ :**

.दिनांक २१-०९-९६ रोजी संपन्न झालेल्या स्थायी समिती सभेचे इतिवृत्त कायम करणे.

**संवाद :**

**श्री. हमीद ताबा :** पृष्ठ क्र. १० वर शिक्षण विभागातील पैकी दराबाबत कार्यवाही केली.

**मा. सभापती** : उप आयुक्त - २ यांनी माहिती दयावी.

**उप आयुक्त - २ :** महानगरपालिकेमध्ये शिक्षण विभागात १० चौकीदार सन १९८२ पासून वेगवेगळया तारखान्वये तात्पुरते काम करीत होते. नंतर त्यांना फिक्स पे वर देण्यात आले पुढे त्यांना ७५०-९५० या ग्रेडमध्ये केली परंतु त्यांना त्याच ठिकाणी ठेवण्यात यावे पुढे त्यांना वेतनवाढ देवू नये अशा प्रकारचे फाईल मध्ये लिहून आले. त्यामुळे एकजन कोर्टात गेला होता व नंतर प्रशासनाने असे सांगितले की, शासनाची मंजूरी नाही तोपर्यंत काहीही करता येणार नाही. तोपर्यंत जैसे थे रहावे असे आहे.

**श्री. हमीद ताबा :** कोर्ट केस काढावयास तयार आहे गेल्या १५ वर्षा पासून त्यांना फिक्स पे वर ठेवलेले आहे व सर्व सोयी देता परंतु वेतनवाढ देत नाही. ते योग्य नाही.

**श्री. गौतम खरात :** फिक्स पे वर रु. ७५०-९५० च्या ग्रेडमध्ये केले तेव्हा त्यांना कधी केले व कुणाच्या अधिकारात केले याची माहिती दयावी व त्यावेळी इतर सेविका वगैरे कामाला फिक्स पे वर होते काय?

**मा. सभापती** : ३ स. स. ना मागितलेली माहिती एक टिप्पणी तयार करुन स्थायी समितीच्या सर्व स. स. ना दयावी.

२) पृष्ठ क्र. ५ मध्ये स. स. श्री. गौतम खरात यांच्या वाक्यात कार्यक्षम व सक्षम जकात अधिक्षक देण्यात यावा असे आहे हे वाक्य इतिवृत्तात वगळण्यात येते.

**श्री. गौतम खरात :** हे वाक्य मी बोललो नाही उलट जकात अधिक्षक हे अधिक कार्यक्षम होते मी कोणत्याही अधिकाऱ्याबाबत असे काहीही बोलत नाही.

**श्री. रशीद खान (मामू) :** पृष्ठ क्र. १० वर श्रीमती व्ही. के. वाघमारे यांचे उस्मानपुरा वर अभ्यासीका केंद्रावर दै. वेतनावर रु. ३००/- मानधनावर आहेत. इतराप्रमाणे त्यांनाही रु. १,०००/- का देण्यात येत नाही.

**मा. सभापती** : संबंधित अधिकाऱ्यांनी खुलासा करावा.

**उप आयुक्त - २ :** प्रकल्प संचालक यांचे कडे अभ्यासीका केंद्रावर पुर्वी १५०/- रु. मानधनावर काम करीत होत्या नंतर इतर सेविकांना रु. ३००/- मानधन देतो त्याप्रमाणे त्यांनाही रु. ३००/- मानधन देण्यात येते. त्यांचे पार्टटाईम काम असल्याने रु. १५०/- वर नेमलेले होते.

**श्री. रशीद खान मामू :** श्रीमती वाघमारे या ग्रॅज्युएट व टायपिंग वगैरे करतात त्यासाठी त्यांना इतर प्रमाणे वेतन दयावे.

**मा. सभापती** : रोजंदारी प्रमाणे आदेश काढावे (दै. वेतनावर)

**श्री. महादेव सुर्यवंशी :** पृष्ठ क्र. ४ वर सर्वसाधारण सभेत आर. आर. च्या प्रस्ताव पाठवावा असे इतिवृत्तांत नमुद केले ते चुकीचे आहे.

**मा. सभापती** : १) सदरचे वाक्य वगळण्यात यावे मी असे बोललो नाही.

२) वाहन चालकांशी वेतनश्रेणी बाबत केलेली मागणीची माहिती पुढील बैठकीत दयावी.

३) सॅनीटरी पेक्टर ३ घ्यावयाचे होते त्या बाबत प्रशासनाने काय कार्यवाही केली सध्या टेंपररी घ्यावे. (एम्पायमेंट कडून) व नंतर शासनाच्या मंजुरी नंतर पुढील कार्यवाही येईल.

४) पृष्ठ क्र. १३ वर सिमेंट खरेदी बाबत मुंबई प्रा. मनपा अधि-१९४९ चे अनुसुचिचे प्रकरण ५ चे कलम २ चे कलम-२ असे मी म्हटलेले आहे तेव्हा ती दुरुस्ती व्हावी.

**श्री. रशीद खान (मामू) :** मागील वेळेस जकातीच्या गाडया पकडण्यात आलेल्या होत्या त्याबाबत काय कार्यवाही केली याची माहिती दयावी.

**मा. सभापती** : उप आयुक्त - १ यांनी माहिती दयावी.

**उप आयुक्त - १ :** संबंधित कागदपत्रे तपासूनच कार्यवाही केलेली आहे.

**मा. सभापती** : संबंधित कागदपत्रे घेऊन व्हेरीफिकेशन केले आहे. आपणास या पुढे काय म्हणावयाचे पोलीस केस करावयाची आहे काय? करावी.

**श्री. रशीद खान मामू :** उप आयुक्त - १ यांना जकातीचे ट्रक अडविले रु. ५ लाख मिळाले अशी वर्तमान पत्रात बातमी आलेली होती म्हणून विचारणा करीत आहे.

**श्री. महादेव सुर्यवंशी :** आण्णा भाऊ साठे महामंडळाचा तो ट्रक नसून इतर दोन ट्रक बाबत आपण कोणताही निर्णय घ्यावा.

**उप आयुक्त -१, श्री. रशीदखान (मामु) :** मी कोणाच्याही बाबतीत पोरवेट करण्याचा प्रश्नच जकात मधील तिन वर्षाच्या वरील कालावधीतीत कर्मचाऱ्यांचे बदल्या बाबत काय कार्यवाही केली.

**उप आयुक्त - १ :** ठिक आहे. बदल्या करण्यात येत आहेत.

**श्री. महादेव सुर्यवंशी :** आपल्या जकात मध्ये कॅसेट चे जकात वसूली केली जातात काय.

**मा. सभापती** : पृष्ठ क्र. ७० व पृष्ठ क्र. ४१ या मधील ठराव क्र. २८८/१४ प्रकाशनगर स. स. श्री. घडामोडे यांच्या वॉर्डात मुरुम टाकणेसाठी व माजी महापौर सौ. कोल्हे यांच्या वॉर्डातही मुरुम टाकणेसाठी व सौ. काळुसे यांच्या वॉर्डातही मुरुम टाकण्याबाबत कार्योत्तर मंजुरी दिली होती. परंतु सौ. काळुसे यांच्या वॉर्डात मुरुम टाकण्यात आले व बाकी दोन्हीही वॉर्डात मुरुम टाकलेले नाही. तेव्हा दोन्ही ठिकाणी मुरुम टाकावे व रिपोर्ट दाखल करावा त्यास कार्योत्तर मंजूरी दिली जाईल.

**श्री. रशीद खान (मामू)** : दैनंदिन तक्ता देण्यात यावा परंतु तसे होत नाही. आता जो तक्ता दिलेला आहे. यावरुन असे दिसते की, स्थायी समितीच्या सभेच्या दोन दिवस अगोदरचा जकात वाढ दर्शविलेला.

**उप आयुक्त - १** : दि. ०१-१०-९६ ते ०७-१०-९६ पर्यंतची जकात वसुली आलेले आकडे

| | |
|---|---|
| १-१०-९६ | ८.७४ लाख |
| २-१०-९६ | ९.६१ -//- |
| ३-१०-९६ | -//- |
| ४-१०-९६ | ८.३० लाख |
| ५-१०-९६ | ८.५४ लाख |
| ६-१०-९६ | ९.२६ -//- |
| ७-१०-९६ | ९.२४ -//- |

**मा. सभापती** : दैनंदिन अहवाल जकातीचा येतो पुढे ९ ते १५ पर्यंतचा दैनंदिन अहवाल द्यावा.

**श्री. महादेव सुर्यवंशी** : पृष्ठ क्र. २६ मध्ये शिक्षण विभागाचे फर्निचर खरेदी बाबत असे लक्षात येते की, लाकडी टेबल आहे ते वरचे प्लॉयवूड निघून गेले आहे व खालचे संपूर्ण फ्रेम गेलेले आहे.

**मा. सभापती** : आपण कोणते लाकूड खरेदी करतो.

**शिक्षणाधिकारी** : यापुर्वी जे बेचेंस घेतलेले आहेत ते सन १९९३-९४ घेतलेले आहेत. आता जे मागविलेले आहेत लेखा विभागामध्ये मागे जे टेबल विकत घेण्यात आलेले आहेत त्या टेबलामधलेच हे टेबल आहेत आणि खुर्च्या आहेत त्या सर्व सागवानी आहेत.

**श्री. महादेव सुर्यवंशी** : जे टेबल आहेत. प्लायवूडचे आहेत की, आहेत काय की ते सागवानी आहेत.

**शिक्षणाधिकारी** : आता जे टेबल आहेत ते संपूर्ण सागवानी आहेत.

**लेखाधिकारी - १** : आपण संपूर्ण सागवानी लाकडाची मंजूरी दिलेला आहे. शिक्षण विभागात या बाबत अंदाजपत्रकीय तरतूद केलेली आहे. त्याची खरेदी सुध्दा त्यांचे मार्फतच होते.

**मा. सभापती** : यासाठी शहर अभियंता यांचे देखरेखी खाली फर्निचरचे कामे व्हावे.

**श्री. अभिमन्यु भालेराव** : पाच सागवानी आहे व तर त्यातील तीन पाच साधे आहेत आणि त्यावर चमक येण्यासाठी पॉलीश मारलेली दिसते.

**मा. सभापती** : लेखाधिकारी - १ यांनी शहर अभियंता यांचे कडील अभियंता यांनी पाहणी करुन योग्य ते प्रमाणपत्राची पौच दिल्या शिवाय शिक्षण विभागातील फर्निचर बाबत संबंधितास देयक देण्याची कार्यवाही करु नये.

**श्री. अभिमन्यु भालेराव** : आज अशी परिस्थिती झाली आहे की, शहर अभियंता काय की अति शहर अभियंता काय यांचे कडे कितीही वेळेस काम घेऊन गेले तरी ते काम लवकर करीत नाही. आणि त्यांना माहित आहे आमचे कुणी काही करु शकत नाही. यासाठी आपण अशा काही अधिकाऱ्यांबाबत कार्यवाही केली तरच ठिक राहील नसता तुम्ही बोलतच राहणार तरीही कामे होणार नाहीत.

**मा. सभापती** : आपण ज्या पोटतिडकीने बोलत आहात ते योग्य आहे आपण जर अशा काही अधिकाऱ्यांबाबत ॲक्टच्या नियमाप्रमाणे कार्यवाही करु न आणि केली तर तुळी शिफारस घेऊन येऊ नये.

**श्री. गौतम खरात** : २६१/४० च्या फर्नीचरच्या बाबत दुरुस्ती करावी यात दर्शविल्याप्रमाणे लाकडी खर्चाचे दर रु. १२४०/- आहे. तेव्हा फायबरच्या खुर्ची घेतल्यास रु. ४५०/- दर राहील म्हणजे बराच फायदा होऊ शकेल.

**मा. सभापती** : आता आपण मंजुरी दिलेली तसे करता येणार नाही.

**श्री. गौतम खरात** : नसता प्रस्ताव ना मंजूर करा.

**श्री. रशिद खान (मामू)** : स. स. नी जी भावना लाकडी फर्नीचर बाबत केली परंतु प्रत्यक्षात लाकडी फर्नीचर व्यवस्थित येत नाही. तेव्हा अशा गुत्तेदाराने ४२० पना केला समजून गुन्हा दाखल करावा.

**मा. सभापती** : या संदर्भात शहर अभियंता यांनी प्रमाणपत्र त्याशिवाय देऊ नये. काळजी घ्यावी.

**श्री. अभिमन्यु भालेराव** : कोणातही वार्डातील शाळेत १५ ऑगस्ट किंवा २६ जानेवारी या राष्ट्रीय दिनानिमित्त ध्वजारोहणास स. स. नगरसेवकास बोलवावे असे आहे किंवा नाही. शिवाय शाळेतील विद्यार्थ्यांचे गणवेश पुस्तके वाटप तेथील नगरसेवकांचे हस्ते करावयाचे पाहिजे किंवा नाही माझ्या वॉर्डातील शाळेतील मुख्याध्यापाक याबाबत मला अजिबात विश्वासात घेत नाही व विचाराणाही करीत नाही तसेच पिरबाजार येथील स. स. श्री. प्रकाश निकाळजे यांच्याही वॉर्डात झालेले आहे याबाबत काय नियम आहेत.

**मा. सभापती** : आम्ही यापुर्वीच शिक्षणाधिकारी यांनी सुचना दिलेली आहेत का, ज्या वॉर्डातील शाळेत कोणतेही राष्ट्रीय ध्वजारोहन असो वा पुस्तके किंवा गणवेश वाटप असो. तेथील स. नगरसेवकांना बोलवून कार्यकृष व्हावे आणि त्यानंतरही असा प्रकार होत असल्यास ते योग्य नाही याबाबत शिक्षणाधिकारी यांनी खुलासा करावा.

**शिक्षणाधिकारी** : याबाबत संबंधित मुख्याध्यापक यांना ज्ञापन दिले होते. पिरबाजार येथील मुख्याध्यापिकेचे पत्र आहे की, माझी चुक झाली यापुढे असे होणार नाही तसे पत्र आम्ही स. स. ना दिले येथील मुख्याध्यापिकेला पत्र दिले. तेव्हा त्यांनी एक वर्तमानपत्राचे कात्रण आणुन दिले की, स. स. चे हस्ते गणवेशाचे व पुस्तकाचे वाटप झाले. परंतु काही दुसऱ्या गणवेशाचा कोट आलेला होता तो आम्ही स. स. ना विचारताच वाटप केलेले आहे.

**मा. सभापती** : आपण शाळेतील सर्व मुख्याध्यापकांना अशी पत्र दिलेली आहेत काय.

**शिक्षणाधिकारी** : होय दिलेली आहेत.

**श्री. अभिमन्यु भालेराव** : दि. १४ ऑगस्ट ९६ रोजी १७५ ड्रेसचे वाटप करण्यात आले, दुसऱ्या दिवशी सुध्दा उर्वरित कापडयाचे वाटप करण्याकरीता कार्यवाही करावयाची पाहिजे होती. परंतु तसे केले नाही तर तेथील शिक्षक श्री.

खरात यांनी स्वतःच पुढारीपण गाजवायचे काय माहिती त्यांनी मुख्याध्यापिका हाताशी धरुन स्वतःच वाटप केले याबाबत या भागात उपलट सुलट चर्चा होणे आहे व त्यामुळे राजकारण होण्याची शक्यता आहे. तेव्हा अनेकदा सांगुनही त्या शिक्षकांच्या बदल्या होत नाहीत रत मग आम्ही आमचे राजीनामे देऊन घरीच बसू अशी वेळ झालेली आहे.

**मा. सभापती** : शिक्षणाधिकारी यांनी या संदर्भात प्रथमच संबंधित मुख्याध्यापीका व शिक्षक श्री. खरात यांना ज्ञापन देऊन ताबडतोब बदली करावी. यामध्ये स. स. श्री. धिल्लन यांच्या वार्डातील कांचनवाडी मधील दोन शिक्षक आहेत त्यांची तेथून बदली उदयाच करावीत.

**शिक्षणाधिकारी** : बदल्याच संदर्भात मा. उप आयुक्त यांचेकडे प्रस्ताव ठेवलेला होता. परंतु ५-७ बदल्या सोडल्यास बाकी शिक्षक बदल्याबाबत उप आयुक्त १ व २ यांनी तपासून कार्यवाही करण्याचे सुचित केले होते.

**मा. सभापती** : कांचनवाडी येथील शिक्षकांचे खाजगी मसनतपुरा येथील दोन्ही शिक्षक मुख्याध्यापक व शिक्षक या दोघांचीही बदली एकमेकांच्या ठिकाणी उद्याच करण्यात यावा.

**श्री. हमीद ताबा** : फक्त नेमक्याच बदल्या करण्यात नसता इतर ठिकाणच्या शिक्षकांच्या बदल्या करण्यात येईल यांची नोंद---

**श्री. डॉ. कराड** : स. स. प्रकाश निकाळजे यांच्या वॉर्डातील मुख्याध्यापीकेने सुध्दा विचारणा केलेली नाही. त्याचीही बदली करण्यात यावी.

**स. सभापती** : नाही संबंधितांनी माफी मागितलेली आहे.

**श्रीमती रजनी जोशी** : माझ्या वॉर्डात अदयापही गणवेश वाटप करण्यास आलेले नाही.

**मा. सभापती** : संबंधित गुत्तेदाराने फारच लवकर गणवेश दिलेले आहे. त्याचे कौतुक करावयास पाहिजे.

**श्री. गौतम खरात** : पृष्ठ क्र. ७३ मध्ये डॉ. बाबासाहेब आंबेडकर पुतळया भडकलगेट येथे हार्यस्ठ लावल्याबाबत सुचना केलेली होती.

**मा. सभापती** : छत्रपती शिवाजी महाराज, क्रांती चौक यांच्या पुतळयाजवळ रु. १०.०० लाखाची तरतुद हाथेस्ट लावण्यासाठी करण्यात आली त्याचप्रकारे डॉ. आंबेडकर पुतळयाजवळही रु. १०.०० लाखाची तरतुद वेगळया शिर्षकाखाली करुन लवकर करण्यात यावी.

**श्री. रशीद खान (मामू)** : शहराचे मध्यवर्ती बसस्थाका समोरील चौकास याच प्रकारची व्यवस्थ व्हावी.

**अति शहर अभियंता** : अंदाजपत्रकात तरतुद नाही.

**श्री. महादेव सुर्यवंशी** : पृष्ठ क्र. ४० मध्ये विषय क्र. २६४/४३ च्या ठरावात दुरुस्ती करण्यात यावी.

**मा. सभापती** : संबंधित अधिकाऱ्यांनी माहिती दयावी.

**उप अभियंता (इ)** : या प्रस्तावाबाबत नारेगांव शाळेतील बांधकामाचे दोन खोल्यांचा प्रस्ताव आहे त्यास रु. १,५९,८८/- ला कार्योत्तर मंजुरी मिळालेली आहे आणि पुन्हा दोन खोल्याचें बांधकामाचे रु. ३,४४,८२८/- च्या अंदाजपत्रकीय वाढीव खर्च आहे या दोहोंचे खर्चास मान्यता हवी.

**मा. सभापती** : ठिक आहे. दुरुस्तीस मान्यता परंतु संबंधित अधिकारी यांना विनंती की, ऐनवेळचे प्रस्ताव आणु नये.

**श्री. सुभाष टाकळकर** : पृष्ठ क्र. ७ मध्ये टपरी बाबतची चर्चा झाली आणि १५ दिवसात कार्यवाही करण्यात येईल. त्याबाबत काय झाले याची माहिती दयावी.

**श्री. रशीद खॉन (मामू)** : मी सुचना केल्याप्रमाणे १०-१५ वर्षापासून टपऱ्या टाकून बसलेले आहेत. त्यांचे बाबत प्रशासनाने टपऱ्या वाटप करीत असतांना विचार करावा.

**मा. सभापती** : आता मालमत्ता अधिकारी श्री. वाहूळ आलेले आहेत. त्यांनी याबाबत आवश्यक ती कार्यवाही करावी.

**श्री. रशीद खान (मामू)** : ज्या टपऱ्या बसलेल्या आहेत त्यांना अधिकृत कारणे बाबत धमीरीने विचार करावा कारण शहरात फार मोठया प्रमाणात सुक्षीत बेकार असून, त्यांनी वेगवेगळया प्रकारचे धंदे टाकून आपी उपजिविका सांभाळत आहेत.

**मा. सभापती** : याबाबत डी. पी. रोड सोडून इतर ठिकाणी महापालिकेने परवाने देण्याबाबत कार्यवाही करेल आता इतिवृत्त वरील चर्चा समाप्त करुन इतिवृत्त दुरुस्तीसह कायम करण्यात येते.

**ठराव :**

जालना रोड वरील डिवायडर चे कामा संदर्भात पाहणी करण्यासाठी एक समिती गठण करण्यात आली त्या समितीत सर्व श्री. १) भगवान घडामोडे, २) महादेव सुर्यवंशी, ३) सुभाष टाकळकर, ४) डॉ. कराड, ५) अभिमन्यु भालेराव, ६) सौ. रजनी जोशी व ७) तांत्रिक विभाग, मा. आयुक्त यांच्या कक्षातील समितीने एक महिन्याचे आत स्थायी समितीला अहवाल सादर करावा.

२) कर आकारणीच्या नोटीस (छापील कॉम नविन प्रमाणे) कर दात्यांना झोन वाईज वाटण्यात यावे.

३) प्रत्येक वॉर्डात महानगरपालिकेच्या खुल्या जागेवर संपर्क कार्यालय

४) महानगरपालिका कार्यालयातील कर्मचारी अधिकारी काही कारणास्तव निलंबीत त्यांची प्रकरणे किंवा चौकशी अधिकारी म्हणुन दोन रिटायर्ड जज अस्थापनेवर नेमण्याबाबत सर्वसाधारण सभेत शिफारस करण्यात येते.

५) महानगरपालिका कर्मचारी सेवा भरती नियमान्वये शासनाकडून मंजूरी झालेल्या आदेशानुसार सन १९९४ पासून अंमलबजावणी करण्यास स्थायी समितीने मंजुरी दिलेली आहे. त्यावरच प्रशासनाने कार्यवाही करावी सर्वसाधारण सभेकडे दुरुस्ती प्रस्ताव अमेंडमेंट करणेसाठी पाठवावा. परंतु आर. आर. स्थायी समितीचा अखत्यारीतच मंजुरी दि. ३०-०७-९६ ला देण्यात आला आहे. त्याप्रमाणे कार्यवाही व्हावी.

६) माजी महापौर सौ. सुनंदा कोल्हे यांच्या वार्डातील रु. ७०/- हजाराचे पाणी पुरवठा पाईप लाईनचे कामास कार्योत्तर मंजुरी दिलेली आहे.

७) ठराव क्र. २२६/५, २३४/१५, २६१/४० सदरील प्रस्ताव स्थळ पाहणी साठी ठेवण्यात आले होत या बाबतचा अहवाल प्राप्त झाला असून, त्यास मंजूरी देण्यात येते.

८) प्रस्ताव क्र. २६८/४७ ते २७४/५३ हे झोनवाईज एम. एन्ड. आर. चे प्रस्तावाचे शॉर्ट टेंडर काढुन लवकरात लवकर करावे.

९) मा. सभापती यांच्या वाक्यात महानगरपालिका कर्मचाऱ्यांचे आर. आर. बाबतीत सर्वसाधारण सभेत शिफारस करण्याचा प्रस्ताव पाठविण्यात येतो असे आले ते वगळण्यात येतो.

१०) पृष्ठ क्र. १३ वर सिमेंट खरेदी बाबत मुंबई प्रा. मनपा अधि १९४९ चे अनुसुचिचे प्रकरण ५ चे कलम - २ पोटकलम - २, पोटकलम - २ अशी दुरुस्ती करण्यात येते.

११) पृष्ठ क्र. ७० पृष्ठ क्र. ४१ मध्ये स. स. श्री. मोतीराम घडामोडे व माजी महापौर सौ. कोल्हे यांच्या वार्डात मुरुम टाकण्यात येऊन अहवाल सादर करावा.

१२) मो. मसनतपुर व मो. कांचनवाडी येथील प्रत्येकी मुख्याध्यापक व एक शिक्षकांची आपआपसात उदया बदली करण्यात यावे.

१३) पृष्ठ क्र. ४० मध्ये विषय क्र. २६४/१३ च्या ठरावात दुरुस्ती करण्यात येते.

१४) पृष्ठ क्र. ५ मध्ये स. स. श्री. गौतम खरात यांच्या वाक्यात कार्यक्षम व सक्षम जकात अधिक्षक देण्यात यावा असे आहे हे वाक्य इतिवृत्तातून वगळण्यात येते.

१५) या व इतर दुरुस्तीसह दि. २९-०९-९६ रोजीच्या स्थायी समितीच्या सभेचे इतिवृत्त कायम करण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.
वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. २९३/९ :**

अति शहर अभियंता प्रस्ताव सादर करीत आहेत की, लक्ष्मी वाडी पदमपुरा येथे खांडकी दुरुस्त करणेच्या कामाचे सन ९५-९६ चे डी. एस. आर. दराने रक्कम रु. १,२८,४००/- चे अंदाजपत्रक तयार करण्यात आले असून, त्यास मा. आयुक्त यांची मंजुरी मिळालेली आहे. सदरील कामाचा खर्च रस्ते दुरुस्ती व देखभाल या लेखा शिर्षा मधुन सन ९६-९७ साठी असलेल्या तरतुदी मधुन प्रस्तावित आहे.

तरी सदर कामासाठी तयार करण्यात आलेल्या र.रु १,२८,४००/- चे अंदाजपत्रक मंजुरी बाबतचा प्रस्ताव स्थायी समितीच्या विचारार्थ तथा मंजुरीस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्यानुसार, लक्ष्मीवाडी पदमपुरा येथे खांडकी दुरुस्त करणेच्या कामासाठी तयार करण्यात आलेले रक्कम रु. १,२८,४००/- चे अंदाजपत्रकास तसेच सदर कामाबाबत निगोशियेशन करुन सदर काम तातडीने पुर्ण करुन घेण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. २९४/३ :**

अति शहर अभियंता प्रस्ताव सादर करीत आहेत की, श्रेयनगर मधील सुप्रतम सोसायटी मधील अंतर्गत रस्त्याचे डांबरीकरण करणेच्या कामाचे सन ९५-९६ चे सार्वजनिक बांधकाम खात्याचे डी. एस. आर. दराने रक्कम रु. ४,०७,८८९/- चे अंदाजपत्रक तयार करण्यात आले असून, त्यास मा. आयुक्त यांची मंजुरी मिळालेली आहे. सदरील कामाचा खर्च " भांडवली रस्ते " नविन डांबरीकरण सन ९६-९७ मधुन प्रस्तावित आहे.

तरी सदर कामासाठी तयार करण्यात आलेल्या र. रु. ४,०७,८८९/- चे अंदाजपत्रक मंजुरी बाबतचा प्रस्ताव स्थायी समिती समोर विचारार्थ तथा मंजुरीस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्यानुसार, श्रेयनगर मधील सुप्रतम सोसायटी व शुभम सोसायटी मधील अंतर्गत रस्त्यांचे डांबरीकरण करणेच्या कामासाठी तयार करण्यात आलेले रक्कम रु. ४,०७,८८९/- चे अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. २९५/४ :**

कार्यकारी अभियंता पाणी पुरवठा व जलनिःसारण हयांनी प्रस्ताव सादर केलेला आहे की, विभाग क्र. ३ अंतर्गत प्रभाग " अ " मधील अस्तित्वात असलेल्या ड्रेनेज लाईनची सन ९६-९७ या आर्थिक वर्षात देखभाल व दुरुस्ती करणेसाठी अंदाजपत्रकीय र. रु. ३,९७,०००/- ला प्रस्ताव स्थायी समितीच्या दि. १९-०७-९८ च्या सभेत विषय क्र. २१/२० ने संमत झालेला आहे, त्यानंतर सदरील कामाची निविदा सुचना जा. क्र. मनपा/लेखा/नि/८८/९६ दि. १६-०७-९६ रोजी वर्तमान पत्रात " ब " निविदे प्रमाणे जाहिरात दिला असता एकूण आठ (८) निविदा विक्री झाल्या व त्यापैकी ३ (तीन) निविदा प्राप्त झाल्या. त्यांचा तुलनात्मक तपशील खालील प्रमाणे आहे.

| | | |
|---|---|---|
| १. | श्री. एस. एम. हक | ९% अ. प. दरापेक्षा कमी दराने |
| २. | श्री. मनोज घोडके | ७.७७% -//- |
| ३. | श्री. आर. एल. बारवाल | ०.५% -//- |

तुलनात्मकदृष्टया सर्वात कमी म्हणजे अंदाजपत्रकीय दरापेक्षा ९% कमी दराने श्री. एस. एम. हक हयांची निविदा आहे, सदरील निविदेस मा. आयुक्तांनी दिनांक ३०-०८-९६ ला प्रशासकीय मंजुरी दिलेली आहे.

तरी सदरील कामाचे गुत्तेदार श्री. एस. एम. हक यांची अंदाजपत्रकीय दरापेक्षा ९% कमी दराची निविदा स्विकारणेस्तव प्रस्ताव विचारार्थ तथा मंजुरीस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्या नुसार, विभाग क्र. ३ अंतर्गत प्रभाग " अ " मधील अस्तित्वात असलेल्या ड्रेनेज लाईन सन ९६-९७ या आर्थिक वर्षात देखभाल व दुरुस्ती करणेसाठी तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी व अंदाजपत्रकीय दरापेक्षा ९% कमी दराचे गुत्तेदार, श्री. एस. एम. हक यांचे निविदा पत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. २९६/५ :**

कार्यकारी अभियंता पाणी पुरवठा व जलनिःसारण यांनी प्रस्ताव सादर केला की, देखभाल व दुरुस्ती ९६-९७ झोन-३ वार्ड " क " साठी देखभाल व दुरुस्ती ९६-९७ या लेखा शिर्षकातुन अंदाजपत्रकीय रक्कम रु. ३,८६,५००/- चे स्थायी समिती सभा दि. ०२-०८-९६ विषय ठराव क्र. १९/१८ अन्वये मंजुरी मिळालेली आहे. सदरील कामाची निविदा सुचना क्र. मनपा/लेखा/नि/८८/९६ दि. १६-०७-९६ अन्वये वर्तमान पत्रात प्रसिध्दिस दिली असता एकूण ८ (आठ) निविदा विक्री झाली त्यापैकी २ (दोन) निविदा प्राप्त झाल्या त्यांचा तुलनात्मक तक्ता खालील प्रमाणे आहे.

| | | |
|---|---|---|
| १. | श्री. कुलवंतसिंग | ५% अ. प. दरापेक्षा कमी दराने |
| २. | श्री. मन्नान खान | २% अ. प. दरापेक्षा कमी दराने |

तुलनात्मकदृष्टया सर्वात कमी म्हणजेच अंदाजपत्रकीय दरापेक्षा ५% कमी दराने श्री. कुलवंतसिंग यांच्या कडून अंदाजपत्रकीय दरापेक्षा ५% कमी दराने करुन घेण्याचा प्रस्ताव मंजुरीस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्यानुसार झोन क्र. ३ वार्ड " क " साठी देखभाल व दुरुस्ती साठी तुलनात्मकदृष्टया सर्वात कमी व अंदाजपत्रकीय दरापेक्षा ५% कमी दराचे गुत्तेदार श्री. कुलवंतसिंग यांचे निविदा पत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. २९७/६ :**

मा. कार्यकारी अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, क्र. ७ तुलसी प्लॅट ओनर सहकारी गृहनिर्माण संस्थ नागरी सुविधा बाबतच्या कामासाठी रु. २,२९,४२९/- चे अंदाजपत्रक तयार करण्यात आले असून ते परिसर अभियांत्रिकी यांचे सन ९४-९५ च्या दरानुसार बनविण्यात आलेले आहे.

तेथील प्लॅट धारकांना मालमत्ता कर आकारणी पुर्ण झालेली आहे. विभागीय अधिकारी विभाग क्र. ४ यांना जा. क्र. १७२/९५ दि. ३०/६/९५ नुसार मालमत्ता कर वसुली बाबत कळविण्यात आले आहे.

उपरोक्त काम हे करुन घेण्याची जबाबदारी मा. कार्यकारी यांची राहील व मालमत्ता कर वसुली बाबत विभागीय अधिकारी विभाग क्र. ४ यांची जबाबदारी राहील. तरी वरील कामासाठी तयार करण्यात आलेले रु. २,२९,४२९/- चे अंदाजपत्रकास मंजूरी मिळणेसाठी प्रस्ताव विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्यानुसार ७ तुलसी प्लॅट ओनर सहकारी गृहनिर्माण संस्था येथील नागरी सुविधा बाबतच्या कामासाठी तयार करण्यात आलेले रक्कम रु. २,२९,४२९/- चे अंदाजपत्रकास तसेच सदर काम मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियमाचे कलम ६७(३) चा वापर करुन कार्यवाही करणेस सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. २९८/७ :**

कार्यकारी अभियंता पाणी पुरवठा व जलनिःसारण यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, मो. चंपा मस्जिद चौक येथे आर. सी. सी. गटार बांधणेच्या कामा करीता परिसर अभियांत्रिकीच्या दर पत्रक ९४-९५ नुसार व मंजुर दराप्रमाणे अंदाजपत्रक र. रु. ३,००,०००/- चे तयार करण्यात आले आहे.

सदरील काम " झोपडपट्टी व शहरातील इतर भागात खुल्या गटारी बांधणे या लेखा शिर्षा खाली सन ९६-९७ च्या तरतुदीमधून प्रस्तावित केले आहे.

सदरील अंदाजपत्रकीय रक्कमेस मा. आयुक्त महोदय यांनी दि. २०-०९-९६ ला प्रशासकीय मंजूरी दिलेली आहे, तरी सदरील अंदाजपत्रकीय र. रु. ३,४०,०००/- ला स्थायी समितीच्या विचारार्थ व मंजुरीस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्यानुसार मो. चंपा मस्जिद चौक येथे आर. सी. सी. गटार बांधणेच्या कामा करीता तयार करण्यात आलेले र. रु. ३,४०,०००/- चे अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. २९९/८ :**

कार्यकारी अभियंता पाणी पुरवठा व जलनिःसारण यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, मो. काचीवाडा भडकलगेट येथे आय. टी. आय. च्या बाजूस १५० मी. मी. व्यासाची व २५० मी. मी. व्यासाची ड्रेनेज लाईन टाकणेच्या कामाकरीता अंदाजपत्रकीय र. रु. २,२५,४६२/- चे परिसर अभियांत्रिकीच्या दरसुची ९५-९६ नुसार तयार करण्यात आले आहे.

सदरील काम लेखा शीर्षक भांडवली तरतुद ९६-९७ हया मधुन प्रस्तावित केले आहे. सदरील अंदाजपत्रकास मा. आयुक्तांनी दि. २४-०९-९६ ला प्रशासकीय मंजुरी दिलेली आहे.

तरी अंदाजपत्रकास र. रु. २,२५,४६२ च्या मंजुरीस्तव व विचारार्थ प्रस्ताव स्थायी समितीच्या मंजुरीस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्यानुसार मो. कांजीवाडा भडकलगेट येथे आय. टी. आय. ज्या बाजूस १५० मी. मी. व्यासाची ड्रेनेज लाईन टाकणेच्या कामाकरीता तयार करण्यात आलेले र. रु. २,२५,४६२/- चे अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

टिप :- ठराव क्र. ३००/९ हा सभेच्या शेवटच्या पानावर पाहावा.

**विषय क्र. ३०१/१० :**

पाणी पुरवठा विभाग क्र. २ (सिडको) अंतर्गत झोन क्र. ७ आणि झोन क्र. ५ अंतर्गत येणाऱ्या जलवाहिन्यांच्या देखभाल व दुरुस्तीसाठी सी. आय. डी. जॉईंट खरेदी करण्यासाठी र. रु. १,५८,५००/- चे अंदाजपत्रक परिसर अभियांत्रिकी यांच्या सन ९५-९६ च्या दरसुची नुसार तयार करण्यात आले असून, सदरील अंदाजपत्रकास प्रशासकीय मंजुरी मिळालेली आहे. या कामावर होणारा खर्च हा देखभाल व दुरुस्ती या लेखा शिर्षकातून करण्यात येणार आहे.

तरी सदर कामासाठी तयार करण्यात आलेल्या रक्कम रु. १,५८,५००/- अंदाजपत्रकास मंजुरी बाबतचा प्रस्ताव विचारार्थ व मंजुरीसाठी सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्यानुसार पाणी पुरवठा विभाग क्र. २ (सिडको) अंतर्गत झोन क्र. ७ आणि झोन क्र. ५ अंतर्गत येणाऱ्या जलवाहिन्यांच्या देखभाल व दुरुस्ती साठी सी. आय. डी. जॉईंट खरेदी करणेसाठी तयार करण्यात आलेले रक्कम रु. १,५८,५००/- चे अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ३०२/११ :**

पाणी पुरवठा विभाग क्रमांक २ (सिडको) मनपा अंतर्गत चिकलठाणा येथील कामागार कॉलनी, कुरेशी गल्ली व माल गल्ली येथे जलवाहिनी टाकण्याच्या कामासाठी अंदाजपत्रक र. रु. २,८७,४००/- चे तयार करण्यात आले असून, सदरील अंदाजपत्रक परिसर अभियांत्रिकी यांच्या ९५-९६ च्या दरसुची नुसार तयार करण्यात आले आहे. तरी सदर कामासाठी तयार करण्यात आलेल्या र. रु. २,८७,४००/- चे अंदाजपत्रकास मंजुरी बाबतचा प्रस्ताव विचारार्थ व मंजुरीसाठी सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्यानुसार पाणी विभाग क्र. २ (सिडको) मनपा अंतर्गत चिकलठाणा येथील कामगार कॉलनी कुरेशी गल्ली व माळ गल्ली येथे जलवाहिनी टाकणेच्या कामासाठी तयार करण्यात आलेल्या रक्कम रु. २,८७,४००/- चे अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ३०३/१२ :**

शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला की, संजयनगर मुकूंदवाडी, बंजारा कॉलनीतील खुल्या जागेत आभ्यासीका इमारत बांधणे बाबतचे सन ९५-९६ च्या सार्वजनिक

बांधकाम खात्याच्या दर सुची अन्वये र. रु. १,६७,५००/- चे अंदाजपत्रक तयार करण्यात आले, त्यास मा. आयुक्त यांनी मंजुरी दिलेली आहे. सदर खर्च इतर वाचनालय या तरतुदी मधुन करण्यात येणार आहे.

अंदाजपत्रक रक्कम रु. १,४७,५००/- प्रस्ताव मंजुरीस्तव व विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्यानुसार, संजयनगर मुकूंदवाडी, बंजारा कॉलनीतील खुल्या जागेत आभ्यासीका इमारत बांधणे बाबतचे कामासाठी तयार करण्यात आलेले रक्कम रु. १,४७,५००/- चे अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ३०४/१३ :**

शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला की, रेल्वेस्टेशन हमालवाडा येथील स्मशानभूमी मध्ये बर्निंग रोड, रेस्टींग रोड इत्यादी बांधणे बाबतचे अंदाजपत्रक सन ९५-९६ च्या सार्वजनिक बांधकाम खात्याच्या दरसुची अन्वये र. रु. १,८६, ३२५/- चे तयार करण्यात आले आहे. त्यास मा. आयुक्त यांची मंजुरी झालेली आहे. सदर खर्च स्मशान भूमी या तरतुदी मधुन करण्यात येणार आहे. करीता प्रस्ताव विचारार्थ व मंजुरीस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्यानुसार, रेल्वेस्टेशन, हमालवाडा, येथील स्मशान भुमी मध्ये बर्निंग रोड रेस्टींग रोड इत्यादी बांधणीचे कामासाठी तयार करण्यात आलेले रक्कम रु. १,८६,३२५/- चे अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ३०५/१४ :**

शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला की, मो. प्रबुध्द नगर स्लम येथे खांडकी दुरुस्त करणे व गटार दुरुस्ती आणि फरशी बसविणे बाबत कामाकरीता सा. बा. खाते यांच्या वर्ष ९५-९६ च्या दरसुची नुसार र. रु. २,९७,८८५/- चे अंदाजपत्रक तयार करण्यात आले असून, सदरच्या अंदाजपत्रकास मा. आयुक्त साहेबांनी दि. २२-०९-९६ ला प्रशासकीय मान्यता दिली आहे.

तरी सदरील कामाकरीता तयार करण्यात आलेले र. रु. २,९७,८८५/- चे अंदाजपत्रकास मान्यतेचा प्रस्ताव विचारार्थ तथा मंजुरीस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्यानुसार, मो. प्रबुध्द नगर स्लम येथे खांडकी दुरुस्ती करणे व गटार दुरुस्ती आणि फरशी बसविणे बाबतचे कामाकरीता तयार करण्यात आलेले रक्कम रु. २,९७,८८५/- चे अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ३०६/१५ :**

औरंगाबाद शहराचे मंजुर विकास योजने मधील मोती कारंजा ही चौरांह या रस्ता रुंदीकरणाचे काम यापुर्वी रितसर भूसंपादनाचे कार्यवाही अंतर्गत भूसंपादन करुन करण्यात आलेले आहे. भूसंपादनाचे कार्यवाही वेळी न. भू. क्र. ८०११ व ८०१२ म्यु. घर नं. ४.०.३०७

चे पी. आर. कार्ड बाबत संदिग्धता आल्याने व सुधारीत पी. आर. काडे तयार करण्यास वेळ लागणार असल्याने ही मिळकत संपादना मधुन वगळण्यात आली होती व सदर मिळकत महानगरपालिकेने खाजगी वाटाघाटीने संपादित करावी. असे मत विशेष भूसंपादन अधिकारी यांनी निवडावा मध्ये दिलेले आहे.

रस्ता रुंदीकरणाचे भूसंपादनामध्ये एवढी मिळकत संपादन करावयाची राहील्याने त्यांचे खाजगी वाटाघाटी संपादन करण्याचे कार्यवाही अंतर्गत जागेच्या ४२.५ चौ. मी. बांधीव क्षेत्रा करीता रु. २.८० लाख एवढे मुल्य निश्चित करण्यात आलेले आहे.

करीता र. रु. २.८० लाख एवढे मुल्य देऊन न. भू. क्र. ८०११ चे ३८.०० चौ. मी. व ८०१२/पैकी चे ४.५० चौ. मी. एवढे बांधिव क्षेत्र संबंधिता कडुन रितसर संपादीत करुन घेण्याचा प्रस्ताव मान्यतेसाठी सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्यानुसार, औरंगाबाद शहर मंजूर विकास योजने मधील मोती कारंजा ते चौराहाच्या रस्ता रुंदीकरण यापुर्वी रितसर भूसंपादनाचे कार्यवाही अंतर्गत भूसंपादन करुन करण्यात आले. भूसंपादन कार्यवाहीचे वेळी न. भू. क्र. ८०११ व ८०१२ (म्यु. घ. नं. ८.३.३०) चे पी. आर. कार्ड बाबत संदिग्धता असल्याने व सुधारीत पी. आर. काडे तयार करण्यास वेळ लागणार असल्याने ही मिळकत भूसंपादना मधुन वगळण्यात आली. सदर मिळकती बाबत खाजगी वाटाघाटी करुन संपादन करावी असे मत विशेष भूसंपादन अधिकारी यांनी निवाडयामध्ये दिलेले असल्याने खाजगी वाटाघाटी संपादन करण्याचे कार्यवाही अंतर्गत जागेच्या ८२.५ चौ. मी. बांधीव क्षेत्र निश्चित करण्यात आलेले २.८० लाख एवढे मुल्य देणेस व न. भू. क्र. ८०११ चे ३८.०० चौ. मी. व ८०१२/पैकी चे ४.५० चौ. मी. एवढे बांधीव क्षेत्र संबंधिता कडुन रितसर संपादीत करुन घेण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ३०७/१६ :**

अति शहर अभियंता यांनी प्रस्ताव दिला की, मो. खडकेश्वर भागातील अंतर्गत रस्त्याच्या पुर्नडांबरीकरण करणे या कामासाठी तयार करण्यात आलेल्या रक्कम रु. २,५५,६००/- च्या अंदाजपत्रकास स्थायी समिती विषय क्र. ५८६/२० दि. २८-०६-९६ अन्वये मंजुरी प्राप्त झालेली आहे.

त्यानुसार सदरील कामाकरीता निविदा पत्रके मागविली असता निविदा पत्रके विक्रीच्या अंतिम तारखे पर्यंत एकूण ६ कोरे निविदा पत्रके मागविली असता निविदा पत्रके विकल्या गेले. निविदा पत्रकांच्या स्विकृतीच्या अंतिम तारखे पर्यंत यापैकी फक्त ३ निविदा पत्रके दर भरुन प्राप्त झाले प्राप्त निविदा पत्रके दि. १२-०६-९६ रोजी उघडण्यात आले त्यांचा तपशील खालील प्रमाणे आहे.

| | | |
|---|---|---|
| १. | मे. मस्कट कन्स्ट्रक्शन कं. | ८.००% जास्त दराने |
| २. | आदिनाथ कन्स्ट्रक्शन कंपनी | १५.००% जास्त दराने |
| ३. | श्री. भिमराव वसंतराव पाटील | ३०.८०% जास्त दराने |

वरील प्राप्त निविदापैकी मे. मस्कट कंन्स्ट्रक्शन कं. याच्या निविदा पत्रकाचे दर तुलनात्मकदृष्टया सर्वात कमी व अंदाजपत्रकीय दरापेक्षा ८.००% जास्त दराने आहेत. त्यांना वाटाघाटीस बोलाविले असता वाटाघाटी अंती त्यांनी सदर काम अंदाजपत्रकीय दराने करावयाचे मान्य केले आहे.

तरी मे. मस्कट कंन्स्ट्रक्शन कंपनी यांची अंदाजपत्रकीय दराची निविदा मंजुरी बाबतचा प्रस्ताव मा. स्थायी समितीच्या विचारार्थ तथ मंजुरीस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्यानुसार, मो. खडकेश्वर भागातील अंतर्गत रस्त्याच्या पुर्नडांबरीकरणाचे करणेच्या कामासाठी तुलनात्मकदृष्टया सर्वात कमी व अंदाजपत्रकीय दराने गुत्तेदार मे. मस्कट कंन्स्ट्रक्शन कंपनी यांनी (वाटाघाटी अंती) काम करणेस मान्य केल्याने त्यांचे अंदाजपत्रकीय दराचे निविदा पत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ३०८/१७ :**

अति. शहर अभियंता यांनी प्रस्ताव दिला की, गणेश कॉलनी आणि शबिस्थान कॉलनी भागातील रोडचे डांबरीकरण करणे या कामासाठी तयार करण्यात आलेल्या रु. ४,५०,६४०/- च्या अंदाजपत्रकास स्थायी समिती विषय क्र. ९१/३६ दि. १२-०७-९६ अन्वये मंजुरी प्राप्त झालेली आहे.

त्यानुसार सदरील कामाकरीता निविदा पत्रके मागविली असता निविदा पत्रके विक्रीच्या अंतिम तारखे पर्यंत एकूण ६ कोरी निविदा पत्रके विकल्या गेली व निविदा पत्रके स्विकृतीच्या अंतिम तारखे पर्यंत यापैकी फक्त २ निविदा पत्रके दर भरुन प्राप्त झाली. प्राप्त निविदा पत्रके दि. २७-०८-९६ रोजी उघडण्यात आली. त्यांचा तपशील खालील प्रमाणे आहे.

| | | |
|---|---|---|
| १. | श्री. एम. एस. जग्गी | ५% कमी दराने |
| २. | श्री. भिमराव वसंतराव पाटील | ०.१०% कमी दराने |

वरील प्राप्त निविदा पत्रका पैकी श्री. एम. एस. जग्गी यांच्या निविदा पत्रकाचे दर तुलनात्मकदृष्टया सर्वात कमी व अंदाजपत्रकीय दरापेक्षा ५% कमी आहेत.

तरी श्री. एम. एस. जग्गी यांचे अंदाजपत्रकीय दरापेक्षा ५% कमी दर मंजुरी बाबतचा प्रस्ताव विचारार्थ तथा मंजुरीस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्यानुसार, गणेश कॉलनी आणि शाबिस्थान कॉलनी भागातील रोडचे डांबरीकरण करणेच्या कामासाठी तुलनात्मकदृष्टया सर्वात कमी व अंदाजपत्रकीय दरापेक्षा ५% कमी दराचे गुत्तेदार श्री. एम. एस. जग्गी यांचे निविदा पत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ३०९/१८ :**

अति. शहर अभियंता यांनी प्रस्ताव दिला की, समर्थनगर (प्लॉट नं. ३/२२) वृंदावन कॉलनी पुष्प नगरी भागातील अंतर्गत रोडचे पुर्नडांबरीकरण करणे या कामासाठी तयार करण्यात आलेल्या रु. ३,५०,२४०/- च्या अंदाजपत्रकास स्थायी समिती विषय क्र. ७०/१५ दि. १२-०७-९६ अन्वये मंजुरी प्राप्त झालेली आहे.

त्यानुसार सदरील कामा करीता निविदा पत्रके मागविली असता निविदा पत्रके विक्रींच्या अंतिम तारखे पर्यंत एकूण ६ कोरी निविदा पत्रके विकल्या गेली व निविदा पत्रके स्विकृतीच्या अंतिम तारखे पर्यंत यापैकी फक्त ४ (चार) निविदा पत्रके दर भरुन प्राप्त झाली. प्राप्त निविदा पत्रके दि. ९७/८/९६ रोजी उघडण्यात आली. त्यांचा तपशील खालील प्रमाणे.

| | | |
|---|---|---|
| १. | श्री. के. बी. पाथ्रीकर | १७% कमी दराने |
| २. | मे. आदिनाथ कंस्ट्रक्शन | १२.७९% कमी दराने |
| ३. | श्री. भिमराव वसंतराव पाटील | ७.८९% कमी दराने |
| ४. | श्री. एम. एस. जग्गी | ७.००% कमी दराने |

वरील प्राप्त निविदा पत्रकापैकी श्री. के. बी. पाथ्रीकर यांच्या निविदा पत्रकाचे दर तुलनात्मकदृष्टया सर्वात कमी व अंदाजपत्रकीय दरापेक्षा १७% कमी आहेत.

तरी श्री. के. बी. पाथ्रीकर यांचे अंदाजपत्रकीय दरापेक्षा १७% कमी दर मंजुरी बाबतचा प्रस्ताव विचारार्थ तथा मंजुरीस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविलेल्या कामाची स्थळ पाहणी करण्यात यावी असे सर्वानुमते ठरले.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ३१०/१९ :**

अति. शहर अभियंता यांनी प्रस्ताव दिला की, दत्तनगर भागातील रोडचे डांबरीकरण करणे या कामासाठी तयार करण्यात आलेल्य रु. ४,०८,५६२/- च्या अंदाजपत्रकास स्थायी समिती विषय क्र. ६९/१४ दि. १२-०७-९६ अन्वये मंजुरी प्राप्त झालेली आहे. त्यानुसार सदरील कामाकरीता निविदापत्रके मागविली असतो निविदा पत्रके विक्रीच्या अंतिम तारखे पर्यंत एकूण ५ कोरी निविदापत्रके विकल्या गेली व निविदापत्रके स्विकृतीच्या अंतिम तारखे पर्यंत यापैकी फक्त ३ (तीन) निविदा पत्रके दर भरुन प्राप्त झाली. प्राप्त निविदा पत्रके दि. २७-०८-९६ रोजी उघडण्यात आली त्याचा तपशील खालील प्रमाणे.

| | | |
|---|---|---|
| १. | मे. व्यंकटेश कन्स्ट्रक्शन | १३.५१% कमी दराने |
| २. | मे. आदिनाथ कन्स्ट्रक्शन | १२.६५% कमी दराने |
| ३. | श्री. भिमराव वसंतराव पाटील | ५.०१% कमी दराने |

वरील प्राप्त निविदा पत्रकापैकी मे. व्यंकटेशन कंन्स्ट्रक्शन यांच्या निविदा पत्रकाचे दर तुलनात्मकदृष्टया सर्वात कमी व अंदाजपत्रकीय दरापेक्षा १३.५१% कमी आहेत.

तरी. मे. व्यकंटेश कन्स्ट्रक्शन यांचे अंदाजपत्रकीय दरापेक्षा १३.५१% कमी दर मंजुरी बाबतचा प्रस्ताव विचारार्थ तथा मंजुरीस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्यानुसार, दत्तनगर भागातील डांबरीकरण करणेच्या कामासाठी तुलनात्मकदृष्टया सर्वात कमी व अंदाजपत्रकीय दरापेक्षा १३.५१% कमी दराचे गुत्तेदार मे. व्यकंटेश कंन्स्ट्रक्शन यांचे निविदा पत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ३११/२० :**

अति. शहर अभियंता यांनी प्रस्ताव दिला की, भवानीनगर रोहीदासपुरा भागात डांबरीकरण करणे या कामासाठी तयार करण्यात आलेल्या रु. ७,७०,३२०/- च्या अंदाजपत्रकास स्थायी समिती विषय क्र. ६०/५ दि. १२-७-९६ अन्वये मंजुरी प्राप्त झालेली आहे.

त्यानुसार सदरील कामा करीता निविदा पत्रके मागविली असता निविदा पत्रके विक्रीच्या अंतिम तारखे पर्यंत एकूण ४ कोरी निविदा पत्रके विकल्या गेली व निविदापत्रके स्विकृतीच्या अंतिम तारखे पर्यंत यापैकी फक्त ३ (तीन) निविदा पत्रके दर भरुन प्राप्त झाली. प्राप्त निविदा दि. २०-०८-९६ रोजी उघडण्यात आली. त्यांचा तपशील खालील प्रमाणे.

| | | |
|---|---|---|
| १. | श्री. एम. एस. जग्गी | १०.००% कमी दराने |
| २. | श्री. भिमराव वसंतराव पाटील | ६.७९% कमी दराने |
| ३. | मे. आदिनाथ कन्स्ट्रक्शन | ५.७९% कमी दराने |

वरील प्राप्त निविदा पैकी श्री. एम. एस. जग्गी यांच्या निविदा पत्रकाचे दर तुलनात्मकदृष्टया सर्वात कमी व अंदाजपत्रकीय दरापेक्षा १०% कमी आहेत. तरी श्री. एम. एस. जग्गी यांचे अंदाजपत्रकीय दरापेक्षा १०% कमी दर मंजुरी बाबतचा प्रस्ताव विचारार्थ तथा मंजुरीस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्यानुसार, भवानीनगर रोहीदासपुरा भागात डांबरीकरण करणेच्या कामासाठी तुलनात्मकदृष्टया सर्वात कमी व अंदाजपत्रकीय दरापेक्षा १०% कमी दराचे गुत्तेदार श्री. एम. एस. जग्गी याचे निविदा पत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ३१२/२१ :**

अति शहर अभियंता यांनी प्रस्ताव दिला की, मालजीपुरा येथील रोडचे डांबरीकरण करणे या कामासाठी तयार करण्यात आलेल्या रु. १,१०,०००/- च्या अंदाजपत्रकास स्थायी समिती ठराव क्र. ६३/८/ दि. १२/७/९६ अन्वये मंजुरी प्राप्त झालेली आहे. त्यानुसार सदरील कामा करीता निविदा पत्रके मागविली असता निविदा पत्रके विक्रीच्या अंतिम तारखे पर्यंत एकूण ४ कोरी निविदा पत्रके विकल्या गेली व निविदा पत्रके स्विकृतीच्या अंतिम तारखे पर्यंत यापैकी फक्त ४ (चार) निविदा पत्रके दर भरुन प्राप्त झाली. प्राप्त निविदा पत्रके दि. २७-८-९६ रोजी उघडण्यात आली. त्याचा तपशील खालील प्रमाणे.

| | | |
|---|---|---|
| १. | श्री. आदिनाथ कंन्स्ट्रक्शन | १५.६६% कमी दराने |
| २. | मे. व्यंकटेश कंन्स्ट्रक्शन | १५.५१% कमी दराने |
| ३. | श्री. भिमराव वसंतराव पाटील | ७.९०% कमी दराने |
| ४. | मे. मस्कट कंन्स्ट्रक्शन | ०.९७% कमी दराने |

वरील प्राप्त निविदा पत्रका पैकी मे. आदिनाथ कंस्ट्रक्शन यांच्या निविदा पत्रकाचे दर तुलनात्मकदृष्टया सर्वात कमी व अंदाजपत्रकीय दरापेक्षा १५.६६% कमी आहेत तरी मे. आदिनाथ कंन्स्ट्रक्शन यांचे अंदाजपत्रकीय दरापेक्षा १५.६६% कमी दर मंजुरीबाबतचा प्रस्ताव विचारार्थ तथा मंजुरीस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्यानुसार, मालजीपुरा येथील रोडचे डांबरीकरण करणेच्या कामासाठी तुलनात्मकदृष्टया सर्वात कमी व अंदाजपत्रकीय दरापेक्षा १५.६६% कमी दराचे गुत्तेदार मे. आदिनाथ कंन्स्ट्रक्शन यांचे निविदा पत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ३१३/२२ :**

मा. शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, मो. आंबेडकरनगर (स्लम) वार्ड क्र. १२ भागात मुख्य दगडी गटार बांधणे व त्यावर आवश्यक ठिकाणी स्लॅब टाकणे या कामाकरीता एकूण रु. ४,९९,९५०/- चे अंदाजपत्रक सा. बा. विभाग, औरंगाबाद यांची दरसुची ९४-९५ प्रमाणे तयार करण्यात आले असून, मा. आयुक्त यांनी दि. १२-१२-९५ रोजी प्रशासकीय मान्यता दिली असून, सदरील कामासाठी स्थानिक वृत्तपत्रामध्ये प्रसिध्दी करुन कार्यालयाची प्रगट निविदा सुचना क्र. मनपा/लेखा/नि/८८/९६ दि. १६-७-९६ अन्वये निविदा मागविण्यात आली असता निविदा विक्रीच्या अंतिम दि. २३-७-९६ पर्यंत एकूण (११) अकरा कोऱ्या निविदा विकल्या गेल्या व स्विकारण्याच्या अंतिम दि. ५-८-९६ रोजी फक्त दोन मोहरबंद निविदा प्राप्त झाल्या त्या निविदा उपस्थित ठेकेदारा समक्ष उघडण्यात आल्या असता गुत्तेदारांनी दिलेले दर खालील प्रमाणे आहे.

| | | |
|---|---|---|
| १. | श्री. सरवदे एस. पी. | ०.०१% अ. प. दरा पेक्षा कमी |
| २. | श्री. कुलवंतसिंग | ५% अ. प. दरा पेक्षा जास्त |

तुलनात्मकदृष्टया कमी व अंदाजपत्रकीय दरापेक्षा ०.०१% कमी दराची निविदा आहे. परंतु मा. आयुक्त साहेबांनी सदरील दर मान्य नसल्यास कारणाने संबंधिताने गुत्तेदारास वाटाघाटीसाठी बोलावून चर्चा केली असता ठेकेदारांनी ०.०१% कमी ऐवजी अंदाजपत्रकीय दरापेक्षा ५% कमी दराने सदरील काम करण्याची हमी दिली आहे. करीता मान्यतेस्तव व विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्यानुसार, मो. आंबेडकर (स्लम) वार्ड क्र. १२ भागात मुख्य दगडी गटार बांधणे व त्यावर आवश्यक ठिकाणी स्लॅब टाकणेच्या कामा करीता तुलनात्मकदृष्टया सर्वात कमी व अंदाजपत्रकीय दरापेक्षा ५% कमी दराने (वाटाघाटी नुसार गुत्तेदार, श्री. सरवदे एस. पी. यांनी सदरील काम करण्याची हमी दिल्याने त्यांचे दरपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ३१४/२३ :**

शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, रविंद्रनगर (शहाबाजार) येथील स्मशान मध्ये बर्निंग रोड बांधणे कामाचे अंदाजपत्रक सन ९५-९६ सालचे सा. बा. खात्याच्या दर सुची अन्वये रक्कम रु. १,१४,७००/- चे तयार करण्यात आले त्यास मा. आयुक्त यांची मंजुरी झालेली आहे. सदर खर्च स्मशान भूमी व तरतुदी मधुन करण्यात येणार आहे. करीता प्रस्ताव मंजुरीस्तव व विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्यानुसार, रविंद्र नगर (शहाबाजार) येथील स्मशान भूमी मध्ये बर्निंग रोड बांधणेचे कामासाठी तयार करण्यात आलेले र. रु. १,१४,७००/- चे अंदाजपत्रकास तसेच सदर खर्च स्मशानभूमी या तरतुदी मधून करण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

**विषय क्र. ३१५/२४ :**

मो. बायजीपुरा येथील जालना रोड लगतच्या न. भु. क्र. १२४८३/१ करीताचे मंजुर रेखाकंनातील खुली जागा जिम्नॅशियम हॉल बांधण्याचे विकासा करीता जायंटग्रुप ऑफ चिखलठाणा यांनी मागणी केलेली आहे.

सदरील मंजुर रेखांकनातील हया खुल्या जागेचे क्षेत्र ५२७/३२ चौ. मी. एवढे असून, विकास नियंत्रण नियमावलीतील नुसार हया खुल्या जागेच्या क्षेत्राचे १०% म्हणजे ५२.७३ चौ. मी. एवढे बांधकाम हया खुल्या जागेत देय आहे. सदर संस्था हया खुल्या जागेत देय होणाऱ्या क्षेत्रामध्ये जिम्नॅशियम हॉलचे बांधकाम करणार आहे. करीता जॉयटंस ग्रुप ऑफ चिलकठाणा हया स्वयंसेवी, समाजसेवी संस्थेस हया खुल्या जागेतील ५२.७३ चौ. मी. एवढी जागा प्रतिवर्ष रु. ५५७०/- एवढया दराने ३० वर्षाचे कालावधी करीता सदर संस्थेने सदरील संपूर्ण खुल्या जागेचा सर्वाथाने उद्यान म्हणून स्वखर्चाने विकास करावा या अटीसह महापालिकेच्या नेहमीच्या अटी शर्तीस पात्र राहून भाडेपटयावर देण्याचा प्रस्ताव मान्यतेसाठी सादर.

प्रस्ताव मान्यते नंतर सदर संस्थेस यापुर्वी नगर रचना विभागाने खुल्या जागा देतांना ठरवून देतांना ठरवून दिलेल्या सर्व अटी व शर्ती कळवुन त्या त्यांना मान्य असल्यास आवश्यक तो करारनामा व इतर कार्यवाही पूर्ण करुन जागा भाडेपटयावर देण्याची कार्यवाही करण्यात येईल.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्या प्रमाणे मो. बायजीपुरा येथील जालना रोड लगत असलेल्या न. भु. क्र. १२४८३/१ या मंजुर रेखांकनातील खुल्या जागेमध्ये विकास नियंत्रण नियमावलीतील तरतुदी नुसार खुल्या जागेच्या क्षेत्राचे १०% म्हणजेच ५२.७३ चौ. मी. खुल्या जागेवर संबंधित संस्थेस संपूर्ण खुल्या जागेचा सर्वार्थाने उद्यान म्हणून स्वखर्चाने विकास करावा. या अटीसह व महापालिकेने ठरवून दिलेल्या सर्व अटी व शर्ती मान्य असल्यास आवश्यक ती कार्यवाही करुन जॉयंटस ग्रुप ऑफ चिकलठाणा यांना जिम्नॅशियम हॉल बांधण्याकरीता प्रति वर्ष रु. ५,५७०/- या दराने ३० वर्षाच्या कालावधी करीता खुली जागा महापालिकेच्या नेहमीच्या अटी व शर्तीस पात्र राहुन भाडेपटयावर देण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ३१६/२५ :**

शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, मो. फुले नगर हर्सुल स्लम वार्ड क्र. ११ येथे रस्ते तयार करणे, गटार दुरुस्त करणे, रोड क्रॉस पाईप टाकणे व एस. एफ. आर. सी. ढापे टाकणे बाबत कामा करीता सा. बा. खाते यांच्या वर्ष ९५-९६ नुसार रु. ४२७८००/- चे अंदाजपत्रक तयार करण्यात आले आहे. सदरील काम अठरा खेडी विकास योजना ११ या शिर्षकातुन करण्यात येईल. सदरच्या अंदाजपत्रकास मा. आयुक्त साहेबांनी दि. २६-९-९६ ला प्रशासकीय मान्यता दिली आहे.

तरी सदर कामाकरीता तयार करण्यात आलेले अंदाजपत्रक रक्कम रु. ४२७८००/- यास मान्यतेचा प्रस्ताव विचारार्थ तथा मंजुरीस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्यानुसार, मो. फुलेनगर हर्सुल स्लम वार्ड क्र. ११ येथे खडी रस्ते तयार करणे, गटार दुरुस्त करणे, रोड क्रॉस पाईप टाकणे व एस. एफ. आर. सी. ढापे टाकणे बाबतचे कामा करीता तयार करण्यात आले र. रु. ४२७८००/- चे अंदाजपत्रकास तसेच सदरील काम " अठरा खेडी विकास योजना " या शिर्षकातून करण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ३१७/२६ :**

शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला की, मो. मोती कारंजा येथील प्रा. शाळेच्या छतास वाटर प्रुफिंग करणे व फरशी बसविण्याच्या सार्वजनिक बांधकाम खात्याचे सन ९५-९६ चे जिल्हा दर सुची नुसार रक्कम रु. १,६४,१५३/- चे अंदाजपत्रक तयार करण्यात आले असून, अंदाजपत्रकास स्थायी समिती पुढे प्रशासकीय मान्यतेस्तव ठेवणेस्तव मा. आयुक्त यांनी दि. १९-९-९६ ला शिफारस केली आहे.

सबब सदर कामासाठी रक्कम रु. १,६४,१५३/- चे अंदाजपत्रक मंजुरीचा प्रस्ताव विचारार्थ सादर सदरचा खर्च ईमारती दुरुस्ती व देखभाल या लेखा शिर्षा मधून सन ९६-९७ या वर्षात करण्यात येईल.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्यानुसार, मो. मोतीकारंजा येथील प्रा. शाळेच्या छतास वाटर प्रुफिंग करणे व फरशी बसविण्याच्या कामासाठी तयार करण्यात आलेले रक्कम रु. १,६४,१५३/- चे अंदाजपत्रकास तसेच सदरचा खर्च इमारती दुरुस्ती व देखभाल या शिर्षा मधुन सन ९६-९७ या वर्षात करण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ३१८/२७ :**

कार्यकारी अभियंता पाणी पुरवठा व जलनिःसारण यांनी प्रस्ताव सादर केला की, मो. किलेअर्क येथील मशीद लगत नाल्यास संरक्षित भिंत बांधणेच्या कामा करीता अंदाजपत्रकीय रक्कम रु. ५,००,०००/- चे तयार करण्यात येऊन स्थायी समिती सभा दि. १२-७-९६ च्या सभेत विषय क्र. ७८/२३ नुसार संमत झाला आहे. सदरील कामाची निविदा क्र. जा. क्र./मनपा/लेखा/नि/९३/९६/ दि. ९-८-९६ अन्वये वर्तमान पत्रात प्रसिध्दीस दिली असता एकूण (१६) सोळा निविदा पत्रके विकण्यात आली व त्यापैकी फक्त २ (दोन) निविदा प्राप्त झाल्या त्यांचा तुलनात्मक तक्ता खालील प्रमाणे.

| | | |
|---|---|---|
| १. | मेसर्स बसरा कंन्स्ट्रक्शन | ७% अ. प. दरा पेक्षा जास्तीचे दराने |
| २. | श्री. एस. एम. मंडोरे | २०.१०% अ. प. दरा पेक्षा जास्तीचे दराने |

तुलनात्मकदृष्टया सर्वात कमी म्हणजेच अंदाजपत्रकीय दरापेक्षा ७% जास्तीच्या दराने मेसर्स बसरा कन्स्ट्रक्शन यांची निविदा आहे. परंतु सदरील दर जास्तीच्या दर असल्यामुळे सदरील मेसर्स बसरा कन्स्ट्रक्शन हयांना मा. आयुक्तांना दालनात वाटाघाटी साठी बोलाविले असता त्यांनी सदरील काम अंदाजपत्रकीय दराने करण्यास संमती दर्शविली व त्यास मा. आयुक्तांनी दि. १९-९-९६ ला प्रशासकीय मान्यता दिली तरी मेसर्स बसरा कंन्स्ट्रक्शन हयांची अंदाजपत्रकीय दराची निविदा स्थायी समितीच्या विचारार्थ तथा मंजुरीस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्यानुसार, मो. किलेअर्क येथील मशिदी लगत नाल्यास संरक्षित भिंत बांधण्याच्या कामा करीता तुलनात्मकदृष्टया सर्वात कमी व अंदाजपत्रकीय दराचे गुत्तेदार मेसर्स बसरा कंन्स्ट्रक्शन (वाटाघाटीनुसार) यांचे निविदा पत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ३१९/२८ :**

शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, मो. इंदिरानगर बायजीपुरा वार्ड क्र. २४ स्लम येथील मुख्य रस्त्याचे पुर्नडांबरीकरण करणे बाबतच्या कामा करीता

सार्वजनिक बांधकाम खाते यांच्या वर्ष ९५-९६ च्या दरसुची नुसार र. रु. १,२९१७७/- चे अंदाजपत्रक तयार करण्यात आले आहे. सदरील काम " खडी रस्ते " या शिर्षकातुन करण्यात येईल. सदरच्या अंदाजपत्रकास मा. आयुक्त साहेबांनी दि. २२-९-९६ ला प्रशासकीय मान्यता दिली आहे.

तरी सदरील कामा करीता तयार करण्यात आलेले अंदाजपत्रक रक्कम रु. १२९१७७/- यास मान्यतेचा प्रस्ताव विचारार्थ तथा मंजुरीस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्यानुसार, मो. इंदिरा नगर बायजीपुरा वार्ड क्र. २४ स्लम येथील मुख्य रस्त्यांचे पुर्नडांबरीकरण करणेबाबतच्या कामा करीता तयार करण्यात आलेले रक्कम रु. १२१७७/- चे अंदाजपत्रकास तसेच सदरील काम " खडी रस्ते या लेखा शिर्षकातुन करण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ३२०/२९ :**

अति शहर अभियंता प्रस्ताव सादर करीत आहेत की, सहयोग नगर मधील अंतर्गत रस्त्याचें डांबरीकरण करणे कामाचे सन १९९५-९६ चे सार्वजनिक बांधकाम खात्याचे डी. एस. आर. दराने रक्कम रु. ३०५८४१/- चे अंदाजपत्रक तयार करण्यात आले असून, मा. आयुक्त यांची मंजुरी मिळालेली आहे. सदरील कामाचा खर्च सन १९९६-९७ भांडवली रस्ते या लेखा शिर्षा मधून प्रस्तावित आहे.

सदरील कामासाठी निविदा पत्रके मागविली असता निविदा पत्रके विक्रीच्या अंतिम तारखे पर्यंत एकूण सात निविदा पत्रके विक्री झाल्या असून, निविदा पत्रके स्विकृतीच्या अंतीम तारखे पर्यंत एकूण पाच निविदा पत्रके दर भरुन प्राप्त झाल्या असून, त्याचा तुलनात्मक तक्ता खालील प्रमाणे आहे.

| | | |
|---|---|---|
| १. | मे. मस्कट कन्स्ट्रक्शन | १७.८६% कमी दराने |
| २. | श्री. के. बी. पाथ्रीकर | १४.२१% कमी दराने |
| ३. | मे. व्यकंटेश कंन्स्ट्रक्शन | १३.३१% कमी दराने |
| ४. | श्री. एम. एस. जग्गी | १०.००% कमी दराने |

तुलनात्मकदृष्टया कमी व अंदाजपत्रकीय दरापेक्षा १७.८६% कमी दराने मे. मस्कट कंन्स्ट्रक्शन यांची निविदा आहे.

तरी सदर कामाकरीता तयार करण्यात आलेल्या रक्कम रु. ३०५८४१/- च्या अंदाजपत्रकास तसेच सदरील काम मे. मस्कट कंन्स्ट्रक्शन यांच्या कडून १७.८६% कमी दराने करुन घेण्या बाबतचा प्रस्ताव विचारार्थ तथा मंजुरीस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्यानुसार, सहयोग नगर मधील अंतर्गत रस्त्याचे डांबरीकरण करणेच्या कामासाठी तुलनात्मकदृष्टया सर्वात कमी व अंदाजपत्रकीय दरापेक्षा १७.८६% कमी दराचे मे. मस्कट कंन्स्ट्रकशन यांचे निविदा पत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ३२१/३० :**

अतिरिक्त शहर अभियंता यांनी प्रस्ताव दिला की, मनपा चे मुख्य इमारतीचे आवारात " टाऊन हॉल " येथे अेक ट्रान्सफार्मर बसविण्याचे कामासाठी रु. ४,९७,०००/-

च्या अंदाजपत्रकीय खर्चास स्थायी समिती विषय क्र. --------/ दि. -------- अन्वये मंजुरी प्राप्त झालेली आहे.

त्यानुसार सदर कामासाठी निविदा मागविल्या असता निविदा विक्रीचे अंतिम तारखे पर्यंत एकूण निविदा (कोऱ्या) विकण्यात आल्या व मोहरबंद निविदा पत्रके स्विकृतीच्या अंतिम तारखे पर्यंत फक्त सहा निविदा प्राप्त झाल्या प्राप्त निविदा पत्रके दि. ----- रोजी उघडण्यात आल्या त्यांचा तपशील खालील प्रमाणे आहे. तज्यास मा. आयुक्तांनी दि. ०७-०९-९६ रोजी मान्यता दिली आहे.

| | | |
|---|---|---|
| १. | मे. कॅपको एजन्सी | रु. ०८.३०% कमी दर |
| २. | मे. सत्यम वायर्स | रु. ०९.९५% कमी दर |
| ३. | मे. दनिश सेल्स कॉर्पोरेशन | रु. ०२.००% कमी दर |
| ४. | मे. जे. बी. इलेक्ट्रीकल्स | रु. ०४% जास्त दर |
| ५. | मे. लुना इलेक्ट्रीकल्स | रु. ०८% जास्त दर |
| ६. | मे. हिंद इलेक्ट्रीकल्स | रु. ३६% जास्त दर |

वरील तुलनात्मक तक्त्या नुसार मे. सत्यम वायर्स यांचे दर सर्वात कमी म्हणजे अंदाजपत्रकीय दरापेक्षा ०९.९५% कमी दर आहेत. तरी मे. सत्यम वायर्स यांची रु. ०९.९५% कमीचे दर स्विकारण्याचे विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्यानुसार, मनपा चे मुख्य इमारतीचे आवारात " टाऊन हॉल " क्र. येथे अेक ट्रान्सफार्मर बसविण्याचे कामासाठी तुलनात्मकदृष्टया सर्वात कमी व अंदाजपत्रकीय दरापेक्षा ०९.९५% कमी दराचे गुत्तेदार, मे. सत्यम वायर्स यांचे निविदा पत्रकास स्टॅंडर्ड कंपनीचे ट्रान्सफार्मर पुरविण्यात यावे या अटीवर सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ३२२/३१ :**

अति शहर अभियंता यांनी प्रस्ताव दिला आहे की, मो. काझी वाडा भागात खांडकी बसविणे व जुनी खांडकी दुरुस्त करणे या कामासाठी तयार करण्यात आलेल्या रक्कम रु. २,६०,६००/- च्या अंदाजपत्रकास स्थायी समिती विषय क्र. ५८९/२३ दिनांक २८-०६-९६ अन्वये मंजुरी प्राप्त झालेली आहे. त्यानुसार सदरील कामासाठी निविदा मागविले असता निविदा पत्रके विक्रीच्या अंतिम तारखे पर्यत एकूण २३ निविदा पत्रके विकल्या गेली व निविदा पत्रके स्विकृतीच्या अंतिम तारखे पर्यंत या पैकी फक्त २ निविदा पत्रके दर भरुन प्राप्त झाले. प्राप्त निविदा पत्रके दि. १२-७-९६ रोजी उघडण्यात आले त्यांचा तपशील खालील प्रमाणे आहे.

| | | |
|---|---|---|
| १. | श्री. के. बी. पाथ्रीकर | अंदाजपत्रकीय दराने |
| २. | श्री. सय्यद अथर अली जाफर अली | ५.००% जास्त दराने |

वरील प्राप्त निविदा पत्रका पैकी श्री. के. बी. पाथ्रीकर यांच्या निविदा पत्रकाचे दर तुलनात्मकदृष्टया सर्वात कमी व अंदाजपत्रकीय दराने आहेत. त्यांच्या वाटाघाटीस बोलाविले असता वाटाघाटीअंती त्यांनी सदर काम अंदाजपत्रकीय दरापेक्षा ५% कमी दराने करावयाचे मान्य केले आहे. तरी श्री. के. बी. पाथ्रीकर यांचे अंदाजपत्रकीय दरापेक्षा ५% कमी दराची निविदा मंजुरी बाबत प्रस्ताव मा. स्थायी समितीचे विचारार्थ तथा मंजुरीस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविलेल्या कामाची स्थळ पाहणी करण्यात यावी असे सर्वानुमते ठरले.

**विषय क्र. ३२३/३२ :**

अति शहर अभियंता यांनी प्रस्ताव दिला की, हॉटेल आशियाना ते स्टेट बँक ऑफ हैद्रबाद पर्यंतच्या रस्त्याचे विद्युतीकरण करणे या कामासाठी तयार करण्यात आलेल्या र. रु. ३,३५,००४/- च्या अंदाजपत्रकास स्थायी समिती विषय क्र. ------- दि. --------- अन्वये मंजुरी प्राप्त झालेली आहे. त्यानुसार सदरील कामा करीता निविदा पत्रके मागविली असता निविदा पत्रके विक्रीच्या अंतिम तारखे पर्यंत एकूण तेरा कोरी निविदा पत्रके विकल्या गेली व निविदा पत्रके स्विकृतीच्या अंतिम तारखे पर्यंत फक्त सात दरपत्रके भरुन प्राप्त झाली. प्राप्त निविदा पत्रके दिनांक २७-८-९६ रोजी उघडण्यात आली. त्याचा तपशील खालील प्रमाणे.

| | | |
|---|---|---|
| १. | मे. लुना इलेक्ट्रीकल्स | ५.१०% जास्त दराने |
| २. | मे. दानिश सेल्स कॉर्पोरेशन | १८.२१% कमी दराने |
| ३. | मे. शाम इलेक्ट्रीकल्स स्टोअर्स | १२.६०% कमी दराने |
| ४. | मे. आदित्य इलेक्ट्रीकल्स | २.००% कमी दराने |
| ५. | मे. बी. जे. इलेक्ट्रीकल्स कं. | ५.००% जास्त दराने |
| ६. | मे. हिंद इलेक्ट्रीक कं. | ९.९५% जास्त दराने |
| ७. | मे. जे. बी. इलेक्ट्रीकल्स | ६.००% जास्त दराने |

वरील प्राप्त निविदापत्रका पैकी मे. दानिश सेल्स कार्पोरेशन यांच्या निविदा पत्रकाचे दर तुलनात्मकदृष्टया सर्वात कमी व अंदाजपत्रकीय दरा पेक्षा १८.२९% कमी आहे.

तरी मे. दानिश सेल्स कार्पोरेशन यांचे अंदाजपत्रकीय दरापेक्षा १८.२१% कमी/जास्त दर मंजुरी बाबतचा प्रस्ताव विचारार्थ तथा मंजुरीस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्यानुसार, हॉटेल आशियाना ते स्टेट बँक ऑफ हैद्राबाद पर्यंतच्या रस्त्याचे विद्युतीकरण करणेच्या कामासाठी तुलनात्मकदृष्टया सर्वात कमी व अंदाजपत्रकीय दरापेक्षा १८.२१% कमी दराचे गुत्तेदार मे. दानिश सेल्स कार्पोरेशन यांचे निविदा पत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते व सदर प्रस्तावचे इतिवृत्त याच सभेत कायम करणेस सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

## *ऐनवेळचे विषय*

**विषय क्र. ३२४/१ :**

अति शहर अभियंता प्रस्ताव सादर करीत आहेत की, संजयनगर हौसिंग सोसायटी (पीर बाजार) येथील अंतर्गत रस्त्याचे पुर्नडांबरीकरण करणेच्या कामाकरीता सन १९९५-९६ चे सा. बा. खात्याचे दरसुचीनुसार रक्कम रु. १,६०,५३०/- चे अंदाजपत्रक तयार करण्यात आले आहे. सदरील कामास मा. आयुक्त यांची मंजुरी मिळालेली आहे. सदर कामाचा खर्च रस्ते दुरुस्ती व देखभाल सन १९९६-९७ साली असलेल्या तरतुदीमधून प्रस्तावित आहे. तरी प्रस्ताव स्थायी समितीच्या मंजुरीस्तव विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्यानुसार, संजयनगर हौसिंग सोसायटी (पीरबाजार) येथील अंतर्गत रस्त्यांचे पुनर्डांबरीकरण करणेच्या कामाकरीता तयार करण्यात आलेल्या र. रु. १,६०,५३०/- च्या अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ३२५/२ :**

अति शहर अभियंता प्रस्ताव सादर करीत आहेत की, उत्सव मंगल कार्यालय चौकाचे सौंदर्यीकरण करण्याचे दृष्टीने मा. आयुक्त यांचे बरोबर प्रत्यक्ष स्थळ पाहणी केली. पाहणी अंती सदरील कामासाठी लागणाऱ्या सिव्हील वर्कचे अंदाजपत्रक तयार करण्यात आले असून, अंदाजपत्रकीय र. रु. १,७१,३००.०० आहे. शहर सौंदर्यीकरणाची कामे तातडीने चालू करावयाची असल्याने सदरील काम उपलब्ध कॉन्ट्रक्टर श्री. शेख मसुद यांचेकडून अंदाजपत्रकीय दराने करुन घेण्यास मा. आयुक्त यांची मंजुरी मिळाली आहे. तरी सदर काम अंदाजपत्रकीय दराने श्री. शेख मसुद यांचेकडून करुन घेण्याबाबतचा प्रस्ताव स्थायी समितीच्या विचारार्थ तथा मंजुरीस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्यानुसार, उत्सव मंगल कार्यालय चौकाचे सौंदर्यीकरण करण्याचे कामासाठी तयार करण्यात आलेल्या र. रु. १,७१,३००/- च्या अंदाजपत्रकास तसेच सदरील काम अंदाजपत्रकीय दराने श्री. शेख मसुद, गुत्तेदार यांचेकडून करुन घेण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ३९६/३ :**

अतिरिक्त शहर अभियंता प्रस्ताव सादर करीत आहेत की, कोकणवाडी येथे रुंद गल्यामध्ये खांडकी दुरुस्ती करणेच्या कामाचे सन १९९५-९६ चे सा. बा. खात्याचे डी. एस. आर. दराने र. रु. २,५४,२००/- चे अंदाजपत्रक तयार करण्यात आले असून, त्यास मा. आयुक्त यांची मंजुरी मिळाली आहे. सदरील कामाचा खर्च रस्ते दुरुस्ती व देखभाल (पॅकवर्क) या लेखा शिर्षामधून सन १९९६-९७ साठी असलेल्या तरतुदीमधुन प्रस्तावित आहे.

तरी सदरील कामासाठी तयार करण्यात आलेल्या र. रु. २,५४,२००/- चे अंदाजपत्रक मंजुरीबाबतचा प्रस्ताव स्थायी समितीच्या विचारार्थ तथा मंजुरीस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे कोकणवाडी येथे अरुंद गल्ल्यांमध्ये खांडकी दुरुस्ती करणेच्या कामाकरीता तयार करण्यात आलेल्या र. रु. २,५४,२००/- च्या अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. या कामाकरीता शॉर्ट टेंडर काढावे वा काम तात्काळ करावे.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ३२७/४ :**

अतिरिक्त शहर अभियंता प्रस्ताव सादर करीत आहेत की, गजानन महाराज चौकाचे सौंदर्यीकरणाचे दृष्टीने मा. आयुक्त यांचे बरोबर सदरील चौकाची पाहणी करण्यात आली. पाहणी अंती सदरील चौकात मार्बलची समई ग्रॅनाईटचे सिव्हील वर्कवर बसविणे तसेच त्यात मार्बलची जाळी बसवून दिवे लावण्याचे ठरले. त्यानुसार चर्चा करुन मोजमाप ठरवून नकाशा

तयार करण्यात आली व सदरील नकाशानुसार या कामात अनुभवी असलेल्या एजन्सीकडून कामाची दरपत्रके मागविली असता सिव्हील वर्कसहित कोटेशन घेण्यात आले. त्याचे दर खालील प्रमाणे.

| | | |
|---|---|---|
| १. | श्री. संजय सोनी | ४,८५,०००/- |
| २. | मे. व्यंकटेश कंन्स्ट्रक्शन | ४,९८,०००/- |
| ३. | श्री. महेश एन. वर्मा | ४,९५,०००/- |

सर्वात कमी दर श्री. संजय सोनी यांचे असून, त्यांचे दर सिव्हील वर्क सहीत रु. ४,८५,०००/- आहेत. सदर दर जास्त वाटत असल्यामुळे संबंधितास मा. आयुक्तांचे समोर प्रत्यक्ष वाटाघाटीस बोलाविले असता मा. आयुक्तांनी संबंधितास सदरील काम रेट ॲनालिसीसमध्ये दाखल केलेल्या बाबीमध्ये कोणत्याही बदल न करता सदरील काम हे रु. ४,२५,०००/- सिव्हील वर्कसहित करावे असे सांगितले. त्यानुसार संबंधिताने सदरील काम रुपये ४,२५,०००/- मध्ये करावयास संमती दिली. करीता सदरील काम श्री. संजय सोनी यांचेकडून टर्न की बेसीसवर करुन घेण्याचे मान्यतेस्तव प्रस्ताव मंजुरीस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्यानुसार, गजानन महाराज चौकाचे सौदंर्यीकरणाच्या कामाकरीता मागविण्यात आलेल्या कोटेशननुसार व पैकी सर्वात कमी दराचे दरपत्रकधारक श्री. संजय सोनी यांचेशी झालेल्या वाटाघाटीनुसार उपरोक्त काम रु. ४,२५,०००/- मध्ये करुन घेण्यास तसेच हे काम टन की बेसीसवर करुन घेण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ३२८/५ :**

अतिरिक्त शहर अभियंता प्रस्ताव सादर करीत आहे की, औरंगाबाद मनपाचे गरवारे क्रिडा संकुल येथे पश्चिम बाजुस नविन पॅव्हेलियन इमारतीचे बांधकाम करणेच्या कामाचे संबंधित वास्तु शास्त्रज्ञाकडून अंदाजपत्रक घेण्यात आले. सदरील अंदाजपत्रकास हे सन ९४-९५ चे डी. एस. आर. दराप्रमाणे असून, सदरील कामाची एकूण किंमत १८३९०००/- रु. आहे. सदरील कामाचा खर्च शासकीय अनुदान ९५-९६ चे र. रु. १० कोटीमधून प्रस्तावित आहे.

सदरील कामासाठी निविदापत्रके मागविली असता विक्रीच्या अंतिम तारखेपर्यंत एकूण १२ निविदा विकल्या गेल्या. निविदा स्विकृतीच्या

अंतिम तारखे पर्यंत दोन निविदा प्राप्त झाल्या. त्याचे खालील प्रमाणे होते.

| | | |
|---|---|---|
| १. | मे. एलोरा कंन्स्ट्रक्शन | ४.५०% जास्त डी. एस. आर. ९५-९६ प्रमाणे |
| २. | मे. के. एस. गुरु ॲन्ड कंपनी | ८.४५% जास्त दराने |

परंतु एलोरा कंन्स्ट्रक्शन कंपनी यांनी निविदेसोबत कॉल डिपॉझीट (इ.एम.डी.) परंतु एलोरा कंन्स्ट्रक्शन कंपनी यांनी निविदेसोबत कौल डिपॉझिट (इ.एम.डी.) चेकने सादर केली होती. त्यानंतर मा. आयुक्तांना दोन्ही एजंन्सीला पत्र देऊन ते किती दर कमी करणार याबाबत विचारणा केली असता खालील प्रमाणे दर प्राप्त झाले.

| | | |
|---|---|---|
| १. | मे. एलोरा कंन्स्ट्रक्शन कंपनी | अंदाजपत्रकीय दरापेक्षा ८.००% जास्त व शालन नियम १०९१/सीआर १७२ दि. १०-९-९२ नुसार भाववाढ फरक मागितला. |

२. मे. के. एस. गुरु यांनी त्यांचे अंदाजपत्रकीय दरापेक्षा ८% जास्त दर्शविले व सिमेंट रिकव्हरी १६३ रु. प्रति गोणी ऐवजी १४० रु. प्रति गोणी गृहीत धरण्यात यावी अशी अट घातली.

उपरोक्त दोन्ही दर लक्षात घेता मे. एलोरा कंन्स्ट्रक्शन कंपनी यांचे दर तुलनात्मकदृष्टया दोन्ही निविदापैकी कमी आहेत. जरी भाववाढ फरक मागितला आहे तरी सदरील बाब ही नियमीत स्वरुपाची आहे व इतर कोणासही सदरचे अथवा इतर काम दिल्यास ते भाववाढ करुन मागू शकतील. तथापी ते एलोरा कंन्स्ट्रकशन कंपनी यांनी निविदेसोबत ई. एम. डी. रोखीने अथवा वे स्लीपने सदर न करता चेकने सादर केलेली आहे. सदर चेक वटवून इ. एम. डी. मनपा फंडामध्ये जमा करता येईल. मनपाचा दोन्ही दराने विचार करता मे. एलोरा कंन्स्ट्रक्शन यांची निविदा मान्य केल्यास फायदा होऊ शकतो त्यामुळे त्यांनी जरी इ. एम. डी. चेकने सदर केली असली तरी मनपाचा फायदा बघता विशेष बाब म्हणून त्यांना निविदा मान्य करण्यास व उपरोक्त बाबी स्थायी समिती समोर विचारार्थ ठेवण्यास शिफारस करण्यास हरकत नसावी असे लेखाधिकारी यांचे अभिप्राय आहेत. मा. आयुक्तांनी सदरील काम एलोरा कंन्स्ट्रक्शन कंपनी यांनी ९४-९५ चे दराने करावे असे सुचित केले. त्यास एलोरा कंन्स्ट्रक्शन कंपनी यांनी संमती दर्शविली आहे. तरी प्रस्ताव स्थायी समितीचे विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे महानगरपालिकेचे गरवारे क्रिडा संकुल येथे पश्चिम बाजुस पॅव्हेलियन इमारतीचे बांधकाम करण्याच्या कामाकरीता र. रु. १८,३९,०००/- च्या अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. या कामाकरीता प्राप्त निविदापैकी कमी दराचे निविदा धारक मे. एलोरा कंन्स्ट्रक्शन कंपनी यांचे झालेल्या वाटाघाटीनुसार अंदाजपत्रकीय दरापेक्षा ४% जास्त दराने काम करुन घेण्यास तसेच शासन निर्णयानुसार भाववाढ फरक देण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. सदर काम ९४-९५ चे डी. एस. आर. दराने करुन घेण्यात यावे. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**टीप : ठराव क्र. ३२९/६ सभेच्या शेवटच्या पानावर पहावा.**

**विषय क्र. ३३०/७ :**

शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला की, सिमेंट खरेदी बाबत स्थायी समितीत दि. १७-०९-९६ ठराव क्र. २२१/५ अन्वये सिमेंट कॉर्पोरेशन ऑफ इंडिया यांच्याकडून रु. १२५/- प्रति गोणी या दराने सिमेंट खरेदीची मंजुरी दिली आहे.

परंतु मोठी सिमेंट यांना दि. १८-०९-९६ रोजी मा. आयुक्त साहेबांनी पत्र देऊन कळविले की, रु. १२३.०० प्रति गोणी सर्व करासहित सिमेंट पुरवठा करण्यात तयार आहे. याबाबतीत दि. २१-०९-९६ च्या स्थायी समितीत प्रस्ताव फेर विचारार्थ सादर करण्यात आला होता. त्यावर सी. सी. आय. कंपनीबरोबर मा. आयुक्त साहेबांनी दराबाबत वाटाघाटी करुन करारनामा करावा असे ठरल्यानुसार यावर दि. ३०-०९-९६ रोजी मा. आयुक्तांच्या दालनास बोलाविण्यात आले असता त्यांनी रु. १२२.५० प्रति गोणी सर्व करासहित दर प्रस्तावित केले व लेखी पत्र सादर केले चर्चेत मुख्य लेखा परीक्षक शहर अभियंता व लेखाधिकारी-१ उपस्थित होते.

तरी अंतिम दर रु. १२२.५० प्रति गोणी या दराने सिमेंट कार्पोरेशन ऑफ इंडिया यांच्याकडून सिमेंट खरेदी करण्यास्तव प्रस्ताव मंजुरीस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्यानुसार, दि. १७-०९-९६ च्या स्थायी समिती मध्ये ठराव क्र. २२१/५ अन्वये सिमेंट कार्पोरेशन ऑफ इंडिया यांच्या कडून रु. १२५.०० प्रति गोणी दराने सिमेंट खरेदीची मंजुरी दिली होती. तथापी अंतिम वाटाघाटी अंती ठरल्यानुसार उपरोक्त दराऐवजी रु. १२२.५० प्रति गोणी या दराने सिमेंट कार्पोरेशन ऑफ इंडिया यांच्याकडून सिमेंट खरेदी करण्यास मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ३३१/८ :**

शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, मो. घाटी जयभिमनगर स्लम येथे डॉ. बाबासाहेब आंबेडकर पुतळयासाठी विद्यापीठ गेट तयार करणे, फरशी बसविणे व सौदंर्यीकरण करणे व इतर कामाकरीता सा. बा. खात्याचे सन ९५-९६ च्या दरसुचीनुसार रक्कम रु. १,२०,८००/- चे अंदाजपत्रक तयार करण्यात आले आहे. सदरील कामाचा खर्च ५% कमकुवत घटक कल्याण योजना या शिर्षकातून करण्यात येईल. सदरच्या अंदाजपत्रकास मा. उप आयुक्त साहेबांनी दिनांक ०१-१०-९६ ला प्रशासकीय मान्यता दिली आहे व मा. आयुक्त साहेबांची कार्योत्तर मंजुरी घ्यावी. असा अभिप्राय दिला आहे.

तरी सदरील कामासाठी तयार करण्यात आलेले अंदाजपत्रक र. रु. १,२०,८००/- यास मान्यतेस्तव प्रस्ताव विचारार्थ तथा मंजुरीस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्यानुसार, घाटी जयभिमनगर स्लम येथे डॉ. बाबासाहेब आंबेडकर पुतळयासाठी विद्यापीठ गेट तयार करणे, फरशी बसविणे व सौंदर्यीकरण करणे व इतर कामाकरीता तयार करण्यात आलेल्या र. रु. १,२०,८००/- च्या अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. सदर काम " विशेष बाब " म्हणून तात्काळ काम करावे.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ३३२/९ :**

शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला की, दिल्ली गेट येथे मा. आयुक्त यांचे निवासस्थानाची दि. २२-०९-९६ रोजी मा. सहाय्यक संचालक नगर रचना मा. शहर अभियंता व मा. आयुक्त यांनी सयुक्त पाहणी केली. प्रस्तुत निवास्थानातील मध्यभागाच्या खोलीचा वापर बेडरुम म्हणून करण्या करीता व त्यात ॲटॅच टॉयलेट इ. नविन करण्यासाठी प्रत्यक्ष स्थळावर मा. आयुक्त महोदय यांनी सुचविले. निवासस्थानातील अस्तित्वात असलेल्या काही भिंती तोडून बीम वगैरे टाकून व काही भिंती बांधून म्हणजेच निवासस्थनात अंतर्गत फेर फार करुन एक अद्यावत बेडरुम ॲटेच टॉयलेट तयार करण्यासाठी सा. बा. खात्याचे सन ९५-९६ चे जिल्हा दरसुची नुसार र. रु. १६०,१३०/- चे अंदाजपत्रक तयार करण्यात आले असून, काम तातडीने असल्याने व काम करतांना घेणारा सांभाव्य धोका टाळण्यासाठी तांत्रिकदृष्टया तरबेज गुत्तेदार यांचेकडून अंदाजपत्रकीय दरावर काम करण्यासाठी स्थायी समिती समोर ठेवण्यासाठी दि. १-१०-९६ अन्वये मा. उप आयुक्त यांनी शिफारस केली आहे.

सबब सदरचे कामाचे र. रु. १,६०,१३०/- ला तसेच सदर काम उपलब्ध मक्तेदार श्री. डी. पी. जीवनलाल यांचेकडून करुन घेण्यासाठी प्रस्ताव मंजुरीस्तव व विचारार्थ सादर. सदरचा खर्च इमारत दुरुस्ती व देखभाल या लेखा शिर्षामधून सन ९६-९७ या वर्षात करण्यात येईल.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्यानुसार, दिल्ली गेट स्थित मा. आयुक्त यांचे निवासस्थनाच्या अंतर्गत फेरफार करण्याचे कामाकरीता तयार करण्यात आलेल्या र. रु. १,६०,१३०/- च्या अंदाजपत्रकास तसेच सदर काम उपलब्ध गुत्तेदार श्री. डी. पी. जीवनलाल यांचेकडून अंदाजपत्रकीय तसेच सदर काम उपलब्ध गुत्तेदार श्री. डी. पी. जीवनलाल यांचेकडून अंदाजपत्रकीय दराने करुन घेण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ३३३/१० :**

शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला की, मोहल्ला चिकलठाणा येथे आभ्यासिका केंद्र बांधणेच्या कामासाठी सा. बा. खात्याच्या सन १९९५-९६ चे जिल्हा दरसुचीनुसार र. रु. १,७७,३८४/- चे अंदाजपत्रक तयार करण्यात आले असून, प्रशाकीय मंजुरीसाठी स्थायी समितीपुढे ठेवण्यासाठी मा. आयुक्तांनी दि. २४-९-९६ अन्वये शिफारस केली आहे. सबब सदर कामाचे र. रु. १,९७,३८४/- चे अंदाजपत्रक मंजुरीचा प्रस्ताव विचारार्थ सादर. सदर खर्च ५% कमकुवत घटकासाठी कल्याणकारी योजना या लेखाशिर्षा मधून करण्यात येईल.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्यानुसार, मो. चिकलठाणा येथे अभ्यासिका केंद्र बांधणेच्या कामासाठी तयार करण्यात आलेल्या र. रु. १,९७,३८४/- च्या अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी. सदर काम तातडीने करण्यात यावे. सदर काम उपलब्ध गुत्तेदाराकडून अंदाजपत्रकीय दराने करुन घेण्यास यावे असे सर्वानुमते ठरले.

**विषय क्र. ३३४/११ :**

शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, वार्ड क्र. ८२ मो. चिकलठाणा (गाव) व चौधरी कॉलनी चिकलठाणा येथे नविन खडी रस्ते तयार करणे व अस्तित्वात असलेल्या खडी रस्त्याचे मजबुतीकरण करणे या कामाकरीता र. रु. ४,८५,०००/- चे अंदाजपत्रक सा. बा. विभाग औरंगाबाद दरसुची १९९५-९६ प्रमाणे तयार करण्यात आले असून, मा. आयुक्त यांनी दिनांक २४-०९-९६ रोजी प्रशासकीय मान्यता दिली आहे. सदरील काम १८ खेडी विकास कार्यक्रम या लेखा शिर्षाखाली सन १९९६-९७ च्या तरतुदी र. रु. ३००.०० लाख यातुन खर्च करण्याचे प्रस्तावित आहे. करीता मंजुरीस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्यानुसार, वार्ड क्र. ८२ चिकलठाणा गांव व चौधरी कॉलनी चिकलठाणा येथे नविन खडी रस्ते तयार करणे व अस्तित्वात असलेल्या खडी रस्त्याचे मजबुती करण करणे या कामाकरीता तयार करण्यात आलेल्या र. रु. ४,८५,०००/- च्या अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ३३५/१२ :**

शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केल आहे की, वार्ड क्र. ६५ मो. मिलिंदनगर स्लम भागात जुन्या संरक्षित भिंतीची उंची वाढविणे व दगडी गटार दुरुस्त करुन आर. सी.

सी. स्लॅब टाकणेच्या कामाकरीता र. रु. १,३७,०००/- चे अंदाजपत्रक सा. बा. विभाग औरंगाबादची दरसुची १९९५-९६ प्रमाणे तयार करण्यात आले असून, मा. आयुक्त यांना दि. २४-०९-९६ रोजी प्रशासकीय मान्यता दिली आहे. सदरील काम " दुर्बल घटक कल्याणकारी योजना ५% " या लेखा शिर्षाखाली सन १९९६-९७ च्या तरतुदीतून प्रस्तावित असून, यासाठी ३५ लाखाची तरतुद करण्यात आली आहे. करीता मंजुरीस्तव व विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्यानुसार, वार्ड क्र. ६५ मो. मिलिंदनगर स्लम भागात जुन्या संरक्षित भिंतीची उंची वाढविणे व दगडी गटार दुरुस्त करुन आर. सी. सी. स्लॅब टाकणेच्या कामाकरीता तयार करण्यात आलेल्या र. रु. १,३७,०००/- च्या अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ३३६/१३ :**

शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, आणि युज टाईप स्लम शौचालय (सिध्दार्थ उद्यान शेजारी) बांधणेच्या कामा करीता र. रु. ९,४४,०००/- चे अंदाजपत्रक सा. बा. विभाग, औरंगाबाद यांची दरसुची १९९५-९६ अनुसार तयार करण्यात आले असून, मा. आयुक्त यांनी दि. ७-६-९६ रोजी प्रशासकीय मान्यता दिली असून, रितसर स्थानिक वृत्तपत्रात प्रसिध्दी देऊन पहिल्यांदा दि. १४-०३-९६ रोजी निविदा मागविण्यात आली असता श्री. आर. एल. बारवाल यांची निविदा ७.७७% जास्त अंदाजपत्रकीय दरापेक्षाची होती. करीता वाटाघाटीसाठी बोलाविले असता त्यांनी दि. १८-०५-९६ रोजी लेखी कळविले की, निविदात भरलेल्या दरापेक्षा कमी करण्यात तयार नाही. करीता मा. आयुक्त यांनी दुसऱ्यांदा कार्यालयाची निविदा सुचना क्र. मनपा/लेखा/नि/८८/९६ दि. १६-०७-९६ अन्वये निविदा मागविण्यात आली असता निविदा विक्रीच्या अंतिम दिनांक पर्यंत एकूण ५ कोऱ्या निविदा विकण्यात आल्या व स्विकारण्याच्या दिवशी फक्त २ (दोन) मोहरबंद निविदा प्राप्त झाल्या त्या उपस्थित ठेकेदारासमक्ष दि. ०५-०८-९६ रोजी उघडण्यात आल्या असता ठेकेदारांना दिलेले दर खालील प्रमाणे आहेत.

| | | |
|---|---|---|
| १. | श्री. राजेंद्र च शिंदे | अ. प. दरापेक्षा ५ टक्के जास्त |
| २. | श्री. आर. एल. बारवाल | १०% जास्त दराने |

तुलनात्मकदृष्टया कमी व अंदाजपत्रकीय दरापेक्षा ५% जास्त दराची निविदा श्री. राजेंद्र च. शिंदे यांची आहे. परंतु सदरील दिलेले दर मा. आयुक्त यांना मान्य नसल्यामुळे संबंधितास वाटाघाटीसाठी बोलाविण्यात आले असून, त्यांनी अंदाजपत्रकीय दरापेक्षा ५% जास्त ऐवजी अंदाजपत्रकीय दराने सदरील काम करण्याची हमी दिली करीता प्रस्ताव मान्यतेस्तव व विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्यानुसार, पे आणि युज टाईम सुलभ शौचालय (सिध्दार्थ उद्यान शेजारी) बांधणेच्या कामाकरीता प्राप्त झालेल्या निविदा पैकी कमी दराचे निविदाधारक श्री. राजेंद्र च. शिंदे यांच्याशी झालेल्या वाटाघाटीनुसार र. रु. ९,४४,०००/- चे काम अंदाजपत्रकीय दराने श्री. शिंद्र यांचेकडून करुन घेण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ३३७/१४ :**

शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला की, चिकलठाणा येथील स्मशानभूमीमध्ये बर्नींग रोड, पाण्याचा हौद व बसविण्यासाठी आर. सी. सी. बेचेंस बसविणे इ. कामाचे अंदाजपत्रक सन १९९५-९६ च्या सा. बा. खात्याच्या दरसुची अन्वये र. रु. ७९,९५०/- चे

तयार करण्यात आले असून, त्यास मा. आयुक्तांनी मंजूरी दिली. सदर काम जनहिताच्या दृष्टीकोनातुन स्मशानभूमीचे काम असल्याने व पावसाळयाचे दिवस लक्षात घेता मा. आयुक्तांनी श्री. एस. ए. नवाब गुत्तेदार यांच्याकडून अंदाजपत्रकीय दराने करुन घेण्यात यावे असे आदेशित केले आहे. काम सुरु करण्यात आले होते. परंतु संबंधित वार्डाने स. नगरसेवक यांनी विनंती केली की, एक रेस्टींग शेड (३०X२५), चौकीदारासाठी एक बोली पाण्याचा हौद इ, जास्तीचे काम करुन द्या ावे, पुर्वी मंजुरा अंदाजपत्रकात बर्नींग शेड १५' X २०' या आकाराचे व पाण्याचा हौद ६' X ४' आकाराचे व ६ नग आरसीसी बेंचेसचा समावेश होता. ती रक्कम रु. फक्त रु. ७९,९५०/- मंजुरी होती. पुर्वीच्या अंदाजपत्रक मंजुरा रक्कमेपेक्षा जास्त वाढीव रक्कम रु. १,५५,१००/- इतकी आहे. अशी एकूण रक्कम रु. ७९,९५० + १५५,१०० = २,३५,०५०/- इतकी आहे. काम त्याच गुत्तेदारामार्फत (श्री. एस. ए. नवाब) अंदाजपत्रकीय दराने करुन घेणेस्तव व वाढीव अंदाजपत्रक व पुर्वीच्या मुळ अंदाजपत्रकास एकूण रु. २,३५,०५०/- अंदाजपत्रक मंजुरीसाठी सादर.

सदर खर्च स्मशानभुमी या तरतुदीमधुन करण्यात येणार आहे करीता अंदाजपत्रकीय रक्कमेस व सध्या काम करीत असलेल्या गुत्तेदारामार्फत काम अंदाजपत्रकीय दराने करुन घेण्यासाठी प्रस्ताव विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्यानुसार, चिकलठाणा येथील स्मशानभूमीध्ये बर्नींग शेट, पाण्याचा हौद व बसण्यासाठी आर. सी. सी. बेचेंस बसविणे इ. कामाचे मुळ अंदाजपत्रक र. रु. ७९,९५०/- तसेच संबंधित वॉर्डाचे सन्माननीय सदस्य श्री. नवपुते यांनी सुचविल्यानुसार वाढीव काम एक रेस्टींग शेड चौकीदारासाठी एक खोली पाण्याचा हौद इ. जास्तीचे काम करण्यासाठी लागणारे सुधारीत अंदाजपत्रक र. रु. १,५५,१००/- असे एकूण ७९,९५० + १५५,१०० = २,३५,०५०/- च्या अंदाजपत्रकास मंजुरी देण्यात येते. तसेच सदरील काम पुर्वीचेच गुत्तेदार श्री. एस. ए. नवाब यांचेकडून अंदाजपत्रकीय दराने करुन घेण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ३३८/१५ :**

शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, मो. मगलपुरा स्लम येथे शहाबाद फर्शी बसविणे, खांडकी बसविणे व दुरुस्ती करणेचे कामाचे सा. बा. खात्याचे दरसुची सन १९९४-९५ च्या नुसार रक्कम रु. १,६३,६००/- चे अंदाजपत्रकास मा. आयुक्तांनी दि. ०१-०१-९६ ला मान्यता दिली आहे. सदरील कामात परिस्थितीनुसार व स. नगर सेवकांची व नागरिकांची रास्त मागणीनुसार सदरील कामाचे दुरुस्त अंदाजपत्रक अतिरिक्त बाबीसह र. रु. २,५९,६७५/- ला मा. आयुक्तांनी दि. २४-०९-९६ ला मान्यता दिली आहे. तरी सदरील दुरुस्त अंदाजपत्रकास मंजुरीस्तव व वाढीव काम मंजुरी निविदेचे ठेकेदाराकडून मंजुर दराप्रमाणे म्हणजे १.२५% कमी दराने करुन घेण्याच्या मंजुरीस्तव प्रस्ताव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्यानुसार, मो. मगलपुरा (स्लम) येथे शहाबादी फरशी बसविणे, खांडकी बसविणे व दुरुस्ती करणेचे कामाकरीता रु. १,६३,६००/- चे अंदाजपत्रकाऐवजी जागेच्या परिस्थितीनुसार व स. नगरसेवकांची व नागरिकांची रस्त मागणीनुसार सदरील कामाचे दुरुस्त अंदाजपत्रक अतिरिक्त बाबींसह र. रु. २,५९,६७५/- ला सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. व सदरील काम मंजुरी निविदेचे ठेकेदाराकडून मंजुरा दराप्रमाणे म्हणजे रु.

१.२५% कमी दराने करुन घेण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी. या प्रस्तावास याच बैठकीस इतिवृत्त कामय करण्यात येते. काम लवकर व्हावे.

**विषय क्र. ३३९/१६ :**

कार्यकारी अभियंता पाणी पुरवठा व जलनि:सारण त्यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, भांडवली खर्च ९६-९७ वर्षा करीता पाणी पुरवठा विभागा करीता रुपये ५.०० कोटीची अर्थ तरतुद केलेली होती, सदरील तरतुदी मधुन मोठया प्रमाणात बचत होत असल्याचे निदर्शनास आले आहे. ड्रेनेज लाईन दुरुस्ती व गटार दुरुस्ती या आर्थिक शिर्षकाखाली र. रु. २५.०० लाखाची तरतुद केलेली होती. सदरील तरतुद ही गलिच्छ वस्ती ड्रेनेज व संपूर्ण शहरासाठी असल्याने सदरील तरतुद ही तोटकी पडत आहे.

तरी भांडवली तरतुद पाणी पुरवठा ९६-९७ या आर्थिक शिर्षकामधुन वाचणारी रक्कम हि ड्रेनेज देखभाल व गटार देखभाल या वार्षिक निविदा करीता वापरणे योग्य राहील या बाबतचे आदेश मा. आयुक्त महोदयांना दि. ०७-०९-९६ रोजी झालेल्या मासिक बैठकीस आर्थिक तरतुद वरील प्रमाणे पुर्ण निश्‍चिती करणे करीता आदेश दिले आहे.

जलनि:सारण विभागस १) देखभाल व दुरुस्ती करीता २५.०० लाख २) भांडवली खर्च करीता ९५.०० लाख ही संपूर्ण संपलेला (बुक) असल्याने पुढे एकही काम हाती घेता येणे शक्त नाही. शहरात बऱ्याच ठिकाणी नागरिकांतर्फे व सदस्या नगर सेवक यांचे मार्फत सारखी मागणी येत आहे, परंतु तरतुदी अभावी हे शक्त होत नाही, तरी पाणी पुरवठा विभागातील एकूण ५०० लाख तरतुदी पैकी ३४० लाख तरतुद पुंडलीकनगर सिडको अधिसुचीत अनाधिकृत वस्ती मध्ये २५% कमी लोक वर्गणी अंतर्गत प्रकल्प मंजुर केलेला आहे.

सध्या चालू आर्थिक वर्षा संपूर्ण २५% कमी रक्कम जमा होणे शक्य वाटत नाही. त्यामुळे काम या आर्थिक वर्षात होईल असे वाटत नाही, व खर्च हा पडणार नाही. तरी या तरतुदी मधुन पाणी पुरवठा विभागातुन तरतुद कमी केल्यास योग्य राहील.

| | | |
|---|---|---|
| १. | जलनि:सारण देखभाल व दुरुस्ती | रु. १२५.०० लाख |
| २. | जलनि:सारण भांडवली खर्च | रु. ५५.०० लाख |
| | **एकूण** | **१८०.०० लाख** |

तरी सदरील प्रस्ताव मा. आयुक्तांनी दि. २४-०९-९६ रोजी का प्रशासकीय मंजुरी दिलेली आहे, तरी पाणी पुरवठा विभागातुन जलनि:सारण विभागासाठी अनुक्रमे देखभाल व दुरुस्तीसाठी १२५.०० लाख व भांडवली तरतुदी साठी ५५.०० लाख स्थायी समितीकडे विचारार्थ व मंजुरीस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्यानुसार, भांडवली खर्च ९६-९७ वर्षाकरीता पाणी पुरवठा विभागाकरीता र. रु. ५.०० कोटीची आर्थिक तरतुद केली होती सदरील तरतुदीतून बऱ्याच प्रमाणात बचत होत असल्याचे निदर्शनास आल्यामुळे व यातील उर्वरीत रक्कम जलनि:सारण विभागासाठी पाणी पुरवठा विभागाच्या तरतुदीमधुन करण्याकरीता खालील प्रमाणे मंजुरी दिली जाते.

| | | |
|---|---|---|
| १. | जलनि:सारण देखभाल व दुरुस्ती | रु. १२५.०० लाख |
| २. | जलनि:सारण भांडवली खर्च | रु. ५५.०० लाख |
| | **एकूण** | **१८०.०० लाख** |

करीता वरील प्रमाणे रक्कमेचा तरतुद पाणी पुरवठा विभागातून जलनिःसारण विभागा करीता करण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ३४०/१७ :**

मा. कार्यकारी अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, झोन क्र. ४ अंतर्गत मंजुर रेखांकन (विविध ठिकाणी) मध्ये १५०/२५०/३०० मी. मी. व्यासाची आर. सी. सी. लाईन टाकणेच्या कामासाठी निविदा मागविल्या होतया. सदरील काम हे गोडवान कन्स्ट्रक्शन यांना मिळाले होते. उपरोक्त कामाचे अंदाजपत्रक हे परिसर अभियांत्रिकी यांचा सन ९२-९३ ची दरसुचीनुसार बनविण्यात आले आहे. अंदापत्रकीय र. रु. १९,९७,५००/- एवढी आहे.

आतापर्यंत १६.०० लाख रुपये खर्च झाला असून, अजून बराच मंजूर रेखांकनामध्ये काम करणे बाकी आहे. करीता वाढीव रक्कम रु. ५.०० लाख यास मा. आयुक्तांनी मंजुरी दिली असून, संबंधित वाढीव काम त्याच दराने मे. गॉडवीन कंन्स्ट्रकशन यांचेकडून करुन घेण्यासाठी स्थायी समितीकडे प्रस्ताव मंजुरीसाठी विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्यानुसार, झोन क्र. ४ अंतर्गत मंजुर रेखांकनामध्ये (विविध ठिकाणी) १५०/२५०/३०० मी. मी. व्यासाची आर. सी. सी. लाईन टाकण्याच्या कामाकरीता तयार करण्यात आलेल्या वाढवी र. रु. ५.०० लाखाच्या अंदाजपत्रकास तसेच सदरील काम पुर्वीच्याच दराने पुर्वीच्या कामाचे गुत्तेदार मे. गॉडवीन कंन्स्ट्रक्शन यांचे कडून करुन घेण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ३४१/१८ :**

कार्यकारी अभियंता पाणी पुरवठा व जलनिःसारण यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, मो. रोहीला गल्ली येथील नाल्यास संरक्षित भिंत बांधणेच्या कामाकरीता र. रु. १०,००,०००/- चे अंदाजपत्रक तयार करुन सर्वसाधारण सभेत विषय क्र. २०/१८ दि. २०-०७-९६ ला संमत झालेला होता. नंतर सदरील कामाची निविदा सुचना वर्तमानपत्रात प्रसिध्दीस दिली असता एकूण २६ निविदा विक्री झाल्या व अंतिम तारखेपर्यंत एकूण ३ निविदा प्राप्त झाल्या त्याचा तुलनात्मक तपशील खालील प्रमाणे आहे.

| | | |
|---|---|---|
| १. | श्री. शेख शरीफ | ७% अ. प. दरापेक्षा जास्त |
| २. | मे. बसरा कंन्स्ट्रक्शन | ९% अ. प. दरापेक्षा जास्त |
| ३. | श्री. ए. एम. फारुकी | ११% अ. प. दरापेक्षा जास्त |

तुलनात्मकदृष्टया सर्वात कमी म्हणजे अंदाजपत्रकीय दरापेक्षा ७% जास्तीच्या दराने श्री. शेख शरीफ हयांची निविदा आहे. परंतु सदरील दर जास्तीचे वाटल्याने मा. आयुक्तांनी त्यांना वाटाघाटीसाठी बोलाविले असता श्री. शेख शरीफ यांनी सदरील काम ७% अंदाजपत्रकीय दरापेक्षा जास्त ऐवजी अंदाजपत्रकीय दराने करण्यास संमती दर्शविली आहे व मा. आयुक्तांनी दि. ३०-०९-९६ ला प्रशासकीय मंजुरी दिलेली आहे.

तरी सदरील काम श्री. शेख शरीफ हयांच्याकडून अंदाजपत्रकीय दराने करुन घेण्याचा प्रस्ताव विचारार्थ मंजुरीस्तव सादर.

**ठराव :**

उपरोक्त कामाबाबत स्थळ पाहणी करण्यात यावी, असे सर्वानुमते ठरले.

**विषय क्र. ३४२/१९ :**

कार्यकारी अभियंता पाणी पुरवठा व जलनि:सारण यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, मो. जुनाबाजार मेनरोड वरील देता बँक पासून बी. एम. सी. बँक पर्यंतची अस्तित्वात असलेली नादुरुस्त सरफेस गटार तोडुन ४५० मी. मी. व्यासाची आर. सी. सी. अर्धगोलाकार गटार बांधणीच्या कामाकरीता अंदाजपत्रक रक्कम रु. ३,८१,८००/- परिसर अभियांत्रिकीच्या सन ९५-९६ च्या नविन दरसुचीनुसार व मंजुर दर पृथीकरणान्वये तयार करण्यात आले असून, सदरील काम लेखा शिर्षक " स्लम व शहरी भागात गटार बांधणे " अंतर्गत प्रस्तावित आहे.

सदरील अंदाजपत्रकीय रक्कम रुपये ३,८१,८००/- यास प्रशासकीय मान्यता मा. आयुक्तांनी दिनांक २९-०९-९६ ला दिलेली आहे तरी, अंदाजपत्रकीय रक्कम रु. ३,८१,८००/- मंजुरीस्तव व विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्यानुसार, मो. जुनाबाजार मेन रोडवरील देना बँक पासून बी. एम. सी. बँक पर्यंतची असलेली नादुरुस्त सरफेस गटार तोडून ४५० मी. मी. व्यासाची आर. सी. सी. अर्धगोलाकार गटार बांधणेच्या कामाकरीता तयार करण्यात आलेल्या र. रु. ३,८१,८००/- च्या अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ३४३/२० :**

शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला की, रेल्वेस्टेशन राज्य परिवहन कार्यालयात पासिंगसाठी येणाऱ्या वाहनाचा जकात भरणा केला किंवा नाही तपासण्यासाठी तेथे कार्यालयीन कर्मचाऱ्यांना बसविण्यासाठी कुठलीच सुविधा नसल्याने तेथे त्वरीत नाका बांधण्यासाठी जकात अधिक्षक यांनी सुचविले व तेथे जकात वसुली करणाऱ्या कर्मचाऱ्यांना एका चौकी बांधून देण्याबाबत जकात अधिक्षक यांना प्रत्यक्ष स्थळ पाहणी करुन सुचविले त्यानुसार सार्वजनिक बांधकाम खात्याच्या सन ९५-९६ चे जिल्हा दर सुचीनुसार अंदाजपत्रक रक्कम रु. ५०,८३५/- चे तयार करण्यात आले आहे. सदरील काम विना निविदा त्वरीत काम उपलब्ध गुत्तेदार मार्फत करुन घेण्यासाठी मा. स्थायी समितीची मान्यता घेऊन सुरु करण्याचे सुचना मा. उप आयुक्त यांनी दिल्यानुसार प्रस्ताव सादर करण्यात आला असून, त्यास मा. आयुक्तांची मान्यता दि. ०३-१०-९६ ला प्राप्त झाली.

सबब सदर कामाचे रक्कम रु. ५०,८३५/- च्य अंदाजपत्रकास व सदरील काम उपलब्ध गुत्तेदार श्री. इत्पेखार अ. खान यांचे कडुन अंदाजपत्रकीय दरावर काम करुन घेणेसाठी प्रस्ताव मंजुरीस्तव सादर. सदरचा खर्च व्यापारी संकुल व इतर इमारती या लेखा शिर्षामधून सन ९६-९७ या वर्षात करण्यात येईल.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्यानुसार, रेल्वेस्टेशन राज्य परिवहन कार्यालयात पासींगसाठी येणाऱ्या वाहनांचा जकात भरणा केला किंवा नाही तपासण्यासाठी तेथे कार्यालयीन कर्मचाऱ्यांना बसण्याकरीता त्वरीत नाका बांधण्याकरीता स्थळ पाहणी अंती तयार करण्यात आलेल्या र. रु. ५०,८३५/- च्या अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. तसेच सदरील कामाची तातडी लक्षात घेता सदर काम उपलब्ध गुत्तेदाराकडून अंदाजपत्रकीय

दराने करुन घेण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. गुत्तेदार श्री. इप्तेखार अ. खान यांचेकडून उपरोक्त करुन घेण्यास मंजुरी दिली जाते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ३४४/२१ :**

शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, मो. भिमनगर भावसिंगपुरा (स्लम) येथे फरशी पुल बांधणे बाबतच्या कामाकरीता सा. बा. खात्याच्या सन ९५-९६ च्या दरसुचीनुसार रु. १,९२,२००/- चे अंदाजपत्रक तयार करण्यात आले आहे. सदरील काम " खडी रस्ते " या शिर्षकातून करण्यात येईल. सदरच्या अंदाजपत्रकास मा. आयुक्तांनी दि. २३-०९-९६ ला प्रशासकीय मान्यता दिली आहे.

तरी सदरील कामाकरीता तयार करण्यात आलेले अंदाजपत्रक रक्कम रु. १,९२,२००/- यास मान्यतेचा प्रस्ताव विचारार्थ तथा मंजुरीस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्यानुसार, मो. भिमनगर भावसिंगपुरा (स्लम) येथे फरशी पूल बांधणेच्या कामाकरीता सा. बा. खात्यांच्या ९५-९६ च्या दरसुचीनुसार तयार करण्यात आलेल्या १,९२,२००/- च्या अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ३४५/२२ :**

मा. जिल्हाधिकारी यांचे पत्र क्र. ९६/पुरवठा/भुमायो ९६-९७ दिनांक १२-०८-९६ अन्वये खालील संस्था व इसमांना झुणका भाकर केंद्र चालविण्यासाठी मंजुरी देण्यात आलेली आहे.

| अ.क्र. | नांव | ठिकाण |
|---|---|---|
| १. | श्री. सुंगधकुमार गडवे | पंचायत समिती |
| २. | प्रमोद आसाराम काजळे | पीर बाजार |
| ३. | शिवाजी सावंत | बन्सीलाल नगर |
| ४. | स. बहाब हुसैन | रोशन गेट |
| ५. | आसाराम कदम | औरंगपुरा भाजी मंडई |
| ६. | श्रीमती रेखा प्रदिप अग्रवाल | बीबीका मकबरा |
| ७. | श्रीमती सुशीला सुरडकर | सेवा योजन कार्यालय |
| ८. | अनुराधा चौथमल | वरद गणेश समर्थनगर |
| ९. | अनुसया शिंदे | गजानन महाराज मंदिर |
| १०. | लोकहितवादी मागासवर्गीय संस्था | शहागंज |
| ११. | उत्कर्ष महिला विकास मंडळ | औरंगपुरा |

वरील सर्व संबंधितांना झुणका भाकर केंद्रासाठी प्रस्तावित ठिकाणी जागा देता येईल किंवा नाही याबाबत मा. आयुक्त यांनी दि. २७-०९-९६ रोजी खालील समितीचे गठण केले आहे.

१. उप आयुक्त - २
२. अति. शहर अभियंता
३. सहाय्यक संचालक नगर रचना

वरील समितीचे जागेची पाहणी करुन खालील प्रमाणे अहवाल सादर केला आहे की, जवळपास सर्वच जागा हया रस्त्यामधील आहेत. रस्त्याच्या वापर रस्त्याचे नियोजन करुन ठरविलेली रुंदी, नियोजनासह भविष्यातील विकास पाहता जर झुणका भाकरसाठी जागा दिल्यास तेथे पक्क्या स्वरुपाचे बांधकाम होईल व त्यामुळे रस्त्याने तेवढया लांबीमध्ये तेवढया भागात अनाधिकृत टपऱ्या ठेवल्या जातील व पर्यायाने रस्त्याची (इफेक्टीव्ह विड्थ) कमी होऊन वापरास अडथळा/अडचण निर्माण होण्याची शक्यता नाकारता येणार नाही. तरी झुणका भाकर केंद्राकरीता रस्त्याच्या जागा देण्यात येऊ नयेत.

हया अहवालाच्या संदर्भाने समितीने खालील प्रमाणे शिफारस केली आहे.

१) झुणका भाकर केंद्रासाठी अनुक्रमांक १ व ३ साठी जे ठिकाण मंजुर करण्यात आलेली आहे. त्या ठिकाणच्या शासकीय व निमशासकीय कार्यालयाने झुणका भाकर केंद्रास देण्याबाबत मा. जिल्हाधिकारी यांनी संबंधित कार्यालयात पत्र दयावे व तसेच मनपा तर्फे जिल्हाधिकारी औरंगाबाद यांना कळविण्यात यावे.

२) तसेच उर्वरित भाकर केंद्रासाठी मंजुर केलेल्या ठिकाणची जागा रस्त्यामधील असल्यामुळे मा. जिल्हाधिकारी यांना मनपाशी संपर्क साधून पर्यायी जागा देण्याबाबत कार्यवाही करण्यास्तव कळविण्यात यावे.

तरी वरील प्रमाणे समितीने सादर केलेला अहवाल व शिफारशी मा. स्थायी समितीपुढे विचारार्थ ठेवणे योग्य राहील.

**संवाद :**

**श्री. रशिद खान (मामू) :** झुणका भाकर केंद्राबाबत जिल्हाधिकारी कार्यालया मार्फत जेवढे प्रस्ताव आलेले होते ते सर्व प्रस्ताव स्थायी समितीने मंजुरी दिलेली आहे. आता प्रशासनाने जी समिती नेमलेली आहे. त्या समितीने सर्वांना मागितलेल्या ठिकाणी झुणका भाकर केंद्रासाठी जागा देणे आवश्यक आहे. व्हीआयपी रोडवर मागणी असल्या ठिकाणी सुध्दा शासनाने दिलेल्या अटी व शर्तीनुसार कार्यवाही प्रस्तावित करावी.

**मा. सभापती** : व्हीआयपी रोडवरील टपऱ्या असल्यास त्यांना काढावे. शहरातील अतिक्रमणे काढावयाचे असे प्रशासनाने वर्तमानपत्रात म्हटलेली आहे. म्हणजे नेमके प्रशासनाने वर्तमानपत्रात म्हटलेले आहे. म्हणजे नेमके प्रशासनाने काय करावयाचे ठरविले. याची कल्पना द्यावयास पाहिजे. शहरातील अतिक्रमणे हटविण्याचे म्हणजे अर्धे शहर अतिक्रमणाच्या विळाख्यात आहे बऱ्याच ठिकाणी मनपाच्या खुल्या जागावर तर काही ठिकाणी रोडवर अतिक्रमणे झालेली आहेत. तर काही ठिकाणी शासनाच्या जागावरही अतिक्रमणे आहेत. अशा सर्व जागांवर मनपातर्फे मंजुरी दिलेली नसल्यास नियमाप्रमाणे कार्यवाही अपेक्षित आहे. परंतु रोडवरील धंद्यासाठी चालविण्यात येणाऱ्या टपऱ्याबाबत प्रशासनाने विचार करावा लागणार आहे. त्यात बऱ्याच जणांचा रोजीरोटीचा प्रश्न आहे. त्याबाबत प्रशासनाने गांभिर्याने विचार करावा. फार तर डी. पी. रोडच्या बंधनात येत असतील तर त्यांना इतर ठिकाणी पर्यायी व्यवस्था करण्यात यावी.

**श्री. रशिद खान (मामू) :** सर्व्हे नु. ५२ शासनाकडून हस्तांतरण होउुन बऱ्याच ठिकाणी अतिक्रमणे झालेली आहेत. त्याप्रमाणे मुख्य रोडवरील अतिक्रमणे अनेक आहेत. त्या सर्वाबाबत प्रशासन प्रथमतः कार्यवाही करणार की, रोडसाईड

अथवा अनाधिकृत वसाहती बाबत कार्यवाही करणार याचे नेमके कारण काय आहे.

**मा. सभापती** : शहरातील मुख्य रस्ता म्हणजे डी. पी. रोड १०० व ८०, ६०, ५० फुटी रस्ता आहे. त्या ठिकाणी मनपातर्फे टपरीसाठी परवानगी नाकारली.

**उप आयुक्त - १ :** शहरातील बऱ्याच टपऱ्या अस्तित्वात आहेत आणि जे गेल्या दहा वर्षापासून बसवून आहेत त्यांना मनपातर्फे नियमान्वये परवानगी दिलेली आहे. तशी लोकांना काहीही करणार नाही. तर काही लोक दहा वर्षापासून भाडयाने आहेत परंतु ते भाडे देत नाहीत. त्यांची परवानगी रद्द करण्यात येईल. याशिवाय अनाधिकृत टपऱ्या आहेत. त्यांचे बाबतीत आवश्यक ती कार्यवाही अपेक्षीत आहे. काही मनपाच्या खुल्या जागा वर अतिक्रमणे, वसाहतीतील वाढीव बांधकामे डी. पी. रोडवरील अतिक्रमणे आदींचा यामध्ये समावेश आहे. याशिवाय तक्रारीनुसार मनपा तर्फे कार्यवाही करण्यात येईल. यात कुणाच्याही बाबतीत भेदभाव होणार नाही.

**श्री. रशिद खान (मामू) :** शहरातील मोठमोठया बिल्डींग व घरांचे बांधकाम अनाधिकृत आहेत. त्याबाबत कार्यवाही करावी. असे अनाधिकृत घरांचे बाबत कार्यवाही न करता छोटे मोठे घराबाबत प्रशासनाने लोकांना त्रास देऊ नये. तेथील घटनाच अशी आहे की, लोकशाही प्रमाणे लोकनियुक्त सरकारने योजलेल्या किंवा पारित केलेल्या ठरावाची अंमलबजावणी प्रशासनाने करावयाची असते सध्या स्थायी समितीने झुणका भाकर केंद्राबाबत जो निर्णय दिलेला आहे. तो हायकोर्टचा निर्णय आहे. तर सर्वसाधारण सभा ही सर्वोच्च न्यायालय आहे. असे समजा यास्तव यापुर्वी पारित केलेल्या प्रस्तावातबाबत आपण आवश्यक ती कार्यवाही करावी व बेरोजगारांना त्यांच्या रोजीरोटीच्या मूलभुत हक्कांना गदा येणार नाही याची दक्षत घ्यावी. कुणाच्या टपऱ्या हटविण्यापुर्वी रु. ५/- चे बॉंडवर लिहून घ्यावे.

**मा. सभापती** :१) शहरात ज्या काही टपऱ्या आहेत त्यांचे भाडे सुरु करावेत.

२) मनपाचे गाळे खालील पडलेले आहेत. त्यांची कमीटी आहे त्या कमीटीने सर्व माहिती पुढील बैठकीत ठेवावी.

३) झुणका भाकर केंद्रासाठी ज्या लोकांची यादी स्थायी समितीने मंजुरी दिलेली आहे. त्या सर्वांना तात्काळ मागणी केल्यानुसार जागा देणे आवश्यक आहे. परंतु मुख्य रस्त्यावरील झुणका भाकर केंद्र असतील. त्याबाबत रहदारीस अडथळा होणार नाही. याबाबत काळजी घ्यावी. परंतु शासनाने जे नविन परिपत्रकान्वये निर्देशित केलेले आहे. त्यांचे अटी व शर्तीस आधीन राहून त्यांना जागा देण्यात याव्यात मनपास काही अडथळा असल्यास आणि जागा रिकामी करण्यास विलंब लागल्यास संबंधिताकडून रु. ५/- च्या बॉंडपेपरवर तसे लिहून घ्यावे व पर्यायी व्यवस्था इतर ठिकाणी करावी यासह सदरील प्रस्तावास मंजुरी देण्यात येते.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्यानुसार, मा. जिल्हाधिकारी यांचे दि. १२-०८-९६ च्या पत्राचे अनुषंधाने खालील अ. क्र. १ ते ११ वर दर्शविलेल्या संस्था व इसमांना झुणका भाकर केंद्र चालविण्यासाठी मंजुरी देण्यात आलेली आहे, तथापी प्रशासनाने उप आयुक्त-२, अतिरिक्त शहर अभियंता व सहा. संचालक नगर रचना या त्रिसदस्थीय समितीचे गठण केले. समितीच्या शिफारशी शासनाच्या परिपत्रकान्वये आणि मनपाचे घालून दिलेल्या अटी व

शर्तीस आधिन राहून झुणका भाकर केंद्र चालविण्याबाबत परवानगी देतांना खालील मुद्यांचा अवलंब करावा.

अ. क्र. १ व ३ साठी मंजुर झुणका भाकर केंद्राचे संदर्भात मा. जिल्हाधिकारी यांचे कार्यालयाकडून संबंधित शासकीय व निमशासकीय कार्यालयांना पत्र देण्याबाबत कळविण्यास्तव विनंती करण्यातयावी. तसेच उर्वरित मंजुर झुणका भाकर केंद्र चालविण्यासाठी द्यावयाच्या जागेच्या संदर्भात रु. ५/- च्या पेपरवर संबंधिताकडून करारनामाच्या स्लॅब पेपरवर संबंधिताकडून करारनामा करुन घेण्यात यावा व या करारनाम्यात खालील अटींचा समावेश अत्यावश्यक असून, संबंधितांवर तो बंधनकारक राहील.

अ) झुणका भाकर केंद्र रस्त्यावरील वाहतुकीस अडचण वा अडथळा निर्माण होणार नाही याची दक्षता घ्यावी.

ब) झुणका भाकर केंद्र बांधकाम स्वरुपाचे झाल्यास मनपाची पुर्व परवानगी घेणे बंधनकारक राहील.

क) ज्यावेळेस मनपास जागेचे आवश्यकता भासेल किंवा उपरोक्त दोन मुद्यामुळे निर्माण होणाऱ्या परिस्थितीमुळे किंवा रहदारीत बाधा निर्माण होणे यामुळे निर्माण होणाऱ्या परिस्थितीमुळे मनपाकडून झुणका भाकर केंद्र हतवावे लागल्यास मनपाकडून केव्हाही जागा रिकामी करुन घेण्यास येईल व संबंधितावर ही जागा रिकामी करुन देणे बंधनकारक राहील.

संबंधित अटी व शर्तीच्या आधीन राहुन प्रस्तावित अ. क्र. १ ते ११ नांवे दिलेल्या धारकांना झुणका भाकर केंद्रासाठी जागा देण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ३२९/६ :**

अति. शहर अभियंता प्रस्ताव सादर करीता आहेत की, औरंगाबाद मनपाचे गरवारे क्रिडा संकुल येथे खेळांडुचे निवास व्यवस्थेसाठी (जर्माटरी) इमारत बांधण्याचे अंदाजपत्रक हे सन ९४-९५ चे डी. एस. आर. प्रमाणे असून, सदरील कामाची किंमत २३,४८,५००/- रु. आहे. सदरील कामाचा खर्च शासकीय अनुदान सन ९५-९६ चे रु. १० कोटीमधून प्रस्तावित आहे. सदरील कामासाठी निविदा मागविल्या असता निविदा विक्रीच्या अंतिम तारखे पर्यंत दोन निविदा प्राप्त झाल्या. त्यांचे दर खालील प्रमाणे होते.

| | | |
|---|---|---|
| १. | मे. एलोरा कन्स्ट्रक्शन | ४.५०% जास्त |
| २. | मे. के. एस गुरु ॲन्ड कं. | ८.४५% जास्त दराने |

परंतु एलोरा कन्स्ट्रक्शन कंपनी यांनी निविदेसोबत कॉल डिपॉझिट (इ. एम. डी.) चेकने सादर केली होती त्यानंतर मा. आयुक्तांनी दोन्ही एजंसीला पत्र देऊन ने किती दर जमा करणार आहेत. याबाबत विचारणा केली असता खालील प्रमाणे दर प्राप्त झाले.

| | | |
|---|---|---|
| १. | मे. एलोरा कन्स्ट्रक्शन | अंदाजपत्रकीय दरापेक्षा ४.००% जास्त व शासन नियम १०९१/सीआर१७२ दि. १०-०९-९२ नुसार भाववाढ फरक मागितला. |
| २. | मे. के. एस. गुरु | यांनी त्यांचे अंदाजपत्रकीय दरापेक्षा ८% जास्त दर्शविले व सिमेंट रिकव्हरी १६३ रु. प्रति गोणी ऐवजी १४० रु. प्रति गोणी गृहीत धरण्यास यावी अशी अट घातली. |

उपरोक्त दोन्ही दर लक्षात घेता, मे. एलोरा कन्स्ट्रक्शन कंपनी यांचे दर तुलनात्मकदृष्टया दोन्ही निविदापैकी कमी आहेत जरी त्यांना भाववाढ फरक मागितला आहे तरी सदरील बाब ही नियमित स्वरुपाची आहे व इतर कोणासही सदरचे अथवा इतर काम दिल्यास ते भाववाढ फरक मागू शकतील तथापी ते एलोरा कन्स्ट्रकशन कंपनी यांनी निविदेसोबत ई.एम. डी. रोखीने अथवा स्लीपने सदर न करता चेकने सादर केलेली आहे. सदरील चेक वटवुन इएमडी मनपा फंडामध्ये जमा करता येईल. मनपाचा दोन्ही दराने विचार करता मे. एलोरा कन्स्ट्रक्शन कंपनी यांची निविदा मान्य केल्यास फायदा होऊ शकतो. त्यामुळे त्यांनी जरी इएमडी चेकने सादर केली असली तरी मनपाची फायदा बघता विशेष बाब म्हणून त्यांना निविदा मान्य करणेस व उपरोक बाबी स्थायी समिती समोर विचारार्थ ठेवण्यास शिफारस करण्यास हरकत नसावी असा अभिप्राय लेखाधिकारी यांची दिली. त्यानंतर मा. आयुक्तांनी सदरील काम एलोरा कन्स्ट्रक्शन कंपनी यांनी ९४-९५ चे डी. एस. आर. दराने करावे असे सुचित केले. त्यास एलोरा कंन्स्ट्रक्शन कंपनी यांनी संमती दर्शविली आहे. तरी प्रस्ताव विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, औरंगाबाद महापालिकेस गरवारे क्रिडा संकुल येथे खेळाडुचे निवास व्यवस्थेसाठी (जर्माटरी) इमारत बांधण्याचे कामासाठी तयार करण्यात आलेले अंदाजपत्रक र. रु. ९३,४८,५००/- ला सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. तसेच या कामासाठी प्राप्त निविदापैकी कमी दराचे निविदाधारक मे. एलोरा कन्स्ट्रकशन कपंनी यांचेशी झालेल्या वाटाघाटीनुसार अंदाजपत्रकीय दरापेक्षा ४% जास्त दराने तसेच शासन नियम १०६१/सीआर १७२ दि. १०-०१-९२ नुसार भाववाढ फरक देण्यास व काम करुन घेण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. सदर काम सन ९४-९५ चे डी. एस. आर. प्रमाणे करुन घेण्यात यावे. वैधानिक कार्यवाही व्हावी.

सर्वाचे आभार मानून " जन गण मन " राष्ट्रगिताने सभा संपली.

| | |
|---|---|
| स्वाक्षरित/- | स्वाक्षरित/- |
| नगरसचिव, | स्थायी सभापती, |
| महानगरपालिका, औरंगाबाद. | महानगरपालिका, औरंगाबाद. |

**विषय क्र. ३००/९ :**

कार्यकारी अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, शहानुरवाडी येथील वैद्यकीय को. ऑ. हौ. सोसायटी मध्ये १०० मी. मी. व्यासाची ए. सी. जलवाहिनी टाकावयाची आहे. त्यासाठी परिसर अभियांत्रिकी विभागाची सन ९४-९५ व ९५-९६ च्या दर सुचीनुसार र. रु. ३,४३,११५/- एवढयाचे अंदाजपत्रक तयार करण्यात आलेले आहे सदर कामाचा खर्च हा भांडवली कामाची तरतुद मधुन करण्यात येणार आहे. तरी अंदाजपत्रक र. रु. ३,४३,११५/- चे मंजुरीस्तव व विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्यानुसार, शहानुरवाडी येथील वैद्यकीय को. ऑ. हौ. सोसायटी मध्ये १०० मी. मी. व्यासाची एसी जलवाहिनी टाकणेच्या कामासाठी तयार करण्यात आलेले अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.वैधानिक कार्यवाही व्हावी.

# *औरंगाबाद महानगरपालिका औरंगाबाद*

**दिनांक २५-१०-९६ रोजी संपन्न झालेल्या स्थायी समिती सभेचे इतिवृत्त. मा. सभापती स्थायी समिती श्री. गिरजाराम हाळनोर यांचे अध्यक्षतेखाली दिनांक २५-१०-९६ रोजी दुपारी अंदाजे ४.०० वाजता स्थायी समिती सभेस सुरुवात झाली. सभेची सुरुवात " वंदे मातरम् " या गिताने झाली. या सभेस सन्मानीय सदस्यांसह मनपा अधिकारी उपस्थित होते.**

| | | |
|---|---|---|
| १) | स. स. श्री. गौतम खरात | स. सदस्य |
| २) | स. स. सौ. रजनी जोशी | -//- |
| ३) | स. स. डॉ. भागवत कराड | -//- |
| ४) | स. स. श्री. विजयकुमार मेहेर | -//- |
| ५) | स. स. श्री. महादेव सुर्यवंशी | -//- |
| ६) | स. स. श्री. हमीदउद्दीन ताबा | -//- |
| ७) | स. स. श्री. भगवान घडामोडे | -//- |
| ८) | स. स. श्री. सुभाष टाकळकर | -//- |
| ९) | स. स. श्री. त्र्यबंक तूपे | -//- |
| १०) | स. स. श्री. अभिमन्यु भालेराव | -//- |
| ११) | स. स. श्री. कचरु नवपुते | -//- |
| १२) | स. स. श्री. विकास जैन | -//- |
| १३) | स. स. श्री. अ. रशिद खान (मामू) | -//- |

**संवाद :**

**मा. सभापती** : या ठिकाणी इतिवृत्त लिहिण्यासाठी लघुलेखक हजर नाहीत. मी यापुर्वीच सांगितले होते की, मिटींग विभागसाठी वेगळा स्वतंत्र लघुलेखक द्यावा. परंतु अद्यापही दिलेला नसल्याने हा प्रश्न निर्माण झालेला आहे. या सभेसाठी कुणाला तरी एकास बायडींग करुन घ्यावे. लघुलेखक नाही म्हणून बैठक थांबविणे काय?

**श्री. हमीद ताबा** : बैठकीसाठी इतिवृत्त घेण्यास लघुलेखकांना पाबंद करण्याचे काम सचिवांचे आहे. एकतर बैठकीस उशीर झाला आणि लघुलेखक नाही. नाही तर बैठक रद्द करावी.

**नगर सचिव** : मी दोन्हीही लघुलेखकांना निरो दिलेला आहे.

**श्री. रशिद मामू** : मेल्ट्रॉन कंपनीचे मटेरीयल या ठिकाणी येतात त्यांचे किती टक्केने जकात आकारणी केली जाते?

**मा. सभापती** : जकात अधिक्षक यांनी खुलासा करावा.

**जकात अधिक्षक** : मेल्ट्रान कंपनीचे इले. समानाचे २% तर इतर ४% कमी आहे.

**श्री. रशिद मामू** : यापुर्वी मेल्ट्रॉन कंपनीचे आपल्याला ४% मी जकात फाडलेली आहे आणि आता २% म्हणतात. आपल्याकडे फोनचे साठी ४% जी जकात फाडण्याऐवजी २% कमी आकारणी करण्यात आली आणि जकातीची टक्केवारी वारंवार बदलते. कशी काय?

**मा. सभापती** : याबाबतची माहिती पुढील बैठकीत द्यावी.

**स. डॉ. कराड :** मागे आपण इले बाबत वस्तु असल्यास ४% व फोन वगैरे असल्यास ५% जकात आकारणी करावे.

**श्री. रशिद खान (मामु) :** नाही, आपण जकात वाढीबाबत प्रस्ताव इले बाबत ४% जकात म्हणुन पारीत केलेला आहे व शासनास पाठविलेला आहे आणि शासन प्रस्तावास मंजुरी देऊन नंतरच मनपा आकारणी करते.

**श्री. रशिद खान(मामु) :** गरवारे कंपनीची ६.५६ लाख रु. आपणास मिळावयाचे असतात परंतु आपल्याकडे ३.२७ दर्शविलेले आहे ते कसे काय याची माहिती पुढील बैठकीत द्यावी. त्यांच्याकडून अपघाताचे माल येतात स्कॅप माल येतात. त्यासाठी पोलीस पंचनामा होते नाही काय?

**मा. सभापती :** याची माहिती पुढील बैठकीत द्यावी.

**श्री. रशीद खान(मामु) :** जकात विभागात ज्या बदल्या कर्मचाऱ्यांच्या झालेल्या आहेत. त्या पाहिजे तशा झालेल्या नाहीत. काही कर्मचारी आठ आठ वर्षापासून त्याच विभागास कार्यरत आहेत. त्यांचे बदल्या केलेल्या नाहीत. परंतु त्याहीपेक्षा कमी कालावधी झालेल्यांच्या केलेल्या आहेत. त्यामुळे जकात वाढीस परिणार होण्याची शक्यत आहे.

**मा. सभापती :** या बदल्या प्रथमतः केल्या आहेत. आणखी आता दुसऱ्या वेळेस करण्यात येत आहेत. बदल्या संपलेल्या नाहीत.

**श्री. रशिद मामू :** जकात वाढ होणे हा मुळ प्रश्न आहे. यासाठी चांगल्या आणि जास्त कालावधी झालेल्या कर्मचाऱ्यांना हटवून इतरांना या विभागात समावून घ्यावे.

**मा. सभापती :** ठिक आहे.

**श्री. कचरु नवपुते :** माझ्या वॉर्डातील आठवडी बाजाराचे उद्घाटन होऊन ३/४ महिने झालेले आहेत. परंतु अद्यापही तेथील वॉल कंपाऊंडचे काम झालेले नाही.

**मा. सभापती :** संबंधित अधिकाऱ्यांनी माहिती दयावी.

**शहर अभियंता :** या कामासंदर्भात अंदाजपत्रक तयार करुन पाठविलेले होते. परंतु त्यावर काही रिमार्क्स आलेले आहेत.

**श्री. कचरु नवपुते :** याबाबतचे अंदाजपत्रक तयार होऊन बराच कालावधी लोटलेला आहे. इतका उशीर का होत आहे या संदर्भाची संचिका दाखवावी.

**मा. सभापती :** याबाबतची संचिका कुठे आहे. इतका उशीर होण्यास विलंब का लागतो आहे.

**शहर अभियंता :** अंदाजपत्रक तयार होऊन २ महिने झालेले आहेत.

**श्री. कचरु नवपुते :** स्थायी समितीचे सदस्यांचे वॉर्डातील हे काम असूनही या कामास विलंब होतो तर इतर स. सदस्यांचे कामाचे बाबतीत काय प्रकार होत असतील.

**मा. सभापती :** संचिका दाखवावी.

**श्री. रशिदखान मामू :** आपल्या प्रशासनाने अतिक्रमण हटाव मोहीम सुरु केलेली आहे म्हणजे नेमके काय करणार? बरचसे लोक फुटपाथवर धंदे टाकून बसलेले आहेत. प्रशासनाने अतिक्रमण काढावयाचे ठरविलेले असल्यास आम्ही विरोध करणार नाही. परंतु अतिक्रमण काढीत असतांना कधी रस्त्यावर बाधीत होणाऱ्या टपऱ्या तर कधी अनाधिकृत घरे ती छोटी असोत किंवा मोठी असोत असा भेदभाव न करता आलटून पालटून अतिक्रमण हटविण्याची कार्यवाही करावयास पाहिजे. बऱ्याच ठिकाणी लोकांना मनपातर्फे टपरी मंजुरी दिलेली आहे. आणि त्यांचीही अतिक्रमणात टपरी हटविण्यात आलेली

आहे. तेव्हा अशा रोजी रोटीच्या साठी काम करणाऱ्या धारकांबाबत ताबडतोब प्रशासनाने सहानुभूती दाखवली पाहिजे व जे खरोखरच अनाधिकृत व विना परवानगी बसलेले आहेत त्यांचे बाबतीत कायदेशीर कार्यवाही करावी.

**श्री. कचरु नवपुते :** जालना रोडवरील जेवढे अनाधिकृत अतिक्रमण काढण्यास आले. त्याबाबत प्रशासनाचे अभिनंदन करावयास पाहिजे. या रोडवर बऱ्याच लोकांनी स्वत:कडून टपऱ्या हटविल्या आहेत तेव्हा नियमाप्रमाणे परवानगी दयावी.

**श्री. रशिद खान (मामू) :** अतिक्रमण हटविण्याच्या मोहिमेस कोणत्याही स. सदस्यांनी विरोध दर्शविलेला नाही. फक्त जे लोक बऱ्याच दिवसापासून रोजीरोटीसाठी टपऱ्या घेऊन काम भागवतात त्यांना नियमाप्रमाणे परवानगी द्यावी. अद्यापही टपऱ्यांबाबत कोणतीही कार्यवाही प्रशासनाने केली नाही.

**श्री. हमीद ताबा :** टपऱ्याबाबत नागरिकांनी फॉर्म वाटप करुन परवानगी द्यावी.

**मा. सभापती** : याबाबत उप आयुक्त - २ महिती देतील.

**उप आयुक्त - २ :** मागील बैठकीत टपरी कमीटीने फॉर्म द्यावयाचे सांगितलेले होते. फॉर्म छापुन देण्यास आलेले आहेत. आता पोलीस परवानगीसाठी " ना हरकत प्रमाणपत्रासाठी " पत्र पोलीस आयुक्त कार्यालयात पाठविण्यात आलेले आहे. परवानगी येईपर्यंत फॉर्म वाटप करावयाचे अशी सुचना दिल्यास त्या प्रमाणे कार्यवाही करता येईल.

**श्री. भागवत कराड :** पोलीस कार्यालयाकडे पत्र पाठवून किती कालावधी झाला.

**श्री. अ. रशीद खान (मामू) :** पोलीस परवानगीची आवश्यकता आहे काय? जर पोलीस परवानगी दिली नाही तर काय करणार टपरी कमीटीने शिफारस केली. परंतु परवानगी अभावी काम थांबणार काय? बऱ्याचशा टपऱ्या डी. पी. रोडमुळे दिल्या जात नाहीत तेव्हा अजून किती कालावधी लागणार आहे.

**मालमत्ता अधिकारी :** या आठवडयात पर्यंत देणार असे सांगितले आहे.

**उप आयुक्त-२ :** पोलीस कार्यालयाशी या संदर्भात पत्र व्यवहार केलेला आहे.

**श्री. कचरु नवपुते :** पोलीस कार्यालयातून ना हरकत प्रमाणपत्र येईल. परंतु तो पर्यंत फॉर्म वाटप करावे. प्रोसिजर होण्यास विलंब होणार आहे.

**मा. सभापती** : आज शहरात टपऱ्यांसाठी परवानगी न दिल्यामुळे अनाधिकृत टपऱ्या असलेल्या आहेत व दिवसेंदिवस वाढत आहेत. यासाठी विशेष लक्ष प्रशासनाने पुरवावे व टपरीसाठी फॉर्म वाटप कधी पासून करणे याची निश्चित तारीख जाहिर करावी.

**उप आयुक्त - २** : येत्या सोमवार पासून फॉर्म वाटप करण्यात येईल.

**मा. सभापती** : नुसते फॉर्म वाटप करुन चालणार नाही. फॉर्म देवूनही वर्षभर कार्यवाही झाली नाही तर प्रशासनास पुन्हा त्रास होईल.

**डॉ. भागवत कराड :** हा विषय सर्वसाधारण सभेत मंजुर झालेला आहे. आणि टपरी कमीटीने आपआपल्या वॉर्डातील स.सदस्याच्या सुचनेनुसार जागा पाहणी करुन शिफरसही केलेली आहे आणि त्यामुळे पोलीस परवानगी मिळो न मिळो याबाबत प्रशासनाने कार्यवाही त्वरीत करावी.

**मा. सभापती** : टपरी कमीटीने अहवाल दिलेला आहे. त्याप्रमाणे कार्यवाही व्हावी.

**श्री. गौतम खरात :** औरंगाबाद शहरात अधिकृत व अनाधिकृत टपऱ्या किती असलेल्या आहेत त्याबाबतचा सर्व्हे झालेला आहे. स. सदस्यांनी मागणी केल्याप्रमाणे ज्या ठिकाणी द्यावयास पाहिजे त्या ठिकाणी न देता गुलमंडी सारख्या ठिकाणी जर टपरी परवानगी प्रस्तावित जर केले तर आपण देणार काय? यासाठी प्रशासनाने साईट सिलेक्शन करुन पोलीस कार्यालयाकडे ना हरकत प्रमाणपत्रासाठी कळवावे.

**श्री. महादेव सुर्यवंशी :** सर्वात प्रथम टपरी कमीटीने शहरातल्या प्रत्येक वॉर्डात जाऊन पाहणी केलेली आहे. त्यानंतर ज्या ज्या ठिकाणी टपऱ्या बसविण्यात येतील त्या ठिकाणच्या जागा राखून दिलेल्या आहेत. त्यावेळेस सोबत आजचे खासदार व माजी आयुक्त श्री. भोगे साहेब यांनीही जागाची स्थळ पाहणी केलेली आहे. महापालिकेकडून ज्या लोकांनी मंजुरी घेतलेली आहे व मंजुरी घेतलेली नाही परंतु फॉर्म भरुन पैसे भरणा केलेले आहेत. या सर्वांची यादी आपल्याकडे नाही. तेव्हा सर्वप्रथम यांचाही विचार आपणास करावा लागणार आहे.

**श्री. कचरु नवपुते :** नुकतेच जालना रोडवरील टपऱ्या हटविण्यात आलेल्या आहेत. त्यांना नियमाप्रमाणे परवानगी दयावी.

**मा. सभापती :** जालना रोडवर परवानगी दयावी किंवा नाही याबाबत टपरी कमीटीने सुचना केलेल्या आहेत.

**श्री. महादेव सुर्यवंशी :** कोणत्याही वॉर्डाच्या बाबती असो संपूर्णतः टपरी बाबत सर्व्हे झालेला आहे. काही लोकांकडून फॉर्मही भरुन घेतलेले आहे आणि पुन्हा काही लोक नव्याने फॉर्म भरतील परंतु अगोदर फॉर्म भरुन ठेवलेले आहेत. त्यांचे बाबती काय? याचाही विचार होणे आवश्यक आहे.

**मा. सभापती :** फॉर्म वाटप करणार परंतु पोलीस कार्यालयाकडून ना हरकत प्रमाणपत्र किती दिवसात देणार याची निश्चित तारीख दयावी.

**उप आयुक्त - २ :** टपरी कमीटीने शिफारस केल्याप्रमाणे व स. सदस्यांच्या सुचनेप्रमाणे पोलीस कार्यालयाकडे न हरकत प्रमाणपत्र देणे बाबत अभिप्राय मागविलेले आहेत. रस्ते रुंदीकरण व ट्रॅफिकच्या दृष्टीने त्वरीत कार्यवाही झालेली नाही.

**मा. सभापती :** पोलीस कार्यालयाकडे टपरी बाबत महापालिकेस ना हरकत प्रमाणपत्र देवू शकते काय? याची माहिती विधी सल्लागार यांनी दयावी.

**विधी सल्लागार :** सर्वसाधारण सभेनेच पोलीस कार्यालयाची परवानगी घेणे आवश्यक असल्याचे मंजुरी दिलेली आहे. म्हणुन आवश्यक आहे.

**मा. सभापती :** नियमाप्रमाणे काय आहे.

**विधी सल्लागार :** पोलीस कार्यालयाची परवानगी घेणे आवश्यक आहे.

**मा. सभापती :** आपल्या मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियमाच्या ॲक्ट प्रमाणे आवश्यकता आहे काय?

**विधी सल्लागार :** रस्त्यावरील टपऱ्या असल्याने ट्रॅफिकला अडचणी होऊ नयेत म्हणून पोलीस परवानगी घेणे आवश्यकता आहे.

**डॉ. विजयकुमार मेहेर :** आपण रस्त्याच्या बाजुला टपरी मागतो. तेव्हा पोलीसांची परवानगी घेणे कुठे कायदयात आहे.

**मा. सभापती :** महानगरपालिका टपरी धारकांना जागा देते. टपरी देत नाही. मला प्रशासनाला असे सुचित करावयाचे आहे की, ट्रफिक पोलीसाला पत्राने

कळवावे की, येत्या १५ दिवसांपर्यंत महापालिकेने शिफारस केलेल्या जागा बाबत आपण " ना हरकत प्रमाण पत्र " दिले तर ठिक नाही. तर हीच ना हरकत प्रमाणपत्र समजून आम्ही टपरी धारकांना जागा देवू व उदयाला काही झाले तर त्यास सर्वस्वी जबाबदार पोलीस कार्यालय राहील.

**श्री. अ. रशिद (मामू) :** यामध्ये थोउी दुरुस्ती करावे की, ना हरकत प्रमाणपत्र दिले नाही तर हेच मान्यता समजावे.

**मा. सभापती** : ठिक आहे. महापालिकेने पोलीस कार्यालयास असे कळवावे की, १५ दिवसात ना हरकत दिली नाही तर आपली मान्यता आहे असे गृहीत धरुन महापालिका टपरी धारकांना जागा देण्याची कार्यवाही करेल व १५ नोव्हेंबर ९६ पर्यंत जागास परवानगी पोलीस कार्यालयातर्फे मिळालेली जर ठिक तर १ डिसेंबर पासून महापालिका टपरी धारकांना फार्म वाटप करुन जागास परवानगी देण्याची कार्यवाही करेल.

**श्री. हमीद ताबा :** आजपासून ५ वर्षापूर्वी ज्यांना टपऱ्या दिलेल्या आहेत. त्यांचे भाडे बाबत काय झाले?

**मा. सभापती** : भाडे वसुली आपण करीत आहोत.

**श्री. भगवान घडामोडे :** टपऱ्यास परवानगी देतांना ज्यांना अगोदर पासून टपरी टाकून काम करतात त्यांना प्राधान्य दयावे.

**मा. सभापती** : टपरी कमीटीने शिफारस केलेली आहे. त्याप्रमाणे कार्यवाही होईल.

**डॉ. विजयकुमार मेहेर :** जकात नाल्याला लागून १०२ अनाधिकृत टपऱ्या बसलेल्या आहेत तसेच वसंत भुवन जवळ १८ अनाधिकृत टपऱ्या आहेत. त्यांचे कडून भाडे वसूल करावे. जे की, पक्के बांधकामाचे आहेत.

**मा. सभापती** : जकात नाक्याजवळील अधिकृत टपरी धारकांकडून नियमाप्रमाणे भाडे वसुली करावी व जे अनाधिकृत आहेत. त्यांचे बाबतीत प्रशासनाने कार्यवाही करावी.

**डॉ. भागवत कराड :** टपरी धारकांबाबत महापालिकेने फॉर्म वाटप करुन एक नियमावली तयार करावी.

**मा. सभापती** : टपरी कमीटीने सर्व्हे व शिफारस केलेली आहे. त्याप्रमाणे कार्यवाही करावी.

**श्री. अब्दुल रशिद खान (मामू) :** फायदया प्रमाणे स. सदस्यांनी यामध्ये भाग घेऊ नये.

**मा. सभापती** : फॉर्म वाटपात स. सदस्यांनी हस्तक्षेप करु नये फक्त नविन ठिकाणी मागणी असल्यास आणि याबाबतीत प्रशासनाने ठरवून दिलेले असल्यास संबंधित प्रायरिटी दिली जाईल.

(चिकलठाणा आठवडी बाजार बाबतची संचिका आलेली आहे व त्यामधील रिमार्कस वाचतात.)

**श्री. कचरु नवपुते :** चिकलठाणा आठवडी बाजार ही नविन ठिकाणी आहे आणि या सभोवती संपूर्ण नाला असून, नाल्याला कंपाऊंड वॉल बांधणे अत्यंत गरजेचे आहे. पावसाळयात जोरदार दृष्टीने वाहून जाण्याची शक्यता असते आणि या कामास उशीर होत असून, रिमार्कस मारण्याचे कारण काय आहे?

**मा. सभापती** : तांत्रिक विंग आहे त्यांनी साईट पाहिल्यानंतर रिमार्कस मारलेले आहेत.

**श्री. कचरु नवपुते :** याबाबत रिमार्कस मारण्याचा संबंध काय कृपया माहिती दयावी.

**मा. आयुक्त** : १) या कामाचे अंदाजपत्रक रु. १८.०० लाख ६८ हजार रु. आहे आणि या वर्षात आर्थिक तरतुद नाही म्हणून हे काम हाती घेता येणार नाही.

२) काम करण्यापुर्वी त्या कामाची आवश्यकता आहे किंवा नाही ते तांत्रिक दृष्टया पाहणे आवश्यक आहे आणि तांत्रिक सल्ला हा अभियंता यांनीच द्यावयाचा आहे. त्यांचे म्हणण्यानुसार रबर पिचिंग जे केलेले आहे ते सिमेंट कॉक्रींटने स्ट्रॉंग केले तर पाण्याचा प्रवाह जो प्रवाह आहे तो योग्य पध्दतीने खाली जावू शकेल आणि आठवडी बाजाराचा कोणत्याही प्रकारचा त्रास होणार नाही.

**श्री. कचरु नवपुते :** माजी आयुक्त भोगे साहेब यांनी त्याच ठिकाणी पाहणी केलेली होती. त्यांनही असे सांगितले होते की, दोन्हीही बाजुने पाणी येते तेव्हा अंदाजपत्रक तयार करावे अंदाजपत्रक तयार करुन २-इ महिन्याचा कालावधी लोटूनही अद्यापही कार्यवाही झालेली नाही सदरचे काम अत्यंत आवश्यक असून, या कामास मंजुरी दयावी.

**श्री. अब्दुल रशिद खान (मामू) :** बजेट तरतूद नाही तर रिव्हाइज्ड बजेटमध्ये तयार करुन कार्यवाही व्हावी.

**श्री. गौतम खरात :** प्रशासनाला तांत्रिक विंगची आवश्यकता भासण्याचे कारण काय? याठिकाणी कोणत्याही कामाबाबत ज्यावेळी अंदाजपत्रक तयार केले जाते. तेव्हा प्रथमत: कनिष्ठ अभियंता नंतर उप अभियंता आणि नंतर कार्यकारी अभियंता किंवा शहर अभियंता सर्व तांत्रिक अभियंत्या कडुनच सर्व त्रुटया पाहून अंदाजपत्रक यांचेकडून तपासणी करावयाचे म्हणजे त्यांचेवर प्रशासनाचा विश्वास नाही काय? जर मा. आयुक्त यांना असे वाटत असले तर एखादा रिटायर्ड व्यक्ती त्यांची नेमणुक करुन काम पहावे व त्यांना मानधन दयावे.

**श्री. महादेव सुर्यवंशी :** मागील बैठकीत याच संदर्भात असा मुद्दा उपस्थित केला होता की, एखादे अंदाजपत्रक शहर अभियंता किंवा कार्यकारी अभियंता यांचेकडून तयार घेऊन आल्यानंतर त्या अंदाजपत्रकाचे तपासणी काम कुणी करावे. याबाबत विधी सल्लागांरांनी खुलासा करावा.

**मा. सभापती** : विधी सल्लागारांनी माहिती दयावी.

**श्री. विकास जैन :** माझ्या वॉर्डातील कामाबाबत अनेक रिमार्कस संचिकेत आहेत आणि त्यामुळे २-३ महिन्याचा कालावधी लागत आहे.

**मा. आयुक्त** : आठवडी बाजाराची संचिका ०२-०३-९६ पासून सुरु झालेली आहे. २४-०९-९६ ला शहर अभियंता कडुन आली व ०५-१०-९६ ला लेखा विभागाकडून माझेकडे आली.

**श्री. गौतम खरात :** महापालिकेमध्ये लेखा तपासणीचे रिमार्कस मुख्य लेखा परीक्षक करतात. तर तांत्रिक अभियंता यांनी रिमार्कस लिहिण्याचे प्रयोजन काय?

**श्री. कचरु नवपुते :** या कामाचे अंदाजपत्रक बनवून ५-६ महिन्याचा कालावधी लोटलेला आहे आणि डी. एस. आर. दराने तरतू करुन त्यावेळेस संचिका तयार करण्यात आली आहे. सदरील काम तातडीने असून, कामास मंजुरी द्यावी.

**मा. सभापती** : सदरची संचिका सुरु झाल्यानंतर ज्या हेड मधुन हा खर्च करावयाचा असतो. त्या हेडमधील खर्चाची तरतुद संपलेली आहे आणि त्यामुळे पुढील वेळेस कामास मंजुरी देता येईल.

**मा. आयुक्त** : या संचिकेत कामाच्या संदर्भात बजेट नाही असे नसून टेक्नीकली काम योग्य नाही असे संचिकेस माहिती आहे.

**श्री. हमीद उद्दीन :** आपल्याकडील सभागृह नेता यांच्या गाडीला मुंबई दौऱ्यावर गेले असतांना अपघात झाला व हजारो रुपयांना महापालिकेस आर्थिक तोटा सहन करावा लागणार त्यास प्रशासनाने मंजुरी दिलेली होती काय?

**मा. सभापती** : संबंधित अधिकाऱ्यांनी माहिती दयावी.

**अति. शहर अभियंता :** बाहेर गावाला गाडी नेण्यासाठी परवानगी मा. आयुक्त यांची घ्यावी लागते.

**श्री. हमीदउद्दीन ताबा** : सभागृह नेता यांच्या गाडीचा अपघात मुंबई येथे झाला याची आपणास कल्पना आहे काय? त्यास परवानगी दिलेली होती काय? विना परवानगी गाडी बाहेर घेऊन जाणे महापालिकेचे आर्थिक नुकसान होते त्यास जबाबदार कोण राहणार?

**श्री. गौतम खरात :** अपघात झाला असेल तर नेमके काय झाले संबंधित वाहन चालकांनी कार्यालयास रिपोर्ट सादर केला आहे काय?

**मा. सभापती** : परवानगी दिलेली आहे काय

**मा. आयुक्त** : माझ्याकडे अनेक संचिका येतात त्यामुळे आताच सांगणे योग्य नाही.

**मा. सभापती** : पुढील बैठकीत सविस्तर अहवाल ठेवा.

**श्री. हमीद उद्दीन ताबा, श्री. अभिमन्यु भालेराव :** सदरचा प्रश्न गंभीर असून, आपण यावर सभागृहात चर्चा करावी.

**श्री. महादेव सुर्यवंशी :** कोणाताही पदाधिकारी बाहेर गावाला ज्यावेळेस गाडी घेऊन जातो. त्या अर्थी कार्यालयीन कामाकरीताच जात असतो. त्यामुळे परवानगीची आवश्यकता अधिकाऱ्यांना असते. असे नाही.

**श्री. हमीदउद्दीन ताबा :** परंतु मुंबई येथे गाडीचा अपघात झाला यांची माहिती द्यावी. अशा काही झाले त्यास जबाबदार कोण. यासाठी परवानगी घेतली काय म्हणुन विचारणा करीत आहे.

**मा. सभापती** : स्थायी समितीत प्रश्न विचारणा करण्यासाठी सात दिवस अगोदर कळवावे. ऐनवेळी प्रश्न विचारल्याने उत्तर योग्य ते मिळत नाही यास्तव सात दिवस अगोदरच विचारणा करुन स्थायी समितीला माहिती प्रशासन देऊ शकते. तेव्हा स. सदस्यांना कळविण्यात येते की, पुढील बैठकीत माहिती देण्यात देईल. पदाधिकाऱ्यांनी अनेक वेळा बाहेर गावी गाडया घेऊन जातात.

**श्री. हमीद उद्यीन ताबा :** महापालिकेतर्फे शालेय तपासणी शिबीर घेण्यात आले. त्यामध्ये बऱ्याचशा शाळांमध्ये तपासणीत योग्य रित्या तपासणी न करता औषणोपचार न करता तपासणी आल्याचा अहवाल दिलेला आहे. त्यामध्ये महापालिकेला आतापर्यंत केती खर्च झाला याची माहिती दयावी.

**मा. सभापती** : संबंधित अधिकाऱ्यांनी माहिती दयावी.

**मा. आयुक्त** : आज या ठिकाणी डॉक्टर नाही आहेत. एकुण आपल्या शहरामध्ये २६६ शाळा होत्या. याच्यामध्ये ८५ हजार विद्यार्थी शिकतात. या सर्वांची आरोग्य तपासणी गेल्या १५ दिवसांत संपवून टाकली ८१ ऑक्टोबर ते १८ ऑक्टो ९६) एकूण ७५ हजार विद्यार्थ्यांची तपासणी करण्यात आली या ७२ हजार विद्यार्थ्यांत काही विद्यार्थी असे सापडले की, काहींना हृदय रोगाचे तर काही मुत्रविकाराचे यकृत विकाराचे त्रास आहेत. परंतु असे विद्यार्थी १०% पेक्षा

जास्त नाहीत जे तपासणी करुन अहवाल आलेला आहे. त्याची छाननी सुरु आहे आणि याचा सारांश अहवाल आम्ही सर्वसाधारण सभेसमोर ठेवणार आहोत. या कामी शासनाने पूर्ण अनुदान दिलेले आहे. ९०/- रु. प्रमाणे एकूण किती खर्च झाला. कोणकोणती औषध आपण घेतली याचा समग्र अहवाल आम्ही आपणास देणार आहोत. आज या ठिकाणी डॉक्टर नाहीत ते असले असते तर आताच अहवाल दिला असता तपशीलात माहिती आपल्याला पाहिजे आहे ती माहिती सर्वसाधारण ठेवण्यात येईल. नोव्हेंबर-९६ च्या सभेसमोर.

**श्री. अ. रशिद खान (मामू) :** माझ्या माहितीप्रमाणे या ठिकाणी व्हाईट कॉलरचे डूप्लीकेट शाळा उघडून संस्था चालवितात कागदावर शाळा आहेत परंतु प्रत्यक्षात मात्र काहीच नाही. याबाबत माहिती दयावी.

**मा. आयुक्त** : जास्त विद्यार्थी असे तपासणीत आढळून आले की, त्यांना आहारात कमी प्रमाण मिळाले. जे की, अल्प उत्पन्नगटातील मुले आहेत. काही विद्यार्थ्यीमध्ये जन्मताचे विकार दिसून आले तर काही विदयार्थ्यांना जरुरीचे प्रमाणे दिसले. याकरीता औषधी दिल्या गेली अल्प उत्पन्न गट मध्यम उत्पन्न गट व उच्च उत्पन्न गटातील बाबत छाननी करण्याचे काम चालु आहे आणि त्यामुळे याशिवाय गंभीर आजार ज्यांना आहे. त्यांना शासकीय रुग्णालयात किंवा जवळपासचे दवाखान्यात शिफारस करण्यात येणार आहेत. याकरीता शासनाला पुर्णपणे अहवाल पाठवायचा आहे. ४-५ शाळा अस्तित्वातच नाही. त्याबाबत त्यांना अनुदान मिळते नाही त्या बोगस शाळा आहेत काय हे आपणास पाहावयाचे आहे. पटावरील संख्या विद्यार्थ्यींची कमी आढळून आले. त्याचे व्हेरीफिकेशन करावयाचे आहे. या सर्वा बाबत कार्यवाही करावयाची आहे.

**डॉ. भागवत कराड :** मा. आयुक्त यांनी आताच सांगितल्याप्रमाणे शहरातील एकूण ७२ हजार विद्यार्थ्यांचे आरोग्य तपासणी आपण केलेली आहे. ही बाब कौतुकास्पद आहे. याकामी इंडियन मेडीकल असोसिएशन व मेडीकल कॉलेज औरंगाबाद, महात्मा गांधी मिशन व इतर बऱ्याच संस्थानी सहकार्य केले. या सर्वांचे अभिनंदन करावे असे माझे मत आहे व पत्राने कळवावे.

**मा. सभापती** : ठिक आहे. ऐनवेळचा अभिनंदनाचा प्रस्ताव संमत करुन प्रशासनामार्फत संबंधितांना कळविण्यात यावे.

**श्री. भगवान घडामोडे, श्री. कचरु नवपुते :** माझ्या वॉर्डात काही ठिकाणी स्वच्छतेमुळे रस्त्यावरुन बारीक आळया निघतात व घरांमध्ये जाण्याची शक्यता असते. महापालिकेतर्फे जाहिरात देऊन स्वच्छता राखण्याचे आवाहन करतो. परंतु साफसफाई नियमित होणे महत्वाचे आहे नाही तर जेव्हा तापाची लागण लागण्याची शक्यता आहे.

**मा. सभापती** : आपण महापालिकेतर्फे वर्तमान पत्रातुन जाहिरात देऊन आरोग्याची निगा राबविण्याचे आवाहन करतो. यासाठी जनतेने सहकार्य करावयाचे आहे. जनतेनेच सहाकार्य केले नाही. उदा. सांडपाणी बाहेर टाकणे, अस्वच्छता, कचरा कुंडीत न टकाता घराजवळच ढिग लावून ठेवणे वगैरे जनतेने काळजी घ्यावयाची असते ही निगा राखल्यास आपल्या कडे कोणतीही साथ

येणार नाही. उप आयुक्त-२ आपणाकडे साफसफाई बाबत विशेष लक्ष द्यावयाचे आहे व प्रत्यक्ष भेट देवून पाहणी करुन कार्यवाही करावी.

**श्री. भगवान घडामोडे :** कर्मचाऱ्यांच्या बदल्या प्रकरणी तीन वर्षापेक्षा जास्त कालावधी लोटलेल्या कर्मचाऱ्यांच्या आहे. आणि पुन्हा काही कर्मचाऱ्यांच्या बदल्या करावयाच्या आहेत.

**मा. सभापती** : आपण जकात मधील ३ वर्षापेक्षा जास्त कालावधी झालेल्या कर्मचाऱ्यांबाबत स्पष्टपणे सांगितले होते की, याबाबत स्पष्ट सांगितले होते की, त्यांच्या बदल्या कराव्यात. त्या झालेल्या आहेत. आता पुढच्या लॉट करण्यात येणार आहे. नाहीतर, जकात दर का कमी आले तर आपण प्रशासनास जाब विचारणार आहेत. कर्मचाऱ्यांचे बदल्या कशा करावयाच्या ते प्रशासनाचे लुक आऊट आहे.

**श्री. भगवान घडामोडे :** असे काही कर्मचारी आहे की, गेल्या ८ वर्षापासून ते एकाच ठिकाणी आहेत. त्यांच्या बदल्या झालेल्या नाहीत.

**उप आयुक्त-१ :** त्या सर्वाच्या बदल्य करण्यात येणार आहेत.

**श्री. अ.रशिद खान मामू :** शहरात आपण साफ सफाई व्यवस्थित करतो. परंतु काही हाऊसिंग सोसायटया आहेत. त्यांचेकडील साफसफाई करुनही ते लोक स्वच्छतेकडे दुर्लक्ष करतात. तेव्हा त्यांना नोटीसेस देऊन कार्यवाही करावी.

**मा. सभापती** : ठिक आहे. अशा प्रकरणा बाबत नियमाप्रमाणे नोटीस देऊन महापालिकेने कार्यवाही करावी. उप आयुक्त-१ यांनी ज्या बदल्या केलेल्या आहेत. त्या कशा पध्दतीने केल्या कोणत्या निकषाने केल्या याची माहिती पुढील बैठकीत द्यावी.

**श्री. गौतम खरात :** जवळच टी. बी. हॉस्पीटल आहे आणि त्याला लागूनच नाला आहे. टी. बी. हॉस्पीटलमध्ये अनेक रुग्ण आहेत आणि संसर्गजन्य रोग आहे. यामुळे जवळच्या नाल्यात मलमुत्र वाहून जाते. नाल्यात घाण पाणी साचते शेजारील घरांना त्रास होण्याची शक्यता आहे. यासाठी हे हॉस्पीटल येथून हलवून बाहेर जाणे बाबत संबंधित कार्यालयास पत्राने कळवावे. कालच मा. पालकमंत्री यांचेशी चर्चा झालेली आहे

**मा. सभापती** : मा. ना. पालकमंत्री यांचा कालच मुंबई वरुन दुरध्वनी संदेश प्राप्त झाला त्यांनी दुरध्वनी वरुन सर्व पदाधिकारी व मा. उप आयुक्त यांना मुंबईस बोलाविले आहे. महापालिकेतील अनेक प्रलंबित प्रश्न व विविध विकास कामांबाबतचे प्रश्नाबाबत त्याठिकाणी चर्चा होणार आहे. प्रशासनाने याबाबत कार्यवाही करुन सोबत मुंबईला यावयाचे आहे. महापालिकेस जास्तीचे अनुदान मिळणे बाबत निवेदन द्यावयाचे आहे.

**श्री. हमीदउद्दीन ताबा :** शिक्षकांच्या बदल्या प्रकरणी केवळ दोनच शिक्षकांच्या केलेल्या आहेत. जनरल केलेल्या नाहीत.

**मा. सभापती** : मागील स्थायी समितीच्या बैठकीत आपण ठरविले होते की, परटी कुलर दोनच शिक्षकांचे करावे व त्यानुसार कार्यवाही झालेली आहे. आपण प्रशासनास एकच निर्णय द्यावा व अंमलबजावणी करण्यास सांगावे. ज्याठिकाणी शिक्षकांच्या तक्रारी आहेत. त्यांच्याच बदल्या होत आहेत. बदल्या प्रकाराची प्रशासकीय कामे आहेत. आपण यामध्ये भाग घेऊ नये.

**श्री. गौतम खरात** : नोकरीत असतांना कर्मचारी मृत पावतात. त्यानंतर अनुकंपा धर्तीवरील मृत व्यक्तींचे वारसदार नौकरीत सामावून घ्यावे असे असते. परंतु संचिका चालू होऊनही एक दीड महिना विलंब लागतो. व वारसदार विनंत्या करीत बसतो. त्यापेक्षा प्रशासनाने या कामी जास्तीचा विलंब न लावता अशी प्रकरणे त्वरीत निकाली काढावीत.

**मा. सभापती** : स. सदस्यांनी सुचना केल्याप्रमाणे उप आयुक्त-२ यांनी स्थायी समितीने शिफारस केल्या प्रमाणे अनुकंपा धर्तीवर प्रकरणांची सविस्तर माहिती पुढील बैठकीत दयावी.

**श्री. अ. रशिद खान (मामू)** : कटकट गेटजवळील एका महिनेच्या जागेबाबत अद्यापही निर्णय झालेला नाही.

**मा. सभापती** : सहा. संचालक नगर रचना व शहर अभियंता यांनी सविस्तर अहवाल पुढील बैठकीत द्यावा.

**अ. रशिद (मामू)** : वाहन चालकांनी जे निवेदन दिलेले आहे. त्याबाबत काय झाले याची माहिती दयावी.

**मा. सभापती** : वाहन चालकातून जेष्ठ वाहन चालक हे पद आर. आर. नुसार भरण्यात यावे. अशी या कर्मचाऱ्यांची मागणी आहे. याबाबत मा. आयुक्त माहिती देतील.

**मा. आयुक्त** : आज वाहन चालकाचे डेलिगेशन मल भेटते. त्यानुसार तपासणी करुन सर्वसाधारण सभेपुढे प्रस्ताव ठेवू असे मी त्यांना सांगितले. यामध्ये असा प्रश्न आहे की, वाहन चालकांना ग्रेड कनिष्ठ लिपिकाप्रमाणे देतो आणि वाहन चालकांना पुढे प्रोत्साहन मिळावे चालना मिळावी म्हणून जेष्ठ वाहन चालक म्हणून पद निर्माण केले. ही मनपा संपूर्ण महाराष्ट्रात अशी आहे की, याच मनपामध्ये जेष्ठ वाअन चालकाचे पद निर्माण केले आहे. कोणत्याही मनपात ही पद नाही आहे. या पदाची वेतनश्रेणी रु. १२००/- ची आहे. या वाहन चालकाचे असे म्हणणे आहे की, जेष्ठ लिपिक म्हणून रु. १२००/- देता तसेच जेष्ठ वाहन चालक म्हणून रु. १४००/- आम्हास दयावे. यात जस्टीफिकेशन आम्हला दिसून येत नाही. एक चूक जी झालेली आहे. त्याबाबत संबंधित विभागासा आदेश दिलेले आहे की, करसपॉन्डन्स स्केल ४० च्या ग्रेडमध्ये ते पगार ताबडतोब फिक्स करावेत असे आदेशित केलेले आहे आणि त्यांी १४००/- ची मागणी आहे. त्याबाबत सर्वसाधारण सभेपुढे प्रस्तव मांडण्यात येईल.

**मा. सभापती** : ठिक आहे. येत्या सर्वसाधारण सभेत प्रस्ताव मांडावा.

**श्री. अ. रशिद मामू** : प्रशासनाने कर्मचाऱ्यंच्या खर्चाबाबत ४०% पर्यंत करावे की, त्यापेक्षा जास्त याबाबतची माहिती दयावी.

**मा. आयुक्त** : अस्थापनेचा खर्च आपला आतापर्यंत ३८% पर्यंत खर्च करतो आहे. परंतु आपण जे निवड श्रेणी/समयश्रेणी आहे. त्यामुळे प्रत्येकाचा अपेक्षा वाढत जात आहेत. आणि त्यामुळे प्रशासनाचा खर्चही वाढतो आहे. दुसरी गोष्ट म्हणजे लाईनमनची पदे त्यांना दिली. त्यांना नियमाप्रमाणे न्याय दिला परंतु आपण आता ६०० पदे वाढविणार आहोत. आपण नविन दवाखाने बांधणार आहोत. त्यात डॉक्टर, कंपाऊंडरची पदे, विकासाचे कामे राबवायीच आहेत. त्यासाठी वेगवेगळा कर्मचारी वर्ग लागणार, स्वच्छता निरिक्षक लागणार

आहेत. त्या ठिकाणी १००-१२५ वाहन चालक रोजंदारीवर काम करीत आहेत आणि मग अनावधानाने अपघात झाला जबाबदारी कुणाची तेव्हा त्यांना रेग्युलर, स्केलवर घ्यावे लागणार आहे. या सर्व प्रकरणांशी आकृतीबंध अहवाल तयार करुन ४०% ते ४२% पर्यंत खर्च कसा करावयाचा हा गंभीर प्रश्न प्रशासनासमोर आहे. म्हणून माझी आपणास विनंती की, या निवडश्रेणी बाबतीत ज्या कर्मचाऱ्यांच्या मागण्या येतात. त्यावर प्रशासनाकडून अनेलेसिस करुन बजेट मधे आपण आहोत किंवा नाही. इतर महापालिकेत काय व्यवस्था आहे. अस्थापनेवर अनिवार्य खर्च कोणता आहे याचा साततने विचार करन मगच अंतिम निर्णय घेणे योग्य होईल.

**मा. सभापती** : जेष्ठ वाहन चालकासाठी पदास मान्यता दयावी. तोपर्यं पुढचे बजेट येते व नंतर शासनाकडे मंजुरीस्तव पाठवावे.

**श्री. अ. रशिद खान (मामू)** : अस्थापनेवरील खर्च ४०% च्या वर जाऊ नये याची दखल घ्यावी.

**श्री. गौतम खरात** : आपल्या इमारतीच्या उदघाटनासाी मा. राज्यपाल या ठिकाणी आले होते. त्यावेळेस प्रशासनाने अस्थापनेवरील खर्च २५% झाल्याचे सांगितले व आता ३८% सांगत आहेत हे कसे?

**मा. सभापती** : गेल्या आर्थिक वर्षात याबाबत किती खर्च होतो, तरतुद किती केली होती व आज काय परिस्थिती आहे. याची माहिती आम्हला दयावी. तसेच जे कर्मचारी स्वत:चे गाडीवर लाईटचे काम पाहतात. सर्व्हे करतात. त्यांना रु. ३००/- पेट्रोल अलाउन्स देतो. त्यांच्या मागणीनुसार आजचे महागाई लक्षात घेता पुन्हा रु. २००/- वाढ करुन रु. ५००/- प्रशासनाने तपासणी करुन दयावे असे स्थायी समितीचे मत आहे.

**सौ. रजनी जोशी** : सिडको एम-७ झोन मध्ये पापु विभागात जे कर्मचारी रोजंदारीवर काम करतात त्यांना जेष्ठतेनुसार कायम करावे.

**मा. सभापती** : नियमाप्रमाणे कार्यवाही करण्यात येईल.

**डॉ. भागवत कराड** : महापालिकेतर्फे मेडीकल हॉस्पीटल सुरु करावयाचे आहे तर मध्यवर्ती ठिकाणी रिकामी जागा पाहून बांधावे.

**मा. सभापती** : रिकामी जागा १०-१२ एकराची लागणार आहे आणि ते पुढील भविष्यातील योजना लक्षात घेऊन एक हॉस्पीटल बांधावयाचे आहे. त्यामध्ये नक्षत्रवाडीकडे बांधले तरी हरकत नाही.

**श्री. अ. रशिद खान (मामू)** : पृष्ठ क्र. ६ मध्ये डिव्हायडर बाबत पाहणी करुन अहवाल देणे बाबत एका समितीने गठण केलेले आहे ते योग्य नाही.

**मा. सभापती** : यासाठी समिती गठीत केली त्याबाबत सर्वसाधारण सभेकडे शिफारस करुन पाठविले नंतर त्यास मंजूरी मिळाल्यास ती समिती कायम घेणे या ठिकाणी सर्व स. सदस्यांच्या भावना लक्षात घेता याही समितीची आवश्यकता नाही आहे. तेव्हा प्रशासनाने याची चौकशी करुन चौकशी पूर्ण होईपर्यंत संबंधित गुत्तेदाराचे ५% डिपॉझिट करुन ठेवावे व बाकीचे देण्यास हरकत नाही.

**श्री. भगवान घडामोडे, श्री. अभिप्राय भालेराव, डॉ. भागवत कराड** : वर्तमान पत्रात या समिती बद्दल बातमी प्रसिध्दीस झालेली आहे. त्यामुळे बदनामी होते. आपण

दिलेला निर्णय फिरवू नये. त्यापेक्षा २५% डिपॉझिट ठेवून संबंधित गुत्तेदारास देयक अदा करावीत.

**श्री. अभिमन्यु भालेराव :** माझ्या वॉर्डातील मसनतपुर शाळेच्या बाबतीत निर्णय झालेला असतांनाही अद्यापही कार्यवाही झालेली नाही. ही बाब योग्य नाही.

**मा. सभापती** : मा. आयुक्तांनी निवेदन करावे.

**मा. आयुक्त** : मसनतपूर शाळेबाबत जो ठराव झालेला आहे की, ५% जास्त देवून सिद्दीकी नावाचे गुत्तेदारास ते काम दयावे. त्याबाबत चर्चा झालेली आहे आणि अशा प्रकारचा ठराव करुन नये अशी मी विनंती केली होती. त्याही पेक्षा आपल्याला जो निर्णय घ्यावयाचा आहे. तो घ्यावा तीन दिवसाची निविदा काढुन कामास सुरुवात करा असा निर्णय घ्या. परंतु ५% जास्त देवून सिद्दीकी गुत्तेदारास काम दयावे असे म्हणणे बरोबर नाही.

**मा. सभापती** : प्रशासनास आम्ही सांगू इच्छितो की, सर्वसाधारण सभेने घेतलेला निर्णय चुकीचा आहे किंवा स्थायी समितीला अशा प्रकारचा निर्णय घेता येत नाही की, अमुक एका एजन्सीला काम दया विदाऊट टेंडर तर प्रशासनाला असे सांगायचे की, मागिल इतिवृत्तात आपण बघितले तर असे लक्षात येईल की, ते ही टेंडर केव्हातरी मंजूर झालेले होते, ते अदांजपत्रक होते त्यास मंजुरी मिळाली होती. त्यानंतर ते काम ५ लाखांनी वाढलो आणि परत प्रशासनामार्फत स्थायी समिती समोर ठेवल्या जाते की, त्याच गुत्तेदारांकडून ते काम करवुन घ्यावे. हे प्रशासनाचे धोरण चुकीचे आहे. कोणतेही एक्स्टेंड कामाचे टेंडर काढून काम करावे व मंजुरीस्तव पाठवावे.

**श्री. गौतम खरात :** प्रशासनाने २०% वाढ बऱ्याच कामास केलेली आहे.

**श्री. महादेव सुर्यवंशी :** एक उदा. म्हणून घाटी येथील कामाबाबत पूर्वी ६.०० लाखाची मंजुरी होती. नंतर तेच काम वाढवून व त्याच गुत्तेदाराकडून घेऊन रुन १८.०० लाखाचे अंदाजपत्रक तयार केले याचे कारण काय आहे.

**मा. सभापती** : दुसरे उदा. म्हणजे आजच्या इतिवृत्तातीत पान क्र. ५६ मध्ये विषय क्र. २४०/१७ या प्रस्तावीत जे दिले आहे ते काय आहे.

**मा. आयुक्त** : वाढीव काम असल्याने ते काम त्याच गुत्तेदाराकडून करवुन घ्यावयाचे आहे. परंतु ५% किंवा १०% जादा दराने देऊन त्याच गुत्तेदाराकडून करवून घेणे हे काम सर्वसाधारण किंवा स्थायी समितीला नाही.

**मा. सभापती** : याबाबत विधी सल्लागार यांनी खुलासा करावा. या ॲक्ट मधील ५(२), (२) पहावे.

**विधी सल्लागार :** याबाबत महापालिकेला फायदेशीर जे होईल ते मा. आयुक्त यांना करण्याचे अधिकार आहेत.

**मा. सभापती** : या विषयी आपण नंतर चर्चा करु.

**श्री. कचरु नवपुते :** पान क्र. २ मध्ये पोलवर वायर ओढणाऱ्या गुत्तेदाराचे नाव ब्लॅक लिस्ट मध्ये टाकावे असे म्हटले होते ते शब्द वगळावे.

**मा. सभापती** : ठिक आहे.

तसेच पान क्र. ४८ मधील विषय क्र. ३२८/५ व पान क्र. ५० मधील विषय क्र. ३२९/६ मधील ठरावात अंदाजपत्रकीय दराने अशी दुरुस्ती करावी.

**श्री. महादेव सुर्यवंशी :** पृष्ठ क्र. २१ मध्ये मी म्हणाला घेतो शहर अभियंता कडून कामाची संचिका अंदाजपत्रकासहीत तयार होऊन आल्यानंतर पुन्हा तपासणी करण्याचा अधिकार कुणाचा यावर विधी सल्लागारांचा सल्ला पाहिजे होता.

**मा. सभापती** : विधी सल्लागार यांनी माहिती दयावी.

**विधी सल्लागार :** प्रत्यक्षपणे चौकशीचे अधिकार नियमाप्रमाणे मा. आयुक्त यांना आहेत. ४६९ याप्रमाणे व तसेच अधिकार त्यांचे संबंधित अधिकाऱ्यांकडे ते सोपवू शकतात कायदयाप्रमाणे.

**श्री. कचरु नवपुते :** पृष्ठ क्र. ३७ विषय क्र. ३०९/१८ मधील प्रस्ताव रिकॉल करावा.

**मा. सभापती** : ठिक आहे. रिकॉल करण्यात यावा.

**श्री. कचरु नवपुते :** विषय क्र. ३२२/३१ पृष्ठ क्र. ४४ हे रिकॉल करावे.

**मा. सभापती** : पृष्ठ क्र. ४४ हे सर्वसाधारण सभेतील पॉलीसी मॅटर असल्याने ते करणे आवश्यक आहे.

**श्री. कचरु नवपुते :** पृष्ठ क्र. ५६ विषय क्र. ३४१/१८ स्थळ पाहणी करीता ठेवला होता.

**मा. सभापती** : ठिक आहे. अहवाल प्राप्त झाल मंजुरी देण्यात येते.

**विषय क्र. ३०६/१ :**

दिनांक ०९-१०-९६ रोजी संपन्न झालेल्या स्थायी समिती सभेचे इतिवृत्त कायम करणे.

**ठराव :**

१) दि. १ डिसेंबर ९६ पासून शहरातील टपरी जागांसाठी फॉर्म वाटप करण्याची कार्यवाही.
२) इतिवृत्तातील पृष्ठ क्र. २ मध्ये चिकलठाणा येथील पोल वरील वायर ओढण्याचे काम करणाऱ्या गुत्तेदाराचे नाव ब्लॅक लीस्टमध्ये टाकावे असे होते वगळण्यात येते.
३) पृष्ठ क्र. ४८ विषय क्र. ३२८/५ व पृष्ठ क्र. ५० विषय क्र. ३२९/६ मधील ठरवात अंदाजपत्रकीय दराने मंजुरी देण्यास हरकत नाही. अशी दुरुस्ती करावी.
४) पृष्ठ क्र. ३७ मधील विषय क्र. ३०९/१८ प्रस्ताव सर्वानुमते मंजुर करण्यात येतो.
५) विषय क्र. ३२२/३१ पृष्ठ क्र. ४४ मधील प्रस्ताव मंजुर करण्यात येतो.
६) पृष्ठ क्र. ५६ विषय क्र. ३४१/१८ स्थह पाहणी करीता ठेवलेला होता. अहवाल प्राप्त झाली. मंजुरी देण्यात येते.
७) या व इतर दुरुस्तीसह दिनांक ०९-१०-९६ रोजी संपन्न झालेल्या स्थायी समिती सभेचे इतिवृत्त कायम करण्यास मंजुरी देण्यात येते.
वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ३४७/२ :**

अति शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला की, बीड डायव्हर्शन ते सातारा मनपा हद्दी पर्यंतच्या रस्त्याचे डांबरीकरण करणेच्या कामाचे सन १९९४-९५ चे सार्वजनिक बांधकाम खात्याचे डी. एस. आर. दराने र. रु. ५,०५,४१०/- चे अंदाजपत्रक तयार करण्यत आले असून, त्यास मा. आयुक्त यांची मंजुरी मिळालेली आहे. सदरील कामाचा खर्च " रस्ते दुरुस्ती व देखभाल " पुर्नडांबरीकरण ९६-९७ मधुन प्रस्तावित आहे.

सदरील कामासाठी निविदा पत्रके मागविली असता निविदा पत्रके विक्रीच्या अंतिम तारखे पर्यंत एकूण सहा निविदा विक्री झाल्या असून, निविदा पत्रके स्विकृतीच्या अंतिम

तारखे पर्यंत एकूण सहा निविदा पत्रके दर भरुन प्राप्त झाली असून, त्यांचा तुलनात्मक तक्ता खालील प्रमाणे आहे.

| | | |
|---|---|---|
| १. | मे. आदिनाथ कंन्स्ट्रक्शन | १९.५५% कमी दराने |
| २. | मे. रे. कन्स्ट्रक्शन | १९.१% कमी दराने |
| ३. | मे के. बी. पाथ्रीकर | १७.००% कमी दराने |
| ४. | श्री. एम. एस. जग्गी | ५.००% कमी दराने |
| ५. | मे. कास्काट कन्स्ट्रक्शन | ०.९७% कमी दराने |
| ६. | श्री. भिमराव वसंतराव पाटील | १०.०१% कमी दराने |

तुलनात्मकदृष्टया कमी व अंदाजपत्रकीय दरापेक्षा १९.५५% कमी दराने मे. आदिनाथ कंन्स्ट्रक्शन यांची निविदा आहे.

तरी सदर कामा करीता तयार करण्यात आलेल्या र. रु.५,०५,४१०/- च्या पत्रकास तसेच सदरील काम मे. अदिनाथ कन्स्ट्रक्शन यांच्या कडून १९.५५% कमी दराने करुन घेण्या बाबतचा प्रस्ताव विचारार्थ व मंजुरीस्तव सादर.

**संवाद :**

**श्री. भगवान घडामोडे :** या प्रस्तावात १७% दराने देणे पेक्षा ९.५५% दराने अशी निविदा आहे.

**मा. सभापती :** ठिक आहे. या प्रस्तावास रेट ॲनालिसिस करुन ठेवावे.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, बीड डायव्हर्शन ते सातारा मनपा हद्दी पर्यंतच्या रस्त्याचे डांबरीक करण करणेच्या कामाकरीता तयार करण्यात आलेल्या रक्कम रु. ५,०५,४१०/- च्या अंदाजपत्रकास तसेच सदर कामासाठी तुलनात्मकदृष्टया सर्वात कमी व अंदाजपत्रकीय दरापेक्षा १९.५५% कमी दराचे गुत्तेदार मे. आदिनाथ कन्स्ट्रक्शन यांचे निविदा पत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ३४८/३ :**

अति शरह अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला की, कुँवारफल्ली जावधवमंडी भागातील रोडचे डांबरीकरण करणेच्या कामासाठी र रु. ५,४४,८२५/- च्या अंदाजपत्रकास स्थायी समिती विषय क्र. ४ दि. २०-०७-९६ अन्वये मंजुरी प्राप्त झालेली आहे.

त्यानुसार सदरील कामा करीता निविदापत्रके मागविली असता निविदा पत्रके विक्रीच्या अंतिम तारखे पर्यंत एकूण ४ कोरी निदि पत्रके विकली गेली व स्विकृतीच्या अंतिम तारखे पर्यंत फक्त तीन निविदा पत्रके दर भरुन प्राप्त झाली. प्राप्त निविदा पत्रके दि. २७-०८-९६ रोजी उघडण्यात आली. त्याचा तपशील खालील प्रमाणे आहे.

| | | |
|---|---|---|
| १. | मे. आदिनाथ कंन्स्ट्रक्शन | ५.५९% कमी दराने |
| २. | श्री. भिमराव वसंतराव पाटील | ५.०१% कमी दराने |
| ३. | श्री. एम. एस. जग्गी | ५.००% कमी दराने |

तरी मे. आदीनाथ कंन्स्ट्रक्शन यांचे अंदाजपत्रकीय दरापेक्षा ५.५९% कमी दर मंजुरी बाबत प्रस्ताव विचारार्थ तथा मंजुरीस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्यानुसार, कुँवारफल्ली जाधवमंडी भागातील रोडचे डांबरीकरण करणेच्या कामासाठी तुलनात्मकदृष्टया सर्वात कमी व अंदाजपत्रकीय दरापेक्षा ५.५९% कमी दराचे गुत्तेदार मे. आदिनाथ कंन्स्ट्रक्शन यांचे निविदा पत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ३४९/४ :**

अति. शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला की, टाऊन हॉल ते सफाई गेट या रोडचे पुनर्डांबरीकरण करणे या कामासाठी अंदाजपत्रकीय रक्कम रु. ४,३२,३५०/- च्या अंदाजपत्रकास स्थायी समिती विषय क्र. ६८/१३ दि. १२-०७-९६ अन्वये मंजुरी प्राप्त झाली आहे.

त्यानुसार सदरील कामाकरीता निविदा पत्रके विक्रीच्या अंतिम तारखे पर्यंत एकूण ६ कोरी निविदा पत्रके विकल्या गेली व स्विकृतीच्या अंतिम तारखे पर्यंत फक्त ५ (पांच) निविदा पत्रके दर भरुन प्राप्त झाली. निविदा पत्रके दि. २७-०८-९६ रोजी उघडण्यात आली असता त्यांचा खालील प्रमाणे आहे.

| | | |
|---|---|---|
| १. | मे. रे. कन्स्ट्रक्शन | १७.००% कमी दराने |
| २. | मे. आदिनाथ कंन्स्ट्रक्शन | १६.७९% कमी दराने |
| ३. | श्री. भिमराव वसंतराव पाटील | ५.०१% कमी दराने |
| ४. | श्री. एम. एस. जग्गी | ५.००% कमी दराने |
| ५. | मे. मस्कट कन्स्ट्रक्शन | ०.९७% कमी दराने |

वरील प्राप्त निविदा पैकी मे. रे. कन्स्ट्रक्शन कं. यांच्या निविदा पत्रकाचे दर तुलनात्मकदृष्टया सर्वात कमी व अंदाजपत्रकीय दरापेक्षा १७% कमी आहेत.

तरी मे. रे. कन्स्ट्रक्शन यांचे अंदाजपत्रकीय दरापेक्षा १७% कमी दर मंजुरी बाबतचा प्रस्ताव विचारार्थ तथा मंजुरीस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, टाऊन हॉल ते मकाई गेट या रोडचे पुनर्डांबरीकरण करणेच्या कामासाठी तुलनात्मकदृष्टया सर्वात कमी व अंदाजपत्रकीय दरापेक्षा १७% कमी दराचे गुत्तेदार मे. रे. कन्स्ट्रक्शन यांचे निविदापत्रक असल्याने त्यांचे निविदा पत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ३५०/५ :**

अति. शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला की, लक्ष्मण चावडी ते स्मशान मारोती या रस्त्याचे रुंदीकरण करणे या कामासाठी सार्व. बांधकाम खात्याच्या सन ९५-९६ च्या दर सुची नुसार अंदाजपत्रक रु. १,२५,९९२/- चे तयार करण्यात आले आहे. सदर कामाचा खर्च भांडवली रस्ते एम. ख. सन ९६-९७ या लेखा शिर्षकाअंतर्गत उपलब्ध तरतुदी मधुन करण्यात येईल.

तरी सदर कामासाठी तयार करण्यात आलेले अंदाजपत्रक र. रु. १,२५,२९२/- च्या मंजुरी बाबतचा प्रस्ताव मा. स्थायी समितीचे विचारार्थ तथा मंजुरीस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, लक्ष्मण चावडी ते स्मशान मारोती या रस्त्याचे रुंदीकरण करणे या कामासाठी सार्व. बांधकाम खात्याच्या सन ९५-९६ च्या दर सुची नुसार र. रु. १,२५,२९२/- चे अंदाजपत्रकास तसेच सदर कामाचा खर्च भांडवली रस्ते (न. ख.) सन ९६-९७ या लेखा शिर्षका अंतर्गत उपलब्ध तरतुदी मधुन करण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ३५१/६ :**

अति. शहर अभियंता यांनी प्रस्ताव दिला की, समी कॉलनी भागात शहाबाद फरशी बसविणे व जुन्या खांडकीवर कॉक्रीटींग करणे या कामासाठी सार्वजनिक बांधकाम खात्याच्या सन ९५-९६ दरसुची नुसार अंदाजपत्रक र.रु. २,०४,८६२/- चे तयार करण्यात आले आहे. सदरील कामाचा खर्च रस्ते देखभाल व दुरुस्ती (पॅचवर्क) सन ९६-९७ या लेखा शिर्षा मध्ये उपलब्ध असणाऱ्या तरतुदीतुन करण्यात येईल.

तरी सदर कामासाठी तयार करण्यात आलेले अंदाजपत्रक रक्कम रु. २,०४,८६२/- च्या मंजुरी बाबतचा प्रस्ताव विचारार्थ व तथा मंजुरीस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्यानुसार समी कॉलनी भागात शहाबाद फरशी बसविणे व जुन्या खांडकीवर कॉक्रीटींग करणे या कामासाठी सार्वजनिक बांधकाम खात्याच्या सन ९५-९६ दरसुची नुसार तयार करण्यात आलेले र. रु. २,०४,८६२/- चे अंदाजपत्रकास तसेच सदरील कामाचा खर्च रस्ते देखभाल व दुरुस्ती (पॅचवर्क) सन ९६-९७ या लेखा शिर्षकामध्ये उपलब्ध असणाऱ्याचा तरतुदीतून करण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

**विषय क्र. ३५२/७ :**

अति. शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला की, मो. संगिता कॉलनी व यमुना कॉलनी भागातील अंतर्गत रस्त्यांचे डांबरीकरण करणे या कामासाठी सार्वजनिक बांधकाम खात्याच्या सन ९५-९६ च्या दरसुची नुसार अंदाजपत्रक रक्कम रु. २,५८,५००/- चे तयार करण्यात आलेले आहे. सदरील कामाचा खर्च भांडवली रस्ते (नविन डांबरी रस्ते) सन ९६-९७ या लेखा शिर्षातंर्गत उपलब्ध तरतुदी मधुन करण्यात येईल. तरी सदर कामासाठी तयार करण्यात आलेले अंदाजपत्रक र. रु. २,५८,५००/- च्या मंजुरी बाबतचा प्रस्ताव विचारार्थ तथा मंजुरीस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, मो. संगिता कॉलनी भागातील अंतर्गत रस्त्याचे डांबरी करणेच्या कामासाठी सार्वजनिक बांधकाम खात्याच्या सन ९५-९६ च्या दरसुची नुसार तयार करण्यात आलेले रक्क्म रु. २,५८५००/- चे अंदाजपत्रकास तसेच सदरील कामाचा खर्च भाडंवली रस्ते (नविन डांबरी रस्ते) सन ९६-९७ या लेखा शिर्षातंर्गत उपलब्ध तरतुदी मधुन स्विकारण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ३५३/८ :**

अति. शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला की, जयहिंद कॉलनी, जिजामाता कॉलनी आणि मराठवाडा प्रेस भागातील अंतर्गत रस्त्यांचे पुनर्डांबरीकरण करणे या कामासाठी सार्वजनिक बांधकाम खात्याच सन ९५-९६ च्या दरसुची नुसार अंदाजपत्रक रक्कम रु. २,९०,६१५/- तयार करण्यात आले असून, सदरील कामाचा खर्च रस्ते देखभाल व दुरुस्ती (पुनर्डांबरीकरण) सन ९६-९७ या लेखा शिर्षकामध्ये उपलब्ध असलेल्या तरतुदी मधुन करण्यात येईल.

तरी सदर कामासाठी तयार करण्यात आलेल्या अंदाजपत्रक र. रु. २,९०,६१५/- चे मंजुरी बाबतचा प्रस्ताव विचारार्थ तथा मंजुरीस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्यानुसार, जयहिंद कॉलनी, जिजामाता कॉलनी आणि मराठवाडा प्रेस भागातील अंतर्गत रस्त्यांचे पुनर्डांबरीकरण करणेच्या कामासाठी सार्वजनिक बांधकाम खात्याच सन ९५-९६ च्या दरसुची नुसार तयार करण्यात आलेले रक्कम रु. २,९०,६१५/- चे अंदाजपत्रकास तसेच सदरील कामाचा खर्च रस्ते देखभाल व दुरुस्ती (पुनर्डांबरीकरण) सन ९६-९७ या लेखा शिर्षका मध्ये उपलब्ध असलेल्या तरतुदी मधुन करण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ३५४/९ :**

अति. शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला की, धनमंडी येथील रस्त्यावर २५० वॅटचे सोडीयम दिवे पोलसह बसविण्याच्या कामाकरीता सार्वजनिक बांधकाम खात्याच्या सन ९६-९७ च्या दर सुची नुसार र. रु. ३,०९,७५०/- चे अंदाजपत्रक तयार करण्यात अलो आहे. सदरील खर्च सन ९६-९७ च्या अर्थसंकल्पात १५०० पोत रोवण्याच्या कामासाठी उपलब्ध असलेल्या र.रु. ६५.०० लाखाच्या तरतुदी मधुन करण्यात येईल.

तरी र. रु. ३,०९,७५०/- चे अंदाजपत्रक मंजुरी बाबतचा प्रस्ताव मंजुरीस्तव तथा विचारार्थ सादर.

**मा. सभापती** : या प्रस्तावात १५०० पोलसाठी रु. ६५.०० लाखाची तरतुद ठेवली आहे आणि ३.०० लाखास आज मंजुरी यातुनच देण्यात येत आहे. तेव्हा १५०० पोल आपण कधी रोवणार व त्यासाठी म. रा. वि. न. यांचे कडून हे काम करवून लवकर घेता येईल काय? किती दिवसात हे काम पूर्ण होणार आहे. याची माहिती दयावी.

**अति. शहर अभियंता :** असे ठरले आहे की, १५०० पोल हे मराविम कडुन बसवुन घ्यावे.

**श्री. महादेव सुर्यवंशी, डॉ. भागवत कराड :** जल मराविम हे काम तातडीने करवून घेत असल्यास तसे द्यावे नसता उगीचच उशीर झाल्यास नागरिकास नाराजी व्यक्त होत असते.

**मा. सभापती** : महापालिकेने म. रा. वि. म. मंडळ यांचे सुपरव्हिजन अन्वये कार्य करते परंतु एकंदरीत म. रा. वि. म. कडून पोल बसवावे लागल्यास विलंब लागू नये याबाबत पॉलीसी मॅटर असल्याने सर्वसाधारण सभेकडे शिफारशीस्तव प्रस्ताव पाठविण्यात यावा.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्यानुसार, धनमंडी येथील रस्त्यावर २५० वॅटचे सोडीयम दिवे पोलसह बसविण्याच्या कामाकरीता सार्वजनिक बांधकाम खात्याच्या सन ९६-९७ च्या दर सुची नुसार तयार करण्यात आलेले र. रु. ३,०९,७५०/- चे अंदाजपत्रकास तसेच सदरील खर्च सन ९६-९७ च्या अर्थसंकल्पात १५०० पोल रोवण्याच्या कामासाठी उपलब्ध असलेल्यार. रु. ६५.०० लाखाच्या तरतुदी मधुन करण्यात सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ३५५/१० :**

शहर अभियंता यांनी प्रस्ताव दिला की, जवाहर कॉलनी येथील मनपाच्या दवाखान्याजवळ मनपाच्या खुल्या जागेवर उद्यान विकसित करणे बाबतचे अंदाजपत्रक र. रु. ३,५०,०००/- यास दि. ०६-०१-९६ च्या विषय क्र. ३५२/११ अन्वये स्थायी समितीने मंजुरी दिलेली आहे, त्याअनुषंधाणे रितसर निविदांची कार्यवाही केली आलेल्या निविदा पैकी श्री. उपेंद्र कातेले यांच्या दरास मा. आयुक्त यांनी वाटाघाटीसाठी चर्चा धडकन आली त्यास संबंधित गुत्तेदार यांनी १% कमी दराने काम करण्याचे मान्य केले. प्रस्ताव स्थायी समिती पुढे ठेवण्यात आला त्यास २९-०२-९६ रोजी विषय क्र. ३५ अन्वये मंजुरी दिलेली आहे. त्या अनुषांगाने काम सुरु करण्यात आले त्यात वॉचमन क्वॉर्टर, लॉनचे टेरेस, पाण्याचा हौद व टाकी, मुलांची खेळणी, बेंचेस, संरक्षित भिंत पाडावे इ. तयार करणे काम होते. परंतु आर्किटेक्ट कडून लॅड स्केपिंग नकाशा मागविण्या पुर्वी अंदाजपत्रक रक्क्म रु. ३,५०,०००/- तयार करुन कार्यवाही केली होती. त्यानंतर आर्किटेक्ट कडुन लँड स्केपिंग नकाशे प्राप्त झाले त्यात कॉन्टीटी मध्ये बदल घडवून आले त्यामुळे अंदाजपत्रक र. रु. १,५०,०००/- वाढीव रक्कम होत आहे. म्हणजे पुर्वीचे ३,५०,०००/- आताचे वाढीव अंदाजपत्रक १,५०,००० अशी ५,००,०००/- (पाच लाख) होत आहे. सुधारीत उर्वरित काम होणे जरुरीचे आहे. नसता उद्यानाचे काम अर्धवट राहील. करीता वाढीव रक्कमेला म्हणजे रु. १,५०,०००/- यास त्याच गुत्तेदाराकडून मंजुर दरा प्रमाणे (१% कमी दराने) करुन घेण्यास्तव प्रस्ताव विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्यानुसार, जवाहर कॉलनी जवाहर कॉलनी येथील महापालिकेच्या दवाखान्याजवळ मनपाच्या खुल्या जागेवर उद्यान विकसित करणेच्या कामाबाबत आर्किटेक्ट कडुन लॅड स्केचिंग नकाशे प्राप्त झाले नंतर त्यात कॉन्टीटी मध्ये बदल घडवून आले व त्यामुळे वाढलेल्या रक्कम रु. १,५०,०००/- चे वाढीव अंदाजपत्रकास तसेच सदर कामासाठी आलेल्या निविदापैकी श्री. उपेंद्र कालेले यांचे दरास मा. आयुक्त यांनी वाटाघाटीसाठी चर्चा घडवून आली त्यात संबंधित गुत्तेदाराकडून मंजूर दराप्रमाणे (१% कमी दराने) पुर्ण करुन घेण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ३५६/११ :**

शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, वार्ड नं. ६८ मो. फुले नगर स्लम भागात शहाबाद फरशी बसविण्याच्या कामाकरीता र. रु. १,५८,०००/- चे अंदाजपत्रक सा. बांधकाम विभाग औरंगाबाद यांचे दर सुची ९५-९६ प्रमाणे तयार करण्यात आले असून, मा. आयुक्त यांनी दि. २५-०९-९६ रोजी प्रशासकीय मान्यता दिली आहे.

सदरील काम गलिच्छ वस्ती सुधारणा " खांडकी रस्ते " या लेखा शिर्षा ९६-९७ च्या तरतुदी मधुन खर्च करण्याचे प्रस्तावित आहे. करीता मंजुरी विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्यानुसार वार्ड नं. ६८ मो. फुले नगर स्लम भागात शहाबाद फरशी बसविण्याच्या कामाकरीता सा. बा. विभाग औरंगाबाद यांचे ९५-९६ चे दर सुची नुसार तयार करण्यात आलेले रक्कम रु. १,५८,०००/- चे अंदाजपत्रकास तसेच सदरील काम गलिच्छ

वस्ती सुधारणा " खांडकी रस्ते " या लेखा शिर्षा ९६-९७ च्या तरतुदी मधून करणेस सर्वानुमते मंजुरी देण्यता येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ३५७/१२ :**

शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, वार्ड क्र. ८० मो. संजय नगर (मुकूंद वाडी उत्तर भाग) येथे डांबरी रस्ते तयार करणे (पार्ट "अ") या कामा करीता र. रु. १६,१०,८५०/- चे अंदाजपत्रक सा. बा. विभाग औरंगाबाद यांची दर सुची ९५-९६ प्रमाणे तयार करण्यात आले असून, मा. आयुक्त यांनी दिनांक १०-०६-९६ रोजी प्रशासकीय मान्यता दिली असून, सदरील कामासाठी वृत्तपत्रात रितसर प्रसिध्दी देऊन कार्यालयाची निविदा सुचना क्र. मनपा/मुलेप/नि/८०/९६ दि. २१-०६-९६ अन्वये निविदा मागविल्या असता निविदा विक्रीच्या अंतिम दि. ०५-७-९६ पर्यंत एकूण पाच कोऱ्या निविदा विकल्या गेल्या व स्विकारण्याच्या तारखेस एकूण (४) मोहरबंद निविदा प्राप्त झाल्या त्या दिनांक १७-०७-९६ रोजी उपस्थित ठेकेदारा समक्ष उघडण्यात आल्या असता गुत्तेदारांनी दिलेले दर पुढील प्रमाणे आहेत.

| | | |
|---|---|---|
| १. | मे. रे. कन्स्ट्रक्शन | अ. प. दरापेक्षा १९.८६% कमी |
| २. | मे. आदिनाथ कंन्स्ट्रक्शन | अ. प. दरापेक्षा १८.७७% कमी |
| ३. | मे. रे. कन्स्ट्रक्शन | अ. प. दरापेक्षा १४.४०% कमी |
| ४. | श्री. एम. एस. जग्गी | अ. प. दरापेक्षा १०.००% कमी |
| ५. | मे. मस्कट कन्स्ट्रक्शन | ०.९७% कमी दराने |

तुलनात्मकदृष्टया कमी व अंदाजपत्रकीय दरापेक्षा १९.८६% कमी दराची निविदा मे. मस्कट कन्स्ट्रक्शन यांची असून, त्यांचे दर पृथःकरण मागविण्यात आले असता त्यांनी लेखी कळविले आहे की, सदरील कामा करीता लागणारी मशिनरी व खडी स्वतःची आहे. म्हणून निविदेत दिलेले दर त्यांना परवडणार आहे.

करता सदरील काम मे. मस्कॉट कन्स्ट्रक्शन यांचे कडून अंदाजपत्रकीय दरापेक्षा १९.८६% कमी दराने करुन घेण्याच्या मान्यतेस्तव व विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्यानुसार, वार्ड क्र. ८० मो. संजयनगर (मुकूंदवाउी उत्तर भाग) येथे डांबरी रस्ते तयार करणे (पार्ट "अ") या कामा करीता तुलनात्मकदृष्टया सर्वात कमी व अंदाजपत्रकीय दरापेक्षा १९.८६% कमी दराचे गुत्तेदार मे. मस्कॉट कन्स्ट्रक्शन यांचे निविदा पत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ३५८/१३ :**

कार्यकारी अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला की, रेल्वेस्टेशन ते हमालवाडा येथे जलवाहिनी टाकावयाची आहे. त्यासाठी परिसर अभियांत्रिकी विभागाची सन ९४-९५ च्या दरसुची नुसार र. रु. ४,४४,०७७/- एवढयाचे अंदाजपत्रक तयार येऊन त्यास स्थायी समिती ठराव क्र. १२/११ दि. २८-०६-९६ अनवये मंजुरी दिली आहे. कार्यालयाची निविदा सुचना क्र. ८८/९६-९७ बी-१ निविदा दै. वर्तमानपत्रात प्रसिध्दीस देण्यात येऊन निविदा मागविण्यात आल्या. कोऱ्या निविदा विक्रीच्या अंतिम तारखे पर्यंत एकूण ९ कोऱ्या निविदा विक्री झाल्या व

सिलबंद निविदा स्विकारण्याच्या नियोजीत तारखेस दोन सिलबंद निविदा प्राप्त झाल्या त्या खालील प्रमाणे आहेत.

| | | |
|---|---|---|
| १. | श्री. हुसेन अली | ७.३५% जास्त |
| २. | मे. गॉडवील कॅ. क. | १०% जास्त |

वरील प्रमाणेच्या तुलनात्मकदृष्टया कमी दर श. श्री. हुसरेअली यांच्या आहे. परंतु त्यांनी दिलेला दर हा कार्यालयास जास्त वाटत असल्यामुळे दर पृथःकरणासह दर वाटाघाटीसाठी मा. आयुक्त यांच्याकडे दि. ३०-०९-९६ रोजी बोलाविण्यात आले होते. वाटाघाटीअंती अंदाजपत्रकीय दरा नुसार काम करण्यास तयार असल्याचे लेखी दिले व त्यास मा. आयुक्त यांनी मंजुरी दिली आहे.

तरी वाटाघाटी अंतीचा दर म्हणजेच अंदाजपत्रकीय दरा नुसार श्री. हुसेन अली यांची निविदा स्विकृतीचा प्रस्ताव सादर.

**मा. सभापती** : आजच्या सभेत कायम करण्यात यावे.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्यानुसार रेल्वे स्टेशन ते हमालवाडा येथे जलवाहिनी टाकणेच्या कामासाठी तुलनात्मकदृष्टया सर्वात कमी व अंदाजपत्रकीय दरापेक्षा ५.३५% जास्त गुत्तेदार श्री. हुसेन अली यांचे दर होते. त्यांनी दिलेले दर हे कार्यालयास जास्त वाटत असल्यामुळे दर पृथःकरणासह दराने वाटाघाटीसाठी मा. आयुक्त यांच्याकडे दि. ३०-०९-९६ रोजी बोलाविले असता वाटाघाटी अंती अंदाजपत्रकीय दरानुसार काम करण्यास तयार असल्याचे लेखी दिले व त्यास मा. आयुक्त यांनी मंजुरी दिल्यानुसार वाटाघाटी अंती अंदाजपत्रकीय दराचे श्री. हुसेन अली यांचे निविदा पत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. तसेच सदर प्रस्तावास आजच्या सभेत कायम करण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ३५९/१४ :**

कार्यकारी अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला की, शांतीपुरा येथे १५० मी. मी. व्यासाची ए. सी. जलवाहिनी टाकावयाची आहे. त्यासाठी परिसर अभियांत्रिकी विभागाची सन ९५-९६ या दरसुचीनुसार र. रु. २,४९,८९५/- चे अंदाजपत्रक तयार करण्यात आले आहे. सदर कामाचा खर्च हा भांडवली कामाची तरतुद मधुन करण्यात येणार आहे. तरी अंदाजपत्रक मंजुरीस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे शांतीपुरा येथे १५० मी. मी. व्यासाची ए. सी. जलवाहिनी टाकावयाच्या कामाकरीता तयार करण्यात आलेल्या र. रु. २,४९,८९५/- च्या अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ३६०/१५ :**

पाणी पुरवठा विभाग क्र. २ (सिडको), अंतर्गत एन-५ येथील जलकुंभाच्या पंपहाऊस समोरच्या रस्त्यावर कॉक्रीटचा रस्ता तयार करण्यासाठी ९५-९६ च्या दरसुची नुसार र. रु.

१,९०,०००/- चे अंदाजपत्रक तयार करण्यात आले असून, सदरील कामावर होणारा खर्च देखभाल व दुरुस्तीसाठी ९६-९७ मध्ये ठेवण्यात झालेल्या तरतुदीमधून करण्यात येणार आहे. अंदाजपत्रकास प्रशासकीय मंजुरी मिळाली आहे. तरी सदर कामाकरीता तयार करण्यात आलेल्या र. रु. १,९०,०००/- च्या अंदाजपत्रकास मंजुरीस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे पाणी पुरवठा वि. क्र. २ (सिडको) अंतर्गत सिडको एन-५ येथील जलकुंभाच्या पंपहाऊस समोरच्या रस्त्यावर कॉंक्रीटचा रस्ता तयार करण्याकरीता र. रु. १,९०,०००/- च्या अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ३६१/१६ :**

जकात अधिक्षक यांनी प्रस्ताव सादर केला की, औरंगाबाद महानगरपालिका औरंगाबाद जकात विभागातर्फे जकात वसुलीसाठी आयातीत मालाचे योग्य वजन करणे आवश्यक असते. जेणे करुन जकात वसुली योग्य रीतीने होईल या दृष्टीने जकात विभागात " वजन काटा " उप अभियंता (इमारती) मनपा औरंगाबाद यांच्यातर्फे जकात नाका येथे आयातीत वाहनाचे वजन करण्यासाठी खालील प्रमाणे दर ठेवण्यात येत आहेत.

१. रिकामे वाहन व तद्‌नंतर मात भरलेले वाहन (लोडींग ट्रक) रु. ४०/- प्रति वाहन
२. रिकामे वाहन (ट्रक) करीता उपरोक्त दरास रु. २०/- प्रति वाहन

करीता उपरोक्त दरास मान्यता देणेसाठी स्थायी समितीपुढे प्रस्ताव विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे मध्यवर्ती जकात नाक्यावर बसविण्यात आलेला वजन काटा प्रत्यक्ष सुरु झाल्यानंतर आयातीत वाहनाचे वजन करण्यासाठी खालील दर्शविलेल्या दरास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

१. रिकामे वाहन व तद्‌नंतर मात भरलेले वाहन (लोडींग ट्रक) रु. ४०/- प्रति वाहन
२. रिकामे वाहन (ट्रक) करीता उपरोक्त दरास रु. २०/- प्रति वाहन

**विषय क्र. ३६२/१७ :**

मो. उस्मानपुरा येथील स. नं. ५१/५२ करीता पुर्वीच्या नगर परिषदेने केलेल्या रेखांकनामधील खुली जागा जिचा न. भु. क्र. -- आहे व जो २४ मी. रुंद रस्ता उत्सव मंगल कार्यालय ते पीरबाजार हया रस्त्यालगत व भूखंड क्र. ११४ अ जवळ आहे. ती जागा श्री. अ. पु. नारायण स्वामी टेंपल ट्रस्ट, संत निवास, सराफा औरंगाबाद यांनी बालोद्यान व संस्कार केंद्र विकसित करण्याकरीता मागणी केली आहे.

मंजुर रेखांकनामधील सदर खुल्या जागेचे क्षेत्र सुमारे २८१५ चौ. मी. मंजुर विकास नियंत्रण नियमावलीतील तरतुदीनुसार खुल्या जागेचे क्षेत्राचे १०% अथवा जास्तीत जास्त २०० चौ. मी. बांधकाम खुल्या जागेमध्ये अनुज्ञेय आहे. त्यानुसार सदर संस्थेस खुल्या जागेपैकी चौ. मी. क्षेत्र संस्कार केंद्र विकसित करण्याकरीता प्रतिवर्ष रु. २४,०००/- हया दराने ३० वर्षाचे कालावधी करीता सदर संस्थ्येस सदरील जागा संपूर्णपणे व सर्वाथाने बालोद्यान म्हणून स्वखर्चाने प्रथमतः विकसित करावी. हया अटीसह महानगरपालिकेच्या नेहमीच्याच अटी व शर्तीस पात्र राहुन भोडपटयावर देण्याचा मान्यतेस्तव सादर.

मान्यतेनंतर संस्थेस हयापुर्वी नगर रचना विभागाने खुल्या जागा देतांना ठरवून दिलेल्या सर्व अटी व शर्ती कळविण्यात येतील. त्या अटी व शर्ती संबंधितास मान्य असल्यास

त्यानंतर करारनाम्याची पूर्तता करुन सदरील खुल्या जागेमधील २०० चो. मी. क्षेत्र संस्थेस भाडेपटयावर देण्यात येईल.

**संवाद :**

**मा. सभापती** : सदरील प्रस्ताव गार्डन विकसित करण्यास देत आहोत.

**श्री. भगवान घडामोडे :** हा प्रस्ताव विकसित करण्यासाठी देत आहात परंतु या खुली जागेचा न. भू. क्र. यात नमूद केलेला नाही आणि त्यापेक्षा एखाद्या ट्रस्टकडे देण्यापेक्षा मनपानेच स्वत: विकसित करावे लिजवर देऊ नये.

**श्री. गौतम खरात :** लिजवर देणे म्हणजे सदरील संस्थेस जागा देणे आहे. त्यापेक्षा प्रस्ताव मंजुर करु नये.

**मा. सभापती** : सदरील प्रस्तावाबाबत मोफत गार्डन विकसित करण्यासाठी देत आहोत त्यांच्याकडे पी. आर. कार्ड तयार करुन देत नाही. या संस्थेने देशात अनेक ठिकाणी चांगले कार्य केलेले आहे आणि आपण ही जागा विकसित करण्यासाठी देत असतांना शर्ती व अटीसह देत आहोत.

**श्री. कचरु नवपुते, श्री. विकास जैन :** सदरील प्रस्ताव मंजूर करावा.

**श्री. हमीद ताबा :** स. स. श्री. घडामोडे वेळोवेळी सुचना करीत आहेत. त्याप्रमाणे स्थळ पाहणीसाठी ठेवावे.

**मा. सभापती** : या ठिकाणी डॉ. कराड, श्री. भगवान घडामोडे यांचा फक्त विरोध समजून हा प्रस्ताव मंजुर करण्यात येतो.

**श्री. हमीद ताबा, श्री. भगवान घडामोडे :** हा विषय स्थळपाहणी करीता ठेवावा.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, मो. उस्मानपुरा येथील स.नं. ५१/५२ करीता पुर्वीच्या नगर परिषदेने केलेल्या रेखांकनामधील खुली जागा जिचा न. भू. क्र. आहे व जो २४.०० मी. रुंद रस्त उत्सव मंगल कार्यालय ते पीर बाजार हया रस्त्यालगत व भूखंड क्र. ११४ हा जवळ आहे. ही जागा श्री. अ. पु. नाराण स्वामी टेंपल ट्रस्ट, संतनिवास, सराफा औरंगाबाद हयांना बालोद्यान व संस्कार केंद्र विकसित करण्याकरीता २८१५.०० चो. मी. पैकी नियमावलीतील तरतुदीनुसार २०० चौ. मी. क्षेत्र प्रति वर्षी २४,०००/- हया दराने ३० वर्षाचे कालावधी करीता सदर संस्थेस संपुर्णपणे व सर्वथाने बालोद्यान म्हणून स्वखर्चाने प्रथमत: विकसित करण्याकरीता मनपाच्या नेहमीच्याच अटी व शर्तीस पात्र राहुन भाडेपट्टयावर देण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ३६३/१८ :**

मो. उस्मानपुरा येथील स. न. ४८ भाग, पन्ना लालनगर हया मंजुर रेखांकनातील भूखंड क्र. ६२ व ६६ समोरील व भूखंड क्र. १७८२० असा असून क्षेत्र १६१६.१३ चौ. मी. आहे. मी पन्नालालनगर विकास संस्थेने व्यायाम शाळा व खुला ओटा बांधण्याकरीता मागणी केलेली आहे.

सदरील संस्थेस द्यावयाचे जागेकरीता प्रचलित गणनानुसार र. रु. ११९२४/- प्रति वर्ष आहे. निश्चित करुन देण्यात आलेली आहे. विकास नियंत्रण नियमावली नुसार खुल्या जागेपैकी १०% म्हणजेच १६.५.०० चौ. मी. जागेवर संबंधितास व्यायाम शाळा व खुला ओटा विकसित करता येईल. सदर जागेवर संबंधितास व्यायाम शाळा व खुला ओटा विकसित

करता येईल. सदर संस्थेने सदर जागा प्रथमतः संपुर्णपणे व सर्वार्थाने उद्यान म्हणून विकसित करावी हया अटीसह महानगरपालिकेच्या नेहमीच्या अटी व शर्तीस पात्र राहून ३० (तीस) वर्षाचे कालावधी करीता भाडेपट्टयावर देण्याचा प्रस्ताव मान्यतेस्तव सादर.

मान्यतेनंतर संस्थेस यापुर्वी नगर रचना विभागाने खुल्या जागा देतांना ठरवून दिलेल्या सर्व अटी शर्ती कळवून त्या त्यांना मान्य झाल्यास आवश्यकतोनुसार करारनाम्याची पूर्तता करुन जागा संस्थेस भाडेपट्टयावर देण्यात येईल.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, मो. उस्मानपुरा, येथील स. नं. ४८ भाग पन्नालालनगर हया मंजुर रेखांकनातील भूखंड क्र. ६२ ते ६६ समोरील व भूखंड क्र. ६७, ६८ चे लगत असलेली खुली जागा जिचा न. भू. क्र. १७८२० असा असून क्षेत्र १६१६.१३ चौ. मी. आहे. ती पन्नालालनगर विकास संस्थेस व्यायाम शाळा व खुला ओटा बांधण्याकरीता वार्षीक भाडे रु. ११,९२४/- प्रमाणे तीस (३०) वर्षाच्या भाडेपटयावर तसेच सदर जागा प्रथमतः संपुर्णपणे व सर्वार्थाने उद्यान म्हणून विकसित करावी हया अटीसह खुल्या जागेपैकी १०% म्हणजे १६५.०० चौ. मी. जागेवर संबंधितास व्यायाम शाळा व खुला ओटा विकसित करण्याकरीता भाडेपटयाने जागा देण्यास मनपाच्या अटी व शर्तीस पात्र राहून देण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

## ऐनवेळचे विषय

**विषय क्र. ३६४/१ :**

पशुधन विकास अधिकारी यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, महानगरपालिका औरंगाबाद प्राणी संग्राहालाय येथे १ हत्ती जोडपे आणण्यात आले असता माहे नोव्हेंबर, १९९६ पासून हत्ती स्वारी करविण्याचे ठरविले आहे. स्वारी करीता मा. आयुक्त यांच्या मान्यता अन्वये खालील अटीवर हत्ती स्वारीचे दर प्रस्तावित करण्यात येत आहेत.

पौंढासाठी रु. १०.००
मुलासाठी रु. ५.००
(वय ३ ते १२ वर्षे)
मुले (वय ३ वर्षाखलील) मोफत

**हत्ती स्वारीसाठी अटी :**

१. हत्तीच्या फेऱ्या मनपाने ठरवून दिलेल्या रस्त्यावर होईल.
२. एका चक्करला १५ मिनिटांपेक्षा जास्त वेळ देण्यात येणार नाही.
३. हत्ती स्वारी ही जनावरांची प्रकृती व वातावरणावर अवलंबून राहील.
४. प्रत्येक जनावरास २ तासापेक्षा जास्त वेळ स्वारी करता येणार नाही.
५. प्रत्येक स्वारीस महावत व्यतिरिक्त सहा मोठे किंवा आठ लहान पेक्षा जास्त व्यक्ती बसविण्यात येणार नाहीत.
६. प्रत्येक स्वारीसाठी एक मोठे व दोन लहान स्वारी याप्रमाणे महानगरपालिकासाठी राखून ठेवण्यात आले आहे.
७. स्वारी करणाऱ्या व्यक्तीस दुखापत किंवा इजा खालील किंवा खाली पडले तर मनपा जबाबदार राहणार नाही. स्वारी स्वतःच्या जबाबदारीवर करावी लागेल.
८. हत्ती स्वारीचे पूर्ण हक्क महानगरपालिका ने राखून ठेवले आहेत.

९. हत्ती स्वारी करीता प्राणी संग्राहालयाच्या कर्मचाऱ्यांनी केलेल्या सूचना बंधनकारक राहतील.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे मनपा प्राणी संग्राहालयातील हत्तीची सवारी करण्यास नोव्हेंबर १९९६ पासून सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. प्रस्तावातील दराऐवजी खालील सुचविलेले दर आकारण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

| | | सुचविलेले दर | ऐवजी | मंजूर दर |
|---|---|---|---|---|
| १. | प्रौढांसाठी | रु. १०.०० | ऐवजी | रु. ५.०० (पाच) |
| २. | मुलांसाठी (वय ३ ते १२) | रु. ०५.०० | ऐवजी | रु.२.०० (दोन) |
| ३. | मुले (वय ३ वर्षा खालील) | मोफत | | मोफत |

**हत्ती स्वारीसाठी अटी :**

१. हत्तीच्या फेऱ्या मनपाने ठरवून दिलेल्या रस्त्यावर होईल.
२. एका चक्करला १५ मिनिटांपेक्षा जास्त वेळ देण्यात येणार नाही.
३. हत्ती स्वारी ही जनावरांची प्रकृती व वातावरणावर अवलंबून राहील.
४. प्रत्येक जनावरास २ तासापेक्षा जास्त वेळ स्वारी करता येणार नाही.
५. प्रत्येक स्वारीस महावत व्यतिरिक्त सहा मोठे किंवा आठ लहान पेक्षा जास्त व्यक्ती बसविण्यात येणार नाहीत.
६. प्रत्येक स्वारीसाठी एक मोठे व दोन लहान स्वारी याप्रमाणे महानगरपालिकासाठी राखून ठेवण्यात आले आहे.
७. स्वारी करणाऱ्या व्यक्तीस दुखापत किंवा इजा खालील किंवा खाली पडले तर मनपा जबाबदार राहणार नाही. स्वारी स्वतःच्या जबाबदारीवर करावी लागेल.
८. हत्ती स्वारीचे पूर्ण हक्क महानगरपालिका ने राखून ठेवले आहेत.
९. हत्ती स्वारी करीता प्राणी संग्राहालयाच्या कर्मचाऱ्यांनी केलेल्या सूचना बंधनकारक राहतील.

उपरोक्त अटी व सुचविण्यात आलेले सुधारीत दरास सर्वानुमते मंजुर देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ३६५/२ :**

पशुधन विकास अधिकारी यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, महानगरपालिका औरंगाबाद अंतर्गत सिध्दार्थ उद्यान येथे एक मत्सालय आहे. नोव्हेंबर १९२६ पासून सुरु करण्यात येणार आहे. मा. आयुक्त यांचे मान्यते अन्वये या मतस्यालयात खालील दर्शविल्या प्रमाणे प्रवेश शुल्काने दर प्रस्तावित करण्यात येत आहे.

पौंढासाठी रु. ०३.००
मुलासाठी रु. २.००
(वय ३ ते १२ वर्षे)
मुले (वय ३ वर्षाखलील) मोफत

वरील प्रमाणे प्रस्ताव विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे नोव्हेंबर ९६ पासून सिध्दार्थ उद्यानात सुरु होणाऱ्या मत्स्यालयाकरीता खालील प्रमाणे प्रवेश शुल्क लावण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

| | | **प्रस्तावित** | **मंजुर** |
|---|---|---|---|
| १. | प्रौढांसाठी | ३.०० | रु. ३.०० |
| २. | मुलांसाठी<br>(वय ३ ते १२ वर्षे) | रु. २.०० ऐवजी | रु. १.०० |
| | मुले<br>(वय ३ वर्षाखालील) | मोफत | मोफत |

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ३६६/३ :**

औरंगाबाद शहराचे मंजूर विकास योजनामधील कटकट गेट ते सिडकोकउे जाणारा १०० फुट विकास योजना रस्त्याचे उत्तरेस मोहल्ला हत्तेसिंगपुरा येथील स. न. २९/१ सि. स. न. ११६०१ मधील एम. एस. आर. टी. कामगार सहाकारी गृहनिर्माण संस्था मर्यादित हत्तेसिंगपुरा औरंगाबाद हया संस्थेच्या मंजुर रेखांकनातील मुख्य रस्ता व नमूद १०० फुट विकास योजना रस्त्यास जोडण्याकरीता ९.०० मीटर रुंद रस्त्याचे काम महापालिकेकडून सुरु करण्यात आले होते. सदर जमीन (१०० फुट रुंद विकास योजना रस्ता व संस्थेचे रेखांकन यामधील जागा) खाजगी मालकीची असल्याने संबंधित जमीन मालक श्री. अब्दुल शकूर पि. अब्दुल सत्तार यांनी न्यायालयात जाऊन प्रकरणी काम थांबविले होते. सदरील संस्थेची मागणी व न्यायालयाने त्याअनुषंगाने दिलेला निर्णय या संदर्भात सदर रस्त्याचे काम करण्यासाठी बाधीत होणारे क्षेत्र संपादीत करुन संबंधितास जागेचा योग्य तो मोबदला देण्याचा प्रस्ताव आहे.

न्यायालयाने निर्णयासंबंधाने संबंधित जमिन मालकाने रस्त्याचे काम सुरु करण्याबाबत हमीफा दिले असून, त्या जमीनीचा दि. २०-०८-९६ रोजी आगाऊ ताबाही दिलेला आहे. हया रस्त्या करीता बाधीत क्षेत्र जे संपादित करावयाचे ते १६२.०० चौ. मी. आहे. त्याचे मुल्याकंन करण्यात आले असून, मुल्यांकनानुसार मोबदल्याची रक्कम रु. १,८२,२५०/- एवढी होते.

प्रस्ताव मान्यतेनंतर सदर रस्त्याखालील जमीन संबंधिताकडून नोंदणी कृत दस्तऐवजाने महापालिकेस हस्तांतरीत करावयाची असून, त्यासाठीचा खर्चही ५०% रक्कम संबंधित जमीन मालकाने द्यावयाचा आहे व उर्वरीत ५०% महानगरपालिका खर्च करणार आहे. तसेच सदर प्रकरणी न्यायप्रविष्ठ असलेले प्रकरण काढुन घेतल्यानंतर संबंधितास देय होणारी मोबदल्याची रक्कम देण्यात येईल. करीता प्रस्ताव मान्यतेस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, कटकट गेट ते सिडकोकडे जाणाऱ्या १०० फुट रुंद रस्त्याच्या उत्तरेस हत्तेसिंगपुरा येथील स. न. २९/१ सि. स. नं. ११६०१ मधील एम. एस. आर. टी. कामगार सहाकारी गृहनिर्माण संस्था म. हत्तेसिंगपुरा औरंगाबाद या संस्थेच्या

मंजुर रेखांकनातील मुख्य रस्ता उपरोक्त १०० फुट रुंद विकास योजना रस्त्यास जोडण्याकरीता ९.०० मीटर रुंद रस्त्याचे काम हाती घेण्यास्तव रस्त्यात बाधीत होणाऱ्या खाजगी जमिनीचे मालक श्री. अब्दुल शकुर पि. अब्दुल सत्तार यांनी न्यायप्रविष्ट प्रकरणी मनपाशी समझीता (क्रॉम्प्रमाईज) केल्यामुळे व रस्त्याचे काम सुरु करण्याबाबत दिलेल्या हमी पत्रा आधारे सदर जमिनीचा मोबदला (क्षेत्र १६२.०० चौ. मी.) मुल्यांकन नुसार र. रु. १,८२,२५०/- (एक लक्ष ब्याऐंशी हजार दोनशे पन्नास मात्र) जमीन मालकास अदा करण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. नोंदणीकृत दस्तऐवजाचा खर्च ५०% संबंधित जमीन घेतल्यानंतर संबंधितास देय असणारी मोबदल्याची रक्कम अदा करण्यात यावी.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ३६७/४ :**

औरंगाबाद जिल्हा मराठी पत्रकरा संघ औरंगाबाद यांनी पत्रकार भवन बांधण्याकरीता समर्थनगर भागातील हॉटेल देवप्रिया समोरील वरद गणेश मंदिरालगतची नाल्याची जमीन भाडेपट्टयावर मिळावी म्हणून मागणी केलेली आहे.

पत्रकार संघाचे व्यापक स्वरुप व प्रमुख सामाजिक उद्दीष्टे व त्या दृष्टीने नाला जमिनी लगतच्या विकासाचे नियोजन विचारात घेता सदर नाला जमीन नेहमीच्या अटीत व शर्तीस पात्र राहुन ३० वर्षात कालावधी करीता भाडेपट्टयावर देण्याचा प्रस्ताव मान्यतेसाठी सादर.

प्रस्ताव मान्यतेनंतर प्रत्यक्ष जागेवर नाला जमीन मोजणी करुन सिमांकनांनंतर उपलब्ध होणारे क्षेत्र निश्चित करण्यात येईल. व ती नाला जमीन रु. १५५/- प्रति चौरस मीटर प्रति वर्ष या भाडे दराने भाडे आकारुन नेहमीच्या अटी व शर्तीस पात्र राहुन आवश्यक तो करारनामा केल्या नंतर संबंधित संस्थेस देण्याची कार्यवाही करण्यात येईल.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, औरंगाबाद जिल्हा मराठी पत्रकार संघ औरंगाबाद यांना पत्रकार भवन बांधण्याकरीता समर्थनगर भागातील हॉटेल देवप्रिया समोरील वरद गणेश मंदिरालगतची नाल्या जमीन वार्षीक रु. १५५/- प्रति चौरस मीटर या दराने ३० वर्षाच्या कालावधीकरीता नेहमीच्या अटी व शर्तीस पात्र राहुन संबंधित संस्थेस जागा देण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ३६८/५ :**

अतिरिक्त शहर अभियंता यांनी प्रस्ताव दिला की, मिलकॉर्नर ते अंलकार हॉटेल पर्यंत पोलीस आयुक्त कार्यालयाच्या संरक्षित भिंती लगतच्या जागेत सौदंर्यीकरण करणेच्या कामासाठी. सा. बा. खात्याच्या सन १९९५-९६ च्या दरसुचीनुसार अदांपजत्रक रक्कम रु. २,२५,०००/- चे तयार करण्यात आले आहे. सदरील काम सौदंर्यीकरणाचे व विशिष्ट पध्दतीचे असल्यामुळे तसेच या ठिकाणी लवकरच पोलीस खात्याचा महाराष्ट्र पातळीवरच्या क्रिडा महोत्सव साजरा होत आहे. त्यामुळे काम तातडीने करणे आवश्यक आहे. त्यामुळे या कामासाठी लघुनिविदा काढून काम करावे अशी मा. आयुक्त यांनी शिफारस केली आहे. तसेच सदरील कामाचा खर्च भांडवली रस्ते सन १९९६-९७ या लेखा शिर्षकामध्ये उपलब्ध तरतुदीमधून करण्यात येईल.

तरी सदर कामासाठी तयार करण्यात आलेले अंदाजपत्रक रक्कम रु. २,२५,०००/- च्या अंदाजपत्रकास मंजुरी मिळणे बाबत प्रस्ताव स्थायी समितीपुढे विचारार्थ तथा मंजुरीस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्यानुसार मिलकॉर्नर ते अंलकार हॉटेल पर्यंत पोलीस आयुक्त कार्यालयाच्या संरक्षित भिंती लगतच्या जागेत सौदंर्यीकरण करणेच्या कामासाठी तयार करण्यात आलेल्या रक्कम रु. २,२५,०००/- च्या अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ३६९/६ :**

अतिरिक्त शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, नंदनवन कॉलनी ते अभिनंदन कॉलनी (पडेगांव) या रस्त्याचे डांबरीकरण करणेच्या कामासाठी सा. बा. खात्याच्या सन ९५-९६ च्या दरसुचीनुसार अंदाजपत्रक र. रु. २,१०,५५०/- चे तयार करण्यात आले आहे. सदरील कामाचा खर्च भांडवली रस्ते लेखाशिर्षकामध्ये उपलब्ध तरतुदीमधून करण्यात येईल.

तरी सदर कामासाठी तयार करण्यात आलेले र. रु. २,१०,५५०/- अंदाजपत्रक मंजुरीबाबतचा प्रस्ताव स्थायी समितीच्या विचारार्थ तथा मंजुरीस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, नंदनवन कॉलनी ते अभिनंदन कॉलनी (पडेगांव) या रस्त्याचे डांबरीकरण करणेच्या कामासाठी तयार करण्यात आलेल्या र. रु. २,१०,५५०/- च्या अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ३७०/७ :**

शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, मोहल्ला फुलेनगर स्लम भागात खडी रस्ता तयार करण्यापुर्वी नियोजीत रस्त्यामध्ये येत असलेले राहत्या घरांच्या भिंती काढून रस्ता रुंद करणे करीता पूर्ण बांधकाम करण्याचे अंदाजपत्रक तयार करण्यात आले असून, एकूण रक्कम रु. ७,५४,०००/- ला मा. आयुक्तांनी दि. १२-०३-९६ रोजी प्रशासकीय मान्यता दिली आहे.

तसेच स्थायी समितीकडे ठराव क्र. ५७८/१२ दि. १८-०३-९६ अन्वये मान्यता मिळाल्यानंतर कार्यालयीन निविदा सुचना क्र. मनपा/लेखा/नि/८०/९६ दिनांक २१-०६-९६ अन्वये मागविण्यात आली असता निविदा विक्रीच्या अंतिम तारीख ०५-०७-९६ पर्यंत एकूण ७ (सात) कोऱ्या निविदा विक्री झाल्या व दि. १६-०७-९६ रोजी फक्त दोन निविदा प्राप्त झाल्या तसेच दि. १०-०७-९६ रोजी उपस्थित गुत्तेदारासमक्ष निविदा उघडण्यात आल्या असता तुलनात्मकदृष्टया खालील प्रमाणे दोन निविदा प्राप्त झाल्या.

| | | |
|---|---|---|
| १. | श्री.ए. एम. फारुखी | अंदाजपत्रकीय दराने |
| २. | श्री. एम. एस. बसरा कन्स्ट्रक्शन | अ. प. दरापेक्षा ५% जास्त |

वरील दोन्ही निविदा पैकी, मे. बसरा कन्स्ट्रक्शन यांनी एक टक्का अनामत रक्कम निविदासोबत भरलेली नाही. तसेच श्री ए. एम. फारुकी यांना मा. आयुक्त साहेबांनी

वाटाघाटीसाठी सदरील कामाबाबत बोलाविल असता संबंधित गुत्तेदाराने अं. प. दरापेक्षा ३% कमी दराने काम करण्यास दि. १८-१०-९६ रोजी संमती दिली आहे. करीता श्री. ए. एम. फारुकी यांची निविदा अ. प. दरापेक्षा ३% कमी दराची निविदा विचारार्थ व मंजुरीस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, मो. फुलेनगर स्लम भागात खडी रस्ते तयार करण्यापुर्वी रस्त्या मध्ये येत असलेले राहत्या घरांच्या भिंती काढून रस्ता रुंद करणेच्या कामाकरीता प्राप्त निविदापैकी श्री. ए. एम. फारुकी यांची वाटाघाटी अंती संमती दिल्यानुसार अंदाजपत्रकीय दरापेक्षा ३% कमी दराने सदरील काम करुन घेण्यात यावे.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ३७१/८ :**

मालमत्ता अधिकारी यांनी मा. आयुक्त यांच्या मंजुरीनुसार प्रस्ताव सादर करण्यासत येत आहे की, श्री. यशवंत केशवराव ओक यांना मा. जिल्हाधिकारी औरंगाबाद यांचे पत्र क्र. ९६/झुमाचे/पुरवठ/९६-९७ अन्वये महानगरपालिका कार्यालय येथे झुणका भाकर केंद्र चालविण्यासाठी मनपा परिसरातील पुर्वेकडील इमारती खालील कॅन्टीनचे बाजुला डावीकडील भागत (उत्तरेस) ८ x १५ या आकाराची जागा देण्याबाबत स्थायी समिती ठराव क्र. २९१/१७ दि. २१-०९-९६ रोजी पारीत झाल होता.

तथापी झुणका भाकर केंद्र धारकांनी सदरील जागा झुणका भाकर केंद्रासाठी योग्य नसल्याने बदलून मिळणे बाबत मा. सभापती स्थायी समिती यांच्याकडे अर्ज देऊन जागा मुख्य प्रवेश दाराच्या पश्चिमेकडील संरक्षित भिंतीच्या लगत देण्याची विनंती केल्यानुसार अर्जाप्रमाणे नगररचना विभागाचे अभिप्रायानुसार मुख्य कार्यालयात सुरक्षा विभाग कार्यालयाचे पश्चिमेकडील कुंपण भिंतीचे लगत खुल्या जागेत ८ x १५ या आकाराची जागा ज्याची चतु:सिमा

| | | |
|---|---|---|
| पुर्वेस | : | सुरक्षा विभाग कार्यालय |
| पश्चिमेस | : | मनपा कार्यालय कुंपण भिंत |
| दक्षिणेस | : | स. नगरसेवक वाहन पार्कींग जागा |
| उत्तरेस | : | कुंपनभिंत |

जागा बदलून देणे बाबत ८ x १५ या आकाराची जागा झुणका भाकर केंद्र चालविण्यासाठी खालील अटीवर विनामुल्य देण्यास हरकत नाही.

१) प्रशासकीय कामात अडथळा होणार नाही.

२) अस्वच्छता होणार नाही.

तरी कार्यालयीन टीप्पणी नुसार जागा देण्याबाबत पुन्हा विचारार्थ स्थायी समितीमध्ये मान्यतेस्तव सादर.

**संवाद :**

**श्री. रशिद खान (मामू) , श्री. हमीद ताबा :** मनपा येथे कॅन्टील आहे ते चांगल्या स्थितीत व स्वच्छ राहावे यासाठी त्यांना योग्य ठिकाणी जागा द्यावी.

**मा. सभापती :** याबाबत मालमत्ता अधिकारी यांनी योग्य ती कार्यवाही करावी व दोन्हीही कॅन्टीनमुळे प्रशासनास कुठलीही बाधा होणार नाही याची दखल घ्यावी.

**श्री रशिद मामू** : मुख्य इमारतीच्या खाली वाहने उभे करतात त्या ठिकाणी मनपाच्या दोन्हीही कॅन्टीन समझोत करुन देण्यात याव्या.

**मा.सभापती** : याबाबत स. स. श्री. रशिद मामू मा. आयुक्त व मालमत्ता अधिकारीयांनी पाहणी करुन कार्यवाही करावी.

**मा. सभापती** : हा प्रस्ताव मंजुर करण्यात येतो.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, श्री. यशवंत केशवराव ओक यांना झुणका भाकर केंद्राकरीता महानगरपालिका परिसरात नगर रचना विभागाच्या अभिप्रायानुसार मुख्य कार्यालयात सुरक्षा विभाग कार्यालयाचे पश्चिमेकडील कुंपण भिंतीचे लगत खुल्याजागेत ८ x १५ या आकाराची जागा (पुर्वी झालेल्या ठरवातीत जागा बदलून) खालील चतु: सिमेच्या आतील जागा देण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

पुर्वेस : सुरक्षा विभाग कार्यालय
पश्चिमेस : मनपा कार्यालय कुंपण भिंत
दक्षिणेस : स. नगरसेवक वाहन पार्कींग जागा
उत्तरेस : कुंपनभिंत

या चतु:सिमेतील जागा खालील अटींवर देण्यास सर्वानुमते मंजुरी दिली जाते.

१) प्रशासकीय कामात अडथळा होणार नाही.

२) अस्वच्छता होणार नाही.

याद्वारे यापुर्वी जागा देण्याबाबत या ठराव क्र. २९१/९७ दि. २९-०९-९६ रद्द करण्यात येतो. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ३७२/९ :**

अतिरिक्त शहर अभियंता यांनी प्रस्ताव दिला की, भडकलगेट येथे डॉ. बाबासाहेब आंबेडकर पुतळया रु. ९,८५,०००/- चे अंदाजपत्रक तयार करण्यात आले आहे. सदरील खर्च सन १९९६-९७ या वर्षाकरीता " नविन पोल खरेदी " या शिर्षकाखाली उपलब्ध असलेल्या र. रु. ६५.०० लाखाच्या तरतुदीमधून करण्यात येईल.

यापुर्वी स्थायी समिती विषय क्र. २१२/२ दि. ३०-०८-९६ अन्वये अशाच प्रकारचा हायमास्ट लाईट क्रांतीचौक येथे बसविण्याचे काम मे. रॉयल इलेक्ट्रीकल्स पुर्ण यांच्याकडून अंदाजपत्रकीय दरापेक्षा १.३० टक्के कमी या दराने करुन घेण्यास मान्यता प्राप्त झाली आहे. त्याच धर्तीवर त्यांच्याकडून वरील मान्य दरानुसार म्हणजे अ. प. दरापेक्षा १.३० टक्के कमी या दराने करुन घेण्याचे मंजुरीस्तव तसेच अंदाजपत्रकीय रक्कम रु. ९,८५,०००/- चे अंदाजपत्रकास मंजुरीस्तव व विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, भडकलगेट येथे डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतहयाजवळ हायमस्ट लाईट बसविण्याच्या कामासाठी तयार करण्यात आलेल्या र.रु. ९,८५,०००/- च्या अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

तसेच सदर काम मे. रॉयल इलेक्ट्रीकल्स पुर्ण यांच्याकडून पुर्वीच्याच दराने म्हणजे अंदाजपत्रकीय दरापेक्षा १.३० टक्के कमी या दराने करुन घेण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

या बरोबरच " जन गण मन " या राष्ट्रगिताने सभा संपल्याचे मा. सभापती यांनी सांगितले.

| | |
|---|---|
| स्वाक्षरित/- | स्वाक्षरित/- |
| नगरसचिव, | स्थायी सभापती, |
| महानगरपालिका, औरंगाबाद. | महानगरपालिका, औरंगाबाद. |

# *औरंगाबाद महानगरपालिका औरंगाबाद*

**दिनांक ०८-११-९६ रोजी संपन्न झालेल्या स्थायी समितीचे इतिवृत्त. दिनांक ०८-११-९६ रोजी मा. सभापती स्थायी समिती श्री. गिरजाराम हाळनोर यांचे अध्यक्षतेखाली दुपारी ३.०० वाजता स्थायी समिती सभा आयोजित करण्यात आली होती. सदर सभेत निम्ननिर्दिष्ट स्थायी समिती सभासद उपस्थित होते. सभेस मा. उप. आयुक्त व महापालिकेचे इतर अधिकारीही उपस्थित होते.**

| | | |
|---|---|---|
| १) | स. स. श्री. गौतम खरात | स. सदस्य |
| २) | स. स. श्री. कंवरसिंग बैनाडे | -//- |
| ३) | स. स. सौ. रजनी जोशी | -//- |
| ४) | स. स. कु. माया लाडवाणी | -//- |
| ५) | स. स. श्री. विजयकुमार मेहेर | -//- |
| ६) | स. स. श्री. महादेव सुर्यवंशी | -//- |
| ७) | स. स. श्री. हमीदउद्दीन ताबा | -//- |
| ८) | स. स. श्री. भगवान घडामोडे | -//- |
| ९) | स. स. श्री. सुभाष टाकळकर | -//- |
| १०) | स. स. श्री. अभिमन्यु भालेराव | -//- |
| ११) | स. स. श्री. कचरु नवपुते | -//- |
| १२) | स. स. श्री. अ. रशिद खान (मामू) | -//- |

सभेची सुरुवात " वंदे मातरम् " या गिताने झाली. सभेत प्रथम मा. सभापती यांनी सर्वांना दिपावली व नविन वर्षाच्या शुभेच्छा प्रदान केल्या.

**संवाद :**

**श्री. गौतम खरात :** मागील १५ दिवसापासून प्रशासनाने अतिक्रमणे हटविण्याची मोहीम हाती घेतलेली आहे. काही टपऱ्या हटविल्युाळे झालेली आहेत. प्रशासनाची भूमिका योग्य असली तरी लोक प्रतिनिधी या नात्याने कोणत्या टपऱ्या हटवाव्यात. कोणत्या हटवू नयेत याबाबत आपण प्रशासनास काही सूचना दयाव्यात. शहरातील काही मोठया अधिकृत इमारती मात्र पाडल्या जात नाहीत. हे बरोबर नाही. दोन-तीन मजली अधिकृत बांधकामे झालेल्या इमारतीही यादी प्रशासनाकडे आहे. तेव्हा अशा इमारती प्रथम पाडण्यास याव्यात.

**मा. सभापती** : मागील बैठकीत टपऱ्या देण्याबाबत रुंलीग देण्यात आलेली आहे. उप आयुक्त-२ यांनी पोलीस खात्यास पत्र दिले आहे काय

**उप आयुक्त-२** : या संदर्भाने पोलीस खात्यास पत्र देण्यात आलेले आहे.

**मा. सभापती** : मी मा. महापौरा समवेत याबाबत बैठक चालविली होती, परंतु काही कारणामुळे मा. महापौर बाहेरगांवी गेलेले बसल्यामुळे बैठक होऊ शकली नाही. ज्यांच्या टपऱ्या होत्या त्यांना टपऱ्या देण्यात येतील. अनाधिकृकत बांधकामे प्रथम काढण्यात यावीत. यानंतर अनाधिकृत वसाहतीबाबत कार्यवाही करण्यात यावी व वेळोवेळी अहवाल सभेसमोर ठेवण्यात यावा.

**श्री. गौतम खरात :** काही प्रकरणात कोर्टाने सुनावणी अंती बांधकाम पाडण्याचे आदेश दिलेले आहेत. परंतु अशा इमारतीही पाडल्या जात नाहीत. याचा खुलासा व्हावा.

**मा. सभापती** : उप आयुक्तांनी अशी प्रकरणात स्वत: लक्ष घालावे व पुढील बैठकीत माहिती दयावी. कोर्टाने सुनावणी अंती निर्णय दिलेल्या इमारती पाडण्यात याव्यात.

**श्री. हमीदउद्दीन ताबा :** गतवर्षी नोव्हेंबर मधील जकात वसुली पाहता या वर्षाची नोव्हेंबर महिन्यातील जकात कर वसुली ही फारच कमी आहे.

**मा. सभापती** : गत वर्षी दिवाळीच्या दिवसात वसुल झालेल्या जकात करापेक्षा या वर्षी वसूल झालेला जकात कर कमी आहे असे मी म्हटले होते.

**जकात अधिक्षक :** यावर्षी कळल्यावरती रु. २.४४ लाख एवढी जकात वसुल करण्यात आलेली आहे. मागील वर्षी रु. २.८९ लाख एवढी जकात वसुली झाली होती.

**श्री. अ. रशिद खान (मामू) :** मग जकात वसुली कमी का होते तेथे काही लोकांची लाईन मिळालेली आहे. जकात विभागातील कर्मचाऱ्यांच्या बदल्या करण्यात याव्यात.

**मा. सभापती** : तीन वर्षापेक्षा जास्त कालावधी झाले त्या जकात विभागातील कर्मचाऱ्यांच्या बदल्या करण्यात याव्यात.

**श्री. अ. रशिद खान (मामू) :** जकात वसुलीची दैनंदीन वसूली तक्ता देण्यात यावा जेणेकरुन वसूलीची माहिती सविस्तरपणे करुन येईल. जकात विभागात मनमानी चालू आहे.

**मा. सभापती** : असे आपण म्हणून शकत नाही. दिपावलीत शहरात जास्त माल येतो यामुळ उत्पन्नात वाढ व्हावयास पाहिजे. अशी माझी धारणा आहे.

**श्री. अ. रशिद खान (मामू) :** महापालिका हद्दीत येणाऱ्या इलेक्ट्रॉनिक पार्टस व इतर पार्टस यावर वेगवेगळी जकात आकारावयास हवी.

**उप आयुक्त-१ :** मागील बैठकीत मेल्ट्रॉन कंपनीच्या मालावरील जकात वसुलीचा प्रश्न विचारण्यात आला होता. गतवर्षी तत्कालीन आयुक्तांच्या काळात सर्वच प्रकारच्या मालावर ४% जकात आकारली जात असे, असे मेल्ट्रॉन व्यवस्थापनाचे म्हणणे होते. यात फरक करावयास हवा. इलेक्ट्रॉनिक पार्टस वरती ४% जकात दर इतर पार्टसवरती २% जकात घ्यावी असे त्यांचे म्हणणे होते. यात सुधारणा करण्याचे प्रयत्न चालू आहेत. मेल्ट्रॉन ही शासन अंगिकृत संस्था आहे. जकात कमी आकारली गेली असेल तर, या कंपनी कडून आपण केव्हाही फरकाची रक्कम वसुल करु शकतो.

**श्री. अ. रशिद खान (मामू) :** जकात वसुलीत फरक करत असतांना कोणाची परवानगी घेतली होती मेल्ट्रॉन इलेक्ट्रॉनिक्स पार्टसवरती २% जकात भरत असतांना महापालिकेस फोन पुरवतांना त्यांनी ४% जकात कशी आकारली.

**जकात अधिक्षक :** माल आल्यानंतर त्यांचे पोल पाहून एकत्रित जकात आकारली जाते व त्यानंतर प्रत्येक महिन्यांचे वेगवेगळया आयटेमवर जकात आकरली जाते.

**श्री. अ. रशिद खान (मामू) :** गरवारे कंपनी कडून वसूल झालेल्या जकात बाबत माहिती देण्यात यावी.

**उप आयुक्त-१ :** गरवारे कंपनी आयात केलेली मशिनरी ही इलेक्ट्रॉनिक आहे काय याची माहिती ऑडीट विभागाने मागितली आहे. याची तपासणी करण्यात येत आहे. सध्या सेंट्रल नाक्यावरती अनलोड डिलीव्हरी घेण्यात येत आहे.

**मा. सभापती :** जकात वसुली संदर्भाने आम्ही कोणताही ब्लेम करत नाही. जकात वसूली वाढावी यासाठी प्रशासनाने आवश्यक ते सर्व प्रयत्न करावयास पाहिजे. एवढेच आमचे म्हणणे आहे. जकात नाक्यावरती वायरलेस सेट बसविण्याबाबत पुर्वीच मंजुरी देण्यात आलेली आहे. वायरलेस सेट तातडीने बसविण्यात यावेत.

**कार्यकारी अभियंता :** येत्या सर्वसाधारण सभेत या संदर्भाने प्रस्ताव ठेवण्यात येत आहे.

**मा. सभापती :** कचऱ्यावरती प्रक्रिया करुन खत निमिर्ती करावी या संदर्भाने स्थायी समितीने पाहणी करुन अहवाल दिलेली आहे. त्यावर अद्याप कार्यवाही झालेली नाही.

**आरोग्य वैद्यकीय अधिकारी :** या संदर्भाने संबंधित कंपनी कडून माहिती मागविण्यात आलेली आहे. माहिती प्राप्त होताच प्रकरणात कार्यवाही करण्यात येईल.

**मा. सभापती :** शहराच्या दृष्टीकोनातून हा महत्वाचा प्रकल्प आहे. यात लवकर कार्यवाही करण्यात यावी.

**डॉ. विजयकुमार मेहेर :** सेंट्रल नाक्यावरती वजन काटा बसविण्यात यावा यासाठी मी बऱ्याच दिवसांपासून पाठपुरवा करत आहे. कार बसविण्यात आलेला असला तरी अद्याप तो का चालू करण्यात आलेला नाही यामुळे महापालिकेचाच फायदा होणार आहे.

**उप आयुक्त-१ :** यासाठी काटा चालू करण्यापूर्वी वेट अँड मेजरमेंट डिपार्टमेंटचे सर्टीफिकेट घ्यावे लागते. हे सर्टीफिकेट मिळविण्यात येत आहे.

**डॉ. विजयकुमार मेहेर :** तरुण उद्योजक संघटने मार्फत जकाती संदर्भाने आर फॉर्म सवलत चालू करण्याची मागणी सातत्याने होत आहे. पूर्वी ही तरतूद होती. ती परत चालू करण्यात यावी. औरंगाबादमध्ये बऱ्याचशा लहान कारखान्यात प्रक्रियेसाठी माल येतो व प्रक्रिया होऊन परत जातो. ज्यावर जकात आकारली जाते. यामूळे बरेच उद्योगधंदे ठप्प होत आहेत.

**जकात अधिक्षक :** महापालिकेच्या नियमात आर फॉर्मची तरतुद नाही. आयातीत माल प्रक्रिया होऊन परत जरा अपीअरन्समध्ये काही बदल होत असेल तर अशा मालावर जकता आकारली जाते. आर फॉर्म सुरु करावयाचा झाल्यास प्रथम नियमात दुरुस्ती करावी लागेल.

**मा. सभापती :** या संदर्भाने सर्वसाधारण सभेत ठराव ठेवण्यात यावा.

**डॉ. विजयकुमार मेहेर :** शहरात ४३ ग्रेड व ५३ ग्रेड सिमेंट येते. या दोन प्रकारच्या सिमेंटच्या भावातही फरक आहे. मात्र दोन्ही प्रकारच्या सिमेंटवर एकाच दराने जकात आकारली जाते.

**उप आयुक्त-१ :** मध्यंतरीच्या काळात सिमेंट दर निम्म्याने कमी जास्त होत होते. यामुळे ॲव्हरेजचे रेटवर जकात आकारली जाते.

**डॉ. विजयकुमार मेहेर :** सेल्स टॅक्स भरलेल्या देयकाप्रमाणे जकात आकारली जावी.

**मा. सभापती :** जर पक्की पावती असेल, सेल्स टॅक्स भरलेला असेल तर, ती गृहीत धरुन जकात अकारावयास पाहिजे. आर फॉर्मची सवलत फक्त मुंबई महानगरपालिकेचे आहे. असे स्थायी समिती सभासद अभ्यास दोऱ्या दरम्यान दिसून आले. इतर महापालिका मधून ही सवलत नाही.

**श्री. कचरु नवपुते :** शहरात होणाऱ्या पाणी पुरवठयात वारंवार व्यत्यत येतो. नेहमीच पाईपलाईन कशी फुटते. या दुरुस्तीवर किती खर्च झालेला आहे.

**श्री. हमीदउद्दीन ताबा :** या संदर्भाने आढावा घेण्यास आलेला असून, तो शासनाकडे पाठवावा असे ठरले होते. त्याचे काय झाले.

**कार्यकारी अभियंता :** नक्षत्रवाडी जवळ प्रथमच पाईपलाईन फुटलेली आहे.

**डॉ. विजयकुमार मेहेर :** दिपावलीच्या दिवसात शहरवासीयांना पाणी कमी पडणार नाही. यासाठी आवश्यक ती उपाययोजना करण्यात यावी.

**मा. सभापती** : ही लाईन महापालिकेच्या ताब्यात नाही. परिसर अभियांत्रिकीच्या ताब्यातील लाईन फुटलेली होती. दिपावलीच्या दिवसात पाणी कमी पडणार नाही. यासाठी आवश्यक ते उपाय योजण्यात यावेत.

**कार्यकारी अभियंता :** दिपावलीच्या दिवसात पाणी पुरवठा व्यवस्थित व्हावा यासाठी नियंत्रण कक्ष स्थापण्यात आलेला आहे. गरज भासल्यास टँकरनेही पाणी पुरवठा करता येईल. पाणी पुरवठा नियंत्रण कक्षा संदर्भाने वृत्तपत्रातही बातम्या देण्यात आलेल्या आहेत.

**श्री. विजयकुमार मेहेर :** ही पाईपलाईन महापालिकेने हस्तांतरीत करुन घ्यावी असा पूर्वीच प्रस्ताव झालेला आहे. या प्रस्तावावर काय कार्यवाही झाली.

**मा. आयुक्त** : पाणी पुरवठयाचा प्रश्न हा महत्वाचा हा जिळवाळयाचा प्रश्न आहे. ही लाईन महापालिकेने ताब्यात घ्यावी अशी परिसर अभियांत्रिकी विभागाची अपेक्षा आहे. ही लाईन वारंवार फुटते ती दुरुस्त करुन घेणे आवश्यक आहे. महानगरपालिकेने केवळ लायबीलीटीज घ्यावयाच्या का? फुटलेल्या लाईनचे काम युध्दपातळीवर करुन घेण्यात आलेला आहे. आवश्यकता पडल्यास टँकरनेही पाणी पुरवठा केला जाईल.

**श्री. अ. रशिद खान (मामू) :** पाणी पुरवठा मुख्य वाहिनी फुटल्यावर बारा तासा पर्यंत परिसर अभियांत्रिकी विभागाचे कोणीही स्थळावर आले नव्हते. मा. आयुक्तांनी धमकी दिल्यानंतर परिसर अभियांत्रिकी विभागाने कामास सुरुवात केली. याबाबत मा. आयुक्तांचे आभारच मानावयास पाहिजेत.

**सौ. रजनी जोशी :** वृत्तपत्रात ज्या तारखेस पाणी पुरवठा होणार नाही म्हणून बातमी देतात त्या तारखेस पाणी पुरवठा होतो. मात्र दुसऱ्या दिवशी पाणी पुरवठा होत नाही. नेमका कोणत्या तारखेस पाणी पुरवठा होणार नाही याची वृत्तपत्रातून माहिती देण्यात यावी.

**मा. सभापती** : हर्सुल तलावातूनही पाणी पुरवठा करण्यात येतो. त्यामुळे वृत्तपत्रात बातमी आली तरी एखादे वेळी पाणी पुरवठा होता.

**श्री. महादेव सुर्यवंशी :** एन-५ टाकीच्या बाजूची जागा महापालिकेने सिडकोकडून मागितली होती. ही जागा देता येत नाही. असे उत्तर सिडकोने दिलेले होते. ही जागा महापालिकेस मिळाली नाही तर पुढे पाणी साठवण्यासाठी जागा मिळणार नाही. यासाठी एन-५ पाणी टाकीच्या बाजूची जागा उपलब्ध करुन घेण्यात यावी. सिडकोने एन-७ ची जागा उपलबध करुन देण्याची तयारी दर्शविली आहे. परंतु ही जागा सोयीस्कर नाही. नारेगांव येथे टाकण्यात आलेली नविन लाईन चालू करण्यात यावी.

**डॉ. वियजकुमार मेहेर :** चिकलठाणा परिसरात टाकी बांधण्यात आलेली आहे ती केव्हा सुरु करणार.

**श्री. कचरु नवपुते :** ही टीकी सुरु झालेली आहे.

**कार्यकारी अभियंता :** एन-५ टाकीच्या बाजूची जागा सिडको प्रशासन विकत आहे.

**मा. सभापती :** सिडको हस्तांतरणा बाबत सध्या बैठका चालू आहेत. अशा बैठकांमध्ये या संदर्भाने प्राधान्याने विचार करण्यात यावा. सिडकोचा भाग उंच सखल आहे. त्यामुळे या भागात दोन तीन ठिकाणी पाणी साठविण्याची व्यवस्था करणे जरुरीचे आहे.

**श्री. महादेव सुर्यवंशी :** सिडको भागातील लोकसंख्याही वाढेल. याचा विचार करता एन-५ टाकीच्या बाजूची जागा उपलब्ध करुन घेण्यात यावी.

**श्री. अ. रशिद खान (मामू) :** डॉ. बाबासाहेब आंबेडकर रोडवरती अलंकार हॉटेलच्या बाजूच्या गोदामात पाणी येते. पाईप लाईन फुटल्याने वगैरे पाणी येते काय याची तपासणी करावयास हवी.

**मा. सभापती :** कार्यकारी अभियंता यांनी याबाबीची दखल घ्यावी.

**श्री. अब्दुल रशिदखान (मामू) :** साधारणतः तीन तीन वर्षांनी अधिकारी/कर्मचाऱ्यांच्या बदल्या करण्यात येतो. श्री. रामटेके व कलिम अख्तर हे दोन्ही उप अभियंता पाणी पुरवठा विभागात बऱ्याच वर्षापासून कार्यरत आहेत. त्यांचे कामही समाधानकारक आहे. तेव्हा दोन्ही उप अभियंत्यांना एक जादा वेतनवाढ देण्यात यावी.

**मा. सभापती :** याबाबत दोन्ही उप अभियंत्याचे काम पाहता. मा. आयुक्तांनी याबाबत जादा वेतनवाढ देण्या बाबत कार्यवाही करावी.

**मा. आयुक्त :** प्रशासकीय स्तरावर प्रकरणाची तपासणी करुन निर्णय घेण्यात येईल. पाणी पुरवठा उप अभियंता नेहमीच सहाकार्यांची भावना ठेवतात. त्यांच्या कामाचा गौरव व्हावायास हवा.

**श्री. हमीदउद्यीन ताबा :** महापालिका ऑफिसर्स असोसिएशनने धमकी दिली आहे की, अधिकारी कार्यालयीन वेळेनंतर ५-४५ नंतर कार्यालयात थांबणार नाही. हे बरोबर नाही. यामुळे कामे प्रलंबित राहतील.

**मा. सभापती :** असोसिएशनने पदाधिकाऱ्यांना विनंती केली आहे की, अधिकारी ३ नंतर कार्यालयात उपस्थित नसतात असे नेहमी म्हटले जाते. मात्र दुपारी नंतर अनेक वेळा बैठका आयोजिल्या जातात. त्यामुळे ते कार्यालयात उपलब्ध होऊ शकत नाहीत. म्हणून विनाकारण गैर समज वाढतात. त्यामुळे त्यांना व्हीजिटींग अवर्समध्ये बैठकीसाठी बोलावू नये.

**श्री. हमीदउद्यीन ताबा :** कोणतीही बैठक दुपारी ३ नंतर बोलाविण्यात येऊ नये यामुळे त्यांच्या कार्यालयाच उपस्थित राहिले तर नागरिकांची कामेही वेळेवर होतील.

**डॉ. विजयकुमार मेहेर :** यास आमची सहमती आहे.

**श्री. हमीदउद्यीन ताबा :** महापालिकेतर्फे किती अधिकाऱ्यांना कार खरेदीसाठी कर्ज देण्यात आलेले आहे.

**मा. सभापती :** सहा अधिकाऱ्यांना कार खरेदी करण्यासाठी कर्ज देण्यात आलेले आहे.

**डॉ. विजयकुमार मेहेर :** काही जेष्ठ अधिकाऱ्यांनिही कार घेण्यासाठी कर्जाची मागणी केलेली आहे. त्यानांही कर्ज देण्याबाबत विचार व्हावा.

**श्री. अब्दुल रशीद खान (मामू) :** बजेट रिव्हयु करतांना या संदर्भाने प्रोव्हीजन करण्यात यावी.

**मा. सभापती :** दुचाकी वाहने देण्या सदंर्भाने आदेश देण्यात आलेले होते त्यावर काय कार्यावही झाली.

**लेखाधिकारी** : यासंदर्भाने क्षेत्रिय को करणारे कर्मचारी प्रशासकीय कामे करणारे, कर्मचारी यांची यादी सिनियॉरिटी बनविण्यात येत आहे. लवकरच बैठक घेण्यात येईल.

**श्री. महादेव सुर्यवंशी** : चार चाकी वाहनांसाठी जो व्याजाचा दर ठेवण्यात आलेला आहे तोच व्याजाचा दर दोन चाकी वाहनासाठी ठेवण्यात यावा.

**लेखाधिकारी - १** : चार चाकी गाडयांसाठी व्याजाचा दर ६% सर्वसाधारण सभेने ठरवून दिला होता. शासनाने मंजुर केलेले दर आपण प्रमाण समजतो.

**मा. सभापती** : ६ अधिकाऱ्यांना गाडया देण्याबाबत प्रस्ताव तयार करण्यात यावा. पैकी तीन तांत्रिक व तीन प्रशासकीय भागातील अधिकाऱ्यांना गाडयात देण्यात याव्यात. यासाठी बजेट मध्ये आवश्यक ती प्रोव्हीजन करण्यात यावी.

**लेखाधिकारी - १** : प्रकरण सर्वसाधारण सभेपुढे ठेवण्यात यावे.

**श्री. अ. रशिद खान (मामू)** : लाईनचे चेंबर फुटलेले आहे. त्यामुळे सिव्हर लाईनचे काम चांगल्या प्रकारे झालेले नाही. असे दिसून येते.

**मा. सभापती** : अशा प्रकारच्या मोठया कामांमध्ये कार्यकारी अभियंता यांनी विशेष दक्ष राहावयास हवे. ड्रेनेज लाईफ ठरवावयास हवे.

**श्री. महादेव सुर्यवंशी** : नाल्यातील चेंबर्स हे उंच नाहीत. त्यामुळे गुराखी मुले ही चेंबर्स फोडतात.

**कार्यकारी अभियंता** : बसक्या चेंबर मधून पुराचे पाणी जाऊन ते चोकअप होतात. यासाठी चेंबर्स उंच बांधले जातात.

**श्री. अ. रशिद खान (मामू)** : महापालिकेमध्ये एकूण संपर्गनिहाय अधिकारी / कर्मचारी किती आहेत, त्यांच्या पगार व भत्यांवरती किती खर्च होतो, बोनसवरती किती खर्च झाल, महापालिकेचे एकूण बजेट किती, महापालिकेतील एकूण वाहने किती, पेट्रोल डिझेलवरती झालेला खर्च किती, गणवेषसाठी कपडा किती खरेदी करण्यात आला याची माहिती देण्यात यावी.

**श्री. हमीदउद्दीन ताबा** : नेहरु रोजगार योजने अंतर्गत द्यावयाच्या कर्जाचे फॉर्म्स तीन-तीन महिने पावती बँकेकडे का पाठविले जात नाहीत. स्थापन करण्यात आलेली कमीटी कॅन्सल करुन पुर्वीची पध्दत अवलंबावी.

**सौ. रजनी जोशी** : बालवाडी शिक्षकांना रु. ५००/- मानधन देण्यात येते. त्यांना बोनस देण्याबाबत विचार करण्यात यावा.

**मा. सभापती** : नियमानुसार ज्यांना ज्यांना बोनस देणे शक्य आहे. त्या सर्वांना बोनस देण्यात येईल.

**श्री. महादेव सुर्यवंशी** : वाघुले नंदु केरुबा यांची आई मृत्यु पावल्या नंतरही त्यांना अनुकंपा धर्तीवर नोकरीत का घेतले जात नाही. त्यांच्या आईचे निधन झाले तेव्हा ते अज्ञन होते. त्यांना महापालिकेत अनुकंपा धर्तीवर नोकरी देण्यात यावी.

**मा. सभापती** : प्रशासनाने यात सहानुभूतीपुर्वक विचार करुन कार्यवाही करावी.

**विषय क्र. १ :**

दिनांक २५-१०-९५ रोजी संपन्न झालेल्या स्थायी समिती मध्ये इतिवृत्त कायम करणे.

**श्री. अ. रशिद खान (मामू)** : इतिवृत्ताचे पृष्ठ क्र. ९ बोगस शाळा बाबतचा अहवाल शासनाकडे पाठविला आहे काय?

**मा. आयुक्त** : शासनाकडे पत्र पाठविण्यात आलेले आहे.

**श्री. सुभाष टाकळकर :** इतिवृत्ताचे पृष्ठ क्र. १४ वरती " पृष्ठ क्र. ४४ हे सर्वसाधारण सभेतील पॉलीसी मॅटर असल्याने ते करणे आवश्यक आहे. " या वाक्याचा अर्थबोध होत नाही. ते इतिवृत्तातून वगळण्यात यावे.

**मा. सभापती** : चुकीची नोंद इतिवृत्तातून वगळण्यात यावी.

**श्री. महादेव सुर्यवंशी :** मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ६९(१) बाबत विधी सल्ला गारांनी सविस्तर निवेदन करावे.

**विधी सल्लागार :** कामगाजाच्या दृष्टीकोनातून मा. आयुक्त त्यांचे अधिकारी इतर अधिकाऱ्यांना प्रदान करु शकतात. तशी कायदयात तरतुद आहे. जे अधिकार स्थायी समितीच्या मंजुरीने प्रदान करावयाचे असतात ते अधिकारी स्थायी समितीच्या मंजुरीनेच प्रदान करण्यात येतात.

**मा. आयुक्त** : प्रशासन चालविण्यासाठी जे जे करणे आवश्यक आहे. त्या गोष्टी कायदयाच्या चौकटीत करण्याचा चौकटीत करण्याचा अधिकारी आयुक्तांना आहे.

**श्री. हमीद उद्दीन ताबा, श्री. महादेव सुर्यवंशी :** तांत्रिक कक्ष स्थापण्या बाबत कोणाचा आक्षेप नाही. मात्र कार्यकारी अभियंता हेही वर्ग-१, अधिकारी आहेत. त्यांनी एखादया कामा संदर्भाने बनविलेल अंदाजपत्रक की-२ च्या अधिकाऱ्यांनी परत तपासणी संयुक्तिक वाटत नाही.

**मा. आयुक्त** : प्रशासकीय कार्ये पार पाडण्यासाठी मला जी मदत माहिती आवश्यक असलेली कशा प्रकारे मिळावी हा आयुक्तांचा अधिकार आहे.

**मा. सभापती** : दैनंदिन कामे पार पाडत असतांना प्रत्येक बाब मा. आयुक्त स्वतः पाहू शकत नाहीत. त्यांना कामाची योग्य माहिती मिळावी यासाठी नियंत्रण कक्ष स्थापण्यात आलेला आहे. परंतु अंतिम निर्णय मा. आयुक्त घेतात. मागिल बैठकीत सांगितले होते की, बऱ्याचशा क्षेत्रिय कामे पार पाडणाऱ्या कर्मचाऱ्यांना ३००/- रुपये वाहन भत्ता दिला जातो इंधनाचे भाव अशात मोठया प्रमाणात वाढलेले आहेत. ही बाब पाहता त्यांना रु. ३००/- ऐवजी २००/- रुपये भत्ता वाढवून देण्यात यावा.

**मा. आयुक्त** : ज्यांना रु. ३००/- पेट्रोल अलांउन्स देण्यात येतो. त्यांना ०१-११९६ पासून रु. ५०० पेट्रोल अलाऊंन्स देण्यात येईल.

**ठराव :**

दिनांक २५-१०-९६ ला स्थायी समिती सभेच्या इतिवृत्तातील पृष्ठ क्र. १४ वरीत पृष्ठ क्र. ४४ हे सर्वसाधारण सभेतील पॉलीस मॅटर असल्याने ते करणे आवश्यक आहे " हे वाक्य इतिवृत्तातून वगळण्याच्या मंजुरीसह दिनांक २५-१०-९६ च्या स्थायी समिती इतिवृत्तास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ३७४/२ :**

अतिरिक्त शहर अभियंता यांनी प्रस्ताव दिला की, पैठणगेट, दलालवाडी भागात शहाबाद फरशी बसविणे व खांडकी दुरुस्त करणे या कामासाठी स. नगर सेवक श्री. अश्फाक सलामी यांच्या विनंती नुसार सदरील कामास करावयाची वाढ लक्षात घेऊन सार्वजनिक बांधकाम खात्याच्या सन १९९४-९५ च्या दर सुचीनुसार अंदाजपत्रक र. रु. १,४६,०२०/- चे तयार करण्यात आलेले असून, सदरील सुधारीत वाढीव खर्चास मा.

आयुक्त मनपा यांनी मंजुरी दिलेली आहे. सदरील काम मुळ कामाशी निगडीत असल्यामुळे कंत्राटदार श्री. मे. अलीफ असोसिएटस यांचे कडून अंदाजपत्रकीय दरापेक्षा १% कमी कमी दराने करुन घेण्यात येईल सदरील खर्च भांडवली रस्ते नविन खांडकी सन ९५-९६ या लेखा शिर्षकामध्ये उपलब्ध तरतुदी मधुन करण्यात येईल.

तरी सदरील कामासाठी तयार करण्यत आलेले सुधारीत अंदाजपत्रक र. रु. १,४६,०२०/- चा मंजुरी बाबतचा सदरील वाढीव काम पुर्वीचेच कंत्राटदार मे. आलिफ असोसिएट यांचे कडून अंदाजपत्रकीय दरापेक्षा १% कमी दराने करुन घेणे बाबतचा प्रस्ताव मा. स्थायी समितीचे विचारार्थ मंजुरीस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्यानुसार, पैठणगेट दलालवाडी भागात शहाबाद फरशी बसविणे व खांडकी दुरुस्त करणे या कामासाठी स. नगर सेवक श्री. अश्फाक सलामी यांच्या विनंती नुसार सदरील कामास करावयाची वाढ लक्षात घेऊन सार्वजनिक बांधकाम खात्याच्या सन १९९४-९५ च्या दर सुचीनुसार तयार करण्यात आलेल्या रक्कम. रु. १,४६,०२०/- च्या अंदाजपत्रकास तसेच सदरचे काम मुळ कामाशी निगडीत असल्यामुळे कंत्राटदाराच्या श्री. मे. अलिफ असोसिएट यांच्या कडून अंदाजपत्रकीय दरापेक्षा १% कमी दराने करुन घेण्यास तसेच सदरील खर्च भांडवली रस्ते नविन खांडकी सन १९९६-९७ च्या लेखा शिर्षातुन करण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ३७५/३ :**

अतिरिक्त शहर अभियंता यांनी प्रस्ताव दिला की, कै. बाबुराव काळे चौकाचे सौदंर्यीकरण करुन " भारण राणा व सिंह यांची कलात्मक फायबरग्लास माध्यमात प्रतिकृती त्यावरती बारकाव्यासह तयार करण्याचे ठरले.

त्यानुसार हे काम कलाकुसरीचे व कलात्मकरित्या करावयाचे असल्याने तातडीने दरपत्रक मागितले असता मे. भडीलगेकर आर्ट स्टुडिओ औरंगाबाद यांनी सिंह ६ फुट लांब व राजा भरत ४. १/२ उंच अशा प्रकारच्या फायबर ग्लासच्या प्रतिकृतीसाठी एकूण र. रु. १,९५,०००/- चे दरपत्रक कार्यालयात आणून दिलेले आहे.

वरील प्रमाणे मे. भडीलगेकर आर्टस स्टुडीओ औरंगाबाद यांचे कडुन हे काम करुन घ्यावयाचे आहे व त्यांचे दर र.रु. १,९५,०००/- हे जास्त वाटत असल्यामुळे त्यांना वाटाघाटीस कार्यालयात बोलाविले असता मा. आयुक्त व मुख्य लेखा परीक्षक यांचे समोर चर्चा होऊन मे. भडीलगेकर आर्ट स्टुडीओ यांनी हे काम र. रु. १,७५,०००/- मध्ये करुन देण्याचे मान्य केले आहे. तरी मे भडीलगेकर आर्ट स्टुडीओ यांचे दर पत्रक र. रु. १,७५,०००/- चे मंजुरीस्तव व हे काम त्यांचे कडुन टर्नकी बेसीसवर करुन घेण्याचा प्रस्ताव मंजुरीस्तव सादर.

तसेच या कामासाठी वाहतुक बेट विशिष्ट पध्दतीने तयार करावयाचे असून, त्यासाठी अंदाजे रक्कम रु. २,१५,७२४/- एवढा खर्च येणार आहे. हे काम उपलब्ध अनुभवी कंत्राटदार श्री. मन्नान खान यांचे कडून अंदाजपत्रकीय दराने करुन घेण्यात येईल.

सदरील कामाचा खर्च र. रु. ३,९०,७२४/- पैकी २.५० लाख एवढी तरतुद शा. अ. सन ९५-९६ (१०.०० कोटी) मध्ये असून, उर्वरीत र. रु. १,४०,७२४/- भांडवली रस्ते सन ९६-९७ या लेखा शिर्षका मधुन करण्यात येईल.

तरी या कामाचा एकूण अंदाजीत खर्च र. रु. ३,९०,७२४/- ला मंजुरी मिळणे व प्रस्तावित केल्यानुसार मे. भडीलगेकर आर्ट स्टुडीओ व श्री. मन्नान खान यांचे कडून काम करुन घेण्यास मंजुरी मिळावी.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्यानुसार, कै. बाबुराव काळे चौकाचे सौंदर्यीकरण करुन भरत राणा व सिहं यांची कलात्मक फायबर ग्लास माध्यामात कलाकुसरीचे व कलात्मक रित्या तयार करण्यासाठी मागविण्यात आलेल्या दरपत्रकान्वये व वाटाघाटी अंती मे. भडीलगेकर आर्ट स्टुडीओ औबाद यांचे कडून सदरचे काम १,७५,५००/- मध्ये टर्नकी बेसीसवर करुन घेण्यास तसेच वाहतुक बेटाचे काम रु. २,१५,७२४/- उपलब्ध कंत्राटदार श्री. मन्नानखान यांच्या कडुन अंदाजपत्रकीय दराने करुन घेण्यात सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. तसेच एकूण खर्च रु. ३,९०,७२४/- पैकी रु. २-५० लाख एवढी तरतुद शा. अ. ९५-९६ (१० कोटी) मधून व उर्वरीत रु. १,४०,७२४/- भांडवली रस्ते ९६-९७ या लेखा शिर्षकातुन करण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ३७६/४ :**

अतिरिक्त शहर अभियंता यांनी प्रस्ताव दिला की, हर्सुल येथे नंदादिप व शिवगिरी हाऊसिंग सोसायटी अंतर्गत रस्त्याचे डांबरीकरण करणे या कामासाठी सार्वजनिक बांधकाम खात्याच्या सन ९५-९६ च्या दरसुची नुसार अंदाजपत्रक र. रु. २,६६,००२/- चे तयार करण्यात आले आहे. सदरील कामाचा खर्च भांडवली रस्ते (नविन खडी रस्ते) सन ९६-९७ या लेखा शिर्षकामध्ये उपलब्ध तरतुदी मधुन करण्यात येईल.

तरी सदर कामासाठी तयार करण्यात आलेले अंदाजपत्रक रक्कम रु. २,६६,००२/- चे मंजुरी बाबतचा प्रस्ताव मा. स्थायी समितीचे विचारार्थ तथा मंजुरीस्तव व सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्यानुसार, हर्सुल येथे नंदादिप व शिवगिरी हाऊसिंग सोसायटी अंतर्गत रस्त्याचे डांबरीकरण करण्याच्या कामासाठी सा. बा. खात्याच्या सन ९५-९६ च्या दरसुची नुसार तयार करण्यात आलेले र. रु. २,६६,००२/- चे अंदाजपत्रकास तसेच सदरील खर्च भांडवली रस्ते (नविन खडी रस्ते) ९६-९७ या लेखा शिर्षातून करण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ३७७/५ :**

कार्यकारी अभियंता पाणी पुरवठा व जलनि:सारण यांनी महानगरपालिका विभाग क्र. १ वॉर्ड " ब " साठी सन ९६-९७ या आर्थिक वर्षासाठी अस्तित्वात असलेल्या जलनि:सारण वाहिनीच्या देखभल व दुरुस्ती करणे साठी परिसर अभियांत्रिकीच्या सन ९४-९५ चे दर सुची प्रमाणे अंदाजपत्रक र. रु. २,५०,००/- इतक्या रक्कमेचे सादर केलेले आहे.

सदरील काम देखभाल व दुरुस्ती ९६-९७ या आर्थिक शिर्षका मधून प्रस्तावित आहे. सदरील प्रस्तावास मा. आयुक्तांनी दि. २२-१०-९६ ला प्रशासकीय मंजुरी दिलेली आहे तरी प्रस्ताव स्थायी समितीच्या विचारार्थ व मंजुरीस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्यानुसार विभाग क्र. १ वॉर्ड " ब " साठी सन ९६-९७ या आर्थिक वर्षासाठी अस्तित्वात असलेल्या जलनि:सारण वाहिनीच्या देखभाल व दुरुस्ती करणेसाठी परिसर अभियांत्रिकीच्या सन ९४-९५ चे दर सुची नुसार तयार करण्यात आलेल्या र. रु. २,५०,००/- च्या अंदाजपत्रकास तसेच सदरचा खर्च देखभाल व दुरुस्ती ६-९७ च्या आर्थिक शिर्षका मधुन करण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. २७८/६ :**

कार्यकारी अभियंता पाणी पुरवठा व जलनि:सारण यांनी महानगरपालिका विभाग १ वॉर्ड " क " साठी सन १९९६-९७ या आर्थिक वर्षासाठी अभियांत्रिकीच्या सन ९४-९५ चे दर सुची प्रमाणे अंदाजपत्रकीय र. रु. १,५०,०००/- इतक्या रक्कमेचे सादर केलेले आहे.

सदरील प्रस्तावास मा. आयुक्तांनी दि. २२-१०-९६ च्या प्रशासकीय मंजुरी दिलेली आहे. तरी सदरील प्रस्ताव स्थायी समितीच्या विचारार्थ व मंजुरीस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्यानुसार विभाग क्र. १ वॉर्ड " क " साठी सन १९९६-९७ या आर्थिक वर्षासाठी अस्तित्वात असलेल्या सरफेस गटारींची देखभाल व दुरुस्ती करणेसाठी परिसर अभियांत्रिकीच्या ९४-९५ च्या दर सुची प्रमाणे तयार करण्यात येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ३७९/७ :**

कार्यकारी अभियंता पाणी पुरवठा व जलनि:सारण हयांनी प्रस्ताव सादर केला आहे की, महानगरपालिका झोन क्र. १ अंतर्गत प्रभाग " अ " मधील सरफेस गटारींची दुरुस्ती व देखभाल करणेसाठी परिसर अभियांत्रिकीच्या सन ९४-९५ च्या दर सुची नुसार अंदाजपत्रकीय र. रु. २,००,०००/- चे सादर केलेले आहे.

सदरील काम देखभाल व दुरुस्ती ९६-९७ या लेखा शिर्षका खाली प्रस्तावित आहे. सदरील प्रस्तावास मा. आयुक्तांनी दि. २६-१०-९६ ला प्रशासकीय मंजुरी दिलेली आहे. तरी प्रस्ताव स्थायी समितीच्या विचारार्थ मंजुरीस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्यानुसार झोन क्र. १ अंतर्गत प्रभाग " अ " मधील सरफेस गटारींची दुरुस्ती व देखभाल करणेसाठी परिसर अभियांत्रिकीच्या सन ९४-९५ च्या दर सुची नुसार तयार करण्यात आलेल्या र. रु. २,००,०००/- च्या अंदाजपत्रकास तसेच सदरचे काम ९६-९७ च्या देखभाल व दुरुस्ती या लेखा शिर्षा खाली करण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ३८०/८ :**

कार्यकारी अभियंता यांनी प्रस्तार सादर केला की, झोन क्र. ६ अंतर्गत जलनि:सारण वाहिनीची देखभाल व दुरुस्ती करणे (भाग-१) ची कामे करणेस्तव र. रु. २,१८,०००/- चे अंदाजपत्रक परिसर अभियांत्रिकी विभागाचे सन १९९४-९५ च्या दरसुची प्रमाणे तयार

करण्यात आलेले आहे. सदरील खर्च हा देखभाल व दुरुस्ती हया आर्थिक शिर्षका खाली करण्यात येईल.

तरी अंदाजपत्रक र. रु. २,१८,०००/- चा प्रस्ताव मंजुरीस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्यानुसार झोन क्र. ६ अंतर्गत जलनिःसारण वाहिनीची देखभाल व दुरुस्ती करणे (भाग-१) करण्याच्या कामासाठी परिसर अभियांत्रिकी विभागाच्या सन ९४-९५ च्या दरसुची नुसार तयार करण्यात आलेल्या रक्कम रु. २,१८,०००/- च्या अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ३८१/९ :**

कार्यकारी अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला की, झोन क्र. ४ अंतर्गत जलनिःसारण वाहिनीची देखभाल व दुरुस्तीची कामे करणेस्तव र. रु. २,१०,५००/- चे अंदाजपत्रक परिसर अभियांत्रिकी विभागाचे सन १९९४-९५ च्या दरसुची प्रमाणे तयार करण्यात आले आहे. सदरील खर्च हा देखभाल व दुरुसती हया आर्थिक शिर्षकाखाली करण्यात येईल.

तरी अंदाजपत्रक र. रु. २,१०,५००/- च्या प्रस्ताव मंजुरीस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्यानुसार, झोन क्र. ४ अंतर्गत जलनिःसारण वाहिनीची देखभाल व दुरुस्तीची कामे करण्यासाठी परिसर अभियांत्रिकीच्या सन ९४-९५ च्या दरसुची नुसार तयार करण्यात आलेल्या रु. २,१०,०००/- च्या अंदाजपत्रकास तसेच सदरचे काम देखभाल व दुरुस्ती या लेखाशिर्षकाखाली करण्यास सर्वानुमते मंजुरी देण्या येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ३८२/१० :**

कार्यकारी अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला की, झोन क्र. ६ अंतर्गत जलनिःसारण वाहिनीची दुरुस्ती व देखभाल (भाग-२) ची कामे करणेस्तव रक्कम रु. २,११,१६/- चे अंदाजपत्रक परिसर अभियांत्रिकी विभागाचे सन १९९४-९५ च्या दर सुची प्रमाणे करण्यात आले आहे. सदरील खर्च हा देखभाल व दुरुस्ती हया आर्थिक शिर्षकाखाली करण्यात येईल.

तरी अंदाजपत्रक र. रु. २,११,६१६/- चा प्रस्ताव मंजुरीस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्यानुसार, झोन क्र. ६ अंतर्गत जलनिःसारण वाहिनीची दुरुस्ती व देखभाल (भाग-२) ची कामे करणेस्तव परिसर अभियंत्रिकीच्या सन ९४-९५ च्या दर सुची प्रमाणे तयार करण्यात आलेल्या रु. २,११,६१६/- च्या अंदाजपत्रकास तसेच सदरचे कामाचा खर्च देखभाल व दुरुस्ती हया लेखा शिर्षा खाली करण्यात सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ३८३/११ :**

कार्यकारी अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला की, झोन क्र. ६ अंतर्गत अस्तित्वात असलेल्या गटारीची दुरुस्ती करणेस्तव र. रु. २,९४,५००/- चे अंदाजपत्रक परिसर अभियांत्रिकी विभागाचे सन ९४-९५ च्या दर सुचीप्रमाणे तयार करण्यात आले आहे. सदरील खर्च हा देखभाल व दुरुस्ती हया आर्थिक शिर्षकाखाली करण्यात येईल.

तरी अंदाजपत्रक र. रु. २,९४,५००/- चा प्रस्ताव मंजुरीस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्यानुसार, झोन क्र. ६ अंतर्गत अस्तित्वात असलेल्या गटारीची दुरुस्ती करणेसाठी परिसर अभियांत्रिकीच्या ९४-९५ च्या दर सुची नुसार तयार करण्यात आलेल्या र. रु. २,५४,५००/- च्या अंदाजपत्रकास तसेच सदरचा खर्च देखभाल व दुरुस्ती या आर्थिक शिर्षाखाली करण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

तसेच प्रस्तावात दर्शविण्यात आलेल्या रक्कमेत रु. २,९४,५००/- ऐवजी, २,५४,५००/- अशी दुरुस्ती करण्यात येते.

**विषय क्र. ३८४/१२ :**

कार्यकारी अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला की, झोन क्र. ६ अंतर्गत जलनिःसारण वाहिनीची दुरुस्ती देखभाल (भाग-३) ची कामे करणेस्तव रक्कम रु. २,१४,८००/- चे परिसर अभियांत्रिकी विभागचे सन १९९४-९५ च्या दर सुची प्रमाणे करण्यात आले आहे. सदरील खर्च देखभाल व दुरुस्ती हया आर्थिक शिर्षका खाली करण्यात येईल.

तरी अंदाजपत्रक र. रु. २,१४,८००/- चा प्रस्ताव मंजुरीस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्यानुसार, झोन क्र. ६ अंतर्गत जलनिःसारण वाहिनीची दुरुस्ती देखभाल (भाग-३) ची कामे करणेस्तव परिसर अभियांत्रिकीच्या सन ९४-९५ च्या दर सुची म रु. २,१४,८००/- नुसार तयार करण्यात आलेल्या रु. २,१४,८००/- च्या अंदाजपत्रकास तसेच सदरचे कामाचा खर्च देखभाल व दुरुस्ती या आर्थिक शिर्षाखाली करण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ३८५/१३ :**

कार्यकारी अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला की, विष्णु नगर येथे १५० मी. मी. व्यासाची एस. डब्ल्यु. जी. पाईप लाईन काढुन २५० मी. मी. व्यासाची आर. सी. सी. जलनिःसारण वाहिनी टाकणेबाबत अंदाजपत्रक र. रु. २,४०,०००/- चे परिसर अभियांत्रिकी विभागाचे सन १९९५-९६ च्या दर सुची प्रमाणे करण्यात आले असून, सदरील कामाचा खर्च देखभाल व दुरुस्ती हया आर्थिक शिर्षका अंतर्गत करण्यात येईल.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्यानुसार, विष्णु नगर, येथे १५० मी. मी. व्यासाची एस. डब्ल्यु. जी. पाईप लाईन काढुन २५० मी. मी. व्यासाची आर. सी. सी. जलनिःसारण वाहिनी टाकण्याच्या कामासाठी परिसर अभियांत्रिकीच्या सन ९५-९६ च्या दर सुची नुसर तयार

करण्यात आलेल्या र. रु. २,४०,०००/- च्या अंदाजपत्रकास तसेच सदरचा खर्च देखभाल व दुरुस्ती या आर्थिक शिर्षा खाली करण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ३८६/१४ :**

कार्यकारी अभियंता, महानगरपालिका औरंगाबाद यांनी प्रस्ताव सादर केला की, पाण पुरवठा-१, अंतर्गत येणाऱ्या जल वाहिन्या दुरुस्ती गळती दुरुस्तीसाठी जी की जॉईन्टची गरज आहे जी की जॉईन्ट खरेदी साठी रक्कम रु. ४,९९,११८/- एवढयाचे अंदाजपत्रक तयार करण्यात आले आहे.सदर खर्च पाणी पुरवठा देखभाल दुरुस्ती या लेखा शिर्षका खाली करण्यात येईल. सदरील साहित्य खरेदी साठी दैनिक वर्तमान पत्रात प्रसिध्दी करुन डी. फॉर्मवर अधिकृत विक्रेते किंवा अधिकृत पुरवठादार यांचे कडुन निविदा मागविण्या बाबत तसेच अंदाजपत्रक रु. ४,९९,११८/- चे मंजुरीस्तव प्रस्ताव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्यानुसार, पाणी पुरवठ-१ अंतर्गत येणाऱ्या जलवाहिन्या दुरुस्ती गळती दुरुस्तीसाठी जॉईन्ट खरेदीसाठी तयार करण्यात आलेल्या रक्कम रु. ४,९९,११८/- च्या अंदाजपत्रकास तसेच साहित्य खरेदीसाठी दैनिक वर्तमान पत्रात प्रसिध्दी देऊन अधिकृत विक्रेते किंवा पुरवठादार यांच्या कडून डी. फॉर्मवर निविदा मागविण्यात सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ३१७/१५ :**

कार्यकारी अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, आसेफिया कॉलनी येथे १०० मी. मी. व्यासाची ए. सी. जलवाहिनी टाकावयाची आहे. त्यासाठी परिसर अभियांत्रिकी विभागाची सन १९९५-९६ च्या दर सुची नुसार रक्कम रु. १,०७,२५३/- एवढयाचे अंदाजपत्रक तयार करण्यात आले आहे. सदर कामाचा खर्च हा भांडवली कामाची तरतुद मधुन करण्यात येणार आहे.

तरी अंदाजपत्रक मंजुरीस्तव प्रस्ताव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्यानुसार, आसेफिया कॉलनी येथे १०० मी. मी. व्यासाची ए. सी. जलवाहिनी टाकण्यासाठी परिसर अभियांत्रिकीच्या सन १९९५-९६ च्या दर सुची नुसार तयार करण्यात आलेल्या रु. १,०७,२५३/- च्या अंदाजपत्रकास तसेच सदर कामाचा खर्च भांडवली कामाची तरतुद यातुन करण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ३८८/१६ :**

कार्यकारी अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला की, गौरी शंकर कॉलनी मध्ये १०० मी. मी. व्यासाची ए. सी. जलवाहिनी टाकावयाची आहे. त्यासाठी परिसर अभियांत्रिकी विभागाची सन १९९४-९५ च्या दरसुची नुसार र. रु. १,२९,०००/- एवढयाचे अंदाजपत्रक तयार करण्यात आले आहे. सदर कामाचा खर्च हा देखभाल व दुरुस्ती कामाची तरतुदी मधुन करण्यात येणार आहे.

तरी अंदाजपत्रक मंजुरीस्तव प्रस्ताव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्यानुसार, गौरी शंकर, कॉलनीत १०० मी. मी. व्यासाची ए. सी. जलवाहिनी टाकावयाची आहे. त्यासाठी परिसर अभियांत्रिकी विभागाची सन १९९४-९५ च्याद दर सुची नुसार र. रु. १,२९,०००/- अंदाजपत्रकास तसेच सदरचा खर्च देखभाल व दुरुस्ती मधुन करण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ३८९/१७ :**

कार्यकारी अभियंता यांनी प्रस्ताव केला आहे की, पहाडसिंगपुरा येथील सर्वे नं. १९३९/१ मंजुर रेखांकना मध्ये १०० व १५० मी. मी. व्यासाची ए. सी. जलवाहिनी टाकावयाची आहे. त्यासाठी परिसर अभियांत्रिकी विभागाची सन १९९५-९६ च्या दर सुची नुसार र. रु. २,७०,८९३/- एवढयाचे अंदाजपत्रक तयार करण्यात आले आहे. सदर कामाचा खर्च हा भांडवली कामाची तरतुद मधुन करण्यात येणार आहे. तरी अंदाजपत्रक मंजुरीस्तव प्रस्ताव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्यानुसार, पहाडसिंगपुरा येथील सर्वे नं. १९३९/१ मंजुर रेखांकना मध्ये १०० व १५० मी. मी. व्यासाची ए. सी. जलवाहिनी टाकण्यासाठी परिसरर अभियांत्रिकीच्या ९५-९६ च्या दरसुची नुसार तयार करण्यात आलेल्या रु. २,७०,८९३/- च्या अंदाजपत्रकास तसेच सदरचा भांडवली कामाची तरतुद मधून करण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ३९०/१८ :**

शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, मो. संजय नगर (मुकूंदवाडी) उत्तर भाग वार्ड क्र. ८० येथे ३०० मी. मी. व्यासाची प्रिकास्ट अर्धगोलाकार गटार बांधणे ( पार्ट " अ ") कामासाठी र.रु. २५,८१,८७०/- चे अंदाजपत्रक सा. बा. खात्याची दर सुची १९९५-९६ नुसार तयार करण्यात आले असून, मा. आयुक्तांनी दि. २०-०६-९६ रोजी प्रशासकीय मान्यता दिली असून, सदरील कामा करीता रितसर वृत्तपत्रात प्रसिध्दी देऊन कार्यालयाची प्रगट निविदा सुचना क्र. मनपा/लेखा/नि/९०/९६ दि. ०१-०८-९६ अन्वये निविदा मागविण्यात आल्या असता निविदा विक्रीच्या अंतिम दिनांकापर्यंत एकूण (१३) तेरा कोऱ्या निविदा विकल्या गेल्या व स्विकारण्याच्या दिनांका पर्यंत (२) दोन मोहरबंद निविदा प्राप्त झाल्या त्या निविदा दि. २८-०८-९६ रोजी उपस्थित गुत्तेदारासमक्ष उघडण्यात आल्या असता गुत्तेदारांनी दिलेली दर खालील प्रमाणे आहे.

| | | |
|---|---|---|
| १. | मे. शिवा कन्स्ट्रक्शन | अं. प. दरापेक्षा ४.९९% जास्त |
| २. | श्री. आर. बी. चव्हाण | अ. प. दरापेक्षा ७.७७% जास्त |

परंतु वरील गुत्तेदाराने दिलेले दर जास्त असल्यामुळे मा. आयुक्त साहेबां समक्ष दि. २४-१०-९६ रोजी प्रत्यक्ष दर वाटाघाटीसाठी गुत्तेदारास बोलाविण्यात आले असता वाटाघाटी

अंती संबंधित गुत्तेदाराने अंदाजपत्रकीय दरा पेक्षा ३% जास्त दराने काम करण्यास संमती दिली आहे.

करीता मे. शिवा कन्स्ट्रक्शन यांची निविदा अंदाजपत्रकीय दरापेक्षा ३% जास्त दराने मंजुरी व विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्यानुसार, मो. संजयनगर, (मुकूंदवाडी) उत्तर भागात वार्ड क्र. ८० येथे ३०० मी. मी. व्यासाची प्रिकास्ट अर्धगोलाकार गटार बांधणे (पार्ट " अ ") कामासाठी सा. बा. खाते दर सुची ९५-९६ नुसार तयार करण्यात आलेल्या अंदाजपत्रक रु. २५,८१,८७०/- च्या कामासाठी मागविण्यात आलेल्या निविदा पैकी व वाटाघाटी अंती मे. शिवा कन्स्ट्रक्शन यांनी अंदाजपत्रकीय दरापेक्षा सदरचे काम ३% जास्त दराने करण्याची तयारी दर्शविल्यानुसार सदरचे काम मे. शिवा कन्स्ट्रक्शन यांचे कडून अंदाजपत्रकीय दरापेक्षा ३% जास्त दराने करुन घेण्यास सर्वानुमते मंजुरी देण्या येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ३९१/१९ :**

शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, मो. कांचनवाडी स्लम (अ) वॉर्ड क्र. ६२ मध्ये अर्धगोलाकार गटार बांधणे या कामाकरीता रक्कम रु. ४,४०,०००/- चे अंदाजपत्रक सा. बा. विभाग, औरंगाबाद यांची दर सुची सन १९९५-९६ अनुसार तयार करण्यात आले असून, मा. आयुक्तांनी दि. २६-०७-९६ रोजी प्रशासकीय मान्यता दिली असून, सदरील कामा करीता रितसर वृत्तपत्रात प्रसिध्दी देऊन कार्यालयाची प्रगट निविदा सुचना क्र. मनपा/लेखा/नि/९७/९६ दि. २७-०८-९६ अन्वये निविदा मागविण्यात आल्या असता निविदा विक्रीच्या अंतिम दिनांका पर्यंत एकूण (३०) तिस कोऱ्या निविदा विकल्या गेल्या व स्विकारण्याच्या दिनांका पर्यंत एकूण (१०) दहा मोहरबंद निविदा प्राप्त झाल्या. त्या निविदा दि. १३-०९-९६ रोजी उपस्थित गुत्तेदारासमक्ष उघडण्यात आल्या असता गुत्तेदारांनी दिलेले दर खालील प्रमाणे आहेत.

| | | |
|---|---|---|
| १. | मे. जयश्री कन्स्ट्रक्शन | अं. प. दरापेक्षा २५.६५% कमी |
| २. | श्री. बी. आर. चव्हाण | अं. प. दरापेक्षा २३.२४% कमी |
| ३. | श्री. अब्दुल खालेख | अं. प. दरापेक्षा २३.२३% कमी |
| ४. | आबावाला ए. एच. एन | अं. प. दरापेक्षा २३% कमी |
| ५. | शे. सलीम अहमद | अं. प. दरापेक्षा २०.९०% कमी |
| ६. | एलोरा कन्स्ट्रक्शन | अं. प. दरापेक्षा २०% कमी |
| ७. | आर. एल. भाटीया | अं. प. दरापेक्षा १५.९९% कमी |
| ८. | कुलवंतसिंग | अं. प. दरापेक्षा १४% कमी |
| ९. | एस. एन. मंडोरे | अं. प. दरापेक्षा ११% कमी |
| १०. | एस. एच. असोसिल्ट | अं. प. दरापेक्षा ०.११% कमी |

तुलनात्मकदृष्टया कमी व अंदाजपत्रकीय दरापेक्षा २५.६५% कमी दराची निविदा मे. जयश्री कंन्स्ट्रक्शन यांची निविदा मंजुरी मधुन विचारार्थ सादर.

**सभापती** : एखादे काम १५% जास्त बिले येत असेल तर कंत्राटदार कामाची गुणवत्त टिकून ठेवेले याची खात्री देता येते नाही. यासाठी मा. आयुक्तांनीच अशा प्रकरणात टेंडर्स रिकॉल करावेत.

**मा. आयुक्त** : अशा प्रकरणात कंत्राटदार कामाची गुणवत्त देऊ शकेल काय याची तपासणी करण्यात येईल.

**मुख्य लेख परीक्षक** : प्रकरणात रेट ॲनालिसिस करुन मागविले योग्य राहील.

**श्री. गौतम खरात** : टेंडर्स दुसऱ्यांदा जाऊ नये यासाठी कंत्राटदार अगोदरच एक दुसऱ्यांशी संगनमत करुन पैसे वाटतात.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्यानुसार, कांचनवाडी स्लम (अ) वार्ड क्र. ६२ मध्ये अर्ध गोलाकार गटार बांधण्याच्या फेर निविदा मागविण्यात याव्यात.

**विषय क्र. ३९२/२० :**

शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला की, मो. क्रांतीनगर स्लम भागात डांबरी रस्ते तयार करणे करीता, र. रु. ४,६२,०००/- चे अंदाजपत्रक सार्वजनिक बांधकाम विभाग, औरंगाबाद यांची दर सुची १९९५-९६ प्रमाणे तयार करण्यात आले असून, मा. आयुक्त यांनी दि. ३०-०५-९६ रोजी प्रशासकीय मान्यता दिली असून, सदरील कामा करीता रीतसर वृत्तपत्रात प्रसिध्दी देऊन कार्यालयाची प्रगट निविदा सुचना क्र. मनपा/लेखा/नि/८८/९६ दि. १६-०७-९६ अन्वये निविदा मागविल्या असता निविदा विक्रीच्या अंतिम दिनांका पर्यंत दोन (२) कोऱ्या निविदा विकल्या गेल्या व स्विकारण्याच्या दिनांका पर्यंत दोन मोहरबंद निविदा प्राप्त झाल्या त्या निविदा दि. ०६-०८-९६ रोजी उपस्थित गुत्तेदारा समक्ष उघडण्यात आल्या असता गुत्तेदारांनी दिलेले दर खालील प्रमाणे आहेत.

| | | |
|---|---|---|
| १. | मे. आदिनाथ कन्स्ट्रक्शन | अं. प. दरापेक्षा १२% जास्त |
| २. | भिमराव वसंतराव पाटील | अं. प. दरापेक्षा १५% जास्त |

परंतु वरील गुत्तेदाराने दिलेले दर जास्त असल्यामुळे मा. आयुक्त साहेबा समक्ष दि. २२-१०-९६ रोजी प्रत्यक्ष दर वाटाघाटीसाठी गुत्तेदारासमक्ष बोलाविण्यात आले असता वाटाघाटी अंती संबंधित गुत्तेदाराने अंदाजपत्रकीय दरापेक्षा ५% जास्त दराने काम करण्यास संमती दिली आहे.

करीता मे. आदिनाथ कन्स्ट्रक्शन यांची निविदा अंदाजपत्रकीय दरापेक्षा ५% जास्त दराने मंजुरी व विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्या क्रांती नगर स्लम भागात डांबरी रस्ते तयार करण्यासाठी सा. बा. खात्याच्या ९५-९६ च्या दर सुची नुसार तयार करण्यात आलेल्या र. रु. ४,६२,०००/- च्या अंदाजपत्रकासाठी मागविण्यात आलेल्या निविदा मध्ये व वाटाघाटी अंती मे. आदिनाथ कन्स्ट्रक्शन यांनी सदरचे काम अंदाजपत्रकीय दरापेक्षा ५% जास्त या दराने करण्याची संमती दर्शविल्यानुसार सदरचे काम मे. आदिनाथ कन्स्ट्रक्शन यांच्या कडून अंदाजपत्रकीय दरापेक्षा ५% जास्त दराने करुन घेण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

**विषय क्र. ३९३/२१ :**

शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, मो. कांचनवाडी स्लम (अ,ब) वार्ड क्र. ६२ या भागात डांबरी रस्ते तयार करणेच्या कामाकरीता र. रु. ३,३४,०००/- चे अंदाजपत्रक सा. बा. विभाग औरंगाबाद यांची दर सुची १९९५-९६ नुसार तयार करण्यात आले असून मा. आयुक्त यांनी दि. २२-१०-९६ रोजी प्रशासकीय मान्यता दिली आहे.

सदरील काम १८ खेडी विकास कार्यक्रम अंतर्गत लेखा शिर्ष सन १९९६-९७ या तरतुदी नुसार प्रस्तावित आहे करीता मान्यतेस्तव व विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्यानुसार, कांचनवाडी स्लम (अ,ब) वार्ड क्र. ६२ या भागात डांबरी रस्ते तयार करण्यासाठी सा. बा. विभाग औरंगाबाद यांच्या ९५-९६ च्या दर सुची नुसार तयार करण्यात आलेल्या र. रु. ३,३४,०००/- च्या अंदाजपत्रकास तसेच सदरचे कामाचा खर्च १८ खेडी विकास कार्यक्रम अंतर्गत लेखा शिर्षका ९६-९७ मधुन करण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ३९४/२२ :**

शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, मो. नक्षत्रवाडी गावात खडी रसते व डांबरी रस्ते तयार करणे करीता र. रु. ५,८६,६००/- चे अंदाजपत्रक सा. बा. विभाग औरंगाबाद यांची दर सुची १९९२-९३ प्रमाणे तयार करण्यात आले असून, प्रशासक यांनी दि. ०१-०९-९४ रोजी प्रशासकीय मान्यता दिली. यापुर्वी सदरील काम मे. व्यकंटेश कन्स्ट्रक्शन यांना देण्यात आले होते, परंतु त्यांनी काम मुदतीच्या आत पुर्ण न केल्यामुळे ४६००/- रु. दंड आकारुन काम अंतिम करण्यात आले.

उर्वरीत कामाकरीता मे. आदिनाथ कन्स्ट्रक्शन हे १९% जास्त अंदाजपत्रकीय दरापेक्षा या दराने करण्याकरीता दि. १६-०५-९६ च्या पत्रा द्वारे कळविले आहे. परंतु सदरील दिलेले दर मा. आयुक्त यांना मान्य नसल्यामळे संबंधित गुत्तेदारास वाटाघाटीसाठी बोलाविण्यात आले व १९९५-९६ च्या डी. एस. आर. प्रमाणे अंदाजपत्रकीय दराने काम करण्याची अंदाजपत्रकीय दराने काम करण्याची मान्यता दिली आहे. करीता मंजुरीस्तव व विचारार्थ सादर.

**मुख्य लेखा परीक्षक :** सदरचा प्रस्ताव हा अपुर्ण आहे. यावर खुलासा व्हावयास हवा.
**शहर अभियंता :** एकूण काम ५.८६ लाखाचे आहे पैकी ७९,४३६/- चे काम पुर्वीच झालेले आहे. सदरच्या कंत्राटदाराने काम बंद केलेले आहे म्हणून, एजन्सी बदलण्यासाठी हा प्रस्ताव आहे.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्यानुसार, नक्षत्रवाडी गावात खडी रस्ते व डांबरी रस्ते तयार करण्याकरीता रु. ५,८६,०००/- चे अंदाजपत्रक सा. बा. विभाग औरंगाबाद यांची दर सुची ९२-९३ प्रमाणे तयार करण्यात येऊन सदरचे काम मे. व्यंकटेश कन्स्ट्रक्शन यांना देण्यात आले होते, परंतु त्यांनी काम मुदतीच्या आत पुर्ण न केल्याने रु. ४,६००/- दंड आकारुन काम अंतिम करण्यात आले, उर्वरीत काम मे. आदिनाथ कन्स्ट्रक्शन यांनी वाटाघाटी अंती

९५-९६ च्या डी. एस. आर. दराप्रमाणे करण्याची तयारी दर्शविल्या नुसार त्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ३९५/२३ :**

नारेगांव येथे हनुमान मंदिरा पासून ते वरुड रोडच्या पुला पर्यंत जलनिःसारण वाहिनी टाकण्याच्या कामासाठी अंदाजपत्रक र. रु. १,४९,३००/- ते परिसर अभियांत्रिकीच्या दर सुची नुसार तयार करण्यात आले आहे. सदर कामावर होणारा खर्च ९६-९७ च्या " झोपडपट्टी सुधारणा " या लेखा शिर्षकांखालील तरतुदी मधुन करण्यात येणार आहे. सदर अंदाजपत्रकास प्रशासकीय मंजुरी मिळालेली आहे.

तरी सदर कामासाठी तयार करण्यात आलेल्या र. रु. १,४९,३००/- चे अंदाजपत्रकास मंजुरी बाबतचा

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्यानुसार, नारेगांव येथे हनुमान मंदिरापासुन ते वरुड रोड पुला पर्यंत जलनिःसारण वाहिनी टाकण्याच्या कामासाठी परिसर अभियंत्रिकीच्या दरसुची नुसार तयार करण्यात आलेल्या रु. १,४९,३००/- च्या अंदाजपत्रकास तसेच सदरचे काम ९६-९७ च्या झोपटपट्टी सुधारण लेखा शिर्षातुन करण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ३९६/२४ :**

अतिरिक्त शहर अभियंता हे प्रस्ताव सादर करीत आहेत की, सिव्हील हॉस्पीटल ते रंगिन गेट या रस्त्या वरील रस्ता दुभाजकाची उंची वाढविणे व त्यावर रेलिंग बसविणे हे काम सध्या प्रगती पथावर आहे. या कामासाठी शासकीय अनुदानातुन (१०.०० कोटी) निधी उपलब्ध करुन देण्यात आलेला आहे. सदर कामाचे मुळ अंदाजपत्रक रु. ९,९५,०७३/- इतके आहे व काम शेख शरीफ या गुत्तेदाराकडुन सध्या सुरु आहे. या कामाअंतर्गत लोंखडी ॲगल्सचे सपोर्ट व आडवे पाईप असलेल्या रोलींगची तरतुद होती, मात्र या कामाचा मुळे उद्देश शहर सौंदर्यीकरणाचा असल्याने ही रोलींच वापरली तर सौंदर्यीकरण करण्याच्या मुळ उद्देशालाच बाधा येईल असे वाटल्याने मा. आयुक्तांचे सुचने प्रमाणे मध्ये नविन डिझाईन तयार करुन त्यानुसार शहरात विविध ठिकाणी कामे झाली आहेत हे कामाही त्याच स्वरुपाचे आहे, त्यामुळे या रोलींगची बाब घेऊन या कामाचे सुधारीत अंदाजपत्रक तयार केले असता ते रु. ११,८६,८१०/- (अतिरिक्त बाबींनी) एवढे वाढ झाली आहे. म्हणजेच मुळ अंदाजपत्रकात रु. १,९१,७३७/- एवढी वाढ झाली आहे. तरी या वाढीव खर्चास म्हणजे व रु. १,१,७३६/- ला मान्यता मिळणे बाबत ठराव विचारार्थ व मंजुरीस्तव सादर.

**श्री. गौतम खरात, श्री. रशिद खान मामू :** अंदाजपत्रकात फार मोठी वाढ झालेली आहे. त्यांचा खुलासा व्हावा.

**अति. शहर अभियंता :** पुर्वीची रेलींग या गोल पाईप मधील होत्या परंतु त्या बदलुन नविन डिझाईन मध्ये रेलींग बसविण्यात येणार आहेत, त्यामुळे अंदाजपत्रकात वाढ झालेली आहे.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्यानुसार, सिव्हील हॉस्पीटल ते रंगिन गेट या रस्त्या वरील दुभाजकांची उंची वाढविणे व रेलिंग बसविण्यासाठी तयार करण्यात आलेल्या रु. ११,८६,८१०/- (अतिरिक्त बाबीसी) च्या सुधारीत अंदाजपत्रकास (रु. १,९१,७३६/- च्या वाढीव खर्चासह) सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ३९७/२५ :**

अतिरिक्त शहर अभियंता यांनी प्रस्ताव दिला की, मुजीब कॉलनी ते रोषण गेट जवळील गल्ल्यांमध्ये खांडकी दुरुस्त करणे व नविन खांडकी बसविणे या कामासाठी सा. बा. खात्याच्या सन ९५-९६ च्या दरसुचीनुसार अंदाजपत्रक र. रु. २,०६,६८०/- चे तयार करण्यात आले आहे. सदरील कामाचा खर्च भांडवली रस्ते (खांडकी) सन ९६-९७ या लेखा शिर्षका अंतर्गत उपलब्ध तरतुदी मधुन करण्यात येणार आहे.

तरी सदर कामासाठी तयार करण्यात आलेले अंदाजपत्रक र. रु. २,०६,६८०/- मंजुरी बाबतचा प्रस्ताव मा. स्थायी समितीचे विचारार्थ तथा मंजुरीस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्यानुसार, मुजीब कॉलनी ते रोषण गेट जवळील गल्ल्यांमध्ये खांडकी दुरुस्त करणे व नविन खांडकी बसविणे या कामासाठी सा. बा. खात्याच्या सन ९५-९६ च्या दरसुचीनुसार तयार करण्यात आलेल्या र. रु. २,०६,६८०/- च्या अंदाजपत्रकास व सदरचे कामाचा खर्च भांडवली रस्ते (खांडकी) सन ९६-९७ या लेाा शिर्षा अंतर्गत उपलब्ध तरतुदीतून करण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ३९८/२६ :**

अतिरिक्त शहर अभियंता यांनी प्रस्ताव दिला की, दादा कॉलनी भागात खांडकी बसविणे व जुनी खांडकी दुरुस्त करणे व शहाबाद फरशी बसविणे या कामासाठी सा. बा. खात्याच्या सन ९५-९६ च्या दरसुचीनुसार अंदाजपत्रक र. रु. १,२१,४७०/- चे तयार करण्यात आलेले आहे.

सदरील कामाचा खर्च भांउवली रस्ते (नविन खांडकी) या लेखा शिर्षकामध्ये उपलब्ध असणाऱ्या आर्थिक तरतुदी मधून करण्यात येणार आहे.

तरी अंदाजपत्रक र. रु. १,२१,४७२/- चे मंजुरी बाबतचा प्रस्ताव मा. स्थायी समितीचे यांचे विचारार्थ तथा मंजुरीस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्यानुसार, दादा कॉलनी भागात खांडकी बसविणे व जुनी खांडकी दुरुस्त करणे व शहाबाद फरशी बसविणे या कामासाठी सा. बा. खात्याच्या सन ९५-९६ च्या दरसुचीनुसार तयार करण्यात आलेल्या रु. १,२१,४७२/- च्या अंदाजपत्रकास तसेच सदरचे कामाचा खर्च भांडवली रस्ते (नविन खांडकी) या लेखा शिर्षात करण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ३९९/२७ :**

अतिरिक्त शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला की, बेगमपुरा येथे कुंभारवाडा भागातील गल्यामध्ये शहाबाद फरशी बसविणे व जुनी खांडकी दुरुस्त करणे या कामासाठी सा. बा. खात्याच्या ९५-९६ च्या दरसुची नुसार अंदाजपत्रक र. रु. १,५१,०२०/- चे तयार करण्यात आले आहे. सदरील कामाचा खर्च रस्ते देखभाल व दुरुस्ती सन ९६-९७ या लेखा शिर्षकाअंतर्गत उपलब्ध असणाऱ्या तरतुदी मधुन करण्यात येईल.

तरी सदरील कामासाठी तयार करण्यात आलेले अंदाजपत्रक रु. १,५१,०२०/- चे मंजुरी बाबतचा प्रस्ताव मा. स्थायी समितीचे विचारार्थ तथा मंजुरीस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्यानुसार, बेगमपुरा येथे कुंभारवाडा भागातील गल्यामध्ये शहाबाद फरशी बसविणे व जुनी खांडकी दुरुस्त करणे या कामासाठी सा. बा. खात्याच्या ९५-९६ च्या दरसुची नुसार तयार करण्यात आलेल्या र. रु. १,५१,०२०/- च्या अंदाजपत्रकास तसेच सदरचे कामाचा खर्च रस्ते देखभाल व दुरुस्ती ९६-९७ मधुन उपलब्ध तरतुदीतून करण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ४००/२८ :**

अति. शहर अभियंता यांनी प्रस्ताव दिला की, रोशनगेट परिसरात २५ फुट उंच मिनार बांधणे या कामासाठी सा. बा. खात्याच्या सन ९५-९६ च्या दरसुचीनुसार अंदाजपत्रक रु. १,४०,०५८/- चे तयार करण्यात आले होते. परंतु मा. आयुक्त यांच्या स्थळ पाहणी नुसार व त्यांनी दिलेल्या सुचनेनुसार हे काम अतिविशिष्ट असल्या कारणाने अनुभवी कंत्राटदार श्री. शेख मसुद यांचे कडून बर्न की बेसीसवर रु. १,३०,०००/- एवढया किंमतीस करुन घेण्यात येईल. सदरील कामाचा खर्च शा. अ. सन ९५-९६ (रु. १० कोटी) या लेखा शिर्षकांतर्गत उपलब्ध तरतुदीमधुन करण्यात येईल.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्यानुसार, रोशनगेट परिसरात २५ फुट उंच मिनार बांधण्याच्या कामासाठी सा. बा. खात्याच्या सन ९५-९६ च्या दरसुचीनुसार अंदाजपत्रक तयार करण्यात आल्यानुसार र. रु. १,४०,०५८/- च्या कामास अतिविशिष्ट पध्दतीचे असल्याने श्री. शेख मसूद यांचे कडून टर्न की बेसीसवर करुन घेण्यास तसेच सदरील कामाचा खर्च शा. अ. (९५-९६) रु १० कोटी मधून करण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ४०१/२९ :**

अतिरिक्त शहर अभियंता यांनी प्रस्ताव दिला की, मो. काझीवाडा, भडकलगेट रोडचे डांबरीकरण करणे कामासाठी तयार करण्यात आलेल्या र. रु. ३,४४,२००/- च्या अंदाजपत्रकास स्थायी समिती विषय क्र. १२५/५ दि. ३०-०७-९६ अन्वये मंजुरी प्राप्त झालेली आहे.

त्यानुसार सदरील कामाकरीता निविदा पत्रके मागविली असता निविदापत्रके विक्रीच्या अंतिम तारखे पर्यंत एकूण (४) कोरी निविदापत्रक विकल्या गेली व निविदा पत्रके

स्विकृतीच्या अंतिम तारखे पर्यंत यापैकी फक्त (४) निविदापत्रक दर भरुन प्राप्त झाली प्राप्त निविदापत्रके दि. २७-०८-९६ रोजी उघडण्यात आली. त्याचा तपशील खालील प्रमाणे आहे.

| | | |
|---|---|---|
| १. | मे. मस्कट कन्स्ट्रक्शन | २०.९७% कमी दराने |
| २. | मे. आदिनाथ कन्स्ट्रक्शन | १९.५६% कमी दराने |
| ३. | श्री. के. बी. पाथ्रीकर | १९.२१% कमी दराने |
| ४. | श्री. भिमराव पाटील | ७.९०% कमी दराने |

वरील प्राप्त निविदापत्रकापैकी मे. मस्कट कन्स्ट्रक्शन यांच्या निविदापत्रकाचे दर तुलनात्मकदृष्टया सर्वात कमी व अंदाजपत्रकीय दरापेक्षा २०.९७% कमी आहे.

तरी मे. मस्कट कन्स्ट्रक्शन यांचे अंदाजपत्रकीय दरापेक्षा २०.९७% कमी दर मंजुरी बाबतचा प्रस्ताव विचारार्थ तथा मंजुरीस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्यानुसार, काझीवाडा भडकलगेट भागातील रोडचे डांबरीकरण करण्यासाठी करण्यात आलेल्या र. रु. ३,४४,२००/- च्या अंदाजपत्रकास स्थायी समिती विषय क्र. १२५/५ दिनांक ३०-०७-९६ अन्वये मंजुरी दिल्यानुसार बोलाविण्यात आलेल्या निविदामध्ये मे. मस्कॉट कन्स्ट्रक्शन यांची निविदा तुलनात्मकदृष्टया सर्वात कमी व अंदाजपत्रकीय दरापेक्षा २०.९७% कमी दराची असल्याने तिच्या स्विकृतीस सर्वानुमते मंजुरी देण्यात यते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ४०२/३० :**

अतिरिक्त शहर अभियंता यांनी प्रस्ताव दिला की, कटकट गेट ते सिडको या १०० फुटी रस्त्यावर मध्य दुभाजक टाकणे या कामासाठी सार्वजनिक बांधकाम खात्याच्या सन १९९६-९७ च्या दरसुचीनुसार अंदाजपत्रक र. रु. ३,९५,२०४/- चे तयार करण्यात आले आहे. सदरील कामचा खर्च भांडवली रस्ते (नविन खडी रस्ते) सन १९९६-९७ च्या लेखा शिर्षकांतर्गत उपलब्ध तरतुदीमधून करण्यात येईल.

तरी सदरील कामासाठी तयार करण्यात आलेले अंदाजपत्रक र. रु. ३,९५,२०४/- चे मंजुरी बाबतचा प्रस्ताव मा. स्थायी समितीचे विचारार्थ तथा मंजुरीस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्यानुसार, कटकट गेट ते सिडको या १०० फुटी रस्त्यावर दुभाजक टाकण्याच्या कामासाठी सार्वजनिक बंधकाम खात्याच्या ९५-९६ च्या दरसुचीनुसार तयार करण्यात आलेल्या रु. ३,९५,२०४/- च्या अंदाजपत्रकास तसेच सदरचे कामाचा खर्च भांडवली रस्ते (नविन खडी रस्ते) ९६-९७ या लेखाशिर्षा अंतर्गत करण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ४०३/३१ :**

शहर अभियंता यांनी प्रसताव सादर केला की, नारेगांव येथील स्मशान भूमी येथे बर्निंग रोड, रेल्टींग रोड व तार कुंपन पाण्याचा हौद बांधणे इ. कामाचे अंदाजपत्रक

सार्वजनिक बांधकाम खात्याचे सन ९५-९६ च्या दरसुची नुसार रक्कम रु. २,५६,२००/- चे तयार करण्यात आले त्यास मा. आयुक्त यांनी मंजुरी दिलेली आहे. सदर खर्च स्मशानभुमी या तरतुदीमधून करण्यात येणार आहे. करीता प्रस्ताव विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्यानुसार, नारेगांव येथील स्मशानभूमी येथे बर्निक रोड, रोल्टींग रोड व तार कुंपन व पाण्याचा हौद बांधणे इ. कामासाठी सार्वजनिक बांधकाम खात्याच्या ९५-९६ च्या दरसुची अन्वये तयार करण्यात आलेल्या रक्कम रु. २,५६,२००/- च्या अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ४०४/३२ :**

कार्यकारी अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, चाणक्यपुरी गृह निर्माण संस्था येथे १५० मी. मी. व्यासाची ए. सी. जलवाहिनी टाकावयाची आहे. त्यासाठी परिसर अभियांत्रिकी विभागाची सन १९९४-९५ च्या दरसुची नुसार र.रु. ३,०४,४९०/- एवढयाचे अंदाजपत्रक तयार करण्यात आले आहे. सदर कामाचा खर्च हा भांडवली कामाचे तरतूदमधून करण्यात येणार आहे.

तरी अंदाजपत्रक मंजूरीस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्यानुसार, चाणक्यपुरी गृह निर्माण संस्था येथे १५० मी. मी. व्यासाची ए. सी. जलवाहिनी टाकण्यासाठी ९४-९५ च्या परिसर अभियांत्रिकी च्या दर सुची नुसार तयार करण्यात आलेल्या र. रु. ३,०४,४९०/- च्या अंदाजपत्रकास तसेच सदरचे कामाचा खर्च भांडवली कामातुन करण्यात सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ४०५/३३ :**

कार्यकारी अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, मो. राजनगर शहानुरवाडी येथे १०० व १५० मी. मी. व्यासाची ए. सी. जलवाहिनी टाकावयाची आहे. त्यासाठी परिसर अभियांत्रिकी विभागाची सन १९९४-९५ च्या दरसुचीनुसार र. रु. ३,२२,९६०/- एवढयाचे अंदाजपत्रक तयार करण्यात आले सदर कामाचा खर्च हा भांडवली कामाची तरतुदमधून करण्यात येणार आहे.

तरी अंदाजपत्रक मंजुरीस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्यानुसार, राजनगर शहानुरवाडी येथे १०० व १५० मी. मी. व्यासाची ए. सी. जलवाहिनी टाकण्यासाठी परिसर अभियांत्रिकीच्या सन १९९४-९५ च्या दरसुचीनुसार तयार करण्यात आलेल्या र. रु. ३,२२,९६०/- च्या अंदाजपत्रकास तसेच सदरचे कामाचा खर्च भांडवली कामाची तरतुदीमधुन करण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

# ऐनवेळचे विषय

**विषय क्र. ४०६/१ :**

शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, मोहल्ला संजयनगर बायजीपुरा स्लम येथे गल्ली नं. ७, ८, ९, १०, ११ येथे रोड क्रॉस पाईप काढून गटार बांधणे बाबतच्या कामाकरीता र. रु. २,८१,०००/- चे अंदाजपत्रक तयार करण्यात आले आहे. सदरील काम ५% कमी कमकुवत घटक कल्याण योजना या शिर्षकातुन करण्यात येईल. सदरच्या अंदाजपत्रकास मा. आयुक्तांनी दिनांक ०२-०१-९६ ला प्रशासकीय मान्यता दिली आहे.

तरी सदरील कामाकरीता तयार करण्यात आलेले अंदाजपत्रक रक्कम रु. २,८१,०००/- यास मान्यतेस्तव प्रस्ताव विचारार्थ तथा मंजुरीस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्यानुसार, संजयनगर, बायजीपुरा स्लम येथे गल्ली नं. ७, ८, ९, १०, ११ येथे रोड क्रॉस पाईप काढून गटार बांधण्याच्या कामासाठी तयार करण्यात आलेले अंदाजपत्रक र. रु. २,८१,०००/- तसेच सदरील काम ५% कमकुवत घटक कल्याण योजना शिर्षकातून करण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ४०७/२ :**

शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, मो.रविंद्रनगर शहाबाजार येथे खांडकी रस्ते व खडी रस्ते तयार करणे व गटारीची दुरुस्ती करणे बाबतच्या कामाकरीता सा. बा. खात्याच्या वर्ष ९५-९६ च्या दरसुचीनुसार १,४३,८७३/- चे अंदाजपत्रक तयार करण्यात आले आहे. सदरील काम खुली गटार बांधणे १००.०० लाख या शिर्षकातुन करण्यात येईल. सदरील अंदाजपत्रकास मा. आयुक्तांना दि. ३०-१०-९६ ला प्रशासकीय मान्यता दिली आहे.

तरी सदरील कामासाठी तयार करण्यात आलेले अंदाजपत्रक र. रु. १,४३,८७३/- यास मान्यतेचा प्रस्ताव विचारार्थ मंजुरीस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्यानुसार, रविंद्रनगर शहाबाजार येथे खांडकी रस्ते व खडी रस्ते तयार करणे व गटारीची दुरुस्ती करण्याच्या कामाकरीता सा. बा. खात्याच्या ९५-९६ च्या दरसुचीनुसार तयार करण्यात आलेल्या रु. १,४३,८७३/- च्या अंदाजपत्रकास तसेच सदरील काम खुली गटार बांधणे १००.०० लाख या शिर्षाकातून करण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ४०८/३ :**

शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, मो. इंदिरानगर बायजीपुरा स्लम वार्ड क्र. २४ येथील मुख्य रस्त्याचे पुर्नडांबरीकरण करणे बाबत कामाकरीता सा. बा. खात्याच्या वर्ष ९५-९६ च्या दरसुचीनुसार रु. ५,०३,३००/- चे अंदाजपत्रक तयार करण्यात

आले आहे. सदरील काम " डांबरी रस्ते " या शिर्षकातुन करण्यात येईल. सदरच्या अंदाजपत्रकास मा. आयुक्त यांनी दि. ३१-१०-९६ ला प्रशासकीय मान्यता दिली आहे.

तरी सदरील कामासाठी तयार करण्यात आलेल्या रु. ५,०३,३००/- च्या अंदाजपत्रकास मान्यतेचा प्रस्ताव विचारार्थ तथा मंजुरीस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्यानुसार, इंदिरानगर बायजीपुरा स्लम वार्ड क्र. २४ येथील मुख्य रस्त्याचे पुर्नडांबरीकरण करण्याच्या कामाकरीता सा. बा. खात्याच्या वर्ष ९५-९६ च्या दरसुचीनुसार तयार करण्यात आलेल्या रु. ५,०३,३००/- च्या अंदाजपत्रकास तसेच सदरील खर्च डांबरी रस्ते या शिर्षकातुन करण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ४०९/४ :**

शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, मो. मुकूंदवाडी (शिवाजी कॉलनी) येथे दगडी गटार बांधणे च्या कामाकरीता रक्कम रु. १,५१,६००/- चे अंदाजपत्रक सा. बा. विभाग औरंगाबाद यांची दरसुची ९५-९६ प्रमाणे तयार करण्यात आले असून, मा. आयुक्तांनी दि. २९-१०-९६ ला प्रशासकीय मान्यता दिली आहे.

सदरील काम १८ खेडी विकास अंतर्गत अर्थसंकल्प १९९६-९७ मध्ये ३ कोटीची तरतुदीमधून करण्याचे प्रस्तावित आहे. करीता मंजुरीस्तव विचारार्थ प्रस्ताव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्यानुसार, मुकूंदवाडी (शिवाजी कॉलनी) येथे दगडी गटार बांधण्याच्या कामाकरीता सा. बा. विभागाच्या ९५-९६ च्या दरसुची नुसार तयार करण्यात आलेल्या रु. १,५१,६००/- च्या अंदाजपत्रकास तसेच सदरचा खर्च १८ खेडी विकास अंतर्गत अर्थसंकल्प ९६-९७ मधील ३ कोटीच्या तरतुदीतून करण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ४१०/५ :**

शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला की, मजनुहील उद्यान येथे स्वामी विवेकानंद यांचा पुतळा बसविणे व आजुबाजुला सौंदर्यीकरण करणे बाबत कामाचे अंदाजपत्रक सन १९९५-९६ च्या सा. बा. खात्याच्या दरसुची अन्वये र. रु. २,४८,१००/- चे तयार करण्यात आले. त्यास मा. आयुक्तांनी मंजुरी दिलेली आहे.

दि. २८-०६-९६ रोजी झालेल्या स्थायी समिती मध्ये मा. सभापती यांनी मंजुरी दिलेली आहे की, उप अभियंता (उद्यान बा.) व उद्यान अधिक्षक यांनी सदर पुतळा नियोजित ठिकाणी बसवून व आजूबाजूचे भाग सुशोभित करण्याचे काम त्वरीत हाती घ्यावे व काम करण्यास तो अपेक्षित खर्च येईल त्यास सभागृहाची कार्योत्तर मंजुरी मिळेल. या अनुषंगाने सदर काम त्वरीत होण्याच्या दृष्टीने श्री. वाघ, गुत्तेदार हे अंदाजपत्रकीय दराने काम करण्यास तयार आहे. त्यास मग आयुक्तांनी मंजुरी दिलेली आहे.

सदर खर्च नविन उद्याने या तरतूदीमधून करण्यास येईल प्रस्ताव विचारार्थ व मंजुरीस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्यानुसार, मजनुहिल उद्यान येथे स्वामी विवेकानंदाचा पुतळा बसविण्यासाठी सा. बा. खात्याच्या ९५-९६ च्या दरसुचीनुसार तयार करण्यात आलेल्या अंदाजपत्रक रु. २,४८,१००/- तसेच सदरचे काम तातडीने होण्याच्या दृष्टीने उपलब्ध गुत्तेदार श्री. वाघ यांच्याकडून अंदाजपत्रकीय दराने करुन घेण्यास व सदरचा खर्च नविन उद्याने या शिर्षातुन करण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ४११/६ :**

शिक्षणाधिकारी यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, सन ९६-९७ सालात मनपा शाळोतील मुलांना साहित्य खरेदी व मा. नगरसेवक स्वेच्छा निधीतून साहित्य खरेदी करीता निविदा मागविण्यात आल्या आहे.

एकूण ५ निविदा प्राप्त झाल्यात. प्राप्त निविदेतील साहित्य व दर्जा व दरांची तपासणी करुन, निवड समितीने शिफारस केल्यानुसार साहित्य खरेदीचा प्रस्ताव सादर करण्यात येत आहे. प्राप्त साहित्यांपैकी निवड समितीने पुढील प्रमाणे साहित्य खरेदीची शिफारस केलेली आहे.

| | | |
|---|---|---|
| १. | मे. सुनिल स्पोटर्स | ३, ६, ३०, ३२, ५२, ५८, ८२- १ ते १२- (७) |
| २. | साकेत प्रकाशन | |
| ३. | वेधे इंटरनॅशनल | १६, २२, ५०, ५६, ५७, ६१, ८३, ८५, ८६, ८७, ९०, ९८, १०४.१३, |
| ४. | चॅम्पीयन | ४५, ४६, ५९, ६२, ६३, ८८, ८९, ९५= (८) |
| ५. | इंटरनॅशनल | १, २, ४, ६, १०, ११, १३, १४, १५, १८, १९, २०, २१, २५, २६, २९, ३१, ३३, ३५, ३६, ३७, ३८, ३९, ४०, ४१, ४२, ४३, ४४, ४७, ४८, ४९, ५१, ५३, ५४, ५५, ६०, ६४, ६५, ६६, ६७, ६८, ६९, ७०, ७१, ७२, ७३, ७४, ७५, ७६, ७७, ७८, ७९, ८०, ८१, ८२, ८४, ९२, ९३, ९६, ९७, ९९, १००, १०१, १०२, १०३, १०५, १०६, १०७, १०८ (६९) |

उपरोक्त नुसार निविदा धारकांच्या नावांसमोर दर्शविण्यास आलेल्य साहित्याची खरेदी करणे योग्य राहील. प्रकरण मंजुरीस्तव.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्यानुसार, ९६-९७ सालात मनपा शाळेतील मुलांना साहित्य खरेदी व मा. नगरसेवक स्वेच्छा निधीतून साहित्य खरेदीसाठी निविदा मागविल्यास असता प्राप्त निविदांपैकी साहित्य, दर्जा व दरांची तपासणी करुन निवड समितीने शिफारस केल्यानुसार खालील प्रमाणे साहित्य खरेदी करण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

| | | |
|---|---|---|
| १. | मे. सुनिल स्पोटर्स | ३, ६, ३०, ३२, ५२, ५८, ८२- १ ते १२- (७) |

| | | |
|---|---|---|
| २. | साकेत प्रकाशन | |
| ३. | वेधे इंटरनॅशनल | १६, २२, ५०, ५६, ५७, ६१, ८३, ८५, ८६, ८७, ९०, ९८, १०४.१३, |
| ४. | चॅम्पीयन | ४५, ४६, ५९, ६२, ६३, ८८, ८९, ९५= (८) |
| ५. | इंटरनॅशनल स्पोर्ट्स | १, २, ४, ६, १०, ११, १३, १४, १५, १८, १९, २०, २१, २५, २६, २९, ३१, ३३, ३५, ३६, ३७, ३८, ३९, ४०, ४१, ४२, ४३, ४४, ४७, ४८, ४९, ५१, ५३, ५४, ५५, ६०, ६४, ६५, ६६, ६७, ६८, ६९, ७०, ७१, ७२, ७३, ७४, ७५, ७६, ७७, ७८, ७९, ८०, ८१, ८२, ८४, ९२, ९३, ९६, ९७, ९९, १००, १०१, १०२, १०३, १०५, १०६, १०७, १०८ = ६९ |

**विषय क्र. ४१२/७ :**

मालमत्ता अधिकारी यांनी मा. आयुक्त यांच्या मंजुरीनुसार प्रस्ताव सादर करीत आहेत की, क्रांती चौक येथील पहिल्या मजल्या वरील दोन हॉल व दुसऱ्या मजल्या वरील एक असे तीन हॉल आहेत. त्यापैकी व्यापारी संकुलावरील हॉल निविदा नुसार श्री. शरदकुमार अग्रवाल यांना भाडयाने देण्यात आले आहेत. तथापी पहिल्या मजल्यावरील एक हॉल व दुसऱ्या मजल्यावरील एक हॉल असे दोन्ही हॉल रिकामे आहेत.

सदरील रिकामी जागा (हॉल) मिळण्यासाठी मुख्य कार्यकारी अधिकारी देवगिरी नागरी सहकारी बँक लि. यांनी मागणी केली आहे.

तथापी पहिल्या मजल्यावरील हॉल श्री. शरद कुमार अग्रवाल यांना निविदा नुसार देण्यात आले असून, अनामत रक्कम रु. ३,५००/- प्रति चौ. मी. प्रमाणे त्याची एकूण अनामत रक्कम ६,१३, ३८५/- आहे. मासिक भाडे प्रति चौ. मी. ३९/- प्रमाणे मासिक भाडे ६, ८, ३५ आहे एकूण सेवा शुल्का सहित वार्षीक भाडे ९२,५३५/- या दराने त्यांची निविदा मंजुर करुन भाडयाने देण्यात आली आहे.

श्री. शरद कुमार अग्रवाल यांना देण्यात आलेल्या दराने बँकेला देण्यास मान्यता झाल्यास या दोन्ही हॉलचे एकूण क्षेत्रफळ १०६.४२ चौ. मी. आहे. त्याचे भाडे प्रति महा ४९/- प्रति चौ. मी. प्रमाणे सेवा शुल्क सहित १७,८८२/- प्रतिमहा आहे व अनामत रक्कम रु. २५००/- प्रति चौ. मी. प्रमाणे रक्कम रु १६,२५,६८०/- इतके अपेक्षित आहे करीता प्रस्ताव मान्यतेस्तव व विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्यानुसार, क्रांती चौक येथील पहिल्या मजल्यावरील एक हॉल व दुसऱ्या मजल्यावरील एक हॉल देवगिरी नागरी सहाकारी बँक लि. यांना (दोन्ही हॉलचे क्षेत्रफळ ४०६.४२ चौ. मी.) प्रतिमहा भाडे ३९/- प्रति चौ. मी. प्रमाणे सेवा शुल्कासह रु. १७,८८२/- प्रतिमहा व अनामत रु. ३५००/- प्रति चौ. मी. प्रमाणे रु. १६,२५,६८०/- प्रमाणे देण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ४१३/८ :**

मालमत्ता अधिकारी, यांना मा. आयुक्त, यांच्या मंजुरीनुसार प्रस्ताव सादर करीत आहे की, श्रीमती गयाबाई गौरी यांना मा. जिल्हाधिकारी औरंगाबाद यांचे पत्र क्र. ९६/झुभायो/पुरवठा/कावि/९६-९७ दिनांक १२-०८-९६ सदरील झुणका भाकर केंद्रास सुतगिरणी ते काब्रानगर कडे जाणाऱ्या रस्त्यालागून पुलाच्या भितीलगत १० x १२ च्या आकाराची १२० चौ. मी. फुट जागा ज्याची चतु:सिमा खालील प्रमाणे आहे.

| | | |
|---|---|---|
| पुर्वेस | - | रस्ता |
| पश्चिमेस | - | झोपडया व खुली जागा |
| दक्षिणेस | - | खुली जागा |
| उत्तरेस | - | रस्ता |

वरील चतु:सिमेत दर्शविल्याप्रमाणे १२० चौ. फुट जागा विनामुल्य झुणका भाकर केंद्रासाठी खालील अटी शर्तीनुसार देता येऊ शकेल.

१) झुणका भाकर केंद्रामुळे रस्त्यावरील वाहतुकीस अडचण वा अडथळा निर्माण होणार नाही. याची दक्षता घ्यावी.

२) झुणका भाकर केंद्राचे बांधकाम पक्क्या स्वरुपाचे करावयाचे झाल्यास मनपाची पुर्वपरवानगी घेणे बंधनकारक राहील.

३) ज्यावेळेस मनपास या जागेची आवश्यक्यता भासेल किंवा उपरोक्त दोन मुदयांमुळे निर्माण होणाऱ्या परिस्थितीमुळे किंवा रहदारीस बाधा निर्माण होणे या मुदयांमुळे निर्माण होणाऱ्या परिस्थितीमुळे मनपाकडून झुणका भाकर केंद्र हलवावे लागल्यास मनपाकडून केव्हाही जागा रिकामी करुन घेण्यात येईल व संबंधितावर ही जागा रिकामी करुन घेणे बंधनकारक राहील. करीता, प्रस्ताव मान्यतेस्तव व विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्यानुसार, मा. जिल्हाधिकारी, औरंगाबाद यांनी त्यांचे पत्र क्र. ९६/झुभागो/पुरवठा/कावि-९६-९७ दि. १२-०८-९६ अन्वये सुत गिरणी परिसरात झुणका भाकर केंद्र उघडण्यासाठी श्रीमती गयाबाई गिरी यांना परवानगी दिल्यानुसार सुतगिरीणी ते काब्रा नगरकडे जाणाऱ्या पुलाच्या भितीलगत प्रस्तावात दर्शविलेल्या चतु:सिमेअंतर्गत व अटी व शर्ती वर १० x १२ फुट या आकाराची १२० चो. फुट जागा देण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ४१४/९ :**

कार्यकारी अभियंता पाणी पुरवठा व जलनि:सारण यांनी महानगरपालिका विभाग क्र. १ अंतर्गत वार्ड " ब " करीता अस्तित्वात सरफेस गटारींची दुरुस्ती व देखभाल करणेच्या कामाकरीता सन ९६-९७ या आर्थिक वर्षासाठी महाराष्ट्र परिसर अभियांत्रिकीच्या सन ९४-९५ च्या दरसुची नुसार र. रु. २,००,०००/- अंदाजपत्रक सादर केले आहे.

सदरील काम देखभाल व दुरुस्ती ९६-९७ या लेखा शिर्षातून प्रस्तावित केले आहे. सदरील कामास मा. आयुक्तांनी दि. ३१-१०-९६ ला मंजुरी दिलेली आहे. तरी प्रस्ताव विचारार्थ व मंजुरीस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्यानुसार, वि. क्र. १ अंतर्गत वार्ड " ब " करीता अस्तित्वात असलेल्या सरफेस गटारींची देखभाल व दुरुस्तीच्या कामासाठी ९६-९७ या आर्थिक वर्षासाठी

महाराष्ट्र परिसर अभियांत्रिकीच्या ९४-९५ च्या दरसुची नुसार तयार करण्यात आलेल्या रु. २,००,०००/- च्या अंदाजपत्रकास व सदरील कामाचा खर्च देखभाल दुरुस्ती ९६-९७ या शिर्षकातून करण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ४१५/१० :**

कार्यकारी अभियंता (पापु व ज. नि.) यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, महानगरपालिका वि. क्र. १ प्रभाग " अ " मधील अस्तित्वात असलेल्या ड्रेनेजलाईनची दुरुस्ती व देखभाल करणेच्या कामाकरीता सन ९६-९७ या आर्थिक वर्षासाठी महाराष्ट्र परिसर

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्यानुसार, विभाग क्र. १ प्रभाग " अ " मधील अस्तित्वात असलेल्या ड्रेनेज लाईनची दुरुस्ती देखभाल करण्याच्या कामाकरीता महाराष्ट्र परिसर अभियांत्रिकी ९४-९५ च्या दरसुचीनुसार तयार करण्यात आलेल्या रु. २,५०,०००/- च्या अंदाजपत्रकास तसेच सदरचे काम देखभाल दुरुस्ती ९६-९७ या लेखा शिर्षकातून करण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ४१६/१३ :**

कार्यकारी अभियंता पाणी पुरवठा व जलनि:सारण यांनी महानगर पालीका विभाग क्र. १ वॉर्ड करीता अस्तित्वात असलेल्या ड्रेनेज लाईनची देखभाल व दुरुसती करणेच्या कामाकरीता सन ९६-९७ या आर्थिक वर्षासाठी महाराष्ट्र परिसर अभियांत्रिकीच्या सन ९४-९५ चे दरसुची नुसार र. रु. २,००,०००/- चे अंदाजपत्रक सादर केले आहे.

सदरील काम देखभाल व दुरुस्ती सन ९६-९७ या लेखा शिर्षातून प्रस्तावित आहे. सदर कामास मा. आयुक्तांनी दि. ३१/१०/९६ ला मंजुरी दिली आहे. करीता प्रस्ताव विचारार्थ व मंजुरीस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्यानुसार, विभाग क्र. १ वार्ड " क " करीता अस्तित्वात असलेल्या ड्रेनेज लाईनची देखभाल व दुरुस्ती करण्याकरीता ९६-९७ या आर्थिक वर्षासाठी महा. परिसर अभियांत्रिकीच्या ९४-९५ च्या दरसुचीनुसार तयार करण्यात आलेल्या रु. २,००,०००/- च्या अंदाजपत्रकास व सदरचे अंदाजपत्रकास काम देखभाल व दुरुस्ती ९६-९७ या लेखाशिर्षकातून करण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ४१७/१२ :**

कार्यकारी अभियांत्रिकी यांनी प्रस्ताव सादर केला की, जहागिरदार कॉलनी येथे अर्धगोलाकार पूर्वरचित आर. सी. सी. गटार बांधणे बाबत परिसर अभियांत्रिकी विभागाचे सन ९५-९६ च्या दरसुची प्रमाणे र. रु. २,०९,५०७/- चे अंदाजपत्रक तयार करण्यात आले असून, सदरील खर्च " झोपडपट्टी व शहरातील भागात खुल्या गटारी बांधणे " या लेखा शिर्षातून करण्यात येईल.

तरी अंदाजपत्रक र. रु. २,०९,५०७/- च्या अंदाजपत्रकास मंजुरी मिळणेस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्यानुसार, जहागिरदार कॉलनी येथे अर्धगोलाकार पूर्वरचित आर. सी. सी. गटार बांधण्यासाठी परिसर अभियांत्रिकीच्या सन ९५-९६ च्या दरसुची नुसार तयार करण्यात आलेल्या र. रु. २,०९,५०७/- च्या अंदाजपत्रका तसेच सदरचा खर्च झोपडपट्टी व शहरातील भागात खुल्या गटारी बांधणे या लेखा शिर्षातून करण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यत येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ४१८/१३ :**

कार्यकारी अभियंता यांनी प्रस्ताव केला की, अजबनगर (छोटा तकीया) येथे १५० मी मी. व्यासाची एस. डब्ल्यु. जी. लाईन काढुन २५० मी. मी. व्यासाची आर. सी. सी. ड्रेनेज लाईन टाकणे बाबत परिसर अभियांत्रिकी विभागाचे सन ९५-९६ च्या दरसुचीनुसार अंदाजपत्रक तयार करण्यात आले आहे.

तरी अंदाजपत्रक र. रु. ४,२७,२७०/- चे मंजुरीस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्यानुसार, अजबनगर (छोटा तकीया) येथे १५० मी मी. व्यासाची एस. डब्ल्यु. जी. लाईन काढुन २५० मी. मी. व्यासाची आर. सी. सी. ड्रेनेज लाईन टाकणेसाठी परिसर अभियांत्रिकी ९५-९६ च्या दरसुची नुसार तयार करण्यात आलेल्या र. रु. ४,२७,२७०/- च्या अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ४१९/१४ :**

कार्यकारी अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, झोन क्र. ४ अंतर्गत जलनिःसारण वाहिनीची दुरुस्ती व देखभाल (भाग १) बाबत परिसर अभियांत्रिकी विभागाचे सन ९५-९६ च्या दरसुचीनुसार र. रु. २,१८,०००/- चे अंदाजपत्रक तयार करण्यात आले आहे. तरी अ. प. रु. २,१८,०००/- मंजुरीस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्यानुसार, झोन क्र. ४ अंतर्गत जलनिःसारण वाहिनीची दुरुस्ती देखभाल (भाग १) बाबत परिसर अभियांत्रिकीच्या सन ९५-९६ च्या दरसुचीनुसार तयार करण्यात आलेल्या र. रु. २,१८,०००/- च्या अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ४२०/१५ :**

कार्यकारी अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला की, झोन ४ अंतर्गत जलनिःसारण वाहिनींची दुरुस्ती व देखभालची कामे करणे (भाग-१) बाबत परिसर अभियांत्रिकी विभागाचे सन ९५-९६ च्या दरसुची नुसार रक्कम रु. २,१६,०००/- चे तयार करण्यात आले आहे. तरी र. रु. २,१६,०००/- यास मंजुरी मिळणेस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्यानुसार, झोन क्र. ४ अंतर्गत जलनि:सारण वाहिनींची दुरुस्ती व देखभालची कामे करणे (भाग-१) बाबत परिसर अभियांत्रिकी च्या सन ९५-९६ च्या दरसुची नुसार तयार करण्यात आलेल्या रक्कम रु. २,१६,०००/- च्या अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ४२१/१६ :**

कार्यकारी अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला की, मिलींद नगर (उस्मानपुरा) येथे ड्रेनेज लाईन टाकणे व नाल्यामध्ये सोडलेले ड्रेनेज लाईन मुख्य लाईनला मिळविणे बाबत परिसर अभियांत्रिकी विभागाच्या सन ९५-९६ च्या दरसुचीनुसार अंदाजपत्रक र. रु. २,६३,३००/- चे तयार करण्यात आले असून, सदरील खर्च " झोपडपट्टी सुधारण " ह्या लेखा शिर्षकातून करण्यात येईल.

तरी अंदाजपत्रक र. रु. २,६३,३००/- च्या अंदाजपत्रक मंजुरी मिळणेस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्यानुसार, मिलिंदनगर (उस्मानपुरा) येथे ड्रेनेज लाईन टाकणे व नाल्यामध्ये सोडलेले ड्रेनेज मुख्य लाईनला मिळविणे बाबत परिसर अभियांत्रिकी विभागाच्या ९५-९६ च्या दरसुचीनुसार तयार करण्यात आलेल्या रु. २,६३,३००/- च्या अंदाजपत्रकास तसेच सदरचा खर्च झोपडपट्टी सुधारणा ह्या लेखा शिर्षातून करण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ४२२/१७ :**

शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला की, मो. हर्षनगर स्लम वार्ड क्र. ४१ येथे खांडकी दुरुस्त करणे व फरशी बसविणे व गटार दुरुस्त करणे बाबतच्या कामाकरीता सा. बा. खात्याच्या वर्ष ९५-९६ च्या दरसुची नुसार रु. ८,३८,०००/- चे अंदाजपत्रक तयार करण्यात आलेले आहे. सदरील काम " खांडकी रस्ते " या शिर्षकातून करण्यात येईल. सदरच्या अंदाजपत्रकास मा. आयुक्त दि. ०९-०७-९६ ला प्रशासकीय मान्यता दिली असून, सर्वसाधारण सभेत दि. १९-०८-९६ रोजी मंजूरी मिळालेली आहे सदरील कामासाठी निविदा मागविण्यात आले असता अंतिम तारखेपर्यंत एकूण तीन निविदा प्राप्त झाल्या त्या खालील प्रमाणे.

| | | |
|---|---|---|
| १. | सिद्यीकी एस. झेड | ०.१५% कमी |
| २. | अब्दुल सलाम | ०.१०% जास्त |
| ३. | शेख सलीम | २% जास्त |

तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी म्हणजेच अंदाजपत्रकीय दरापेक्षा ०.१५% कमी दराची निविदा श्री. सिद्यीकी एस. झेड यांची आहे. तरी अं. प. दरापेक्षा ०.१५% कमी दराची असलेली श्री. सिद्यीकी एस. झेड यांची निविदेस मान्यतेचा प्रस्ताव विचारार्थ तथा मंजुरीस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्यानुसार, मो. हर्षनगर वॉर्ड क्र. ४१ येथे खांडकी दुरुस्त करणे व फरशी बसविणे व गटार दुरुस्त करण्याच्या कामासाठी सा. बा. खात्याच्या ९५-९६ च्या दरसुचीनुसार तयार करण्यात आलेल्या रक्कम रु. ८,३८,०००/- च्या अंदाजपत्रकीय कामासाठी निविदा मागविण्यात आल्या असता प्राप्त निविदापैकी तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी म्हणजेच अंदाजपत्रकीय दरापेक्षा ०.१५% कमी दराची निविदा श्री. सिद्यीकी एस. झेड यांची असल्याने श्री. सिद्यीकी एस. झेड यांची निविदा स्विकारण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. याच बरोबर प्रस्ताव कायम करण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ४२३/१८ :**

शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, मो. तक्षशिलानगर स्लम येथे १६ बैठकाचे सार्व. शौचालय बांधण्याबाबत कामाकरीता सा. बा. खाते यांच्या वर्ष ९५-९६ च्या दरसुचीनुसार रु. ३,२०,९२३/- चे अंदाजपत्रक तयार करण्यात आले आहे. सदरील काम देखभाल व दुरुस्ती या शिर्षकातून करण्यात येईल. सदरच्या अंदाजपत्रकास मा. आयुक्तांनी दिनांक २७-०६-९६ ला प्रशासकीय मान्यता दिली असून, स्थायी समिती दि. २१-०७-९६ ला मंजुरी मिळाली आहे.

सदर कामासाठी निविदा मागविण्यात आले असता अंतिम तारखेपर्यंत एकूण दोन निविदा प्राप्त झाल्या.

| | | |
|---|---|---|
| १. | श्री. सलीम अहमद | ४.९% जास्त |
| २. | ए. एम. फारुकी | १०% जास्त |

तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी म्हणजेच अंदाजपत्रकीय दरापेक्षा ४.९% जास्त दराची निविदा सलीम अहमद यांची आहे. परंतु हे कार्यालयाला जास्त वाटल्याने दराच्या वाटाघाटीसाठी बोलावण्यात आले असता व सदरील काम ठेकेदार यांनी अंदाजपत्रकीय दराने करण्यास संमती दर्शविली आहे.

तरी सदरील कमासाठी अंदाजपत्रकीय दराची असलेली श्री. सलीम अहमद यांची निविदेस मान्यतेचा प्रस्ताव विचारार्थ तथा मंजुरीस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्यानुसार, तक्षशिलानगर स्लम येथे १६ बैठकाचे सार्व. शौचालय बांधण्याच्या कामासाठी सा. बा. खात्याच्या वर्ष ९५-९६ च्या दरसुचीनुसार तयार करण्यात आलेल्या अंदाजपत्रकीय रक्कम रु. ३,२०,९२३/- ला दि. २१-०७-९६ च्या स्थायी समितीने मंजुरी दिल्यानुसार निविदा मागविण्यात आल्या असता प्राप्त निविदापैकी तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी म्हणजे अंदाजपत्रकीय दरापेक्षा ४.९% जास्त दराच्या निविदा ऐवजी वाटाघाटीत ठरल्यानुसार श्री. सलीम अहमद यांनी अंदाजपत्रकीय दराने काम करण्यास संमती दर्शविल्याने त्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ४२४/१९ :**

मालमत्ता अधिकारी यांनी मा. आयुक्त यांच्या मंजुरी नुसार प्रस्ताव सादर करीत आहे की, सौ. कला सुरेश बोरमणाकर उत्कर्ष महिला विकास मंडळ यांना मा. जिल्हाधिकारी औरंगाबाद यांचे पत्र क्र. ०६/पुरवठा/झुभायो/मंजुरी दिली आहे. मा. स्थायी

समिती ठराव क्र. १०५/५० दि. १२-०७-९६ अन्वये एस. बी. थांब्याजवळ गणेश विसर्जनाकडे जाणाऱ्या उत्तरेस जागा देण्यात आली होती.

तथापी सरस्वती शिक्षण संस्थेच्या प्रशासनाने जागे बाबत वाद निर्माण केल्यामुळे जागा देता आली नाही.

तथापी स्थायी समिती ठराव क्र. ३४५/२२ दि. ०९-१०-९६ ला झुणका भाकर केंद्रासाठी ८ x १५ निराला बाजार समर्थनगर ते औरंगपुरा बलवंत वाचनालयाकडे जाणाऱ्या रस्त्यावर खालील चतु:सिमेनुसार झुणका भाकर केंद्रासाठी विनामुल्य जागा देण्याबाबत प्रस्तावित करण्यात येत आहे.

| | | |
|---|---|---|
| पुर्वेस | : | औरंगपुरा ते समर्थनगर जाणाऱ्या रस्त्यावरील पुलाची भिंत |
| पश्चिमेस | : | जि. प. कुंपन भिंत |
| दक्षिणेस | : | खुली जागा व नाला भिंत |
| उत्तरेस | : | खुली जागा व २० फुटावर जि. प. शाळा गेट |

वरील चतु:सिमेस दर्शविल्याप्रमाणे झुणका भाकर केंद्रासाठी खालील अटी शर्तीनुसार देता येऊ शकेल.

१. झुणका भाकर केंद्रामुळे रस्त्यावरील वाहतुकीस अडथळा व अडचण निर्माण होणर नाही याची दक्षता घ्यावी.
२. झुणका भाकर केंद्राचे बांधकाम पक्क्या स्वरुपाचे करावयाचे झाल्यास मनपाची पुर्व परवानगी घेणे बंधनकारक राहील.
३. ज्या वेळेस मनपास या जागेची आवश्यकता भासेल किंवा उपरोक्त दोन मुद्यांमुळे निर्माण होणाऱ्या परिस्थितीमुळे किंवा रहदारीत बाधा निर्माण होणाऱ्या परिस्थितीमुळे मनपाकडून झुणका भाकर केंद्र हलवावे लागल्यास मनपा केव्हाही जागा रिकामी करुन घेण्यात येईल. व संबंधितावर ही जागा रिकामी करुन देणे बंधनकारक रहील. करीता प्रस्तव मान्यतेस्तव व विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्यानुसार, सौ. कला सुरेश बोरमणीकर उत्कर्ष महिला विकास मंडळ यांना मा. जिल्हाधिकारी औरंगाबाद यांनी पत्र क्र. २६/पुरवठा/झुभायो/९६/९७ दि. १२-०८-९६ अन्वये औरंगपुरा परिसरात झुणका भाकर केंद्र उघडण्यास मंजुरी दिल्यानुसार स्थायी समिती ठराव क्र. १०५/५० दि. १२-०७-९६ अन्वये एस. बी. थांब्याजवळ गणेश विसर्जनाकडे जाणाऱ्या रस्त्याच्या उत्तरेस जागा देण्यात आली होती. तथापी सरस्वती शिक्षण संस्था प्रशासनाने जागेबाबत वाद निर्माण केल्याने जागा देता आली नाही. तथापी स्थायी समिती ठराव क्र. ३४५/२२ दि. ०९-१०-९६ ला झुणका भाकर केंद्रासाठी औरंगपुरा येथे ८ x १५ फुट निराला बाजार समर्थनगर ते औरंगपुरा बलवंत वाचनालयाकडे जाणाऱ्या रस्त्यावर प्रस्तवात दर्शविलेल्या अटी व शर्तीच्या आधीन राहून प्रस्तावित चतु:सिमे अंतर्गत झुणका भाकर केंद्रासाठी भाकर केंद्रासाठी विनामुल्य जागा देण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ४२५/२० :**

मालमत्ता अधिकारी यांनी मा. आयुक्तां यांच्या मंजुरीनुसार प्रस्ताव सादर करीता आहे की, श्रीमती कोकीळा किशोर पंडया यांना मा. जिल्हाधिकारी औरंगाबाद यांचे पत्रक ९६/पुरवठा/झुभायो/९६-९७ दिनांक १२-०८-९६ अन्वये बाबा पेट्रोल पंपाजवळ झुणका भाकर केंद्र उघडण्यासाठी मंजुरी दिली आहे.

प्रिन्ट्रॅव्हल चौक ते रेल्वे स्टेशन रस्त्यावर युथ हॉस्टेलच्या भिंतीलगत ८ x १५ ची जागा विनामुल्य देण्याबाबत प्रस्तावित करण्यात येते. याची चतु:सिमा खालील प्रमाणे आहे.

पुर्वेस : युथ हॉस्टेल कुंपन भिंत
पश्चिमेस : प्रिन्ट्रॅव्हल ते रेल्वे स्टेशन १०० फुट रस्ता
दक्षिणेस : कॉलनी कडे जाणारा रस्ता
उत्तरेस : खुली जागा

झुणका भाकर केंद्रासाठी खालील अटी व शर्ती नुसार देता येऊ शकेल.

१) झुणका भाकर केंद्रामुळे रस्त्यावरील वाहतुकीस अडचण अडथळा निर्माण होणार नाही याची दक्षता घ्यावी.

२) झुणका भाकर केंद्राचे बांधकाम पक्क्या स्वरुपाचे करावयाचे झाल्यास मनपाची पुर्व परवानगी घेणे बंधनकारक राहील.

**२)** ज्या वेळेस मनपास जागेची आवश्यकता किंवा उपरोक्त दोन मुद्यांमुळे निर्माण होणाऱ्या परिस्थितीमुळे किंवा रहदारीस बाधा निर्माण होणे या मुद्यांमुळे निर्माण होणाऱ्या परिस्थितीमुळे मनपाकडून झुणका भाकर केंद्र हलवावे लागल्यास मनपाकडून केव्हाही जागा रिकामी करुन घेण्यत येईल. व संबंधितांवर ही जागा रिकामी करुन देणे बंधनकारक राहील करीता प्रस्ताव मान्यतेस्तव व विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्यानुसार, श्रीमती कोकीळा किशोर पांडया यांना मा. जिल्हाधिकारी औरंगाबाद यांचे पत्र क्र. ९६/पुरवठा/झुभायो/९६-९७ दि. १२-०८-९६ अन्वये बाबा पेट्रोल पंपाजवळ झुणका भाकर केंद्र उघडण्यासाठी मंजुरी दिली आहे. प्रस्तावात दर्शविल्यानुसार प्रिंट्रॅव्हल व चौक ते रेल्वे स्टेशन रस्त्यावर युथ हॉस्टेलच्या भिंती लगत ८ x १५ फुटाची जागा प्रस्तावातील चतु:सिमे अंतर्गत अटी व शर्तीच्या आधीन राहून विनामुल्य जागा देण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**संवाद :**

**श्री. रशिद खान (मामू) :** स. नगरसेविका आबेदा बेगम यांच्या वॉर्डातील शाळेबाबत त्यांनी केलेल्या मागणीवर प्रशासनाने काय केले?

**शहर अभियंता :** नाल्याच्या जागेवर शाळा इमारत बांधण्याची त्यांची मागणी आहे. परंतु यातील बरीचशी जागा रस्ता रुंदी करणात त्यामुळे तेथे शाळा बांधता येणार नाही.

**स. श्री. गौतम खरात :** डॉ. बाबासाहेब आंबेडकर रिसर्च सेंटर उद्यानाचे बांधकाम बरोबर होत नाही. या कामात मा. आयुक्तांनीच लक्ष घालावे.

**मा. सभापती :** दोन्ही प्रकरणात मा. आयुक्तांनी स्वतः लक्ष घालून निर्णय घ्यावेत.

सायंकाळी ५.०० वाजता राष्ट्रगिताने सभेची सांगता झाल्याचे मा. सभापती यांनी घोषीत केले.

| | |
|---|---|
| स्वाक्षरित/- | स्वाक्षरित/- |
| नगरसचिव, | स्थायी सभापती, |
| महानगरपालिका, औरंगाबाद. | महानगरपालिका, औरंगाबाद. |

# *औरंगाबाद महानगरपालिका औरंगाबाद*

**दिनांक २९-११-९६ रोजी संपन्न झालेल्या स्थायी समितीचे इतिवृत्त. शुक्रवार दिनांक २९-११-९६ रोजी दुपारी ३.०० वा. सभापती, स्थायी समिती, यांचे अध्यक्षतेखाली स्थायी समिती सभा संपन्न झाली. तिचे इतिवृत्त उक्त सभेस मनपा अधिकाऱ्यांसह खालील स. सदस्य उपस्थित होते.**

| | | |
|---|---|---|
| १) | स. स. श्री. गौतम खरात | स. सदस्य |
| २) | स. स. श्री. कंवरसिंग बैनाडे | -//- |
| ३) | स. स. श्री. विजयकुमार मेहेर | -//- |
| ४) | स. स. श्री. महादेव सुर्यवंशी | -//- |
| ५) | स. स. श्री. हमीदउद्दीन ताबा | -//- |
| ६) | स. स. श्री. त्र्यबंक तुपे | -//- |
| ७) | स. स. श्री. सुभाष टाकळकर | -//- |
| ८) | स. स. श्री. अभिमन्यु भालेराव | -//- |
| ९) | स. स. श्री. कचरु नवपुते | -//- |
| १०) | स. स. श्री. विकास जैन | -//- |
| ११) | स. स. श्री. अ. रशिद खान (मामू) | -//- |

**संवाद :**

**श्री. विकास जैन, श्री. कचरु नवपुते :** स. स. श्री. धिरज खखोरडीया यांचे बंधु कै. किशोर खखोरडीया यांचे दुःखद निधन झाले. त्याच प्रमाणे उप अभियंता श्री. कलिम बख्खतर यांचे वडील पै. मो. शहाबुद्यीन शनिम यांचे दुःखद निधनाने सभागृहातर्फे ००.०२ मिनिटे श्रध्दांजली वाहण्यास यावी.

**मा. सभापती** : ठिक आहे.

सभागृहात ००.०२ मिनिटे स्तब्द उभे राहून श्रध्दांजली वाहण्यात आली.

**श्री. हमीदउद्यीन ताबा :** शहानुरवाडी येथील एका ड्रेनेज लाईन टाकण्याचे काम रेटलिस्टवर असतांना सदरील काम रु. ५.०० लाखावर गेलेले असून, याबाबत सर्वत्र चर्चा होत आहे व वर्तमान पत्राद्वारे प्रशासनाची बदनामी होत आहे. याबाबत चौकशी करुन संबंधिता बाबत कार्यवाही व्हावी.

**मा. सभापती** : प्रशासनामार्फत असा खुलासा व्हावा की, सदरचे काम रेटलिस्टवर दिलेले असतांना आता रु. ५.०० लाखाचे अंदाजपत्रक कसे तयार झाले.

**कार्यकारी अभियंता :** सन १९८९-९० मध्ये ड्रेनेज लाईनचे रु. १.५० लाखाचे काम होते. एस. डब्ल्यु लाईन ६" इंचाची टाकलेली होती. दोन वर्षानंतर ज्योती नगर दशमेश नगर या भागातही लाईन टाकली. याच शहानुरवाडीच्या ड्रेनेज लाईनला लाईन जोडण्यात आली. नंतर जी लाईन इनसफिशियंट असल्याने रु. ५.०० लाखाचे टेंडर काढून करण्यात येईल.

**मा. सभापती** : आपण लाईन किती इंचाची टाकलेली होती.

**कार्यकारी अभियंता :** १५० मी. मी. १२" इंचाची लाईन टाकली इंटरनल लाईन सुरुवातील टाकली.

**श्री. हमीदउद्यीन ताबा :** माजी आयुक्त यांनी सदरच्या संचिकेत असे म्हटले आहे की, संबंधित काम ऑर्डीनरी स्वरुपाचे केले असून, त्यामुळे संबंधित अधिकाऱ्यांच्या पगारातुन पैसा कपात करावा याबाबतचा खुलासा मा. आयुक्त यांनी करावा.

**मा. सभापती** : शहानुरवाडी येथील ड्रेनेज लाईन टाकण्याचे काम चालू होते. त्यावेळस नगरसेवक नीट होत त्यावेळी मी प्रशासनाच्या याबाबत निदर्शनास आणून दिले होती आणि त्यावेळी संबंधित गुत्तेदाराचे नांव ब्लॅक लिस्ट मध्ये टाकले होते की, अशा पध्दतीने चुकीचे काम करु नये म्हणून इंटरनल लाईन टाकली होती रु. १.५० लाखाची ती स्लममध्ये होती व बाहेत रोडच्या बाजुला टाकली ती १२" इंची टाकली आणि ती जवळपास १३ फुट खोल आहे. त्याचे अंदाजपत्रक रु ५.०० लाखाचे आहे.

**कार्यकारी अभियंता :** १३ फुट खोल लाईन टाकलेली आहे ती सन १९८९-९० मध्ये टाकलेली आहे. ज्यावेळी शहानुरवाडी स्लम घोषित झाले. त्यावेळी त्या ठिकाणी ड्रेनेज लाईनची व्यवस्था नसल्याने आपण तिथे डब्ल्यु ई. सी. बांधण्याचे प्रयोजन केले होते, हे बांधतांना त्याठिकाणी जागा मिळत नव्हती. व एका खाजगी मालकांनी ते काम थांबवले आणि म्हांडाकडून आपणास अनुदान मिळाले व पीरबाजार रोडकडील लाईनला जोडली. ही लाईन वर्षभर चालली. परंतु त्यानंतर याच ठिकाणी दुसरा एक विभाग जोडण्यात आला त्यामुळे बदलवली.

**मा. सभापती** : वर्तमानपत्रात अशी बातमी प्रसिध्दीस आलेली आहे की, ज्यावेळी शहानुरवाडी जवळ नाला असतांना देखील दुरच्या नाल्याला देऊन टाकली त्यावेळेस शहानुरवाडीचा जो नाला आहे. त्यामध्ये सेवरेज लाईन मोठी लाईन मुख्य लाईन ही नव्हती. म्हणून आपण जिथपर्यंत मेन लाईन नव्हती तिथपर्यंत नेऊन जोडली.

**श्री. हमीदउद्यीन ताबा :** माजी आयुक्त यांनी जो शेरा सबंधित कामाबाबत दिलेली आहे. त्याची माहिती दयावी.

**मा. सभापती** : त्याची माहिती दयावी.

**श्री. अ. रशिद खान (मामू) :** शहानुरवाडीतून प्रतापनगरला जी लाईन आणून सोडली ती जोडलेलीच नव्हती चेंबर धनवन संबंधित गुत्तेदाराने पैसे खाल्ले ते आहेत. आणि सदरील व्यक्ती औरंगाबादच्या फार मोठया पुढाराचा पुतळा होता. याबाबत माजी आयुक्त यांच्या बरोबर पाहणी केली होती.

**कार्यकारी अभियंता :** या ठिकाणी जी " ६ इंची लाईन त्या लाईनला अजूनही धक्का लावलेला नाही. "

**श्री. अब्दुल रशिद खान मामू :** या ठिकाणी लाईन नव्हती. त्यासाठी संबंधित गुत्तेदारास मनपा तर्फे कार्यवाही करुन पोलीस तक्रार करावी म्हणून सांगितले होते. तथापी कार्यवाही झाली नाही. त्यानंतरही पुन्हा १२ " इंची लाईन दोनदा टाकणेची कार्यवाही करण्याचे सांगितले तेही झाले नाही. आतच्या ठिकाणी ३-३ लाईन झालेल्या आहेत व एक लाईन उलटी आणलेली आहे.

**कार्यकारी अभियंता :** एक लाईन ज्योतीनगर, दशमेशनगरची लाईन आहे व त्या भागात विकासामुळे कामे होत आहेत.

**श्री. अ. रशिद (मामू) :** आपण चुकीची माहिती देत आहात. स्लम विभागाची जी लाईन आहे जी तीन गल्ल्यांसाठी आपण जोडली आहे. आता आपण एकूण सात गल्ल्या

जोडलेल्या आहेत. त्यावेळी प्रतापनगरमध्ये फक्त चेंबर बनवुन संबंधितांनी पैसे उकळले त्यावर कार्यवाही करण्याचे सुचविले नंतर १२ " लाईन टाकण्याचे सांगितले ती सुध्दा चुकिची होती म्हणुन याबाबत कार्यवाही होणे आवश्यक आहे.

**मा. सभापती** : याबाबत माजी आयुक्त यांनी जी शेरा दिलेला आहे. तो सांगण्यास यावा. माझ्या माहितीप्रमाणे संबंधित कामाबाबत सदरील अधिकाऱ्यांच्या पगारातुन खर्च वसुल करण्यात यावा असे आहे. त्या व्यतिरिक्त मा. आयुक्त यांनी तपासून योग्य ती कार्यवाही करावी.

**कार्यकारी अभियंता** : याबाबत संबंधित साईटवर प्रत्यक्षात जी जुनी लाईन दाखविली आहे व वस्तुस्थिती काय आहे ते पहावे.

**मा. सभापती** : याबाबत मा. आयुक्त यांनी माहिती दयावी.

**मा. आयुक्त** : अब्दुल अजीज म्हणून आपल्याकडे सेवा निवृत्त इंजिनिअर होते ते आणि जनता दलाचे काही कार्यकर्ते आठच दिवसांपुर्वी माझेकडे आले होते. त्यांनी माझेकडे अर्ज दिला की, शहानुरवाडी येथील ड्रेनेजचे जे काही काम झालेले आहे. या कामास फार मोठया प्रमाणात भ्रष्टाचार झालेला आहे आणि एकंदर रु. ५.०० लाख वसुल करावे यामध्ये कार्यकारी अभियंता श्री. सोनवणे यांना प्रत्यक्ष जबाबदार माजी आयुक्तांनी धरलेले आहे आणि आदेश केलेले आहे. तेव्हा तुम्ही कार्यवाही का करीत नाही. सदरची फाईल मी दोन दिवसांपुर्वी मागितलेली आहे आणि त्या फाईलची संपूर्ण छाननी करुन कोण जबाबदार आहे. वसुली करणे योग्य आहे का? अयोग्य आहे हे छाननीचे काम सध्या सुरु आहे आणि या कामी जबाबदार कुणी आढळल्यास निश्चितस त्यांचेवर आम्ही कार्यवाही करु कारण की, शासनाने प्रति नियुक्तीवर आलेले मुख्य लेखा परीक्षक श्री भोसले यांचेकडे ते सुपर व्हिजनचे काम होते.

**मा. सभापती** : संपुर्ण छाननी करुनच पुढील कार्यवाही व्हावी.

**श्री. हमीदउद्दीन ताबा** : महापालिकेचे जे गाळे आहेत. ते गेल्या दहा बारा वर्षापासून त्याचे भाडे थकित आहे व ते लोक स्वत: घेउुन दुसऱ्यास गाळे चालविण्यास देऊन पैसे कमवित आहेत. त्यात प्रामुख्याने नाथ मार्केटमधील श्री. बासटवार यांचे बाबतीत आहे. त्यांच्याकडे रु. १.५० ते २.०० लाखापर्यत थकित भाडे आहे. अशा प्रकारचे महपालिकेचे शहरातील ५० गाळयांचे बाबतीत अशीच थकीत व इतरांना देऊन केलेले गाळे आहेत. याबाबत आपण काय कार्यवाही केली.

**मा. आयुक्त** : याबाबत मुळ जे बासटवार आहेत. त्यांना आपण गाळा दिलेला आहे. त्यांचे हे धाकटे बंधू होते. त्यांच्याकडे फॅमिली शिफ्टींगमध्ये सध्या त्यांचा ताब्यात जो गाळा आहे. त्यांच्याकडे हा गाळा देण्यात येत आहे. अशा प्रकारचा कोर्टामध्ये फॅमिली सेटलमेंट केलेला आहे. याप्रमाणे माझे नांव या गाळयामध्ये बदलून दयावे असा विनंती अर्ज त्यांनी आपल्याकडे दिलेला आहे. परंतु पुर्वीची जी थकबाकी आहे ती थकबाकी जवळपास १.० लाखाची होती ती भरल्याशिवाय आम्ही तुमच नाव नांवावर करुन घेणार नाही. अशा प्रकारची महापालिकेची भूमिका होती. त्यांनी अनीत अनेक मुद्दे लिहीलेले होते. तथापी आपण त्या गाळयाला सिल लावलेले होते की, त्या मालकास हुसकूवून लावण्यासाठी आणि आता सर्व १.५० लाख रु. थकीत वसुली कोर्टाच्या सेटलमेंट प्रमाणे करुन नावांवर केलेले आहे.

**श्री. हमीदउद्दीन ताबा :** अशा प्रकारचे संपूर्ण शहरात कित्येक उदाहरण आहेत. त्याबाबत आपण काय निर्णय घ्याल?

**मा. सभापती** : याबाबत पूर्ण शहराचा नाईट सर्व्हे करुन सर्व्हेत मालमत्ता अधिकारी यांना महापालिकेच्या मालकिचे एकूण गाळे किती? किती गाळे कुणाच्या नावे आहेत व आता तो गाळेधारक आहे की अजून कुणी? त्याचे भाडे नियमित चालू आहे किंवा नाही अशा प्रकारचा सर्व्हे करुन अहवाल मी पत्राद्वारे मागितलेला आहे दुसरे असे की, जे काही स्टॉल्स आपण परवानगीने देता त्याचा विस्तार फार मोठया प्रमाणात झालेला आहे. याचाही सव्हे्र करुन तेही रिपोर्ट स्थायी समितीला द्यावा.

**श्री. हमीदउद्दीन ताबा :** शहागंज भाजी मंडई अशाच प्रकारचे गेले कित्येक वर्षापासून भाडे थकित देऊन दुसऱ्यांच्या नावांवर गाळे आहेत. त्याची चौकशी व्हावी.

**मा. सभापती** : याचसाठी सर्व्हे करुन डिटेल अहवाल मागविलेला आहे.

**मा. आयुक्त** : श्री. बासटवार यांची केस वेगळी आहे. यामध्ये कोर्टाच्या आदेशाप्रमाणे आपण ट्रान्सफर केला आहे. आज गाळा दिला आहे " अ " व्यक्ती परस्पर महापालिकेस न विचारता जर ते काही आपले किरायेदार होऊ शकत नाही. त्यांच्याकडून काढून घ्यावा. त्याप्रमाणे ठरविल्यास किती येईल.

**श्री. अ. रशिद खान (मामू) :** अशा प्रकारचे शहरात बहुतेक आढळतील. मध्यवर्ती बस स्टँड समोर किंवा शासकीय रुग्णालयाच्या रोडवर आपण अपंग लोकांना जागा दिली परंतु आज त्या जागेचा वापर वेगवेगळया प्रकारे करतांना आढळतात. पानचक्की रोडवर ५०,०००/- डिपॉझिट व रु. ६,०००/- रु. किराया म्हणजे रु. २५/- रु. सुध्दा किराया पडत नाही. म्हणजे आपण किती बाय कितीची जागा संबंधितांना दिली आपण बऱ्याचशा रोडवरती फुटपाथ ठेवतो तो ३० फुटाचा न ठेवता १० फुटाचा ठेवावा. दोन्हीही बाजुने.

**मा. सभापती** : मी आज सर्व्हे केला जेव्हा असे आढळले की, रोड वाईडींग करतो. तेव्हा मध्ये रोड करतो व जागा साईडला सोडतो. त्याच्याऐवजी रोड शेवटपासून घ्यायचा आणि जागा मध्ये सोडायची म्हणजे कुणीही अतिक्रमण करण्याचा प्रश्नच येत नाही व मधल्या जागेत झाडे फुलझाडे लावता येतील.

**श्री. अ. रशिद खान (मामू) :** जिल्हाधिकारी कार्यालयाकडे जसे फुटपाथ आहे त्यानंतर रोड येते त्यापेक्षा मुंबई पुणे येथील रोड कसे आहेत. फुटपाथ फरशी बसवुन घ्यावी जेणे करुन महापालिकेला समजुन घेऊ शकतील. अन्यथा ज्या टपऱ्यांना आपण रोडच्या साईडला परवानगी देतो ते यामुळे अतिक्रमण करुन राहतात व समजून येत नाही. जसे की, एमएसईबी कार्यालयाच्या रोडवर आहे तशी अशी काही प्रकरणे आहेत की ज्यामुळे टपरीवाले लोक अतिक्रमण करुन कोर्टातून स्टे आणतात त्यासाठी शहरातील नामवंत वकिलांना अशा केसेस द्याव्यात जेणेकरुन ज्यांना १०-१५ वर्षाचा अनुभव असेल आज आपल्याकडे नविन व्यक्तींना पॅनेलवर घेऊन काम चालविले जाते. याबाबत शहानिशा करावी.

**मा. आयुक्त** : स. सदस्यांनी सुचना केल्याप्रमाणे पानचक्की रोडचा ज्यावेळी सर्व्हे केला त्यावेळी फुटपाथवरील अतिक्रमण व अंध अपंग व्यक्ती झोपडया टाकुन राहिलेले होते. त्यामुळे फुटपाथवर झोपडपट्टी तयार होते की, काय अशी शंका संबंधित नगरसेवकांनी व्यक्ती केलेली होती आणि याबाबत आवश्यक

आहे की, फुटपाथवर अतिक्रमण होता कामा नये आणि त्या झोपडया आपण काढलेल्या आहेत, याच बाबत अपंग मंडळीनी गेले तीन दिवस आपल्याकडे उपोषण सुरु केलेले होते. पण आम्ही समजावुन सांगितले की, आपली जी काही मागणी आहे ती आम्हाला मान्य नाही, कुणीही फुटपाथवर आपला संसार थाटू शकत नाही. फुटपाथ हे चालण्याकरीता आहे याबाबत पुर्वी ज्या ३ अंध अंपगांनी टपऱ्या टाकल्या होत्या त्यापैकी एक नाही. दोघे आहेत त्यांनी मेडीकल समोर टपरीसाठी सहानूभूतीपूर्वक विचार करण्याचा अर्ज दिला आहे. त्याबाबत आपण विचार करीत आहोत. शिवाय रोडच्या फुटपाथवर अशा प्रकारचे अतिक्रमण होऊन टपऱ्या बसल्यास शहराची व रोडची शोभा राहणार नाही. यासाठी रोड तयार करीत असतांना ठरविणे आवश्यक आहे की, फुटपाथ किती फुटाचे असावे, त्याचे नियोजन होणे आवश्यक आहे की, याचे भाव काढणे आवश्यक आहे.

**श्री. शहर अभियंता :** १०० फुटी रोडसाठी १० फुटाचा फुटपाथ असावा.

**श्री. अ. रशिद खान (मामू) :** अशा रोडसाठी फुटपाथ कट करुन रस्ता रुंदीकरण करुन दयावा.

**मा. सभापती** : मालमत्ता अधिकारी यांनी या सगळया सुचनांनी कार्यवाही करतो. त्यावेळी मुद्दयाचा विचार व्हावा. यापुढे लक्षात घ्यावे की, रस्ता तयार करीत असतांना ड्रेनेज व पाणी पुरवठा लाईनसाठी १-२ मीटर जागा सोडून बाकी डांबरीकरण करावे व रोडच्या मधोमध फुलझाडे लावण्यासाठी जागा सोडावी.

**डॉ. विजयकुमार मेहेर :** शहरामध्ये असे अनेक अतिक्रमण करुन टपऱ्या बसलेल्या आहेत, जे अपंग व्यक्तींनी मागणी केल्या प्रमाणे त्यांच्या बाबतीत सहानुभूतीपूर्वक विचार करुन सभागृहाने निर्णय घ्यावा अशी जी विनंती करतो.

**श्री. अ. रशिद खान (मामू) :** मला असे सांगावयाचे आहे की, पानचक्की रोडवर टपरीसाठी जागा मागावयाची व उर्वरीत जागेवर अतिक्रमण करुन दुसराचा वापर करायचा हे योग्य वाटत नाही. माझे टपरीला परवानगी द्यावी. परंतु त्याला लागून बाकी खाली जागेचा गैरवापर होतो त्याची दक्षता घ्यावी.

**श्री. गौतम खरात :** नियमाप्रमाणे ४ x ६ ची टपरीस परवानगी दयावी. परंतु ज्यांच्या कडे ४ x १० च्या जागा जास्तीचे वापरात आहेत त्यांचे परवानगी काढून द्यावी. मेडीकल गेटच्या मधोमध पुर्णत: अतिक्रमण आहे. आणि कोटीचा स्टे आणलेला आहे. आपण किती दिवस सहन करायचे अशा लोकांना तुम्ही काय शिक्षा देणार? एकाने अनाधिकृत मेडिकल स्टोअर टाकले? आपण काय कार्यवाही केली.

**मा. सभापती** : प्रशासकीय अधिकारी यांनी वरील सुचनेची नोंद घेऊन कार्यवाही करावी.

**श्री. कचरु नवपुते :** आपल्याकडी वकिलांचे जे पॅनेल आहेत. त्यामध्ये काही वकील पाहिजे तशी महापालिकेची बाजू मांडत नाहीत. त्यासाठी बदल करण्यात यावा.

**मा. सभापती** : ठिक आहे. प्रशासनाने याची दखल घेऊन कार्यवाही करावी.

**श्री. अब्दुल रशिद खान (मामू) :** वकिल विधिज्ञ असावयास पाहिजे व अनुभवी असणे आवश्यक आहे जेणे करुन त्यांची फिस जास्त असली तर हरकत नाही. परंतु नावाजलेले व महापालिकेची परखडपणे बाजू मांडणारे वकिल असावे.

**मा. सभापती** : याबाबत महापालिकेचे काही नॉर्मल असतील.

**मा. आयुक्त** : यामध्ये अशी भूमीका घेतलेली आहे की, कनिष्ठ न्यायालयामध्ये काम करणारे वकील वरिष्ठ न्यायालयात काम करणारे वकिल यांचे पॅनेल असावयास पाहिजे. जे वकिल नेमलेले आहेत. त्या वकिलांना काम वाटुन देतात ते विधी सल्लागार वाटुन देतात. एखादी जर वेगळीच केस असल्यास त्यावेळी मोठी केसची तत्परता लक्षात घेता चांगल्या वकीलांकडे केस देऊ शकतो. कारण ज्येष्ठ वकीलांची आपणांस गरज असल्यास त्याप्रमाणे फिस दयावी लागणारच परंतु असे वकिल आपण नेमक्या केसेसमध्ये () नेमतो फक्त पॅनेल मधील वकिल बदलावयाचे झाल्यास आपण बदलवू शकतो. सध्या याबाबत कार्यवाही चालू असून २५१ अर्ज प्राप्त झाले आहे. त्याची छाननी करुन बार असोशिल्शनशी चर्चा करुन गरज पडल्यास चपळगांवकर साहेबांशी चर्चा करुन कोण वकिल कनिष्ठ व वरीष्ठ न्यायालयात घ्यावे यांची शहानिशा करुनच निर्णय घेऊ.

**श्री. अ. रशिद खान (मामू) :** महापालिकेची बाजु मांडणारे व अनुभवी वकिल नेमल्यास बऱ्याचशा केसेस ज्या पेंडींग आहेत त्या निकाली लागतील. याचसाठी अनुभवी वकिलांना पॅनेलवर घ्यावे.

**श्री. हमीदउद्यीन ताबा** : आपल्याकडील जकात नाक्यावरील २-५ वर्षापुर्वी अँटी करप्शन वाल्यांनी पावती पुस्तके घेऊन गेलेली आहेत. त्याबाबत काय झाले याची माहिती दयावी.

**मा. सभापती** : संबंधित अधिकाऱ्यांनी खुलासा करावा.

**जकात अधिक्षक :** अँटी करप्शन वाल्यांनी पावती बुक चौकशीसाठी नेलेले आहेत.

**मा. सभापती** : अँटी करप्शनवाल्यांनी नेलेले बुक त्यांची चौकशी पुर्ण केल्याशिवाय परत करणार नाहीत.

**श्री. हमीद उद्यीन ताबा :** याबाबत आपण अद्याप संपर्क केला आहे काय? सदरील विचारणा करुन माहिती दयावी. याबाबत उप आयुक्त-१ यांनी विशेष लक्ष घालून कार्यवाही करावी संबंधित विभागाशी पत्र व्यवहार करुन दिलेल्या निर्णयाची माहिती द्यावी. ह्य

**श्री. हमीद उद्यीन ताबा :** कर आकारणी बाबत आपण ज्या अधिकाऱ्यांकडे काम सोपविलेले आहेत त्याबाबत किती प्रमाणात वसुली होत आहे. याची माहिती द्यावी आणि कर आकारणी विभागात बरेचसे कर्मचारी फक्त बसुन राहतात. त्यांना काहीच कामे नाहीत काय?

**मा. सभापती** : याबाबत पुढील बैठकीत माहिती देण्यात येईल.

**श्री. हमीदउद्यीन ताबा :** उप शिक्षणाधिकारी पदनिर्मिती बाबत प्रशासन जर कार्यवाही करीत असेल तर शिक्षण विभागातील शिक्षकांच्या ज्येष्ठता यादीतून घ्यावे यामध्ये मराठी व उर्दू माध्यमांचे शिक्षक कार्यरत आहेत. त्यांच्यातुन घ्यावे इतर ठिकाणी काम करणारे कर्मचाऱ्यांमधून घेऊ नये.

**मा. सभापती** : मी आपल्या विचारांशी सहमत आहे. परंतु हे पॉलिसी मॅटर असल्यामुळे सर्वसाधारण सभा यावर निर्णय घेईल.

**श्री. हमीदउद्यीन ताबा :** सिटी चौक पोलिस चौकी पासूनचा रस्ता रुंदीकरणाच्यासाठी जी जमिन संपादित करण्यास आली त्याचा मोबदला अद्यापही मिळालेला नाही.

**लेखाधिकारी - १ :** दिवाळी नंतर पैसे देवू असे सांगितले होते.

**श्री. हमीद ताबा :** रंगारगल्ली बाबत काय कार्यवाही केली.

**मा. सभापती** : रंगारगल्ली रस्त्याबाबत अगोदर ५० फुटी नंतर ४५ फुट आणि नंतर नागरिकांच्या विनंती नुसार तो रस्ता ४० फुटी करण्यास मा. आयुक्तांकडे ठरलेले आहे. परंतु त्यास सर्वसाधारण सभेची मंजुरी घेतलेली नाही.

**मा. आयुक्त** : अगोदर प्लॅनिंग कमिटी नंतर सर्वसाधारण सभा व नंतरच शासनाकडे प्रस्ताव पाठविला जाईल.

**श्री. हमीदउद्यीन ताबा** : रस्ता कमी करता येतो काय?

**मा. सभापती** : शासनाने गाईड लाईन काही दिलेल्या आहेत ज्या आधारे प्लॅनिंग कमिटी त्यावर विचार करते. रंगारगल्ली हा भाग शहराच्या आतील भाग असून, शहराचा मुख्य भाग नाही. यासाठीच या रस्त्यात बदल करण्याचा प्लॅनिंग कमीटीला अधिकार आहे व त्यानुसार कार्यवाही करु शकते.

**श्री. हमीदउद्यीन ताबा** : शहागंज ते लेबर कॉलनीकडे जो रस्ता नविन केलेला आहे. तो ५० फुटी आहे. यामध्ये सुध्दा प्लॅनिंग कमीटीकडून २० फुट रस्ता वगळण्याचा प्रस्ताव ठेवावा.

**मा. सभापती** : ठिक आहे. याबाबत प्लॅनिंग कमीटीकडे ठेवावे. किती प्लॅन रिव्हाइज्ड करणार आहोत. त्यावेळेस विचार.

**श्री. अ. रशिद खान (मामू)** : भडकल गेट येथील शाळा इयत्ता १ ली ते ७ वी पर्यंत आहे. त्या शाळेचे नांव नुतन माध्यमीक शाळा ऐवजी न्यु मिडल स्कुल असे नामांतर केल्यास योग्य होईल.

**मा. सभापती** : शिक्षणाधिकारी यांनी खुलासा करावा.

**शिक्षणाधिकारी** : नुतन माध्यमिक ही शाळा आहे. त्या अगोदर जुन्या भडकल गेट येथील शाळेत भरत होती ती शाळा दुसऱ्यांना दिली व येथील शाळा नुतन माध्यमिक शाळा म्हणून ज्युब्ली पार्कच्या शाळेत शिफ्ट केली आणि ही शाळा इयत्ता ५ वी ते ७ वी मराठी व उर्दू माध्यमातुन चालायची परंतु ज्युब्ली पार्कच्या इमारतीत गेल्यानंतर त्या इमारतीचे विस्तारिकरण आपण केस त्यात तीन शाळा एकत्रित चालविल्या जात होत्या. १ ली शाळा ज्युब्लीपार्क मराठी १ ली ते ४ थी त्यानंतर नुतन माध्यमिक शाळेचे मराठी व उर्दूचे इयत्ता ५ वी ते ७ वी असे एकूण सहा वर्ग आणि प्राथमिक शाळा भडकल गेट उर्दू स्वतंत्र उर्दू माध्यमाची शाळा या इमारतीत भरवत होतो. जुलै ९५ ला या शाळेत गेल्यानंतर पाहिले. उर्दू माध्यमाच्या विद्यार्थ्यांची संख्या अत्यल्प होती. उदा. इयत्ता ५ वी मध्ये संख्या ४ उपस्थिती ३, ६ वी मध्ये संख्या १० उपस्थिती ७ आणि ७ वी संख्या ६ उपस्थिती ५ वी मोजून १५ उपस्थितीसाठी ३ शिक्षक ट्रेंड आणि लगेच उर्दू माध्यमासाठी शाळा वेगळी होती. तेव्हा मी असा प्रस्ताव दिला होता की, जी उर्दु शाळा भडकल गेटला आहे त्या शाळेची संख्या ५ वीची १४, ६ वी २७ व ७ वी यांच्यामध्ये हे विद्यार्थी टाकावे तर ९ वी १८, ६ वी ३७ व ६ वी २७ अशी संख्या होऊन उर्दू माध्यमाची स्वतंत्र शाळा होईल. आणि तशी शाळा अम्ही सुरुवात केली होती. परंतु मनपाच्या या संघटनेच्या पदाधिकाऱ्यांनी सारखे निवेदनाद्वारे पाठपुरावा करुन ही उर्दू शाळा बंद केली असे सारखे सुरु झाले. मी याबबत तत्कालीन आयुक्त भोगे साहेबांनी चर्चा करुन असे ठरविले की, ज्या उर्दू व मराठी आहेत. तसेच राहू दया. परंतु पुन्हा मार्च ९६ मध्ये निवेदन आले की, अगोदर जसे होत तशीच व्यवस्था करावी. मग ३१ ऑक्टो-९६ ला ही प्राथमिक शिक्षक संघटनेच्या पदाधिकाऱ्यांबरोबर चर्चा करुन ही शाळा जोडून

दिली. परंतु याच बरोबर तीन शाळा एकच चालल्या असल्याने आम्ही अजून एक प्रस्ताव दिला की, या शाळेमध्ये ४ थी पर्यंतची जी शाळा आहे. ती शाळा याच शाळेमध्ये वर्ग कावी व त्याप्रमाणे वर्ग झाली व १ ली ते ७ वी चे मराठीचे वर्ग त्याठिकाणी सुरु करण्यात आलेले होत. आता मागणी अशी आहे की, या शाळेला एकच नांव देता येईल काय हा प्रश्न आहे. किराडपुरा नं. १ व २ या उर्दू माध्यमाच्या दोन शाळा आहेत. परंतु हे अंतर १-२ कि. मी. चे आहे. याबाबत जर अशा प्रकारचे आदेश देत असतील तर त्याप्रमाणे कार्यवाही करु.

**श्री. अ. रशिदखान (मामू) :** या ठिकाणी तिनिही शाळा एकत्रित असल्याने न्यु मिडल स्कुल असे शाळेचे नांव असावे ही मागणी आहे.

**मा. सभापती** : याबाबत सविस्तर माहितीसह पुढील बैठकीत ठेवण्यात यावे.

**श्री. अ. रशिद खान (मामू) :** या शाळेमध्ये इयत्ता १-४ भडकल गेट नांव आहे. ५-७ मिडस्कूल नाव आहे. यामध्ये तीन शाळा एकत्रित काम करीत आहेत.

**मा. सभापती** : या शाळेला मा. आयुक्त स्वतः भेट देवून पाहणी करतील व शिक्षण अधिकाऱ्यांबरोबर चर्चा करुन पुढील बैठकीत माहिती देतील.

**श्री. अ. रशिदखान (मामू) :** शाळांच्या ज्या इमारती आहेत. त्या सर्वांच्या सर्व्हे करुन त्याचे व्हॅल्युएशन काढुन शासनाकडे पाठविणे बाबत मी मागील वर्षापासून सुचना करीत आहे.

**उप अभियंता** : शासनाकडून निधी उपलब्ध नसल्यामुळे कामास सुरुवात करता आली नाही.

**मा. सभापती** : याबाबत कोणत्याही प्रकारे हयगय करु नये. महपालिकेच्या संपूर्ण शाळांच्या इमारतींचा सर्व्हे व व्हॅल्युएशन करुन पुढील बैठकीत स्थायी समिती समोर ठेवावा.

**श्री. हमीदउद्यीन ताबा :** १ वर्षा पुर्वीचा निर्णय शासनाचा आहे. उप अभियंता आहेत. त्यांना वर्ग-१ श्रेणीची वेतनवाढ दयावी याबाबत काय कार्यवाही केली.

**मा. सभापती** : युती शासनाच्या निर्णय आहे याबाबत सहा आयुक्त-१ यांनी खुलासा करावा.

**सहा आयुक्त-१ :** याबाबत मुख्य लेखा परिक्षकाकडे संचिका पाठविण्यात आलेली आहे.

**मा. सभापती** : पुढील बैठकीत सविस्तर माहिति ठेवावी.

**श्री. सुभाष टाकळकर :** सिडको एन-६ या शाळेत सांस्कृतिक सभागृह बांधावे म्हणून मी गेल्या २-३ महिन्यानपासून पत्र व्यवहार करीत आहे. परंतु अद्यापही ही शाळा सिडको किंवा मनपाच्या मालकीची नसेल तर शाळेचे वॉल कंपाऊंड रु. ५-६ लाखांचे अंदाजपत्रकाचे कसे होतात.

**मा. सभापती** : शिक्षण अधिकाऱ्यांनी खुलासा करावा.

**शिक्षणाधिकारी :** या शाळा सन १९८८ ला आपल्याकडे आहेत. परंतु याचा ताबा कुणाकडे आहे या संदर्भात कागदपत्र नाहीत मालमत्ता अधिकाऱ्यांकडे विचारणा केली असता त्यांचे कडून माहिती मिळाली नाही. परंतु ६ महिन्यापुर्वी सिडको कडून ५ शाळांच्या भाडे बाबत पत्र आलेले आहे. या वरुन नेमके लक्षात येईल की ही शाळा कुणाच्या ताब्यात आहे.

**मा. सभापती** : मालमत्ता अधिकाऱ्यांनी खुलासा करावा.

**मालमत्ता अधिकारी :** या शाळा आपल्या ताब्यात नाही.

**मा. सभापती** : मग आपण त्या ठिकाणी शाळा चालवितो कसे काय? जर मनपाच्या हँडओव्हर शाळा झालेल्या नसतांनाही आपण कॉल कंपाऊंड कुणाच्या जागेवर बांधतो. कंपाऊंड वॉलचे काम कोणत्या विभागामार्फत चालते.

**शहर अभियंता** : शहर अभियंता विभागा मार्फत कंपाऊंड वॉलचे काम चालु होते. आता पर्यंत आमच्या कडे कुठलीही कल्पना माहिती आलेली नव्हती मागिल महिन्यापासून सिडकोने मनपाकडून पत्र पाठवून भाडे दयावे. म्हणून कळविले आहे. आतापर्यंत शाळा दुरुस्ती केल्या परंतु कुणाचेही आक्षेप नाही.

**श्री. महादेव सुर्यवंशी** : सिडकोने एक महिन्यापुर्वी मनपाकडे भाडे मागितले परंतु प्रत्यक्षात सिडकोच्या शाळांवरती मनपाने आतापर्यंत जवळपास ३५.०० लाखा पर्यत काम केलेले आहे व तेथील कामे पूर्णत्वाकडे आहेत. एवढा खर्च करुनही ही मालमत्ता आली आहे की नाही हे म्हणणे योग्य वाटत नाही. या मनपा मध्ये १८ खेडयाच्या मालमत्ता आपल्या ताब्यात आलेल्या आहेत. परंतु त्यांचे रेकॉर्ड मात्र आपल्याकडे नाही. त्याचे उदा. द्यावयाचे झाल्यास नारेगांव येथील समाज मंदिर बांधकामाचे प्रसतावास गेल्या ३ वर्षापासून मंजूर असून एजन्सी सुध्दा फिक्स केलेली आहे. परंतु मालकी हक्काबाबत मनपा रेकॉर्ड गायब तर करीत नाही ना? परंतु सदरची जागा मनपाची आहे असे गेल्या ८ वर्षापासुन सांगुन सुध्दा कार्यवाही होत नाही. आता समाजमंदिर ऐवजी अभ्यासिका केंद्र म्हणून प्रस्ताव आहे.

**श्री. कचरु नवपुते** : माझ्या वॉर्डातील मनपाच्या ताब्यात येण्यापुर्वी पासून व्यायाम शाळा अस्तित्वात होती. परंतु ग्रामपंचायतीत रेकार्ड असतांनाही मनपाकडे याबाबत कुठलाही पुरावानाही. त्यामुळे व्यायाम शाळेची पुढील कार्यवाही करणे बाबत अडथळा येत आहेत.

**मा. सभापती** : मालमत्ता अधिकारी व उप आयुक्त-२ यांनी याबाबत रेकॉर्ड अद्यावत करण्याचे बाबतीत कार्यवाही करावी व शहर अभियंता यांना विचारणा करण्यात येते की, त्या ठिकाणी ज्यावेळेस वॉल कंपाऊंड बांधकाम करीत होते. त्यावेळेस ही जागा कुणाच्या मालकीची आहे त्याची पाहणी काकेली नाही.

**श्री. महादेव सुर्यवंशी** : याबाबत झोन ५ मध्ये बैठक झालेली होती मो. नारेगांव येथे शाळेच्या मागील बाजुस खुली जागा होती. त्या जागेवर झोपडपट्टी बसली नंतर त्यांना उठविण्यात आले परंतु नंतर शाळेच्या मागील बाजुस असलेल्या मोकळया जागेतील माती मात्र लोकांना उचलून नेली त्यामुळे शाळेच्या मागे जवळपास १५ फुट खडे पडलेले दिसतात व शाळेला धोका होण्याचा संभव आहे. सांगावचा मुद्दा असा की, मनपाकडे अशा कुइल्याही मालमत्ताचा रेकॉर्ड नाही ही आश्चर्याची बाब आहे.

**मा. सभापती** : उप आयुक्त-२ यांनी मालमत्ता विभागाची रेकॉर्ड बाबत गांर्भीयाने लक्ष देऊन कार्यवाही करावी.

**श्री. सुभाष टाकळकर** : नविन विद्युत खांब बाबत काम झाले. ह्य

**मा. सभापती** : नविन बजेट मध्ये जवळपास ६,००० लाखाची तरतुद केलेली आहे.

**अति. शह. अ.** : एम. एस. ई. बी. कडून नविन विद्युत खांब बसवुन घ्यावे असे ठरलेले आहे.

**मा. सभापती** : कुणी ठरविले.

**अति. शहर अ.** : मा. आयुक्तांनी

**मा. सभापती** : याबाबत स्थायी समिती किंवा सर्वसाधारण सभेची मंजुरीची आवश्यकता नाही काय?

**श्री. महादेव सुर्यवंशी :** मनपातर्फे जवळपास १५०० पोल शहरात बसविणे आहेत स्ट्रिट लाईट आपणास दिसतील मात्र त्याचा फायदा घरासाठी लोकांना होणार नाही. याबाबत एम. एस. ई. बी. ने हा धंदा सुरु केलेला आहे. मनपाची आर्थिक परिस्थती ठिक नसल्याने आपण खांबावर हा डीपीवर टॅक्स बसवावे म्हणून सर्वसाधारण सभेने प्रस्ताव मंजुर केला आहे. यासाठी जसे निर्णय मनपाने घ्यावे व जनतेला याबाबत लाभ कसा होईल याची कार्यवाही करावी.

**मा. सभापती** : यापुर्वी मराविम पोल लावत होती व पैसे मनपा भरीत होती आपले स्ट्रिट लाईट व कसुमर लाईट लावत होते. मिटरचे पैसे व वसुल करीत होते. परंतु या सर्वांसाठी लागणारा कालावधी मराविम कडे जास्त लागतो. १५०० पोल मनपाने एका वर्षात रोवणे इतक्या कमी कालावधीत मराविमने काम केलेले नाही. मनपाचा वेग चांगला आहे. फक्त मराविम शिवाय लाईट आपल्याला मिळू शकत नाही मागिल वेळेस मा. खासदार समवेत मराविम अधिकाऱ्यांची जी बैठक घेतली होती ती आमच्याच स्पेसिफिकेप्रमाणे पोल लावलेले नाहीत. कंडक्टर्स लावलेले नाहीत वायर लावलेले नाहीत.

**श्री. रशिद खान (मामू) :** शासनाकडून असे आदेश होते की, जो पर्यंत तुम्ही घरगुती विज कनेक्शन घेऊ शकत नाही. तो पर्यंत बांधकाम परवाना नाही. नंतर या ठिकाणी मा. मुख्य मंत्री या मुख्यालयात आल्या नंतर आपण निवेदन दिलेले होते की, याबाबत विचार व्हावा. तेव्हा मा. मुख्यमंत्र्यानी ताबडतोब आदेश दिलेले होते. याचा फायदा संपुर्ण महाराष्ट्राला झाला नाही. मनपाच्या बांधकामाची नाहरकत प्रमाणपत्राशिवाय घरगुती विज कनेक्शन मिळत नव्हते. मजबुरीने मराविम त्याचा फायदा उचलत असते.

**मा. सभापती** : सुपरव्हिजन फिस मराविम यांचेकडे देऊन त्यांच्याच स्पेसिफिकेशन प्रमाणे काम करुन घ्यावे लागणार आहे व हे काम आपण करुन सर्वसाधारण सभेकडे पॉलिसी ठरविण्यात यावे.

**मा. आयुक्त** : स्ट्रिट लाईटची जबाबदारी मनपाची आहे. या स्ट्रिट लाईटच्या पोल वरुन घरगुती विज कनेक्शन द्यावयाचे असेल आणि त्यांच्याकडून मराविमला उत्पन्न मिळवायचे असेल तर या पोलचा अर्धा खर्च मराविमने दयावा आणि मनपाने अर्धा खर्च सोसावा.

**मा. सभापती** : ठिक आहे. अशा प्रकारचा प्रस्ताव सर्वसाधारण सभेकडे ठेवून पॉलीसी डीसाईड करावी.

**श्री. हमीद ताबा :** शिक्षण विभागातील चौकीदाराचा प्रश्न गेल्या दोन महिन्यांपासून सतत विचारीत आहे. कृपया माहिती दयावी वाहन चालकांनी धमकी दिली तर त्यांचा प्रश्न मार्गी लावला परंतु यांचा प्रश्न का मार्गी लागत नाही.

**उप आयुक्त-२ :** चौकीदारांचे १० पदाचे बाबतीत जे ग्रेड वेतन श्रेणीची आहे ते रु. ७५०/- देण्यात आलेल्या आहे. परंतु पोस्ट मंजुर नव्हत्या म्हणजे तशाच भरल्या सन १९८७ ला या बाबतची संचिका शिक्षण व अस्थापाना-२ कडे विचारणा केली असून, ती संचिका मिळत नाही. तरी याबाबत जो निर्णय दयाल या प्रमाणे कार्यवाही करता येईल.

**श्री. हमीद ताबा :** सदरची संचिका अस्थापना-२ कडून लिहून पाठविलेली आहे की, याबाबत आमच्याही काही संबंध नाही. गेल्या १५ वर्षापासून या पदावर नियुक्त करावयाचे असून, प्रशासनाने कार्यवाही करावी.

**लेखाधिकारी - १ :** अस्था-२ विभागाने ही चौकीदाराची पदे भरलेली होती. सन १९८४ च्या प्रशासनाचा जी आर प्रमाणे तांत्रिक खंड देऊन ही पदे जाग रिक्त असल्यास रेगुलाईज्ड करता येऊ शकते.

**मा. सभापती** : काय लिहिलेले आहे ते वाचुन दाखवावे.

**लेखाधिकारी - १** : (वाचुन दाखविण्यात आले.)

**श्री. गौतम खरात :** अस्था-२ हा विभाग व बदल्या प्रकरणाचे काम करीत असता तरी या विभागातील कर्मचाऱ्यांबाबत ५०% अनुदान शासन देते व ५०% मनपा खर्च करते जर या पदासाठी शासनांची मंजुरी असल्यास ५०% खर्च दयावा लागेल आणि जर मंजुरी नसेल तर हा जो खर्च आहे. मनपाच्या फंडातुन करता येईल काय? हे सुध्दा तपासून पाहिले पाहिजे.

**श्री. हमीद ताबा :** गेली १५ वर्षे हे कर्मचारी काम करीत आहेत पगार मात्र पुर्ण मिळतो मनपा तर्फे

**श्री. गौतम खरात :** आपल्याकडे ३२ सेविका फिक्स पे वर काम करीत आहेत. त्यांच्याबाबत शासनाकडे मंजुरी मिळाली नाही असे उत्तर मिळाले आहे. मग ही पदे मनपाच्या खर्चातुन भरुन करावी का? असावी मुद्दा उपस्थित होतो. न्याय द्यावयाचे झाल्या. सर्वांना सारखा न्याय द्या. कुणावरही अन्याय नको.

**श्री. हमीद ताबा :** ही फिक्स पे ची बाब वेगळी आहे. दोघा मधेही तफावत आहे.

**मा. सभापती** : आपण दे. वेतनावर घेतो व मनपा खर्च करते परंतु शिक्षण विभागातील पदांना मंजुरी देवून मनपा सर्व खर्च सोसावा का याचा विचार होणे आवश्यक आहे.

**श्री. गौतम खरात :** शिक्षण विभागात चौकीदार पदाबाबत प्रस्ताव सर्वसाधारण सभेत ठेवावा व शासनाकडे पाठपुरवा करावा. त्यामुळे मंजुरी मिळाल्यास अर्धा खर्च शासन देईल व कर्मचाऱ्यांना न्याय मिळेल.

**मा. सभापती** : ठिक आहे. या पदासाठी अस्था-२ ने प्रस्ताव सर्वसाधारण सभेसमोर ठेवावा व मंजुरी घेऊन शासनाकडे पाठवावा.

**श्री. महादेव सुर्यवंशी :** गेल्या १५ वर्षापासुन शिक्षण विभागात हे कर्मचारी चौकीदार म्हणून कार्यरत आहेत व त्यांना पुर्ण पगार दिला जातो. परंतु शासनाची या पदांना मंजुरी असुनही किंवा स्थायी समिती व सर्वसाधारण सभेची मंजुरी नसतांनाही आपण कोणाला नियमान्वये या कर्मचाऱ्यांना पगार देतो. यास जबाबदार कोण लेखा विभागाकडे दै. वेतनावरील कर्मचाऱ्यांचे बिले पाठविले तर तपासून पाहुन नंरच दिले जाते. मग गेल्यस १५ वर्षा पासून या कर्मचाऱ्यांबाबत लेखा विभागाने का तपासणी केली नाही या बाबत प्रशसानाने खुलासा करावा.

**मा. सभापती** : उप आयुक्त-२ यांनी सुचना केल्या प्रमाणे पुढील बैठकीत सविस्तर माहिती घ्यावी.

**श्री. रशिद खॉन :** दामु सोनवणे (शिपाई) यास ब्लु प्रिंटसाठी रु. ५०/- मासिके दराने आदेश असूनही देण्यात येत नाही याचे कारण काय?

**मा. उप आयुक्त-२ :** दामु सानवणे शिपाई या बनु प्रिंटचे एक्स्ट्रा काम करण्यासाठी प्रति माह रु. ५०/- देण्यास येत होते. परंतु आता याबाबत मला कल्पना नाही.

**मा. सभापती** : याबाबत उप आयुक्त-२ यांनी आवश्यक ती कार्यवाही करुन न्याय द्यावा.

**श्री. महादेव सुर्यवंशी :** जेसीबी मशील याबाबत काय झाले?

**अति. शहर अभियंता :** आलेली आहे.

**श्री. महादेव सुर्यवंशी :** या मशीनवर काम करण्यासाठी वाहन चालक कसा भरणार.

**मा. सभापती** : जेसीबी मशिन खरेदी करण्यासाठी व एजन्सी फिक्स करण्यासाठी स्थायी समितीची मंजुरी घेतली काय?

**अति. शहर अ. :** याची सर्वसाधारण मंजुरी घेतलेली आहे त्यामुळे स्थायी समिती मध्ये प्रस्ताव आलेला नाही. सदरील प्रस्ताव लेखा विभागाकडून गेलेला नाही. तात्कालीन आयुक्त यांनी सर्वसाधारण सभे समोर पुण्याच्या एजन्सीच्या नावासंह माहे जून ९६ च्या वेळेस मांडला होता.

**मा. सभापती** : सर्वसाधारण सभेला रु. ५.०० लाख व एजन्सी फिक्स भरण्याचे अधिकार आहेत काय?

**लेखाधिकारी - १ :** विधी सल्लागार खुलासा करतील.

**मा. सभापती** : विधी सल्लागार रजेवर आहेत. तरीही त्यांना सुचना द्याव्यात की, तरी रजेवर असले तरी या संदर्भात आपण पुढील बैठकीत आवश्यक ती माहिती सांगावी.

**श्री. हमीद ताबा :** गेल्या १५/२० दिवसापासून जकात फारच कमी दिसत आहे याचे कारण काय?

**मा. सभापती** : जकात अधिक्षकांनी खुलासा करावा.

**जकात अधिक्षक :** दिवाळी पुर्वी जकात साधारणत: त्यामध्ये ८, ८, १/२ असा एव्हरेज होता व नंतर मात्र कामे झालेला आहे. यामध्ये आवश्यक बाब म्हणजे मालाचे ट्रक कमी झाल्याने.

**मा. सभापती** : दिवाळी अगोदर मालाचे ट्रक भरपूर येतात. मात्र त्यानंतर कामे झाले काही दिवस हे बरोबर आहे. त्यामुळे जकात कामे आली.

**श्री. रशिद खान (मामू) :** मेल्ट्रॉन कंपनीचे साहित्य आहे. त्यावर आपण २% जकात आकारणी करतील. परंतु आपल्याकडून ते ४% होतात याचे कारण काय?

**मा. सभापती** : पुढील बैठकीत उप आयुक्त-१ यांनी माहिती देतील.
जकात बाबत निर्णय आले आहे.

| | | |
|---|---|---|
| १९९५-९६ | | १९९६-९७ |
| ७२,३८,४८६ | फटाक्यावरती | ७७,६३,४५२ |
| २,८९,५३९ | ४% दराने | ३,१७,५३८ |

**श्री. रशिद खॉन (मामू) :** तरीही जकात कमीच आहे. मागच्या कर्मचाऱ्यांना झोपले म्हणून निलंबित केले होते. परंतु त्याचसोबत इन्स्पेक्टर बाबतीत काय कार्यवाही केली?

**मा. सभापती** : उप आयुक्त-१ यांनी माहिती दयावी.

**मा. उपआयुक्त - १ :** संबंधित कर्मचाऱ्यांना नोटीस देण्यात आलेली आहे.

**श्री. रशिदखॉन (मामू) :** अस्थापने वरील खर्चाची माहिती दयावी.

**लेखाधिकारी - १ :** (वाचून दाखविली)

सन १९९५-९६ या वित्तीय वर्षात निव्वळ महसुली उत्पन्न रु. ४४, ११, ६६, २९३ तर अस्थापनेवरील खर्च रु. १६, ५६, ४४, ५५० एकंदर खर्चाची टक्केवारी पाहता ३७.८४ म्हणजे ३८% एवढा होतो. यामध्ये प्रामुख्याने

| | | | |
|---|---|---|---|
| १. | लिपीक | २० पदे | रु. ७.८२ |
| २. | मजुरी | २०० पदे | रु. ६५.६० |
| ३. | कार्यालयीन अधिक्षक | ७ पदे | रु. ४.९७ |
| ४. | कनिष्ठ अभियंता | ६ पदे | रु. ३.३६ |
| ५. | दुय्यम आवेक्षक | १२ पदे | रु. ६.७२ |
| ६. | अनुरेखक | ६ पदे | रु. २.३३ |
| ७. | व लिपीक | ६ पदे | रु. ३.३६ |
| ८. | क. लिपीक | ६ पदे | रु. २.२८ |
| ९. | वैद्यकीय अधिकारी | ८ पदे | रु. ६.४० |
| १०. | नेत्र चिकित्सक सह | १ पदे | रु. ०.५६ |
| ११. | प्रयोगशाळा नंयत्र | १ पदे | रु. ०.५६ |
| १२. | प्रयोगशाळा नयंत्र | १ पदे | रु. ०.५६ |
| १३. | स. किरण सहा | १ पदे | रु. ०.३९ |
| १४. | मिश्रक | ४ पदे | रु. २.१६ |
| १५. | ड्रेसर | ८ पदे | रु. २.५८ |
| १६. | अटेंडर | ८ पदे | रु. २.५७ |
| १७. | नोंदणी लिपिक | ४ पदे | रु. १.२५ |
| १८. | ए. एम. एन | २० पदे | रु. २.६७ |
| १९. | उप अग्नीशामक | ४ पदे | रु. १.९३ |
| २०. | मुख्य अग्नीशामक | ९ पदे | रु. ७.२० |
| २१. | अग्नीशामक | ३० पदे | रु. १२.९२ |
| २२. | वाहन चालक | ८ पदे | रु. ३.०८ |

याबाबत वार्षीक बोज १.४५ कोटीच पडतो दर वार्षीक खर्च ४०.४५ कोटीचा झाला.

**श्री. रशीद खॉन (मामू) :** माझी अशी सुचना आहे की, मनपाच्या अस्थापनेवर एकूण खर्च किती होतो याची माहिती दयावी.

**लेखाधिकारी** : मनपाच्या अस्थापनेवरील कर्मचाऱ्यांचे वेतन भत्ते १४.६५ कोटीचा खर्च आहे व उर्वरीत २.०० कोटी खर्च हा निवृत्ती वेतन साधन सामुग्री किरकोळ फोन मशीनरी व इतर खर्चासाठी होतो.

**श्री. रशीद खान (मामू) :** मनपाचा या वर्षाचा बजेट कितीचा आहे.

**लेखाधिकारी** : एकूण ८५.०० कोटीचा अंदाजपत्रकीय बजेट आहे या बाबत टीपनी तयार करण्यात येत आहे.

**श्री. रशीदखान (मामू) :** आपला बजेट ५५ ते ६०.०० कोटीचा आहे. ८५.०० कोटीचा नाही. याबाबत सविस्तर माहिती दयावी.

**मा. सभापती** : आतापर्यंत आपला अस्थापनेवरील खर्च किती झाला.

**लेखाधिकारी** : निव्वळ महसुली खर्च (अस्थापना) २८ कोटी म्हणजे ३८.१६ टक्केवारी खर्चाची होते.

**मुख्य लेखा परीक्षक :** एकंदर अस्थापनेवरील खर्च ४२% च्या पुढे जाऊ नये.

**श्री. रशिदखान :** आराखडया सहीत माहिती पुढील बैठकीत द्यावी.

**लेखाधिकारी - १ :** डिसेबंर अखेरपर्यंत बजेट रिव्हाईज्ड करुन टिप्पणी सादर करण्यात येईल.

**मा. सभापती** : ठिक आहे. बजेट रिव्हाईज्ड मध्ये टिप्पनी तयार करुन द्यावी.

**श्री. रशिद खान (मामू) :** कर्मचाऱ्यांच्या व प्रशासनाची काही प्रलंबीत प्रस्ताव मंत्रालयात पडून आहेत. यासाठी सात आठ वेळेत पदाधिकारी जाऊन आले परंतु अंतिम रित्या कामाला स्वरुप आलेले दिसत नाही. वेळोवेळी सांगूनही प्रशासनाचा खर्च होऊनही काम मात्र झालेले दिसत नाही. त्यापेक्षा एकदा मुंबईला गेले की, आठ दहा दिवस मुक्काम करुन प्रशासनाची व कर्मचाऱ्यांचे प्रलंबित प्रस्ताव मंजुरी करु आणावे.

**मा. सभापती** : ठिक आहे. यापुढे त्या नुसारच कामास गती देता येईल. दुसरे असे की, माहे ऑक्टो-९६ ची जकात विभागाची टिप्पनी वसुलीची प्राप्त झाली आहे. रु. ७,२४,५८२/- कोटी आहे. आता चर्चा समाप्त करुन इतिवृत्त प्रारंभ करण्यात येतो.

**विषय क्र. ४२६/१ :**

दिनांक ०८-११-९६ रोजी संपन्न झालेल्या स्थायी समिती सभेचे इतिवृत्त कायम करणे.

**ठराव :**

मंजुर पृष्ठ क्र. १९ मध्ये ड्रेनेजचे काम करणे आवश्यक अशी दुरुस्ती सह दि. ०८-११-९६ च्या स्थायी समिती सभेच्या इतिवृत्तात सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ४२७/२ :**

अति. शहर अभियंता महानगरपालिका औरंगाबाद निवेदन करीत आहेत की, नेहरु प्लेस येथे खडी रस्ता तयार करणे व कल्व्हर्से बांधणे या कामासाठीच्या अंदाजपत्रक र. रु. २,०३,०७७/- च्या अंदाजपत्रकास मा. आयुक्त यांनी दि. ८,८,९६ रोजी मंजुरी दिली होती. सदरील अंदाजपत्रकास दि. ३०-०८-९६ रोजी संपन्न झालेल्या स्थायी समितीच्या सभेत मंजुरी मिळाली. तसेच या सभेत सर्वानुमते असेही ठरविण्यात आले की, सदरील काम तातडीचे असल्याने उपलब्ध गुत्तेदार श्री. अनिल कुलकर्णी यांचे कडून अंदाजपत्रकीय दरापेक्षा ९% कमी दराने करुन घेण्यात यावे. त्यानुसार मा. स्थायी समितीच्या सदरील मंजुराची माहिती अंतर्गत लेखा परीक्षण विभागास म्हणजेच लेखाधिकारी-१ यांचे कडे माहितीसाठी व मा. आयुक्त यांचे कडे पुढील आदेशास्तव सादर केला असता लेखा परीक्षण विभागाने म्हणजेच लेखाधिकारी-१ यांनी नमुद केले की, अशा प्रकारे कामाच्या अंदाजपत्रकास मंजुरी देते. वेळीच सरळ रित्या एजन्सीज नेमण्याबाबत मा. स्थायी समिती विचार करु शक नाही. इतिवृत्तात कारणे नमुद करुन तातडीने काम करणे बाबत मा. आयुक्तास स्थायी समितीस प्राधिकृत करता येईल. त्यामुळे सदर बाब विभागाने मा. स्थायी समितीस निदर्शनास आणून देणे बाबत त्यांचे टिपणीत नमूद केले आहे. तसेच लेखाधिकारी-

१ यांच्या टिपणीत नमुद केलेल्या नुसार मा. स्थायी समितीच्या अधिकार बाबत निवेदन कारणेस्तव आदेशीत केल्या प्रमाणे निवेदन सादर करीत आहे.

तरी प्रकरणी योग्य त्या कार्यवाहीस्तव निवेदन सादर.

**संवाद :**

**मा. सभापती** : या प्रस्तावाबाबत निर्णय झालेला असल्याने सदरचा प्रस्ताव वगळण्यात येतो.

**ठराव :**

प्रस्ताव वगळण्यात येतो.

**विषय क्र. ४२८/३ :**

अति. शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला की, ओंकारेश्वर चौकातील राजाराणी अपार्टमेंट समोरील नाल्यावर भिंत बांधून त्यावर स्लॅब टाकणेच्या कामाचे सन ९५-९६ चे सा. बा. खात्याचे डी. एस. आर. दराने र. रु. १,४४,१००/- चे अंदाजपत्रक तयार करण्यात आले असून, त्यास मा. आयुक्त यांनी मंजुरी दिलेली आहे. सदरील कामाचा खर्च " रस्ते दुरुस्ती व देखभाल " या लेखा शिर्षकामधून सन ९६-९७ साठी असलेल्या तरतुदी मधून प्रस्तावित आहे.

तरी सदर कामासाठी तयार करण्यात आलेल्या र. रु. १,४४,१०० चे अंदाजपत्रक मंजुरीबाबतचा प्रस्ताव स्थायी समितीच्या विचारार्थ तथा मंजुरीस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, ओंकारेश्वर चौकातील राजाराणी अपार्टमेंट समोरील नाल्यावर भिंत बांधून त्यावर स्लॅब टाकणेच्या कामाकरीता तयार करण्यात आलेल्या र. रु. १,४४,१००/- च्या अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ४२९/४ :**

अतिरिक्त शहर अभियंता यांनी प्रस्ताव दिला की, रोशनगेट ते सिडको या ८० फुट रस्त्यालगत पॅचसचे खडीकरण करणे या कामासाठी सा. बा. खात्याच्या सन ९५-९६ च्या दरसुचीनुसार अंदाजपत्रक र. रु. १,४३,२१७/- चे तयार करण्यात आले आहे. सदरील कामाचा खर्च रस्ते देखभाल व दुरुस्ती सन ९६-९७ या लेखा शिर्षामधे उपलब्ध असणाऱ्या तरतुदीमधून करण्यात येईल.

तरी सदरील कामासाठी तयार करण्यात आलेले अं. प. रु. १,४३,२१७/- चे मंजुरीबाबतचा प्रस्ताव स्थायी समितीचे विचारार्थ तथा मंजुरीस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्यानुसार, रोषणगेट ते सिडको या ८० फुट विकास रस्त्यालगत पॅचसचे खडीकरण करणेच्या कामासाठी सा. ब. खात्याच्या सन ९५-९६ च्या दरसुचीनुसार तयार करण्यात आलेल्या र. रु. १,४३,२१७/- च्या अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ४३०/५ :**

अतिरिक्त शहर अभियंता यांनी प्रस्ताव दिला की, मो. मुलमची बाजार लोटाकारंजा आणि रोहीला गल्ली या कामासाठी तयार करण्यात आलेल्या र. रु. ६,४१,०००/- च्या अंदाजपत्रकास स्थायी समिती विषय क्र. ८३/४ दि. २०-०९-९६ अन्वये मंजुरी प्राप्त झालेली आहे.

त्यानुसार सदरील कामाकरीता निविदापत्रके मागविली असता निविदा विक्रीच्या अंतिम तारखेपर्यंत एकूण १९ कोरी निविदापत्रके विकल्या गेली व स्विकृतीच्या अंतिम तारखेपर्यंत फक्त ७ निविदापत्रके दर भरुन प्राप्त झाली. प्राप्त निविदापत्रके दि. ०९-१०-९६ रोजी उघडण्यात आली. त्यांचा तपशील खालील प्रमाणे आहे.

| | | |
|---|---|---|
| १. | श्री. आर. बी. चव्हाण | २८.००% कमी दराने |
| २. | मे. अन्सारी कन्स्ट्रक्शन | २६.८६% कमी दराने |
| ३. | न्यु सुपर कन्स्ट्रक्शन | २५.५७% कमी दराने |
| ४. | श्री. अब्दुल सलीम | १९% कमी दराने |
| ५. | मे. राना कन्स्ट्रक्शन | १९.०१% कमी दराने |
| ६. | मे. बसरा कन्स्ट्रक्शन | १८.९९% कमी दराने |
| ७. | सय्यद रफियोद्दीन | १६.१६% कमी दराने |

तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी व अंदाजपत्रकीय दरापेक्षा २८.००% कमी दराची श्री. आर. बी. चव्हाण यांची निविदा मंजुरीस्तव प्रस्ताव विचारार्थ सादर.

**संवाद :**

**मा. सभापती** : खांडकीचे काम आहे. संबंधित उप अभियंता यांनी क्वॉलीटीमध्ये जबाबदारी घ्यावी. प्रस्ताव मंजूर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, मुलमची बाजार, लोटाकारंजा आणि रोहीला गल्ली या कामासाठी प्राप्त झालेल्या निविदापैकी तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी व अ. प. दरापेक्षा २८% कमी दराची श्री. आर. बी. चव्हाण यांची निविदा स्विकारण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ४३१/६ :**

अति. शहर अभियंता प्रस्ताव दिला की, सिडको फायर स्टशेन येथे फायरमनसाठी क्वॉटर्स बांधणेच्या कामासाठी तयार करण्यात आलेल्या र. रु. १२,०३,२००/- च्या अंदाजपत्रकास स्थायी समिती ठराव क्र. ६३/२ दि. २०-०९-९६ अन्वये मंजुरी प्राप्त झालेली आहे, त्यानुसार सदरील कामाकरीता निविदापत्रके मागविली असता निविदापत्रके विक्रीच्या अंतिम तारखे पर्यंत एकूण १८ कोरी निविदापत्रके विकल्या गेली व निविदापत्रके स्विकृतीच्या अंतिम तारखे पर्यंत आहे. निविदापत्रके दर भरुन प्राप्त झाली. प्राप्त निविदापत्रके दि. ०९-१०-९६ रोजी उघडण्यात आली. त्याचा तपशील खालील प्रमाणे आहे.

| | | |
|---|---|---|
| १. | मे. शिवा कन्स्ट्रक्शन | ९.९९% कमी दराने |
| २. | मे. सुपर | ७.१% कमी दराने |
| ३. | मे. एलोरा | ५.५५% कमी दराने |
| ४. | श्री. सलीम पटेल | २.११% कमी दराने |
| ५. | मे. अनुभोग कन्स्ट्रक्शन | २.९% कमी दराने |
| ६. | सय्यद जमीर | १.००% जास्त दराने |
| ७. | श्री. एस. प्रितमसिंग सोधी | ०.५१% कमी दराने |
| ८. | श्री. अब्दुल सलाम | ५% जास्त दराने |

तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी व अंदाजपत्रकीय दरापेक्षा ९.९९% कमी दराची मे. शिवा कन्स्ट्रक्शन यांची निविदा स्विकृतीचा प्रस्ताव विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे सिडको फायर स्टेशन येथे फायरमनसाठी क्वॉर्टस बांधणेच्या कामाकरीता प्राप्त झालेल्या निविदापैकी तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी व अंदाजपत्रकीय दरापेक्षा ९.९९% कमी दरी मे. शिवा कन्स्ट्रक्शन यांची निविदा स्विकारण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. क्वॉलीटीकडे विशेष लक्ष द्यावे.

**विषय क्र. ४३२/७ :**

अतिरिक्त शहर अभियंता यांनी प्रस्ताव दिला की, शहागंज चमन भोवती व निजामोद्यीन दर्ग्यापर्यंत रोडचे डांबरीकरण करणेचया कामासाठी तयार करण्यात आलेल्या र. रु. ११,५३,५६७/- च्या अंदाजपत्रकास स्थायी समिती ठराव क्र. ६४/३ दि. २०-०९-९६ अन्वये मंजुरी प्राप्त झालेली आहे.

त्यानुसार सदरील कामाकरीता निविदापत्रके मागविली असता निविदापत्रके विक्रीच्या अंतिम तारखेपर्यंत एकूण ४ कोरी निविदापत्रके विकल्या गेली व निविदापत्रके स्विकृतीच्या अंतिम तारखेपर्यंत यापैकी फक्त ३ निविदा दर भरुन प्राप्त झाल्या प्राप्त निविदापत्रके दि. ०९-१०-९६ रोजी उघडण्यात आली. त्याचा तपशील खालील प्रमाणे आहे.

| | | |
|---|---|---|
| १. | मे. आदिनाथ कन्स्ट्रक्शन | १५.९९% कमी दराने |
| २. | श्री. राजेश्वर बी. देशमुख | १४.८८% कमी दराने |
| ३. | श्री. डी. अजित सिंग | ६.५% कमी दराने |

तरी प्राप्त निविदापत्रकापैकी मे. आदिनाथ कन्स्ट्रक्शन यांच्या निविदापत्रकाचे दर तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी व अं. प. दरापेक्षा १५.९९% कमी आहे. निविदा स्विकृतीचा प्रस्ताव मंजुरीस्तव व विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे शहागंज चमन भोवती व निजामोद्यीन दर्ग्यापर्यंत रोडचे डांबरी करण करणेच्या कामाकरीता प्राप्त झालेल्या निविदा पैकी तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी व अं. प. दरापेक्षा १५.९९% कमी दराची मे. आदीनाथ कन्स्ट्रक्शन यांची निविदा स्विकारण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ४३३/८ :**

अतिरिक्त शहर अभियंता यांनी प्रस्ताव दिला की, लिटल प्लॉवर स्कूल ते युनिव्हर्सिटी गेट पर्यंतच्या रोडचे डांबरीकरण करणेच्या कामासाठी तयार करण्यात आलेल्या

र. रु. २३,८२,९००/- च्या अंदाजपत्रकास स्थायी समिती ठराव क्र. ६६/५ दि. २०-०९-९६ अन्वये मंजुरी प्राप्त झालेली आहे.

त्यानुसार सदरील कामाकरीता निविदापत्रके मागविली असता निविदा पत्रके विक्रीच्या अंतिम तारखेपर्यंत एकूण ५ कोरी निविदापत्रके विकल्या गेली व निविदापत्रके दर भरुन प्राप्त झाली. प्राप्त निविदापत्रके उघडण्यात आली असता त्याचा तपशील खालील प्रमाणे.

| | | |
|---|---|---|
| १. | मे. आदिनाथ कन्स्ट्रक्शन | २२.९९% कमी दराने |
| २. | श्री. एम. एस. जग्गी | २१.००% कमी दराने |
| ३. | श्री. डी. अजितसिंग | २१.००% जास्त दराने |
| ४. | श्री. राजेश्वर बी. देशमुख | १७.८८% जास्त दराने |
| ५. | श्री. रे. कन्स्ट्रक्शन | १३.००% जास्त दराने |

प्राप्त निविदापैकी तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी व अंदाजपत्रकीय दरापेक्षा २२.९९% कमी दराची मे. आदीनाथ कन्स्ट्रक्शन यांची निविदा स्विकारणेचा प्रस्ताव मंजुरीस्तव व विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्यानुसार, लिटल प्लॉवर स्कूल ते युनिव्हर्सिटी गेट पर्यंतच्या रोडचे डांबरीकरण करणेच्या कामासाठी प्राप्त झालेल्या निविदापैकी तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी व अंदाजपत्रकीय दरापेक्षा २२.९९% कमी दराची निविदा आदिनाथ कन्स्ट्रक्शन यांची निविदा स्विकारण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ४३४/९ :**

अतिरिक्त शहर अभियंता यांनी प्रस्ताव दिला की, व्यंकटेश नगर सुराणा नगर सेव्हन हील कॉलनी आणि रघुवीर नगर मधील रोडचे डांबरीकरण करणेच्या कामासाठी तयार करण्यात आलेल्या र. रु. ७,७३,६१३/- च्या अं. प. कास स्थायी समिती ठराव क्र. ६७/६ दि. २०-०९-९६ अन्वये मंजुरी प्राप्त झाल्या नुसार सदर कामाकरीता निविदापत्रके मागविली असता निविदा विक्रीच्या अंतिम तारखेपर्यंत पाच कोरी निविदापत्रके विक्री झाली व स्विकृतीच्या अंतिम तारखेपर्यंत फक्त चार निविदा पत्रके दर भरुन प्राप्त झाली. प्राप्त निविदापत्रके दि. ०९-१०-९६ रोजी उघडण्यात आली. त्याचा तपशील खालील प्रमाणे.

| | | |
|---|---|---|
| १. | मे. आदिनाथ कन्स्ट्रक्शन | १५.९९% कमी दराने |
| २. | श्री. डी. अजितसिंग | १५.५% कमी दराने |
| ३. | श्री. एम. एस. जग्गी | १४.००% कमी दराने |
| ४. | श्री. राजेश्वर बी. देशमुख | ८.८८% कमी दराने |

तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी व अं. प. दरापेक्षा १५.९९% कमी दराची मे. आदिनाथ कन्स्ट्रक्शन यांची निविदा स्विकारणेचा प्रस्ताव विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, व्यंकटेश नगर, सुराणा नगर, सेव्हन हील कॉलनी आणि रघुवीर नगर मधील रोडचे डांबरीकरण करणेच्या कामाकरीता प्राप्त झालेल्या निविदापैकी तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी व अंदाजपत्रकीय दरापेक्षा १५.९९% कमी दराचे मे. आदीनाथ कन्स्ट्रक्शन यांची निविदा स्विकारण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ४३५/१० :**

शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला की, नारेगांव येथील स्मशानभूमी येथे बर्निंग रोड रेस्टींग रोड व तार कुंपण व पाण्याचा हौद बांधणे इ. कामाचे अंदाजपत्रक सा. बा. खात्याचे सन ९५-९६ च्या दरसुची अन्वये र.रु. २,५६,२००/- चे तयार करण्यात आले त्यास मा. आयुक्त यांनी मंजुरी दिलेली आहे. सदर खर्च स्मशानभूमीची तरतुदीमधून करण्यात येणार आहे. करीता प्रसतव विचारार्थ सादर.

**ठराव :**

सदरचा प्रस्ताव पुर्वीच मंजुर झालेला असल्याने वगळण्यात यावा असे सर्वानुमते ठरले.

**विषय क्र. ४३६/११ :**

शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला की, प्राणी संग्राहालय येथील मिनी थिएटरच्या बाजूस लव्हबर्ड करीता (डोम टाईप) पिंजरे तयार करण्याकरीता सा. बा. खात्याचे सन ९५-९६ चे जिल्हा दरसुची नुसार रु. १,४३,०००/- वे अंदाजपत्रक तयार करण्यात आले असून, त्यास मा. आयुक्तांनी दि. २४-१०-९६ अन्वये मंजुरीस्तव सादर. सदरचा खर्च प्राणी संग्राहालय विकसित करणे या लेखा शिर्षातून सन ९६-९७ मध्ये करण्यात येणार आहे.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्यानुसार, प्राणी संग्राहालय येथील मिनी थिएटरच्या बाजूस लव्हबर्ड करीता (डोम टाईप) पिंजरे तयार करण्यासाठी तयार करण्यात आलेल्या र. रु. १,४३,८००/- च्या अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ४३७/१२ :**

शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला की, हर्सुल येथील बौध्द स्मशानभुमी मध्ये बर्निंग रोड व संरक्षित भिंत बांधणे बाबत कामाचे अंदाजपत्रक सन ९५-९६ च्या सा. बा. खात्याच्या दरसुची अन्वये र. रु. २,६०,०००/- चे तयार करण्यात आले त्यास मा. आयुक्त यांनी मंजुरी दिलेली आहे. सदर खर्च स्मशानभूमी या तरतुदी मधून करण्यात येणार आहे.

करीता प्रसताव विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे हर्सुल येथील बौध्द स्मशानभूमी मध्ये बर्नींग रोड व संरक्षित भिंत बांधणेच्या कामाकरीता तयार करण्यात आलेल्या र. रु. २,६०,०००/- च्या अंदाजपत्रकास तसेच सदरचा खर्च " स्मशानभूमी " या तरतुदी मधुन करण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ४३८/१३ :**

शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला की, मो. गणेश कॉलनी येथे मनपाच्या मोकळया जागेवर संरक्षित भिंत बांधणेच्या कामासाठी सा. बा. खात्याचे सन ९५-९६ चे जिल्हा दरसुचीनुसार रु. २,५९,६००/- चे अंदाजपत्रक तयार करण्यात आले असून, स्थायी समिती मध्ये प्रस्ताव सादर करण्यासाठी दि. २०-१०-९६ अन्वये मा. आयुक्तांनी शिफारस केली आहे.

सबब सदर कामाचे रु. २,५९,६००/- चे अंदाजपत्रक मंजुरीचा प्रस्ताव मंजुरीस्तव व विचारार्थ सादर. सदरचा खर्च विकास इमारती शाळा व दवाखाने बांधणे या लेखा शिर्षामधून सन ९६-९७ या वर्षात करण्यात येईल.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे गणेश कॉलनी येथील मनपाच्या मोकळया जागेवर संरक्षित भिंत बांधणेच्या कामासाठी तयार करण्यात आलेल्या रु. २,५९,६००/- च्या अंदाजपत्रकास तसेच सदरचा खर्च " विकास इमारती शाळा व दवाखाने बांधणे " या लेखा सन ९६-९७ या वर्षात करण्यात येईल.

**विषय क्र. ४३९/१४ :**

शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला की, मो. चौरसनगर स्लम भागात डांबरी रस्ते तयार करणे या कामाकरीता रु. ३,७२,३००/- चे अंदाजपत्रक सा. बा. विभाग औरंगाबाद यांचे दरसुची ९५-९६ प्रमाणे तयार करण्यात आले असून, मा. आयुक्त यांची दि. ०२-११-९६ रोजी प्रशासकीय मान्यता देण्यात आली आहे. करीता प्रस्ताव मंजुरीस्तव व विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे चौरसनगर, स्लम भागात डांबरी रस्ते तयार करणेच्या कामाकरीता तयार करण्यात आलेल्या रु. ३,७२,३००/- च्या अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ४४०/१५ :**

शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला की, मो. गितानगर नहर डांबरी टाकीचे समोर मनपा प्राथमिक शाळेकीरता नविन खोल्या बांधणेच्या कामासाठी मा. सर्वसाधारण सभा ठराव क्र. १२/१० दि. २०-०७-९६ अन्वये रु. ५,९७,२१०/- चे अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजुरी मिळालेली आहे. सदरचे काम हाती घेण्यासाठी कार्यालयीन निविदा सुचना क्र. मनपा/लेखा/नि/१०३/९६ दि. २०-०९-९६ अन्वये बी - १ नमुन्यात निविदा मागविल्या असता कोऱ्या निविदा विक्रीच्या तारखेपर्यंत एकूण ५ निविदा विक्री झाल्या निविदा स्विकारणेच्या अंतिम तारखेपर्यंत एकूण ४ चार निविदा दर भरलेल्या प्राप्त झाल्या त्या दि. ०९-१०-९६ ला उघडण्यात आल्या. त्यांचा तुलनात्मक तक्ता खालील प्रमाणे.

| | | |
|---|---|---|
| १. | एस. पी. सोधी | २.०२% कमी दराने |
| २. | श्री. एल. ए. नवाब | ४.०९% कमी दराने |
| ३. | मे. पारस कन्स्ट्रक्शन | ०.०५% कमी दराने |
| ४. | श्री. सुजात अली हाश्मी | २% कमी दराने |

तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी व अंदाजपत्रकीय दरापेक्षा ४.०९% कमी दराची श्री. एस. ए. नवाब यांची निविदा आहे. सदर दरास लेखाधिकारी-१ यांनी मान्य करण्याचा प्रसताव मा. आयुक्तांकडे सादर केला असता मा. आयुक्तांनी गुत्तेदारास चर्चेस बोलाविण्याचे दि. ०४-११-९६ अन्वये आदेशित केले त्यानुसार दि. १९-११-९६ ला पत्राद्वारे मक्तेदारास मा. आयुक्तांनी चर्चा होऊन सदर कामास मा. आयुक्तांनी दि. १९-११-९६ अन्वये अंदाजपत्रकीय

दरापेक्षा ४.०९% कमी दरास मान्यता दिलेली आहे. सबब सदर कामाचे तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी अंदाजपत्रकीय दरापेक्षा ४.०९% कमी दराची श्री. एस. ए. नवाब यांची निविदा मंजुरीचा प्रस्ताव विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्यानुसार, मो. गितानगर नहर डांबरी समोर मनपा प्राथमिक शाळेकीरता नविन खोल्या बांधणेच्या कामासाठी प्राप्त झालेल्या निविदापैकी तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी व अं. प. दरापेक्षा ४.०९% कमी दराची श्री. एस. ए. नवाब यांची निविदा स्विकारण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ४४१/१६ :**

शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केल की, बन्सीलाल नगर मनपा अग्नीशमन दल विभाग येथील मोटार गॅरेजच्या प्लोरींगला क्रॉंकीट करणे व मुख्य भागास कोल्प्सीबल गेट बसविण्याचे कामासाठी स्थायी समिती बैठक ठराव क्र. १७४/२० दि. ०९-०८-९६ अन्वये रु. ३,३२,४९६/- चे अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजुरी मिळालेली आहे. सदरचे काम हाती घेण्यासाठी कार्यालयीन निविदा सुचना क्र. /मनपा लेखा/नि/१०३/९६ दिनांक २०-०९-९६ अन्वये बी-१ नमुन्यात निविदा मागविल्या असता कोऱ्या निविदा विक्रीच्या तारखेपर्यंत एकूण सहा (६) निविदा दर भरुन प्राप्त झाल्या त्या दि. ०९-१०-९६ ला उघडण्यात आल्या त्यांचा तुलनात्मक तक्ता खालील प्रमाणे.

| | | |
|---|---|---|
| १. | मे. जयश्री कंस्ट्रक्शन | १५.६५% कमी दराने |
| २. | श्री. कुलवंत सिंग | १८% जास्त दराने |
| ३. | श्री. एस. एस. असोसिएट | १४.११% कमी दराने |
| ४. | श्री. रिचपालसिंग बिंद्रा | १७.२८% कमी दराने |
| ५. | श्री. सलीम पटेल | ३.९१% कमी दराने |
| ६. | श्री. मन्नान खान | १४.१% कमी दराने |

तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी व अंदाजपत्रकीय दरापेक्षा १७.२८% कमी दराची श्री. रिचपालसिंग बिंद्रा यांची निविदा मंजुरीचा प्रस्ताव विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, बन्सीलाल नगर मनपा अग्नीशमन दल विभाग येथील मोटार गॅरेजच्या प्लोरींगला क्रॉंकीट करणे व मुख्य भागास कोल्प्सीबल गेट बसविण्याचे कामाकरीता प्राप्त निविदापैकी तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी व अंदाजपत्रयकी दरापेक्षा १७.२८% कमी दराची श्री. रिचपालसिंग बिंद्रा यांची निविदा स्विकारण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ४४२/१७ :**

शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला की, मो. अजबनगर, मिलिंदनगर येथे आभ्यासिका केंद्र बांधणेच्या कामासाठी सा. बा. खात्याचे सन ९५-९६ चे जिल्हा दरसुची नुसार रु. २,२६,४६०/- चे अंदाजपत्रक तयार करण्यात आले असून, त्यास मा. आयुक्तांनी दि. ०५-११-९६ ला मंजुरी देऊन स्थायी समितीकडे प्रस्ताव ठेवण्यासाठी शिफारस केले

आहे. सबब सदर कामासाठी र. रु. २,२६,४६०/- चे अंदाजपत्रक मंजुरीचा प्रस्ताव विचारार्थ सादर.

सदरचा खर्च ५% कमकुवत घटकासाठी कल्याणकारी योजना या लेखा शिर्षा मधून सन ९६-९७ या वर्षात करण्यात येईल.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्यानुसार, अजबनगर, मिलिंदनगर येथे आभ्यासिका केंद्र बांधणेच्या कामाकरीता तयार करण्यात आलेल्या रु. २,२६,४६०/- च्या अंदाजपत्रकास व सदर खर्च ५% कमकुवत घटकासाठी कल्याणकारी योजना " या लेखा शिर्षामधून करण्यात सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ४४३/१८ :**

शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, मो. संजय नगर मुकूंदवाडी समाज मंदिराच्या समोरील मोकळया जागेवर मनपा शाळेला तीन खोल्या, मुला मुलींसाठी शौचालय बांधणेच्या कामासाठी मा. सर्वसाधारण दि. २०-०७-९६ ठराव क्र. ११/९ अन्वये र. रु. १०,३८,०००/- चे अंदाजपत्रक सर्वानुमते मंजुरी मिळालेली आहे. सदरचे काम हाती घेण्यासाठी कार्यालयीन सुचना क्र. मनपा/लेखा/नि/१०३/९६ दि. २०-०९-९६९ अन्वये बी-१ नमुन्यात निविदा मागविल्य असता कोऱ्या निविदा विक्रीच्या तारखेपर्यंत एकूण १० निविदा विक्री झाल्या त्या दि. ०९-१०-९६ ला उघडण्यात आल्या त्याचा तुलनात्मक तक्ता खालील प्रमाणे.

| | | |
|---|---|---|
| १. | श्री. बी. एल. काल्डा | २०% जास्त दराने |
| २. | श्री. एस. प्रितमसिंग सोधी | १.२३% कमी दराने |
| ३. | श्री. अ. सलीम | २% जास्त दराने |
| ४. | मे. एस. एच. असोसिएट | ११.०१% कमी दराने |

तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी व अंदाजपत्रकीय दरापेक्षा ११.०१% कमी दराची मे. एस. एच. असोसिएट यांची निविदा असून, प्राप्त कमी दरास मा. आयुक्त यांनी दि. ०५-११-९६ अन्वये मान्यता देऊन प्रस्ताव स्थायी समितीच्या समोर सादर करण्यासाठी शिफारस केलेली आहे. सबब सदर कामाचे तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी व अंदाजपत्रकीय दरापेक्षा ११.०१% कमी दराची मे. एस. एच. असोसिएट यांची निदि मंजुरीचा प्रस्ताव विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, संजयनगर मुकूंदवाडी समाज मंदिराच्या समोरील मोकळया जागेवर मनपा शाळेला तीन खोल्या, मुला मुलींसाठी शौचालय बांधणेच्या कामाकरीता प्राप्त झालेल्या निविदापैकी तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी व अंदाजपत्रकीय दरापेक्षा ११.०१% कमी दराची मे. एस. एच. असोसिएटस यांची निविदा स्विकारण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ४४४/१९ :**

शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, नारेगांव येथे अभ्यासिका केंद्र बांधणेच्या कामासाठी सार्वजनिक बांधकाम खात्याच्या सन ९५-९६ चे जिल्हा दरसुचीनुसार

र. रु. २,६१,९८०/- चे अंदाजपत्रक तयार करण्यात आले असून, त्यास मा. आयुक्तांनी दि. २०-१०-९६ अन्वये मंजुरी दिलेली आहे.

सबब सदर कामाचे र. रु. २,६१,९८०/- अंदाजपत्रक मंजुरीचा प्रस्ताव विचारार्थ सादर. सदरचा खर्च ५% कमकूवत घटकासाठी कल्याणकारी योजना या लेखा शिर्षामधून सन ९६-९७ मध्ये करण्यात येईल.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, नारेगांव येथे अभ्यासिका केंद्र बांधणेच्या कामाकरीता तयार करण्यात आलेल्या ८० र. रु. २,६१,९८०/- च्या अंदाजपत्रकास तसेच सदरचा खर्च ५% कमकुवत घटकासाठी कल्याणकारी योजना या लेखा शिर्षा मधुन करण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र ४४५/२० :**

शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला की, चिकलठाणा येथील भाजी मार्केट शेड तोडून त्या जागेवर आर. सी. सी. दुकाने व पहिला मजल्यावर पोलीस चौकी बांधणेच्या कामासाठी स्थायी समिती सभेचा ठराव क्र. ४१७/३ दि. ०५-०२-९६ अन्वये र. रु. ५.०० लाखाची अंदाजपत्रक सर्वानुमते मंजुरी प्राप्त झालेली आहे. तसेच सदर काम हाती घेण्यासाठी कार्यालयीन निविदा मागविल्या असता कोऱ्या निविदा विक्रीच्या तारखेपर्यंत एकूण (१२) निविदा झाल्या. निविदा स्विकारणेच्या अंतिम तारखे पर्यंत एकूण (६) निविदा दर भरुन प्राप्त झाल्या त्या दि. ०९-१०-९६ ला उघडण्यात आल्या त्याचा तुलनात्मक तक्ता खालील प्रमाणे.

| | | |
|---|---|---|
| १. | श्री. मोहम्मद रऊफ | ४.९९% जास्त दराने |
| २. | श्री. विद्यानंद पेधी | ६% कमी दराने |
| ३. | श्री. रिचमलसिंग बींद्रां | ३.७२% कमी दराने |
| ४. | मे. एस. एच. असोसिएटस | ११.११% कमी दराने |
| ५. | श्री. कुलवंत सिंग | ४.९०% कमी दराने |
| ६. | श्री. मनोज घोडके | ३.३१% कमी दराने |

तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी व अंदाजपत्रकीय दरापेक्षा ११.११% कमी दराची मे. एस. एच. असोसिएटस यांची निविदा आहे. प्रस्ताव स्थायी समिती समोर ठेवा या अटीवर मा. आयुक्तांनी दि. २६-१०-९६ अन्वये मंजुरी दिलेली आहे. सबब सदर कामाची तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी व अंदाजपत्रकीय दरापेक्षा ११.११% कमी दराची मे. एस. एच. असोसिटस यांची निविदा मंजुरीचा प्रस्ताव विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, , चिकलठाणा येथील भाजी मार्केट शेड तोडून त्या जागेवर आर. सी. सी. दुकाने व पहिला मजल्यावर पोलीस चौकी बांधणेच्या कामासाठी प्राप्त निविदापैकी तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी व अंदाजपत्रकीय दरापेक्षा ११.११% कमी दराची मे. एल. एच. असोसिएटस यांची निविदा स्विकारण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ४४६/२१ :**

शहर अभियंता यांनी प्रसताव सादर केला आहे खडकेश्वर येथील मनपा वाचनालयाचे दुसऱ्या टप्प्याचे काम करण्यासाठी मा. सर्वसाधारण सभा दि. १७-०८-९६ ठराव क्र. ८६/७ अन्वये रक्कम रु. १५,२३००/- चे अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजुरी मिळालेली आहे. सदर काम हाती घेण्यासाठी कार्यालयीन निविदा सुचना क्र./मनपा/लेखा नि/१०३/९६ दि. ९०-०९-९६ अन्वये बी-१ नमुन्यात निविदा मागविल्या असता विक्रीच्या तारखेपर्यंत एकूण ४ निविदा दर भरून प्राप्त झाल्या ह्या दि. ०९-१०-९६ ला उघडण्यात आल्या त्याचा तुलनात्मक तक्ता खालील प्रमाणे.

| | | |
|---|---|---|
| १. | श्री. एस. प्रितमसिंग सोधी | ०.०१२% कमी दराने |
| २. | मे बसरा कन्स्ट्रक्शन | दर भरलेली नाही. |
| ३. | मे. हरीष कन्स्ट्रक्शन | २% कमी दरान |
| ४. | मे. शिवा कन्स्ट्रक्शन | ४.९९% कमी दराने |

तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी व अंदाजपत्रकीय दरापेक्षा ४.९९% कमी दराची मे. शिवा कन्स्ट्रक्शन यांची निविदा असून, प्राप्त दरास मान्यता देऊन प्रस्ताव स्थायी समिती समोर ठेवण्याबाबत दि. ०२-११-९६ अन्वये मा. आयुक्त साहेबांनी शिफारस केली आहे. सबब सदर कामासाठी तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी व अंदाजपत्रकीय दरापेक्षा ४.९९% कमी दराची मे. शिवा कन्स्ट्रक्शन यांची निविदा दर मंजुरीचा प्रस्ताव विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, मो. खडकेश्वर येथील मनपा वाचनालयाचे दुसऱ्या टप्प्याचे काम करण्यासाठी प्राप्त झालेल्या निविदापैकी तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी व अंदाजपत्रकीय दरापेक्षा ४.९९% कमी दराची मे. शिवा कन्स्ट्रक्शन यांची निविदा स्विकारण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ४४७/२२ :**

शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला की, मो. कैलास नगर प्रा. शाळेवर पहिला मजला बांधणेच्या कामासाठी स्थायी समितीच्या बैठक दि. १८-१०-९५ ठराव क्र. १५०/७ अन्वये र. रु. २,२५,०००/- ला सर्वानुमते मंजुरी प्राप्त झालेली आहे. सदरील काम स्थायी समिती ठराव क्र. ४२७/३ दि. १३-०२-९६ अन्वये अंदाजपत्रक दराने श्री. एस. जी. भालेराव यांचेकडून करुन घेण्यासाठी सर्वानुमते मंजुरी मिळालेली असून, कार्यादेश क्र. एमसा/एईडब्ल्यू (बी)/२०८/९६ दि. ०७-०३-९६ अन्वये काम हाती घेण्यात आले व मुळ काम पूर्ण करण्यात आले असून, सदर कामात शाळेच्या प्रांगणात फरशी बसविणे; मुतारी बांधणे संरक्षित भितींची उंची वाढविणे नाल्यावर स्लॅब टाकणे, पाण्याची टाकी बसविणे या बाबीकरीता एकूण र.रु. ५८,९००/- ची वाढ होत आहे. अतिरिक्त कामास मुदतवाढ व मंजुरी प्राप्त झालेली आहे.

सबब सदर कामासाठी सुधरीत अंदाजपत्रक र.रु. २,८३,९००/- ला तसेच मुळ कामाचे बी-१ निविदा नियम व अटीनुसार काम मुळ गुत्तेदार श्री. एस. जी. भालेराव कडून घेण्याचा प्रस्ताव मंजुरीस्तव सादर. सदरचा खर्च विकास इमारती शाळा व दवाखाने बांधणे या लेखा शिर्षामधून सन ९६-९७ या वर्षात करण्यात येईल.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, कैलासनगर प्रा. शाळेवर पहिला मजला बांधणेच्या कामाव्यतिरिक्त शाळेच्या प्रांगणात फरशी बसविणे, मुतारी बांधणे संरक्षित भितींची उंची वाढविणे नाल्यावर स्लॅब टाकणे, पाण्याची टाकी बसविणे या बाबीकरीता र.रु. ५८,९००/-

च्या वाढीव खर्चास तसेच सदरील अतिरिक्त क्रमास मुळ गुत्तेदार श्री. एस. जी. भालेराव यांचेकडून बी-१ निविदा अटी नियमानुसार करुन घेण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. तसेच सुधारीत अंदाजपत्रक र.रु. २,८३,९००/- ला सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ४४८/२३ :**

शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला की, महानगरपालिका यांत्रिकी कार्यशाळेमध्ये नविन शेड व रुम बांधणेच्या कामासाठी स्थायी समिती बैठक ठराव क्र. २४/२३ दि. २८-०३-९६ अन्वये र. रु. ५०,०००/- चे अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजुरी मिळालेली आहे. सदरचे काम हाती घेण्यासाठी कार्यालयीन निविदा क्र. मनपा/लेखा/नि/९७/९६ दि. २७-०८-९६ अन्वये बी-१ नमुन्यात निविदा मागविल्या असता कोऱ्या निविदा विक्रीच्या तारखेपर्यंत एकूण १६ निविदा विक्री झाल्या. निविदा स्विकारणेच्या अंतिम तारखेपर्यंत एकूण ४ निविदा दर भरुन प्राप्त झाल्या त्या दिनांक १३-०९-९६ ला उघडण्यात आल्या त्यांचा तुलनात्मक तक्ता खालील प्रमाणे.

| | | |
|---|---|---|
| १. | श्री. कुलवंतसिंग | ३% जास्त दराने |
| २. | श्री. सय्यद अथर अली | २०% जास्त दराने |
| ३. | श्री. सलीम पटेल | २% जास्त दराने |
| ४. | श्री. एस. एम. मंडोरे | ५% जास्त दराने |

तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी व अंदाजपत्रकीय दरापेक्षा २% जास्त दराची श्री. सलीम पटेल यांची निविदा आहे. दर जास्त वाटत असल्यामुळे.

मक्तेदारास मा. आयुक्त यांचे दालनात दराचे वाटाघाटी करीता दि. ०७-११-९६ ला बोलाविले असता वाटाघाटी अंती सदरील काम अंदाजपत्रकीय दराने मा. आयुक्तांनी दि. ०७-११-९६ अन्वये मंजुरी दिली असून, त्यास मक्तेदारानेही लेखी संमती दिली आहे. सबब सदर कामाचे तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी व अंदाजपत्रकीय दरापेक्षा २% जास्त ऐवजी अंदाजपत्रकीय दराची (वाटाघाटीनुसार) श्री. सलीम पटेल यांची निविदा मंजुरीचा प्रस्ताव विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, मनपा यांत्रिकी कार्यशाळेमध्ये नविन रोड व रुम बांधणेच्या कामासाठी प्राप्त झालेल्या निविदांपैकी वाटाघाटी अंती ठरल्यानुसार श्री. सलीम पटेल यांची अंदाजपत्रकीय दराची निविदा स्विकारण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ४४९/२४ :**

शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला की, मो. एकनाथ नगर येथे प्रा.शाळेवर पहिला मजला बांधणेच्या कामासाठी मा. सर्वसाधारण सभा ठराव क्र. १५/१३ अन्वये र. रु. ९,८७,७१५/- चे अंदाजपत्रकीय मान्यता मिळालेली असून, सदर काम हाती घेण्यासाठी कार्यालयीन निविदा सुचना क्र. मनपा/लेखानि/१०३/९६ दि. २०-०७-९६ अन्वये बी-१ नमुन्यात निविदा मागविल्या असता कोऱ्या निविदा विक्रीच्या तारखे पर्यंत एकूण ४ निविदा विक्री झाल्या निविदा स्विकारणेच्या अंतिम तारखेपर्यंत फक्त एकच निविदा दर भरलेली प्राप्त झाली ती दि. ०९-१०-९६ ला उघडण्यात आली. सदरची निविदा ही मे. शिवा

कन्स्ट्रक्शन यांची अंदाजपत्रकीय दरापेक्षा २% कम दराची असून, स्थायी समिती समोर ठेवण्या बाबत मा. आयुक्तांनी दि. ०७-११-९६ अन्वये शिफारस केलेली आहे. सबब सदर कामाची अंदाजपत्रकीय दरापेक्षा २% कमी दराची मे. शिवा कन्स्ट्रक्शन यांची निविदा मंजुरीचा प्रस्ताव विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, एकनाथनगर येथे प्रा. शाळेवर पहिला मजला बांधणेच्या कामाकरीता प्राप्त झालेली मे. शिवा कन्स्ट्रक्शन यांची अंदाजपत्रकीय दरापेक्षा २% कमी दराची निविदा स्विकारणेस सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र ४५०/२५ :**

कार्यकारी अभियंता पाणी पुरवठा व जलनि:सारण यांनी प्रस्ताव सादर केला की, मो. जयसिंगपुरा येथील नाल्याची व्ही टाईप गटार बांधणेच्या कामाकरीता अंदाजपत्रक र. रु. १,७६,५००/- चे परिसर अभियांत्रिकीच्या दरसुची ९५-९६ नुसार प्रस्तावित केले आहे.

सदरील काम " झोपडपट्टी व शहरातील इतर भागात खुल्या गटारी बांधणे " ला लेखा शिर्षकाखाली प्रस्तावित केले आहे. सदरील अंदाजपत्रकास मा. आयुक्तांनी दि. ०७-११-९६ ला मंजुरी दिलेली आहे. तरी अंदाजपत्रकीय र. रु. १,७६,५००/- ला स्थायी समितीच्या विचारार्थ व प्रस्ताव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, जयसिंगपुरा येथील नाल्याची व्ही टाईप दगडी गटार बांधणेच्या कामाकरीता तयार करण्यात आलेल्या र. रु. १,७६,५००/- च्या अंदाजपत्रकास तसेच सदर खर्च झोपडपट्टी व शहरातील इतर भागात खुल्या गटारी बांधणे या शिर्षाखाली करण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ४५१/२६ :**

कार्यकारी अभियंता पाणी पुरवठा व जलनि:सारण यांनी मो. कटकट गेट तलाव वाडी वार्ड क्र. २५ शरीफ कॉलनी येथील अस्तित्वात असलेली ड्रेनेज लाईन काढुन १५० मी. मी. व्यासाची आर. सी. सी. ड्रेनेज लाईन टाकणेच्या कामाकरीता परिसर अभियांत्रिकीच्या सन ९४-९५ चे दरसुचीनुसार रक्कम रु. २,१४,८००/- चे अंदाजपत्रक सादर केले आहे.

सदर काम देखभाल दुरुस्ती ९६-९७ या लेखा शिर्षातुन प्रस्तावित केले आहे. सदरील कामास मा. आयुक्तांनी दि. ०४-११-९६ ला मुंरी दिलेली आहे. तरी प्रस्ताव विचारार्थ व मंजुरीस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, मो. कटकट गेट तलाव वाडी वार्ड क्र. २५ शरीफ कॉलनी येथील अस्तित्वात असलेली ड्रेनेज लाईन काढुन १५० मी. मी. व्यासाची आर. सी. सी. ड्रेनेज लाईन टाकणेच्या कामाकरीता तयार करण्यात आलेल्या र. रु. २,१४,८००/- च्या अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ४५२/२७ :**

सहाय्यक आयुक्त-२ यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, महानगरपालिकेत मालमत्ता विभागाच्या अधिपत्याखाली असलेले शहरातील विविध विभागात अस्तित्वात ३०

स्मशानभुमीच्या देखभाल (संरक्षण) करीता ३० पदे स्मशान जोगी/वाचमन वेतनश्रेणी रु. ७५०-१२-८७ ईबी-१४-९४० मध्ये पदे निर्माण करण्या करीता प्रस्ताव विचारार्थ व मंजुरीस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, मनपाच्या मालमत्ता विभागाच्या अधिपत्याखाली असलेले शहरातील विविध विभागात अस्तित्वात असलेल्या ३० स्मशानभूमीच्या देखभाली (संरक्षण) करीता (३०) पदे स्मशानजोगी/वाचमन) वेतनश्रेणी रु. ७५०-१२-८७० ईबी-१४-९४० मध्ये पदे निर्माण करण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येवून सर्वसाधारण सभेस शिफारस करण्यात येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ४५३/२८ :**

मालमत्ता अधिकारी यांनी मा. आयुक्त यांच्या मंजुरी प्रस्ताव सादर करीत आहे की, पैठणगेट येथील वाहनतळ कार्यालयातर्फे कार्यरत करण्यात आले होते. परंतु सदरील वाहनतळासाठी नागरिकांकडून पाहिजे तेवढा प्रतिसाद न मिळाल्यामुळे सायकल स्टँड बंद करावे लागते. तसेच सन ९६-९७ या वर्षाकरीता वर्तमानपत्रात जाहिर सुचना देण्यात आल्या होत्या. परंतु या वाहनतळासाठी एकही निविदा प्राप्त झाली नाही. त्यामुळे सदरील वाहनतळा पासून मनपास काहीच उत्पन्न मिळत नाही.

तथापी, श्री. रईस कुरैशी यांना अर्ज दिला आहे की, सदर सायकल स्टँड मला चालविण्यासाठी दिल्यास दरमहा ६००/- प्रमाणे भाडे देईल. याबाबतची मागणी केलेली आहे.

सायकल स्टँड अटी शर्तीनुसार अर्जदाराकडून सहा महिन्याचे आगाऊ भाउे भरणा करुन आवक अनामत र. रु. ५,०००/- भरणा करावी. तरी वरील सायकल स्टँउ मार्च ९७ पर्यंत बसविण्यासाठी देण्याबाबत प्रस्ताव विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, पैठणगेट येथील वाहनतळ श्री. रईस कुरैशी यांना सायकल स्टँड चालविण्याकरीता प्रतिमहा रु. ६०० प्रमाणे भाडयाने देण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यत येते. परंतु अनामत रक्कम रु. ५००/- ऐवजी रु. ३,०००/- घेण्यास यावा.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ४५४/२९ :**

आरोग्य वैद्यकीय अधिकारी यांनी प्रस्तावित केले आहे की, सन ९६-९७ सालासाठी पाणी शुध्दीकरण गोळी क्लोरीन ३० एम. जी. खरेदी करण्याकरीता निविदा जाहिरात क्र. १८५५ दि. २२-१०-९६ देऊन मागवल्या होत्या त्यानुसार एकूण चार निविदा प्राप्त झाल्या आहेत. त्यांचे दर खालील प्रमाणे आहेत.

| | | | |
|---|---|---|---|
| १. | एम. एस. सभान नागपुर | दर प्रति हजार गोळी | रु. ८१.९५ |
| २. | एम. एस. प्रिमियर असोसिएट नागपूर | दर प्रति हजार गोळी | रु. ७२.५० |
| ३. | एस. के. सेल्स नागपुर | दर प्रति हजार गोळी | रु. ८१.५० |
| ४. | ओरथ केम नागपुर | दर प्रति हजार गोळी | रु. ८३.७५ |

वरील चार निविदामध्ये मे. प्रिमियर असोसिएट नागपुर यांचे कमी दर रु. ७२.५० प्रति हजार गोळी साठी आहेत. तरी मे. प्रिमियर असोसिएट नागपुरा यांचे कमी दर मंजूर करुन त्यांचे बरोबर सन ९६-९७ साठी करार करण्यासाठी मंजुरी द्यावी व अंदाजपत्रकीय तरतुदीनुसार खरेदीस मान्यता द्यावी.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, सन ९६-९७ सालाकरीत पाणी शुध्दीकरण गोळी क्लोरीन ३० एम. जी. खरेदी करण्याकरीता प्राप्त झालेल्या निविदापैकी तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी दर असलेली म्हणजेच रु. ७२.५० प्रति हजार गोळी या दराची मे. प्रिमियन असोसिएट नागपुर यांची निविदा स्विकारण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. त्यांचे बरोबर ९६-९७ सालाकरीता करार करण्यात यावा. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ४५५/३० :**

लेखाधिकारी यांनी प्रस्ताव सादर केला की, मनपा गणवेश विनिमय क्र. २५ दि. १८-०६-९० अनुसार खालील स्त्री कर्मचारी/कामगारांसाठी दर वर्षी मकर संक्रातपुर्वी प्रत्येकी दोन साडया व ब्लाऊज पिसेस तथा स्विपर यांना शर्ट सलवारचे कापड व ओढणी देणे आहे.

देय कर्मचारी सार्वजनिक आरोग्य, परिचारिका, परिचारिका, प्रसविक्रका, नर्स, एएनएम माळीन, मजूरीन स्त्री स्वीपर, सेविका (शिक्षण व इतर विभाग)

वरील साहित्य देणेसाठी वर्तमानपत्रातून जाहिरात देण्यात आली होती एकूण चार निविदा या विभागास प्राप्त झाल्या. प्राप्त निविदा वसाहित्याचे नमुने विविध संघटनेच्या पदाधिकाऱ्यांना व उपस्थित कामगार, प्रतिनिधीस दाखविण्यात आले पसंत केलेल्या नमुन्यावर संबंधितांच्या स्वाक्षाऱ्या घेण्यात आल्या व सुचना घेण्यात आल्या.

पसंत केलेल्या नमुन्याचे विवरण व येणार खर्च

| | |
|---|---|
| साडी ८ मीटर - रंगित | कंपनी - दिपक<br>रंग - भरुन (लाल)<br>डिझाईन पंसत केलेल्या साडीनुसार<br>दर -रु. ४२७/- प्रतिनग<br>अंदाजे खरेदी ७०० नग<br>अंदाजे खर्च रु. २,९८,९००/- |
| साडी ५ मीटर - रंगीत | कंपनी - वांगी<br>डिझाईन पसंत केलेल्या साडी नुसार<br>परंतु परिचारीका नर्सयांना पूर्ण<br>प्लेन देणे आहे.<br>दर रु. ३१०/- प्रति नग<br>अंदाजे खरेदी - ५० नग<br>अंदाजे खर्च र. १५,५००/- |

| | |
|---|---|
| साडी ५ मीटर पांढरा रंग | कंपनी - वांगी<br>डिझाईन पंसत केलेल्या साडीनुसार<br>परंतु परिचारीका नर्स यांना पूर्ण<br>ल्पेन देणे आहे.<br>दर रु. २१०/- प्रति नग<br>अंदाजे खरेदी १८०/- नग<br>अंदाजे खर्च ३७,८००/- |

६ ब्लाऊज पिसेस व शर्ट सलवार, ओढणी कापडाचे नमुणे पसंत होणे शेश असलेने प्रस्ताव सादर करण्यात येईल.

वरील प्रमाणे एकूण खर्च रु. ३,६८,१६०/- मे. शा. मशुरदास छबिलदास यांची निविदा यापुर्वी मा. स्थायी समिती तसेच मा. सर्वसाधारण सभेने वाढीव अंदाजपत्रकीय तरतुदीस मान्यता दिले. नुसार प्रस्ताव विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, मजपातील स्त्री कर्मचारी / कामगारांस प्रत्येकी दोन साडया व ब्लाऊज पिसेस तथा स्विपर यांना शर्ट सलवारचे कापड ओढणी देण्याकरीता मे. शा. मशुरदास छबिलदास यांचे खालील दर्शविलेल्या दरास तसेच एकूण खर्च रु. ३,६८,१६०/- ला सर्वानुमते मंजुरी देण्यात येते

१. साडी ८ मीटर रंगीत (कपनी - दिपक) दर प्रतिनग रु. ४२७/-
२. साडी ५ मीटर रंगीत (कंपनी - वांगी) दर प्रतिनग रु. २१०/-
३. साडी ८ मीटर पांढरा रंग (कंपनी - वांगी) दर प्रतिनग रु. ३१०/-
४. साडी ५ मीटर पांढरा रंग (कंपनी - वांगी) दर प्रतिनग रु. २१०/-

सदरील साडयांचे वाटप संक्रातीपुर्वी करणे आवश्यक असल्याचे या सभेत ठरावास स्विकृती देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ४५६/३१ :**

लेखाधिकारी यांनी प्रस्ताव सादर केला की, मनपा गणवेश विनिमय क्र. २५ दि. १८-०६-९६ अनुसार खालील कर्मचारी / कामगार यांना दर तिन वर्षांनी गरम कपडे देय आहेत.

वुलनकोट-सर्व निरिक्षक, फोरमन, मेकॅनिक, पंप ऑपरेटर, इलेक्ट्रीशियन, लाईनमन (पाणी पुरवठा) व विद्युत, फिटर, क्लिनर, माळी, शिपाई,जवान, हमाल, मजूर, सेवक इ.

वुलन स्वेटर-सर्व वाहन चालक तसेच सुरक्षा रक्षकांनी लेखा मागणी केले नुसार वुलन कोट ऐवजी स्वेटर देणे आहे.

ब्लॅकेटस - माळीण, मजुरीन, स्त्री स्वीपर, दाया, सेविका, (शिक्षण विभाग व इतर विभाग)

वरील कपडे मागविण्यासाठी वर्तमानपत्रात जाहिरात देण्यात आली होती. एकूण चार निविदा या विभागात प्राप्त झाल्या. प्राप्त निविदा व नमुने पसंतीसाठी विविध संघटनेच्या पदाधिकारी व उपस्थित कर्मचारी कामगार प्रतिनिधींना दाखविण्यात आले पसंत केलेल्या नमुन्यावर संबंधितांच्या स्वाक्षऱ्या घेण्यात आल्या.

पसंत केलेले गरम कपडे इ. चे विवरण खालील प्रमाणे

| | | |
|---|---|---|
| १. | वुलनकोट कापड | एजन्सी मे. महाराष्ट्र स्टेट को-ऑपरेटीव्ह कन्झ्युमर फेडरेशन मिल - मिलच्या नावाचा उल्लेख नाही.<br>रग - लाल पंसत केले परंतु मागणीनुसार निळा रंगाचा देण्यात येईल.<br>अंदाजे कापड - २१५० मिटर<br>दर रु. ९८.९० प्रति मिटर<br>अंदाजे खर्च २,१२,६३५/- |
| २. | वुलन स्वेटर | एजन्सी मे. विजय जनरल स्टोअर्स औरंगाबाद<br>मिल - जेमीनी कंपनी<br>अंदाजे नग १५० नग दर रु. ३५० प्रति नग<br>अंदाजे खर्च ५२,५००/- |
| ३. | ब्लॅकेटस | मे. विजय जनरल स्टोअर्स औरंगाबाद मिल जेमिनी कंपनी दर रु. ५२५/- प्रति नग<br>अंदाजे खर्च - १,०६,३१६/- |

एकूण येणारा खर्च रु. ३,७१,४४८/- येईल. वाढीव अंदाजपत्रकीय तरतुदीस यापुर्वी मा. स्थायी समिती तसेच मा. सर्वसाधारण सभेने मान्यता दिलेली आहे.

प्रस्ताव विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे मनपातील कर्मचारी / कामगार यांना देण्याकरीता एजन्सीच्या नावासमोर दर्शविलेल्या दरास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

| | | |
|---|---|---|
| १. | वुलनकोट कापड | मे. महाराष्ट्र स्टेट को-ऑपरेटीव्ह<br>कन्झ्युमर फेडरेशन लि.<br>दर रु. ९८.९० प्रति मिटर |
| २. | वुलन स्वेटर | मे. विजय जनरल स्टोअर्स औरंगाबाद<br>मिल - जेमीनी कंपनी<br>दर रु. ३५० प्रति नग |
| ३. | ब्लॅकेटस | मे. विजय जनरल स्टोअर्स औरंगाबाद मिल जेमिनी कंपनी दर रु. ५२५/- प्रति नग |

उपरोक्त खरेदीकरीता येणाऱ्या रु. ३,७१,४४८/- च्या खर्चास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. व ठरावास याच सभेत स्विकृती देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ४५७/३२ :**

लेखाधिकारी यांनी प्रस्ताव सादर केला की, मनपा गणवेश विनिमय क्र. २५ दि. १८-०६-९३ अनुसार खालील कर्मचारी / कामगार यांना गणवेश कापड दरवर्षी (प्रत्येकी दोन गणवेश प्रमाणे) देणे आहे.

देय भासणारे कर्मचारी-सर्व निरिक्षक, वाहन चालक
एमपीडब्ल्यु, मिश्रक फोरमन, हेडमेकॅनिक, मेकॅनिक,
पंप ऑपरेटर इलेक्ट्रीशियन, लाईनमन, फिटर, क्लीनर

माळी, सर्व शिपाई, जवान, हमाल, वॉचमन व सेवक इ.

गणवेश कापड मागविणेस्तव वर्तमानपत्रात जाहिरात देण्यात आली होती. एकूण ६ निविदा या विभागास प्राप्त झाल्या. प्राप्त निविदा नमुने पसंतीनुसार विविध, संघटनेच्या पदाधिकाऱ्यांना व कर्मचारी / कामगार प्रतिनिधींना बोलाविण्यात आले होते. प्राप्त नमुने संबंधितास दाखविण्यात येवून पसंत असलेल्या नमुनेवर संबंधितांच्या स्वाक्षऱ्या घेण्यात आल्या. यावेळी निरिक्षक व वाहन चालक यांना देण्यात येणार कापड पसंत करणे शेष आहे.

पसंत केलेल्या कापडाचे विवरण

रंग - पांढरा, खाकी व निळा (पसंत खाकी कापडाचे करण्यात आले याच कापडाच्या प्रकारात निळा व पांढरा मागविण्यात मान्य करण्यात आले. मिल- कमल सिल्क मिल (डीप्लोमॅट)

दर - रु. ९१.८० प्रति मिटर

अंदाजे खरेदी - ५५०० मिटर

येणार खर्च रु. ५,०४,९००/-

एजन्सीचे नांव - मे अरमान, औरंगाबाद

करीता अंदाजपत्रकीय वाढीव तरतुदीस यापुर्वी मा. स्थायी समिती व मा. सर्वसाधारण सभेने मान्यता दिले अनुदसार अंदाजे येणारा खर्च रु. ५,०४,९००/- चे खर्चास मान्यतेस्तव प्रस्ताव विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्यानुसार, मनपातील कर्मचारी / कामगार यांनी गणवेश देण्याकरीता पांढारा खाकी व निळया रंगाचे कापड खरेदी करण्याकरीता प्राप्त झालेल्या मे. अरमान, औबाद यांच्या प्रतिमीटर रु. ९१.८० प्रति मीटर या दरास तसेच र. रु. ५,०४,९००/- च्या खर्चास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. सदरील कापड त्वरीत द्यावयाचे असल्यामुळे या ठरावास याच सभेत स्विकृती देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ४५८/३३ :**

शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, मो. खारा कुआँ येथे मनपाच्या खुल्या जागेवर व्यायामशाळा इमारतीचे बांधकाम करण्या करीता सा. बा. खात्याच्या सन ९५-९६ च्या दरसुची अन्वये अंदाजपत्रक र. रु. ५,००,०००/- तयार करण्यात आले. त्यास मा. आयुक्त यांची मंजुरी झालेली आहे. त्याअनुषंगाने " बी-१ " नमुन्यात अल्प मुदतीचे निविदा मागविण्याकरीता शहरातील दै. लोकमत व दै. औरंगाबाद टाईम्स इ. वर्तमानपत्रातील प्रसिध्द करण्यात आले.

त्याअनुषंगाने विक्रीच्या तारखपर्यंत कोरी निविदा एकूण (९) विकले गेले व स्विकारण्याच्या तारखेपर्यंत दर भरुन सील बंद पाकीटात दोन (२) निविदा प्राप्त झाली. सदरील निविदा लेखाधिकारी यांच्या दालनात उपस्थित गुत्तेदारासमक्ष उघडण्यात आले. त्याने दिलेले दराचे तपशील खालील प्रमाणे.

| | | |
|---|---|---|
| १. | मनोज घोडके | ६.१% अंदाजपत्रकीय दरापेक्षा जास्त दराचे दर |
| २. | प्रशांत एम राईकर | १२.०१%अंदाजपत्रकीय दरापेक्षा जास्त दराचे दर |

सदरील निविदापत्रकास सर्वात कमी झालेले दर मंजुरीस्तव शहर अभियंताकडे सादर करण्यात आले दराच्या वाटाघाटी मा. आयुक्त समक्ष झाली. त्यास गुत्तेदार श्री.

मनोज घोडके यांना २% जास्त दराने करण्याचे मान्य केले गेले. त्यास मा. आयुक्त यांनी मंजुरी दिलेली आहे.

सदर कामाचे खर्च ९६-९७ सालाच्या आमदार निधीतुन करण्यात येणार आहे. करीत प्रस्ताव विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, खारा कुआँ येथे मनपाच्या खुल्या जागेवर व्यायामशाळा इमारतीचे बांधकाम करण्या करीता प्राप्त निविदापैकी वाटाघाटी अंत ठरल्यानुसार श्री. मनोज घोडके यांनी अंदाजपत्रकीय दरापेक्षा २% जास्त दराची निविदा स्विकरण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ४५९/३४ :**

अतिरिक्त शहर अभियंता यांनी प्रस्ताव दिला की, महानगरपालिका प्रशासकीय इमारतीमधील कार्यालयाकरीता पिण्याचे पाणी पुरवठा या कामासाठी सार्वजनिक बांधकाम खात्याच्या सन १९९५-९६ च्या दरसुची नुसार अंदाजपत्रकीय र. रु. २,३४,९००/- चे तयार करण्यात आले आहे. सदरील कामाचा खर्च प्रशासकीय इमारती सन ९६-९७ (६०.०० लाख) या लेखा शिर्षका अंतर्गत उपलब्ध तरतुदीमधून करण्यात येईल.

तरी सदरील कामसाठी तयार करण्यात आलेले अंदाजपत्रक रक्कम रु. २,३४,९००/- चे मंजुरी बाबतचा प्रस्ताव मा. स्थायी समितीचे विचारार्थ तथा मंजुरीस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, महानगरपालिका प्रशासकीय इमारतीमधील कार्यालयाकरीता पिण्याचे पाणी पुरवठा या कामासाठी तयार करण्यात आलेल्या र.रु. २,३४,९००/- च्या अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ४६०/३५ :**

शिक्षणाधिकारी यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, शहाबाजार चाऊस कॉलनी भोईवाडा काचीवाडा चेलीपुरा या भागात बालवाडी नाही या ठिकाणी बालवाडीची आवश्यकता आहे. विद्यार्थी संख्या मिळण्याची शक्यता आहे. तेव्हा शहाबाजार भागात एक उर्दू माध्यम बालवाडी सुरु करण्याबाबत प्रस्ताव मान्यतेसाठी सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, शहाबाजार, भागात एक ऊर्दू माध्यमाची बालवाडी सुरु करण्याकरीता सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ४६१/१ :**

औरंगाबाद शहरातील महापालिकेच्या मालकी हक्कात असलेल्या विविध नाला जमिनीपैकी मो. उस्मानपुरा येथील स. न. ४८ मधील न. भु. क्र. १४४९०/२/१४४९०३ व १४४१३/१०२ या मिळकतीलगतच्या नाला जमिनीपैकी ११४.१० चौ. मी. एवढया क्षेत्रची

जमिन प्रतिवर्ष रु. ८,२१५/- एवढया भाडे दराने भाडेपट्टयावर देण्याबाबत यापुर्वी स्थायी समितीचे ठराव क्र. ४४३/१९ दि. १३-०२-९६ ने मान्यता दिलेली आहे.

संदर्भाधीन नाल्याजमिनीचे देण्यात येणारे क्षेत्रहे देय जमिनीच्या लांब पट्टी सारख्या अनियमी आकाराने ( ) पूर्ण वापरात येऊ शकणार नाही व संबंधित तेथे फक्त तळमजल्याचे बांधकाम करणार असल्याने आवश्यक सामाजिक अंतरे सोडता करण्यात येणार बांधकाम क्षेत्र हे देय चटई क्षेत्राच्या निम्म्यापेक्षाही कमी राहणार असल्यामुळे म्हणजेच देय चटई क्षेत्र निर्देशांकाच्या ५०% पेक्षा कमी चटईने निर्देशांक वापरात येणार असल्याने या प्रकरणी यापुर्वी कायम केलेल्या भाडेदरात सुधारणा केली असून, आता ह्या जमिनीकरता (देय क्षेत्र ११४.१० चौ. मी.) रुपये ४०००/- प्रति वर्ष ह्या भाडेदरास निश्चित करण्यात येत आहे.

करीता प्रस्ताव मान्यतेस्तव सादर.

प्रस्ताव मान्यतेनंतर रु. ४,०००/- प्रतिवर्ष एवढे भाडे आकारुन नेहमीच्या इतर अटी व शर्तीस पात्र राहून संबंधितास जागा देण्या बाबतची कार्यवाही करण्यात येईल.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, उस्मानपुरा येथील स. न. ४८ मधील न. भु. क्र. १४४९०/२, १४४९०/३ व १४४१३/१०२ या मिळकतीलगतच्या नाला जमिनीपैकी ११४.१० चौ. मी. एवढया क्षेत्राची जमिन प्रतिवर्ष रु. ८,२१५/- एवढया भाडे दराने देण्यात आलेली आहे. परंतु जमिनीच्या लांब पट्टीसारख्या अनियमीत आकारण्यांस सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. नेहमीच्या इतर अटी व शर्तीस पात्र राहून संबंधितास जागा देण्याची कार्यवाही करावी.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ४६२/२ :**

शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला की, मो. नागसेननगर व मिलींदनगर स्लम भागात अर्धगोलाकार गटार बांधकाम करणे करीता २६,७७,५००/- चे अंदाजपत्रक सा. बा. विभाग, औरंगाबाद यांची दरसुची ९५-९६ अनुसार तयार करण्यात आले असून, मा.आयुक्त यांनी दिनांक २९-०६-९६ रोजी प्रशासकीय मान्यता दिली आहे. तसेच सर्वसाधारण सभा प्रस्ताव क्र. ७०/९ दि. १७-०८-९६ अन्वये मान्यता मिळाल्यानंतर कार्यालयीन निविदा क्र. मनपा/लेखा/नि./९७/९६ दि. २७-०८-९६ अन्वये मागविण्यात आली असता निविदा विक्रीच्या अंतीम तारीख ०५-०९-९६ पर्यंत एकूण (१७) सतरा कोऱ्या निविदा विकल्या गेल्या व स्विकारण्याचे तारखेस १३-०९-९६ रोजी फक्त ३ (तीन) मोहर बंद निविदा प्राप्त झाल्या व त्या निविदा दि. १३-०९-९६ रोजी उपस्थित ठेकेदारासमक्ष उघडण्यात आल्या असता ठेकेदारांनी दिलेले दर खालील प्रमाणे आहे.

| | | |
|---|---|---|
| १. | मे. एलोरा कन्स्ट्रक्शन | अंदाजपत्रकीय दरापेक्षा १०% जास्त |
| २. | श्री. खरडीकर कन्स्ट्रक्शन | अंदाजपत्रकीय दरापेक्षा १२% जास्त |
| ३. | श्री. कुलवंतसिंग | अंदाजपत्रकीय दरापेक्षा १५% जास्त |

तुलनात्मकदृष्ट्या कमी व अंदाजपत्रकीय दरापेक्षा १०% जास्त दराची निविदा मो. एलोरा, कन्स्ट्रक्शन यांची निविदा आहे. परंतु मा. आयुक्त साहेबांनी सदरील दर मान्य नसल्या कारणाने संबंधित गुत्तेदारास वाटाघाटीस बोलावून चर्चा केली असता ठेकेदारांना १०% जास्त ऐवजी अंदाजपत्रकीय दरापेक्षा ५% जास्त दराने सदरील काम करण्याची हमी दिली आहे. करीता मान्यतेस्तव विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, नागसेननगर व मिलींदनगर स्लम भागात अर्धगोलाकार सरफेस गटार बांधणेच्या कामाकरीता प्राप्त झालेल्या निविदा पैकी तुलनात्मकदृष्ट्या कमी दराचे दरपत्रकधारक मे. एलोरा कन्स्ट्रक्शन यांचेशी झालेल्या वाटाघाटीनुसार सदरील काम त्यांचेकडून अंदाजपत्रकीय दरापेाा ५% जास्त दराने करुन घेण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र ४६३/३ :**

अतिरिक्त शहर अभियंता प्रस्ताव सादर करीत आहेत की, पन्नालाल नगर ते पीरबाजार रस्ता या ८० फुट विकास रस्त्याचे रुंदीकरण करणे व रस्त्याच्या मधोमध दुभाजक टाकणेच्या कामाचे सन ९५-९६ चे सा. बा. खात्याचे डी. एस. आर. दराने रक्कम रु. ११,५०,०५०/- चे अंदाजपत्रक तयार करण्यास आले असून, मा. आयुक्त यांची मंजुरी मिळालेली आहे. सदरील कामचा खर्च भांडवली रस्ते ९६-९७ साठी असलेल्या तरतुदीमधून प्रस्तावित आहे.

सदरील कामासाठी निविदापत्रके मागविली असता निविदापत्रके विक्रीच्या अंतिम तारखेपर्यंत एकूण २७ कोरी निदिा पत्रके विकल्यागेली व निविदापत्रके स्विकृतीच्या अंतिम तारखेपर्यंत एकूण आठ निविदापत्रके दर भरलेल्या प्राप्त झाल्या असून, त्याचा तुलनात्मक तक्ता खालील प्रमाणे आहे.

| | | |
|---|---|---|
| १. | मे. शिवा कन्स्ट्रक्शन | ३०.११% कमी दराने |
| २. | श्री. कुलवंतसिंग | २९.१०% कमी दराने |
| ३. | श्री. डी. सी. पंजाबी | २६.३% कमी दराने |
| ४. | श्री. राजासिंग | २२.८३% कमी दराने |
| ५. | मे. जयश्री कन्स्ट्रक्शन | २१.६५% कमी दराने |
| ६. | श्री. शेख मसुद | १८.५५% कमी दराने |
| ७. | श्री. आर. बी. चव्हाण | १५.००% कमी दराने |
| ८. | मे. न्यु सुपर कन्स्ट्रक्शन | ११.००% कमी दराने |

तुलनात्मकदृष्ट्या कमी व अंदाजपत्रकीय दरापेक्षा ३०.११% कमी दराने मे. शिवा कन्स्ट्रक्शन यांची निविदा आहे. तरी सदर कामाकरीता तयार करण्यात आलेल्या रक्कम रु. ११,५०,०५०/- अंदाजपत्रकास तसेच सदरील काम मे. शिवा कन्स्ट्रक्शन यांचेकडून ३०.११% कमी दराने करुन घेण्याबाबतचा प्रस्ताव विचारार्थ तथा मंजुरीस्तव सादर.

**संवाद :**

**मा. सभापती** : पुढील बैठकीस रेट ॲनालिसीस करुन ठेवावे याबाबत लेखाधिकारी - १ व मुख्य लेखा परीक्षक यांनी तपासणी करुनच ठेवावे.

**श्री. रशिद (मामू)** : गुत्तेदाराकडून करारनामा करुन घ्यावा की, स्पेशिफिकेशन प्रमाणे मी जर काम केले नाही तर मनपाने माझ्यावर कायदेशीर कार्यवाही कावी. शिवाय एखादया उद्घाटनाच्या कामाच्या वेळी स्वागताध्यक्ष म्हणून त्याच वार्डातील सन्माननीय सदस्याचे नाव अगोदर घ्यावे.

**ठराव :**

सदर प्रस्ताव रेट ॲनालिसीस करुन पुढील बैठकीत ठेवावी असे सर्वानुमते ठरले.

**विषय क्र. ४६४/४ :**

अतिरिक्त शहर अभियंता प्रस्ताव सादर करीत आहेत की, गारखेडा स. न. १९, ५१ प १५२ मधील अंतर्गत रस्त्याचे डांबरीकरण करणेच्या कामाचे सन ९५-९६ चे सा. बा.

खात्याचे डी. एस. आर. दराने र. रु. ५,१६,४४५/- चे अंदाजपत्रक तयार करण्यात आले असून, त्यास मा. आयुक्तांनी मंजुरी मिळालेली आहे. सदरील कामाचा खर्च भांडवली रस्ते ९६-९७ या लेखा शिर्षा मधून प्रस्तावित आहे.

सदरील कामासाठी निविदापत्रके मागविली असता निविदापत्रके विक्रीच्या अंतिम तारखे पर्यंत एकूण पाच निविदापत्रके विकल्या गेली व स्विकृतीच्या अंतिम तारखेपर्यंत एकूण पाच निविदापत्रके प्राप्त झाली असून, त्याचा तुलनात्मक तक्ता खालील प्रमाणे आहे.

| | | |
|---|---|---|
| १. | के. बी. पाथ्रीकर | १९.२१% कमी दराने |
| २. | मे. मास्कोट कन्स्ट्रक्शन | १७.८६% कमी दराने |
| ३. | श्री. एम. एस. जग्गी | १७.५१% कमी दराने |
| ४. | श्री. डी. अजित सिंग | ७.७७% कमी दराने |

तुलनात्मकदृष्ट्या कमी व अंदाजपत्रकीय दरापेक्षा १९.२१% कमी दराची श्री. के. बी. पाथ्रीकर यांच्याकडून अंदाजपत्रकीय दरापेक्षा १९.२१% कमी दराने करुन घेण्या बाबत प्रस्ताव विचारार्थ मंजुरीस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, गारखेडा स. न. ११, ५१ व ५२ मधील अंतर्गत रस्त्याचे डांबरी करण करण्याच्या कामाकरीता तयार करण्यात आलेल्या र. रु. ५,१६,४४५/- च्या अंदाजपत्रकास तसेच सदरील कामाकरीता प्राप्त झालेल्या निविदापैकी तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी व अंदाजपत्रकीय दरापेक्षा १९.२१% कमी दराच्या श्री. के. बी. पाथ्रीकर यांची निविदा स्विकारण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ४६५/५ :**

अतिरिक्त शहर अभियंता प्रस्ताव सादर करीत आहेत की, गजानन कॉलनी व श्री. हरीनगर येथील अंतर्गत रस्त्याचे डांबरीकरण करणेच्या कामाचे सन ९५-९६ चे सा. बा. खात्याचे डी. एस. आर. दराने र. रु. ९,२९,७५९/- चे अंदाजपत्रक तयार करण्यात आले असून, त्यास मा. आयुक्त यांची मंजुरी मिळालेली आहे. वरील कामाचा खर्च भांडवली रस्ते ९६-९७ साठी असलेल्या तरतुदीमधून प्रस्तावित आहे.

सदरील कामासाठी निविदापत्रके मागविली असता निविदापत्रके विक्रीच्या अंतिम तारखेपर्यंत एकूण आठ कोरी निविदापत्रके विकल्या गेली व निविदापत्रके स्विकृतीच्या अंतिम तारखे पर्यंत एकूण सहा निविदापत्रके दर भरलेली प्राप्त झाली असून, त्याचा तुलनात्मक तक्ता खालील प्रमाणे आहे.

| | | |
|---|---|---|
| १. | के. बी. पाथ्रीकर | १९.९१% कमी दराने |
| २. | श्री. एम. एस. जग्गी | १८.००% कमी दराने |
| ३. | मे. मास्कोट कन्स्ट्रक्शन | १७.८६% कमी दराने |
| ४. | मे. व्यंकटेश कन्स्ट्रक्शन | १५.३१% कमी दराने |
| ५. | श्री. डी. अजित सिंग | ९.२ % कमी दराने |
| ६. | मे. आदीनाथ कन्स्ट्रक्शन | ८.५६% कमी दराने |

तुलनात्मकदृष्ट्या कमी अंदाजपत्रकाचे दरापेक्षा १९.९१% कमी दराने श्री. के. बी. पाथ्रीकर यांची निविदा आहे. तरी सदर कामाकरीता तयार करण्यात आलेल्या र.रु.

९,१९,७५९/- चे अंदाजपत्रकास तसेच सदरील काम श्री. के. बी. पाथ्रीकर यांचे कडून १९.९१% कमी दराने करुन घेण्या बाबतचा प्रस्ताव विचारार्थ तथा मंजुरीस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे गजानन कॉलनी व श्रीहरी नगर येथील अंतर्गत रस्त्यांचे डांबरीकरण करणेच्या कामाकरीता तयार करण्यात आलेल्या र.रु.९,२९,७५९/- च्या अंदाजपत्रकास तसेच सदरील कामाकरीता प्राप्त झालेल्या निविदापैकी तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी व अंदाजपत्रकीय दरापेक्षा १९.९१% कमी दराची निविदा स्विकारण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ४६६/६ :**

अति. शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर करीत आहेत की, एम. आय. डी. सी. रेल्वेस्टेशन येथील बालभारती ऑफीस ते वाघ यांचे घर एम. आय. डी. सी. कॉलनी अंतर्गत आणि हॉलीडे कॅम्प ते मिलिंदनगर या रस्त्याचे डांबरीकरण करणेच्या कामाचे सन ९४-९५ चे सा. बा. खात्याचे डी. एस. आर. दराने र. रु. ३,५०,६७५/- चे अंदाजपत्रक तयार करण्यात आले असून, त्या मा. आयुक्तांची मंजुरी मिळालेली आहे. सदरील कामाचा खर्च " रस्ते दुरुस्ती "पुर्नडांबरीकरण ९६-९७ मधून प्रस्तावित आहे.

सदरील कामासाठी निविदापत्रके मागविली असता निविदापत्रके विक्रीच्या अंतिम तारखे पर्यंत एकूण तीनच निविदापत्रके दर भरुन प्राप्त झाल्या असून, त्याचा तुलनात्मक तक्ता खालील प्रमाणे आहे.

| | | |
|---|---|---|
| १. | मे. मास्कोट कन्स्ट्रक्शन | १७.८६% कमी दराने |
| २. | मे. व्यकंटेश कन्स्ट्रक्शन | ११.११% कमी दराने |
| ३. | श्री. एम. एस. जग्गी | ५.००% जास्त दराने |

तुलनात्मकदृष्ट्या कमी व अंदाजपत्रकीय दरापेक्षा १७.८६% कमी दराने मे. मास्कोट कन्स्ट्रक्शन यांची निविदा आहे.

तरी सदर कामाकरीता तयार करण्यात आलेल्या र. रु. ३,५०,६७५/- चे अंदाजपत्रकास तसेच सदरील काम मे. मास्कोट कन्स्ट्रक्शन यांचे कडून १७.८६% कमी दराने करुन घेण्याबाबतचा प्रस्ताव विचारार्थ मंजुरीस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, एम. आय. डी. सी रेल्वेस्टेशन येथील बाल भारती ऑफिस ते वाघ यांचे घर एम. आय. डी. सी. कॉलनी अंतर्गत आणि हॉलीकॅम्प ते मिलिंदनगर या रस्त्याचे डांबरीकरण करणेच्या कामाकरीता प्राप्त झालेल्या निविदापैकी तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी व अंदाजपत्रकीय दरापेक्षा १७.८६% कमी दराची मे. मास्कोट कन्स्ट्रक्शन यांची निविदा स्विकारण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ४६७/७ :**

अतिरिक्त शहर अभियंता यांनी प्रस्तव सादर करीत आहेत की, गारखेडा ते टिळकनगर या ८० फुट विकास रस्त्याचे डांबरीकरण करणेच्या कामासाठी सन ९४-९७ चे सा. बा. खात्याचे डी. एस. आर. दराने र. रु. २५,९३,२६४/- चे अंदाजपत्रक तयार करण्यात आले असून, त्यास मा. आयुक्त यांची मंजुरी मिळालेली आहे. सदरील कामाचा खर्च " रस्ते दुरुस्ती " पुर्नडांबरीकरण ९६-९७ मधून प्रस्तावित आहे.

सदरील कामासाठी निविदापत्रके मागविली असता निविदापत्रके विक्रीच्या अंतिम तारखेपर्यंत एकूण आठ निविदापत्रके दर भरलेल्या प्राप्त झाल्या असून, त्याचा तुलनात्मक तक्ता खालील प्रमाणे आहे.

| | | |
|---|---|---|
| १. | मे. मास्कोट कन्स्ट्रक्शन | १९.८६% कमी दराने |
| २. | श्री. एम. एस. जग्गी | १९% कमी दराने |
| ३. | मे. आदिनाथ कन्स्ट्रक्शन | ८.५६% कमी दराने |
| ४. | श्री. डी. अजितसिंग | ४.७% कमी दराने |

तुलनात्मकदृष्ट्या कमी व अंदाजपत्रकीय दरापेक्षा १९.८६% कमी दराची मे. मोस्काट कन्स्ट्रक्शन यांची निविदा आहे.

तरी सदर कामाकरीता तयार करण्यात आलेल्या र. रु. २५,९३,९६४/- चे अंदाजपत्रकास तसेच सदरील काम मे मोस्काट कन्स्ट्रक्शन यांचे कडून अंदाजपत्रकीय दरापेक्षा १९.८६% कमी दराने करुन देण्याबाबतचा प्रस्ताव विचारार्थ मंजुरीस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, गारखेडा ते टिळकनगर या ८० फुट विकास रस्त्याचे डांबरीकरण करणेच्या कामाकरीता तयार करण्यात आलेल्या र. रु. २५,९३,२६४/- च्या अंदाजपत्रकास तसेच या कामाकरीता प्राप्त झालेल्या निविदापैकी तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी व अंदाजपत्रकीय दरापेक्षा १९.८६% कमी दराच्या मे. मोस्काट कन्स्ट्रक्शन यांच्या निविदेस सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ४६८/८ :**

अति. शहर अभियंता यांनी प्रस्ताव दिला की, जिव्हेश्वर कॉलनी भागातील कटकट गेट पर्यंत असलेल्या वस्तीत (नेहरुनगर, बाबर कॉ.) खडी रस्ते तयार करणेच्या कामासाठी तयार करण्यात आलेल्या रक्कम रु. ७,२९,५८०/- च्या अंदाजपत्रकास सर्वसाधारण सभा ठराव क्र. ५/७ दि. १९-०८-९६ अन्वये मंजुरी प्राप्त झाल्या नुसार सदर कामाकरीता निविदापत्रके मागविली असता निविदा विक्रीच्या अंतिम तारखेपर्यंत एकूण १४ कोरी निविदापत्रके विकली गेली व स्विकृतीच्या अंतिम तारखेपर्यंत दोन निविदापत्रके दर भरुन प्राप्त झाली ती दि. २७-०८-९६ रोजी उघडण्यात आली असता त्याचा तपशील खालील प्रमाणे आहे.

| | | |
|---|---|---|
| १. | श्री. शेख शरीफ | ०.५०% कमी दराने |
| २. | मे. पारस कन्स्ट्रक्शन | ३% जास्त दराने |

तुलनात्मकदृष्ट्या कमी व अ. प. दरापेक्षा ०.५०% कमी दराची श्री. शेख शरीफ यांची निविदा आहे. प्रस्ताव मंजुरीस्तव व विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, जिव्हेश्वर कॉलनी भागातील कटकट गेट पर्यंत असलेल्या वस्तीत (नेहरुनगर, बाबर कॉलनी) खडी रस्ते तयार करणेच्या कामाकरीता प्राप्त झालेल्या निविदापैकी तुलनात्मकदृष्ट्या कमी व अ. प. दरापेक्षा ०.५०% कमी दराच्या श्री. शेख शरीफ यांची निविदा स्विकारण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ४६९/९ :**

अतिरिक्त शहर अभियंता यांनी प्रस्ताव दिला की, रोशनगेट ते चंपा मस्जिद पर्यंतच्या रोडवर मध्य दुभाजक टाकणे हे काम मा. आयुक्त यांचे आदेशानुसार बी. पी. एम. सी. ॲक्ट सन १९४९ चे कलम ६७ (३) सी नुसार कार्यालयीन आदेश क्र. मनपा/बां.-१/३२०/९६ दि. १६/८/९६ अन्वये श्री. असद पटेल मंजूर अंदाजपत्रक र. रु. ५९,१५०/- मध्ये अंदाजपत्रकीय दराने करुन घेण्यात येत होते. परंतु मा. विरोधी पक्षनेता यांनी केलेल्या मागणी नुसार सदरील कामासाठी सा. बा. खात्याच्या सन १९९५-९६ च्या दरसुचीनुसार नव्याने सुधारीत अंदाजपत्रक र. रु. ४,१३,२९९/- चे तयार करण्यात आले आहे. सदरील कामाचा खर्च भांडवली रस्ते सन ९६-९७ या लेखा शिर्षाखाली उपलब्ध तरतुदीमधून करण्यात येईल.

तरी सदरील कामासाठी तयार करण्यात आलेले अंदाजपत्रक रक्कम रु. ४,१३,२९९/- चे मंजुरीबाबत तसेच सदरील काम पुर्वीचेच कंत्राटदार श्री. असद पटेल यांचे कडुन अंदाजपत्रकीय दराने करुन घेणे बाबतचा प्रस्ताव स्थायी समितीचे विचारार्थ तथा मंजुरीस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, रोशनगेट ते चंपा मस्जिद पर्यंतच्या रोडवर मध्य दुभाजक टाकणेच्या कामाकरीता तयार केलेल्या सुधारीत अंदाजपत्रक र. रु. ४,१३,२९९/- ला तसेच सदरील काम पुर्वीचेच कंत्राटदार श्री. असद पटेल यांचेकडून अं. प. दराने करुन घेण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ४७०/१० :**

अतिरिक्त शहर अभियंता यांनी प्रस्ताव दिला की, नविन व जुन्या मनपा प्रशासकीय इमारती मधील मुख्य सभागृह शेजारी पैन्टी रुम बांधणे, पी बी एक्स रुममध्ये जिप्सम सिलींग प्लैटफॉर्म आणि डोअर क्लोजर बसविणे शिक्षण विभागात पार्टीशन बसविणे, जुन्या इमारतीत रेकॉर्ड विभागाच्या वर वॉटर प्रुफींग करणे, आकौंट विभागात पार्टीशन तयार करुन कपबडर्स तयार करणे इ. विविध स्वरुपाच्या कामासाठी साबा. खात्याच्या सन १९९५-९६ च्या दरसुचीनुसार अंदाजपत्रक र. रु. १,३०,९२८/- चे तयार करण्यात आलेले आहे. सदरील काम तातडीने करावयाचे असल्याने उपलब्ध कंत्राटदार मे. एलोरा कन्स्ट्रक्शन यांचे कडून अं. प. दराने करुन घेण्यात आलेले आहे. सदरील कामाचा खर्च भांडवली इमारती सन ९६-९७ या लेखा शिर्षका अंतर्गत उपलब्ध असणाऱ्या तरतुदीमधून करण्यात येईल.

तरी सदरील कामासाठी तयार करण्यात आलेले अंदाजपत्रक र. रु. १,३०,९२८/- चे मंजुरीस्तव तसेच सदरील काम मे. एलोरा कन्स्ट्रक्शन क. यांचेकडून अ.प. दराने करुन घेणे करीता कामास मंजुरी मिळणे बाबतचा प्रस्ताव मा. स्थायी समितीचे विचारार्थ तथा मंजुरीस्तव सादर तरी कार्योत्तर मंजुरीस्तव प्रस्ताव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे नविन व जुन्या मनपा प्रशासकीय इमारती मधील मुख्य सभागृहा शेजारी पॅन्ट्री रुम बांधणे, पी बी एक्स रुम मध्ये जिप्सम सिलींग प्लॅट फॉर्म आणि डोअर क्लोजर बसविणे, शिक्षण विभागात पार्टीशन बसविणे, जुन्या इमारतीत रेकॉर्ड विभागाच्या वर वॉटर प्रफुींग, लेखा विभागात पार्टीशन तयार करुन कपबर्डस तयार करणे इ. विविध स्वरुपाचे कामाकरीता र. रु. १,३०,९२९/- च्या अंदाजपत्रकास तसेच सदर काम

मे. एलोरा कन्स्ट्रक्शन क. यांचे कडून अं. प. दराने करुन घेण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ४७१/११ :**

पशुधन विकास अधिकारी यांनी प्रस्ताव सादर केला की, सिध्दार्थ उद्यान येथे नविन मत्सलय सुरु करण्याकरीता वेगवेगळया प्रकारचे आकाराचे मासे तयार करण्यात आलेल्या बॉक्स मध्ये प्रदर्शनासाठी ठेवण्याचे योजविले आहे त्या करीता अंदाजे दोन लाखा पर्यंत खर्च अपेक्षीत आहे. त्याकरीता वर्तमानपत्रातुन निविदा मागविल्या असता दोन निविदा प्राप्त झाल्या.

१. फिश होम औरंगाबाद २) सौ.सुनिता बी मांडे औरंगाबाद वरील दोन निविदा पैकी सौ. सुनिता मांडे यांनी निविदा सोबत अनामत रक्कम भरती नाही. परंतु त्यांचे दर तुलनात्मकसाठी विचारात घेण्यात आले होते. फिश होम यांनी अनामत रक्कमेसह निविदा भरती त्याचे तुलनात्मक दर कमी असल्याने मा. आयुक्त यांनी " फिश होम " यांनी दिलेल्या दरात ५% दर कमी करुन स्थायी समितीकडे पुढील मान्यतेसाठी शिफारस केली आहे.

२. तरी यादीत दर्शविल्याप्रमाणे वेगवेगळया प्रकारचे आकाराचे रंगीत मासे फिश होम यांनी दिलेले दर मंजुरी साठी प्रस्ताव विचारार्थ सादर.

**मा. सभापती** : मंजुर सोबत इतिवृत्त कायम करण्यात येते.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे सिध्दार्थ उद्यान येथे नविन मत्सालय सुरु करण्यास करीता वेगवेगळया प्रकारचे, आकाराचे मासे तयार करण्यात आलेल्या बॉक्स मध्ये प्रदर्शनासाठी ठेवण्याचे योजील्या नुसार त्या करीता येणाऱ्या अंदाजे दोन लाख पर्यंतचे अपेक्षित खर्चास तसेच फिश होम, औरंगाबाद यांनी प्रस्तावित दर्शविलेले अ. क्र. १ ते ४७ मधील प्रती जोडीचे दरास ५% दर कमी करु शिफारस केल्या नुसार यादीत दर्शविल्याप्रमाणे वेगवेगळया प्रकारचे, आकाराचे रंगित मासे फिश होम यांनी दिलेल्या दराचे निविदा पत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

| **अ.क्र.** | **माशाचा प्रकार** | **आकार** | **दिलेले दर (प्रती जोड)** | | |
|---|---|---|---|---|---|
| | | | **फिश होम प्राप्त दर रु.** | | **सौ. सुनिता मांडे ५% कमी दर रु** |
| **१.** | **२.** | **३.** | **४.** | **५.** | **६.** |
| १. | ऑस्कर | २२ सेमी | १६००/- | १५२०/- | -- |
| | | १५ सेमी | ६००/- | ५७०/- | -- |
| | | ४ सेमी | ८०/- | ७६/- | -- |
| २. | गोल्ड मासा | १० सेमी | २५०/- | २३७.५० | ८००/- |
| | | ०६ सेमी | १५०/- | १४२.५० | २४०/- |
| | | ०४ सेमी | ८०/- | ७६/- | ८०/- |
| ३. | बबल आय गोल्ड | ८ सेमी | ३५०/- | ३३२.५० | १२००/- |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| | मासा | | | | |
| | | ६ सेमी | २००/- | १९०/- | ३६०/- |
| | | ४ सेमी | ८०/- | ७६/- | १२०/- |
| ४. | रेडकॅन गोल्ड मासा | १० सेमी | ३५०/- | ३३२.५०/- | -- |
| | | ६ सेमी | १५०/- | १४२.५० | -- |
| | | ४ सेमी | ८०/- | ७६/- | -- |
| ५. | गोल्ड मासा साधा | ८ सेमी | १५०/- | १४२.५० | -- |
| | | ६ सेमी | १००/- | ९५.०० | -- |
| | | ४ सेमी | ६०/- | ५७.०० | -- |
| ६. | ब्लॅक मोर मासा | १० सेमी | २५०/- | २३७.५० | १००.०० |
| | | ६ सेमी | १७५/- | १६६.२५ | ४००.०० |
| | | ४ सेमी | ८०/- | ७६.०० | १००.०० |
| ७. | ब्लॅक मुळी मासा | ६ सेमी | १२५.०० | ११८.७५ | १०००.०० |
| | | ४ सेमी | ३०.०० | २८.५० | १००.०० |
| | | ३ सेमी | ६०.०० | ५७.०० | ५०.०० |
| ८. | गप्पी मासा | ६ सेमी | १००.०० | ९५.०० | १५०.०० |
| | | ४ सेमी | ८०.०० | ७६.०० | १००.०० |
| | | ३ सेमी | ६०.०० | ५७.०० | ५०.०० |
| ९. | अंजली सिल्वर मासा | ६ x ५ सेमी | ३५०.०० | ३३२.०० | १०००.०० |
| | | ४ x ३ सेमी | २००.०० | १९०.०० | ४००.०० |
| | | ३ x २ सेमी | १४०.०० | १३३.०० | १५०.०० |
| १०. | ब्लॅक अंजली मासा | ७ x ६ सेमी | १५०.०० | १४२.५० | ८००.०० |
| | | ५ x ४ सेमी | १२५.०० | ११८.७५ | २५०.०० |
| | | ४ x ३ सेमी | ८०.०० | ७६.०० | ८०.०० |
| ११. | मुन अंजली मासा | ५ x ३ सेमी | ३००.०० | १८५.०० | १०००.०० |
| | | ४ x ३ सेमी | २५०.०० | २३७.५० | ४००.०० |
| | | ३ x २ सेमी | १००.०० | ९५.०० | १५०.०० |
| १२. | कोईमासा | १२ सेमी | २५०.०० | २३७.०० | १६००.०० |
| | | ८ सेमी | १५०.०० | १४२.५० | ८००.०० |
| | | ६ सेमी | ८०.०० | ७६.०० | ४००.०० |
| १३. | शुभांगी मासा | ८ सेमी | २५०.०० | २३७.५० | -- |
| | | ६ सेमी | १५०.०० | १४२.५० | -- |
| | | ४ सेमी | ८०.०० | ७६.०० | -- |
| १४. | रेडफाइटर मासा | ४ सेमी | ५०.०० | ४७.५० | ३००.०० |
| १५. | निळा फाईटर | ४ सेमी | ५०.०० | ४७.५० | ३००.०० |
| १६. | निऑन मासा | ३ सेमी | ५०.०० | ४७.५० | ३००.०० |
| १७. | किसींग मासा | १२ सेमी | ३००.०० | २८५.०० | ६००.०० |
| | | ८ सेमी | १७५.०० | १६६.२५ | ३००.०० |
| | | ५ सेमी | १००.०० | ९५.०० | २५०.०० |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| १८. | टाईगर मासा | ३ सेमी | ८०.०० | ७६.०० | -- |
| १९. | ब्लुंग्रोमी मासा | ८ सेमी | २५०.०० | २३७.०० | १०००.०० |
| | | ६ सेमी | १५०.०० | १४२.०० | ५००.०० |
| | | ४ सेमी | १००.०० | ९५.०० | २००.०० |
| २०. | पिअर्लग्रोमी मासा | ८ सेमी | २५०.०० | २३७.५० | १०००.०० |
| | | ६ सेमी | १५०.०० | १४२.५० | ४००.०० |
| | | ४ सेमी | १००.०० | ९५.०० | २००.०० |
| २१. | पॅनापलग्रामी मासा | ८ सेमी | २५०.०० | २३७.५० | -- |
| | | ६ सेमी | १५०.०० | १४२.५० | -- |
| | | ४ सेमी | १००.०० | ९५.०० | -- |
| २२. | रोझी मासा | ४ सेमी | ८०.०० | ७६.०० | -- |
| | | ३ सेमी | ६०.०० | ५७.० | -- |
| २३. | प्लेटी मासा | ४ सेमी | ८०.०० | ७६.०० | -- |
| | | ३ सेमी | ६०.०० | ५७.०० | -- |
| २४. | सीअरडेटल मासा | ४-८ सेमी | -- | -- | २००.०० |
| | | २-४ सेमी | -- | -- | १००.०० |
| २५. | टागर शार्क मासा | १५ सेमी | ६००.०० | ५७०.०० | -- |
| | | ८ सेमी | ४००.०० | ३८०.०० | -- |
| | | ४ सेमी | १२५.०० | ११८.७५ | -- |
| २६. | अलबीशार्क मासा | १० सेमी | ६००.०० | ५७०.०० | १२००.०० |
| | | ८ सेमी | ४००.०० | ३८०.०० | ६००.०० |
| | | ६ सेमी | १२०.०० | ११८.७५ | २७०.०० |
| २७. | सिल्वर शार्क मासा | १० सेमी | ६००.०० | ५७०.०० | -- |
| | | ८ सेमी | ४००.०० | ३८०.०० | -- |
| | | ६ सेमी | १२५.०० | ११८.७५ | -- |
| २८. | रेडटेल शार्क मासा | ८ सेमी | -- | -- | १४००.०० |
| | | ६ सेमी | ३००/- | २८५.०० | ५००.०० |
| | | ४ सेमी | २००/- | १९०.०० | ४००.०० |
| २९. | डिसक्स मासा | ८ X ६ सेमी | २०००.०० | १९००.०० | ४०००.०० |
| | | ६ X ४ सेमी | १०००.०० | ९५०.०० | १५००.०० |
| | | ४ X ३ सेमी | ३००.०० | २८५.०० | ३००.०० |
| ३०. | सक्कर मासा | १२ सेमी | ५००.०० | ४७५.०० | -- |
| | | १० सेमी | ८००.०० | ७६०.०० | -- |
| | | ६ सेमी | ३००.०० | २८५.०० | -- |
| ३१. | स्कॅंट मासा | ३ सेमी | ८०.०० | ७६.०० | -- |
| ३२. | कॅपर गोल्ड | ८ सेमी | १५०.०० | १४२.५० | -- |
| | | ६ सेमी | १००.०० | ९५.०० | -- |
| | | ४ सेमी | ६०.०० | ५७.००० | -- |
| ३३. | वायलोच मासा | ६ सेमी | ८०.०० | ७६.०० | -- |
| | | ४ सेमी | ६०.०० | ५७.०० | -- |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| ३४. | स्नेक मासा | १२ सेमी | १५०.०० | १४२.५० | -- |
| | | ८ सेमी | १००.०० | ९५.०० | -- |
| | | ६ सेमी | ६०.०० | ५७.०० | -- |
| ३५. | शिवराम मासा | ४ सेमी | ८०.०० | ७६.०० | -- |
| | | ३ सेमी | ६०.०० | ५७.०० | -- |
| ३६. | बिनस मासा | ४ सेमी | १२५.०० | ११८.७५ | -- |
| | | ३ सेमी | ८०.०० | ७६.०० | -- |
| ३७. | व्हाईट मुळी मासा | ६ सेमी | १५०.०० | १४२.५० | -- |
| | | ४ सेमी | १२५.०० | ११८.७५ | -- |
| | | ३ सेमी | ८०.०० | ७६.०० | -- |
| ३८. | गोल्डन मुळ मासा | ६ सेमी | १५०.०० | १४२.५० | -- |
| | | ४ सेमी | १२५.०० | ११८.७५ | -- |
| | | ३ सेमी | ८०.०० | ७६.०० | -- |
| ३९. | मॅगो मासा | ६ सेमी | १५०.०० | १४२.५० | -- |
| | | ४ सेमी | १२५.०० | ११८.७५ | -- |
| | | ३ सेमी | ८०.०० | ७६.०० | -- |
| ४०. | ब्ल्यु मासा | ३ सेमी | ८०.०० | ७६.०० | -- |
| ४१. | ओरेएससा मासा | ४ सेमी | ८०.०० | ७६.०० | -- |
| ४२. | ऊनिओ मासा | ५ सेमी | १५०.०० | १४२.०० | -- |
| | | ३ सेमी | ८०.०० | ७६.०० | -- |
| ४३. | एलिफंड | ८ सेमी | २०००.०० | १९००.०० | -- |
| | | ६ सेमी | १०००.०० | ९५०.०० | -- |
| ४४. | लेझर मासा | १५ सेमी | ५००.०० | ४७५.०० | -- |
| | | १० सेमी | २५०.०० | २३७.५० | -- |
| | | ८ सेमी | १७०.०० | ९५.०० | -- |
| ४५. | ऑलकिंग मासा | १२ सेमी | ४००.०० | ३८०.०० | -- |
| | | ८ सेमी | ३००.०० | २८५.०० | -- |
| | | ६ सेमी | १५०.०० | १४२.५० | -- |
| ४६. | कासव सिंगापुरी | ४ X ४ सेमी | ९०.०० | ८५.५० | |
| ४७. | कासव भारतीय | ४ X ४ सेमी | १२५.०० | ११८.७५ | ६००.०० |
| | | मध्यम | -- | -- | १८००.०० |
| | | मोठे | -- | -- | १४००.०० |

**विषय क्र. ४७२/२ :**

अतिरिक्त शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर करीत आहेत की, उस्मानपुऱ्यातील शहा कॉलनी मधील तसेच पोस्ट ऑफीस जवळील भुपसिंग ओबेरॉय यांच्या घरा जवळील रस्त्याचे व म्हाडा कॉलनी मधील रस्त्याचे डांबरीकरण करणेच्या कामाचे सन ९५-९६ चे सार्वजनिक बांधकाम खात्याचे डी. एस. आर. दराने रक्कम रु. ६,९४,१५३/- चे अंदाजपत्रक तयार करण्यात आले असून, त्यास मा. आयुक्त यांची मंजुरी मिळालेली आहे. सदरील कामाचा खर्च " भांडवली रस्ते " ९६-९७ साठी असलेल्या तरतुदीमधून प्रस्तावित आहे.

सदरील कामसाठी निविदापत्रके मागविली असता निविदा पत्रके विक्रीच्या अंतिम तारखे पर्यंत एकूण सात कोरी निविदापत्रके विकल्या गेली व निविदा पत्रके स्विकारण्याच्या अंतिम तारखे पर्यंत एकूण पाच निविदा पत्रके दर भरलेल्या प्राप्त झाल्या असून, त्याचा तुलनात्मक तक्ता खालील प्रमाणे.

| | | |
|---|---|---|
| १. | श्री. के. बी. पाथ्रीकर | १८.२१% कमी दराने |
| २. | श्री. मास्कोट कन्स्ट्रक्शन | १७.८६% कमी दराने |
| ३. | श्री. व्यंकटेश कन्स्ट्रक्शन | १५.३१% कमी दराने |
| ४. | श्री. एम. एस. जग्गी | १५.००% कमी दराने |
| ५ | मे. आदिनाथ कन्स्ट्रक्शन | ३.१५% कमी दराने |

तुलनात्मकदृष्ट्या कमी व अंदाजपत्रकीय दरापेक्षा १८.२१% कमी दराने श्री. के. बी. पाथ्रीकर यांची निविदा आहे.

तरी सदर कामाकरीता तयार करण्यात आलेले र.रु. ६,२४,१५३/- चे अंदाजपत्रकास तसेच सदरील काम श्री. के. बी. पाथ्रीकर यांचे कडून १८.२१% कमी दराने करुन घेण्याबाबतचा प्रस्ताव मंजुरीस्तव तथा विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्यानुसार, उस्मानपुऱ्यातील शहा कॉलनी मधील तसेच पोस्ट ऑफीस जवळील भुपसिंग ओबेरॉय याच्या घरा जवळील रस्त्याचे व म्हाडा कॉलनी मधील रस्त्याचे डांबरीकरण करणेच्या कामासाठी तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी व अंदाजपत्रकीय दरापेक्षा १८.२१% कमी दराचे गुत्तेदार श्री. के. बी. पाथ्रीकर यांचे निविदा पत्रकास तसेच रक्कम रु. ६,२४,१५३/- चे अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ४७३/३ :**

अतिरिक्त शहर अभियंता प्रस्ताव सादर करीत आहेत की, गारखेडा येथील मोरेश्वर सोसायटी दिलीप पाटील ले आऊट आणि श्रीनगर अंतर्गत रस्त्यांचे डांबरीकरण करणेच्या कामाचे सन ९५-९६ चे सार्वजनिक बांधकाम खात्याचे डी. एस. आर. दराने र. रु. ३,५३,४३५/- चे अंदाजपत्रक तयार करण्यात आले असून, त्यास मा. आयुक्त यांची मंजुरी मिळालेली आहे. सदरील कामाचा खर्च " भांडवली रस्ते " १९९६-९७ साठी असलेल्या तरतुदी मधून प्रस्तावित आहे. सदरील कामासाठी निविदा पत्रके विकल्या गेली व निविदा पत्रके स्विकारण्याच्या अंतिम तारखे पर्यंत एकूण सात निविदापत्रके दर भरलेल्या प्राप्त झाल्या असून, त्यांचा तुलनात्मक तक्ता खालील प्रमाणे आहे.

| | | |
|---|---|---|
| १. | श्री. एम. एस. जग्गी | १७.००% कमी दराने |
| २. | श्री. के. बी. पाथ्रीकर | १४.२१% कमी दराने |
| ३. | मे. आदिनाथ कन्स्ट्रक्शन | ५.७७% कमी दराने |
| ४. | श्री. व्यंकटेश कन्स्ट्रक्शन | ०.०१% कमी दराने |
| ५ | श्री. डी. अजितसिंग | अंदाजपत्रकीय दराने |
| ६. | श्री. भिमराव वसंतराव पाटील | ७.८०% जास्त दराने |
| ७. | श्री. मास्कोट कन्स्ट्रक्शन | निरंक |

तुलनात्मकदृष्ट्या कमी व अंदाजपत्रकीय दरापेक्षा १७.०% कमी दराने श्री. एम. एस. जग्गी यांची निविदा आहे. तरी सदर कामा करीता तयार करण्यात आलेल्या र. रु. ३,५३,४३५/- चे अंदाजपत्रकास तसेच सदरील काम श्री. एम. एस. जग्गी यांचे कडून १७.००% कमी दराने करुन घेण्याबाबतचा प्रस्ताव विचारार्थ तथा मंजुरीस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्यानुसार, गारखेडा येथील मोरेश्वर सोसायटी दिलीप पाटील ले आऊट आणि श्रीनगर अंतर्गत रस्त्यांचे डांबरीकरण करणेच्या कामासाठी सन ९५-९६ चे सार्वजनिक बांधकाम खात्याचे डी. एस. आर. दराने तयार करण्यात आलेले रक्कम रु. ३,५३,४३५/- चे अंदाजपत्रकीय तसेच सदर कामासाठी तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी व अंदाजपत्रकीय दरापेक्षा १७.००% कमी दराचे गुत्तेदार श्री. एम. एस.जग्गी यांचे निविदा पत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यास येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ४७४/४ :**

अतिरिक्त शहर अभियंता प्रस्ताव सादर करीत आहेत की, अमरप्रित ते चेतना नगर या ८० फुट डी. पी. रस्त्याचे डांबरीकरण करणेच्या कामाचे सन ९५-९६ सार्वजनिक बांधकाम खात्याचे डी. एस. आर. दराने र. रु. १३,७५,०००.०० चे अंदाजपत्रक तयार करण्यात आले असून, त्यास मा. आयुक्त यांची मंजुरी मिळालेली आहे. सदरील कामाचा खर्च सन १९९५-९६ साठी असलेली र. रु. १०.०० कोटी शासकीय अनुदानातुन प्रस्तावित आहे.

सदरील कामासाठी निविदा पत्रके मागविली असता निविदा पत्रके विक्रीच्या अंतिम तारखे पर्यंत एकूण पाच कोरी निविदा पत्रके विक्री झाली व निविदापत्रके स्विकृतीच्या अंतिम तारखे पर्यंत एकूण कोरी निविदा पत्रके विक्री झाली व निविदा पत्रके स्विकृतीच्या अंतिम तारखे पर्यंत एकूण तीन निविदा पत्रके दर भरलेल्या प्राप्त झाल्या असून, त्यांचा तुलनात्मक तक्ता खालील प्रमाणे आहे.

| | | |
|---|---|---|
| १. | मे. मास्कोट कन्स्ट्रक्शन | २२.८६% कमी दराने |
| २. | श्री. एम. एस. जग्गी | २०.००% कमी दराने |
| ३. | मे. आदिनाथ कन्स्ट्रक्शन | १८.९९% कमी दराने |

तुलनात्मकदृष्ट्या कमी व अंदाजपत्रकाचे दरापेक्षा २२.८६% कमी दराने मे. मास्कोट कन्स्ट्रक्शन यांची निविदा आहे.

सदरील कामाकरीता तयार करण्यात आलेल्या र. रु. १३,७५,०००/- चे अंदाजपत्रकास तसेच सदरील काम मे मास्कोट कन्स्ट्रक्शन यांचे कडून २२.८६% कमी दराने करुन घेण्याबाबतचा प्रस्ताव विचारार्थ तथा मंजुरीस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्यानुसार, अमरप्रित ते चेतना नगर या ८० फुट डी. पी. रस्त्याचे डांबरीकरण करणेच्या कामाचे सन ९५-९६ सार्वजनिक बांधकाम खात्याचे डी. एस. आर. दराने तयार करण्यात आलेल्या र. रु. १३,७५,०००/- चे अंदाजपत्रकास तसेच सदर कामासाठी तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी व अंदाजपत्रकीय दरापेक्षा २२.८६% कमी दराचे गुत्तेदार मे. मास्कोट कन्स्ट्रक्शन यांचे निविदा पत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ४७५/५ :**

अतिरिक्त शहर अभियंता यांनी प्रस्ताव दिला आहे की, औरंगाबाद शहरातील काही जुन्या वाहतुक संकेतकाचे हेड लॅम्प बदलण्याच्या कामाकरीता तयार करण्यात आलेल्या र. रु. ३,१६,०००/- च्या अंदाजपत्रकास स्थायी समिती विषय क्र. ५९८/३२ दि. २४-०५-९६ अन्वये मंजुरी प्राप्त झालेली आहे. त्यानुसार सदरील कामाकरीता निविदापत्रके मागविण्यात आली असता निविदा पत्रके विक्रीच्या अंतिम तारखे पर्यंत एकूण तीन कोरी निविदापत्रके विकल्या गेली व निविदापत्रके स्विकृतीच्या अंतिम तारखे पर्यंत यापैकी तिनही निविदा पत्रके दर भरुन प्राप्त झाली प्राप्त निविदा पत्रके दि. १२-०७-९६ रोजी उघडण्यात आली त्यांचा तपशील खालील प्रमाणे.

| | | |
|---|---|---|
| १. | मे. फरॉनी इलेक्ट्रीकल्स अॅण्ड इलेक्ट्रानिक लॅब | १२.००% कमी दराने |
| २. | महाराष्ट्र इलेक्ट्रानिक महामंडळ मर्यादित (मेल्ट्रॉन) | ८.००% कमी दराने |
| ३. | मे. न्युक्सीऑनिक्स पुणे वरील प्राप्त निविदा पैकी मे न्युक्लीआनिक्स | अंदाजपत्रकीय दराने |

वरील प्राप्त निविदा पैकी मे न्युक्लीआनिक्स पुणे यांच्या निविदा पत्रकाचे दर तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी व अंदाजपत्रकीय दरा ऐवढे आहे.

तरी मे. न्युक्लीऑनिक्स पुणे यांचे अंदाजपत्रकीय दराएवढे निविदापत्रक स्थायी समितीच्या मंजुरीस्तव व विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्यानुसार, औरंगाबाद शहरातील काही जुन्या वाहतुक संकेतांकाचे हेड लॅम्प बदलण्याच्या कामाकरीता तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी व अंदाजपत्रकीय दराचे मे. न्युक्लीऑनिक्स यांचे निविदापत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ४७६/६ :**

शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला की, कैसर कॉलनी येथील मिनार मडिल कब्रस्तान, शहाबाजार येथील चम्पा मस्जिद कब्रस्तान, बशीर कॉलनी येथील मस्जिद मध्ये रोड व आर. सी. सी. बेंचेस बसविण्याचे कामाचे अंदाजपत्रक सा. बा. खात्याचे दरसुची सन ९५-९६ च्या अन्वये र. रु. १,४४,८००/- चे तयार करण्यात आले आहे.

सदर खर्च स्मशान भूमी ३८.० लाख तरतुदी मधुन करण्यात येणार आहे. करीता प्रस्ताव विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्यानुसार, कैसर कॉलनी येथील मिनार मडिल कब्रस्तान, शहाबाजार येथील चम्पा मस्जिद कब्रस्तान, बशीर कॉलनी येथील मस्जिद मध्ये रोड व आर. सी. सी. बेंचेस बसविण्याच्या कामासाठी सा. बा. खात्याचे सन ९५-९६ चे दरसुची नुसार तयार करण्यात आलेले र. रु. १,४४,८००/- चे अंदाजपत्रकास तसेच सदर खर्च स्मशान भूमी ३८.०० लाख तरतुदी मधुन करणेस सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ४७७/७ :**

शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला की, मो. मसनतपुर येथील जुन्या शालेय इमारतीस तडे गेल्यामुळे शेजारीच नविन शाळा बांधणेच्या कामासाठी मा. सर्वसाधारण सभा

ठराव क्र. ४१/११ दि. २०-०७-९६ अन्वये र. रु. १३,९०,७९०/- चे अंदाजपत्रक तयार करण्यात आले असून, त्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात आली आहे. सदरील काम हाती घेण्यासाठी कार्यालयीन निविदा सुचना क्र. मनपा/लेखा नि/११८ दि. ०२-११-९६ अन्वये " बी-१ " नमुन्यात निविदा मागविल्या असता कोऱ्या निविदा विक्रीच्या तारखे पर्यंत एकूण पाच निविदा विक्री झाल्या. निविदा स्विकारण्याच्या अंतिम तारखे पर्यंत एकूण तीन निविदा दर भरुन प्राप्त झाल्या. त्या दि. १४-११-९६ ला उघडण्यात आल्या. त्यांचा तुलनात्मक तक्ता खालील प्रमाणे.

| | | |
|---|---|---|
| १. | श्री. एस. प्रितमसिंग सोधी | १४.७६% जास्त दराने |
| २. | श्री. एस. झेड. सिद्यीकी | ९.९% जास्त दराने |
| ३. | मे. न्यु स्टार कन्स्ट्रक्शन | १९% जास्त दराने |

तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी व अंदाजपत्रकीय दरापेक्षा ९.९% जास्त दराची श्री. एस. झेड. सिद्यीकी यांची निविदा आहे. दर जास्त वाटत असल्यामुळे मक्तेदारास मा. आयुक्तांचे दालनात दि. ३२-११-९६ ला दराचे वाटाघाटी बाबत दरापेक्षा ९.९% दरा ऐवजी ९% जास्त दराने करण्यास मा. आयुक्तांनी मान्यता दिली असून, मक्तेदाराने ही त्याला लेखी संमती दिली. सबब सदर कामासाठी, तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी व अंदाजपत्रकीय दरापेक्षा ९.९% जास्त ऐवजी दराचे वाटाघाटी नुसार २% जास्त दराची श्री. एस. झेड सिद्यीकी यांची निविदा मंजुरीचा प्रस्ताव विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्यानुसार, मो. मसनतपुर येथील जुन्या शालेय इमारतीस तडे गेल्यामुळे शेजारीच नविन शाळा बांधणेच्या कामासाठी तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी व अंदाजपत्रकीय दरापेक्षा २% जास्त दराचे (वाटाघाटी नुसार) मक्तेदार श्री. एस. झेड. सिद्यीकी यांचे निविदा पत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ४७८/९ :**

औरंगाबाद येथील लोकमान्य बहुविध विकास महामंडळ ह्या सार्वजनिक विश्वस्त व्यवस्थ म्हणून नोंदणी झालेल्या संस्थेने त्या संस्थेच्या प्रमुख उद्दीष्ट पैकी महिला करीता उद्योग व्यवसाय सुरु करणे, महिला करीता वस्तीगृह बांधणे या कारणाकरीता औरंगपुरा येथील नाला (पश्चिम बाजू) बलवंत वाचनालय ते अदालत रोड या २४.०० मीटर विकास योजना रस्त्याचे पश्चिमेस व गणपती विसर्ज विहीर, जिल्हा परिषद मैदानाचे पुर्वेस लागून असलेल्या नाल्याची नाला जमिन भाडेपट्टयावर मिळावी म्हणून मागणी केलेली आहे.

संस्थेच्या नोंदणी प्रमुख उद्दीष्टे नाला जमिन विकासाचे नियेजन इ. विचारात घेता त्यांना सदर नाला जमिन नेहमीच्या अटी शर्तीस पात्र राहुन ३० वर्षाचे कालावधी करीता भाडेपट्टयावर देण्याचा प्रस्ताव मान्यतेसाठी सादर.

प्रस्तावाच्या मान्यते नंतर प्रत्यक्ष जागेवर नाला जमिन मोजणी करुन विमाकांना नंतर उपलब्ध होणारे क्षेत्र निश्चित करण्यात येईल व ती नाला जमिन रु. १५५.०० प्रति चौ. मी. प्रति. वर्ष या भाडे दराने भाडे आकारुन नेहमीच्या अटी शर्तीस पात्र राहून आवश्यक तो करारनामा केल्या नंतर संबंधित देण्याची कार्यवाही करण्यात येईल.

**संवाद :**

**श्री. रशिद खान (मामू) :** सदरील प्रस्ताव स्थगित ठेवावा याबाबत महापालिका किती जागा देऊ शकते महापालिकेचे काही नॉर्मस आहेत किंवा नाही यासह पुढील बैठकीत माहितीसह ठेवावे.

**मा. सभापती** : प्रस्ताव स्थगित ठेवावे व पुढील बैठकीत सविस्तर माहितीसह ठेवावे.

**ठराव :**

प्रस्ताव तुर्त स्थगित ठेवण्यात येतो.

**विषय क्र. ४७९/९ :**

मालमत्ता अधिकारी यांनी मा. आयुक्त यांच्या मंजुरी नुसार प्रस्ताव सादर करण्यात येतो आहे की, अर्जदार, श्री. प्रकाश बाबुराव वतीने यांनी मो. जाफरगेट मोंढा येथे पेट्रोल बाजुच्या नाल्या लगतची जागेची मागणी केली आहे.

अर्जदाराने मागणी करीत असलेली जागा ही औरंगाबाद मंजुर विकास योजने नुसार ३०.०० मी. रुंद रस्त्याने बाधित होते. प्रारुप मध्येही ह्या रस्त्याची रुंदी ३०.०० मी. आहे.

प्रस्तावित जागा रस्ता विकासास बाधित असून, सध्या वापरात असलेली जागा ह्या ठिकाणी मोकाट जनावरे चरतात व मेटॅडोरवाले वाहने उभी करतात. करीता अर्जदार यांना खालील प्रमुख अटी व शर्ती अन्वये ८ x ६ आकाराची जागा मासिक भाडे तत्वावर ११ महिन्याचे काळासाठी देण्याबाबत विचार करता येईल.

## प्रमुख अटी - शर्ती

१. ३०.३ मी. रुंदी विकास योजना रस्त्याचे जेव्हा जागेची गरज भासेल किंवा मनपा जेव्हा जागा रिकामी करुन देण्यास कळवित ज्यावेळी जागा खुल्या स्वरुपात परत करावी लागेल.
२. जागा रिकामी करतांना किंवा त्यापुर्वीही केव्हाही अर्जदार यांना मनपा विरुध्द कोणत्याही न्यायालयात कोणत्याही स्वरुपाची दावा करता येणार नाही किंवा मनाई हुकूम घेता येणार नाही.
३. जागा निव्वळ ११ महिन्याचे भाडेपट्टयाने दिली जाईल.
४. अर्जदार यांना पक्क्या स्वरुपाचे बांधकाम करता येणार नाही.

शिवाय नेहमीच्या इतर अटी, शर्ती राहतील करीता अर्जदार यांना या ठिकाणी स्थित पुर्वेस भिंत व देशी दारुचे दुकान, पश्चिमेस, मोंढा ते मोंढा कॉर्नर रोड दक्षिणेस खुली जागा व उत्तरेस नाला भिंत या आकाराची जागा अर्जदार यांना रु. १९२/- दरमहा भाडयाने ११ महिन्याच्या कामासाठी वरील प्रमुख अटी-शर्ती व इतर आवश्यक त्या अटी, शर्तीवर देण्याबाबत विचार होण्यास्तव प्रस्ताव मा. स्थायी समिती समोर विचारार्थ सादर.

**मा. सभापती** : प्रस्ताव स्थगित ठेवावे.

**ठराव :**

प्रस्ताव तुर्त स्थगित ठेवण्यात येतो.

**विषय क्र. ४८०/१० :**

अति. शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर करीत आहेत की, गरवारे स्टेडीयम येथे बॅडमिंटन हॉलसाठी टिब्कुड प्लोरींग करणेच्या कामाचे सन १९९५-९६ चे सार्वजनिक बांधकाम खात्याचे डी. एस. आर. दराने र. रु. ४,३६,८००/- चे अंदाजपत्रक तयार करण्यात आले असून, त्यास मा. आयुक्त यांची मंजुरी मिळालेली आहे. सदरील कामाचा खर्च " क्रिडा संकुल " सन १९९६-९७ साठी असलेल्या तरतुदी मधून प्रस्तावित आहे.

तरी सदर कामासाठी तयार करण्यात आलेल्या र. रु. ४,३६,८००/- अंदाजपत्रक मंजुरी बाबतचा प्रस्ताव स्थायी समितीच्या विचारार्थ तथा मंजुरीस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्यानुसार, गरवारे स्टेडीयम येथे बॅडमिंटन हॉलसाठी टिब्कुड प्लोरींग करणेच्या कामासाठी सन १९९५-९६ चे सा. बा. खात्याच्या डी. एस. आर. दराने तयार करण्यात आलेले रक्कम रु. ४,३६,८००/- चे अंदाजपत्रकास तसेच सदरील कामाचा खर्च " क्रिडा संकुल " सन १९९६-९७ साठी असलेल्या तरतुदी मधुन कणेस सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.४८१/११ :**

अतिरिक्त शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला की, संत एकनाथ रंग मंदिर उस्मानपुरा येथील अत्यावश्यक खालील दुरुस्त्या करणे आवश्यक आहे, यामध्ये खालील कामाचा समावेश आहे.

| | | |
|---|---|---|
| १. | खुर्च्याची दुरुस्ती, बॅंक कुशन, बौटम कुशन बदलणे व किरकोळ दुरुस्ती करणे | ६४,५३०.०० |
| २. | फाटलेले जुने पडदे काढु नविन बांधणे | १,३८,१४९.०० |
| ३. | स्टेज वरील सुटलेल्या फळया व कुजलेले रॅप्टर बदलुन पुर्ण स्टेज एक लेव्हल मध्ये करणे व त्यासंबंधी दुरुस्त्या करणे. | १,३५,४००.०० |
| ४. | छता मधुन गळत असलेले पाण्याची तात्पुरती गळती थांबविणे | ७५,०४६/- |
| ५. | विश्रामगृहाचे स्वच्छतागृह व सर्वसाधारण स्वच्छता गृह दुरुस्ती व परिसरातील इतर सर्व किरकोळ दुरुस्त्या व दर्शनी भागास आवश्यक रंगरंगोटी करणे. | १,३५,०००.०० |
| ६. | आतील ध्वनी व्यवस्था | १,६५,९००.०० |
| ७. | विद्युतीकरण करणे दुरुस्त्या | २२,९३०.०० |
| ८. | वातानुकूल | ४५०००.०० |
| | **एकूण** | **७,८२,९५५.००** |

उपरोक्त निरनिराळया कामाचे अंदाजपत्रक तयार करण्यात आले असून, सदर कामे औरंगाबाद येथे माहे नोव्हे ९६ मध्ये होणाऱ्या मंत्रीमंडळाचे बैठकी पुर्वी करणे आवश्यक असल्याचे ठरले होते. म्हणून अ. क्र. १ आणि २ चे कामाकरीता यापुर्वीच त्या त्या कामाच्या उपलब्ध पुरवठाधारका कडून दरपत्रके प्राप्त करण्यात आली होती. तसेच सर्वात कमी दराचे दरपत्रक भरणाऱ्या एजन्सी अ. क्र. १ च्या कामाकरीता एस. ए. गादी कुशन हे र. रु. ६४,५३०/- मध्ये दुरुस्ती करणार आहे व तीन कोटेशन पैकी त्यांचे कोटेशन सर्वात कमी दराचे आहे. त्याच प्रमाणे अनुक्रमांक २ च्या कामाकरीता मे. नाटयसेवा हे र. रु

१,३८,१४९/- मध्ये सर्व पडदे बदलण्यास तयार आहेत. या प्रकरणामध्ये देखिल प्राप्त तीन कोटेशन पैकी सर्वात कमी दराचे कोटेशन नाट्यसेवाचे आहे. ह्य

अनुक्रमांक ३, ४, ५ या कामासाठी निविदा मागवून काम करण्यास बराच कालावधी लागेल व बैठकीपुर्वी काम कणे शक्य होणार नाही.

म्हणून विनी निविदा निरनिराळया उपलब्ध गुत्तेदाराकडून अ. प. दरावर काम करुन घेण्याचे प्रस्तावित करण्यास आले होते. सर्व कामाची एकूण र. रु. ७.८२ लक्ष असल्याने विना निविदा काम करणे योग्य होणार नाही असे अभिप्राय ले. अ. १ यांनी अल्प मुदतीची निविदा मागवुन काम करणे योग्य राहील असे त्यांचे मत आहे व त्यावव मा. आयुक्त महोदयांनी प्रस्तुत प्रकरणात स्थायी समितीची मंजुरी घ्यावी व विहीत पध्दती अवलंब करुन कामे करावीत असे आदेश दि. १९-११-९६ अन्वये दिले आहे.

उपरोक्त आदेशानुसार सबब अ.. क्र. १ ते ९ निरनिराळया कामाची एकत्रित अंदाजपत्रकीय र. रु. ७,८१,९५५/- ची होत आहे, त्यापैकी अ. क्र. १ ते ५ इमारत दुरुस्ती व देखभाल या शिर्षकाखाली प्रस्तावित असून, अ. क्र. ६ ते ७ विद्युत विभागाशी निगडीत असून, एम ॲण्ड आर (विद्युत) या लेखा शिर्षा मधून प्रस्तावित आहे.

उपरोक्त प्रस्ताव विचारार्थ तथा योग्य त्या आदेशास्त सादर.

**संवाद :**

**मा. सभापती** : प्रस्ताव मंजुर करण्यात येतो व शॉर्ट टेंडर काढुन काम करावे या रंग मंदिरातील काम त्वरेने व सगळे साहित्य (आतील ध्वनी साहित्य) नविन मागवून चांगल्या कंपनीचे मागवावे. ज्यामध्ये १) ॲम्लीफायर, २) स्पिकर बॉक्स, ३) माईक साऊंउ पध्दत वगैरे चांगल्या प्रकारे करावे. यास मंजुरी दिली जाते. सोबतच नेहरु भवन येथील फर्निचरची दुरुस्ती करावी आणि ते मंगल कार्यालयासाठी उपयोगात आणता येते काय याबाबत प्रशासनाने कार्यवाही करावी.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्यानुसार, संत एकनाथ रंग मंदिर उस्मानपुरा येथील अत्यावश्यक दुरुस्त्या करणेच्या कामासाठी अ. क्र. १ ते ८ मध्ये नमुद केलेल्या विविध कामासाठी तयार करण्यात आलेले रक्कम रु. ७,८१,९५५/- चे एकत्रित अंदाजपत्रकास तसेच त्यापैकी अ. क्र. १ ते ५ मधील कामे इमारत दुरुस्ती व देखभाल या शिर्षकामधून व अ. क्र. ६ ते ७ विद्युत विभागाशी निगडीत असलेने एम ॲण्ड आर (विद्युत) या लेखा शिर्षा मधून करणेस सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ४९२/१२ :**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, श्री. अबरार अहेमद व इतर यांचे मालकीचे स. न. २०/१ गारखेडा हद्दीचे जमिनी मधुन ५० फुट विकास योजना रस्ता जात आहे. त्यात सुमारे २६०० चौ. मी. जागा बाधित होते.

या प्रकरणात अर्जदारांशी गेले एक ते दिड वर्षामध्ये वारंवार बऱ्याचवेळा चर्चा झाल्या असून, काही मार्ग निघण्याची शक्यता दिसून आलेली नाही, कारण अर्जदारांचा मुख्य आक्षेप विकास योजनातील त्यांच्या जमिनी मधुन जाणाऱ्या १५ मिटर रस्त्याचे मुल्यांकन तीन वेळेस तीन पध्दतीने केले व शेवटी मा. उप संचालक नगररचना औरंगाबाद विभाग यांनी केलेले मुल्यांकन माजी आयुक्त यांनी अंतिम केले असून, ते अर्जदारांना मान्य नाही. तीनही मुल्यांकन अर्जदाराला कळविण्यात आली आहेत. व ती ३.१६ ते ५.८९ लक्ष दरम्यान आहेत.

भूषण नगर गारखेडा येथील रहिवांशाना रस्त्यांची गरज आहे ते सुमारे ७ ते ८ हजार लोकांना जाण्यायेण्याचा प्रश्न आहे. विकास योजने मध्ये सदर ५० फुट रस्ता दर्शविलेला असून, त्यांची आखणी किंचितशी बदलेली आहे. जमिन मालक श्री. अबरार व तेथील रहिवाशी यांचे मध्ये यामुळे वाद निर्माण झाला आहे. रस्त्यासाठी लागणाऱ्या जमिनीचा मोबदला आणि रेखांकनास अंतिम मान्यतेसाठी भरावे लागणारे विकास शुल्क व विकास खर्च यामधील असलेली तफावत जमिन मालक श्री. अबरार ह्यांना मान्य नाही.

उप संचालक नगररचना औरंगाबाद विभाग यांची मुल्यांकन केलेले असून ते माजी आयुक्त यांनी अंतिम केलेले आहे. ३.७७ लक्ष रुपये मोबदला व एकूण १४,०७,५६६/- रुपये विकास खर्च व विकास शुल्क ग्राह्य धरुन भूखंड धारकांतर्फे उर्वरीत रक्कमेचा भरणा करणे बाबत विभागाचे शिफारस केल्या नुसार विकास रक्कमे पैकी मोबदला रक्कम वजा केली असता ३५% सुट देऊन एक विशेष बाब जनाहित म्हणून ६५% उर्वरीत रक्कम १००% जमिन विकास शुल्क प्लॉट धारकांकडून बांधकाम परवानगीच्या वेळी वसुल करण्याचे अटीवर रेखांकनास अंतिम मंजुरी देणे व मोबदला रक्कम वळती करणे बाबतचा प्रस्ताव मा. स्थायी समितीच्या मान्यतेस्तव सादर.

**संवाद :**

**श्री. अ. रशिदखान (मामू) :** प्रस्ताव स्थगित ठेवावा व पुढील बैठकीत सविस्तर माहितीसह ठेवावे.

**ठराव :**

प्रस्ताव तुर्त स्थगित ठेवण्यात येते. पुढील बैठकीत सविस्तर माहितीसह ठेवावे असे सर्वानुमते ठरले.

**विषय क्र. ४८३/१३ :**

शहर अभि. यांनी प्रस्ताव सादर केला की, मो. रहेमानिया कॉलनी, किराडपुरा वार्ड २५ मध्ये डांबरी रस्ते तयार करणे बाबत कामाकरीता सा. बा. खाते यांच्या वर्ष ९५-९६ च्या दर सुची नुसार रु. १९,९५,०६७/- चे अंदाजपत्रक तयार करण्यात आले आहे. सदरील काम " डांबरी रस्ते " या शिर्षकातून करण्यात येईल. सदरच्या अंदाजपत्रकास मा. आयुक्त साहेबांनी दि. ०६-०७-१९९६ ला प्रशासकीय मान्यता दिली आहे. तसेच सर्वसाधारण सभेत दि. १९-०८-९६ दररोजी मंजुरी मिळाली आहे.

प्रस्तावित कामासाठी निविदा मागविण्यत आली असता अंतिम तारखे पर्यंत एकूण दोन निविदा प्राप्त झाल्या.

| | | |
|---|---|---|
| १. | आदिनाथ कन्स्ट्रक्शन | ७.९९% जास्त दराने |
| २. | आर. बी. शिंदे | १०.८८% जास्त दराने |

परंतु सदरील दर कार्यालयात जास्त वाटल्याने दि. २६-११-९६ रोजी दराच्या वाटाघाटीसाठी बोलाविले असता एजन्सीने मा. आयुक्त यांच्या दालनात सदरील काम अंदाजपत्रकीय दर पेक्षा ३% जास्त दराने करण्यात लेखी संमती दर्शविली आहे.

करीता अंदाजपाकीय दरापेक्षा ३% जास्त दराची असलेली श्री. आदिनाथ कन्स्ट्रक्शन यांची निविदेस मान्यतेचा प्रस्ताव विचारार्थ तथा मंजुरीस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्यानुसार, मो. रहेमानिया कॉलनी, किराडपुरा वार्ड २५ मध्ये डांबरी रस्ते तयार करणे बाबतीत कामाकरीता तयार करण्यात आलेल्या र. रु. १९,९५,०६७/- चे अंदाजपत्रकास तसेच सदरील कामासाठी तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी अंदाजपत्रकीय दरापेक्षा ३% जास्त दराने श्री. आदिनाथ कन्स्ट्रक्शन यांनी सदर काम करणेस लेखी संमती दिल्या नुसार त्यांचे निविदा पत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ४८४/१४ :**

शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला की, सिध्दार्थ उद्यानाचे सुशोभित प्रवेशद्वार बांधणेच्या कामाचे अंदाजपत्रक सार्वजनिक बांधकाम खात्याचे सन ९५-९६ च्या दरसुची नुसार रक्कम रु. १,७५,२००/- चे तयार करण्यात आले आहे. त्यास मा. आयुक्त यांची मंजुरी झालेली आहे.

सदर कामाचे खर्च सिध्दार्थ उद्यान विकास (३० लाख) या तरतुदी मधुन करण्यात येणार आहे. करीता प्रस्ताव विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्यानुसार, सिध्दार्थ उद्यानाचे सुशोभित प्रवेशद्वार बांधणेच्या कामासाठी तयार करण्यात आलेले रक्कम रु. १,७५,२००/- चे अंदाजपत्रकास तसेच सदर कामाचा खर्च सिध्दार्थ उद्यान विकास (३० लाख) या तरतुदी मधुन करणेस सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ४८५/१५ :**

शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला की, सिध्दार्थ उद्यान येथे भुलभूलय्या भोवती संरक्षित भिंत बांधणे, चैनलिंक फेसिंग करणे व आर. सी. सी. मध्ये गेट बसविणे इ. कामाचे अंदाजपत्रक सार्वजनिक बांधकाम खात्याच्या सन ९५-९६ च्या दरसुची अन्वये रक्कम रु. २,४२,९००/- चे तयार करण्यात आले त्यास मा. आयुक्त यांनी मंजुरी दिलेली आहे.

सदर कामाचा खर्च सिध्दार्थ उद्यान विकास (३० लाख रुपये) या तरतुदी मधुन करण्यात येणार आहे.

करीता प्रस्ताव विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्यानुसार, सिध्दार्थ उद्यान येथे भुलभूलय्या भोवती संरक्षित भिंत बांधणे, चैनलिंक फेसिंग करणे व आर. सी. सी. मध्ये गेट बसविणे इ. कामासाठी सा. बा. खात्याच्या सन ९५-९६ च्या दरसुची नुसार तयार करण्यात आलेले रक्कम रु. २,४२,९००/- चे अंदाजपत्रकास तसेच सदर कामाचा खर्च सिध्दार्थ उद्यान विकास (३० लाख रु.) या तरतुदी मधुन करणेस सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ४८६/१६ :**

शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला की, मजनुहिल, उद्यान येथे ३५० मीटर मिनी ट्रेनसाठी (खोदाई, भरती, बांधकाम) फॉर्मेशन तयार करणे बाबतचे अंदाजपत्रक

सार्वजनिक बांधकाम खात्याचे सन ९५-९६ च्या दरसुची अन्वये रक्कम रु. ३,३७,३००/- चे तयार करण्यात आले. यास मा. आयुक्त यांची मंजुरी झालेली आहे.

सदर कामाचे खर्च भांडवली तरतुद एक कोटी अंतर्गत करण्यात येणार आहे. करीता प्रस्ताव विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्यानुसार, मजनुहिल, उद्यान येथे ३५० मीटर मिनी ट्रेनसाठी (खोदाई, भरती, बांधकाम) फॉर्मेशन तयार करणेच्या कामासाठी सा. बा. खात्याचे सन ९५-९६ च्या दरसुची नुसार तयार करण्यात आलेले रक्कम रु. ३,३७,३००/- चे अंदाजपत्रकास तसेच सदर कामाचा खर्च भांडवली तरतुद एक कोटी अंतर्गत करण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ४८७/१७ :**

सहा आयुक्त-१ यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, महानगरपालिका अस्थापनेवर कार्यरत असलेले वाहनचालक यांना महाराष्ट्र शासन निर्णय क्र. एस. आर. व्ही १०९५/प्र. क्र. १९५/ बारा मंत्रालय, दिनांक ८ जून १९९५ अन्वये रुपये १२००-१८०० ही वेतन श्रेणी देण्यात आलेली आहे. महानगरपालिकेतील वरीष्ठ लिपिकांना रु. १४००-२३०० ही वेतन श्रेणी स्वतंत्र ठराव करुन व शासनाची मंजुरी घेवुन लागू केलेली आहे. त्याचप्रमाणे जेष्ठ वाहन चालक हे पद रु. १४००-२३०० या वेतन श्रेणीत मंजुरीस्तव शासनाकडे स्थायी समितीची मंजुरी घेऊन पाठविणे योग्य होईल.

करीता प्रस्ताव स्थायी समितीच्या विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्यानुसार, महानगरपालिका अस्थापनेवर कार्यरत असलेले वाहनचालक यांना महाराष्ट्र शासन निर्णय क्र. एस. आर. व्ही - १०९५/प्र. क्र. १९५/ बारा मंत्रालय, दिनांक ८ जून १९९५ अन्वये रुपये १२००-१८०० ही वेतन श्रेणी देण्यात आलेली आहे. महानगरपालिकेतील वरीष्ठ लिपिकांना रु. १४००-२३०० ही वेतन श्रेणी स्वतंत्र ठराव करुन व शासनाची मंजुरी घेवुन लागू केलेली आहे. तसेच जेष्ठ वाहन चालक हे पद रु. १४००-२३०० या वेतन श्रेणीत मंजुर करणेस सर्व सदरे पुर्वीचे वेतनश्रेणीचे शासनाची मंजुरी घेण्यास पाठविण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

**विषय क्र. ४८८/१८ :**

मालमत्ता अधिकारी यांनी मा. आयुक्त यांच्या मंजुरी नुसर प्रस्ताव सादर करण्यात येत आहे की, श्री. प्रमोद आत्माराम काजळे मा. जिल्हाधिकारी औरंगाबाद यांचे पत्र क्र. ९६/झुभायो/पुरवठा/९६-९७ अन्वये पीर बाजार येथे झुणका भाकर केंद्र चालविण्यासाठी ८ x १५ या आकाराची जागा देण्यात आली होती.

स्थायी समिती ठराव क्र. ३४५/२२ दि. ०९-१०-९६ नुसार पीर बाजार येथे जागा दिल्या नंतर वाद निर्माण झाल्या मुळे जागा दिल्या गेली नाही.

तथापी झुणका भाकर केंद्रासाठी पीर बाजार ते शहानूरवाडी ८०' रस्त्यावर ज्याची चतु:सिमा खालील प्रमाणे आहे.

| | | |
|---|---|---|
| पुर्वेस | : | मनपा खुली जागा |
| पश्चिमेस | : | रस्ता |

दक्षिणेस : पीर बाजार ते शहानुरवाडी ८०' रस्ता
उत्तरेस : मनपा शाळा

वरील चतु:सिमेत दर्शविल्याप्रमाणे झुणका भाकर केंद्रासाठी खालील अटी शर्ती नुसार देता येऊ शकल.

१. झुणका भाकर केंद्रामुळे रस्त्यावरील अडचण वा अडथळा निर्माण होणार नाही.
२. झुणका भाकर केंद्राचे बांधकाम पक्क्या स्वरुपाचे करावयाचे झाल्यास मनपाची पूर्व परवानगी घेणे बंधनकारक राहील.
३. ज्या वेळेस मनपास या जागेची आवश्यकता भासेल किंवा उपरोक्त दोन मुदयांमुळे निर्माण होणाऱ्या परिस्थिती मुळे किंवा रहदारीस बाधा निर्माण होणाऱ्या परिस्थितीमुळे मनपा कडुन झुणका भाकर केंद्र हलवावे. लागल्यास मनपा केंव्हाही जागा रिकामी करुन घेण्यात येईल व संबंधितावर ही जागा रिकामी करुन देणे बंधनकारक राहील. करीता प्रस्ताव मा. स्थायी समिती समोर विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्यानुसार, श्री. प्रमोद आत्माराम काजळे मा. जिल्हाधिकारी औरंगाबाद यांचे पत्र क्र. ९६/झुभायो/पुरवठा/९६-९७ अन्वये पीर बाजार येथे झुणका भाकर केंद्र चालविण्यासाठी ८ x १५ या आकाराची जागा देण्यात आली होती. स्थायी समिती ठराव क्र. ३४५/२२ दि. ०९-१०-९६ नुसार पीर बाजार येथे जागा दिल्या नंतर वाद निर्माण झाल्याने जागा दिल्या गेली नाही.

संबंधितास झुणका भाकर केंद्रासाठी पीर बाजार ते शहानूरवाडी ८०' रस्त्यावर पुर्वेस मनपाची खुली जागा पश्चिमेस रस्ता, दक्षिणेस, पीरबाजार ते शहानुरवाडी ८०' रस्ता व उत्तरेस, मनपा शाळा या चतु:सिमे मधील जागा खालील अटी व शर्ती नुसार झुणका भाकर केंद्रासाठी देण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

१. झुणका भाकर केंद्रामुळे रस्त्यावरील अडचण वा अडथळा निर्माण होणार नाही.
२. झुणका भाकर केंद्राचे बांधकाम पक्क्या स्वरुपाचे करावयाचे झाल्यास महपालिकेची पूर्व परवानगी घेणे बंधनकारक राहील.
३. ज्या वेळेस मनपास या जागेची आवश्यकता भासेल किंवा उपरोक्त दोन मुदयांमुळे निर्माण होणाऱ्या परिस्थिती मुळे किंवा रहदारीस बाधा निर्माण झाल्यास मनपा केव्हांही जागा रिकामी करुन घेईल. व संबंधितावर ही जागा रिकामी करुन देणे बंधनकारक राहील. या अटी व शर्ती नुसार संबंधितास झुणका भाकर केंद्रासाठी जागा देण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.
वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ४८९/१८ :**

मालमत्ता अधिकारी यांनी मा. आयुक्त यांच्या मंजुरी नुसार प्रस्ताव सादर करीत आहे की, जनकल्याण मल्टीपर्पज ट्रस्ट पद्मपुरा श्री. सोमनाथ खंडागळे यांना मा. जिल्हाधिकारी औरंगाबाद यांचे पत्रक ९६/झुभायो/पुरवठा/९६-९७ अन्वये पद्मपुरा भागात झुणका भाकर केंद्र चालविण्यासाठी मंजुरी दिली आहे. सदरील झुणका भाकर केंद्र उघडण्यासाठी खालील चतु:सिमे नुसार विना मुल्य जागा देण्यास प्रस्तावित करण्यात येत आहे.

पुर्वेस : सा. बा. कार्यालय, कुंपन भिंत

पश्चिमेस : रस्ता
उत्तरेस : राणा यांची कुंपन भिंत
दक्षिणेस : पंचवटी हॉटेल ते कोकणवाडी ८०' रस्ता

झुणका भाकर केंद्रासाठी पद्मपुरा येथे ८ x १५ या आकाराची खालील अटी व शर्ती नुसार देता येऊ शकेल.

१. झुणका भाकर केंद्रामुळे रस्त्यावरील वाहतुकीस अडथळा वा अडचण निर्माण होणार नाही. याची दक्षता घ्यावी.
२. झुणका भाकर केंद्राचे बांधकाम पक्क्या स्वरुपाचे करावयाचे झाल्यास मनपाची पुर्व परवानगी घेणे बंधनकारक राहील.
३. ज्या वेळेस मनपास या जागेची आवश्यकता भासेल किंवा उपरोक्त दोन मुद्यामुळे निर्माण होणाऱ्या परिस्थितीमुळे किंवा रहदारीस बाधा निर्माण होणाऱ्या परिस्थितीमुळे मनपा कडून झुणका भाकर केंद्र हलवावे लागल्यास मनपा केव्हांही जागा रिकामी करुन घेईल व संबंधितावर ही जागा रिकामी करुन देणे बंधन कारक राहील. करीता सदरील प्रस्ताव मा. स्थायी समिती समोर विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्यानुसार, जनकल्याण मल्टीपर्पज ट्रस्ट पद्मपुरा श्री. सोमनाथ खंडागळे यांना मा. जिल्हाधिकारी औरंगाबाद यांचे पत्रक ९६/झुभायो/पुरवठा/९६-९७ अन्वये पद्मपुरा भागात झुणका भाकर केंद्र चालविण्यासाठी मंजुरी दिल्यानुसार संबंधितास खालील चतु:सिमेतील जागा विना मोबदला देण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

पुर्वेस : सा. बा.
पश्चिमेस : रस्ता
उत्तरेस : राणा यांची कुंपन भिंत
दक्षिणेस : पंचवटी हॉटेल ते कोकणवाडी ८०' रस्ता

झुणका भाकर केंद्रासाठी पद्मपुरा येथे ८ x १५ या आकाराची खालील अटी व शर्ती नुसार सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

१. झुणका भाकर केंद्रामुळे रस्त्यावरील वाहतुकीस अडथळा वा अडचण निर्माण होणार नाही. याची दक्षता घ्यावी.
२. झुणका भाकर केंद्राचे बांधकाम पक्क्या स्वरुपाचे करावयाचे झाल्यास मनपाची पुर्व परवानगी घेणे बंधनकारक राहील.
३. ज्या वेळेस मनपास या जागेची आवश्यकता भासेल किंवा उपरोक्त दोन मुद्यामुळे निर्माण होणाऱ्या परिस्थितीमुळे किंवा रहदारीस बाधा निर्माण होणाऱ्या परिस्थितीमुळे मनपा कडून झुणका भाकर केंद्र हलवावे लागल्यास मनपा केव्हांही जागा रिकामी करुन घेईल व संबंधितावर ही जागा रिकामी करुन देणे बंधनकारक राहील या अटी व शर्ती नुसार संबंधितास झुणका भाकर केंद्रासाठी जागा देण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

**विषय क्र. ४९०/२० :**

शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला की, मो. चिकलठाणा वार्ड क्र. ८२ येथे महानगरपालिकेच्या नियोजीत नविन आठवडी बाजार जवळील सार्वजनिक शौचालय दुरुस्त करणे व स्वीपर क्वॉर्टर बांधणे उपरोक्त रोड तयार करणे व शौचालय पाणी पुरवठा करणे

५० मी. मी. व्यासाची जलवाहिनी टाकणे कामाकरीता रक्कम रु. ५० मी. मी. व्यासाची जलवाहिनी टाकणे या कामाकरीता रक्कम रु. २,२९,५३०/- चे अंदाजपत्रक सार्वजनिक बांधकाम विभाग औरंगाबाद यांची दर सुची १९९५-९६ प्रमाणे तयार करण्यात आले असून, मा. आयुक्त यांनी दि. २९-०२-९६ रोजी प्रशासकीय मान्यता दिली असून व स्थायी समितीच्या प्रस्ताव क्र. -- दि. ०१-०३-९६ प्रमाणे मान्य केल्या नंतर रितसर स्थानिक वृत्तपत्रात प्रसिध्दी देऊन कार्यालयाची प्रगट निविदा सुचना क्र. मनपा/मुसेप/नि/८०/९६ दि. २१-०६-९६ अन्वये निविदा मागविण्यात आल्या असता निविदा विक्रीच्या अंतिम दिनांक ०५-०७-९६ पर्यंत एकूण (८) आठ कोऱ्या निविदा विकल्या गेल्या व स्विकारण्याच्या तारखेस एकूण (३) तीन मोहरबंद निविदा प्राप्त झाल्या त्या निविदा उपस्थित ठेकेदारासमक्ष उघण्यात आल्या असता ठेकेदारांनी दिलेले दर खालील प्रमाणे आहे.

| | | |
|---|---|---|
| १. | श्री. हुसैन अली | अंदाजपत्रकीय दरापेक्षा १३.८९% कमी |
| २. | श्री. एम. ए. फारुकी | अंदाजपत्रकीय दरापेक्षा १६% कमी |
| ३. | श्री. आर. बी. चव्हाण | अंदाजपत्रकीय दरापेक्षा १०.८% कमी |

तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी अंदाजपत्रकीय दरापेक्षा १६.८२% कमी दराची निविदा श्री. हुसेन अली यांची असल्यामुळे श्री. हुसेन अली यांना कार्यालयीन कार्यादेश क्र. मनपा/स्लम/१३६४/दि. ०३-०९-९६ अन्वये सदरील काम सुरु करण्यात आले होते. परंतु महानगरपालिकेच्या दैनंदिन २१-११-९६ द्वारे सुचविल्याप्रमाणे सदरील अंदाजपत्रकास सुधारीत करण्यात आले असता वाढीव कामाची रक्कम रु. १,५६,३३१/- रु. झाली करीता मुळ कामाची रक्कम २,०३,५२७/-, १,५६,३३१/- एकूण ३,५९,८५८/- झाली असून, सदरील ठेकेदार पुर्वी दिलेल्या ठराव म्हणजे १६.८२% कमी (अंदाजपत्रकीय दरापेक्षा) करण्यास तयार आहे व सदरील वाढीव कामाचे अंदाजपत्रकास मा. आयुक्त यांनी दि. २९-११-९६ रोजी प्रशासकीय मान्यता दिली आहे. करीता प्रस्ताव मान्यतेस्तव व विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्यानुसार, मो. चिकलठाणा वार्ड क्र. ८२ येथे महानगरपालिकेच्या नियोजीत नविन आठवडी बाजार जवळील सार्वजनिक शौचालय दुरुस्त करणे व स्वीपर क्वॉर्टर बांधणे उपरोक्त रोड तयार करणे व शौचालय पाणी पुरवठा करणे ५० मी. मी. व्यासाची जलवाहिनी टाकणेच्या कामाकरीता तयार करण्यात आलेल्या रक्कम रु. ३,५९,८५८/- चे वाढीव अंदाजपत्रकास तसेच सदरील कामासाठी तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी व अंदाजपत्रकीय दरापेक्षा १६.८२% दराने गुत्तेदार श्री. हुसैन अली यांचे निविदापत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ४९१/२१ :**

शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला की, ज्योती नगर येथील मनपाच्या खुल्या जागेवर उद्यान विकसीत करणे बाबतचे अंदाजपत्रक व गुत्तेदाराच्या नावाने कामाचे दर इ. स्थायी समिती सभा दि. २९-०२-९६ विषय क्र. ३८ अन्वये मंजुर झालेले आहे. पुर्वीच्या कामाचे अंदाजपत्रके रक्कम रु. ७ लाख रुपयाचे होते. मंजुर गुत्तेदार श्री. सय्यद जमिन यांना अ. प. दरापेक्षा १% कमी दराने काम मंजुर झाले होते.

७ लाख रुपयाच्या अंदाजपत्रकास वास्तुशास्त्रज्ञांच्या लैडस्केपीक नकाशे प्राप्त होण्या पुर्वी तयार करण्यात आले होते. वास्तुशास्त्रज्ञ यांनी नकाशा मध्ये दिलेल्या सर्व बाबींचा समावेश मुळ अंदाजपत्रकात नाही. दिलेल्या नकाशे प्रमाण सदर उद्यान परिपुर्ण व पूर्ण

सुशोभित करण्याकरीता मुळ अंदाजपत्रक रु. लाख पेक्षा जास्तीचे म्हणजे वाढीव अ.प. ४,६१,०००/- अशी एकूण रक्कम रु. ११,६१,०००/- इतकी येत आहे.

चालु असलेल्या गुत्तेदारामार्फत व स. जमिर यांच्या कडुन मंजुर झालेल्या दरामध्येच करुन घेण्यास्तव सदर खर्च सन ९५-९६ शासकीय अनूदान १० कोटी अंतर्गत मधून करण्यात येईल. करीता वाढीव अंदाजपत्रकास व स. जमिर कडूनच १% कमी दराने काम करुन घेण्याच्या प्रस्ताव विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्यानुसार, ज्योती नगर येथील मनपाच्या खुल्या जागेवर उद्यान विकसीत करणे बाबतचे कामासाठी तयार करण्यात आलेले र. रु. ११,६१,०००/- चे वाढीव अंदाजपत्रकास तसेच सदर काम मंजुर गुत्तेदार श्री. सय्यद जमीर यांचे कडुन अंदाजपत्रकीय दरापेक्षा १% कमी दराने करुन घेण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**मा. सभापती** : मंजुर तसेच दि. २५-१०-९६ चा ऐनवेळचा प्रस्ताव मंजुर

**विषय क्र. ४९२/२२ :**

मालमता अधिकारी यांनी प्रस्ताव दिला की, दि. ३०-१०-९६ रोजी संपन्न झालेल्या विशेष सर्वसाधारण सभेने ठराव क्र. १४०/२ अन्वये नाथ मार्केट येथील पहिल्या मजल्या वरील मागिल बाजुची रिकामी दुकाने भाडयाने देण्यासाठी वारंवार निविदा मागविणे, बोली पध्दतीने भाडयाने देण्याबाबत प्रयत्न करुनही नागरिकांकडून प्रतिसाद मिळाला नसल्यामुळे महापालिकेचे होणारे आर्थिक नुकसान टाळण्यासाठी नाथ मार्केट येथील रिकामी दुकाने पुर्वीच्याच दरमहा भाडयाप्रमाणे भाडयाने देण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात आलेली आहे. तसेच सदर ठरावास याच सभेत स्विकृतीही देण्यात आलेली आहे की,

श्री. राजन, शिरोडकर, शिव उद्योग सेना यांनी पत्र दिले आहे की, महाराष्ट्रातील बेरोजगार तरुणांना रोजगार किंवा उद्योग उभे करण्याचे काम या संस्थेमार्फत होणार आहे. तरी शिव उद्योग सेना यांनी नाथ मार्केट येथील दुकानाची मागणी केली असून, पहिल्या मजल्यावरील मागील बाजुचे दुकान क्र. ११ देणे करीता खालील (पुर्वीच्याच) दरा प्रमाणे सादर करण्यात येत आहे.

दुकान क्षेत्रफळ प्रति चौ. मी. रु. २५/- दरमहा प्रमाणे व पोट माळयासाठी प्रति चौ. मी. रु. १० दरमहा प्रमाणे व नियमाप्रमाणे एकूण क्षेत्रफळावर रु. ५/- रु. प्रमाणे सेवा शुल्क भरावे लागेल. तसेच नियमाप्रमाणे अनामत रक्कम रु. १५००/- प्रति चौ. मी. प्रमाणे रु. ५४,६४०/- होते. तरी वरील दराने दुकान देणे बाबत प्रस्ताव स्थायी समितीच्या सन्माननीय सदस्यांसमोर परिपत्रक रुपाने सादर करण्यात येत आहे. प्रस्ताव विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्यानुसार, दि. ३०-१०-९६ रोजी संपन्न झालेल्या विशेष सर्वसाधारण सभेत ठराव क्र. १४०/२ अन्वये नाथ मार्केट येथील पहिल्या मजल्यावरील मागील बाजुची रिकामी दुकाने भाडयाने देण्यासाठी वारंवार निविदा मागविणे, बोली पध्दतीने भाडयाने देण्याबाबत प्रयत्न करुनही नागरिकांकडून प्रतिसात नसल्याने मनपाचे होणारे नुकसान टाळणेसाठी नाथ मार्केटसाठी येथील रिकामी दुकाने पुर्वीच्याच दरमहा भाडयाप्रमाणे भाडयाने देण्यास सर्वानुमते मंजुरी देऊन सदर ठराव याच सभेत स्विकृतीही देण्यात आलेली

असल्यामुळे तसेच श्री. राजन, शिरोडकर, शिव उद्योग सेना यांनी पत्र दिले की, महाराष्ट्रातील बेरोजगार तरुणांना रोजगार किंवा उद्योग उभे करण्याचे काम सदर संस्थेमार्फत होणार असलेने शिव उद्योग सेना यांनी नाथ मार्केट येथील दुकानाची मागणी केल्या नुसार यांना पहिल्या मजल्या वरील मागील बाजूचे दुकान क्र. ११ क्षेत्रफळ प्रति चौ. मी. रु. २५/- दरमहा प्रमाणे व पोट माळयासाठी प्रति चौ. मी. रु. १०/- दर महा प्रमाणे व नियमा प्रमाणे अनामत रक्कम रु. १५००/- चौ. मी. प्रमाणे रु. ५४५४०/- घेऊन दुकान क्र. ११ श्री. राजन शिरोडकर, शिव उद्योग सेना यांना भाडयाने सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ४९३/२३ :**

शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला की, जालना रस्त्यावरील मनपाचे अग्नीशमन दत विभाग परिसरामध्ये उप आयुक्त-१ यांना निवासस्थान बांधणेच्या कामासाठी सा. बा. खात्याचे सन ९५-९६ चे जिल्हा दरसुचीनुसार र.रु. ४,८९,८६०/- चे अंदाजपत्रक तयार करण्यात आले असून, त्यास स्थायी समितीमध्ये सादर करण्याचे र. रु. ४,८९,८६०/- चे अंदाजपत्रक मंजुरीचा प्रस्ताव विचारार्थ सादर. सदरचा खर्च " व्यापारी संकुल " व इतर इमारती बांधणे या लेखा शिर्षामधून प्रस्तावित आहे.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्यानुसार, जालना रोडवरील मनपाचे अग्नीशमन दत विभाग परिसरामध्ये उप आयुक्त-१ यांना निवासस्थान बांधणेच्या कामाकरीता तयार करण्यात आलेल्या र.रु. ४,८९,८६०/- च्या अंदाजपत्रकास तसेच सदरचा खर्च " व्यापारी संकुल " व इतर इमारती बांधणे या लेखा शिर्षामधून करण्यात सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

स्वाक्षरित/-
नगरसचिव,
महानगरपालिका, औरंगाबाद.

स्वाक्षरित/-
स्थायी सभापती,
महानगरपालिका, औरंगाबाद.

# *औरंगाबाद महानगरपालिका औरंगाबाद*

**दिनांक १८-१२-९६ रोजी संपन्न झालेल्या स्थायी समितीचे इतिवृत्त.बुधवार दिनांक १८-१२-९६ रोजी दुपारी अंदाजे ३.२० वा.सभापती,स्थायी समिती यांचे अध्यक्षतेखाली स्थायी समिती सभा संपन्न झाली तिचे इतिवृत्त, सभेची सुरुवात " वंदे मातरम् "या गिताने झाली. उक्त सभेत मनपा अधिकाऱ्यांसह खालील स. सदस्य उपस्थित होते.**

| | | |
|---|---|---|
| १) | स. स. श्री. गौतम खरात | स. सदस्य |
| २) | स. स. श्री. रजनी जोशी | -//- |
| ३) | स. स. डॉ. भागवत कराड | -//- |
| ४) | स. स. श्री. कंवरसिंग बैनाडे | -//- |
| ५) | स. स. कु. माया लाडवाणी | -//- |
| ६) | स. स. श्री. विजयकुमार मेहेर | -//- |
| ७) | स. स. श्री. महादेव सुर्यवंशी | -//- |
| ८) | स. स. श्री. हमीदउद्दीन ताबा | -//- |
| ९) | स. स. श्री. भगवान घडामोडे | -//- |
| १०) | स. स. श्री. सुभाष टाकळकर | -//- |
| ११) | स. स. श्री. त्र्यबंक तुपे | -//- |
| १२) | स. स. श्री. अभिमन्यु भालेराव | -//- |
| १३) | स. स. श्री. कचरु नवपुते | -//- |
| १४) | स. स. श्री. विकास जैन | -//- |
| १५) | स. स. श्री. अ. रशिद खान (मामू) | -//- |

**संवाद :**

**श्री. अब्दुल रशिद खान (मामू) :** पृष्ठ क्र. ७, ८ व ९ मधील इतिवृत्तातील छपाई व्यवस्थित नसल्याने स. स. ना. व्यवस्थित वाचता येत नाही.

**मा. सभापती** : सचिव यांनी माहिती दयावी.

**सचिव** : टंकलेखन मशिनमुळे छपाई व्यवस्थित आलेली नाही याबाबत दोनदा टंकलेखन करुही तिच अवस्था नसल्याने नाईलाजास्तव सदरील पृष्ठ इतिवृत्तात जोडण्यात आले.

**मा. सभापती** : जर टंकलेखर मशिन बरोबर नसेल तर दुरुस्ती करुन घ्यावी किंवा नविन मशिन भांडार विभागाकडून खरेदीसाठी मागणी करावी.

**सचिव** : ठिक आहे.

**श्री. अब्दुल रशिद खान (मामू) :** दै. सामना या वर्तमानपत्रात गाडयांच्या चेसिस बाबत बातमी प्रसिध्द झाली याबाबत खुलासा करावा.

**मा. सभापती** : संबंधित अधिकाऱ्यांनी खुलासा करावा.

**सहा. उप अभियंता :** चेसिसचे दरा बाबत मंजुर मिळाल्याच नंतर पुढील कार्यवाही करण्यात येईल.

**मा. सभापती** : या वर्तमानपत्रात असे नमुद केलेले आहे की, आपण प्रायव्हेट एजन्सीला बोलावून त्यांना न्यायवयास लावतो वगैरे.

**श्री. अब्दुल रशिद खान (मामू) :** दोन महिन उशिर का होत आहे. सुरुवातीपासून का होत नाही यामध्ये असे आहे की, रु. ९.०० लाखाची तफावत दिसले त्यामुळे लेखा विभागाले पैसे थांबविले कारण अगोदरपेक्षा अंदाजपत्रक जास्तीचे बनवुन पाठविले व तेच पुणे/मुबई कडे कमी किंमतीत मिळते त्यामुळे लेखा विभागाने थांबविले.

**मा. सभापती** : अगोदर आपण लॅन्रच्या बाबतीत काय निर्णय केला त्यावर चर्चा करु द्या.

**श्री. हमीदउद्यीन ताबा :** कमी किंमतीचे अंदाजपत्रक का तयार केले याची ही माहिती मिळणे आवश्यक आहे.

**मा. सभापती** : चेसिसवरती लॅडर बसवायला इतका उशीर का लागतो. याची माहिती द्यावी.

**सहा. यांत्रिकी** : अगोदर टेंडर काढलेले होते. परंतु नंतर चौकशी केली त्यामुळे पुन्हा टेंडर रिकॉल करुन कार्यवाही करण्यात येत आहे. यासाठी तीन महिन्याचा कालावधी लागला.

**मा. सभापती** : अगोदर टेंडर काढलेला आहे. नंतर पुन्हा रिकॉल करुन दुसऱ्यांदा टेंडर मागविण्यात आले.

**श्री. अब्दुल रशिद खान (मामू) :** म्हणूनच रिकॉल केल्याने रु. १.०० लाखाचा फरक दिसतो तेव्हा माझे असे म्हणणे आहे की, वेळेच बंधन पाहून दोन्हीही टेंडर एका वेळेस मागविले असते तर बरे झाले तर गाडयांच्या बाबतीत ही जास्तीच्या खर्च होत आहे. यास जबाबदार कोण? वर्तमानपत्रातील बातमी आपण व्यवस्थित वाचली नाही काय?

**मा. सभापती** : जनसंपर्क अधिकारी सदरील वृत्तपत्रातील बातमी आपण या विभागाकडे पाठविली नाही.

**जनसंपर्क अधिकारी :** मा. आयुक्त यांच्या अवलोकनार्थ सर्व दे. वृत्तपत्रांचे कात्रणे पाठवून मग संबंधित विभागास पाठविले.

**मा. आयुक्त** : सदरील वृत्तपत्रातील बातमी माझ्याकडेही पोहचली नाही.

**मा. सभापती** : अति. शहर अभियंता यांनी खुलासा करावा.

**अ. श. अभियंता :** हैड्रोलिक लॅडर बाबत फक्त एकाचेच टेंडर आलेले होते ते म्हणजे उषा कंपनीचे आणि तक्रार टेक कंपनीने टेंडर भरलेले नव्हते. या दोघापैकी नंतर एअर टेकने पत्राने कळविले त्यानुसार या दोघांच्याही दरात तीच तफावत होती. नंतर यावर इतर देवून पुन्हा टेंडर रिकॉल केले आणि दोघानीही ते टेंडर भरले त्यातही दोघात खुपच तफावत दिसुन आली आणि त्यामुळे लेखा विभागाने रिमाकर्स लिहून माझ्याकडे पाठविली असता तांत्रिकी रिमार्कस असल्याने मी लिहुन संचिका कार्यवाहीसाठी पाठविली आहे.

**श्री. अब्दुल रशिद खान (मामू) :** यांत्रिकी विभागाचे काम बरोबर नाही. आपल्या या विभागात मेकॅनिक कर्मचारी असुनही दुसरीकडे गाडया दुरुस्तीसाठी गाडया पाठवितो मागे या ठिकाणी मेकॅनिक कर्मचारी ठेवून उपयोग काय? आपल्याकडील मेकॅनिक कर्मचारी बरोबर काम करीत नाहीत. मा. महापौर यांची गाडी लोटत आणावी लागली किंवा अनेक अशा काही गाडया आहेत की, त्या लवकर दुसऱ्या करुन मिळत नाही त्यांना मटेरियलही तात्काळ उपलब्ध नाही.

**मा. सभापती** : मा. आयुक्त माहिती देत आहेत.

**मा. आयुक्त** : लॅडर बसविण्याच्या दोन कंपन्या आहेत. १) उषा कंपनी, २) एअर टेक कंपनी आपण दोन चेसिस घेतलेल्या आहेत आणि त्याच्यावरती लॅडर बसवायाच्या आहेत. त्यामुळे सोडीयम व्हेपरचे दिवे व्यवस्थित बसविता येते. यापुर्वी एक लॅडर आपण बसविलेले आहे. चांगल्या प्रकारे काम करीत आहे तो लॅउर एअरटेक कंपनीचा आहे. या दोन चेसीस काम करीत आहे तो लॅडर एअरटेक कंपनीचा आहे या दोन चेसीस आल्यानंतर जाहिर निविदा आपण काढल्या आणि जाहिर निविदा काढल्या नंतर एअरटेक या एकाच कंपनीने आपल्याला ऑफर दिली जवळपास ३.२५ लाख रु. खर्च येईल असे सांगितले आणि तो आम्ही टेंडर फायनल करीत असतांना उषा या कंपनीने कळविले की, आम्ही रु. २.०० लाखात देऊ शकतो. आम्ही दिलेले लॅडर पुणे/ठाणे मनपाने बसविलेले आहे. असे सांगितले. त्यामुळे या दोघात जवळपास १.०० लाख चा फरक दिसून येतो त्यामुळे पिंपरी चिंचवड/ठाणे व नाशिक मनपाला संबंधित विभागातील कर्मचाऱ्यास पाठवून विचारणा केली असता काही मनपा मध्ये उषा व काही ठिकाणी एअरटेक कंपनीचे असल्याचे समजले त्यावर यापुर्वीचे जे एअरटेकचे जे घेतलेले आहे. त्यांचा अनुभव चांगला असल्याने यांत्रिकी विभागाने सांगितलेले जे एअर टेक या कंपनीचे घेत असतांना रु. १.०० लाख जास्तीचा खर्च करावा लागतो. तेव्हा त्या दोन्हीही कंपन्यांना बोलाविले त्यांनी चर्चे अंती किंमती कमी केल्या परंतू किंमती कमी करुनही रु. १.५० लाखाचा फरक पडला आणि मग एअर टेकचे घ्यावयाचे म्हटले तर खालची जी उषाची कंपनी आहे. त्याला ओव्हर संम करुन लॅडर चांगले नाही त्यामुळे फेरनिविदा काढण्याच्या निर्णय घेतला. फेरनिविदा काढून सदरची संचिका अति. शहर अभियंता यांचयाकडे आहे. आणि फायनल झाल्यानंतर स्थायी समितीकडे मंजुरीस्तव पाठविण्यात येईल. यामध्ये मनपामध्ये आर्थिक नुकसानही घेता कामा नये व लॅडर ही चांगले मिळावे हाच उद्देश आमच्या समोर आहे.

**श्री. अब्दुल रशिदखान (मामू) :** गाडयांचे रिपेंअरिंग बाबत अनेक अडचणी येतात. याबाबत कार्यवाही करावी.

**मा. सभापती** : यांत्रिकी विभागाच्या काही अडचणी आहेत काय?

**सहा. यांत्रिकी** : गेल्या १० वर्षापासून सतत काम करीत आहेत तेच सध्याही आहेत. शिवाय नविन गाडया येतच आहे. प्रायव्हेट गॅरेज मध्ये गाडया रिपेअर्स साठी आपण पाठविले. आपल्या कडे तिन मेकॅनिक असून, लवकर गाडया दुरुस्ती होत नाही. याचे कारण आर्थिक अधिकार व तात्काळासाठी प्रायव्हेट गॅरेज कडे पाठवावे लागते.

**श्री. अब्दुल रशिद खान (मामू) :** आपल्याकडे प्रायव्हेट गॅरेज कडे गाडया जास्त रिपेअर्स साठी पाटविल्या जातात. अनेक गाडयांचे कुशन सुध्दा प्रायव्हेट गॅरेजकडून करुन घेतल्या जातो. प्रायव्हेट कडे एकच माणूस दोन दिवसात काम करतो. परंतू आपल्याकडे तिन कर्मचारी राहूनही एका गाडीचे काम तात्काळ होत नाही. ही बाब अतिशय गंभीर आहे. गाडयांच्या रिपेअर्ससाठी फाईल प्रोसेसमध्ये वेळ लागू नये.

**श्री. महादेव सुर्यवंशी :** एखादया गडयांचे स्पेअर पार्टस जर नाही किंवा गाडी रिपेअर्ससाठी लागली तर तेथील मेकॅनिक विभागानी असे पार्टस त्यांच्या भांडारात ठेवावे

व ताबडतोब दुरुस्ती करुन द्यावी. थोडयाश्या अडचणीसाठी गाडयांना दुरुस्तीसाठी विलंब करणे योग्य नाही.

**मा. सभापती** : मला वाटते भंडार कडे टेंडर मागवुन पार्टस् ठेवणेची आपण कार्यवाही करतो.

**अ. श. अभियंता** : ह्या वार्षीक टेंडर मागवुन कार्यवाही करा.

**श्री. कचरु नवपुते, डॉ. मेहेर** : शहरात अनेक दुकाने आहेत. त्यामुळे तात्काळ काम होण्यासाठी पार्टस् उपलब्ध होऊ शकतात फक्त मंजुरीसाठी वेळ वाया घालवु नये.

**मा. सभापती** : लेखा विभागाने याबाबत आपले मत द्यावे.

**लेखाधिकारी-१** : दर वर्षाचे आपण टेंडर मागवितो व त्यानुसार यांत्रिकी विभागाने कार्यवाही करावी.

**सहा. यांत्रिकी** : आपल्या मनपाच्या अनेक गाडयांचे रु. ३/- हजारांचे आतिल कामाचे खर्च असल्यास तातडीने करवुन घेतो. परंतु त्यावर आपल्या मंजुरी नंतरच कार्यवाही करावी.

**श्री. अब्दुल रशिद खान (मामू)** : उप आयुक्त-१ ची गाडी सुध्दा खराब आहे. सध्या कचऱ्यांचे गाडया चांगल्या स्थितीत असल्या त्या नविन खरेदी केलेल्या आहेत व जुन्या हरीशी केलेल्या आहेत. पुढील बैठकीत यांत्रिकी विभागाची जुन्या व नविन गाडयांची माहिती मागवावी.

**मा. सभापती** : पुढील बैठकीत यांत्रिकी विभागात जुन्या गाडया ज्यामध्ये ट्रक / जिप / कार / टँकर व रिक्षा तसेच नविन गाडया किती आहेत याची माहिती देण्यात यावी. त्याचप्रमाणे यांत्रिकी विभागाने यापुढे अशा कोणत्याही गाडया रिपेअर्स साठी आल्यास त्या दोन दिवसात रिपेअर्स करुन दयावे.

**श्री. महादेव सुर्यवंशी** : कचऱ्यांचे ज्या गाडया आहेत. त्या कचरा वाहून नेतांना गाडयांचे पाटया तुटतात त्यामुळेही बऱ्याचशा गाडया खराब अवस्थेत होतात. आता पाटयांची काम पोजिशन आहे. याची माहिती दयावी.

**मा. सभापती** : स. स. नी. विचारलेल्या प्रश्नासंदर्भात सिटीतुन केरकचरा ट्रेचिंग ग्रांउडवर नेऊन टाकावयाचा व ट्रेचिंग ग्रांउडकडिस माती गार्डनमध्ये टकायची यासाठी काही गाडयांचे पाटया खराब झाले हे खरे काय? माहिती दयावी.

**सहा. यांत्रिकी** : मातीच्या रोडमुळे काही ३-४ गाडयांचे पाटे तुटलेल्या होत्या.

**डॉ. मेहेर** : किती ठिकाणी किती दिवसापासून तुटलेल्या आहेत. माहिती दयावी.

**मा. सभापती** : या संबंधिची माहिती पुढील बैठकीत दयावी.

**डॉ. कराड** : लायन्स क्लब तर्फे आपल्या शहरामध्ये १३ डिसेंबर ९६ पासून प्लॉस्टिक सर्जरीचे कॅम्प सुरु झालेले आहे. या कॅम्पसाठी अमेरिकेतुन ४ प्लॉस्टिक सर्जरी येथे झालेले आहेत. या कॅम्पमध्ये ४०० च्या वर साधारणतः शस्त्रक्रिया आम्ही करणार आहोत आणि या कामासाठी एका शस्त्रक्रिये साठी रु. ५०००/- खडी येण्याची शक्यता आहे. यासाठी अपेक्षित खर्च रु. १.०० बाब होण्याची शक्यता आहे. या ठिकाणी मा. महापौर उप महापौर यांनी भेट दिलेली आहे. येथील काम आपण सर्वांनी पाहण्यासाठी भेट देण्याबाबत मी आंमत्रीत करतो व मनपातर्फेच्या कार्यासाठी रु. ५१/- हजार आर्थिक मदत दयावी अशी विनंती करतो जे गरजु खेडया पाडयातील लोक आहेत. त्यांच्या शस्त्रक्रिया करण्यात येणार आहे.

**श्री. अब्दुल रशिद खान (मामू) :** स. स. नी. जो प्रस्ताव मांडला आहे. प्रस्ताव चांगला असुन त्यास माझे अनुमोदन आहे. परंतु त्याप्रमाणे अमेरीकेतुन डॉ. या ठिकाणी शस्त्रक्रियोठी येतात तर आपण व आपले डॉ. कमीत कमी खेडयात जाऊन किंवा त्यांच्याकडे येणाऱ्या पेंशटकडू अशाच प्रकारचे कमी खर्चाचे शस्त्रक्रिया यांच्याकडे येणाऱ्या पेशंटकडून अशाच प्रकारचे कमी खर्चाचे शस्त्रक्रिया करुन देण्यास मदत करावी ही विनंती.

**डॉ. मेहेर** : स. स. नी मांडलेल्या सुचनांशी मी अनुमोदन देत आहे.

**श्री. कचरु नवपुते :** सदरचा खर्च कोणाचा निधीतुन देणार याची माहिति दयावी.

**मा. सभापती** : लेखाधिकारी-१ यांनी माहिती दयावी.

**लेखाधिकारी-१ :** अशा प्रकारची कोणतेही अनुदान ठेवण्यात आलेली नाही व यासाठी अंशदान या शिर्षातुन रु. १५/- हजार खर्च करता येतात.

**मा. सभापती** : खास बाब म्हणून आणि चांगले उपक्रम एक क्लब राबविणे गोरगरिबांच्या कल्याणासाठी या करीता रु. ५१/- हजार मंजुर करण्यात येते.

**श्री. अब्दुल रशिद खान (मामू) :** आपल्याकडे ऑटो रिक्षा आलेल्या आहेत. त्यासाठी मेकॅनिक आहेत काय?

**सहा. यांत्रिकी** : सध्या तात्पुरत्या स्वरुपात रिक्षा चालु आहेत.

**श्री. अब्दुल रशिद खान (मामू) :** ही पदे सेवायेजन कार्यालयातुन यादी मागवुन भरणार किंवा कसे.

**मा. सभापती** : प्रशासनात असे सांगितले आहे की, कोणतेही पदे भरण्यासाठी सेवायोजन कार्यालयातुन यादी मागविल जाईल आणि त्यांच्याकडुन नाही असल्यास मग दैनिक वर्तमानपत्रात जाहिरात देवून भरण्यात येईल.

**श्री. अब्दुल रशिद खान (मामू) :** आज त्या ऑटो रिक्षावर काम करीत असलेले कर्मचारी आहेत ते कोणते?

**मा. सभापती** : आपल्याकडे जे हेल्पर पुर्वीचे काम करणार व लेबर होते. त्यांना आपण सध्या काम दिलेले आहे व ते आपले कडील कर्मचारी आहेत.

**श्री. अब्दुल रशिद खान (मामू) :** मग सेवायोजन कार्यालयाकडून यादी का मागविली? ज्या अर्थी तुम्ही रिक्षा वरती लोकांना कानावर लावले व गेल्या दिड महिन्यापासून सेवायोजन कार्यालयाची यादी प्राप्त झाली तर कर्मचाऱ्यांना कामावर का लावले याची माहिती दयावी व त्यामुळे यादी पेंडीग का ठेवली?

**मा. सभापती** : उप आयुक्त-१ माहिती देतील.

**उप आयुक्त - १ :** रिक्षा आल्या नंतर रिक्षावर सध्या नेमणूक केलेली नाही. सेवायोजन कार्यालयाकडून यादी येण्यास विलंब लागला व रिक्षा आलेल्या होत्या तेव्हा कचरा उचलण्याचे काम नये म्हणून जे कर्मचारी ज्यांना रिक्षा चालविण्याचे काम येते. त्यांची आपण बदली केली त्यांची ऑर्डर काढलेली नाही व त्यांनी कोणत्याही प्रकारची नेमणूक दिलेली नाही आणि यादि आल्याप्रमाणे आपली प्रोसिजर नियमाप्रमाणे चालु आहे.

**श्री. अब्दुल रशिद खान (मामू) :** आपण सेवा योजन कार्यालयाकरीता यादी येण्यापुर्वी या कर्मचाऱ्यांना कामावर लावले तर सुध्दा तुम्ही त्यांना हटविण्याची कार्यवाही केल्यास " उपोषणाचा " मार्ग ते कर्मचारी करतील त्यावर आपण काय करणार.

**उप आयुक्त - १ :** आपण रिक्षा वर कर्मचाऱ्यांची बदली केलेली आहे. नेमणूक केलेली नाही.

**श्री. अब्दुल रशिद खान (मामू) :** मी मागेच आपल्याला भेटून सुचना केलेली होती की, सेवायोजन कार्यालयाकडून यादी प्राप्त झाली काय? व सदरील रिक्षावर कोणत्या कर्मचाऱ्यांना कामे देणार परंतु याबाबत विलंब म्हणून यादी पेंडीग ठेऊन इतर कर्मचाऱ्यांचे कार्यालयाचे आदेश काढणे योग्य वाटत नाही.

**मा. सभापती** : नियमाप्रमाणे छाननी करुन प्रशासनाने याबाबत त्वरीत कार्यवाही करावी व पुढील बैठकीत माहिती सादर करावी.

**श्री. अब्दुल रशिद खान (मामू) :** उप आयुक्त-१ हे बोलायला व दिसायला चांगले असून, लोकांना उल्लू मारतात.

**मा. सभापती** : अशा प्रकारचे शब्द अधिकाऱ्यांबाबत वापरु नये उप आयुक्त-१ व्यवस्थित माहिती देत आहेत.

**श्री. अब्दुल रशिद खान (मामू) :** जोराजोराने बोलतात. (या वेळी स. स. जोरजोरात बोलतात त्या वेळी काहीही ऐकू येत नाही.)

**मा. सभापती** : स. स. यांना पुन्हा विनंती करण्यात येते की, आपण अधिकाऱ्यांशी अशा पध्दतीने वागू नये. त्यावेळी सर्व अधिकारी बाहेर जाण्यासाठी हालहाल करतात सर्व अधिकाऱ्यांना सुचना देण्यात येतो की, सभापतीच्या परवानगी शिवाय सभागृहा बाहेर जावू नये. हा सभागृहाचा नियम आहे. यावेळी ऑफिसर्स असो. अध्यक्ष श्री. डी. रझवी स्वतः मा. सभापती यांचेशी चर्चा करतात. ही सभा ००.०५ मिनीटांसाठी सभा तहकुब करण्यात येते. (अंदाजे वेळ ०४.०० वाजता)

(सभेला सुरुवात अंदाजे ०४.१५ वाजता)

**श्री. हमीद ताबा :** स. स. श्री. रशिद खान मामू ऊर्दूतून बोललेले आहेत. त्यांच्या बोलण्यातून असा काही उद्देश नव्हता तेव्हा त्यांच्या मार्फत मी माफी मागतो.

**श्री. कचरु नवपुते :** स. स. श्री. रशिद मामू यांनी आपले शब्द मागे घ्यावे.

**श्री. अब्दुल रशिद खान (मामू) :** माझ्या तोंडातून जे शब्द निघाले त्याबद्दल मला स्वतःला खेद वाटतो त्यामुळे मी माझे शब्द परत घेतो. मी उर्दूतुन बोललो आहे आपण त्याचा अर्थ वेगळा लावता आहे कृपया सर्व ऐकूनच आपण प्रतिक्रया घ्यावे.

**श्री. गौतम खरात :** रिक्षा चालकासाठी आपण जी सेवायेजन कार्यालयातुन यादी मागविली आता तात्पुरते कर्मचारी आपण त्या रिक्षावर घेतलेले आहेत. आता चतुर्थ श्रेणी कर्मचाऱ्यातून असे लायसेंस धारक कर्मचारी असतील तर त्यांचेतुन ५०% व यादीतून ५०% याप्रमाणे घेण्यात यावे.

**मा. सभापती** : आपले सेवा भरती नियम आहे त्यात तरतुद केल्या प्रमाणे कार्यवाही व्हावी. (उदा. २५% आहे.)

**श्री. कचरु नवपुते :** आपण एकीकडे म्हणतो सेवा येजन कार्यालयातर्फे भरावे व दुसरीकडे म्हणतो असे भरावे कोणती तरी एकच पॉलीसी असावी.

**मा. सभापती** : कोणती तरी एक पॉलीसी प्रशासनाने ॲडप्ट करावी व नियमाप्रमाणे प्रशासनाने कार्यवाही करावी.

**श्री. अभिमन्यु भालेराव :** आपले कडील केरकचऱ्यांच्या गाडया आहेत. त्यावर ताडपत्र्या नाहीत माजी आयुक्त यांनी सर्व गाडयांवरीती ताडपत्र्या देण्याबाबत सुचना केलेल्या होत्या आत ताडपत्र्या दिलेल्या नाहीत काय?

**मा. सभापती** : आरोग्य विभगांनी माहिती दयावी.

**आरोग्य वै. अ.** : ताडपत्र्या आपण एका वर्षापुर्वी घेतलेल्या होत्या.

**श्री. महादेव सुर्यवंशी :** मी फक्त एकाच गाडीवरती ताडपत्री झाकलेली पाहतो आणि तीहीचार ठिकाणी फाटलेली असते.

**श्री. अभिमन्यु भालेराव :** एकाही केरकचरा गाडीवरती ताडपत्री झाकलेली दिसत नाही. त्यामुळे सर्व रस्त्यावर केरकचरा सांडत भालेराव जातो.

**श्री. कचरु नवपुते :** ताडपत्र्या आहेत परंतु कर्मचारी वापरत नाहीत.

**मा. सभापती :** याबाबत सविस्तर माहिती पुढील बैठकीत दयावी.

**श्री. अभिमन्यु भालेराव :** मनपा आरोग्य तपासणीसाठी जे येतात आणि त्यांनी रजिस्ट्रेशन फीस वसुली किती होते. दैनंदिन प्रत्येक केंद्रावरची यांची माहिती दयावी.

**मा. सभापती :** आरोग्य वै. अ. यांनी पुढील बैठकीत सविस्तर माहिती दयावी.

**श्री. भगवान घडामोडे :** बिफ व्हन जी खरेदी केलेली आहे. त्याची वॉर्डात आपण बदल केलेला आहे काय?

**मा. सभापती :** अति. शहर अभियंता यांनी माहिती दयावी.

**मा. सभापती :** पशुधन अधिकारी / मेकॅनिक विभाग यांनी माहिती दयावी.

**श्री. भगवान घडामोडे :** जर त्या गाडीचे बॉडी बदलायची होती तर चेसीस खरेदी करुन आज का खरेदी केलेली नाही.

**मा. सभापती :** अति. शहर अभियंता यांनी माहिती दयावी.

**अ. श. अभियंता :** याबाबत मला कल्पना नाही.

**मा. सभापती :** सभागृहात स. स. चे मेकॅनिक विभागाबाबत विचारणा करीत आहेत. त्या बाबतचे सर्व मुद्दे मा. आयुक्त यांना अवलोकन करुन कार्यवाही करावी.

**श्री. भगवान घडामोडे :** जी. सी. बी. मशीन खरेदी करुन किती दिवस झाले त्याची किंमत काय? त्याचा सध्या उपयोग होतो काय?

**लेखाधिकारी-१ :** रु. १७.०० लाखात घेण्यात आली आहे.

**मा. सभापती :** जी. सी. बी. मशिनच्या ट्रेचिंग ग्रांऊडवर सध्या उपयोग होत आहे. ही मशिन खरेदी करण्यामागे शहरातील कामातील माती उचलल्या मागे या मशिनचा उपयोग करण्याकरीताच ही मशिन खरेदी केलेली आहे. जेणे करुन इतर कॉन्ट्रॅक्टदाराचा आपण माती उचलण्याचे पैसे देतो ते वाचविण्यासाठी या मशिनचा उपयोग होतो.

**श्री. महादेव सुर्यवंशी :** केवळ ट्रेचिंग ग्राउंडवर माती उचलण्यासाठीच याचा उपयोग न होता इतर कामासाठीही याचा उपयोग होणे आवश्यक आहे.

**श्री. कचरु नवपुते :** मागिल बैठकीत चिकलठाणा येथील व्यायाम शाळेच्या जागे बाबत माहिती देण्याबाबत विचारणा केली होती.

**डॉ. मेहेर :** जकात नाक्यावर जसा काटा बसविलेला आहे त्या बाबतचा पाठपुरवा मी गेल्या दिड वर्षापासुन करीत आहे तेव्हा या काटयाचही उपयोग प्रायव्हेट गाडी वाल्यांना होईल असाही बोर्ड लावावा जेणे करुन मनपास आर्थिक लाभ होईल.

**जकात अधिक्षक :** जकात नाक्यावर काटा बसविण्यात आलेला आहे व त्यापासून उत्पन्न मिळते.

**मा. सभापती :** याबाबत जकात विभागात दैनंदिन किती उत्पन्न या काटया द्वारे मिळते याची माहिती पुढील बैठकीत दयावी.

**श्री. अभिमन्यु भालेराव :** माझी अशी माहिती आहे की, काही गाडयावाले नाक्यावरील कर्मचाऱ्यांना धाक दाखवून गाडया परस्पर घेऊन जातात तेव्हा कर्मचाऱ्यांना संरक्षण दयावे व वायरलेस सुध्दा पुरविण्याची व्यवस्था करावी.

**मा. सभापती** : माझ्या निदर्शनास असे आले की, बिड नाक्यावर लाईटची व्यवस्था नाही त्या ठिकाणी ताबडतोब व्यवस्था व्हावी.

**अ. श. अभियंता :** म. रा. वि. म. कडे तसे कळविण्यात येईल.

**मा. सभापती** : मराविम कडून पाठपुरावा करुन कार्यवाही करावी.

**श्री. कचरु नवपुते :** जालना नाका आहे तेथील गाडया बिड नाक्याकडे कधीकधी नेतात तेव्हा जाता येतांना पाहण्यासाठी जालना नाका याच हद्दीत कॉर्नवर शिफ्ट करावी.

**मा. सभापती** : याबाबत मा. आयुक्त जातीने लक्ष घालून कार्यवाही करावी.

**डॉ. मेहेर** : स. स. श्री. भालेराव यांनी जो प्रश्न उपस्थित केला की, कर्मचाऱ्यांना मारहान होते धाक दाखविणे वगैरे वस्तुस्थिती काय आहे ते सांगावे.

**जकात अधिक्षक :** बरेचशे गाडयावाले रु. ५/- ची पावती फाडतात व नजर चुकवून निघून जातात अशा वेळी पुन्हा गाडीस पकडून दंड म्हणून ५०+५=५५ अशी वसुली केली जाते.

**डॉ. मेहेर** : ट्रॉझिट पावती रु. १०/- वरुन २०/- केले त्याचे काय झाले

**उप आयुक्त-१** : शासनाकडे याबाबतचा पाठपुरवा चालू आहे.

**श्री. अभिमन्यु भालेराव :** जकातच्या ठिकाणी गाडी पावती फाडून न जाता पकडल्यास प्रशासनाचे निदर्शनास आणून दयावे काय

**मा. सभापती** : शासनाकडे जेवढे प्रस्ताव मंजुरीस्तव पाठविलेले आहेत त्याबाबत प्रशासनाने वेळोवेळी पाठपुरवा करावा व जकात बाबत गाडीची पावती फाडल्यानंतर वेळ टाकण्यात येते काय यासह दाखवुन प्रशासनाच्या निदर्शनास ही बाब आणुन दयावी जेणे करुन पुढील कार्यवाही करण्यात येईल.

**डॉ. मेहेर** : औद्योगिक व्यवसाय कडून मागे मागणी केलेली होती की आर फॉर्म बाबत काय सवलत मिळाली.

**उप आयुक्त-१** : आपल्या नियमात तशी तरतुद नाही कोणत्याही मनपात तशी तरतुद नाही.

**डॉ. मेहेर** : काही कारखान्याचे रॉ. मटेरियल इतर ठिकाणी प्रोसेसिंगसाठी पाठवत होते व परत येत होते त्यामुळे आपण त्यासाठी नाममात्र जकात आकारणी करावी अशी माझी मागणी आहे कारण त्यामुळे बरेचसे कारखानदार कारखाने बंद करीत असून, कामगारही बेकार होत आहेत.

**उप आयुक्त-१** : याबाबत योग्य ती माहिती घेऊन कार्यवाही करण्यात येईल.

**मा. सभापती** : उप आयुक्त-१ यांनी मुंबई मनपाशी संपर्क साधून ह्या ठिकाणी काय पध्दत आहे. त्याची माहिती घेऊन त्यावर अभ्यास करुन सर्वसाधारण सभेसमोर प्रस्ताव ठेवावा.

**श्री. कवंरसिंग बैनाडे :** कमल बाई अशोक काळे हा चतुर्थ श्रेणी दै. वे. वरील कर्मचारी असून, तिचे प्रतिक्षा यादीत नांव ८१ वर आहे व त्याचप्रमाणे दुसरी महिला आहे त्याचेही नाव एकच असून, त्यांचेही नाव प्रतिक्षा यादीत १७१ नंबर वर आहे. परंतु ८१ नंबरच्या महिलेस वगळून दुसऱ्या महिलेस कामावर दै. वै. घेतले जाते.

**मा. सभापती** : उप आयुक्त-२ यांनी माहिती दयावी.

**उप आयुक्त-२** : दै. वे. वर काम करण्याऱ्या चतुर्थ श्रेणी कर्मचारी यांच्या प्रतिक्षा यादीत दोन्हीही नावे असून, दोघांचेही नांव एकच आहे. परंतु प्रतिक्षा यादी वेगवेगळया आहेत त्यामुळे आस्था-२ यांनी दोघानांही बोलावुन दोघांचेही पत्रे व अंगठे घेतलेले आहेत व सध्या ८१ नंबरची स्त्री रा. आंबेडकरनगर या दै. वे. कामावर असून, दुसरी स्त्री रा. जयभिम नगर (घाटी) या सध्या कामावर नाहीत.

**श्री. भगवान घडामोडे :** अस्था-२ या विभागात बराच घोळ आहे. ज्यावेळी या ८१ नं. च्या बाईला घेतले नव्हते व त्यांनी कोर्टात जाण्यासाठी हालचाल सुरु केली. त्यावेळी उप आयुक्त-२ कडून एका दिवसात संचिका अस्था-२ कडे गेली.

**मा. सभापती** : या दोन्हीही महिलांचे नांव एकच आहे तर मला माहिी अशी मिळाली की त्यापैकी एकजण तुमची नातेवाईक आह ते कोण आहे.

**उप आयुक्त-२** : या दोन्ही पैकी एकही माझी नातेवाईक नाही सदरील यादी बनवितांना माझ्‍ या पुर्वीच बनविलेली आहे व त्यास मा. उचच न्यायालयाने मान्यता दिलेली आहे. त्यानुसार अस्था-२ विभाग कार्यवाही करते.

**श्री. गौतम खरात :** दोन्हीही बाबतीत पतीचे नांव अशोक काळे असल्याने संबंधितांची टीसी प्रमाणपत्राची झेरॉक्स प्रत मागवुन पडताळणी करुन शहानिशा करावी.

**मा. सभापती** : याबाबत असे दर्शविण्यात येते की, मा. आयुकत यांनी स्वतः लक्ष घालून प्रकरणी कार्यवाही करावी.

**श्री. कंवरसिंग बैनाडे :** संबंधितांच्या पतीचे नांव अशी आहे परंतु त्याचे टोपन नांव गौतम आहे.

**श्री. कचरु नवपुते :** मागिल इतिवृत्तात नंदु केरुबा वाघुळे यास अनुकंपा धर्तीवर नौकरीवर घेणेबाबत चर्चा झालेली आहे. त्यानुसार काही कार्यवाही झाली आहे का?

**मा. सभापती** : उप आयुक्त-२ यांनी माहिती दयावी सदर व्यक्तीच्या नौकरी बाबत संबंधित मृत व्यक्ती कोण होते. याची माहिती दयावी.

**उप आयुक्त-२ :** संबंधित व्यक्तीस लावता येत नाही असे कळविण्यात आले आहे.

**श्री. कचरु नवपुते :** या संदर्भात न्यायालयाने श्री. संजय सरवाहरी साळवेयास जस अनुकंपा धर्तीवर नौकरी लावण्याबाबत निर्णय लागलेला आहे. त्याच आधारे श्री. नंदु केरुबा वाघुळे याला अनुकंपा धर्तीवर नौकरीवर घेण्याबाबत विचार व्हावा.

**मा. सभापती** : स्वतः मा. आयुक्त यांनी तपासणी करुन योग्य ती कार्यवाही करावी.

**श्री. अब्दुल रशिद खान (मामू) :** मनपाच्या वाहनांना हलक्या प्रकारचा रंग अशी बातमी एका दैनिकात प्रसिध्दीस आली आहे. याबाबत माहिती दयावी.

**मा. सभापती** : संबंधित अधिकाऱ्यांनी खुलासा करावा. तोपर्यंत वृत्तपत्रात आलेली बातमी वाचावी आणि नंतर खुलासा व्हावा. तोपर्यंत गार्डनच्या बाबतीत चर्चा करावी.

**श्री. अब्दुल रशिद खान (मामू) :** औरंगाबादच्या सिध्दार्थ उद्यानाची वेळ संध्या ४.०० ते ८.०० ही वेळ आहे. ती वाढवून रात्री १०.०० पर्यंत वाढविण्यात यावी.

**मा. सभापती** : शहर अभियंता यांनी खुलासा करावा.

**शहर अभियंता :** वेळ वाढविण्यापुर्वी प्रशासनास कर्मचाऱ्यांच्या काम करण्याचा प्रश्न तयार होतो ते तपासणी करुनच पुढील कार्यवाही करता येईल. (या वेळी स. स. मध्ये आपआपसात बोलने चालु असते काहीही ऐकू येत नाही)

**मा. सभापती** : जास्तीचा वेळ वाढविल्यास अनुचीत प्रकार झाल्यास मनपाची बदनामी होऊ नये याची खबरदारी घ्यावी.

**श्री. अब्दुल रशिद खान (मामू) :** गार्डन बंद होण्यापुर्वी ००.१५ मिनिटे अगोदर सिटी वाजवावी.

**श्री. रजनी जोशी :** मजनु हिल (हडको) येथील स्वामी विवेकानंद गार्डनची सुध्दा वेळ सिध्दार्थ गार्डनच्या वेळे प्रमाणे करावे.

**मा. सभापती** : ठिक आहे. नुतन वर्षापासून (दि. ०१-०१-१९९७) दु. ४ ते ९.३० पर्यंत सिध्दार्थ उद्यान व स्वामी विवेकानंद उद्यान चालु ठेवण्याची कार्यवाही करावी. आता गाडयांना रंग देणे विषयक बातमी बाबत खुलासा करावा.

**सहा. यांत्रिकी** : पुढील बैठकीत माहिती देण्यात येईल.

**डॉ. मेहेर** : मेरायोचे फॉर्म जे कर्जदारांनी भरुन दिलेले आहेत ते फॉर्म संबंधित ताबडतोब पाठवित जावे जेणे करुन कर्जदारांना लवकर कर्ज उपलब्ध होईल.

**मा. सभापती** : प्रकल्प संचालक यांनी माहिती दयावी.

**प्रकल्प संचालक :** ४७ बँक निहाय जवळपास २००० कर्जे प्रकरणे पाठविण्यात बाबत सार्टीक करण्याची कार्यवाही झली असून, संबंधित बँककडे प्रकरणे पाठविण्यात येतील. आपल्याकडे र.रु. ५.०० लाख शिल्लक आहेत.

**डॉ. विजयकुमार मेहेर :** मार्च महिन्यापर्यंत १६० कर्जदारांना याचा लाभ होईल. त्यानुसार कार्यवाही व्हावी.

**मा. सभापती** : रु. ५.०० लाख विविध बँकामधून शिल्लक आहे. तेव्हा तेवढयापुरते पैशापुरते प्रकरणे बँकांकडे पाठविण्यात यावी.

**कंवरसिंग बैनाडे :** शहरातील रस्त्यावर काही गाळलेले झाडे तोडणे बाबत दिनांक १८-०३-९६ ला अर्ज दिलेला होता तथापी कार्यवही झालेली नाही.

**मा. सभापती** : रस्त्यावर बाधीत होणारे वाळलेले झाडे किंवा जुने झाडे तोडण्याबाबत अर्ज वगैरे दिलेले असल्यास प्रशासनाने कार्यवाही करावी किंवा याबाबत वन विभागाकडून " ना हरकत प्रमाणपत्र " मिळवावे.

**श्री. कवरसिंग बैनाडे :** श्री. प्रभाकर मोरे या नावाच्या उस्मानपुरा येथील व्यक्तीने सन १९८८ पासून नळ कनेक्शन बंद करणेसाठी अर्ज दिलेला असूनही नळ कनेक्शन बंद केलेले नसून दरवर्षी बिल मात्र येते व सध्या त्यांचे नावे रु. २४४४.०० इतके बिल झालेले आहे. व ते बिल संबंधितांच्या भावाने भरलेले आहे. याबाबत कार्यवाही व्हावी.

**मा. सभापती** : उप अभियंता-१ पाणी पुरवठा यांनी या बाबत पाहणी करुन आवश्यक ती कार्यवाही करावी.

**श्री. विकास जैन :** आपण माहे सप्टे ९६ मध्ये असा प्रस्ताव पारित केलेला आहे की, मनपातील मालमत्ता अधिकारी सहा. आयुक्त व विभागीय अधिकारी तसेच अन्य अधिकारी यांना वर्ग-१ च्या श्रेणीची वेतनश्रेणी द्यावी याबाबत काय झाले?

**उप आयुक्त-१** : वर्ग-२ चे एकंदर १३ अधिकारी आहे त्यांना सध्या रु. २०००-३५०० ही वेतनश्रेणी मिळते परंतू तहसिलदार यांना जशी वेतनश्रेणी लागू झाली. तशी आता रु. २२००-३७०० अशी वेतनश्रेणी आम्हास लागू करावी अशी मागणी आहे. याबाबतची कार्यवाही चलू असून, मा. आयुक्तांकडून तपासणीसाठी संचिका मुख्य लेखा परिक्षक यांचेकडे आहे.

**मा. सभापती** : सदरची मागणी आर आर वा धरुन आहे का? याचा खुलासा मुख्य लेखा परीक्षक यांनी करावा.

**मुख्य लेखा परीक्षक :** अधिक काम वाढले असले तर, याबाबत परवानगी घेऊन कार्यवाही करावी. परंतु आर. आर. प्रमाणे योग्य नसून तहसिलदार प्रमाणे वेतनश्रेणी देता येणार नाही.

**श्री. गौतम खरात :** आपल्याकडे झोन अधिकाऱ्याचे बदल्या सहा-आयुक्त तर इतर ठिकाणीही होतात. म्हणजे नेमके अधिकारी कोणकोणती याची पडताळणी कशी करणार.

**डॉ. मेहेर** : आपण तहसिलदारांशी तुलना करु नये. त्यांची वेगळी कामे आहेत. आपल्या कामाची पध्दती वेगळया आहेत. जर एखादया मिल मजुरास जास्तीचा पगार मिळत आहेत. तर त्याप्रमाणे आपण करावे असे काही आहे काय? त्यापेक्षा वैयक्तिक अर्ज संबंधित अधिकाऱ्यांनी द्यावे व त्याप्रमाणे मागणी करावी. नियमाप्रमणे देता येते किंवा नही ते पाहूनच योग्य ती कार्यवाही करता येईल.

**श्री. अब्दुल रशिद खान (मामू) :** कोणताही नियम होत असतो. त्याबाबत लेखा विभागाने शहानिशा करुनच कार्यवाही करावी.

**मा. सभापती** : सध्या लेखा विभागाकडे आर्थिक बाबतीत तरतुद असते. त्याचा अभिप्राय दयावा.

**लेखाधिकारी-१ :** एकूण १६ अधिकाऱ्यांचा याबाबतच्या मागण्या आहेत. त्यामध्ये प्रामुख्याने ७ झोन अधिकारी दोन मालमत्ता व प्रशासकीय अधिकारी प्रत्येकी एक लेखाधिकारी-१ जकात अधिक्षक, पशुधन अधिकारी व सहा. आयुक्त वगैरे या सर्वाची रु. २२००-३७०० अशी वेतनश्रेणी इतर ३ अधिकाऱ्यांना जशी दिलेली आहे. त्याच धर्तीवर देण्यात यावी. त्यामुळे प्रशासनावर रु. ३७/- हजाराचा आर्थिक बोजा वार्षीक पडणार आहे तर तांत्रिक अधिकाऱ्यांच्या बाबतीत रु. ३.०० लाखाचा बोजा मनपावर येणार आहे

**पशुधन विकास अधिकारी :** पूर्वी सहा आयुक्त म्हणून प्रतिनियुक्तीने शासनाकडून पद भरल्या जात होते. आता मनपा स्वतःच पाहते. त्यामुळे देण्यास हरकत नाही.

**डॉ. मेहेर** : तहसीलदारांना शासन देते म्हणून आपण दयावे असे न करता वैयक्तीक अर्ज देऊन विचार करणे योग्य आणि प्रशासनावर वार्षीक बोजा अतांत्रिक अधिकाऱ्यांसाठी रु. ३७/- हजार व तांत्रिकासाठी रु. ३.०० लाख येणार आहे काय?

**लेखाधिकारी-१ :** यामध्ये बऱ्याचशा अधिकाऱ्यांची वेतनश्रेणी रु. २०००/- च्यापुढे गेलेली आहे. त्यामुळे पगारात काहीही फरक पडणार नसून एखादे वार्षीक वेतनवाढ यामुळे संबंधितांना मिळेल. तांत्रिक व अतांत्रिक संचिका या वेगवेगळया आहेत.

**अति. शहर अभि. :** अतांत्रिक अधिकाऱ्यांना रु. २२००-३७०० अशी वेतन श्रेणी दयावयास हरकत नाही. यापुर्वी शासनाकडून प्रतिनियुक्तीने सहा. आयुक्त म्हणून अधिकारी काम पाहत असे त्याप्रमाणे काम मनपाचेच अधिकारी करीत आहेत.

**श्री. अब्दुल रशिद खान (मामू) :** तांत्रिक व अतांत्रिक अधिकारी यांच्या वेतनश्रेणी बाबतच्या संचिका दोन्हीही एकत्र ठेवावे.

**मा. सभापती** : प्रशासनाने तांत्रिक व अतांत्रिक अधिकाऱ्यांच्या रु. २२००-३७०० श्रेणीवाढ करण्याची संचिका एकत्रित करुन पुढील बैठकीपर्यंत स्थायी समितीसमोर विचारार्थ ठेवावे.

**श्री. अब्दुल रशिद खान (मामू) :** शहराच्या विकास कामाबाबत बैठक अद्यापही झालेली नाही. त्यामुळे बरेचसे कामे होत नसून खोळंबलिले आहेत. जर बैठक बोलावून काही ठरल्यास नंतर सर्वसाधारण सभा त्यानंतर धोरण ठरल्यास शासनाकडे पाठविल्या जाईल व शासनाकडून कधी मंजूर होऊन याची कल्पनाच केलेली बरी त्यामुळे शहराचा झालेला करोडे रु. चा खर्च विनाकारण वाया जाण्याची शक्यता आहे. यासाठी ताबडतोब बैठक बोलवावी.

**मा. सभापती** : याप्रकरणी मा. खासदार यांना लोकांचे आक्षेप घेऊन सुनावणी घेतली होती. त्यानंतर लगेच आचार संहिता सुरु झाल्यामुळे त्याची कार्यवाही पुढे झालेली नाही. त्यानंतर आपण सर्वसाधारण सभेपुढे प्रस्ताव ठेवून आपले तीन सभासद या शहर नगर विकास समितीमध्ये पाठविलेले आहेत. आणि त्याची एक बैठक घेतलेली होती नंतर एक कार्यक्रमसुध्दा तयार केलेला होता. त्याकार्यक्रमाप्रमाणे चार दिवसात पूर्णपणे करणार होतो. परंतु दिवाळी जवळ आलेली होती आणि बऱ्याचशा स. स. नी अशी विनंती केलेली होती की, कृपया आता बैठक बोलावू नये नंतर आपण बैठक बोलवावी. व नंतरच पुर्णपणे विचार करावा. यासाठी विलंब लागला. येत्या २१ डिसे. ९६ ला प्लॅनिंग कमीटीची बैठक होणार आहे या प्रिमिंटीमध्ये पुढच्या कामाच्या बाबतीत कार्यक्रम ठरणार आहे. कारण एकदा बसल्यानंतर संपूर्ण प्लॅन तयार करुन स्थायी समिती समोर ठेवून सर्वसाधारण सभेकडे शिफारस करण्यात येणार आहे.

**श्री. अब्दुल रशिद खान (मामू), श्री. हमीद ताबा :** आम्ही आपल्याकडे स्वतः येऊन विचारणा करीत होतो. परंतु अक्षप कार्यवाही झालेली नाही.

**मा. सभापती** : दि. १३ जानेवारी ९८ ला श्री. करकरे साहेब यांनी वेळ दिलेला आहे. त्यानंतर फायनल होणार आहे.

**श्री. अब्दुल रशिद खान (मामू) :** ऑडीट व जकात रिपोर्ट स्थायी समिती समोर येत नाही.

**डॉ. विजयकुमार मेहेर :** स्थायी समिती समोर जकात बाबतच्या अहवाल प्रत्येक दिवसाचा यावा. परंतु अहवाल मिळत नाही.

**मा. सभापती** : ऑडीट रिपोर्ट आलेला आहे व मी सचिव यांना रिपोर्ट स्थायी समिती समोर ठेवण्यास सुचना दिलेल्या आहेत. जकातीचा अहवाल प्रत्येक स्थायी समोर ठेवण्यात यावा.

**श्री. हमीद उद्यीन ताबा** : जकात कमी जास्त येतो. याबाबत एखादी समिती नेमणे बाबत काय झाले?

**उप आयुक्त-१** : सर्व तपासणी करुन लेखाधिकारी १ व २ अहवाल देणार आहे.

**मा. सभापती** : पुढील बैठकीत माहिती देण्यात येईल.

**श्री. हमीदउद्यीन ताबा :** करंट अकांऊंट बाबत काय झाले?

**मा. सभापती** : पुढील बैठकीत याबाबतची माहिती किती लोकांना आपण करंट अकाऊंट दिले याची माहिती दयावी.

**श्री. अब्दुल रशिद खान (मामू) :** मागिल ६ महिन्याच्या अकांऊट बाबत रेनेवल करावे असे असते परंतु त्याबाबत प्रशासन कार्यवाही करीत नाही.

**मा. सभापती** : उप आयुक्त-१ यांनी स्वतः लक्ष घालुन कार्यवाही करावी.

**श्री. हमीद उद्दीन ताबा :** आर-आर बाबत आपण बैठक होणार होतो. त्याबाबत काय झाले.

**मा. सभापती** : सर्वसाधारण सभेत तसे ठरलेले आहे.

**श्री. हमीद उद्दीन ताबा :** सादिया टॉकीज जवळील शॉपिंग सेंटर बाबत काय झाले.

**शहर अभियंता** : मार्च-९७ पुर्वी काम पूर्ण होईल.

**श्री. हमीद उद्दीन ताबा, श्री. गौतम खरात :** जकात विभागातील काही कर्मचाऱ्यांना पब्लीक हॉलिडेचा पगार सन १९९३ पासून मिळवायचा होता परंतु तसे न होता १९९४ चामिळला व १९९३ चा मिळाला नाही.

**लेखाधिकारी-२ :** सन १९९३ च्या पब्लीक हॉलिडेच्या हजेऱ्या तपासून पाठवावे. परंतु त्या अद्यापही आलेल्या नाहीत.

**मा. सभापती** : सन १९९३ ला जे जकात अधिक्षक होते त्यांनी तपासणी करुन पाठवावे.

**श्री. भगवान घडामोडे :** श्री. मिठू चव्हाण नावांच्या शिपाई यास लिपीक म्हणून घेणे बाबत अर्ज दिलेला आहे. परंतु कार्यवाही झालेली नाही. त्यंनी निवारण समिती कडेही अर्ज दिलेला आहे. त्यावर काय कार्यवाही झाली.

**मा. सभापती** : संबंधित अधिकाऱ्यांनी खुलासा करावा.

**उप आयुक्त-२** : श्री. मिठू चव्हाण हा कर्मचारी अगोदर लिपिक म्हणून दैनिक वेतनावर कार्यरत होता. नंतर तो वर्ग-४ चतुर्थश्रेणीत कायम स्वरुपी नौकरीत समावून घेतल्या गेला. परंतु त्यांनी तक्रार केल्यानुसार तक्रार निवारण समितीने शिफारस केलेली आहे. त्याप्रमाणे विचार करावा.

**मा. सभापती** : सविस्तर तपासणी करुन माहिती दयावी.

**श्री. भगवान घडामोडे :** चिकलठाणा आठवडी बाजार कुणाच्या मालकीची आहे.

**श्री. कचरु नवपुते :** सदरील जागा महापालिका व औकाफ बोर्ड या दोघांच्या भांडणात असून, पूर्वी ग्रामपंचायतीच्या हद्दीत होतो. आता महापालिकेच्या डिसपुप्ट मध्ये आहे.

**मालमत्ता अधिकारी :** आपल्या मालकीची जागा आहे.

**श्री. भगवान घडामोडे :** सदरची जागा जर आपल्या मालकीची आहे. असे विमा प्राधिकरण विभाग काम बंद का करते?

**शहर अभियंता :** सदरची जागा आमच्या मालकीची आहे असे विमान प्राधिकरण समितीने म्हटले आहे.

**मा. सभापती** : सदरील जागा महापालिकेच्या ताब्यात असल्यास ताब्यात घेऊन तार फेंसीग करुन घ्यावी. सध्या आपल्याकडे जागेचा सर्व्हे केलेला रिपोर्ट आलेला आहे. रिपोर्टवर चर्चा करतांना सविस्तर बोलू.

**श्री. महादेव सुर्यवंशी :** आपल्याकडील चतुर्थश्रेणी कर्मचाऱ्यांबाबत काही कर्मचारी बिमार पडतात व नंतर डॉक्टरचे प्रमाणपत्र सादर करतात तेव्हा कोणत्या आजाराचे प्रमाणपत्र आजारानंतर सादर करावे किंवा कसे याबाबतचे नियम काय आहेत कृपया सांगावे.

**आरोग्य वैद्यकीय अधिकारी :**एमसीएसआर प्रमाणे रुग्ण आजारी पडल्यानंतर डॉक्टर प्रमाणपत्र देतो. परंतु रुग्णाच्या नातेवाईकांनी तात्काळ एका आठवडयाच्या आत कार्यालयात सादर करणे आवश्यक असते. गेल्या वर्षीचा रुग्ण या वर्षी प्रमाणपत्र देवून सादर करतो हे योग्य वाटत नाही.

**श्री. महादेव सुर्यवंशी :** एखादा कर्मचारी आजारी असता तर सुट्टी होतो व नंतर तो रुजू होण्यासाठी अर्ज देतो. परंतु त्याची रजा शिल्लक नसते. रजा कमी पडत

असतांनी त्यास रुजू करुन घेण्यात येते. परंतु त्याची रजा मंजुर २-३ वर्षे होत नाही. त्याचे कारण काय? आणि आज जर सरकारी दवाखान्यात पाठविल्यास त्यास प्रमाणपत्र काय म्हणून देणार?

**आरोग्य वैद्यकीय अधिकारी :** आम्हाला जे प्रमाणपत्र बोगस वाटते. साधारण फ्ल्यु या आजारासाठी जर एक महिन्याची रजा घेतली तर आम्हास शंका येईल. की, खरच सदरील कर्मचारी एक महिला मलेरीयाने होता का याचे ट्रिटमेंट कोण करणार शेवटी मंडळास जर ट्रिटमेंट बाबत पटल तर ते लिहितात. (ही इज किट टु जॉईन, बट बई आर नॉट ट्रिटमेंट विथ यु)

**डॉ. विजयकुमार मेहेर :** मेडिकल रजेचा पगार कर्मचाऱ्यास वेगळा देण्यास येतो काय? किंवा नाही कर्मचारी आपल्याकडे न करता प्रायव्हेट उपचारार्थ होतात काय?

**आरोग्य वैद्यकीय अ. :** मेडिकल रजेचा पगार वेगळा देण्यात येत नाही. फ्ल्युसाठी आजारी रजा एक महिना योग्य वाटत नाही. बरेचसे कर्मचारी अगोदर प्रायव्हेट इलाज करतात व नंतर प्रमाणपत्र लिहुन आणतात. त्यासाठी बोर्डाकडे पाठवून प्रकरण कोणत्या इलाज बाबत किती कालावधी लागेल. यासाठी पाठविण्यात येतो व तसे बोर्ड लिहून देतो.

**श्री. महादेव सुर्यवंशी :** एखादया कर्मचाऱ्यांचे नाही तर अनेक चतुर्थ श्रेणी कर्मचाऱ्यांचे बाबतीत प्रकरणे गेल्या ३-४ वर्षा पासून पेडींग असून, अशी प्रकणे तात्काळ हाताळावीत.

**मा. सभापती** : याबाबत सविस्तर माहिती पुढील बैठकीत दयावी.

**श्री. अभिमन्यु भालेराव :** ब्रिजवाडीत भागात ड्रेनेज लाईन आहे. ती ओपन जागेतून वाहते. त्यामुळे लोकांना दुर्गंधी होत आहे. याबाबत पाहणी करुन कार्यवाही करावी.

**मा. सभापती** : संबंधित अधिकाऱ्यांनी ताबडतोब कार्यवाही करावी.

**श्री. अभिमन्यु भालेराव :** स्मशान भूमीत गाजर गवत वाढलेले आहे, ते त्वरीत काढावे.

**शहर अभियंता :** स्मशान भूमीत रोड पासून गाजर गवत काढण्यात कार्यवाही चालू आहे.

**मा. सभापती** : गाजर गवतासाठी ५० दैनिक वेतना मंजुरांची नियुक्ती केलेली आहे. त्यांचेकडून त्वरीत कार्यवाही करावी.

**श्री. अब्दुल रशिद खान (मामू) :** जकात मागील वर्षापेक्षा आता ११ तारखेपासून अत्यंत कमी दिसत आहे. याची माहिती दयावी.

**मा. सभापती** : ११ तारखे पासून जकात कमी होत आहे. तेव्हा उप आयुक्त-१ यांनी योग्य ती कार्यवाही करावी.

**विषय क्र. ५९६/९ :**

दि. १८-१२-९६ रोजी संपन्न झालेल्या स्थायी समिती सभेचे इतिवृत्त कायम करणे

**संवाद :**

**श्री. अब्दुल रशिद खान (मामू) :** इतिवृत्तातीत पान क्र. ३ मध्ये शहानुरवाडी येथील ड्रेनेज लाईन बाबत माहिती दयावी.

**मा. सभापती** : संबंधित अधिकाऱ्यांनी माहिती दयावी.

**कार्यकारी अभियंता :** याबाबत मा. सभापती यांचे सेबत पाहणी केलेली आहे व पूर्ण कल्पना मा. सभापती यांना आलेली असेल.

**मा. सभापती** : याठिकाणी तीन लाईन आहेत ते बरोबर आहे एक ६" दुसरी १२" व तिसरी आता काही गल्या टाकुन खालच्या बाजूला जात नाही. ते चोकअप होऊ लागलेले आहे ६" लाईन त्याठिकाणी आहे. ती वारंवार चोकअप होत होती. तीला प्रत्येक वेळेस साफही केल्या जात होते त्यानंतर वरच्या भागात जी ड्रेनेज लाईन टाकल्या गेली दशमेशनगर, ज्योती नगर या भागामध्ये आणि तेही ड्रेनेजचे पाणी या बाजूला आणल्या गेले. तर सुरुवातील ते ६" इंचिला जोडल्या गेला. ज्यावेळेस ती त्या भागातून आणलेली लाईन १२" आहे आणि त्यामुळे ते ओव्हरफ्लोचे प्रकार सुरु झाले. त्यामुळे दशमेशनगर ज्योतीनगर भागासाठी १२" लाईन टाकण्यात आली.

**कार्यकारी अभियंता :** माझे असे म्हणणे आहे की, त्याच वेळेस जसे सन १९९३ ला ड्रेनेज लाईन टाकली ती १२" लाईन आज टाकली ती त्याच वेळेस टाकली असती तर हा खर्च करण्याची गरज पडली नस्ती आणि सरळपणे ही ६" लाईन चालू राहीली असती कारण ६" मध्ये १२" फ्लो कधील वाहणार नाही तो ओव्हर फ्लोच होते. आणि पीटीसी लाईन जी मेन डिस्पोजल होते. प्रतापनगरच्या नाल्याकडे ती लाईन आजही पूर्णपणे बंद आहे. डिस्पोजलच पूर्ण पणे निकामी झाली आहे.

**श्री. हमीद उद्यीन ताबा :** माझे असे म्हणणे आहे अशा प्रकारची ड्रेनेज लाईन टाकण्यासाठी कोण जबाबदार आहे?

**मा. सभापती** : सुरुवातील अंदाजपत्रक जे तयार झाले ते ज्योतीनगर पर्यंत परंतु तसे न होता प्रताप नगर पर्यंत तयार व्हावयास पाहिजे होते. हे झाले शहानुरवाडी पर्यंत

**श्री. हमीद उद्यीन ताबा, श्री. अब्दुल रशिद खान (मामू) :** माजी आयुक्त यांनी जो संचिकेवर रिमार्क लिहिला की संबंधित अधिकाऱ्यांच्या पगारातुन पैसे कपात करावे याचे कारण काय?

**कार्यकारी अभियंता :** सोबत पाहणी झाली संपूर्ण साईटवर मेनहोलची पाहणी केली. त्या वेळेस उप आयुक्त-१ कॅप्टन महाजन व मुख्य लेखापरिक्षक श्री. भोसले साहेब होते. त्यांनी काम पाहिले आहे व अहवालात नमूद केलेले आहे व त्यावेळेस माझेकडे ते काम नव्हते.

**श्री. हमीद उद्यीन ताबा :** त्यावेळेस लोकांनी तक्रार केलेली होती की, या प्रकरणी महापालिकेची आर्थिक नुकसान झालेले असून चौकशी व्हावी. त्यावेळेस संबंधित अधिकाऱ्याने क्लीअर करणे आवश्यक होते. सदरचे काम केले ते त्याच ठिकाणी आहे व पैसे मात्र उचलुन घेतले याबाबत लोक भूखहरताळासाठी बसलेले अहेत की, रु. ५.०० लाखाचे नुकसान झाले. याचा खुलासा व्हावा.

**श्री. अब्दुल रशिद खान (मामू) :** त्यावेळेस ड्रेनेज लाईन टाकतांना ३ गल्ल्या होत्या आणि गल्यांमध्ये खोटे काम करुन संबंधित गुत्तेदाराने पैसे उचलले आहेत.

**मा. सभापती** : याबाबतचा संबंधित अधिकाऱ्यांनी खुलासा करावा.

**कार्यकारी अभियंता :** पाहणी झाली त्यानंतर मा. आयुक्त यांच्या निदर्शनातुन ही बाब नजरेत आली की, ते काम झाले नाही. त्यावेळेस मी त्या कामावर नव्हतो.

**श्री. अब्दुल रशिद खान (मामू) :** आम्ही आपणावर ही जबाबदारी होती असे म्हणत नाही. परंतु त्यावेळी कोणत्या अधिकाऱ्यांनी ते काम केले.

**डॉ. विजय कुमार मेहेर :** त्यावेळी संबंधित नगरसेवकांना ताबडतोब उत्तर का दिले नाही.

**मा. सभापती** : खरोखरच माजी आयुक्तांनी सदरच्या संचिकेत काय रिमाकर्स लिहिलेत ती संचिका पुढील बैठकीत ठेवावी. माझ्या माहिती प्रमाणे माजी आयुक्तांनी असे लिहिले की, सदरचा खर्च संबंधिताच्या पगारातुन का कपात करु नये?

**कार्यकारी अभियंता :** नविन रु. ५.०० लाखाचे अंदाजपत्रक मा. आयुक्तांकडे मंजुरीस्तव गेले. त्यावेळेस प्रश्न उपस्थित केला होता की, ही लाईन आता टाकली आणि काय झाली. त्यावेळेसचा प्रस्ताव आहे तो यामुळेच साहेबांनी लिहिला परंतु त्यानंतर चौकशी झाली. त्यावेळेस तिथे ६" लाईन आहे. त्याला १२" लाईन आणून जोडली त्यामुळे निकामी झाली त्यानंतर तो शक्तीवर व्हावयास पाहिजे होता.

**मा. सभापती, कार्यकारी अभियंता :** सबंधित फाईल स्थायी समितीकडे पाठवावी. प्रत्यक्षात पाहणी करता येईल.

**श्री. अब्दुल रशिद खान (मामू) :** सदरची पाहणी आम्ही केलेली आहे. सदरची लाईन कुठे जात आहे.

**कार्यकारी अभियंता :** सदरची लाईन दर्गातून जात आहे.

**मा. सभापती** : मी एकदार यावर निर्णय दिलेला आहे. आता त्यावर चर्चा नको.

**श्री. हमीद उद्दीन ताबा :** पान क्र. ७ मध्ये जकात मधील पावत्या अँटीकरप्शन कार्यालयाने नेलेल्या होत्या. त्याबाबत काय झाले?

**मा. सभापती** : सबंधित अधिकाऱ्याने खुलासा करावा.

**जकात अधिक्षक :** सन १९९४ ला फाईल चालू होती त्याबाबत पत्रव्यवहार केलेला असून, संबंधित कार्यालयाने पावती पुस्तक तपासणीसाठी नेलेले असून, त्याचे पुढील माहिती प्राप्त होताच कळविण्यात येईल.

**श्री. हमीद उद्यीन ताबा :** अँटी करप्शन कार्यालयाने पावती पुस्तके तपासणीसाठी नेले आणि १९९४ पासून पत्रव्यवहार होऊनही सन १९९६ पर्यंत माहिती प्राप्त होत नही ही अत्यंत महत्वाची केस असून, एका फॅक्टरीच्या बाबतीतील गुन्ह्याची पावती पुस्तके आहेत. त्यामुळे याची गंभिरता काही तरी असावयास पाहिजे. कार्यालयाने गेल्या २-३ वर्षापासून पत्रव्यवहार का केला नाही. यात दोषी कोण आहे. याची माहिती द्यावी.

**मा. सभापती** : उप आयुक्त-१ यांनी स्वतः लक्ष घालून कार्यवाही करावी.

**जकात अधिक्षक :** अँटी करप्शन कार्यालयाशी पत्रव्यवहार केलेला असून, पत्र दिनांक १८-१२-९६ ला पाठविले आहे.

**श्री. हमीद ताबा :** मी गेल्या सभेपासून सारखी विचारणा करीत असूनही मला माहिती मिळत नाही आहे. मा. सभापतींचे त्यामुळे कुणी ऐकत नाही असे दिसते. याचा मी "निषेध व्यक्त करतो"

**मा. सभापती** : पुढील बैठकीत सदरची माहिती उप आयुक्त-१ यांनी दयावी.

**उप आयुक्त-१** : पुढील बैठकीत माहिती देण्यात येईल.

**श्री. महादेव सुर्यवंशी :** पान क्र. ११ मध्ये महापालिकेच्या हद्दीतील जागेचे बाबतीत काय अहवाल मिळाला माहिती दयावी.

**मा. सभापती** : उप आयुक्त-२ यांनी माहिती दयावी.

**उप आयुक्त-२** : शहराच्या हद्दीतील व ग्रामपंचायत मधील चिकलठाणा व हर्सुल येथील मालमत्तांची माहिती घेतलेली आहे.

**मा. सभापती** : सर्व्हे करण्यात फार उशिर होत असून, आणखी कर्मचारी वाढवून काम त्वरेने करण्यास कार्यवाही व्हावी.

**श्री. कचरु नवपुते** : चिकलठाण्यांचे जागांवर काही लोकांनी अतिक्रमण केलेले आहे त्या जागेबाबत आपण काय करणार

**मा. सभापती** : संबंधित अधिकाऱ्यांनी माहिती दयावी की, अतिक्रमण झाले आहे. त्याबाबत विचार करु परंतु आज महापालिकेच्या जागेवर अतिक्रमण होत आहे त्यांचे बाबतीत प्रशासनाची भूमिका काय माहिती दयावी.

**उप आयुक्त-१** : महापालिकेच्या जागेवर जे काही अतिक्रमण होत आहे ते आम्ही पाडणार आहोत शिवाय काही अतिक्रमण महापालिकेच्या राखीव जागांवर व मोकळया जागावर होत असल्यास याबाबत सहा. संचालक नगर रचना यांचेकडून एकूण महापालिकेच्या मालकीच्या जागा बाबत यादी मागविली आहे आणि त्या त्या प्रभागातील विभागीय अधिकारी व इमार निरिक्षकांना आम्ही सुचना दिलेल्या आहेत की, अशा काही तक्रारी असल्यास व बांधकाम आढळल्यास आपणावर निलबंनाची कार्यवाही करण्यात येईल असे सुचित केले.

**मा. सभापती** : सहा संचालक नगर रचना यांनी याबाबत सर्व्हे झाले आहे काय? याची माहिती दयावी.

**सहा. संचालक नगररचना** : मागे तसा सर्व्हे केलेला आहे.

**मा. सभापती** : महापालिकेच्या राखीव जागा व मोकळया जागांच्या बाबतीत माहिती आहे काय?

**श्री. अब्दुल रशिद खान (मामू)** : सर्व्हे न. ५२ बाबत अद्यापही माहिती दिलेली नाही.

**श्री. कचरु नवपुते** : आज सुध्दा महापालिकेच्या अनेक ठिकाणी ओपन स्पेस आहेत. त्याबाबत निर्णय घ्यावा.

**मा. सभापती** : तीन विभागामध्ये सहाकार्याची अपेक्षा आहे. व एकमेकांत गुंता होता कामा नये यासाठी सहा. संचालक नगर रचना, मालमत्ता अधिकारी व प्रशासकीय अधिकारी यांनी मिळून एकत्रित माहिती गोळा करुन कार्यवाही करावी.

**श्री. हमीद उद्यीन ताबा** : अनेक ठिकाणी महापालिकेच्या ओपन स्पेसवर अतिक्रमणे झालेल्या आहेत. त्यावर कार्यवाही करावी व ओपन स्पेसची यादी दयावी.

**मा. सभापती** : महापालिकेच्या ओपन स्पेसवर आजच्या तारखेपासून जर अशा प्रकारे अतिक्रमण होत असल्यास संबंधित विभागीय अधिकारी (झोन अधिकारी) व इमारत निरिक्षक यांनी बारकाईने लक्ष देवून कार्यवाही करावी नसता शासनाच्या नियमाप्रमाणे संबंधितांना निलंबित करावे.

**मा. आयुक्त** : अतिक्रमणाच्या चर्चेत प्रशासनाला पॉलिसी डिसीजन व्हावे अशी विनंती करतो. या अतिक्रमणाच्यासाठी महाराष्ट्र शासनाने क्लीअर डायरेक्शन दिलेले आहेत. त्यावेळी ४० लाख झोपडपट्टी वासीयांना मोफत घरे बांधून द्यावयाची योजना चालू केली तेव्हा अतिक्रमणा विरुध्द सुध्दा कठोर कार्यवाही करण्याचे ठरविले आहे हे आदेश महाराष्ट्र महानगरपालिका/नगरपालिका यांना पाठविले आहेत. पण त्यामध्ये त्यांनी अशी स्पेसीफिक तारीख दिली की, ०१-०१-९५ नंतर झालेली जी अतिक्रमणे आहेत. त्याच्यावर कठोर कार्यवाही करावयाची अशा तऱ्हेचे शासनाने निर्णय घेतलेला आहे. मुंबई पुरता तेव्हा आपल्या महापालिकेमध्ये विशेषत:

औरंगाबाद मध्ये अनेक अनाधिकृत वस्त्या शहरात झालेल्या आहेत. ज्यामुळे लाखो लोक राहतात. त्या सगळयांना आपण काढून टाकणार आहेत काय पुंडलिनगर वगैरे ४३ वस्त्या अशा आहेत की, ज्यामध्ये गेली २०-२५ वर्षे अनाधिकृत वस्त्या प्लॉट काढून राहत आहेत. त्यांना आपण काढणार आहोत काय? तेव्हा याबाबत धोरणात्मक निर्णय स्थायी समितीने किंवा सर्वसाधारण सभेने घेण्याची वेळ आली आहे आज नुसते इमारत निरिक्षकाला निलंबित करा संबंधित पोलीस इन्स्पेक्टरला निलंबित करा असे बोलून चालणार नाही. एक टारगेट तारीख ठरवावी लागेल की, या तारखेच्या पुढे जे काही अतिक्रमणे होतील ती कुठल्याही परिस्थितीत शासन की महानगरपालिका खपवून घेणार नाही. यामध्ये वर्गीकरण असे आहे की, १) रस्त्यामध्ये असलेली बांधकामे, २) आरक्षित जागेत असलेली बांधकामे, ३) विना परवाना केलेली बांधकामे याच्या बाबतीत कठोर कार्यवाही कण्याचे आम्ही ठरवित आहोत. अतिक्रमणाची मोहीम पावसाळयानंतर आम्ही महिना / दिड महिना यशस्वीपणे राबविली. पण ती कुणाच्या बाबतीत राबविले, टपरी धारकांच्या बाबतीत परंतु ज्यांनी बांधकामे केलेली आहेत. ज्यांनी विना परवाना केलेली आहेत. ती तोडण्याची आवश्यकता आहे. आणि त्याच्या करीता सहा. संचालक नगर रचना यांना सुचना दिलेल्या आहेत की, सर्व्हे करुन आमच्याकडे लिस्ट वा आणि प्रशासकीय अधिकारी त्यावर कार्यवाही करतील असे मुंबईला एका अधिकाऱ्याने अतिक्रमणाची कार्यवही केली तशीच कार्यवाही प्रशासकीय अधिकाऱ्याने करावी ही अपेक्षा व्यक्त केलेली आहे. या करीता महानगरपालिकेने काही तरी धोरण ठरवावे. फुकट सगळे काही हजारो घरे आपण बांधलेली आहेत ती जर का आपण तोडली तर लोकांना आपल्याला काही बेघर करता येणार नाही. याबाबत आपण पदाधिकाऱ्यांनी व विपक्ष नेत्यांनी प्रशासनाला डायरेक्शन दयावे की, त्याच्या नंतर झालेल्या अतिक्रमण तुम्ही तोडा व त्यानंतर होता कामा नये. जी बिल्डींग होणार ती बांधकाम परवानगी घेऊनच व्हायला पाहिजे. अशा प्रकारचे पॉलीसी डिसीजन आम्हाला लागेल. त्याच्या बद्दल आपण विचार करावा.

**श्री. अब्दुल रशिद खान (मामू) :** सर्व प्रथम स. सभसदांनी आपआपसात विचार विनिमय करावा की, शहरात आज अनेक प्रकारचे जे अतिक्रमण होत असते त्यावर आळा घाल्ण्यासाठी एकच उपाययोजना करावी व ती सर्वांना मान्य राहील नसता मी स. नगरसेवक म्हणून वेगळा दबाव आणुन माझे काम करुन घेण्यासाठी मी प्रयत्न करेन ते योग्य होणार नाही. महापालिकेमध्ये सर्वांना सारखे वागणूक दयावी. एखादया कर्मचाऱ्यास निलंबित केले तर आपण आठ दिवसांनी डेलीगेशन घेऊन जाऊन भेटतो व संबंधितांना कामावर घ्यावे असे सुचवितो म्हणजे एकाला वेगळी वागणूक व दुसऱ्याला वेगळी वागणूक होता कामा नये. याची खबरदारी घेऊनच धोरणात्मक निर्णय घेणे आवश्यक राहील.

**मा. सभापती** : म्हणूनच मा. आयुक्त म्हणतात की, धोरणात्मक निर्णय घेणेसाठी सर्वांची सुचना करावी असे संबोधतात.

**मा. आयुक्त** : या समस्येला तोंड फुटत असतांना आणखी एक बाब सर्वांच्या लक्षात आणून देवून इच्छितो की, मुंबईचे जे वाटोळे आणि पोलीसाचे प्रश्न निर्माण आले ते वेळेतच कार्यवाही न झाल्याने होत आहे. आता आम्ही ठरविले की,

या झोपडपट्टया जी बांडगुळ जी रस्त्यावर बसत आहेत त्या काढुन टाकायच्याच आम्ही ठरविलं आहे. म्हणून आम्हाला सहाकार्यांची अपेक्षा आहे. विशेषतः आपल्या येथे गायकवाड हॉस्पीटल नर्सरीच्या बाजूला आहे. तिथे एक झोपडी झाली रस्त्यावर आम्ही ते काढुन टाकण्याचे आदेश दिलेले व काढुनही टाकली स. सदस्य श्री. रशिद मामूच्या वॉर्डात सुध्दा मेडीकल हॉस्पीटलच्या रस्त्यावर लोकांनी झोपडया टाकण्याचे सुरुवात केली. आम्ही ते काढुन टाकले. रस्त्यावर झोपडपट्टी वाढु नये. याची काळजी आता आपण घ्यावी. ज्या दलित वस्त्या झाल्या त्या आता ठिक आहे. वर्षानुवर्षे लोक राहील. पुंडलिकनगर मध्ये लोक राहिले ठिक आहे आता आपल्याला वेगळा दृष्टीकोन घ्यावा लागेल परंतु आता पुढे कुठेही अतिक्रमण होणार नाही. यासाठी कठोर उपयायोजना करणे आवश्यक आहे. त्याकरीता आपण पॉलीसी डिसीजन घ्यावा. म्हणजे आम्हाला कार्यवाही करता येईल.

**डॉ. विजय कुमार मेहेर :** शहराचा वाढता व्याप लक्षात घेता शहरात छोटे छोटे प्लॉट पाडुन लोक अनाधिकृत वस्त्या तयार करीत आहेत. त्यासाठी महापालिकेने अशा छोटया प्लॉ धारकांना परवानगी दयावी जेणे करुन अनाधिकृत वस्त्या होणार नाहीत. आपले अधिकारी याबाबत काय करतात कशा प्रकारे आळा बसवितात याची आपल्याला कल्पना आहे. त्याचसाठी शासनाने कठोर भुमिका घेतलेली आहे. त्यांची अंमलबजावणी होणे आवश्यक आहे. परंतु निवारा म्हणून लोक वस्त्या करुन राहतात. त्यासाठी अशा घरांना महापालिकेने परवानगी दयावी व सगळया प्रकारच्या सुविधा उपलबध करुन दयावीत. ज्या ठिकाणी अनाधिकृत घरे बांधण्यात येतात त्याचे रिपोर्ट दैनंदिन संबंधित इन्स्पेक्टरने देवून त्यावर कार्यवाही केली पाहिजे व लोकांनी तक्रार केलेली असल्यास त्या ताबडतोब पाहून महापालिकेने कार्यवाही करावी व शहराच्या विकासास सर्वांनी हातभार लावावा.

**मा. आयुक्त** : शहरात विना परवाना बांधकाम का होतात. स. सदस्य डॉ. विजयकुमार मेहेर यांनी म्हटल्या प्रमाणे लवकर महापालिकेतर्फे परवानगी दिल्या जात नाही. कागदपत्रे सर्व माहिती जातात वेळोवेळी चकरा माराव्या लागतात त्याचप्रमाणे इतर काही कारणे वगैरे परंतु ही विना परवाना बांधकामे रेग्युलराईज्ड करण्याचे आम्ही मध्यंतरी ठरविले होते किंवा जे अनुज्ञेय बांधकामे आहेत परंतु तिला परवानगी नाही ती आम्ही रेग्युलराईज्ड करण्याचे आम्ही आव्हान केल होते. प्रशासकीय कारकिर्दीमध्ये लेआऊट मंजुर करीत असतांना शंभर टक्के डेव्हलपमेंट चार्जेस जागा डेव्हलपमेंट १००% बेटरमेंट चार्जेस वसुल करण्याचा ठराव प्रशासकाने महापालिकेत केलेला आहे आणि तो ठराव अतिशय जावक लोकांना होत आहे आणि जेव्हा लेआऊट आमच्याकडे मंजुरीला येतो. तेव्हा आम्ही त्यांना सांगतो १००% तुम्ही बेटरमेंट चार्जेस भरा, १००% लॅड डेव्हलपमेंट चार्जेस भरा तेव्हा तुम्हाला परवानगी देऊ तोपर्यंत ते लोक परत येतच नाही. तेव्हा आताच मा. खासदारांशी चर्चा झाली की, लेआऊटताही मंजुरी मिळाली पाहिजे व जाचक अटी घालाता कामा नये. ज्यामुळे महापालिकेचे आर्थिक नुकसान होणार नाही. तेव्हा तशा प्रकारचा प्रस्ताव सर्वसाधारण सभेपुढे ठेवणार आहोत किंवा ५०% बेटरमेंट व ५०% लॅड डेव्हलपमेंट चार्जेस ले आऊट वाल्याकडून वसुल करायचे व उर्वरीत ५०% बिल्डींग परमिशनच्या

वेळेला त्या प्लॉट धारकाकडून वसुल करावे अशा प्रकारच्या मॉडिफाईड ठराव महापालिकेने करणे आवश्यक आहे याबाबतीत पदाधिकाऱ्यांनी पॉलीसी डिसीजन घेणे आवश्यक आहे.

**डॉ. मेहेर** : अभिनय टॉकीजच्या बाजूला गेल्या सन १९८८ मध्ये रोड वाईडींग मध्ये एकाची जागा गेली व त्यास मनपाने मोबदला म्हणून पैसेही दिलेत परंत त्या जागेवर ती संबंधिताने वॉल कंपाऊंड न केल्याने पुन्हा ती जागा दुसऱ्याला विकण्यात आलेली आहे व त्यावर दुकाने काढण्यात आली मग अशी अतिक्रमणे रातोरात झाली तर आपण ताबडतोब कार्यवाही करणार काय? आपला असा काही नियम आहे म्हणतात की, सहा फुटाचे वर बांधकाम नसल्यास ते काढता येत नाही.

**मा. सभापती** : याबाबत संबंधित अधिकाऱ्यांनी जातीने चौकशी करुन कार्यवाही व्हावी शिवाय मा. आयुक्त यांना सांगितल्या प्रमाणे ५० टक्के बेटरमेंट व ५० टक्के लॅड डेव्हलपमेंट चार्जेस भरुन ले आऊट मंजुरी व उर्वरीत बांधकाम परवानगीच्या वेळेस घेऊनच परवानगी द्यावी हे धोरण योग्य राहील परंतु याबाबत सर्व तपासणी करुन प्रशासनाची कार्यवाही करावी.

**श्री. अब्दुल रशिद खान (मामू), श्री. हमीद ताबा :** तुलसी अपार्टमेंट व सुराणा कॉम्प्लेक्स वगैरे ठिकणी मनपाने बांधकाम परवानगी दिली नंतर संबंधित संचिका गायब झाली.

**मा. सभापती** : गादिया विहारमध्ये अशाच प्रकारचे झालेले आहे व नंतर मात्र मनपाला डोकेदु:खी होऊन बसते. जेव्हा अशा प्रकारे परवानगीस्तव संचिका येतात. तेव्हा सर्व प्रकारचे संबंधित विभागाने सर्वच कागदपत्रे पाहूनच कार्यवाही करावी.

**श्री. गौतम खरात :** परिस्थितीनुसार स्लम भागात २० x ३० चे प्लॉट पाडून लोकांनी अनाधिकृत घरे बांधलेली आहेत. मनपाचे जाचक अटी लादल्याने लोक विनापरवानगी घरे बांधून राहतात. यासाठी २० x ३० प्लॉट धारकांना परवानगी दयावी.

**मा. सभापती** : मनपा सर्वसाधारण सभेत अशासकीय प्रस्ताव अशा प्रकारचा मंजुर झालेला आहे.

**श्री. अब्दुल रशिद खान (मामू) :** कोणत्या व किती स्वे. फुट प्लॉट धारकास बांधकाम परवानगी मनपा देते याची माहिती दयाची शताब्दीनगर येथील १० x ३० च्या प्लॉटला आपण परवानगी कशी दिली तसेच गारखेडा येथील मिलच्या जागेवर मनपाचे अशा प्रकारे परवानगी दिलेली आहे. शिवाय मनपाची जन्ममृत्यूची खिडीकी आहे. तिचे बांधकाम परवानगी कशी दिली.

**श्री. गौतम खरात :** आपल्या मनपाची नविन इमरतीची बांधकाम परवानगी आहे काय?

**प्रशासकीय अधिकारी** : अभिनय टॉकीजजवळील जागा श्री. बागडीया यांच्या मालकीची असून त्यांचेकडे पी. आर. कार्ड आहे आणि कोर्ट प्रकरणी आहे त्यामुळे बांधकाम पाडणे शक्य नाही.

**डॉ. मेहेर** : सदरची जागा किती आहे याची पाहणी केली आहे काय ही जागा संबंधिताने रु. ४.०० लाखात विकली असून, ताबडतोब तीन दिवसात ३ दुकाने काढलेली आहेत व आपण गप्प बसलेली आहेत. मनपा मनाई करेल त्यामुळे रितसर कागदपत्रे व कोर्टाची मनाई देखील आणलेली आहे. तेव्हा मनपास माहिती मिळताच त्याठिकाणी सुरक्षा गार्ड ठेवून कार्यवाही का नाही.

**मा. आयुक्त** : रस्ता सोडून द्यावयास संबंधितांना सांगणे.

**श्री. गौतम खरात** : अशा वेळी संबंधितांना नोटीस जारी करुन कॅव्हेट जारी करावयास पाहिजे होते. तरी ते केलेले नसून मनपाचे विधी सल्लागार याकडे डोळेझाक करतात हे योग्य वाटत नाही.

**श्री. कचरु नवपुते** : यासाठी मनपातील वकील पॅनेलमध्ये बदल करण्यासाठी वारंवार चर्चा होते. परंतु त्यावर काहीही कार्यवाही झाली नाही.

**उप आयुक्त-१** : सध्या विधी सल्लागार सुट्टीवर आहेत.

**श्री. भगवान घडामोडे** : गेल्या ६ महिन्यापासून विचारणा करीत आहे की, झोनचे कक्षातील एकूण मनपाचे दवाखाने/शाळा/मंदिर/मस्जिद व खेळाचे मैदान मनपाचे राखीव जागा आदिचा आखीव नकाशे झोन निहाय दाखवावे परंतु तसे केल्या जात नाही.

**श्री. अब्दुल रशिद खान (मामू)** : २७ अधिकारी सिटी सर्व्हेतील मागे निलंबित झालेले होते. त्या अधिकाऱ्यांनी शहरातील कोणाच्या ही मालकीची जाग असो ती रेकॉर्ड न पाहता दुसऱ्यांच्या नावावर पी. आर. कार्ड तयार करुन देत होते. त्यातील अभिनय टॉकीज जवळील जागेची कसे असेल असे वाटते.

**डॉ. मेहेर** : त्याठिकाणी एखादा सुरक्षा गार्ड सुरक्षितेसाठी ठेवावयास पाहिजे होता. पी. आर. कार्ड जे आहे. ते पूर्ण मिळकतीचे आहे.

**मा. सभापती** : तेथील मिळकतीच्या जागेची आपल्या रेकॉर्ड प्रमाणे चौकशी करावी.

**डॉ. मेहेर** : या जागेच्या संदर्भात आपण संबंधिताला मोबदला दिलेला असतानांही त्यांनी इतरास रु. ४.०० लाखास जागा विक्री केली ही जागा अतिशय मोक्याची असून, मला याबाबत मनपावर संताप येतो की, अशा प्रकारच्या बांधकामावर आपण लक्ष देऊन काम कसे करु दिले त्याच वेळेल. कामास आळा का बसविला नाहीत. त्या ठिकाणी ना हरकत प्रमाणपत्र देऊन म. रा. वि. म. कडून संबंधितास लाईट सुध्दा मिळाला आहे. त्या जागेवर स्टे दयावयास आपण होऊनच संधी दिली आहे हे लक्षात घ्यावे.

**श्री. गौतम खरात** : संबंधितांनी अतिक्रमण केले असल्यास नोटीस देऊन आपण प्रत्येक केसमध्ये जर कॅव्हेट दाखल केले तर आपल्याला त्याचा फायदा होऊ शकते. यासाठी विधी विभागाने डोळेझाकपणे करु नये.

**श्री. कचरु नवपुते** : वकील पॅनेल बाबत मी अनेकदार विचारणा करतो आहे. त्याबाबत काय झाले?

**श्री. भगवान घडामोडे** : चिकलठाणा झोन कार्यालयासमोर सुध्दा एका व्यक्तीने असेच अतिक्रमण करुन जागा कापली आहे व त्यास जबाबदार आपण आहोत.

**डॉ. मेहेर** : गेल्या पाच सहा महिन्यापासून मी सुचना करीत आहे की, झोनचे नकाशे तयार करुन द्या की, प्रत्येक झोनमध्ये कोणत्या ठिकाणी मंदिर/मस्जिद/शाळा व इतर मनपाच्या खुल्या जागा/राखीव जागा/शिवाय दवाखाने इ. बी. माहिती मिळु शकेल परंतु तशी माहिती मिळु शकत नाही आहे.

**मा. सभापती** : मनपाचे सातही झोनचे नकाशे काढुन स. स. नी. सुचित केल्याप्रमाणे नकाशे तयार करुन त्यात नमूद करावे झोनमध्ये लावावे.

**श्री. अब्दुल रशिद खान (मामू)** : माझ्या वॉर्डात अतिक्रमण करुन मनपाची जागा हडप करण्याचा प्रयत्न करीत आहे.

**मा. सभापती** : अशा अनेक प्रकारचे केसेस आहेत. जर चर्चा करायची झाल्यास आपल्याला वेळच पुरणार नाही. पाहीजे तर मा. महापौर यांना सांगून मनपाच्या प्रॉपटी व अनाधिकृत जागेवर बांधकामाबाबत विशेष बैठक बोलाविण्याची विनंती करु.

**श्री. महादेव सुर्यवंशी :** सिडको हद्दीमध्ये मनपाच्या शाळा आहेत त्या शाळा मनपाच्या आहेत किंवा नाहीत त्यावर आपण रु. ३५.०० लाख खर्च केलेत त्याबाबत काय झाले.

**मा. सभापती** : शिक्षण अधिकारी यांनी याबाबत चौकशी केली आहे काय?

**शिक्षणाधिकारी :** याबाबत मालमत्ता अधिकारी यांचेकडून ताबा दिलेला आहे.

**मालमत्ता अधिकारी :** रेकॉर्ड तपासले असता तसे मिळत नाही. तथापी अटी व शर्तीच्या आधारे सिडको कडून आपण भाडे वसूली देत असतांना तो रक्कम कपात करता येईल.

**श्री. महादेव सुर्यवंशी :** संबंधित जागेचे रेकॉर्ड नव्हते तर आपण मनपातर्फे एवढा मोठा खर्च का केला आणि सिडकोनेही आपणास भाडे बाबत का विचारणा करावी.

**डॉ. मेहेर** : शिक्षण अधिकारी यांनी भाडे देत असतांना विधी विभागाचा सल्ला घेऊनच पुढील कार्यवाही करावी.

**श्री. सुभाष टाकळकर :** अशा प्रकारचा वाद तयार होत असेल तर, मी गेल्या कित्येक महिन्यापासून कळविले आहे की, सिडको एन-६ शाळेच्या ठिकाणी सांस्कृतिक हॉल बांधणार किंवा नाही.

**मा. सभापती** : मनपाने कोणत्याही प्रकारची चौकशी न करता कंपाऊंड वॉलसाठी फार मोठा पैसा खर्च केलेला आहे. तर स. स. नी. केलेली मागणी सुध्दा मनपाने पूर्ण करुन दयावी. मा. भोगे साहेब यांची चर्चा केल्याप्रमाणे मनपाच्या ताब्यात जर शाळा असतील तर उप आयुक्त-२ शिक्षण अधिकारी आणि मालमत्ता अधिकारी यांनी सिडको कार्यालयात प्रत्यक्ष जाऊन शाळा ताब्यात घेण्याचे सर्व कागदपत्रे घ्यावे व पुढील कार्यवाही करावी.

**उप आयुक्त-२** : अगोदर आपण ताब्यात घेण्या बाबतचे सर्व कागदपत्रे आपल्याकडे तपासणीसाठी मा. मालमत्ता अधिकारी व शिक्षण अधिकारी यांना सुचना दिलेल्या आहेत. जर कागदपत्रे सापडले नाहीत. तर सिडकोच्या शाळा आपल्यास मालकीच्या आहेत असे समजून आपण जो खर्च करीत आहेत. बांधकाम करीत आहोत. अशा परिस्थितीत कागदपत्र मागविण्यासाठी गेल्यास अडचण होण्याची शक्यता नाकारता येत नाही. असे मला वाटते.

**मा. सभापती** : मागेपुढे कार्यालयीन अडचण येऊ नयेत. यासाठी आपण रेकॉर्ड मागवून घ्यावे.

**प्रकल्प संचालक :** श्री. डोंगरगावय साहेब त्यावेळसचे शिक्षण अधिकारी होत. त्यावेळेस सिडकोकडून मनपाच्या ताब्यात शाळा घेतल्याचे आहे.

**मा. सभापती** : ताबा घेतलेला आहे. जुना रेकॉर्ड काढून तपासून घ्यावे.

**श्री. सुभाष टाकळकर :** सिडकोच्या शाळांमध्ये म. रा. वि. म. चे मिटर बसविलेले आहे त्या मिटरवरुन जे बिल येते. ते उप आयुक्त यांच्या नावांनिशी येते.

**मा. सभापती** : त्याअर्थी या शाळांचा ताबा मनपाच्याकडे आहे. ते लक्षात येते. आणि येथील इमारती आपल्या आहेत यात शंका नाही.

**श्री. अब्दुल रशिद खान (मामू) :** मनपाच्या इमारती बाबत मागील सभेत सुचना दिल्या प्रमाणे सर्व्हे करु त्याचा इन्शुरन्स काढले काय

**मा. सभापती** : उप अभियंता (बां.) यांनी माहिती दयावी.

**उप अभियंता** : सर्व्हे केलेला आहे १४ शाळा आहेत व सा. बा. खात्याचे संबंधित अधिकारी यांचेशी चर्चा केलेली आहे. शासनाकडे त्यांचे मार्फत पाठविण्याची कार्यवाही करण्यात येईल.

**मा. सभापती** : इतिवृत्तांवर चर्चा करावी.

**श्री. हमीद ताबा** : इतिवृत्तातील पान क्र. ५० व ५१ ठराव क्र. ४८/८ व ४७९/९ वरील एका संस्थेस जागा देणेच्या प्रस्ताव स्थगित ठेवलेला होता त्याबाबत काय झाले?

**मा. सभापती** : याबाबत नगररचना विभाग किती जागा देणार आहे. याची माहिती सभागृहात देण्याचे सांगितले होते.

मनपा नगररचना ७९ (ब) नियमान्वये ज्या मालमत्तेचे मुल्यांकन रु. ५०/- हजारा पेक्षा कमी आहे. असे वार्षीक भाडे रु. ५,०००/- पेक्षा कमी आहे. असेच प्रस्ताव सर्वसाधारण सभेकडे न पाठविता स्थायी समितीकडे पाठवावे व त्यापेक्षा वरील मुल्यांकन असल्यास ते प्रस्ताव सर्वसाधारण सभेकडे पाठवावे. आणि व्यवस्थित प्रस्ताव पुढील बैठकीत ठेवावे. अशाच प्रकारे जे जागे संदर्भात येतील ते याच नियमाप्रमाणे दोन्हीही प्रस्तावावर कार्यवाही करुन पाठवावे.

पृष्ठ क्र. ५३ बाबत श्री. अबरार अहमद यांचे जागेबाबत प्रस्ताव स्थगित ठेवलेला होता. त्या चर्चा करावी.

**श्री. अब्दुल रशिद खान (मामू)** : या संदर्भात मी जी चर्चा केलेली होती ती चर्चा या ठिकाणी घेतलेली दिसत नाही.

**मा. सभापती** : याबाबत सविस्तर चर्चा लिहून दयावी.

**श्री. अब्दुल रशिद खान (मामू)** : उप संचालक यांचेकडून रु. ३,७७ लाखाचे नमूद करुन आलेले आहे. तेव्हा आपण कोटी मार्फत द्यावे.

**मा. सभापती** : यासंबंधी मी सहा. संचालक नगर रचना व बाहेरील व्यक्तीशी चर्चा केलेली आहे. यांना मागिल सांगितल्याप्रमाणे मागील दरान्वये बेटरमेंट चार्जेस देणे योग्य होणार नाही आणि जे पॉलिसी होईल आणि अनेक केसेसमध्ये ते आपल्याला करावे लागेल. या ठिकाणी त्यांची मागणी आपण मान्य करणार नाही. आजच दर जो दर आहे. बेंटरमेटचा त्याप्रमाणे देणे आवश्यक आहे. आणि पब्लीक इंटरेस्टमध्ये त्या भागातल्या लोकांची गरज लक्षात घेता व त्या ठिकाणची फ्रंटलाईन मार खालेला आहे व संबंधित गृहस्थ बऱ्याच वर्षापासून आपल्याकडे चक्करा मारतो आहे. यासर्व बाबी लक्षात घेता आपण ५.८९ लाख हे जे मुल्यांकन केले होते. त्याप्रमाणे त्यांना पैसे देण्यात यावे. त्याचबरोबर जो डिसे वगैरे झालेला आहे किंवा त्यांची फ्रंटलाईन खालेला आहे आणि रोडची लाईनमेंट मध्ये बदल झालेला आहे. या सगळया गोष्टी लक्षात घेता ३०% रक्कम वाढविण्यात यावे आणि १२% कमी व्याजदर १ वर्षाचा डिले झाल्यामुळे आपण द्यावा. एकूण सर्व रक्कम जी होईल ती सर्व रक्कम यात वळती करुन त्यांच्या ले आऊटला मंजूरी देण्यात यावी. याच्यात संपूर्ण बेंटरमेंट चार्जेस वसूल न झाल्यास उर्वरीत रक्कम प्लॉटधारक आपल्याकडे बांधकाम परवानगी घेण्यास येतील त्यावेळी त्यांचेकडून वसूल करुन घ्यावे असे माझे मत आहे.

**श्री. हमीद ताबा, श्री. कचरु नवपुते** : सुधारीत प्रस्ताव प्रशासनाने ठेवावे व प्रशासनाने खुलासा करावा.

**मा. आयुक्त** : या गारखेडयाच्या रस्त्या संदर्भाने मी स्वतः त्या ठिकाणी गेलो होतो. तो रस्ता सध्या अस्तित्वात आहे. हजारो लोक या वस्त्यावरुन ये जा करतात. जवळपास दहा हजार लोकांचा जो रस्ता आहे. डी. जी. मध्ये जो रस्ता आपण राखीव ठेवलेला आहे. परंतु आपण रस्त्याचे एक्वीजीशन केलेले नाही. असा या जमिनीचे खाजगी वाटाघाटीने एक्वीजीशन करायचे व मुल्यांकन करायचे की, लँड एक्वीजीशन मार्फत मुल्याकंन करायचे हा आपल्या समोर प्रश्न आहे तर, श्री. अबरार यांची मागणी अशी होती की, तेथील जी त्यांची जमिन आहे. त्या जमिनीमध्ये ओरिजनल जो डिपी प्लॅन मधला रस्ता होता तो त्या रस्त्याची अलाईंनमेंट तुम्ही बेकायदेशिरपणे बदलेली आहे. त्यामुळे माझ्या लेआऊटच्या फ्रंटचे मार खाल्ला आहे आणि माझे नुकसान झाले आहे. मला न विचारता हा रस्ता गेली. ५-६ वर्षापासून वाढीवार सुरु आहे. माझे प्रचंड नुकसान ह्या ठिकाणी होत आहे. मनपाने माणा लेआऊटही मंजुर केलेला नाही. त्यामुळे माझे नुकसान झालेले आहे असे त्यांचे मत आहे व तशी माजी आयुक्त श्री. भोगे बरोबर ५-६ वेळेस चर्चा झालेली आहे. माजी आयुक्तांनी जमिनीचे मुल्यांकन किती असावे यासाठी सहा. संचालक नगररचना यांचेकडे प्रकरण पाठवित त्यांनी ५.८९ लाख रु. त्याचे मुल्याकंन केले आणि बेटरमेंट चार्जेस/डेव्हलपमेंट चार्जेस श्री. अबरार यांचे कडुन रु. १४.०० लाख वसुल करावे अशा तऱ्हेच्या प्रस्ताव दिली म्हणजे रु. १४.०० लाख मधून रु. ५.८९ लाख वजा जाता उर्वरीत रक्कम श्री. अबरार यांना मनपात जमा करावे अशा प्रकारे सहा. संचालक नगर रचना यांना मत दिले. त्या मतावर माजी आयुक्त काही समाधान झाले नाही आणि श्री. अबरार यांचेही सहमत नव्हते. श्री. अबरार यांचे म्हणणे होते की, मी बेंटरमेंट चार्जेस काहीही भरीत नाही आणि तुम्ही मला मोबदला काहीही देऊ नका. तरच आपल्या वाटाघाटी होऊ शकतात. त्यावरुन माजी आयुक्तांनी हे प्रकरण उप संचालक नगररचना यांचा सल्ला घेण्याची ठरविले. वरीष्ठ अधिकाऱ्यांनी आणखी मुल्यांकन कमी केले. ते रु. ३.७७ लाख केले आणि एकदाचे वरीष्ठकाडुन मुल्यांकन कमी झाल्याने माजी आयुक्तांनी असे आदेश दिले की, उप संचालक यांनी जे मुल्यांकन दिलेले आहे ते बंधनकारक आहे आता यावर चर्चा होणार नाही. एवढेच मुल्यांकन श्री. अबरार यांना देण्यास यावे व प्रकरण बंद करावे. असे आदेशा झालेले आहेत आणि म्हणून आम्ही आता प्रस्ताव असा सादर केलेला आहे. जे समोरचा मार खालेला आहे रोड अलाईंनमेंट बदल झाला आहे. तो अप्रोच रस्ता आहे. हा रस्ता लोकांच्या रस्त्याच्या प्रश्न आहे. सबब या ठिकाणी मुल्यांकन करीत नसतांना माजी आयुक्तांनी ग्राह्य धरलेले रु. ३.७७ लाख तेच मुल्याकंन करीत असतांना माजी आयुक्तंनी ग्राह्य धरलेले रु. ३.७७ लाख तेच मुल्यांकन जमीनीचे कायम ठेवावे आणि त्यांचेकडुन बेटरमेंट चार्जेस १९९५ चे त्याप्रमणाचे आता कॅशमध्ये वसुल न करता बिल्डींग परवानगी देत असतांना संबंधित प्लॉट धारकांकडून वसुल करावे आणि जो आपला नियम आहे. मुल्यकंनाच्या बाबतीत एकत्रित आणि बेटरमेंट चार्जेस त्याचे ३५% त्यांना सवलत द्यावी म्हणजे कॅश त्यांना आपल्याकडे भरावा लागत नाही आणि आपल्याकाही त्यांना काही पैसे द्यावे लागत नाही. असे आम्ही कायदेशीर प्रस्ताव आपल्यासमोर ठेवलेला आहे.

**डॉ. मेहेर** : लेआऊटमुळे फ्रेटेज भार खाल्ला असे संबंधिताचे म्हणने आहे तर लेआऊट मंजुर करण्याचे अधिकार मनपाचे आहेत.

**मा. आयुक्त** : ती वस्तुस्थित आहे. ती नाकारता येत नाही.

**डॉ. मेहेर** : रस्त्याचे अलाईनमेंट बदल झाला वगैरे त्याचे म्हणणे आहे. परंतु के आऊट मंजुर झालेला नव्हता तर तो कसा फ्रेट भार खाल्ला म्हणणार? शिवाय प्लॉटधारकांकडून बेटरमेंट घेणार तर फसवुणूक होणार नाही का?

**सहा संचालक नगररचना :** त्याठिकाणी तो शिफ्ट झाला व पन्नास घरे झाली आपण ज्यावेळी ले आऊट मंजुर करतो व संबंधित मालक प्लॉट पाहून विकतो त्यावेळी तेथील लोकांना माहित असते.

**श्री. कचरु नवपुते :** यात जी रक्कम भरण्यास सांगितली त्यात ८०% रक्कम वाढविता येते काय?

सहाय्यक संचालक नगररचना : खाजगी वाटाघाटीत तसे करता येऊ शकते परंतु तसे बंधनकारक आहे असे नाही. ३०% त्यापेक्षा जास्त वाढवित येत नाही.

**मा. सभापती** : संबंधितांची जागा २६०० स्के. मी. आपण घेतो आपल्या नियमाप्रमाणे कट करुन १३०० प्रमाणे देतो. ३.७७ लाख मुल्यांकन जे काढले ते कोणत्या वर्षी माजी आयुक्तांनी काढले. त्यावेळपेक्षा आताचे रेडीरेकनर काय आहे. ते पहावे व नियमात बसले पाहिजे खाजगी वाटाघाटीत

१) खाजगी वाटाघाटी करणे, २) कंपलसरा लॅन्ड एक्वीजिशनला देणे.

**मा. आयुक्त** : लॅन्ड एक्वीजीशनला जाऊ दयावे.

**मा. सभापती** : कंपलसरी लॅन्ड एक्वीजीशनला दिल्यास सदरच्या व्यक्ती कोर्टात जाऊ शकतो. तर त्या भागातील नागरिकांचा प्रश्न आहे. तो रस्ता कायम त्रासदायक होईल आपला मुख्य प्रश्न रस्त्याचा आहे. तो रस्ता कायम प्रलंबीत राहील आपण नियमाच्या बाहेर जाऊन करणार नाही.

**श्री. गौतम खरात :** आपआपल्या रस्त्यासाठी गरज पडत आहे म्हणून संबंधित व्यक्ती आडून पाहत आहे. त्याच्या हिशोबाप्रमाणे देणे आवश्यक आहे काय? आपण पैसे देतो परंतु तो घ्यावयास तयार नाही.

**मा. सभापती** : आर्थिक बाब असल्याने स्थायी समितीचे मंजुरी घेणे आवश्यक आहे. या संदर्भात पत्रव्यवहार केला. परंतु तो ऐकत नाही आहे.

**श्री. कचरु नवपुते, श्री. गौतम खरात :** त्या जागेचा ताबा घेऊन कोर्टात पैसे भरुन टाकावे.

**मा. सभापती** : रस्ता ताब्यात नाही फक्त रहदारी चालू आहे. आपआपल्या आजच्या रेडीरेकनर प्रमाणे संबंध तास पैसे देता येईल काय? विधी सल्लागारांनी माहिती दयावी.

**मा. आयुक्त** : प्रशासनाने प्रस्ताव ठेवलेला आहे. आपल्याला तो मान्य नसेल तर फेर प्रस्ताव ठेवण्यात येईल.

**विधी सल्लागार :** कायदेविषयक बाब तपासूनच सांगता येईल.

**डॉ. मेहेर** : जागेचे मुल्यांकन कधी काढते.

**श्री. गौतम खरात :** बेटरमेंट चार्जेस आपण घेणार काय?

**मा. सभापती** : सन १९९५ ला मुल्यांकन काढले आहे व बेटरमेंट चार्जेस जुन्याच दराचे आहे. आता नविन दराने मागणी करावी लागणार आहे. सुधारीत प्रस्ताव आपण कसा पुन्हा ठेवणार याची माहिती दयावी.

**स. संचालक** : प्रस्ताव शासनामार्फत ठेवलेला आहे. आता आपण सुचवाल त्याप्रमाणे करता येईल.

**मा. सभापती** : १) ०१-०३-७७ लाख एका प्रोसिजरनी आलेली किंमत आहे.

०२-०५-८९ व ३.१६ अशी मुल्याकंन किंमत आली आह. या लॅन्ड एक्वीजीशनच्या वेगवेगळया प्रोसेसमुळे काढलेले आहेत. या किमतीस माजी आयुक्त यांना दोन्ही किंमती ग्राह्य न धरता उप संचालक नगर रचना यांना पत्र पाठवून त्यांचेकडून मुल्याकंन काढुन घेतले व त्यांचेकडून रु. ३.७७ लाख इतके झाले मनपाचे अधिकाऱ्यांनी काढलेले मुल्याकंन रु. ३.१६ व ५.८९ या दोन पध्दती आहेत. आता यावर आपण निर्णय दयावा. फेर प्रस्ताव प्रशासनाने आजच्या रेडिरेकनरप्रमाणे तपासून सादर करावे. त्यात आजच्या बेटरमेंट दर व त्यातही आजच्या मुल्यांकना प्रमाणे देणे बाबत विधी विभागाच्या अभिप्रायान्वये स्थायी समिती समोर फेर प्रस्ताव ठेवण्यात यावा.

२) पृष्ठ क्र. ३६ ठराव क्र. ४६३/३ रेट ॲनॅलिसीस करणे बाबत होता. आत रेट ॲनालिसीस झालेला आहे. प्रस्ताव मंजूर फक्त क्वालीटीकडे लक्ष दयावे.

**श्री. कचरु नवपुते** : पृष्ठ क्र. ६२ विषय क्र. ४९४/२४ बाबत माहिती दयावी.

**मा. सभापती** : सदरचा प्रस्ताव कायम करुन सर्वसाधारण सभेकडे शिफारस करण्यात येते.

**श्री. महादेव सुर्यवंशी** : पृष्ठ क्र. १३ मध्ये शिक्षण विभागातील चौकीदार बाबत.

**मा. सभापती** : उप आयुक्त-२ यांनी खुलासा करावा.

**उप आयुक्त-२** : ७५०-९४० या मुळ पगारावर त्यावेळेला शिक्षण-विभागास दहा कर्मचारी कार्यरत होते. त्या कर्मचाऱ्यांना पदस्थापना बाबत अस्था-२ व शिक्षण विभागाकडे मुळ संचिका मागितली तर ती मिळवू शकली नाही आता या कर्मचाऱ्यांना मुळ वेतनांचा जो पगार आहे तो देतो. परंतु नियमाप्रमाणे वेतनवाढ ज्या आहेत. त्या देत नाहीत याबाबत शेड्युलमध्ये ही पदे नाहीत. तरी आपण जसा निर्णय दयात त्याप्रमाणे कार्यवाही करता येईल.

**श्री. महादेव सुर्यवंशी** : गेल्या दहा वर्षापासून आपण लेखा विभागामार्फत पगार देतो तर कोणत्या हेड खाली देतो. त्या लोकांची फाईल मिळत नाही त्यांच्या जिवनाचा प्रश्न आहे.

**मा. सभापती** : लेखा विभाग सुध्दा तपासणी न करता पगार देते. याच आश्चर्य वाटते.

**डॉ. मेहेर** : गेल्या १५ वर्षापासून या लोकांना आपण फिक्सवर ठेवले तर त्यांच्या जिवनाची आपण काय हमी देणार? ही बाब अतिशय गंभीर असून, कार्यालयाने दाखल घ्यावी.

**श्री. महादेव सुर्यवंशी** : या कर्मचाऱ्यांना आपण पूर्ण पगार देतो परंतु पुढील कोणतीही सुविधा किंवा वेतनवाढ देत नाही व त्यांच्या मुळ संचिका नाहीत.

**मा. सभापती** : त्या कर्मचाऱ्यांना पगार फक्त देतो. परंतु कोणत्या पदासाठी पगार देता ती मुळ संचिका गायब आहे. अशा प्रकारची पदे मनपाच्या अस्थापनेवर नाही तरी १५ वर्षापासून काम करीत आहे.

**डॉ. मेहेर** : या कर्मचाऱ्यांची आज आपल्याला गरज आहे काय?

**मा. सभापती** : अशा प्रकारची कर्मचाऱ्यांच्या पदस्थापने संदर्भातील बाब गंभीर आहे. याबाबत सर्वसाधारण सभेत प्रस्ताव ठेवून शासनाकडे कार्यवाहीस्तव पाठवावे.

**ठराव :**

१. लायन्स क्लब आयोजित प्लॉस्टीक सर्जरी शिबीर औरंगाबाद येथे आयोजिलेले असून, त्यासाठी अमेरिकेतून खास पथक डॉ. नाथप्रकाश दिक्षीत यांचे सोबत आलेले आहेत. सा सुत्य रु. एकावन्न हजार आर्थिक मदत अंशदान या लेखाशिर्षातून " विशेष बाब " म्हणून देण्यात मंजूरी देण्यात येते.

२. सिध्दार्थ उद्यान व (मजनु हिल) स्वामी विवेकानंद उद्यानाची वेळ सांय ४.०० ते १.३० रात्री पर्यंत करण्यात येते.

३. इतिवृत्तातील पृष्ठ क्र. ५० ते ५१ वरील ठराव क्र. ४७८/८ व ४७९/९ फेरतपासणी करुन व्यवस्थितरित्या पुढील बैठकीत ठेवावे.

४. पृष्ठ क्र. ५३ वरील अबरार अहमद यांचे जागेबाबतचा प्रस्ताव सुधारीत करुन प्रशासनाने पुन्हा स्थायी समिती समोर ठेवावा.

५. पृष्ठ क्र. ३६ ठराव क्र. ४५३/३ रेट ॲनालिसीस करण्यात आलेला आहे. प्रस्ताव मंजुर करण्यात येतो.

१. पृष्ठ क्र. ३१ वरील ठरावात खालील प्रमाणे दुरुस्ती करावी.
" शर्ट सलवार व ओढणी कापड व ब्लाऊज पिसेस इ. बाबतीत कामगारांचे पसंतीनूसार कापड खरेदीचे आदेश देण्यात यावे. "

२. पृष्ठ क्र. ३२ वरील ठरवात खालील प्रमाणे दुरुस्ती करण्यात यावी. " वुलन कापडाची मी महाराष्ट्र को-ऑप फेडरेशन यांची नमुना पसंत आलेले मे. दिव्य जनरल स्टोअर्स यांच्या नमूना दर रु. १४०/- प्रति मिटर प्रमाणे करण्यात यावे."

३. पृष्ठ क्र. ३४ वरील ठरावात खालील प्रमाणे दुरुस्ती करण्यात यावी.
" वाहन चालकांचे गणवेश त्याचे पसंतीनूसार खरेदी करण्यात यावे."

६. या व इतर दुरुस्त्यासह दि. २९-११-९६ च्या संपन्न झालेल्या इतिवृत्तास मंजूरी देण्यात येते.
वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ४९७/२ :**

कार्यकारी अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, कबीर (स्लम) येथे १०० व १५० मी. मी. व्यासाची ए. सी. जलवाहिनी टाकणेच्या कामाकरीता परिसर अभियांत्रिकी विभागाची सन १९९४-९५ च्या दरसुची र. रु. १,५५,७९०/- चे अंदाजपत्रक तयार करण्यात आलेले आहे. सदर कामाचा खर्च हा " झोपडपट्टी सुत्रधार " कामाचे तरतुदीमधून करण्यात येणार आहे.

तरी अंदाजपत्रक मंजुरीस्तव प्रस्ताव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, कबीरनगर (स्लम) येथे १०० व १५० मी. मी. व्यासाची ए. सी. जलवाहिनी टाकणेच्या कामाकरीता करण्यात आलेल्या र. रु. १,५५,७९०/- च्या अंदाजपत्रकास व सदर खर्च " झोपडपट्टी सुत्रधार " कामाचे तरतुदीतून करण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ४९८/३ :**

कार्यकारी अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, बाबा हरदास नगर येथे १५० मी. मी. व्यासाची ए. सी. जलवाहिनी टाकणेच्या कामाकरीता परिसर अभियांत्रिकी विभागाची सन १९९४-९५ च्या दरसुचीनुसार र. रु. १,०४,७४०/- चे अंदाजपत्रक तयार करण्यात आले आहे. सदर कामाचा खर्च हा भांडवली कामाचे तरतुदी मधून करण्यात येईल.

करीता अंदाजपत्रक मंजुरीस्तव प्रस्ताव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, बाबा हरदास नगर येथे १५० मी. मी. व्यासाची ए. सी. जलवाहिनी टाकणेच्या कामाकरीता तयार करण्यात आलेल्या र. रु. १,०४,७४०/- च्या अंदाजपत्रकास व सदर खर्च भांडवली कामाचे तरतुदीतुन करण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ४९९/४ :**

सिडको एन-१२ डी सेक्टर येथे मोठया व्यासाची जलवाहिनी टाकण्यासाठी अंदाजपत्रक र. रु. १,०१,८९०/- चे तयार करण्यात आले असून, सदरील अंदाजपत्रक परिसर अभियांत्रिकी विभागाच्या सन ९५-९६ च्या दरसुचीनुसार तयार करण्यात आले आहे. अंदाजपत्रकास प्रशासकीय मंजुरी मिळालेली आहे. या कामावर होणार खर्च हा " देखभाल व दरुस्ती " या लेखाशिर्षाकातुन करण्यात येईल.

तरी र. रु. १,०१,८९०/- चे अंदाजपत्रक मंजुरीबाबतचा प्रस्ताव विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, सिडको एन-१२ / डी सेक्टर येथे मोठया व्यासाची जलवाहिनी टाकण्याच्या कामाकरीता तयार कण्यात आले ज्या र. रु. १,०१,८९०/- च्या अंदाजपत्रकास व सदर खर्च देखभाल व दुरुस्ती या लेखाशिर्षातुन करण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ५००/५ :**

कार्यकारी अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, पाणी पुरवठा विभागा अंतर्गत येणाऱ्या जलवाहिन्या व दैनंदिन किरकोळ कामासाठी लागणारी विविध आकाराचे सी. आय. स्पेशल्स खरेदीसाठी स्थायी समिती ठराव क्र. १५६ दि. ३१-१०-९५ नुसार मंजुरी घेण्यात आली. त्यानंतर दैनिक वर्तमानपत्रात निविदा सुचना प्रसिध्द करुन निविदा मागविण्यात आली. निविदेमध्ये मे. सुरज एंटरप्रायजेस यांची निविदा अ. प. दरापेक्षा २९.०४% जास्त दराची प्राप्त झाली. कार्यालयास जास्त दर वाटत असल्याने मा. आयुक्त याचे दालनात वाटाघाटीसाठी बोलाविण्यात आले दि. ०८-०७-९६ रोजी वाटाघाटी अंती ९५-९६ चे डी. एस. आर. नुसार ५% जास्त दराने साहित्य पुरवठा करण्याचे पुरवठादार मे. सुरज इंटरप्रायजेस यांनी मान्य केले

तरी सदर साहित्य हे अ. प. र.रु. १,१३,९३०/- एवढयाचे डी. एस. आर. ९५-९६ चे दरसुचीनुसार ५% जास्त दराने खरेदी करण्यासाठी प्रस्ताव मंजुरीस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, पाणी पुरवठा विभागा अंतर्गत येणाऱ्या जलवाहिन्या व दैनंदिन किरकोळ कामासाठी लागणारी विविध आकाराचे सी. आय. स्पेशल्स खरेदीसाठी प्राप्त झालेल्या निविदाधारकांशी झालेल्या वाटाघाटीनुसार सदरील साहित्य अ. प. व र. रु. ५% जास्त दराने खरेदी करण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ५०१/६ :**

कार्यकारी अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला की, वि. क्र. ४ अंतर्गत अस्तित्वात असलेल्या गटारीची दुरुस्ती करणे बाबत अंदाजपत्रक र. रु. २,४४,०००/- ठराव क्र. २१०/२० दि. ३०-०८-९६ द्वारे मान्यता मिळाल्यानुसार निविदा सुचना प्रसिध्द करुन निविदा मागविल्या असता एकूण १७ निविदा विक्री झाल्या पैकी ११ निविदा दर भरुन प्राप्त झाल्या त्याचे दर खालील प्रमाणे

| | | |
|---|---|---|
| १. | श्री. मोहमंद रऊफ | अंदाजपत्रकीय दरापेक्षा १४.१% कमी |
| २. | श्री. बदर बिन साजम | अंदाजपत्रकीय दरापेक्षा २९.३०% कमी |
| ३. | श्री. आर. बी. चव्हाण | अंदाजपत्रकीय दरापेक्षा २३% कमी |
| ४. | श्री. मनोज वि. घोडके | अंदाजपत्रकीय दरापेक्षा ११.०९% कमी |
| ५. | श्री. रफीकोद्दीन | अंदाजपत्रकीय दरापेक्षा १८.२०% कमी |
| ६. | श्री. शे. सजाम अहमद | अंदाजपत्रकीय दरापेक्षा १२.८६% कमी |
| ७. | श्री. एस. के. मिसाळ | अंदाजपत्रकीय दरापेक्षा १८.११% कमी |
| ८. | श्री. मन्नान खान | अंदाजपत्रकीय दरापेक्षा १५.९९% कमी |
| ९. | श्री. जितेंद्र भारुका | अंदाजपत्रकीय दरापेक्षा १५% कमी |
| १०. | श्री. डी. के. कन्स्ट्रक्शन | अंदाजपत्रकीय दरापेक्षा ७% कमी |
| ११. | श्री. घोडके एस. बी. | अंदाजपत्रकीय दरापेक्षा १७.५१% कमी |

वरील दर पाहता तुलनामकदृष्ट्या कमी व अ. प. दरापेक्षा २९.३०% कमी दरास श्री. बदर बिन साजम यांची निविदा आहे. करीता प्रस्ताव विचारार्थ व मंजुरीस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, वि. क्र. ४ अंतर्गत अस्तित्वात असलेल्या गटारीची दुरुस्ती करणेकरीता प्राप्त झालेल्या निविदापैकी तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी व अ. प. दरापेक्षा २९.३०% कमी दराची श्री. बदर बिन सतलम यांची निविदा स्विकारण्यास सर्वानुमते मंजुरी दिली जाते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ५०२/७ :**

शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला की, मो. संजयनगर बायजीपुरा वार्ड क्र. ३१ येथी शहाबादी फरशी बसविणे बाबतचे कामाकरीता सा. बा. खात्याच्या वर्ष ९५-९६ च्या दरसुचीनुसार र. रु. ९,५४,५२२/- चे अ. प. तयार करण्यात आले आहे सदरील काम " खांडकी रस्ते " या शिर्षकातून करण्यात येईल. सदरच्या अ. प.मा. आयुक्तांनी दि. ०४-०८-९६ ला प्रशासकीय मान्यता दिली आहे. तसेच दि.१९-०८-९६ च्या सर्वसाधारण सभेस मान्यता दिली आहे प्रस्तावित कामासाठी निविदा मागविण्यात आल्या असता अंतिम तारखे पर्यंत एकूण ७ निविदा प्राप्त झाल्या.

| | | |
|---|---|---|
| १. | श्री. महंमद सलिम महंमद शरीफ | २२.५% कमी |
| २. | श्री ए. एम. फारुकी | २२.१०% कमी |
| ३. | श्री. कुलवंतसिंग | २१.७०% कमी |
| ४. | श्री. मन्नान खान | २०.०१% कमी |
| ५. | पारस कन्स्ट्रक्शन | २०.०२% कमी |
| ६. | सय्यद रफीकोद्दीन | १२.२०% कमी |
| ७. | सिद्दीकी एम. झेड | ०.५०% कमी |

तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी व अ. प. दरापेक्षा २२.५% कमी दराची श्री. महंमद सलीम शरीफ यांची निविदा आहे. तरी प्रस्ताव मान्यतेस्तव व विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, मो. संजयनगर बायजीपुरा वार्ड क्र. ३१ येथी शहाबादी फरशी बसविण्याच्या कामाकरीता प्राप्त झालेल्या निविदापैकी तुलनात्मदृष्ट्या सर्वात कमी व अ. प. दरापेक्षा २२.५% कमी दराची श्री. महंमद सलीम, महंमद शरीफ यांची निविदा स्विकारण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ५०३/८ :**

मो. रोशनगेट येथील मियाभाई रेखांकनास पोच रस्ता करण्यासाठी न. भू. क्र. ९६७३/पैकी ६६.२ चौ. मी. क्षेत्र संपादन करावयाचे आहे. सदर जागा संपादन करण्यासाठी सर्वसाधारण सभेचे ठराव क्र. १३ दि. १६-०६-९५ नुसार घेण्यात आलेले आहे. सदर जमीन संपादन करण्यासाठी मोबदल्याची र. रु. १,९८,६००/- असून, दोन पार्टी मध्ये खालील प्रमाणे देणे आहे.

| | | **बांधीव क्षेत्र चौ. मी.** | **मोबदल्याची र. रु.** |
|---|---|---|---|
| १. | श्री. सय्यद सलीनुद्दीन पि. सय्यद गौसोद्दीन | | |
| २. | श्री. सय्यद अजिमुद्दीन पि. सय्यद गौसोद्दीन | | |
| ३. | श्री. सय्यद नईमुद्दीन पि. सय्यद गौसोद्दीन | ४७.१० | १,४१,३०००/- |
| ४. | श्रीमती अहेमदी बेगम भ्र. सय्यद गौसोद्दीन | १९.१० | ५७,३००/- |
| ५. | श्री. शेख अमर बीन हामद | | |

वरील प्रमाणे मोबदल्या रक्कम हितसंबंधितास देण्यासाठी वरील जागेची खरेदीखत करुन घेण्यासाठी रु. २१,०००/- (एकवीस हजार रु. फक्त) अग्रीम श्री. काळेले, शाखा अभियंता यांनी देणेसाठी सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, मो. रोशनगेट येथील मियाभाई रेखांकनास पोच रस्ता करण्यासाठी न. भू. क्र. ९६७३/पैकी ६६.२ चौ. मी. क्षेत्र संपादन करणेस्तव मोबदल्याची र. रु. १,९८,६००/- दोन पार्टीमध्ये खालील प्रमाणे देण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

| | | **बांधीव क्षेत्र चौ. मी.** | **मोबदल्याची र. रु.** |
|---|---|---|---|
| १. | श्री. सय्यद सलीनुद्दीन पि. सय्यद गौसोद्दीन | | |
| २. | श्री. सय्यद अजिमुद्दीन पि. सय्यद गौसोद्दीन | | |
| ३. | श्री. सय्यद नईमुद्दीन पि. सय्यद गौसोद्दीन | ४७.१० | १,४१,३०००/- |

४. श्रीमती अहेमदी बेगम भ्र. सय्यद गौसोद्यीन १९.१० ५७,३००/-
५. श्री. शेख अमर बीन हामद

उपरोक्त जागेचे खरेदीखत करुन घेणेसाठी रु. २१,०००/- (एकवीस हजार रु. फक्त) अग्रीम श्री. काळेले, शाखा अभियंता यांनी देण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.
वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ५०४/९ :**

कार्यकारी अभियंता पाणी पुरवठा व जलनिःसारण यांनी प्रस्ताव सादर केला की, वि. क्र. ३ मधील प्रभाग (      ) साठी सन ९६-९७ या आर्थिक वर्षासाठी अस्तित्वात जलनिःसारण वाहिनीची देखभाल दुरुस्ती करण्यासाठी अ. प. र. रु. ४,२१,०००/- ला स्थायी समिती सभा दि. १२-०७-९६ ठराव क्र. २०/१९ जे संमत झालेला आहे त्यानंतर सदरील कामाची निविदा सुचना क्र. मनपा/लेखा/नि/८८/९६ दि. १६-०७-९६ अन्वये वर्तमानपत्रात प्रसिध्दीस दिली असता एकूण नऊ निविदा विक्री झाल्या व पैकी तीन निविदा प्राप्त झाल्या त्याचा तुलनात्मक तक्ता खालील प्रमाणे आहे.

| | | |
|---|---|---|
| १. | मे. बसरा कन्स्ट्रक्शन | अ. प. दरापेक्षा ७.३१% कमी |
| २. | श्री. आर. एल. बारवाल | ०.८% कमी दराने |
| ३. | श्री. मिर्झा आर. बी. | ५% जास्त दराने |

तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी व अ. प. दरापेक्षा ७.३१% कमी दराची निविदा मे. बसरा कन्स्ट्रक्शन यांची आहे. तरी मे. बसरा कन्स्ट्रक्शन यांची ७.३१% कमी दराची निविदा मंजुरीस्तव प्रस्ताव विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, वि. क्र. ३ मधील अस्तित्वात असलेल्या जलनिःसारण वाहिनीची देखभाल दुरुस्ती करणेकरीता प्राप्त झालेल्या निविदा पैकी तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी व अ. प. दरापेक्षा ७.३१% कमी दराची मे. बसरा कन्स्ट्रक्शन यांची निविदा स्विकारण्यास मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ५०५/१० :**

कार्यकारी अभियंता (पा. पु. ज. नि.) यांनी प्रस्ताव सादर केला की, पाणी पुरवठा जलवाहिनी दुरुस्तीसाठी अे. सी. पाईप खरेदी करण्यासाठी गरज आहे. सदरील पाईप खरेदीसाठी र. रु. ४,९४,७७५/- चे अ. प. तयार करण्यात आले आहे. सदरील पाईप खरेदी करीता अ. प. ९५-९६ च्या परिसर अभियांत्रिकीच्या दरसुचीनुसार तयार करण्यात येत आहे. सदरील खर्च पाणी पुरवठा देखभाल दुरुस्ती या शिर्षकाखाली करण्यात येत आहे. सदरील साहित्य खरेदीसाठी दै. वर्तमानपत्रात प्रसिध्दी करुन " डी " फार्मवर अधिकृत विक्रेते किंवा अधिकृत पुरवठा धारक यांच्या कडुन निविदा मागविल्या बाबत तसेच अ. प. रु. ४,९४,७७५/- चे मंजुरीस्तव प्रस्ताव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, पाणी पुरवठा जलवाहिनी दुरुस्तीसाठी अे. सी. पाईप खरेदी करण्याकरीता तयार करण्यात आलेल्या अ. प. रु. ४,९४,७७५/- ला तसेच सदर

साहित्य खरेदीसाठी वर्तमानपत्रात प्रसिध्दी " डी " फार्मवर अधिकृत पुरवठा धारकांकडून निविदा मागविण्यात सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ५०६/११ :**

शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला की, सिध्दार्थ उद्यान प्राणी संग्राहालया मध्ये माकडाच्या घरासमोर पायऱ्या प्लॉवर बेड व इतर कामे करण्यासाठी सा. बा. खात्यांचे सन १९९५-९६ चे जिल्हा दरसुचीनुसार र. रु. ७०,७७०/- चे अ. प. तयार करण्यात आले असून, सदर काम तात्काळ उपलब्ध मक्तेदार मे. गुलजार कंपनी यांचेकडून हाती घेण्यासाठी मा. आयुक्तांनी दि. ०७-०६-९६ अन्वये कार्योत्तर मंजुरी दिलेली आहे. आचार संहितेमुळे निविदेची कार्यवाही करता येत नसल्याने काम विना निविदा करुन घेण्यात आल्यामुळे स्थायी समितीसमोर प्रस्ताव मंजुरीस्तव सादर करण्यासाठी मा. आयुक्तांनी दि. २९, १०, ९६ अन्वये शिफारस केलेली आहे.

सबब सदर कामासाठी र.रु. ७०,७७०/- च्या अ. प. कास व सदर काम विना निविदा मे. गुलजार कंन्स्ट्रक्शन यांचे कडुन अंदाजपत्रकीय दरावर करुन घेतलेले असल्याने कार्योत्तर मंजुरीस्तव प्रस्ताव विचारार्थ सादर. सदरचा खर्च प्राणी संग्राहालय विकसित करणे या लेखा शिर्षकामधुन सन ९६-९७ या वर्षात करण्यात येईल.

**संवाद :**

**श्री. महादेव सुर्यवंशी :** मा. आयुक्त यांच्या ६७८ (३) (सी) च्या अधिकारान्वये प्रस्तावास मंजुरी देऊन मांडलेला आहे. मला वाटते माणसापेक्षा माकडाला महत्व देऊ नये असे माझे मत आहे. माझ्या वार्डातील ड्रेनेज लाईनच्या लोकांच्या जिव्हाळयाच्या प्रश्न असतांनाही गेल्या महिन्यास भरापासून काम होत नाही आहे. तेव्हा माकडापेक्षा माणसावरही सभागृहाने कामाबाबत लक्ष द्यावे व निर्णय घ्यावा.

**श्री. कचरु नवपुते :** माझ्या वार्डात स्टडी सेंटरचे प्रस्ताव आहे व आपण निर्णय दिलेला असतांनाही लेखा विभागाने त्यावर शॉर्ट टेंडर नोटीस काढावे म्हणून केलेले आहे. तेव्हा अर्जेन्ट काही कामे असतील ती स. सदस्यांच्या भावना लक्षात घेऊन तातडीने करावे.

**श्री. भगवान घडामोडे :** माझ्या वार्डात मुरुम टाकण्याबाबत अद्यापही झालेले नाही. शिवाय पाण्याच्या पाईप लाईन टाकणेसाठी दि. २५-१०-९६ ला मंजुरी मिळालेली आहे. परंतु सदरची संचिका मिळत नाही. तेव्हा असे जिव्हाळयाचे प्रश्नाबाबत प्रशासनाने गांर्भियाने लक्ष द्यावे.

**श्री. अब्दुल रशिद खान (मामू) :** जनावरांनाही पुर्व जगात अतिशय महत्व प्राप्त झाले आहे त्यानुसार माणसानंतर जनावरांनाही महत्व द्यावे.

**श्री. महादेव सुर्यवंशी :** मी स. सदस्यांच्या मताशी सहमत नाही.

**मा. सभापती** : स. सदस्यांच्या भावना लक्षात घेता या प्रस्तावास विरोध नाही. परंतु त्यांच्या वॉर्डातील जिव्हाळयाचा प्रश्न असल्याने ते मांडत आहेत. त्याकडेही प्राधान्याने लक्ष दयावे. मा. आयुक्त यांनी त्यांच्या अधिकारात हा प्रस्ता मंजूर केलेला नसून, क्रमाक्रमाने प्रस्ताव स्थायी समिती समोर आलेला आहे.

**मा. आयुक्त** : सेक्शन ६७ (३) सी हा अधिकार वापलो म्हणजे लोकप्रतिनिधीवर आलेला हस्तक्षेप आहे. असे मी समजतो हा वापर अयोग्य असल्याने मी स्थायी समिती समोर प्रस्ताव आणलेला आहे. काही स. सदस्य " विना निविदा

काम करा " असे वगैरे म्हणतात. ते सांगू नये. एखादी विशेष बाब असल्यास ती करता येऊ शकते नियमाप्रमाणे काम तात्काळ करण्याचे मी संबंधित अधिकाऱ्यांनी सांगून करतो.

**मा. सभापती** : प्रशासनाला बेकायदेशीर काम करण्याचे आम्ही सांगत नाही व करुनही देणार नाही. फक्त शॉर्ट टेंडर काढतो म्हणतात व एक-एक महिना काढत नाहीत. त्यामुळे स. सदस्य बोलत असतात. तसे काही प्रशासनाने मनात ठेवू नये. विषय क्र. ११, १२ मंजुर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, सिध्दार्थ उद्यान प्राणी संग्राहालयामध्ये माकडाच्या घरासमोर पायऱ्या प्लॉवर बेड व इतर कामे करण्यासाठी र. रु. ७०,७७०/- चे अ. प. तयार करण्यात येऊन काम तातडीने असल्याने उपलब्ध गुत्तेदार मे. गुलजार कंपनी यांचेकडून अंदाजपत्रकीय दराने करुन घेण्यात आलेले आहे. त्यास कार्योत्तर मंजुरी देऊन ठराव कायम करण्यात येतो. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ५०७/१२ :**

शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला की, सिध्दार्थ उद्यान प्राणी संग्राहालयामध्ये माकडाच्या पिंजऱ्याचे उत्तर बाजूस वाढ करण्याकरीता सा. बा. खात्याचे सन ९५-९६ चे दरसुचीनुसार रक्कम रु. १,२०,०००/- चे अंदाजपत्रक तयार करण्यात आले होते. परंतु त्यामधील रेलींगचा ॲटम कमी करुन र.रु. ९८,०००/- ला तसेच सदरील काम माकडांची संख्या जास्त असल्याने व माकडे ठेवण्यास पिंजरा उपलब्ध नसल्याने व आचारसंहितेमुळे अत्यंत तातडीचे असल्याने मा.आयुक्तांना ६७ (३) (सी) असलेल्या अधिकरानुसार सदरील काम उपलब्ध गुत्तेदार मे. गुलजार कन्स्ट्रक्शन यांचेकडून अ. प. दराने दि. २८-०६-९६ च्या मंजुरीनुसार करुन घेण्या आले असल्याने त्यास स्थायी समितीची कार्योत्तर मंजुरी घेण्यासाठी दि. १८-११-९६ अन्वये मा. आयुक्तांनी शिफारस केलेली आहे. सबब सदर कामाचे र. रु. ९८,०००/- चे अंदाजपत्रकास तसेच सदरील काम करणारी एजन्सी मे. गुलजार कन्स्ट्रक्शन यांचेकडून अ. प. दरावर करुन घेतलेल्या कामास व आलेल्या खर्चास कार्योत्तर मंजुरीस्तव प्रस्ताव विचारार्थ सादर.

सदरचा खर्च प्राणी संग्राहालय विकसित करणे या लेखा शिर्षकामधून सन ९६-९७ या वर्षात करण्यात येईल.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, सिध्दार्थ उद्यान प्राणी संग्राहालयामध्ये माकडाच्या पिंजऱ्याचे उत्तर बाजूस वाढ करण्याकरीता र.रु. ९८,०००/- चे अंदाजपत्रक तयार करुन आचारसंहितेमुळे काम तातडीचे असल्याने मा. आयुक्तांनी ६७(३) सी अन्वये असलेल्या अधिकरांनुसार उपलब्ध गुत्तेदार मे. गुलजार कन्स्ट्रक्शन यांचेकडून अ. प. दराने करुन घेण्यात आलेले आहे. त्यास कार्योत्तर मंजुरी देऊन स्विकृती देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ५०८/१३ :**

शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला की, महानगरपालिकेच्या बांधकामासाठी विविध विभागातून लोखंडाची २०० टनानी आलेला असून, अंदाजपत्रक र. रु. ३५,७०,०००/-

चे तयार करण्यात आले आणि या अंदाजपत्रकास मा. आयुक्त साहेबांनी दि. ०२-०९-९६ अन्वये मान्यता दिली व सर्वसाधारण सभा ठराव क्र. ९५/९ दिनांक २०-०९-९६ अन्वये मंजुरी मिळाली आहे.

त्याप्रमाणे वरील निविदा जा. क्र./मनपा/लेखा/नि/१२२/९६ दिनांक १८-११-९६ दै. वर्तमानपत्रात प्रसिध्दी केली असता निवि विकल्याची तारीख १९-११-९६ ते २९-११-९६ अशा ठेवण्यात आली आणि त्या काळात ३ निविदा विकल्या गेल्या व दि. ०५-१२-९६ रोजी तीन निविदा प्राप्त झाल्या त्यात.

१. महाराष्ट्र लघु उद्योक विकास मंडळ
२. ट्राडन्ट स्टील जळगांव
३. अमित स्टील रोलींग जळगांव यांच्या निविदा प्राप्त झाल्या. त्याचे दर व अटी खालील प्रमाणे आहे.

| व्यास | वजन | एम. एस. आय. डी. सी. | | टायडन्ड स्टील | | आमित स्टील | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | दर | रक्कम | दर | रक्कम | दर | रक्कम |
| ६ मीमी | २० मे रु. | १६२५० | ३२५००० | १६४२५ | ३३८५०० | १६६५० | ३३३००० |
| ८ मीमी | ६० मे रु. | १६६०० | ९९६००० | १६८५० | १०११००० | १६९५० | १०१७००० |
| १०मीमी | ४० मे रु. | १६५०० | ६६०००० | १६८२५ | ६७३००० | १६९७५ | ६७९००० |
| १२ मीमी | ४० मे रु. | १६२५० | ६५०००० | १६४७५ | ६५९००० | १६७०० | ६६८००० |
| १६ मीमी | २५ मे रु. | १६२५० | ४०६२५० | १६५१० | ४१२७५० | १६७०० | ४१७५०० |
| २० मीमी | १० मे रु. | १६४०० | १६४००० | १६५५० | १६५५०० | १६९०० | १६९००० |
| २५ मीमी | ०५ मे रु. | १६४०० | ८२००० | १६६०० | ८३००० | १६८०० | ८४००० |
| | | | **३३८३२५०** | | **३३३२७५०** | | **३३६७५००** |

१. एम. एस. एस. आय. डी. सी. (महाराष्ट्र लघु उद्योक विकास मंडळ)

**<u>अटी :</u>**

१. इन्कमटॅक्स बेबाकी प्रमाणपत्र जोडले आहे.
२. सेलटॅक्स बेबाकी प्रमाणपत्र जोडले आहे.
३. आय. एस. आय. लायसन्स प्रमाणपत्र सोबत जोडले आहे.
४. आय. एस. आय. प्रमाणपत्र सोबत जोडले आहे.
५. इतर कार्यालयीन आदेश सोबत जोडला आहे.

**ट्रायडन्ट स्टील लि. :**

१. इ. एम. डी. सोबत जोडली आहे.
२. सर्व करासहीत जकातीसह दर दिले आहेत.
३. सदरील दर ९० दिवसाकरीता बंधनकारक राहतील.
४. वेळेच्या आत मालाचा पुरवठा करण्यात येईल.
५. निविदेतील अटी प्रमाणे अटी मंजूर आहेत.

**अमित स्टील रोलींग जळगांव :**

१. इ. एम. डी. सोबत जोडला आहे.

२. सदरील दर ९० दिवसाकरीता बंधनकारक राहतील.
३. मालाचापुरवठा ४५ दिवसांत करण्यात येईल.
४. निविदेतील अटी मंजूर आहेत.
५. सदरील दर सर्व करासहित जकातसह पुरवठा करण्यात येईल.

तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी असलेली दराची निविदा महाराष्ट्र राज्य अधिकृत महामंडळ, औरंगाबाद यांची निविदा असून, अंदाजपत्रकापेक्षा २,८६७५०/- ने कमी आहे. त्यास मा. आयुक्तांनी निविदा मंजूर करण्यास हरकत नाही. असा अभिप्राय दि. ११-१२-९६ रोजी दिलेली आहे.

तरी महाराष्ट्र राज्य अधिकृत महामंडळ औरंगाबाद यांची निविदा विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्यानुसार, मनपाच्या बांधकामासाठी विविध विभागातून एकूण २०० टनाची लोखंडाची मागणी आलेली असून सदर लोखंड प्रस्तावित विविध व्यासाचे खरेदी करण्याकरीता मागविण्यात आलेल्या मे. एम. एस. आ. डी. सी. (महाराष्ट्र लघु उद्योग विकास महामंडळ) यांचेकडून प्राप्त निविदापैकी सर्वात कमी म्हणजे अंदाजपत्रकापेक्षा २,८६,७५०/- ने कमी असलेल्या दराने खरेदी करण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

# ऐनवेळचे विषय

**विषय क्र. ५०९/१ :**

कार्यालयीन आदेश मनपा/अस्था-१/४२३/९६ दि. ०८-०२-९६ नुसार श्री. सी. एल. जयवळ, मुख्याध्यापक शिक्षण विभाग यांचे खाते चौकशी प्रकरणी शिक्षेचे आदेश काढण्यात आलेले आहेत.

वरील आदेशा विरुध्द श्री. जयवळ यांनी मा. स्थायी समितीकडे अपिल दाखल केलयानुसार दि. ३०-०७-९६ रोजी संपन्न झालेल्या स्थायी समिती बैठकी मध्ये ठराव क्र. १२१/१ नुसार श्री. जयवळ यांचे वरील सर्व आरोपाबाबत त्यांना निर्दोष सोडण्याचा निर्णय घेण्यात आलेला आहे.

तथापी श्री. जयवळ यांचे वरील सर्व आरोप सिध्द झाल्यामुळे त्यांना विभागीय चौकशीत प्रस्तावित केले नुसार शिक्ष देण्यात आली आहे. करीता प्रकरणात श्री. जयवळ यांना पूर्णपणे निर्दोष न सोडता मा. स्थायी समितीने दिनांक ३०-०७-९६ रोजी घेतलेल्या निर्णयावर फेर विचार होणेस्तव प्रस्ताव सादर.

**संवाद :**

**मा. सभापती** : दि. ३०-०७-९६ रोजी ठराव क्र. १२१/१ स्थायी समितीने श्री. सी. एल. जयवळ यांचे वरील आरोपाबाबत निर्दोष सोडण्याचा निर्णय घेतलेल्या होता, परंतु प्रशासनाने याबाबत आज ऐन वेळचा प्रस्ताव फेरविचारार्थ ठेवलेला आहे. तेव्हा श्री. जयवळ यांना प्रशासनाने ज्या तीन शिक्षा प्रस्तावित केलेल्या होत्या त्यामधुन दोन शिक्षा रद्द करण्याचा निर्णय स्थायी समिती आज घेत असून, फक्त दि. ०१-१०-१२ पासुन एक वार्षीक वेतनवाढ रोखण्याची प्रशासनास शिफारस करण्यात येत असून, त्याचा पुढील पदोन्नतीवर कोणताही परिणार होणार नाही. असे समजुन आज स्थायी समिती निर्णय

देत आहे व सदरचा प्रस्ताव आजच कायम करण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, श्री. सी. एल. जयवळ यांना त्यांच्या विभागीय चौकशी आरोप सिध्द झाल्याने प्रशासनाने तीन शिक्षा प्रस्तावित केलेली होती, त्यामुळे श्री. जयवळ यांनी स्थायी समितीकडे अपिल केल्याने दि. ३०-०७-९६ च्या १२१-१ च्या ठरावान्वये स्थायी समितीने श्री. जयवळ यांना निर्दोष असल्याचे निर्णय दिला. त्यानुसार प्रशासनाने पुन्हा फेरविचारार्थ प्रस्ताव दाखल केला असता श्री. सी. एल. जयवळ यांच्या वरील एकूण तीन शिक्षपैकी दोन शिक्षा रद्द करुन त्यांची एक वार्षीक वेतनवाढ दिनांक ०१-१०-९२ पासून रोखण्यात यावी ही एकच शिक्षा श्री. जयवळ यांना देण्याबाबत स्थायी समिती निर्णय देत असून, त्यामुळे त्यांच्या भविष्यात पदोन्नतीसाठी कोणताही परिणाम होणार नाही. यासह सर्वानुमते मंजुरी देण्यात येते व आजच्या सभेत प्रस्ताव कायम करण्यात येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ५१०/२ :**

कार्यकारी अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, संजयनगर येथे १०० मी. मी. व्यासाची ए. सी. जलवाहिनी टाकण्यासाठी परिसर अभियांत्रिकी विभागाची ९४-९५ च्या दरसुची नुसार र. रु. ३,२२,०००/- एवढयाचे अंदाजपत्रक तयार करण्यात आले असून, त्यास स्थायी समिती ठराव क्र. ५७/२ दि. १२-०७-९६ अन्वये मंजुरी देण्यात आलेली आहे. कार्यालयाची निविदा सुचना क्र. ९५/९६ जी की, दै. वर्तमानपत्रात प्रसिध्दी देण्यात येऊन बी-१ निविदा मागविण्यत आल्या. कोऱ्या निविदा विक्रीच्या अंतिम तारखे पर्यंत एकूण ७ (सात) कोऱ्या निविदा विक्री झाल्या व सिलबंद निविदा स्विकारण्याच्या नियोजीत तारखेपासून एकूण दोन (२) सिलबंद निविदा प्राप्त झाल्या. प्राप्त निविदा खालील प्रमाणे आहेत.

| | | |
|---|---|---|
| १. | श्री. आर. एस. भाटीया | ४.९९% जास्त |
| २. | श्री. शेख मसूद | ४.५०% जास्त |

वरील प्रमाणे तुलनात्मकदृष्ट्या कमी दर हा श्री. शेख मसूद यांचा आहे. सदरचे अंदाजपत्रकीय दरापेक्षा ४.५०% जास्त हा दर दिलेला आहे. निविदाधारकांनी दिलेला दर हा कार्यालयात जास्तीचा वाटत असल्यामुळे दराबाबत वाटाघाटी करण्यासाठी मा. आयुक्त यांच्या दालनातील ठेकेदारास बोलाविण्यात आले असता अंदाजपत्रकीय दरापेक्षा १% कमी या दरात करण्यास मा. आयुक्त यांनी मान्यता दिली आहे.

तरी वाटाघाटी अंतीचा दर म्हणजेच अंदाजपत्रकीय दरापेक्षा १% कमी दराची श्री. शेख मसूद यांची निविदा स्विकृतीस्तव प्रस्ताव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्यानुसार, संजयनगर येथे १०० मी. मी. व्यासाची ए. सी. जलवाहिनी टाकण्याच्या कामाकरीता प्राप्त झालेल्या निविदांपैकी तुलनात्मकदृष्ट्या कमी व अंदाजपत्रकीय दरापेक्षा १% कमी दराची श्री. शेख मकसूद यांची निविदा स्विकारण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र ५११/३ :**

शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला की, सिध्दार्थ उद्यान येथील प्राणी संग्राहालयामध्ये खडी रस्ता तयार करण्याचे कामासाठी स्थायी समिती बैठक दिनांक १८-

०३-९६ ठराव क्र. ५७०/८ अन्वये रक्कम रु. १,२८,०५०/- चे अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजुरी मिळालेली प्राप्त झालेली आहे. सदर काम हाती घेण्यासाठी कार्यालयीन आदेश क्र. एमईडब्ल्यु/बी/९९७/९६ दि. ११-०९-९६ अन्वये श्री. एम. के. राठोड यांना कार्यादेश देण्यात आला होता व त्याप्रमाणे कामही पूर्ण झालेले आहे. मा. आयुक्त यांनी स्थळ पाहणीच्या वेळेत हत्तीच्या तयारी करीता त्वरीत खडी रस्ता तयार करण्याच्या सुचना दिल्या त्यामुळे सदर कामात हत्तीच्या ट्रॅक करीता उर्वरीत खडी रस्त्याचे कामात र. रु. १,२६,२०/- ची वाढ झालेली आहे व सदरील काम मुळ काम करणारी यांचेकडून मंजूर दराप्रमाणे म्हणजेच १% कमी दराने श्री. एम. के. राठोड करण्यास मा. आयुक्तांनी दि. ११-१२-९६ नुसार मंजूरी दिली आहे.

सबब सदर कामाचे सुधारीत अंदाजपत्रक र. रु. २,५४,२९०/- ला तसेच सदरील काम मुळ गुत्तेदार श्री. एन. के. राठोड यांचेकडून मंजुर निविदा दर म्हणजेच अंदाजपत्रक दरापेक्षा १% (उक टक्का कमी) कमी दराने करुन घेण्याच्या मंजुरीस्तव प्रस्ताव विचारार्थ सादर. सदरील खर्च सिध्दार्थ उद्यान विकास कार्यक्रम या लेखा शिर्षा मधून सन ९६-९७ या वर्षात करण्यात येईल.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्यानुसार, सिध्दार्थ उद्यान प्राणी संग्राहालयामध्ये खडी रस्ता तयार करण्याचे कामाकरीता तयार करण्यात आलेल्या वाढीव अंदाजपत्रक रक्कम रु. २,५४,२९०/- ला तसेच सदरील काम मुळ गुत्तेदार श्री. एम. के. राठोड यांचेकडून मंजूर निविदा दर म्हणजेच अंदाजपत्रकीय दरापेक्षा १% कमी दरापेक्षा १% कमी दराने करुन घेण्यास तसेच सदरील खर्च सिध्दार्थ उद्यान विकास कार्यक्रम या लेखा शिर्षामधून करण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ५१२/४ :**

अति. शहर अभियंता यांनी प्रस्ताव दिलेला आहे. दशमेशनगर, टिळकनगर या रस्त्यावर विद्युतीकरण करण्याच्या कामासाठी सा. बा. खात्याच्या सन ९६-९७ च्या दरसुची नुसार र. रु. २,६०,०००/- चे अंदाजपत्रक तयार करण्यात आले आहे. सदरील खर्च सन ९६-९७ या आर्थिक वर्षात नविन पोल बसविण्यासाठी उपलब्ध असलेल्या रु. ६५.०० लाखाच्या तरतुदीमधून करण्यात येईल.

तरी सदर कामासाठी तयार करण्यात आलेल्या रु. २,६०,०००/- चे अंदाजपत्रक मंजुरी बाबतचा प्रसताव विचारार्थ तथा मंजुरीस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, दशमेशनगर, टिळकनगर या रस्त्यावर विद्युतीकरण करण्याच्या कामासाठी तयार करण्यत आलेल्या र. रु.२,६०,०००/- च्या अंदाजपत्रकास व सदर खर्च नविन पोल बसविण्याकरीता उपलब्ध असलेल्या रु. ६५.०० लाखाच्या तरतुदीमधून करण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ५१३/५ :**

अति. शहर अभियंता यांनी प्रस्ताव दिला की, मुथियान कॉर्नर ते दर्गा रोड या रस्त्यावर विद्युती करणाचे काम करण्यासाठी सा. बा. खात्याच्या सन ९६-९७ च्या दरसुचीनुसार र. रु. ४,९९,०००/- चे अंदाजपत्रक तयार करण्यात आले आहे. सदरील खर्च

सन ९६-९७ या आर्थिक वर्षाकरीता " नविन पोल लावणे " या शिर्षकाखाली उपलब्ध असलेल्या रु. ३५.०० लाखाचे तरतुदीमधून करण्याचे प्रस्तावित आहे.

तर सदर कामाकरीता तयार करण्यात आलेले रु. ४,९९,०००/- चे अंदाजपत्रक मंजुरी बाबतचा प्रस्ताव विचारार्थ तथा मंजुरीस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्यानुसार, मुथियान कॉर्नर ते दर्गा रोड या रस्त्यावर विद्युती करणाचे काम करण्यासाठी तयार करण्यात आलेल्या र.रु. ४,९९,०००/- चे अंदाजपत्रकास तसेच सदर खर्च " नविन पोल लावणे " या शिर्षकाखाली उपलब्ध असलेल्या तरतुदीमधून करण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ५१४/६ :**

शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, पडेगांव स्लम येथील सार्व. शौचालयाची दुरुस्ती करणे, फरशी बसविणे, बाबत कामाकरीता सा. बा. खाते यांच्या वर्ष ९५-९६ च्या दरसुचीनुसार रु. ३,६८,१३०/- चे अंदाजपत्रक तयार करण्यात आले आहे. यापुर्वी शौचालयाची दुरुस्ती ९४ साली करण्यात आली होती. दरम्यानच्या काळात शौचालय नादुरुस्त झाले असून, पडेगांव परिसरात लहान गल्यांमध्ये फरशी बसविणे आवश्यक आहे. कारण पावसाळयात चिखल होऊन नागरिकांना त्रास होतो. तसेच गटारीची किरकोळ दुरुस्ती आवश्यक आहे.

सदरील काम " १८ खेडी विकास योजना " या शिर्षकातून करण्यात येईल.

सदरच्या अंदाजपत्रकास मा. आयुक्त साहेबांनी दि. ३१-१०-९६ ला प्रशासकीय मान्यता दिली आहे.

करीता या कामासाठी तयार करण्यात आलेले अंदाजपत्रक र. रु. ३,६८,१३०/- यांस मान्यतेचा प्रस्ताव विचारार्थ तथा मंजुरीस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्यानुसार, पडेगांव स्लम येथील सार्व. शौचालयाची दुरुस्ती करणे, फरशी बसविणेच्या कामाकरीता तयार करण्यात आलेल्या र. रु. ३,६८,१३०/- च्या अंदाजपत्रकास तसेच सदर खर्च " १८ खेडी विकास योजना " या शिर्षकातून करण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ५१५/७ :**

मालमत्ता अधिकारी यांनी मा. आयुक्त यांच्या मंजुरी नुसार प्रस्ताव सादर करीत आहे की, पीर बाजार येथील मच्छी मार्केट व भाजी मार्केट ओटयाचे भाडे व अनामत रक्कम निश्चित करण्यासाठी समिती गठित करण्यात आली होती. सदरील समितीने खालील प्रमाणे अहवाल सादर केलेला आहे.

| | | |
|---|---|---|
| १. | सिध्द शिर्घ गणका नुसार जागेचे किंमत (या ठिकाणी फक्त ओटे असल्याने) | रु. १००.०० चौ.मी. |
| २. | बांधकाम खर्च (सोयी सुविधा वरील खर्च वगळून बांधकाम खर्च प्र. चौ. मी.) | रु. १८६.७७५<br>रु. १८६.७७५<br>रु. १६९१.१८<br>रु. १६९९.०० |

**(अ) अनामत रक्कम :**

| | |
|---|---|
| (एकूण बांधकाम खर्चाचे निम्मी रक्कम अनामत रक्कम म्हणून घेण्यात यावी प्रति ओटा अनामत रक्कम ओटयाचे क्षेत्र ६.२५ चौ. मी.) | = रु. १६X६X२५ / २ |
| | = रु. ५२८५/- |
| | = रु. ५०००/- |

(ब) मासीक भाडे :

| | |
|---|---|
| (एकूण बांधकाम वरील उर्वरीत निम्मा खर्च व जमिनी किंमत किमान पाच वर्षात वसुल व्हावे यादृष्टीने भाडे निश्चित करण्यात यावे.) | = ५०००.०० |
| | = ५५६८.७५ |
| | = ५५७०.०० |
| १. उर्वरीत बांधकाम खर्च (१६९१X६.२५) | = रु. ९०० X ६.२५ |
| | = ५५६८.७५ |
| २. जागेची किंमत प्रत्येक ओटया करीता | = ५५७० + ५६२५ / ६० |
| | = १८६.५८ |
| | = रु. २००/- |

याशिवाय मालमत्ता करासह इतर शुल्क हे वेगळे राहतील व दर पाच वर्षी नंतर भाडे सुधारीत करण्यात यावे.

मुल्य निर्धारण यांनी प्रति ओव्या करीता मासिक भाडे विचारात घेऊन प्रति ओटया करीता मालमत्ता कर आकारणी करावी असे समितीचे मत आहे.

तथापि स. सदस्य श्री. प्रकाश भाऊराव निकाळजे यांनी पत्र दिले आहे की, पीर बाजार भाजी मंडई मध्ये मासे विकण्याचे दुकाने मनपाने काढलेल्या आहेत. या भागात संबंधित लोक मासे विकणे, अंडी विकणे, बोंबील विकणे हा व्यवसाय उघड्यावर करीत आहे. या भागात सतत दुर्गंधी राहत असल्याने या ठिकाणी वरील व्यवसाय करण्याचे मागणी नुसार ओटे बांधण्यात आले आहे. त्यांनीच ओटे देण्या बाबत स. सदस्यांनी पत्र दिले आहे. तसेच सदरील इसमांची नावे खालील प्रमाणे आहे.

| | | | |
|---|---|---|---|
| १. | लहू निवृत्ती | २. | अंकुश बाबुराव |
| ३. | विजय त्र्यबंक | ४. | शे. नजिर शे. अब्दुल रहेमान |
| ५. | श्री. रोहीदास बाबुराव | ६. | शोभा त्र्यबंक |
| | | ७. | भाऊसाहेब |

तसेच सदरील मच्छी दुकानासाठी दोन अर्ज प्राप्त झालेले आहे. धोरण लागू करणे बाबत व स. सदस्य यांचया पत्रावर विचार करणेस्तव प्रस्ताव मा. स्थायी समिती समोर विचारार्थ सादर.

**संवाद :**

**श्री. गौतम खरात :** डिपॉझिट कमी करावे व भाड्यात कमी करावे.

**मालमत्ता अधिकारी :** डिपॉझिट भरुन घ्यावे.

**मा. सभापती** : आपण यांना करारान्वये देत आहोत काय सुरुवातीला आणि डिपॉझिट रु. २५००/- व भाडे रु. १५०/- आणि यांनी जर पुढच्या सहा महिन्याच्या आत पुढील २५००/- व भाडे रु. १५०/- आणि यांनी जर पुढच्या सहा महिन्याच्या

आत पुढील २५००/- दिले नाही तर म्हणजे वर्षभरात पूर्ण रु. ५,०००/- दिले नाही तर पुन्हा यांना रेनेवल करावयाचे नाही अशी शर्त टाकावे.

**मा. आयुक्त** : डिपॉझिट दिले तर भाडे लवकर देत नाही.

**मा. सभापती** : प्रशासनाने यात दुरुस्ती सुचविलेली आहे. भाडे रु. १२५/- घ्यावे.

**श्री. गौतम खरात :** सदरचे लोक रु. १००/- चा माल आणतात आणि विक्री करतात त्या लोकांनाही परवडले पाहिजे आणि यासाठी डिपॉझीट कमी करावे.

**मा. सभापती** : या भागातील स. सदस्य श्री. प्रकाश निकाळजे सहकार्य करतील या अटीवर डिपॉझिट रु. २५००/- घ्यावे व पुील सहा महिन्यात रु. २५००/- असे दोनदा वर्षा भरात रु. ५०००/- व मासिक भाडे रु. १५० घ्यावे व ११ महिन्या पर्यत रेटेवल करुन घ्यावे या अटीवर मान्य.

**श्री. कचरु नवपुते :** स. सदस्य श्री. भगवान घडामोडे यांच्या वार्डात जसे मार्केटचे दुकाने होत आहेत. तीच सवलत यानाही दयावी.

**मा. सभापती** : एकाला आपण सवलत दिली तर सर्वांनाच याचा फायदा दयावा लागतो त्यामुळे आपले दुकने भाड्याने देण्यासाठी आपण सवलत दिली नाही तर आपले शॉपिंग कॉम्लेक्स तसेच पडून राहतील. त्यांचे भाडेही नाही, डिपॉझिट नाही. यासाठी एकच पॉलीसी डिसाईड व्हायला पाहिजे.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, पीर बाजार येथील मच्छी मार्केट व भाजी मार्केट ओटयाचे भाडे व अनामत रक्कम निश्चित करण्यासाठी गठिक करण्यात आलेल्या समितीने शिफारस केल्यानुसार अनामत रक्कम रु. ५,०००/- घेण्यास मंजुरी देण्यात येते. तथापी स. सदस्यांच्या सुचना लक्षात घेऊन सदरील अनामत एकत्रित न घेता दोन समान हफ्त्यात वसुल करण्यात यावी आणि दर महा भाडे रु. ६०० ऐवजी रु. १५०/- आकारण्यात यावे अनामत रक्कम वेळेच्या आत न भरल्यास संबंधिताचा करारनामा संपुष्टात आणून महापालिकेने ओटा ताब्यात घेण्याची कार्यवाही करावी. याशिवाय मालमत्ता करासह इतर शुल्क वेगळे राहतील व दर पाच वर्षानंतर भाडे सुधारीत करण्यात यावे.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ५१६/८ :**

शिक्षणाधिकारी यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, मनपाच्या प्राथमिक शाळेसाठी दृकश्राव्य शैक्षणिक साहित्यांर्गत फिल्म प्रोजेक्टर व शैक्षणिक फिल्म स्लाईडस खरेदी करण्यासाठी दै. वर्तमान पत्रातुन जाहिर निविदा मागविण्यात आल्या होत्या. त्यानुसार पाच निविदा विक्री झाल्या त्यापैकी ३ तीन निविदा प्राप्त झाल्या. प्राप्त झालेले दर या प्रमाणे आहेत.

| अ.क्र. | साहित्यांचे नांव | मे. स्वास्तिक ट्रे. क. दर रु. | मे. सलवाइंटर प्रायजेस दर रु. | मे महाविर ट्रे. कं. दर रु. |
|---|---|---|---|---|
| १. | फिल्म प्रोजेक्टर | ३९५०/- | ५२००/- | ३४५०/- |
| २. | शै. फिल्म स्लाईडस (१० संच) | -- | -- | -- |

सर्वात कमी दर मे. महावरी ट्रेडींग कं. औरंगाबाद यांचे आहेत. ३० शाळे करीता प्रोजेक्टर इतिहास भूगोल समाजशास्त्र प्राणी जगत अशा विविध विषयाच्या स्लाईड्स पुरविणे प्रस्तावित असून, याकरीता रु. २,९८,२००/- (रु. दोन लाख अठ्ठयान्नव हजार दोनशे फक्त) खर्च येणार आहे. सदर खर्च शिक्षण विभागाच्या " विज्ञान साहित्य " या चार लक्ष रु. तरतुदीतून करण्यात येईल. तसेच यापुढे इतर शाळेची मागणी असल्यास याच दराने सदरील उपकरणे खरेदी करण्यात येईल. करीता प्रस्ताव मान्यतेस्तव सादर.

**संवाद :**

**मा. सभापती** : मंजुरी सोबतच प्रस्तावास स्विकृती देण्यात येते. यात एक दुरुस्ती मे. महावरी नसून महाविर आहे.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, महापालिकेच्या प्राथमिक शाळेसाठी दृकश्राव्य शैक्षणिक साहित्य अंतर्गत फिल्म प्रोजेक्टर व शैक्षणिक फिल्म स्लाईडस खरेदी करण्यासाठी दैनिक वृत्तपत्रातून जाहिर निविदा मागविल्या नुसार सर्वात कमी दर मे. महाविर ट्रे. कंपनी दर रु. खालील प्रमाणे.

| | | |
|---|---|---|
| १. | फिल्म प्रोजेक्टर | रु. ४३५०/- |
| २. | शै. फिल्म स्लाईडस (१० संच) | रु. २९५/- |

औरंगाबाद यांचे आहेत. ३० शाळे करीता फिल्म प्रोजेक्टर इतिहास, भूगोल, समाजशास्त्र, प्राणी जगत अशा विविध विषयाच्या स्लाईड्स पुरविणे करीता रु. २,९८,२००/- चे खर्चास " विज्ञान व साहित्य " शिक्षण विभागाच्या तरतूदी मधून करण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते व आजच्याच सभेत स्विकृती देण्यात येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र ५१७/९ :**

लेखाधिकारी यांनी प्रस्ताव सादर केला की, महापालिकेच्या गणवेश वाटप उपविधी नुसार ज्या कर्मचाऱ्यांना गणवेश देय आहेत. ते शिलाई करुन घेण्यासाठी निविदा सुचना क्र. ५०३/९६/दि. ३०-०९-९६ ही दैनिक वर्तमानपत्रात प्रसिध्दीस देण्यात येऊन स्थानिक टेलर्स कडून सिलबंद निविदा मागविण्यात आल्या. कोऱ्या निविदा विक्रीच्या अंतिम तारखे पर्यंत एकूण नऊ (९) निविदा विक्री झाल्या व प्राप्त झाल्या त्या खालील प्रमाणे आहे.

| अ.क. | टेलर्सचे नांव | कोट शिलाई दर | ड्रेस शिलाई दर |
|---|---|---|---|
| १. | मे. ग्रेट मास्टर | ११०.५० प्र. नग | ५९.०० प्र. ड्रेस |
| २. | श्री. आर. एस जैस्वाल | ९२.०० | ३२.०० |
| ३. | श्री. सय्यद मोईन | -- | ७३.०० |
| ४. | श्री. सोहेल टेलर्स | १२०.०० | ७०.०० |
| ५. | श्री. सुरेश टेलर्स | ९२.०० | ३२.०० |
| ६. | मे. पायोनिर टेलर्स | १४०.०० | ४०.०० |

| | | | |
|---|---|---|---|
| ७. | मे. एम. एस. एस. आय. डी. सी. | ३५०.०० | ५०.०० |
| ८. | श्री. मुस्तफा खान | १८९.०० | ५९.०० |
| ९. | मे. फाईन आर्ट | ४००.०० | ५०.०० |

वरील प्रमाणेच्या तुलनात्मकदृष्ट्या कोट शिलाई व ड्रेस शिलाईसाठी मे. सुरेश टेलर्स व श्री. आर. एस. जैस्वाल यांचे दर सारखा आहे. म्हणजेच कोटासाठी ९२.०० प्रति नग व ड्रेस शिलाई ३२.०० प्रति नग असा आहे. वरील दोन्हीही निविदा धारकांना मा. आयुक्त यांच्या दालनात दराबाबत चर्चेसाठी दिनांक ०६-१२-९६ रोजी बोलाविण्यात आले, त्यावेळी मा. आयुक्त यांनी दोन्हीही निविदा धारकांनी दिलेले दर मंजुर करुन त्यांना समान प्रमाणात काम वाटप करण्यात मंजुरी दिली आहे.

करीता कमी दराचे निविदा धारक श्री. आर. एस. जैस्वाल व मे. सुरेश टेलर्स यांच्या तर्फे उल कोट रु. ९२/- प्रति नग व ड्रेस रु. ३२.००/- प्रति ड्रेस या दराने सम प्रमाणात शिलाई करुन घेण्यासाठी प्रस्ताव विचारार्थ व मंजुरीस्तव सादर.

**संवाद :**

मुलांचे जे ड्रेस शिवलेले होते तोच करार असावा व डॉ.आंबेडकर संशोधन केंद्रात संबंधितांनी शिलाई मशिन आणून ठेवावी व कामाला लागावे. या प्रस्तावास मंजुरी देऊन स्विकृती देण्यात येते. यामध्ये प्रामुख्याने १) करारनामा करावा. २) ५०.५० ड्रेस एकदाच शिवुन दयावे. ३) काम समाधानकारक न झाल्यास गुत्तेदरांचे नांव ब्लॅक लिस्ट टाकण्यात येईल. ४) शिलाई करीता टाईम बॉन्ड एका महिन्याच्या कालावधी करीता देण्यात यावा. ५) २६ जानेवारी ९७ पर्यंत सर्व कर्मचाऱ्यांनी ड्रेसवर येतील या पध्दतीने वाटप करण्याची कार्यवाही करावी.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, महानगरपालिकेच्या गणवेश वाटप उपविधी नुसार ज्या कर्मचाऱ्यांना गणवेश देय आहेत. ते शिलाई करुन घेण्यासाठी मागविण्यात आलेल्या निविदा नुसार प्राप्त झालेल्या सर्वात कमी निविदा धारक श्री. आर. एस. जैस्वाल व मे. सुरेश टेलर्स यांच्या तर्फे उतन कोट रु. ९२/- प्रति नग व ड्रेस रु. ३२.००/- प्रति ड्रेस या दराने सम प्रमाणात शिलाई करुन घेण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

**विषय क्र. ५९८/१० :**

कार्यकारी अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला की, जाधवमंडी येथील सुंदर टी सेंटर पासून नॅशनल बांबू डेपो पर्यंत ६ " चिनी ऐवजी १० " आर. सी. सी. लाईन टाकणे बाबत अंदाजपत्रकीय रक्कम रु. १,४५,८००/- यास स्थायी समिती मध्ये ठराव क्र. १६६/१२ दि. ०९-०८-९६ द्वारे मान्यता मिळाल्यानंतर निविदा सुचना प्रसिध्दी करुन निविदा मागविल्या असता एकूण अकरा निविदा विक्री झाल्या होत्या त्यापैकी एकूण दोन निविदा प्राप्त झाल्या असून, त्यांचा तपशील खालील प्रमाणे दर्शविले आहेत.

| | | |
|---|---|---|
| १. | श्री. मोहमंद जाफेर | अंदाजपत्रकीय दराने |
| २. | श्री. बी. एस. काल्डा | अंदाजपत्रकीय दरापेक्षा ५% जास्त दराने |

परंतु कमी दराचे श्री. मोहंमद जाफेर यांना दराबाबत वाटाघाटीसाठी कार्यालयीन पत्रक क्र. ८३५/ दि. ०३/१२/९६ द्वारे बोलाविले असता संबंधित ठेकेदार श्री. मोहमंद जाकेर यांनी अंदाजपत्रकाच्या दरापेक्षा २% कमी दराने काम करण्यास तयार असल्या बाबत संमती दर्शविली आहे.

तरी अंदाजपत्रकाच्या दरापेक्षा २% कमी दराचे श्री. मोहमंद जाकेर यांच्या दरपत्रकास मंजुरी मिळाणेस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, जाधवमंडी येथील सुंदर टी सेंटर पासून नॅशनल बांबु डेपो पर्यंत ६ " चिनी ऐवजी १० " आर. सी. सी. लाईन टाकणेच्या कामाकरीता प्राप्त झालेल्या निविदा पैकी दराच्या दरपत्रक धारकांशी झालेल्या वाटाघाटी अंती ठरविल्या नुसार सदर काम श्री. मोहंमद जाकेर यांचे कडून अं. प. दरापेक्षा २% कमी दराने करुन घेण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ५१९/११ :**

कार्यकारी अभियंता, पाणी पुरवठा व जलनि:सारण यांनी प्रस्ताव सादर केला की, गांधीनगर ते फकीरवाडी पुला पर्यंत नाल्यास संरक्षित भिंत बांधणे बाबत अंदाजपत्रक रक्कम रु. ७,५०,०००/- यास ठराव क्र. ३२७/२३ दि. २८-२२-९५ द्वारे मान्यता मिळाली होती. तसेच ठराव क्र. ४३७/१३ द्वारे दि. १३-०२-९६ द्वारे श्री. शेख शरीफ ठेकेदार यांची निविदा अंदाजपत्रकीय दरापेक्षा २२% कमी दरास मान्यता मिळाली आहे, निविदेच्या हद्दीपर्यंत काम झालेले आहे, परंतु सदरील ठिकाणी गांधीनगर महानगरपालिकाच्या शाळेजवळ अजून ५० मिटर काम शिल्लक आहे व सदरील काम करणे आवश्यक आहे.

सदरील निविदा ही २२% कमी दराची असल्यामुळे आता पावेतो ७.५० लक्ष पैकी फक्त ५.७१ लाख खर्च झालेला आहे. १.७९ लक्ष रुपयाची बचत झालेली आहे, निविदेच्या रक्कमेपेक्षा १०% अधिक रक्कमे पर्यंत काम करण्याची परवानगी मिळाल्यास शिल्लक ५० मिटरचे काम करुन घेता येईल, वाढीव कामाचे अंदाजपत्रक र. रु. २,५०,०००/- चे तयार करण्यात आले असून, त्यात २२% कमी प्रमाणे काम करुन घेतल्यास २,००,०००/- पर्यंत होईल ठेकेदार सदरील काम २२% कमी दराने करण्यात तयार आहे. संबंधित काम हे शासकीय अनुदान ९५-९६ मधुन प्रस्तावित आहे.

तरी वाढीव अंदाजपत्रक रक्कम रु. २,५०,०००/- यास तसेच संबंधित काम जुन्या दराने म्हणजे अंदाजपत्रकाच्या दरापेक्षा २२% कमी दराने श्री. शेख शरीफ यांच्या मार्फत करुन घेण्या बाबत मंजुरीस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, गांधीनगर ते फकीरवाडी पुला पर्यंत नाल्यावर संरक्षित भिंत बांधणेचे उर्वरित ५० मिटरचे काम करण्याकरीता तयार करण्यात आलेल्या रु. २,५०,०००/- च्या अंदाजपत्रकास व सदरील काम पुर्वीचेच गुत्तेदार, श्री. शेख शरीफ यांच्या मार्फत पुर्वीच्या मंजुरा दर म्हणजे अ. प. दरापेक्षा २२% कमी दराने करुन घेण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ५२०/१२ :**

उप आयुक्त-२ यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, सन १९९०-९१ पासून राज्यात केंद्र शासन पुरस्कृत " शहरी गरिबांसाठी नागरी मुलभूत सेवा "कार्यक्रम राबविण्यात येते. शासनाच्या मार्गदर्शक तत्वानुसार गरीब वस्तीतील २०० कुटूबांसाठी एक समुह संघटक व १०००० कुटूंबासाठी एक प्रकल्प अधिकारी नियुक्त करणे बाबत शासनाचे सुचना आहेत.

शासन निर्णय क्र. युबीएसी-१०९३/१६४४/प्रक्र/१०५/नवि-३३ दि. ३१ मार्च ९६च्या शासन निर्णया नुसार समुह संघटाकांना द. म. रु. २५००/- व वार्षीक वेतनवाढ रु. २५/- प्रवास भत्ता दरमहा ७५/- देय राहील.

प्रकल्प विभागात १९८३ पासून चार समूह संघटक कार्यरत असून, त्यांची सध्याची वेतनश्रेणी रु. १६४० ते २९०० असून, या चार समुह संघटकांपैकी तीन पुरुष आहेत. यापैकी श्री. माहोरे एस. एम. यांी एम. पी. एस. सी. तर्फे प्रशासकीय अधिकारी वर्ग-२ तसेच शासनाच्या मार्गदर्शक तत्वा नुसार शहरी गरीबांसाठी नागरी मुलभूत सेवा योजनेत ६ स्त्री समुह संघटक असावेत असे वरील शासन निर्णयात नमुद करण्यात आले आहे. त्यानुसार दोन पुरुष समुह संघटाकांना इतरत्र करुन त्यांचे पदावर महिला समुह संघटक नियुक्त करण्यात यावेत. ज्या २ स्त्री समुह संघटक रु. १२००/- द. म. मानधनावर काम करीत आहेत. त्या दोन्ही पदांना एप्रील ९६ पासून द. म. रु. २५००/- मानधन वार्षीक वेतन वाढ २५/- व प्रवास भत्ता रु. ७५/- देण्याबाबत प्रस्ताव मान्यतेस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, शासन निर्णय क्र. युबीएसी-१०९३/१६४४/प्रक्र/१०५/नवि-३३ दि. ३१ मार्च ९६ नुसार दरमहा रु. २५००/- व वार्षीक वेतनवाढ रु. २५/- प्रवास भत्ता दरमहा ७५/- प्रमाणे सध्या शहरी गरीबांसाठी नागरी मुलभूत सेवा योजने अंतर्गत कार्यरत दोन स्त्री समुह संघटक श्रीमती राजकुमारी गायकवाड व श्रीमती सिंधु सुरडकर यांना एप्रिल ९६ पासून वरील प्रमाणे मानधनात वाढ करण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. तसेच दोन पुरुष समुह संघटकांशी प्रशासनाने इतर विभागात बदली करुन त्यांचे जागी स्त्री समुह संघटकांची नियुक्ती जिल्हाधिकारी यांचया संमतीने करण्यात यावी. शासनाच्या धोरणाप्रमाणे वरील योजने अंतर्गत सहा पदे मंजुर आहेत. त्यानुसार श्री. माहोरे (स.स.) सिनवर गेल्यामुळे त्या कालावधीसाठी एक पद तात्पुरत्या स्वरुपाचे एक स्त्री (समुदाय संघटक) कायम स्वरुपी नियुक्त करण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ५२१/१३ :**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, मा. महापौर यांच्यासाठी माहे एप्रिल, ९६ मध्ये नविन मारुती इस्टीम कार खरेदी करण्यात आलेली होती. या कारला दि. ०२-१२-९६ रोजी मा. महापौर मुंबई येथे जात असतांना लोणावळा घाटात अपघात झालेला आहे. या अपघाताने कारचे फार मोठे नुकसान झालेले आहे. मारुती कंपनीने अधिकृत विक्रेते यांच्या दरपत्रकानुसार कार दुरुस्तीसाठी अंदाजे रु. ५.५० लाख खर्च येतो. हा खर्च लक्षात घेता कार खर्च येतो हा खर्च लक्षात घेता कार दुरुस्त करणे योग्य वाटत नाही. तसेच मा. महापौर यांनी इंधन खर्चात बचत येण्यासाठी डिझेल कॉन्टेन्सा (एसी) कार खरेदी करीता हिंदुस्थान मोटार्सचे अधिकृत विक्रेता कडुन दरपत्रके मागविण्यात आली आहेत. दर खालील प्रमाणे आहे.

१. मे. भारत इंजिनिअरींग कंपनी औरंगाबाद रु. ४,८९,६९८.००
२. मे. कैलास एजन्सीज प्रा. लि. औरंगाबाद रु. ४,८८,५००.००

नविन डिझेल कॉन्टेन्सा (एसी) कार करीता मे. कैलास एजन्सीज प्रा. लि. औरंगाबाद यांच्या कमीच्या दराप्रमाणे ४,८८,५००.०० खर्च येतो. हे दर सध्याचे असून, जकात कर वगळून आहे. वाहनाचा ताबा घेतांना जी किंमत असेल त्या प्रमाणे रक्कम अदा करावी लागेल. नविन वाहन खरेदी करीता तरतुद नाही. परंतु राखीव घसारा निधी रु. ४७.४८ लाखातून खर्च भागाविता येईल. तरी प्रस्ताव विचारार्थ सादर.

**संवाद :**

**मा. सभापती** : मंजुर.

**मा. आयुक्त** : मा. महापौर यांच्या गाडीला अपघात झाला. त्या गाडीचे सर्व पैसे परत मिळणार आहे.

**मा. सभापती** : गाडीचे इन्शुरन्स काढलेले असल्याने सदरील गाडीचे पैसे महापालिकेस मिळणार आहेत आता मा. महापौरांसाठी नविन गाडी खरेदी करावयाची असून, प्रस्ताव मंजुर करण्यात येतो.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, मा. महापौरांकडील मारुती इस्टीम या कारला अपघात झाल्याने नविन वाहन खरेदी करणे आवश्यक आहे. त्या अनुषंगाने मा. महापौरांनी मागणी केल्या नुसार डिझेल कॉन्टेसा (एसी) खरेदी करीता प्राप्त झालेल्या दरपत्रकानुसार कमी दराचे दरपत्रधारक मे. कैलास एजन्सीज प्रा. लि. औरंगाबाद यांच्या रु. ४,८८,५००/- च्या दरास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. तसेच सदरील खर्च राखीव घसारा निधी रु. ४८ लाख तरतुी मधून करण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. या ठरावास याच सभोत स्विकृती दिली जाते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ५२२/१४ :**

शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला की, मो. संजयनगर मुकूंदवाडी, वार्ड क्र. ८० दक्षिंण भाग येथे डांबरी रस्ते तयार करणे करीता रक्कम रु. १५,१४,०००/- चे अंदाजपत्रक सार्वजनिक बांधकाम विभाग, औरंगाबाद यांची दरसुची १९९५-९६ प्रमाणे तयार करण्यात आली असून, मा. आयुक्त यांनी दि. ११-०६-९६ रोजी प्रशासकीय मान्यता दिली आहे तसेच सर्वसाधारण सभेचे प्रस्ताव दि. २०-०७-९६ अन्वये मान्यता मिळाल्यानंतर कार्यालयीन निविदा सुचना क्र. मनपा/लेखा/नि/९३-९६ दि. ०९-०८-९६ निविदा मागविण्यात आली असता निविदा विक्रीचा अंतिम दि. १६-०८-९६ निविदा एकूण ३ (तीन) कोऱ्या निविदा विकल्या गेल्या व स्विकारण्याच्या तारखेस २३-०८-९६ रोजी फक्त (३) तीन मोहरबंद निविदा प्राप्त झाल्या त्या निविदा उपस्थित ठेकेदारा समक्ष उघडण्यात आल्या असता ठेकेदारांनी दिलेले दर खालील प्रमाणे.

१. मे. मॉस्कॉट कन्स्ट्रक्शन अंदाजपत्रकीय दरापेक्षा २३.८६% कमी
२. मे. आदिनाथ कन्स्ट्रक्शन अ. प. दरापेक्षा २२.२२% कमी
३. मे. रे. कन्स्ट्रक्शन अ. प. दरापेक्षा १९% कमी

तुलनात्मकदृष्ट्या कमी व अंदाजपत्रकीय दरापेक्षा सर्वात कमी दराची निविदा म्हणजे २३.८६% कमी (अंदाजपत्रकीय दरापेक्षा) मे. मास्कॉट कन्स्ट्रक्शन यांची निविदा आहे. करीता मान्यतेस्तव विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, संजयनगर मुकूंदवाडी, वार्ड क्र. ८० दक्षिंण भाग येथे डांबरी रस्ते तयार करणेच्या कामा करीता प्राप्त झालेल्या निविदा पैकी तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी व अंदाजपत्रकीय दरापेक्षा २३.८६% कमी दराची मे. मास्कॉट कन्स्ट्रक्शन यांची निदि स्विकारण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ५२३/१५ :**

शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, मो. आंबेडकर नगर, वार्ड क्र. १२ येथील रस्त्याचे डांबरीकरण करणे या कामाकरीता यापुर्वी सन १९९३-९४ मध्ये एकूण ६.०० लाख (शासकीय अनुदानातुन) अंदाजपत्रक तयार करण्यात आले होते, परंतु उप अभियंता, जलनिःसारण विभाग (सिडको) यांचे ड्रेनेज लाईन टाकण्याचे व कन्व्हरसेशनचे काम चालू असल्यामुळे सन १९९४-९५ मध्ये काम करता आले नाही, तसेच पुर्वीचे अंदाजपत्रकास २० एम. एम. जाळीचे सिसकोट करण्याची तरतुद होती. परंतु कन्व्हरशन व ड्रेनेज लाईन टाकण्याचे काम व काही भागात नाल्या दुरुस्ती व रोड क्रॉसिंग पाईप टाकण्याचे काम चालू होते. त्यामुळे त्या भागातील रोड अत्यंत खराब झालेले आहे. त्याकरीता प्रस्तृत रोडवर मॅकडम (     ) ५० एम. एम. नाडीचे करणे व त्यावर २० एम. एम. जाळीचे सिसकोट करणे अत्यंत जरुरीचे आहे. त्या करीता दुरुस्ती अंदाजपत्रक रक्कम रु. १५,३२,३६०/- तयार करण्यात आले असून, त्यापैकी रु. ६.०० लाख शासकीय अनुदानातून व उर्वरीत रक्कम रु. १,३२,३६०/- महानगरपालिका फंडातुन अर्थसंकल्प १९९६-९७ नविन डांबरीकरण या शिर्षा तरतुदी नुसार रु. ७०.०० तुन खर्च करण्यात येईल. सदरील दुरुस्ती दिली असून, सर्वसाधारण सभेचे विषय क्र. ५/३ दिनांक २०-०७-९६ रोजी मान्यता मिळाले नंतर रितसर वृत्तपत्रात प्रसिध्दी देऊन कार्यालयीन प्रगट निविदा सुचना क्र. मनपा/लेखा/नि/९३-९६ दिनांक ०९-०८-९६ अन्वये निविदा मागविण्यात आल्या असता निविदा विक्रीच्या अंतिम दिनांक १६-०८-९६ पर्यंत एकूण (३) तीन कोऱ्या निविदा विकल्या गेल्या व स्विकारण्याच्या अंतिम तारखेस २३-०८-९६ रोजी फक्त (२) मोहरबंद निविदा प्राप्त झाल्या त्या निविदा दि. २८-०८-९६ रोजी उपस्थित ठेकेदारासमक्ष उघडण्यात आल्या असता ठेकेदारांनी दिलेले दर खालील प्रमाणे आहे.

| | | |
|---|---|---|
| १. | मे. मॉस्कॉट कन्स्ट्रक्शन | अंदाजपत्रकीय दरापेक्षा २३.८६% कमी |
| २. | आदिनाथ कन्स्ट्रक्शन | अंदाजपत्रकीय दरापेक्षा २२.२२% कमी |

तुलनात्मकदृष्ट्या कमी व अंदाजपत्रकीय दरापेक्षा सर्वात कमी दराची निविदा मे. मॉस्कट कन्स्ट्रक्शन यांची २३.८६% कमी दराची निविदा आहे. तरीही त्यांचे कडून दरपृथःकरण मागविण्यात आले असता संबंधित ठेकेदारांनी दिनांक २५-१०-९६ रोजी लेखी पत्राद्वारे कळविले आहे की, त्यांची स्वतःची मशिनरी असल्या कारणाने त्यांना निविदा दिलेले दर परवडत आहे. म्हणून मा. आयुक्त साहेबांनी दि. २१-११-९६ रोजी मान्यता दिली आहे.

करीता मंजुरीस्तव व विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, आंबेडकर नगर वॉर्ड क्र. १२ येथील रस्त्याचे डांबरीकरण करणेच्या कामाकरीता प्राप्त झालेल्या निविदा पैकी तुलनात्मकदृष्ट्या कमी व अंदाजपत्रकीय दरापेक्षा २३.८६% कमी दराची मे. मास्कॉट कन्स्ट्रक्शन यांची निविदा स्विकारण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ५२४/१६ :**

कार्यकारी अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला की, सिडको एन-३ भागात १०० व १५० मी. मी. व्यासाची ए. सी. जलवाहिनी टाकावयाची आहे. त्यासाठी परिसर अभियांत्रिकी विभागाची सन ९४-९५ च्या दरसुची नुसार रक्कम रु. १७, ५१, ५१३.०० एवढयाचे तयार करण्यात येवून त्यास सर्वसाधारण सभेने ठराव क्र. ८५/६ दिनांक २०-०९-९६ नुसार मंजुरी देण्यात आलेली आहे. कार्यालयाची निविदा सुचना क्र. ११३/९६ दैनिक वर्तमान पत्रात प्रसिध्दीस देण्यात येवून बी-१ निविदा मागविण्यात आल्या. कोऱ्या निविदा विक्रीच्या अंतिम तारखे एकूण १७ (सतरा) कोऱ्या निविदा विक्री झाल्या व सिलबंद निविदा स्विकारण्याच्या नियोजीत तारखेस एकूण सात (७) सिलबंद निविदा प्राप्त झाल्या. प्राप्त निविदा खालील प्रमाणे आहे.

| | | |
|---|---|---|
| १. | सलीम पटेल | २७.९२% कमी |
| २. | शिव कन्स्ट्रक्शन | २१.८०% कमी |
| ३. | बी. ए. काल्डा | १८.६०% कमी |
| ४. | रुबी कन्स्ट्रक्शन | १७.२५% कमी |
| ५. | एम. पी. जैस्वाल | १६.७८६% कमी |
| ६. | के. पी. पाथ्रीकर | ११.०१% कमी |
| ७. | श्री. कुलवंतसिंग | ९.००% कमी |

वरील प्रमाणे तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी दर हा श्री. सलिम पटेल यांचा आहे. म्हणजेच अंदाजपत्रकीय दरापेक्षा २७.९२% कमी असा दर दिलेला आहे.

तर श्री. सलिम पटेल यांची अंदाजपत्रकीय दरापेक्षा २७.९२% कमी दराची निविदा स्विकृतीस्तव प्रस्ताव सादर.

**संवाद :**

**डॉ. विजय कुमार मेहेर :** माझ्या वार्डात प्रस्ताव आहे. रेट ॲनालिसीस करण्यासाठी सांगितलेले आहे. यामध्ये सर्वात कमी दर म्हणून अंदाजपत्रकात दिलेला आहे हे त्यांना परवडले काय? अशाने कामाची क्वालीटी ठिक राहते किंवा नाही हे लक्ष देणे गरजेचे आहे.

**लेखाधिकारी** : संबंधित गुत्तेदाराला रेट ॲनालिससाठी बोलाविले असता त्यांनी पत्रान्वये लेखी कळविले असून, पत्राची प्रत संचिकेत लावलेली आहे.

**कार्यकारी अभियंता :** रेट ॲनालिसीस दिनांक १२-०२-९६ ला संबंधित गुत्तेदारांनी सादर केलेले आहे व त्यांनी पत्राद्वारे तसे लिहून दिलेले आहे की, सदरचे काम मी कमी दराने करुन देण्यास तयार आहे.

**डॉ. विजय कुमार मेहेर :** संबंधित अंदाजपत्रक आजच्या डी. एस. आर. दराप्रमाणे आहे काय? जर आजच्या दराप्रमाणे असल्यास हे काम या दराने संबंधित गुत्तेदार घेत असल्यास रु. १७.०० लाखाचे काम तो ८.०० लाखास करुन घेईल. त्यामुळे कामाची क्वालिटी दिसणार नाही.

**श्री. रशिद खॉन (मामू) :** जेवढे काही गुत्तेदार आहेत ते जिद्दी जिद्दीने टेंडर भरुन काम घेतात. त्यामुळे पुढे कामाची प्रगती दिसून येत नाही. त्यासाठी अशा गुत्तेदाराकडून जबाबदारी करवून घ्यावी.

**मा. सभापती** : स. सदस्यांच्या भावना लक्षात घेता हे काम कार्यकारी अभियंता यांनी स्वतः लक्ष घालून संबंधित गुत्तेदाराकडून चांगले काम होणे साठी जातीने उभे राहावे. प्रस्ताव मंजुर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, सिडको एन-३ भागात १०० व १५० मी. मी. व्यासाची ए. सी. जलवाहिनी टाकण्याचे कामाकरीता प्राप्त झालेल्या निविदा पैकी तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी व अंदाजपत्रकीय दरापेक्षा २७.९२% कमी दराची श्री. सलीम पटेल यांची निविदा स्विकारण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ५२५/१७ :**

शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, मो. हर्षनगर स्लम येथे नाल्याचे बाजूचे संरक्षित भिंत बांधणे बाबत कामाकरीता सा. बा. खाते यांच्या वर्ष ९५-९६ च्या दरसुची नुसार रु. ११,०३,६६७/- चे अंदाजपत्रक तयार करण्यात आले सदरील काम " खुल्या गटार " बांधणे या लेखा शिर्षकातुन करण्यात येईल. सदरच्या अंदाजपत्रकास मा. आयुक्त साहेबांनी दि. २५-०७-९६ ला प्रशासकीय मंजुरी दिली आहे. प्रस्तावित कामासाठी निविदा मागविण्यात आली असता एकूण सहा निविदा विकण्यात आल्या व अंतिम तारखे पर्यंत एकूण तीन निविदा प्राप्त झाल्या त्या दि. २३-०९-९६ रोजी लेखाधिकारी व गुत्तेदारासमक्ष उघडण्यात आले त्याची तपशील खालील प्रमाणे आहे.

| | | |
|---|---|---|
| १. | अब्दुल सलाम | ०.१% कमी |
| २. | सिद्दीकी एस. झेड | २% जास्त |
| ३. | आर. बी. चौहान | ३.१५% जास्त |

तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी म्हणजेच अंदाजपत्रकीय दरापेक्षा ०.०१% कमी दराची निविदा श्री. अब्दुल सलाम यांची आहे. तरी अंदाजपत्रकास ०.०१% कमी दराची असलेली श्री. अब्दुल सलाम यांची निविदेस मान्यतेचा प्रस्ताव विचारार्थ तथा मंजुरीस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, हर्षनगर स्लम येथे नाल्याचे बाजूने संरक्षित भिंत बांधणेच्या कामाकरीता प्राप्त झालेल्या निविदा पैकी तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी व अंदाजपत्रकीय दरापेक्षा ०.०१% कमी दराची श्री. अब्दुल सलाम यांची निविदा स्विकारण्यास मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ५२६/१८ :**

लेखाधिकारी-१ यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, आयुक्त कार्यालय पोलीस कार्यालयातील वाहतुक नियत्रंक पोलीसांना आपल्या कार्यालयाकडू एकूण आठ कवासकी बजज १०० सी. सी. वाहन देणे आहेत.

त्याकरीता स्थानिक वितरक मे. पगारीया ऑटो सेंटर यांच्याकडून दरपत्रके मागविण्यात आलेले होते. प्रत्येक वाहनांची किंमत रु. ३५७४९ टॅक्स विमा रु. २९१०.०० अशी एकूण किंमत रु. ३८६५९.०० ऐवढी आहे. एकूण आठ वाहने खरेदी करीता एकूण खर्च रु. ३,०९,२७२.०० इतका येत आहे. सदरचा खर्च ट्राफिक अनुदान यातून करण्यात येईल. प्रस्ताव मंजुरीस्तव सादर.

**संवाद :**

**डॉ. विजय कुमार मेहेर :** सदरचा प्रस्ताव आजच आलेला आहे. आणि या प्रस्तावानुसार मनपाने गाडया खरेदी देण्याचे कारण काय?

**लेखाधिकारी-१ :** याबाबतचे अनुदान शासनाकडुन प्राप्त झाले असुन यापुर्वी सुध्दा महापालिकेने पोलीस कार्यालयासाठी ट्राफिक पोलीसांना रस्त्यावरील वाहने अडविणे/जप्त करण्यासाठी ठोच वाहने, महापालिकेने घेऊन दिलेली आहे.

**डॉ. विजय कुमार मेहेर :** हा पैसा ट्राफिकच्या अंतर्भूत महापालिकेला मिळणार आहे काय?

**लेखाधिकारी** : शहरातील प्रमुख रस्त्यावरील जे झेब्रा टाईप पट्टे वगैरे करतात त्यासाठी आणि रस्त्यावरील वाहने कुठेही उभे राहु नयेत. त्यांना आळा बसण्यासाठी ट्रफिक पोलिसांचे कार्य असते. त्यांचेसाठी शासनाकडून महापालिकेला अनुदान मिळाले व तो खर्च महापालिका या ट्राफिक पोलीसांना गाडया घेऊन देण्यासाठी करीत आहे. त्यासाठी रु. ३.०० लाख र्चा येत आहे.

**डॉ. विजय कुमार मेहेर :** ट्राफिक पोलीसांना महापालिका खर्च का करते हा खर्च त्यांनी त्यांचेसाठी करावा व आपल्याकडे जर अनुदान आलेले असल्यास त्याचा उपयोग आपण स्तः करावा विनाकारण ट्रॅफिकसाठी आपण " उधळपट्टी " का करावी.

**श्री. अब्दुल रशिद खान (मामू), श्री. हमीद ताबा :** " उधळपट्टी " हा शब्द मागे घ्यावा उधळपट्टी याचा अर्थ " घफला " होतो. म्हणजे काय प्रशासनाने घफला केलेला आहे काय?

**श्री. डॉ. विजय कुमार मेहेर :** माझ्या बोलण्याचा उद्देश असा आहे की, विनाकारण महापालिका खर्च करते ही एक उधळपट्टीच आहे.

**मा. सभापती** : स. सदस्य उधळपट्टी असे शब्द आपण कृपया बोलू नये.

**श्री. भगवान घडामोडे :** उधळपट्टी याचा अर्थ विनाकारण खर्च करणे असा होय.

**श्री. हमीद ताबा, श्री. अब्दुल रशिद खान (मामू) :** म्हणजे मा. आयुक्त घफला करतात काय (यावेळी सभागृहात स. सदस्य आपसात जोरजोरात बोलतात काहीही ऐकू येत नाही.)

**डॉ. विजय कुमार मेहेर :** हा खर्च म्हणजे नियमबाह्य आहे, असे माझे म्हणणे आहे जर मोटारसायकल ट्राफिक पोलीसांना द्यावयाचे असेल तर, त्यांनी त्यांच्या कार्यालयाकडून घ्यावे महापालिकेने स्वतःहून खिरापती सारखे वाटणे योग्य नाही.

**मा. सभापती** : प्रशासनाचा विनाकारण खर्च करण्याचा हेतू नाही, माझ्या माहिती प्रमाणे पोलीसांना त्यांचे ट्राफिक बाबत कर्तव्य बजावण्यासाठी अशा मोठया शहरासाठी शासन त्यांना अनुदान देते ते अनुदान त्यांचे असून, महापालिका हा खर्च करते असे नाही.

**डॉ. विजयकुमार मेहेर :** ज्या मोटरसायकल घेण्यात येणार आहेत. त्यांचा दुरुपयोग होणार नाही. माझी सभागृहाला विनंती आहे की, मोटार सायकल ऐवजी एखादया ठिकाणी वाहतूक बेट तयार करण्यासाठी खर्च केल्यास बरे होईल.

**मा. सभापती** : मा. आयुक्त खुलासा करतील.

**मा. आयुक्त** : शासनाकडील इन्टजेक्टर ऑफ पोलिस जनरल यांनी तसे कळविले आहे की, शहरात वाढता व्याप लक्षात घेता वाढती रहदारी लक्षात घेता अनेक ठिकाणी अपघात होतात आणि त्यामुळे ट्राफिक बाबत गांर्भियाने विचार करण्यासाठी आज वेळ आलेली आहे, या ट्राफिकवर टिकर लावणे/रोड डिव्हाडर्स झेब्रा/डिव्हायडर्स आणि अनेक कामे याबाबत शासनाकडून अनुदान मिळत होते. यातून रु. ४.०० लाख त्यांना अतिक्रमण बाबत रहदारीच्या दृष्टीने उपयोग होणार आहे, कोणत्याही ठिकाणी रहदारीत रस्त्यावर अटकाव होवू नये. त्यांचे कडून चांगल्या कार्याचा अनुभव आपल्याला मिळेल आणि तसे पोलीस आयुक्त कार्यालयाशी बोलणी झालेली आहे, त्यानुसार ट्राफिक पोलीसांना या दुचाकी गाडया घेऊन दिल्यास महापालिकेलाही

त्याची मदत होणार आहे आणि याबाबतचे अनुदान शासनाकडून मिळत असून, ती पोलीसांना या कामी गाडया खरेदी करुन लवकर द्यावयाचे आहे, ही कोणत्याही प्रकारची उधळपट्टी नसुन, पोलीस व महापालिका यांचे संयुक्त काम आहे यात दुमत नाही.

**श्री. कचरु नवपुते :** ही वाहने खरेदी करुन देतांना त्या गाडयांवर महापालिकेचा मोनोग्राम लावण्याचे सांगावे.

**डॉ. विजय कुमार मेहेर :** याबाबत तसे लेखी काही आहे काय? ट्राफिक पोलीसांना गाडया ऐवजी इतर कामे करावे असे माझे मत आहे.

**मा. आयुक्त** : सदरील पैसा आम्ही संबंधित कार्यालयास सरेंडर करु.

**श्री. हमीद ताबा :** ज्या कामासाठी पैसा आलेला आहे त्याचा उपयोग त्याच कामासाठी करण्यात यावा.

**मा. सभापती** : प्रस्ताव मंजुर करण्यात येतो.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्यानुसार, आयुक्त कार्यालय पोलीस कार्यालयातील वाहतुक नियंत्रक पोलीसांना महापालिका कार्यालयाकडुन एकूण आठ कावासाकी बजाज १० सी. सी. वाहने देणे करीता स्थानिक वितरक मे. पगारीया ॲटो सेंटर यांचे कडून मागविण्यात आलेल्या दरपत्रकात प्रत्येक वाहनांची निव्वळ किंमत रु. ३५७४९.०० टॅक्स विमा रु. २९१०.०० प्रमाणे दिली असून, एकूण आठ वाहने खरेदी करीता येणाऱ्या रक्कम रु. ३०९२७२.०० चे खर्चास तसेच सदरचा खर्च ट्रॅफिक अनुधन यातुन करण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ५२७/१९ :**

अतिरिक्त शहर अभियंता प्रस्ताव सादर करीत आहे की, पीरबाजार येथे डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे पुतळया समोर मुख्य प्रवेशद्वार व कंपाऊंड वॉलचे बांधकाम करणेच्या कामाचे सन १९९५-९६ चे डी. एस. आर. दराने रक्कम रु. १,५५,०००.०० चे अंदाजपत्रक तयार करण्यात आले असून, त्यास मा. आयुक्त, यांची मंजुरी मिळालेली आहे. सदरील कामाचा खर्च शहर सौंदर्यीकरण सन १९९६-९७ साठी असलेल्या २५०.०० लक्ष तरतुदी मधून प्रस्तावित आहे.

तर सदर कामासाठी तयार करण्यात आलेल्या रक्कम रु. १,५५,०००.०० चे अंदाजपत्रक मंजुरी बाबतचा प्रस्ताव स्थायी समितीच्या विचारार्थ तथा मंजुरीस्तव सादर.

**संवाद :**

**श्री. विजय कुमार मेहेर :** या ठिकाणी जी जागा आहे ती कुणाच्या मालकीची आहे. याचा सर्व्हे करुन पुतळयाची जागेवर कोणताही त्रास होणार नाही. याबाबत माहिती दयावी.

**मालमत्ता अधिकारी :** सदरील जागा स. सदस्य श्री. गाडे यांच्या मालकीची आहे.

**अति. शहर अभियंता :** सदरच्या जागेच्या पुतळया भोवतीची जागा स. सदस्य श्री. गंगाधर गाडे यांनी दिलेली आहे.

**मा. सभापती** : य जागेवर आभ्यासिका आहे, त्या जागेचा मोजमाप करुन माहिती दयावी. शिवाय शासनाकडील जी उर्वरीत जागा असेल. त्या घेण्याची कार्यवाही करावी. प्रस्ताव मंजुर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्यानुसार, पीर बाजार येथे डॉ. बाबासाहेब आंबेडरक यांचे पुतळया समोर मुख्य प्रवेशद्वाव व कंपाऊंड वॉलचे बांधकाम करणेच्या कामासाठी सन १९९५-९६ चे डी. एस. आर. दराने तयार करण्यात आलेले रक्कम रु. १,५५,०००.०० चे अंदाजपत्रकास तसेच सदरील कामाचा खर्च शहर सौदंर्यीकरण सन १९९६-९७ साठी असलेल्या २५०.०० लक्ष तरतुदी मधून करण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ५२८/२० :**

क्रिडाअधिकारी यांनी प्रस्ताव सादर केला की, दि. २ जानेवारी ९७ ते ५ जानेवारी ९७ ते या तारखेस महापौर चषक राज्यस्तरीय खो-खो स्पर्धेचे आयोजन करण्यात आलेले आहे. सदरहु स्पर्धेसाठी खालील प्रमाणे खर्च येणार आहे.

१) **<u>दैनिक भत्ता :</u>**

१. १६ पुरुष संघ x १४ सदस्य = २२४x६० रु. x ४ दिवस ५३,७३०/- ४ दिवस रु. ६० प्रमाणे.

२. १२ महिला संघ x १४ सदस्य = १६८-१६८ x ६० रु. ४ दिवस ४०,३२०/- ४ दिवस रु. ६० प्रमाणे

३. पंच व अधिकारी ३० x १०० रु. x ५ दिवस १५०००/-

२. **<u>प्रवास भत्ता :</u>**

१. १६ पुरुष संघ x १४ सदस्य = २२४-२२४ x २०० रु. ४४,८००/-
प्रत्येकी २०० रु. प्रमाणे.

२. १२ महिला संघ x १४ सदस्य = १६८-१६८ x २०० रु.
प्रत्येकी २०० प्रमाणे. ३६,६००/-

३. पंच व अधिकारी ३० x २०० रु. प्रमाणे ३० x २०० रु. ६०००/-
पंच व अधिकारी ३० x २५० रु. प्रमाणे ३० x २५० रु. ७५००/-

३. **<u>मैदानावरील तयारी व विद्युत खर्च</u>** : ४५,०००/-

४. **<u>निवास व्यवस्था :</u>**
खेळाडू व पंचाची निवास व वाहतूक व्यवस्था २०,०००/-

५. **<u>पारितोषिके :</u>**

१. सर्व गटातील प्रथम, द्वितीय व तृतीय -
मॅन ऑफ दी डे (पुरुष व महिला ४ दिवसांचे) ३०,०००/-
स्पर्धा कालावधीत संपूर्ण उत्कृष्ट, आक्रमक सर्वोत्कृष्ट,
आक्रम व संरक्षक व अष्टपैलु (पुरुष व महिला) ४,०००/-

६. **<u>साहित्य खर्च :</u>**

१. वैद्यकीय स्टेशनरी, मेडल, प्रमाणपत्र, उद्घाटन व
सांगता समारोप आणि गेट टु गेदर ३०,०००/-

२. चेअरमन, निरिक्षक व सेक्रेटरी यांचे प्रथम वर्गाचे ८०००/-

| | | |
|---|---|---|
| | प्रवास भत्ता व भाडे | |
| ३. | किरकोळ खर्च (टि. शर्ट व टोपी) | १६,३००/- |
| ४. | रॉयल्टी, राज्य खो-खो संघटना | १०,०००/- |
| ५. | रॉयल्टी जिल्हा खो-खो संघटना | ५,०००/- |
| | | ३,७४,२८०.०० |

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, दि. २ जानेवारी ते ५ जानेवारी ९७ दरम्यान " महापौर चषक " राज्यस्तरीय खो-खो स्पर्धेच्या आयोजनार्थ दैनिक पत्ता प्रवास भत्ता, निवास व्यवस्था, पारितोषिके इत्यादी (अ. क्र. १ ते ६) च्या खर्चा करीता र.रु. ३,७४,२८०/- चे खर्चास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ५२९/२१ :**

मा. क्रिडा अधिकारी यांनी प्रस्ताव सादर केला, दि. जानेवारी ९७ च्या (३) तिसऱ्या आठवडयात " महापौर चषक " राष्ट्रीय (पुरुष) व राज्यस्तरीय (महिला) कबड्डी स्पर्धाचे आयोजन करण्यात आले आहे. प्रतिवर्षा प्रमाणे सदर स्पर्धेसाठी खालील प्रमाणे खर्च येणार आहे.

| | | |
|---|---|---|
| | दैनिक भत्ता | |
| १. | राष्ट्रीय पुरुष १६ संघ | |
| २. | राज्यस्तरीय महिला ८ संघ | |
| ३. | प्रवास खर्च | २०,१६०/- |
| ४. | राष्ट्रीय पुरुष संघ | |
| ५. | राज्यस्तरीय महिला ८ संघ | १,४५,६००/- |
| ६. | ५० पंप व अधिकारी यांचा | |
| | प्रति दिन ७५/- रु प्रमाणे चार दिवसांचा खर्च | |
| ७. | क्रिंडागण व डेकोरेशन कमानी व अन्य खर्च | ३०,०००/- |
| ८. | बक्षिसे - प्रथम पुरुष | १५,०००/- |
| | द्वितीय | १०,०००/- |
| ९. | निवास खर्च (खेळाडू पंब) | २०,०००/- |
| | महिला-प्रथम १०,००० | ४६,०००/- |
| | द्वितीय ७०००/- | |
| | ४०००/- | |
| १०. | व अन्य | |
| | **<u>बैनर्स स्टेज खुर्च्या</u>** | |
| | कमानी खर्च | २०,०००/- |
| | लायटींग | २०,०००/- |
| | वाहतुक | १०,०००/- |
| | प्रथमोपचार | १०००/- |
| | पदाधिकारी, अधिकारी व्यवस्थापक व अन्य खर्च | १५,०००/- |
| | **<u>रॉयल्टी</u>** | |
| १. | रिकग्नाईज पिस ऑफ | १,००१/- |

| | | |
|---|---|---|
| २. | रिकग्नाईज पिस ऑफ म. रा. | ५०१/- |
| ३. | कॅपिटेशन फीस | २०८/- |
| ४. | महाराष्ट्र राज्य कबड्डी असोसी | १५,०००/- |
| ५. | औरंगाबाद जिल्हा कबड्डी असोशियेशन रॉयल्टी | १०,०००/- |
| | **एकूण** | **३९४०६४/-** |

दिनांक १८-१२-९६ रोजी संपन्न झालेल्या स्थायी समिती सभेच्या इतिवृत्तामध्ये पृष्ठ क्र. ३३ वर विषय क्र. ५०२/७ " ठराव मंजूर " म्हणून नजरचुकीने दर्शविण्यात आलेला आहे. तरी त्यात खालील प्रमाणे दुरुस्ती करण्यात येत आहे. करीता, माहितीस्तव सविनय सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, जानेवारी ९७ च्या तिसऱ्या आठवडयात " महापौर चषक " राष्ट्रीय (पुरुष) व राज्यस्तरीय (महिला) कबड्डी स्पर्धाचे आयोजन करण्यात आले आहे. या स्पर्धासाठी दै. भत्ता प्रवास खर्च सजावट पारितोषिके रॉयल्टी व अन्य खर्चा करीता र.रु. ३,९४,०६४/- च्या खर्चास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ५०२/७ :**

संजयनगर बायजीपुरा वार्ड क्र. ३१ मध्ये शहाबादी फरशी बसविणे बाबत.

**संवाद :**

**मा. सभापती** : शहाबादी फरशी बसविणे बाबत सांगितले आहे. त्या ठिकाणी स्थळ पाहणी करीता प्रस्ताव ठेवावा.

**श्री. महादेव सुर्यवंशी :** शहरात बऱ्याच भागात फरशी बसविणे बाबत प्रस्ताव येतात. परंतु खांडकी बसविण्यात आलेल्या आहेत. त्या काढून कुठे बसविल्या जाते. हा महत्वाचा मुद्दा आहे. आजही खांडकी बसविण्याचे प्रस्ताव जे येतात ते ३०% बिलो का जाते. याचे कारण काय? ज्या ज्या ठिकाणी फरशी बसविण्याचे शहरातील प्रस्ताव येतात. त्या त्या ठिकणीचे खांडक्या संबंधित गुत्तेदार अगोदर गायब करतो व तो दुसऱ्या ठिकाणी नेऊन लावतो याची कुणी पाहणी केली काय? तपासणी केली काय? फरशी बसवितांना फरशी खाली ३" कॉक्रीट टाकणे असा नियम आहे. परंतु तसे करीत नाही. केवळ रेतीवर फरशी बसविल्या जाते. त्या ठिकाणी २" फरशी बसावयाची असते. त्याठिकाणी केवळ १" फरशी बसवितात. ही बाब बरोबर नाही. प्रशासनाने यांची गंभीर दखल घ्यावी.

**मा. सभापती** : स. सदस्यांनी जी सुचना केलेली आहे ती बाब गंभीर आहे. याबाबत वरीष्ठ अधिकाऱ्यांनी गांभीर्याने दखल घ्यावी.

**मा. आयुक्त** : शहर अभियंता यांनी खुलासा करावा.

**शहर अभियंता** : स. नगरसेवकांच्या ज्या ज्या वॉर्डात कामे अशा प्रकारचे असतात. त्या वॉर्डातील कामाचे बाबतीत तेथील अगोदरचे दगड काढा याचे मग ज्या ठिकाणी रुंदीचे गल्लीचे काम करायचे त्या ठिकाणी तो दगड बसवून कामे करतो. म्हणजे सगळया दगडाचे आपण युटीलाईज करतो.

**श्री. गौतम खरात :** बऱ्याचशा स्लम भागात खांडकी बसविण्याचे प्रस्ताव आहेत. त्या ठिकाणच्या गल्या अतिशय अरुंद असतात. त्यामुळे कालांतराने खांडक्या खिळखिळया होतात व गळून पडतात. तर काहीचे म्हणणे असे आहे की,

खांडक्या ३०% कमी चोरीस येथील लोक नेतात. आता फुलेनगर, उस्मानपुरा येथील भागात अशाच प्रकारचे खांडक्या गुत्तेदार बसवितात व आपले काम भागवितात. याकडे लक्ष देणे आवश्यक आहे. असे अनेक कामे आहेत ते मी स्वतः दाखवितो.

**मा. सभापती** : कामाच्या स्पेसिफिकेशन प्रमाणे काम व्हावे. स. सदस्यांचे काही असल्यास जातीने लक्ष दयावे व अशा कामाचे गुत्तेदार श्री. मो. सलीम मो. शरीफ यांनी यापुर्वी जर असे कामे केलेले असतील तर ते आमचे स. सदस्य जाऊन पाहणी करतील.

**श्री. अब्दुल रशिद खान (मामू) :** आपआपल्या वॉर्डातील स. सदस्यांचे काम आहे की, आपल्या वॉर्डात कसे काम करवून घ्यावे. नसता तक्रार करुन संबंधित गुत्तेदाराचे काम बंद करता येते.

**मा. सभापती** : अशा प्रकारचे कामाबाबात प्रत्येक ठिकाणी झाले पाहिजे.

**डॉ. विजय कुमार मेहेर :** प्रस्ताव मंजुर झाल्यानंतर स्थायी समिती समोर येण्यासाठी किती कालावधी लागतो.

**शहर अभियंता** : एकदा कामास मंजुरी मिळाली की, त्याची निविदा काढण्याकरीता लेखा विभागाकडे पाठवावे लागते. याला जास्तीत जास्त एक महिन्याचा अवधी लागतो.

**डॉ. मेहेर** : मग या ठरावाला बरोबर चार महिने झाले विलंब का लागला. पुन्हा वर्क ऑर्डर द्यावयास दोन महिने व कामास सुरुवात करायला दोन महिने म्हणजे एवढा सर्व कालावधीपर्यंत काही लक्षण राहत नाही. माझे असे म्हणणे आहे की, कामाचा वेग वाढावा.

**मा. सभापती** : एकदा स्थायी समितीत अंदाजपत्रक मंजुर झाल्यानंतर किती कालावधीत काम होईल. याची मर्यादा ठेवली पाहिजे. दुसरी गोष्ट एकदा टेंडर मंजुर झाल्यानंतर मा. आयुक्त यांचेकडे जाते. त्यानंतर स्थायी समितीकडे यावयास पाहिजे. याच्यासाठी सुध्दा बराच कालावधी लागतो. इतका कालावधी त्यासाठी होऊ नये.

**शहर अभियंता** : अंदाजपत्रकाच्या निगोशिएशन्ससाठी वाटाघाटीसाठी संबंधित गुत्तेदाराला आपण बोलावितो. त्यासाठी ८- दिवसांचा अवधी जातो. आणि मग तो हो म्हणतो की नाही. त्यावरही बरेच काही अवलंबून असते.

**मा. सभापती** : विषय क्र. ७ स्थळ पाहणी करीता ठेवावे.

**ठराव :**

सर्वानुमते असे ठरले की, विषय क्र. ७ हा स्थळ पाहणी करीता ठेवण्यात यावा.

यानंतर जन गण मन राष्ट्र गिता नंतर सभा संपल्याचे मा. सभापती यांनी घोषीत केले.

| | |
|---|---|
| स्वाक्षरित/- | स्वाक्षरित/- |
| नगरसचिव, | स्थायी सभापती, |
| महानगरपालिका, औरंगाबाद. | महानगरपालिका, औरंगाबाद. |

# *औरंगाबाद महानगरपालिका औरंगाबाद*

**दिनांक ०७-०१-९७ रोजी संपन्न झालेल्या स्थायी समिती सभेचे इतिवृत्त. सभेची सुरुवात " वंदे मातरम् " या गिताने अंदाज ठीक ३.३० वाजता झाली. सभेस निम्ननिर्दिष्ट स. सभासद तथा अधिकारी वर्ग उपस्थित होते.**

| | | |
|---|---|---|
| १) | स. स. श्री. गिरजाराम हाळनोर | अध्यक्ष |
| २) | स. स. श्री. गौतम खरात | स. सदस्य |
| ३) | स. स. सौ. रजनी जोशी | -//- |
| ४) | स. स. डॉ. भागवत कराड | -//- |
| ५) | स. स. श्री. कंवरसिंग बैनाडे | -//- |
| ६) | स. स. श्री. महादेव सुर्यवंशी | -//- |
| ७) | स. स. श्री. हमीदउद्दीन ताबा | -//- |
| ८) | स. स. श्री. सुभाष टाकळकर | -//- |
| ९) | स. स. श्री. भगवान घडामोडे | -//- |
| १०) | स. स. श्री. त्र्यबंक तुपे | -//- |
| ११) | स. स. श्री. अभिमन्यु भालेराव | -//- |
| १२) | स. स. श्री. कचरु नवपुते | -//- |
| १३) | स. स. श्री. विकास जैन | -//- |
| १४) | स. स. श्री. अ. रशिद खान (मामू) | -//- |

**संवाद :**

**मा. सभापती** : नुतन वर्ष सर्वांना सुख समृध्दीचे जातो, हीच मनोकामना बाळगुन सर्वांचे हार्दीग अभिनंदन.

**श्री. हमीद ताबा :** स. स. श्री. रशिद मामू यांना मारण्यासाडी काही दुश्मनांना सुपारी दिलेली आहे. हे जाणून बुजून असे करीत आहे. त्यामुळे त्याच्या जिवीतास धोका आहे. जो कोणी व्यक्ती हे कृत्य करीत असेल त्याचा मी निशेध व्यक्त करतो.

**मा. सभापती** : ठिक आहे.

**श्री. अब्दुल रशिद खान (मामू) :** आपले शहरात एक पत्रकार श्री अलिमोद्यीन म्हणून होते. त्यांचे नुकतेच दु:खद निधन झाले. त्यांना सभागृहात ००.२ मिनिटे श्रध्दांजली वाहण्यात यावी.

**श्री. कचरु नवपुते :** त्याचप्रमाणे विद्युत लाईनमन पै. सिराजभाई यांचेही दु:खद निधन झाले त्यांनाही श्रध्दांजली वाहण्यात यावी.

**श्री. भागवत कराड :** डॉ. भाले यांचेही अपघाती निधन झाले. त्यानांही सभागृहात श्रध्दांजली वाहण्यात यावी. व निवृत्त विभागीय अधिकारी स्व. सहा यांचेही नुकतेच दु:खद निधन झाले. त्यांनाही श्रध्दांजली वाहण्यात यावी.

**मा. सभापती** : ठिक आहे. (००.०२ मिनिटे स्तब्द उभे राहून सभागृहात श्रध्दांजली वाहण्यात आली.)

**श्री. अभिमन्यु भालेराव :** नविन वर्षाच्या सर्व स. सभासदांना तसेच मा. सभापती यांना हार्दीक शुभेच्छा

**श्री. कचरु नवपुते :** दै. सामना या वृत्तपत्रात बातमी प्रसिध्दीस आलेली आहे की, जकात नाक्यावरील ज्या १० कर्मचाऱ्यांना मागे निलंबित केलेले होते. त्यापैकी फक्त ४ कर्मचाऱ्यांना कामावर रुजू करुन घेण्यात आलेले आहे. बाकी कर्मचाऱ्यांना नाही म्हणजे नेमके याचे कारण काय?

**मा. सभापती** : याबाबतचा खुलासा प्रशासन करेल.

**उप आयुक्त-१** : जकात नाकयावर आपण दहा कर्मचाऱ्यांना निलंबित केले होते. त्यापैकी चार कर्मचाऱ्यांनी प्रशासनाला लिहून दिलेले आहे की, त्यापैकी चार कर्मचाऱ्यांनी प्रशासनाला लिहून दिलेले आहे की, आम्हला माफ करावे यापुढे आम्ही असे करणार नाही. तेव्हा आपण त्यांची विभागीय चौकशी कायम ठेवुन जी काही शिक्षा प्रस्तावित होईल, त्या अधिन राहून आपण या चार कर्मचाऱ्यांना कामावर घेतले आहे. त्याचप्रमाणे इतर कर्मचाऱ्यांनी आज अर्ज सादर केला आहे. त्याबाबत विचार करु.

**श्री. कचरु नवपुते :** बाकी उर्वरीत कर्मचाऱ्यांनी माफी मागून लेखी लिहून दिल्यास आपण त्यांनाही कामावर घेणार काय?

**उप आयुक्त-१** : होय चौकशी कायम ठेऊन कामावर घेण्यात येईल.

**श्री. हमीद उद्यीन ताबा :** मागे असे ठरलेले होते की, अगोदर कर्मचाऱ्यांवर कार्यवाही करावी. परंतु आपल्याकडे कर्मचाऱ्यांवर महिन्या दोन महिना निलंबित केल्या जाते आणि पुन्हा कामावर घेतल्या जाते ही बाब योग्य वाटत नाही. कोणत्याही प्रकारे चौकशी न करता परत कर्मचाऱ्यांना कामावर घेणे योग्य वाटत नाही.

**मा. सभापती** : निलबिंन करणे ही बाब काही शिक्षा नाही निलंबना नंतर चौकशी नेमल्या जाते व चौकशीत काही आढळल्यास नंतर कार्यवाही केल्या जाते.

**उप आयुक्त-१** : कर्मचाऱ्यांवरती आरोप सिध्द झाल्याशिवाय सेवेतून कायमचे काढून ऐकता येत नाही. त्यांचेवरती सिरीयस चार्जेस असले तर, त्यांना सेवेतून बडतर्फ करता येऊ शकते. कारण गुन्हा झालेला नाही.

**डॉ. भागवत कराड :** एखादया कर्मचाऱ्याला निलंबित केले तर ती एक प्रकारे पहिली शिक्षाच होऊ शकते, परंतु एखादया कर्मचाऱ्यांना निलंबित आठ दहा दिवसासाठी करतो व परत कामावर घेतो. मग निलंबन कसा कशासाठी चौकशी नेमणूक जी प्रस्तापित होईल. त्याप्रमाणे कार्यवाही व्हावयास पाहिजे.

**श्री. अ. रशिद खान (मामू) :** अशा काही कर्मचाऱ्यांबाबत आपलेस सदस्य, पदाधिकारी किंवा प्रशासनाला जाऊन भेटतात व सांगतात की, या कर्मचाऱ्यांना आपण कामावर घ्या अशा प्रकारच्या शिफारशी करतात. त्यासाठी एक पॉलीसी ठरवावी व त्याप्रमाणे कार्यवाही करावी म्हणजे एका कर्मचाऱ्यांला कामावर घ्यावे व दुसऱ्याला का नाही हा भेदभाव नाही.

**श्री. हमीद ताबा :** निलंबित केलेल्या कर्मचाऱ्यांबाबत सर्वांना सारखीच वागणूक द्यावी.

**मा. सभापती** : सभागृहाचा असा निर्णय आहे की, एखादा निर्णय घेतला की, त्यावर प्रशासनाने ठाम राहावे. त्यात बदल करु नये.

**श्री. अ. रशिद खान (मामू) :** आपले स. सदस्या ज्या शिफारशी पदाधिकाऱ्यांकडे कर्मचाऱ्यांबाबत घेऊन जातात त्या रोखल्या पाहिजे. प्रशासनानी नियमाप्रमाणे कार्यवाही करावी.

**डॉ. भागवत कराड :** सभागृहास असा निर्णय घ्यावा की, एखादया कर्मचारी/अधिकाऱ्यांवर प्रशासनाने कार्यवाही करावीशी वाटल्यास त्यास कोणत्याही स. सदस्य किंवा

पदाधिकाऱ्यांनी प्रशासनामध्ये दखल देऊ नये. असा प्रस्ताव करुन सर्वसाधारण सभेकडे पाठवावा.

**मा. सभापती** : ठिक आहे, असा प्रस्ताव करुन सर्वसाधारण सभेपुढे ठेवावे.

**श्री. अ. रशिद खान मामू :** सिडको एक-८ दवाखान्यात एका लिपिकाने कार्यालयात पैसा अद्यापही जमा केलेला नाही. त्यावर काही कार्यवाही झालेली नाही. मात्र दुसऱ्या विभागातील कर्मचाऱ्यांना आपण याच बाबतीत निलंबित केलेले आहे अशा प्रकारचे २-३ केसेस आहेत. त्यांचे बाबतीत विचारणा का होत नाही. त्यांना नोकरीवर कुणी लावले याची माहिति दयावी.

**मा. सभापती** : अस्था-१ व अस्था-२ बाबतीत अनेक वेळा वर्तमानपत्रात बातम्या छापून आलेल्या आहेत की, या दोन्हीही विभागात आपसात समन्वये नाही. कोणत्या पदावर कोण काम पाहते व पगार मात्र संबंधित कर्मचारी घेऊन जातो. परंतु या विभागाला कोणतीही कल्पना नसते. तेव्हा याबाबत मा. आयुक्तांनी स्वतः लक्ष घालावे.

**श्री. हमीद ताबा :** आपण कर्मचाऱ्यांवर ना इन्साफी करता आहात. एखादया कर्मचाऱ्यांने जादा दिवस पैसे वगळले. तर त्यास निलंबित करतात व अशा प्रकारचे दुसरे काही कर्मचारी आढळूनही अद्याप काहीही करु शकत नाही ही बाब योग्य नाही.

**मा. सभापती** : मा. आयुक्त यांनी स्वतः लक्ष घालून आपल रेकॉर्ड सुस्थितीत ठेवण्यासाठी प्रयत्न करावे व अशा काही प्रकरणांची शहानिशा करावी.

**डॉ. भागवत कराड :** जकात नाक्यावरील कर्मचारी झोपलेले होते. म्हणून आपण त्यांचेवर कार्यवाही केलेली आहे. तेव्हा अशा प्रकारचे कर्मचारी जर कार्यालयात पैसे जमा करीत नसल्यास त्यांचेवरती कार्यवाही व्हावी.

**श्री. अ. रशिद (मामू) :** सिडको एन-८ च्या दवाखान्यात रु. २६००/- व जवाहर नगर येथील दवाखान्यात रु. २६०००/- हे सर्व दिड वर्षापासूनचे पैसे कार्यालयात जमा करीत नाही आहे.

**मा. सभापती** : संबंधित विभाग प्रमुखांनी याकडे लक्ष देणे आवश्यक आहे की, दि. वर्षापासून कार्यालयात पैसे जमा का होत नाहीत, याची चौकशी करीत व्हावयात पाहिजे होते. अशा प्रकारच्या कर्मचाऱ्यांवर कार्यवाही होणे आवश्यक आहे. यासाठीच मा. आयुक्त यांनी शहानिशा करुन कार्यवाही करावी.

**श्री. हमीद उद्यीन ताबा :** झोन-३ मध्ये एका कर्मचाऱ्यांना फसवून केली होती. त्याप्रमाणे प्रशासनाने याची चौकशी केली काय. यात कोण अधिकारी सामिल आहे.

**मा. सभापती** : संबंधित व्यक्तीवर पोलिस केस करण्यात आली आहे.

**श्री. अभिमन्यु भालेराव :** या झोनमध्ये ज्या कर्मचाऱ्यांनी फसवणूक केलेली आहे. त्याप्रमाणे कोण दोषी आहे. त्यावर कार्यवाही व्हावी.

**श्री. हमीदउद्यीन ताबा :** याप्रकरणी कोण अधिकारी शामिल आहेत. त्याची पाहणी करुन कार्यवाही व्हावी.

**मा. सभापती** : माझ्या माहिती प्रमाणे झोन-३ मध्ये सदर कर्मचारी दै. वेतनावर काम करीत होता. त्याला काढलेले होतो. तो पावती पुस्तक देऊन पैसे घेत होता. तर ते पावती पुस्तक नसून, त्या नागरिकांकडे जी पावती रहायची तीच पावती घेऊन त्यावर लिहावयाचा.

**श्री. हमीदउद्यीन ताबा :** त्याच्याकडे महापालिकेचे टेंडर फॉर्म होते. व लोकांकडून पैसा उकळत होता. ही बाब गंभीर आहे. त्यावर विचार करावा.

**मा. सभापती** : त्याच्याकडे एक फाईल होती व त्यात अंदाजपत्रक लिहिलेले होते. या व्यक्तीवर पोलीस केस करण्यात आली आहे.

**श्री. कचरु नवपुते :** सदरचा व्यक्ती भामटा असून, तो त्याच्या पध्दतीने नागरिकांकडून पैसा वसूल करणार आहे. त्यासाठी संबंधित अधिकारी यांनी दखल घ्यावी.

**मा. सभापती** : या प्रकरणास आपले अधिकारी वगैरे कुणीच नाही. संबंधित व्यक्तीवर कार्यवाही केलेली आहे.

**श्री. रशिद मामू :** जकात मध्ये उप आयुक्त-१ यांनी पाहणी केली त्यावेळी त्याठिकाणी रु. ३००/- ची जादा रक्कम होती. त्याबाबत काय कार्यवाही केली. एका कर्मचाऱ्यांने गाडी रु. ३००/- घेऊन सोडील होती काय?

**जकात अधिक्षक :** जकात मधील पावती डिपॉझिटची फाडलेली होती. ती दयावयाची राहिलेली होती. श्री. चाटे लिपिक यांची याप्रसंगी तेथून बदलून वाल्मी नाक्यावर बदली करण्यात आली.

**श्री. रशिद मामू :** दि. २२-१२-९६ ला रेल्वे स्टेशन येथे तीन बकऱ्या पकडल्या परंतु त्या कोडवाडयांतीत कर्मचाऱ्यांला संबंधिताने मारल्यानंतर त्या सोडून दिल्या व माझ्या वार्डातील व्यक्तीच्या बकऱ्या कोंडवाडयात टाकल्या.

**मा. सभापती** : उप आयुक्त-२ यांनी या प्रकरणी लक्ष घालावे.

**श्री. रशिद मामू :** कोंडवाडयासाठी जे कर्मचारी कुत्रे व जनावरे पकडण्यासाठी शहरात फिरतात कित्येक वेळा त्यांना नागरिकांकडून मारहान होते. त्यांचे बाबतीत सहानुभूती दाखवावी.

**मा. सभापती** : अशा कर्मचाऱ्यांबाबत जे रिस्क घेऊन कामे करतात. कोंडवाडा/अतिक्रमण विभागातील असतील किंवा वसुलीच कर्मचारी असतील तर त्या कर्मचाऱ्यांना प्रशासनामार्फत सुरक्षा दिली गेली पाहिजे. यासाठी प्रशासनाने जो पोलिस कर्मचाऱ्यांबाबत प्रस्ताव पाठविलेला आहे. त्याबाबत लवकर निर्णय मा. आयुक्त व पोलिस आयुक्त मिळून घेतील अशी अपेक्षा आहे.

**श्री. कचरु नवपुते :** इमारत निरिक्षक जे झोनवाईज आहेत. त्यांना कार्यालयातर्फे ड्रेस देण्यात यावा.

**मा. सभापती** : इमारत निरिक्षक व स्वच्छता निरिक्षक यांचे बाबतीत बैठकीत सुचित केलेले होते की, नागरिकांना कोणत्याही प्रकारे अडथळे येऊ नयेत. यासाठी ड्रेस घालून त्यावर मनपाचे नेमप्लेट असावी. याबाबत उप आयुक्त-१ व उप आयुक्त-२ यांनी याकडे लक्ष दयावे.

**श्री. गौतम खरात :** शहरात बऱ्याच ठिकाणी विटभट्टया आहेत. या शहरात ऐतिहासीक मकबरा आहे तो प्रदुषनाने धोक्यात येऊ नये यासाठी येथील विटभट्ट्या हटविण्याची कार्यवाही करावी. कारण नुकतेच सुप्रिम कोर्टाने निर्णय दिलेला आहे की, कारखान्याचे प्रदुषणाने आग्रा येथील जवळपास २५० कारखाने बंद पाडण्याचा निर्णय दिलेला आहे त्याप्रमाणे येथील विटभट्टयामुळे प्रदुषनाने ऐतिहासिक बाबीचा मकबरा धोक्यात येणार नाही. याची खबरदारी घेऊन प्रशासनाने कार्यवाही करावी.

**मा. सभापती** : प्रशासकीय अधिकारी माहिती देतील.

**प्रशासकीय अधिकारी :** कोर्ट केसेसच्या प्रकरणात ज्या विटभट्टया आहेत. त्या सोडून सर्व विटभट्टयांना नियमाप्रमाणे नोटीसा देऊन हटविल्या जातील.

**मा. सभापती** : अशा प्रकरणात ज्या कोर्ट केसेस आहेत. त्याबाबत विधी सल्लागारांनी लक्ष घालावे.

**श्री. अभिमन्यु भालेराव :** विटभट्टया वाल्यांना पर्यायी जागा दयावी.

**श्री. कचरु नवपुते** : चिकलठाणा येथे गायरान जागा आहे. त्याठिकाणी पर्यायी व्यवस्थासाठी प्रशासनानीं प्रयत्न करावयाचा प्रस्ताव होता. परंतु काय कार्यवाही झाली माहिती नाही.

**प्रशासकीय अधिकारी :** हर्सुल तलावा जवळच ८ गुंठे जागा पडलेली आहे. ती देण्याबाबत प्रस्ताव ठेवलेला होता. परंतु जागा अपुरी पडत असल्याने त्यावर निर्णय झालेला नाही.

**श्री. अ. रशिद खान (मामू) :** शहराची ऐतिहासिक बाब लक्षात घेऊन प्रशासनाने कार्यवाही करावी.

**श्री. डॉ. भागवत कराड :** माजी आयुक्त श्री. भोगे साहेब असतांना विटभट्टयावर कार्यवाही केली होती. परंतु ती काही कालावधी पुरती होती. आता परत एकदा कार्यवाही व्हावी.

**श्री. गौतम खरात :** शहरातील असे किती विटभट्टीवाले आहेत. त्यांचे कोर्टात केसेस आहेत. त्याची माहिती दयावी.

**विधी सल्लागार** : याबाबतीत कालच दोन व्यक्तींनी हायकोर्टातून स्टे आणलेला आहे.

**श्री. गौतम खरात :** स्मशान भूमीच्या ठिकाणी हे विट्भट्टयावाले आपले काम चालवित आहेत तेथील स. स. श्री. विधाते हे सुध्दा तक्रार करीत होते. त्यामुळे लोकांना सारखा त्रास होतो. तरीही प्रशासन याकडे सारखे दुर्लक्ष करते.

**मा. सभापती** : मा. आयुक्त या प्रकरणी लक्ष घालावे. शहराची ऐतिहासिक बाब लक्षात घेता, आवश्यक ती कार्यवाही करावी व शहरात अशा किती विटभट्टया आहेत. त्याची पाहणी करुन प्रशासकीय अधिकारी यांनी अहवाल दयावा. सोबतच किती प्रकरणांची कोर्ट केसेस आहेत. याचीही माहिती विधी सल्लागांरांनी पुढील बैठकीत दयावी.

**श्री. कवंरसिंग बैनाडे :** मो. किराडपुरा येथील विटभट्टया बाबत सुध्दा कार्यवाही करावी.

**श्री. अभिमन्यु भालेराव :** विटभट्टया शहराच्या किती कि. मी. अंतरावर असावयास पाहिजे व त्यांना पर्यायी जागा त्याप्रमाणे देणे बाबत विचार व्हावा जर शहराबाहेर या विटभट्टया गेल्या तर पुन्हा विटा महाग होतील याची दक्षता घ्यावी. या विटभट्टयांवरती गरीब कुटूंबातील व्यक्ती असलेले उदर निर्वाह करतात. त्यांना उपासमारीची पाळी येऊ नये. याची खबरदारी घ्यावी. प्रशासनानी कार्यवाही करावी.

**मा. सभापती** : प्रशासनाने संपूर्ण भागाचा सर्व्हे करुन पूर्ण रिपोर्ट ठेवावा व नंतरच सभागृह निर्णय घेईल.

**श्री. अभिमन्यु भालेराव :** ज्या कारखान्यामुळे प्रदुषणाने शहरास धोका होतो त्याबाबतही प्रशासनाने कार्यवाही करावी.

**डॉ. भागवत कराड :** मागील वेळेस बऱ्याच विटभट्टया प्रशासनाने बंद केलेल्या होत्या. त्या पुन्हा चालू का झाल्या?

**श्री. अब्दुल रशिद खान (मामू) :** महापालिकेच्या हद्दीत विटभट्टया जर नको आहेत तर नेमके कोणत्या ठिकाणी त्यांना पर्यायी जागा देणार का?

**मा. सभापती** : शहरातील जेवढया विटभट्टया आहेत त्या अनाधिकृत आहेत. त्याचा प्रशासनांनी सर्व्हे करुन अहवाल दयावा व नंतरच स. सदस्यांशी चर्चा करुन निर्णय घेणे योग्य राहील.

**श्री. कंवरसिंग बैनाडे :** बऱ्याचशा शाळेचे आपण काम चालू केलेले आहे. शाळेतील विट कामाचे व्यवस्थित काम होते किंवा नाही याची पाहणी कनिष्ठ अभियंता श्री. काटकर करीत नाही व संबंधित गुत्तेदार मात्र काम करुन निघून जातो याची पाहणी करावी.

**श्री. सुभाष टाकळकर :** सिडकोच्या शाळामध्ये एन-६ येथे वॉल कंपाऊंडचे काम चालू आहे. या कंपाऊंडचे काम सुध्दा गुत्तेदार श्री. शहा यांचे मार्फत होत असून, ते व्यवस्थित होत नाही याची पाहणी करावी.

**श्री. हमीद उद्यीन ताबा :** जर काम समाधानकारक होत नाही असे निदर्शनास असल्यास संबंधित अधिकाऱ्यांवर कार्यवाही करावी.

**मा. सभापती** : मा. आयुक्तांनी तांत्रिक सेल तयार केलेला आहे. या प्रकरणी मा. आयुक्त व त्या भागातील स. नगरसेवक, शहर अभियंता तसेच तांत्रिक सेल यांनी संबंधित भागात जाऊन प्रत्यक्षात पाहणी करतील तेथील कामाचे सॅम्पल आणून लॅबोरॅटरीजकडे (प्रयोग शाळेत) पाठवावे. आणि त्याच्यामध्ये काही आढळल्यास त्यावर जो कुणी दोषी आढळल्यास त्यावर कार्यवाही करावी.

**श्री. कंवरसिंग बैनाडे :** सिडको एन-७ या शाळेत हौद तयार केलेला आहे. परंतु हौदात पाणीच राहत नाही.

**श्री. सुभाष टाकळकर :** एन-६ सिडको येथील स्मशानभूमी येथील बांधकामाबाबत चौकशी व्हावी.

**श्री. अभिमन्यु भालेराव :** एखादया कामाचे संबंधित गुत्तेदाराचे काम समाधानकारक नसल्यास प्रथमतः मा. आयुक्त यांनी पाहणी करावी व नंतरच स्थायी समिती मध्ये चर्चा व्हावी.

**डॉ. भागवत कराड :** स्थायी समितीमध्ये गेल्या बऱ्याच दिवसापासून मी टॅक्स पावत्यांच्या बाबतीत चर्चा करीत आहे. त्याचा नमुना देखील केलेली आहे. परंतु त्यावर काय कार्यवाही केली माहिती नाही.

**मा. सभापती** : पुढील बैठकीत उप आयुक्त-१ माहिती देतील व याबाबत येणाऱ्या आर्थिक वर्षापासून अंमलबजावणी करण्याची कार्यवाही होईल. त्याप्रमाणे महापालिकेच्या प्रत्येक प्रॉपर्टीवर नंबरीग टाकण्याचे कार्यवाही व्हावी व पोलवर नंबरींग टाकण्याचे काम चालू असल्याचे समजले आहे.

**श्री. अब्दुल रशिद खान (मामू) :** नविन शिक्षकांची जी भरती झालेली आहे त्यांचे पगार अद्यापही का देत नाही.

**श्री. हमीद ताबा :** जी चौकशी नेमलेली आहे. त्या समितीचा अहवाल अद्यापही आलेला नाही.

**मा. सभापती** : या कामी सर्वसाधारण सभेमध्ये समिती गठीत झालेली आहे व याबाबतचा प्रश्न सर्वसाधारण सभेतच उपस्थित करावा म्हणजे मा. महापौर योग्य तो खुलासा करतील.

**श्री. गौतम खरात, श्री. अब्दुल रशिद खान (मामू) :** सदरील शिक्षक कामावर आहेत त्यामुळे त्यांना नियमाप्रमाणे पगार दयावा.

**मा. सभापती** : मा. आयुक्त यांनी आपले मत मांडावे.

**मा. आयुक्त** : शिक्षक भरतीच्या बाबतीत गेले तीन महिन्यापासून सतत चर्चा होत आहे व त्यामुळे सर्वांना त्रास होत आहे. वर्तमानपत्रामधून बातम्या प्रसिध्दीस येतात. त्यामुळे महापालिकेची प्रतिष्ठा पणाला लावलेली आहे. त्याच्यामध्ये भ्रष्टाचार झाल. झालेली नियुक्ती बेकायदेशीर आहे की, कायदेशीर आहे यासाठी आपण समिती नेमलेली आहे. यात समितीने ठरविले की, जिल्हा परिषदेतील आठ शिक्षक आहेत. त्यांना आपण ठेवायचे नाही काढून टाकायचे आहे. तत्कालीन आयुक्त यांनी जरी मेरीट लिस्ट तयार केली असली तरी जो आदेश दिला त्याचा सभागृहात अवमान झालेला आहे. हे शिक्षक आम्ळास नको आहेत असा जर निर्णय झाला तर त्यांना पगार कसा देणार आणि म्हणून या चौकशीचा अहवाल येत नाही. ही चौकशी स्वच्छपणे व पारदर्शकपणे करणे आवश्यक आहे ही चौकशी झाल्याशिवाय एकलाही पगार देवू नये असे मी आदेश दिलेले आहेत.

**श्री. अब्दुल रशिद खान (मामू) :** सदरील शिक्षक काम करीत आहेत.

**मा. आयुक्त** : यांची नेमणक मुळात बेकायदेशीर आहे असे जर म्हणून त्यांना काढून टाकण्यचा निर्णय घेतल्यास त्यांचा पगारातुन काढुन कपात करावा हा प्रश्न तयार होतो.

**श्री. अब्दुल रशिद खान (मामू) :** शिक्षक कर्मचारी सध्या कामावर आहेत आणि त्यांना नियमाप्रमाणे पगार देणे आवश्यक आहे. जर पगार न दिल्यास उद्या ते सर्व शिक्षक कोर्टात जातील. त्यावेळी निर्णय त्यांचेच बाजुने लागणार आहे.

**मा. आयुक्त** : आम्ही प्रशासनाची भूमिका स्पष्ट केलेली आहे. आपण तशा प्रकारचा ठराव घ्यावा. आमचे काही म्हणणे नाही.

**श्री. गौतम खरात :** चौकशी किती दिवस लागणार आहे.

**मा. आयुक्त** : म्हणूनच चौकशी लवकर झाल्यास निर्णय घेणे योग्य राहील.

**श्री. भगवान घडामोडे :** याबाबत विधी सल्लागारांनी खुलासा करावा.

**मा. सभापती** : विधी विभागाने आपले मत मांडावे.

**डॉ. भागवत कराड :** शिक्षक भरती प्रकरणच मुळात बेकायदेशीर आहे ही चर्चा झालेली आहे. आणि मा. आयुक्त यांनी केलेल्या खुलासाही योग्य आहे. तेव्हा कमीटीने काही कालावधीत चौकशी करुन निर्णय द्यावा नसता त्या कालावधीनंतर संबंधित शिक्षकांनी पगार देण्याची व्यवस्था करावी.

**श्री. अब्दुल रशिद खान (मामू) :** मनपाच्या कोणत्या नियमान्वये आपण त्यांचे पगार रोखतो याची माहिती दयावी.

**श्री. कचरु नवपुते :** सर्वसाधारण सभेमध्ये चौकशीचा निर्णय झालेला आहे. आपण या ठिकाणी निर्णय घेणे योग्य नाही.

**श्री. अब्दुल रशिद खान (मामू) :** सभागृहात चौकशी करावी असा निर्णय झालेला आहे. परंतु त्याचा पगार थांबवावा असा नाही. आपण एखादया कर्मचाऱ्यास निलंबन केले किंवा त्याच्या अपीलावर निर्णय देतो तेव्हा त्याचप्रमाणे या सभेने सुध्दा निर्णय घ्यावा.

**मा. सभापती** : स. स. मी. तुमच्या मताशी सहमत आहे. परंतु अगोदर विधी सल्लागाराने मत घ्यावे.

**श्री. महादेव सुर्यवंशी :** १. संबंधित शिक्षकांना आपण रुजू करुन घेतले.

२. मा. आयुक्त यांनी केलेला खुलासा की, चौकशी चालू असल्याने पगार देता येत नाही. जर चौकशी चालू आहे तर संबंधित शिक्षकांना कामावर का

ठेवते. कारण चौकशी कधीपर्यंत होईल याचा काही अंदाज नाही. शिक्षकांचे काम मात्र चालू आहे तेव्हा त्यांना त्यांचे कामाचा मोबदला देणे आवश्यक आहे. गेले १५ वर्षापासून कोणतेही पदनाम नसतांना आपण काही कर्मचाऱ्यांना पगार देतो. तर मग यांना का नको.

**डॉ. कराड** : पगाद देऊ नये असे माझे मत आहे.

**मा. सभापती** : कायदेशीर सल्ला घेऊनच निर्णय घेणे योग्य.

**मा. आयुक्त** : ज्यांची नेमणूक कायदेशीर आहे पगार देता येऊ शकते. नेमणूक कायदेशीर आहे किंवा नाही यांच्या जेव्हा वाद सुरु आहे. तेव्हा त्यांना पगार कसे देता येईल.

**श्री. अब्दुल रशिद खान (मामू) :** लेबर लॉ प्रमाणे मा. आयुक्त यांचा आदेश बरोबर नाही तेव्हा कामावर असलेला शिक्षकांचा पगार रोखने ठिक नसून, नियमाप्रमाणे त्यांना पगार देण्यात यावा.

**विधी सल्लागार :** सर्वसाधारण सभेने जी समिती गठीत केलेली आहे. यामध्ये शिक्षक भरती कायदेशीर किंवा बेकायदेशीर आहे. भ्रष्टाचार झालेला आहे किंवा कसे त्यावर चौकशी करीत. परंतु सध्या शिक्षकवर्ग काम करीत असून, त्यांना नियमाप्रमाणे कामाचा पगार देण्यास हरकत नाही.

**मा. सभापती** : सभागृहात जिल्हा परिषद शिक्षक भरती बाबत बऱ्याच वेळे पासून चर्चा चलू आहे. आपल्या वरिष्ठ सभागृहांची याबाबत निर्णय घेतलेला होता आणि एक समिती या ठिकाणी आपण स्थापन केलेली होती. या समितीमध्ये याचा पगार रोखावे यांचा पगार देवू नये, असे कुठेही म्हटलेले नव्हते. तरीही प्रशासनाने त्यांचा पगार रोखलेला होता. ते प्रशासनाचे मत होते. परंतु याच ठिकाणी प्रशासनाने विधी सल्लागार याचे असे मत आहे की, त्यांना पगार देण्यास हरकत नाही. त्यांच्या मताशी आम्ही या ठिकाणी सहमती दर्शवून जिल्हा परिषदेतील कामावरील शिक्षक आहेत. त्यांना पगार देण्यास हरकत नाही असे स्थायी समितीचे मत आहे. तसेच जी चौकशी समिती गठीत केलेली आहे. त्या समितीला सचिव यांनी पत्र दयावे की, शिक्षक भरती प्रकरणी चौकशी लवकरात लवकर करावी व त्यामुळे महापालिकेची जी मानहानी आहे भरुन निघेल.

**श्री. भगवान घडामोडे :** स्टोन इंडस्ट्रीज बाबत माहिती दयावी.

**मा. सभापती** : सहा. संचालक नगररचना यांनी पुढील बैठकीत माहिती दयावी.

**श्री. सुभाष टाकळकर :**पाणी पुरवठा विभागात पाण्यात टाकावयाची जी तुरटी आहे ती मागील वर्षी किती मागविली व यावर्षी किती मागविली याची माहिती दयावी.

**मा. सभापती** : कार्यकारी अभियंता पा. पू. यांनी खुलासा करावा.

**कार्यकारी अभियंता (पा.पू.) :** याबाबत सविस्तर माहिती पुढील बैठकीत देण्यात येईल. परंतु आजच्या बैठकीत ज्या उप अभियंताचे प्रश्न आहेत. त्यांनी बैठकीस उपस्थित रहावे किंवा केबीनमध्ये बसुन रहावे.

**श्री. महादेव सुर्यवंशी :** स्थायी समितीच्या इतिवृत्ताची प्रती सर्व विभाग प्रमुख शाखा प्रमुख यांना का देता हे मला समजत नाही. खुलासा व्हावा.

**सचिव** : मिटींग विभागामार्फत जो अजंडा तयार करण्यात येतो. त्यात बहुतेक मनपाचे सर्व विषय असतात. त्यांचा विषय जरी नसला तरी त्यांना सर्वांना माहिती व्हावे म्हणून जवळपास सर्व अधिकाऱ्यांना हा अजंडा वाटप करण्यात येतो की, त्याप्रमाणे त्यांना कल्पना येऊ शकते.

**श्री. महादेव सुर्यवंशी :** सर्व विभाग प्रमुख व शाखा प्रमुखांकडे अजंडयाच्या प्रति ज्याअर्थी जातात तर कोणत्याही समितीत पारित झालेल्या ठरवाची अंमलबजावणी लवकर का होत नाहीत. उशिर लागण्याची शक्यता का असते.

**मा. सभापती** : स. स. मार्फत अशासकीय प्रस्ताव सर्वसाधारण सभेत मांडल्या जातात तर स्थायी समिती सभेत फक्त स.स. सुचना मांडतात. याबाबतची अंमलबजावणी प्रशासनाने करावी. त्याचबरोबर स. स. ना. विनंती की, अशा प्रकारच्या सुचना किंवा अशासकीय प्रस्तावाबाबतचे यादी आमच्याकडे दयावी. आम्ही मा. आयुक्तांकडे विचारणा तसेच सचिवांनी सुध्दा सर्वसाधारण सभेत झालेल्या ठरवाच्या अंमलबजावणीबाबत संबंधित विभागाकडून माहिती मागवावी व स. स. ना. पत्राने कळवावी.

**डॉ. कराड** : मनपाच्या विविध कामाबाबत ज्या वर्तमानपत्रात जाहिराती दिल्या जातात. त्या स्थानिक वर्तमानपत्रात परंतु दैनंदिन वाचनात येणाऱ्या वर्तमानपत्रात टेंडरच्या जाहिराती रोटेशन पध्दतीने देण्यात याव्यात. खोटया वर्तमानपत्रात देण्यात येऊ नये. त्यामुळे सर्वांचा यामध्ये फायदा होईल. एकाच गुत्तेदाराची पध्दती संपण्याची शक्यता आहे.

**श्री. अब्दुल रशिद खान (मामू) :** शासनाच्या अधिकृत वर्तमानपत्रातुन जाहिर निविदा मागवाव्यात शिवाय टेडंर मंजूर करतांना आपणही डोळेझाक करु नये. आपलेही सर्व काही पाहुनच मंजूरी देणे आवश्यक आहे.

**मा. सभापती** : यामध्ये टेंडर वेगवेगळया वर्तमानपत्रात पाठवितो. ते कशाप्रकारे पाठवित व कोणकोणत्या वर्तमानपत्रात पाठवाण्याची पध्दत आपल्याकडे आहे. त्याप्रमाणे टेंडर पाठविल्या जातात. यामध्ये सर्वसाधारण सभेमध्ये असा निर्णय घ्यावा की, इतक्या लाखापर्यंतचे कामाची निविदा खालच्या वर्तमानपत्रात द्यावयास हरकत नाही. परंतु इतक्या लाखाच्यावर जर असतील तर ते मात्र जास्त खपाच्या वर्तमानपत्रातचे दिले पाहिजे. असे जर असेल तरच त्याप्रमाणे कार्यवाही करणे सोईस्कर होईल.

**श्री. हमीद ताबा :** टेंडर बाबत वर्तमानपत्रात आलेल्या जाहिरातीनुसार टाऊन हॉल येथे गुत्तेदार जमा होतात. एकत्रित रिंग करण्याची पध्दती अवलंबितात.

**मा. सभापती** : जनसंपर्क अधिकारी यांना याबाबत माहिती दयावी.

**जनसंपर्क अधिकारी :** जिल्हा माहिती अधिकारी यांचेकडील प्राप्त यादी प्रमाणे आपले कडील सयकुलर पध्दतीनुसार एक जाहिरात तीन वर्तमानपत्रात (स्थानिक) दिल्या जातात.

**मा. सभापती** : या व्यतिरिक्त इतर वर्तमानपत्रात जाहिराती स. स. च्या निदर्शनास आल्यास तसे दाखववे. त्यावर कार्यवाही करु.

**मुख्य लेखा परीक्षक :** मनपाच्या निविदा जाहिराती बाबत एक जाहिरात विभागीय पातळीवर दै. वर्तमानपत्रात असावे, जर दुसरे दोन स्थानिक पातळीवरील नामांकन वर्तमानपत्रात असावे.

**मा. आयुक्त** : रु. ५.०० लाखाचे कामाचे बाबतीत विभागीय पातळीवर दै. वर्तमानपत्रात द्यावो. असे आदेश दिलेले आहे. एकदा स. स. श्री. गाडे यांनी मो. हर्षनगर येथील कामाचे बाबतीत माझ्याकडे तक्रार केली होती. त्यावेळी मी स्वत: त्या ठिकाणी गेलो. तेथील काम करणे अतिशय आवश्यक असल्याने तेथील कामाचे तीन वर्तमानपत्रात जाहिरात दिलेली होती. त्यास प्रतिसाद ही चांगला मिळला होता त्याचे कमी दराचे टेंडर होते. तसे स्थायी समितीला

पाठविले. आणि तेच मंजूर झालेले आहे. परंतु यामध्ये एखादा वर्तमानपत्र विभागीय पातळीवरील असता तर जास्त सोईचे झाले असते. म्हणुन प्रशासनाला आदेश दिलेले आहेत की, जर रु. ५.०० लाखाचे वरील काम असेल तर तीन दै. वर्तमानपत्रात आपण रोडेशन प्रमाणे जाहीरात देतो. त्यातील तिन्ही वर्तमानपत्र कमी सस्कुलेशनचे असतील तर एक दै. वर्तमानपत्र विभागीय पातळी वरील असावे.

**मा. सभापती** : ठिक आहे निर्णय चांगला आहे.

**श्री. भगवान घडामोडे :** काही असे कामाचे टेंडर काढतात तर त्यांचे काहीही महत्व नसतात. माझ्या वार्डात पाण्याची पाईप लाईनचे कामाचे बाबतीत असून, सुध्दा त्यापेक्षा इतर कामे लवकर होतात.

**श्री. हमीद ताबा :** चांगल्या ख्यातीचे वर्तमानपत्राचे बिलेही रु. ५०-६० हजारापर्यंत येतात. त्यामुळे स्थानिक पातळीवरील वर्तमानपत्रात जाहिराती दिल्या जातात.

**मा. आयुक्त** : रु. ५.०० लाखावरील सर्व जाहिराती / टेंडरच्या त्या चांगल्या व विभागीय पातळीवरील वर्तमानपत्रातुन द्यावयास पाहिजे. उदा. तरुण भारत, सामना लोकमत वगैरे.

**श्री. भगवान घडामोडे :** हर्षनगर येथील रु. ८.०० लाखाचे खांडकाचे शॉर्ट टेंडर काम काढण्याची काय आवश्यकता होती. त्यापेक्षा इतर कामांना प्राधान्य देता येत नाही काय? पाण्याचा प्रश्न माझ्या वार्डातली असुनही तेथील काम येत्या सहा महिन्यापासून होत नाही. मात्र खांडकी काम चालु होतात. त्यामुळे प्रशासनाचे धोरण बरोबर नाही.

**श्री. हमीद ताबा :** माझ्या वार्डातील खांडकीचे काम होते. त्याची पाहणी संबंधित अधिकाऱ्यांना केलेली आहे आणि तो महत्वाचा प्रश्न होता.

**मा. आयुक्त** : कामाचा तत्परता लक्षात घेता टेंडर न काढता सुध्दा ६७ (क) (३) मध्ये घेता येते.

**श्री. कचरु नवपुते :** बऱ्याचशा प्रस्तावावर आपणच सभागृहात शॉर्ट टेंडरचे निर्णय घेत असतो.

**श्री. अब्दुल रशिद खान (मामू) :** बरेचसे स. स. दोन-तीन दिवस कार्यालयात येतच नाही. तरीही त्यांचे कामे आपण या ठिकाणी करतो व आमच्या सारखे स. स. सारखा कामाचा पाठपुरावा करतो.

**मा. सभापती** : आपल्याकडे ८२ स. स. अतिशय चांगले आहेत. त्यांच्या काम करण्याच्या पध्दतीमुळेच शहराचा विकास चांगला होत आहे.

**श्री. सुभाष टाकळकर :** दि. १२-१०-९६ ला स. स. सौ. गंगवाल यांना शहागंज भागात पाणपोई त्यांच्या स्वेच्छा निधीच्या खर्चातुन करणे बाबत पत्र दिलेले होते. अद्याप ही झालेले नाही.

**मा. सभापती** : संबंधित अधिकाऱ्यांनी माहिती द्यावी.

**श्री. कचरु नवपुते :** स्वेच्छा निधीतुन खर्च संपला किंवा नसल्यास कामे होत नाही. अशा प्रकारचे रिमार्कस अनेक फाईल्स वरती येतात. तेव्हा कोणत्या हेड मध्ये किती बजेट आहे. याची विभाग वाईज माहिती द्यावी.

**मा. सभापती** : ठिक आहे. लेखाधिकारी व मुख्य लेखा परिक्षक यांनी कामांची विभाग वाईज किती बजेट आहे व किती खर्च झाला व किती शिल्लक आहे. याची माहिती पुढील बैठकीत द्यावी.

**श्री. कंवरसिंग बैनाडे :** माझ्या वार्डातील स्वेच्छा निधीतुन माझ्या वार्डात पाणपोई करण्यासाठी मी पत्र दिलेले होते. अद्यापही झालेले नाही. माझ्या भावाचा जानेवारी महिन्यात स्मृती दिन आहे. त्या निमित्त याचे काम होणे आवश्यक होते. आता असे समजले की, या कामाचे टेंडर काढले आता पर्यंत कोणत्याही पाणपोईच्या कामाचे टेंडर काढलेले नाही. मग याच कामाचे का काढले.

**श्री. अब्दुल रशिद खान (मामू) :** मा. आयुक्त यांना रु. २५/- हजाराचे कामाचे अधिकार द्यावेत. आपल्या कडील स. स. पाचही पदाधिकाऱ्यांना पत्र देऊन कळविल्या की, माझ्या वार्डातील हे काम वगैरे त्यामुळे मा. आयुक्त यांनी सर्व कामाचे बाबतीत टेंडर काढण्याची कार्यवाही सुरु केलेली आहे.

**मा. सभापती** : रु. २५/- हजाराचे काम नोटीस बोर्डवर लावून कामे होत आहेत. मा. आयुक्त यांनी असे आदेश काढलेले होते की, नगरसेवक स्वेच्छानिधी आहे. त्यांचे काम एका महिन्यांचे आत व्हायला पाहिजे. परंतु स. स. मामु यांनी सांगितल्या प्रमाणे नियमानुसार कार्यवाही झालेला असल्यास आणि मा. आयुक्त यांचे अधिकार वाढवावेत जेणे करुन मा. आयुक्त सुध्दा खंबीरपणे चांगले काम करु शकतील.

**श्री. अब्दुल रशिद खान (मामू) :** मा. आयुक्त यांना रु. १.०० लाखाचे अधिकार आहेत. आपण वेगवेगळया प्रकारे पत्र दिल्यामुळे मा. आयुक्त यांनी ते लांबविले.

**श्री. कचरु नवपुते :** वार्डातील स्वेच्छा निधी बाबत रु. १.०० लाखाचे बाबतीत उपलब्ध गुत्तेदार जो असेल त्यांचेकडून काम करुन घ्यावे व तसे अधिकार मा. आयुक्त यांना द्यावे. म्हणजे कामे लवकर होतील.

**मा. सभापती** : मा. आयुक्त यांना रु. ३.०० लाखाचे कामाचे अधिकार प्रकरण ५ कलम (२) अन्वये टेंडर कॉल करुन केले पाहिजे. असे शासनाने धोरण आहेत. परंतु आपण असे ठरविले की, रु. २५/- हजाराचे काम डायरेक्ट करावे त्याही पेक्षा इमरजन्सी असल्यास ३७ (क) (३) अन्वये काम मा. आयुक्त त्यांच्या अधिकारात करुन शकतात व कार्योत्तर मंजुरीस्तव माहितीस्तव स्थायी समितीकडे पाठवु शकतात.

**शहर अभियंता :** स. स. सो. गंगवाल यांच्या पाण पोईचा प्रस्ताव होता त्या संदर्भाने पाण्याचा प्रेशर किती असावा. याबाबत संचिका तयार करुन कार्यकारी अभियंता पापु यांच्या अभिप्रायासाठी पाठविली होती. त्यांनी पाण्याच्या प्रेशर बाबतीत आम्ही ते करुन म्हणून अभिप्राय दिलेला आहे. यानंतर सौ. गंगवाल यांनी अशा ठिकाणी मागी केलेली आहे की, त्याठिकाणी पाणपोईमुळे जास्त गर्दी होईल. तेव्हा याबाबत मा. आयुक्त यांचेकडे संचिका पाठविली आहे.

**मा. सभापती** : शहरात बऱ्याच ठिकाणी पाणपोई आपण बांधल्या त्यावेळी आपण कार्यकारी अभियंता पा. पु. यांचा अभिप्राय घेतलेला होता काय? याच ठिकाणी का घेतो.

**शहर अभियंता :** याच्यापुर्वी माझ्यातर्फे बांधण्यात आलेल्या नाहीत.

**मा. सभापती** : मग यापुर्वीच्या पाणपोई कुणी बांधल्या?

**कार्यकारी अ. पापु :** सिडको भागातील जेवढया पाणपोई बांधण्यात आलेल्या आहेत. त्या पापु विभागाकडुन बांधण्यात आलेल्या आहेत. स. स. सौ. अंगवाल यांचा अर्ज वार्डामध्ये पाणपोई बांधण्याबाबतचा असल्याने कामे पुर्ण झाले नाही. स. स. श्री. बैनाडे यांच्या बाबतीत टेंडर कॉल केले आहे. उपलब्ध गुत्तेदार यांचे कडून सदरील कामे करुन घेण्यात येईल.

**मा. सभापती** : यांच्या पुर्वी पाणपोईचे बाबतीत टेंडर मागविले होते काय?

**कार्यकारी अ. पाणीपुरवठा :** काही कामांचे बाबतीत मागितले काहीचे मागविले नाही. उपलब्ध गुत्तेदाराकडून काम करवुन घेण्यात आले.

**मा. आयुक्त** : रु. ३,०००/- हजाराच्या वर जर कोणताही खर्च करावयाचा असेल तर निविदा काढल्याशिवाय खर्च करता येत नाही. ही कायदयामध्ये तरतुद आहे, यामध्ये रु. २५/- हजाराचे जी कामे आहेत. ती कामे ए-१ निविदावर आपण नोटीस बोर्ड वर लावुन करतो. रु. ३.०० लाखापर्यंत मला अधिकार आहेत. रु. ३.०० ते ५.०० लाखापर्यंत स्थायी समितीला अधिकार आहेत व रु. ५.०० लाखाच्या वरील सर्वसाधारण सभेची मंजुरी घ्यावी लागते. ही नियमाप्रमाणे करावे लागते. आपण जो गाडा चालवितो आहोत. प्रशासन व स. स. यांच्या वार्डातील कामे सुरळीत होण्याच्या दृष्टीने कामे तात्काळ करतो. आज स्वेच्छा निधीचे हजारो कामे शहरात चालु आहेत. काही कामे झालेली आहेत. एखादे काम स्वेच्छा निधीचे असेल ते प्रशासनाने करीत नाही. असे म्हणणे योग्य नाही. स. स. सौ. गंगवाल यांचे पाणपोईचे काम होऊच शकत नाही. त्या ठिकाणी मोठयातील शंभर ट्रक दररोज ये जा करतात. रात्री बेरात्री सरदार पटेलच्या पुतळयाजवळ काही झाल्यास कोण जबाबदार या बाबतीत स. स. सौ. गंगवाल यांनी मी सांगितले आहे. याबाबत समजुन काढण्यासाठी मी स्थळ पाहणी करणार आहे. जर योग्य असल्यास तर पाण पोई होईल. अन्यथा होणार नाही.

**श्री. सुभाष टाकळकर :** त्यानंतर स. स. सौ. गंगवाल यांनी दि. १६-०८-९६ ला पत्र दिलेले आहे की, राजाबाजार येथील लॉटरीचे दुकाने आहेत ते हटवावे.

**श्री. हमीद ताबा :** मनपा याबाबत कार्यवाही करणार काय?

**मा. सभापती** : याबाबत मा. आयुक्त यांनी दखल घ्यावी. खाजगी ठिकाणी असल्यास आपण ही काहीही करु शकणार नाही. परंतु रस्त्यावर अतिक्रमण झालेले असल्यास मनपातर्फे कार्यवाही करावी.

**श्री. सुभाष टाकळकर :** त्यानंतर दि. १६-०८-९६ चे पत्र आहे. सरदार वल्लभभाई यांचे पुतळयाजवळील गार्डनचे सुशोभीकरण करावे.

**मा. सभापती** : या कामाचे बाबतीत अंदाजपत्रक तयार केले आहे.

**श्री. सुभाष टाकळकर :** गांधी पुतळयाजवळ बसस्टॉपचे शेड उभाराचे म्हणुन तीन महिन्यापासुन पत्र दिलेले आहे.

**मा. सभापती** : स. स. चे पत्र कोणत्याही कामाचे स्वरुप असल्यास संबंधित अधिकाऱ्यांनी होणार किंवा नाही. याबाबतचे उत्तर स. स. ना. आठ दिवसात द्यावे. म्हणजे कोणताही संबंध अधिकाऱ्याबाबत वाहणार नाही.

**श्री. अब्दुल रशिद खान (मामू) :** बरेचसे स. स. आपआपलं कामाचे संदर्भातील पत्र मा. आयुक्त यांना देतात. त्यामुळे संबंधित अधिकाऱ्यांकडे पत्र मिळाल्यानंतर कामास उशीर होतो.

**मा. सभापती** : स. स. ना. आयुक्तांकडे यांच्या साठी पत्र देतात की, त्यांचे लक्षात यायला पाहिजे की, माझे कामाचे बाबतीत पत्र संबंधित विभागाला दिलेले आहे व ते काम मा. आचुक्त यांच्या नजरेतुन गेल्यास काम करण्यास उशीर लागणार नाही.

**श्री. सुभाष टाकळकर:** तुरटीची माहिती द्यावी.

**कार्यकारी अ. पा.पु. :** यावर्षी आपण ५० मेट्रीक टन तुरटी मागविलेली आहे. त्याने टेंडर मागविले आहे. ते जास्तीचे दर आलेले आहे. मा. आयुक्त यांचेकडे निगोशिअन्स करण्यासाठी बोलाविले होते. व ते रद्द केलेले आहे. आता लोकल सेल्क डाव्हनेमेंट शासकीय अंगिकृत संस्थेकडुन आपण मागवित आहोत.

**मा. सभापती** : एक शासनाचा जी. आर. आहे की, लोकल सेल्क गर्व्हनमेंट कडुन विना टेंडर आपण घेऊ शकतो.

**श्री. भगवान घडामोडे :** अशा प्रकारचे कोणत्याही कामाच्या बाबतीत लोकल सेल्क गर्व्हनमेंट अप्रोच झाल्यास आपण घेणार काय?

**मा. सभापती** : होय आपण विना टेडंर कोणत्याही कामाचे बाबतीत घेणार कारण शासनमान्य संस्था आहे. त्यावर शासनाचा अंकुश आहे.

**डॉ. कराड** : गेल्या कित्येक दिवसापासुन मी सतत विचारणा करीत आहे की, क्रांतीचौक शिवाजी महाराज पुतळयाजवळील चौकात लाईटची व्यवस्था करणे बाबत अद्यापी कार्यवाही झालेली नाही.

**मा. सभापती** : सदरचे काम आठ दिवसात पुर्ण करुन घ्यावे. संबंधित एजन्सीजकडुन संपुर्ण काम तात्काळ करुन घेण्याची कार्यवाही करावी. नंतरच डॉ. आंबेडकर पुतळयाजवळील कामास सुरुवात करावी.

**श्री. हमीद ताबा :** नगरनाक्या जवळ एक गाडी २४ तास उभी राहते व येणाऱ्या मालवाहु गाडयांकडून पैसे वसुल करतात. त्याबाबत पाबंद करावे.

**मा. आयुक्त** : ठिक आहे तशा सुचना देण्यात येतील.

**श्री. महादेव सुर्यवंशी :** बऱ्याचशा शाळेतील शिक्षकांना ट्रेनिंगसाठी पाठविले त्यामुळे शाळेतील विद्यार्थी / विद्यार्थीनी यांच्या अभ्यासावर परिणाम होत आहे.

**मा. सभापती** : शिक्षण अधिकारी यांनी खुलासा करावा.

**शिक्षणअधिकारी :** शिक्षक प्रशिक्षणासाठी गेल्यामुळे विद्यार्थीच्या अभ्यासावर परिणाम झाला असे नाही. परंतु काही शिक्षकानाच आपण प्रशिक्षणासाठी पाठविलेले आहे.

**श्री. कचरु नवपुते :** माझ्या वार्डातील शाळेत मी गेलो असता तेथ फक्त एका वर्गातच मुले उपस्थित होते. शिक्षक कुणीही नव्हते पुर्ण शाळा रिकामीच होती.

**शिक्षण अधिकारी :** सकाळी ठिक ९ ते सांय ५ पर्यंत डीपीईपी ची प्रशिक्षण चालु आहे.

**मा. सभापती** : शाळेतील विद्यार्थ्यांना डबेल डेस्क बाबत काय कार्यवाही केली इयत्ता ५ ते ७ वी च्या विद्यार्थ्यांना देणे बाबत ठरलेले होते.

**मा. आयुक्त** : सात दिवसांत टेडंर काढुन कार्यवाही करावी.

**मा. सभापती** : डबेल डेस्क बाबतची कार्यवाही लेखाधिकारी यांनी त्वरीत करावी.

**श्री. अब्दुल रशिद खान (मामू) :** मागील इतिवृत्ता चर्चा झाल्यानुसार फुलेनगर उस्मानपुरा येथील अभ्यासिका केंद्रावर काम करीत असलेल्या सौ. वाघमारे यांना दै. वेतनावर घेणे बाबत काय कार्यवाही झाली.

**श्री. कचरु नवपुते :** त्याचप्रमाणे श्री. वाघुले यांनाही अनुकंपा धर्तीवर नौकरी बाबत ठरलेले होते. त्याची माहिती द्यावी.

**मा. सभापती** : दै. वेतनावर गेली ५-१० वर्षापासुन जे कर्मचारी ज्येष्ठता यादीनुसार काम करीत आहेत. त्यांना पुन्हा आता काढु नये त्यांना पुढे कायम करण्यासाठी मंजुरी पदानुसार व आपल्या सेवा भरती नियमानुसार कार्यवाही करावी. त्याचप्रमाणे पाणी पुरवठा विभागातील लाईनमन पदाबाबत गेली २-३

दिवसापासुन मी स्वतः उपआयुक्त-२ यांचेशी संपर्कात आहे. तरी याबाबत योग्य ते कार्यवाही त्वरीत करावी.

**उप आयुक्त-२** : सो. वाघमारे या फुलेनगर उस्मानपुरा येथे प्रकल्प विभागांतर्गत कार्यरत होत्या. त्यांना दै. वे. वर रु. ३५/- प्रमाणे आदेश काढणेची कार्यवाही चालु आहे. त्याचप्रमाणे श्री. वाघुळे यांचे बाबतीत संबंधित संचिकेत माझे मत स्पष्ट केलेले आहे.

**श्री. अब्दुल रशिद खान (मामू)** : यांत्रिकी विभागात जे नविन रिक्शावर वाहन चालक यांचेसाठी यादी मागविण्यात आली. त्याबाबत काय झाले.

**उप आयुक्त-१** : सेवायोजन कार्यालयाकडुन १०० लोकांची यादी प्राप्त झाली आहे. आता संबंधिताकडुन प्रॅक्टीकल टेस्टसाठी मुलाखती घेऊन नियमाप्रमाणे कार्यवाही करण्यात येईल.

**श्री. गौतम खरात** : मनपामध्ये जे कर्मचारी रोजंदारीवर काम करीत आहेत व त्यांचेकडे लायसंस व कामाचा अनुभव आहे. त्यानांही मुलाखतीसाठी बोलाविण्यात यावे.

**मा. सभापती** : ठिक आहे आता इतिवृत्तावर चर्चा व्हावी.

**डॉ. कराड** : प्लॉस्टिक सर्जरी कॅम्पसाठी अपेक्षीत खर्च रु. २०.०० लाख अशा दुरुस्ती पान क्र. ५ च्या इतिवृत्त करण्यात यावी.

**मा. सभापती** : ठिक आहे तशी दुरुस्ती करावी.

**श्री. अ. शिदखॉन** : इतिवृत्त पृष्ठ क्र. ४ मध्ये केरकचरा वाहुन नेणाऱ्या वाहनातील पाटया तुटलेल्या अवस्थेत आहेत. याची माहिती पुढील बैठकीत देण्यात येईल असे म्हटले होते. त्याचे काय झाले?

**मा. सभापती** : संबंधित अधिकारी पुढील बैठकीत माहिती देतील त्याचेप्रमाणे पृष्ठ क्र ६ मध्ये स. स. श्री. रशिद मामु यांच्या उच्चारात उल्लु हा शब्द प्रयोग केला. ते वाक्य इतिवृत्तातुन वगळण्यात येते. त्याचप्रमाणे मा. सभापती यांचे वाक्यातून आलेले वाक्य इतिवृत्तातून वगळण्यात येते. तसेच पृष्ठ क्र. ८ मध्ये सभापती यांच्या उचारात " प्रशासनाच्या निदर्शनास " या वाक्याऐवजी प्र हे वाक्य टंकलिखीत झाले त्यास दुरुस्ती करण्यात येते.

**श्री. कचरु नवपुते** : मागील इतिवृत्तात मी नंदु वाघुळे यांचे बाबतीत अनुकंपा धर्तीवर घेणे बाबत सुचना केलेली होती त्याचे काय झाले?

**उप-आयुक्त-२** : संबंधितांना कळविण्यात आलेले आहे.

**मा. सभापती** : अनुकंपा धर्तीवरील नौकरीची मागणी करणारे श्री. नंदु वाघुळे यांना त्यावेळी समज नव्हती, अज्ञानी होते. त्यामुळे सहनुभूतीने मानवदृष्टीने विचार करुन कार्यवाही करावी.

**श्री. कचरु नवपुते** : त्याच्या सोबतचे असे एक उदा. आहे की, संजय सखाहरी साळवे यांचे बाबतीत कशी कार्यवाही झाली. त्याच पध्दतीने कार्यवाही करावी.

**मा. सभापती** : पृष्ठ क्र. ९ मध्ये स. स. श्री. कुंवरसिंग बैनाडे यांचे वाक्यात संबंधिताच्या पतीचे नांव अशी आहे. याऐवजी सौ. काळे यांचे पतीचे नाव आहे. अशी दुरुस्ती करण्यात यावी.

२. पृष्ठ क्र. १० मध्ये स. स. सौ. जोशी यांच्या वाक्यात स्वामी विवेकांनद गार्डनची सुध्दा वेळ वाढवावी. असे आहे. त्याऐवजी वृध्दा असे टंकलिखीत चुक दुरुस्ती करावी.

३. जकात बाबतची माहिती देण्याबाबत काय झाले.

**जकात अधिक्षक** : पुढील बैठकीत माहिती देण्यात येईल.

**मा. सभापती** : इतिवृत्तातीत पृष्ठ क्र ३३ विषय क्र. ५०२/७ मध्ये शहाबादी फरशी बसविणे बाबत स्थळ पाहणी करीता ठेवावे. दुरुस्ती करण्यात येते.

**श्री. महादेव सुर्यवंशी** : ड्रेनेज चेंबर मेनहोल लावल्यास ५-५ फुटावर बसविले आहेत. त्यामुळे मनपाचे लाखो रुपये नुकसान झाले आहे. काही भागात मेनहोलवरुन ३-४ ड्रेनेजचे कनेक्शन संबंधित नागरिकांनी घेतलेले आहेत. याबाबत स्थळ पाहणी करुन चौकशी करावी. कारण रोडवर ती शहाबादी फरशी बसवित असतांना संपुर्ण रोड उखडुन टाकावा लागतो. काही ठिकाणी फरशी बसवित असतांना योग्य ती फिनीशींग दिल्या जात नाही. साधारणत: १ इंची ते १ १/२ इंची वरच फरशी बसविल्या जातात आणि नंतर त्या उखडल्या जातात. यामध्ये खडी वापर रेतीचा व सिमेंट हे त्या त्या प्रमाणात असावयास पाहिजे. परंतु प्रत्यक्षात तसे होत नाही. याबाबत प्रत्यक्ष तशी पाहणी करावी. तक्षशिलानगर येथेही बऱ्याच भागातील काम चालु आहे. त्या ठिकाणी चांगले काम होणे आवश्यक आहे. याबाबत योग्य ती कार्यवाही व्हावी.

**मा. सभापती** : स. स. च्या भावना लक्षम घेता संबंधित वार्डातील व इतर वार्डातील स. स. हे पोटतिडकिने आपआपले परिने समस्यांबाबत प्रत्यक्षात दर्शवितात याबाबत मुख्य लेखा परिक्षक यांनी संबंधित स. स. बरोबर करुन अहवाल सादर करावा. तोपर्यंत सदरील प्रस्ताव स्थगित ठेवावा शहरात एकंदर १२ ठिकाणी खांडक्या बसविण्याचे कामे चालु आहेत. याबाबत स. स. सोबत पाहणी करुन सभागृहाला अहवाल सादर करावा.

**श्री. कचरु नवपुते** : मो. बायजीपुरा येथील कामाबाबत अनेक तक्रारी आहेत.

**कार्यकारी अभियंता पा. पु** : तक्षशिलानगर येथे नविन ड्रेनेज लाईन टाकण्याचे काम चालु आहे. त्या ठिकाणी रिंग बसविलेले नाहीत. ज्या वेळी रिंग बसविण्यात येतील त्यावेळेस त्यांची संपुर्ण फिनीशींग होईल व काम सुरळीत होईल. मो. बायजीपुरा येथे ज्यावेळेस नविन लाईन टाकण्याचे काम चालु होते. त्यावेळेस खांडकी रस्त्याचे खोदकाम करणे आवश्यक असते आणि त्यामुळे रस्त्यावर घाण होते. पर्यायाने पुर्ण रोडवर ना दुरुस्ती दिसुन येते. परंतु त्या ठिकाणी ५-५ फुटावर जे मेनहोलवरुन कनेक्शन घेतलेले आहेत असे नाही. घाण पाणी ताबडतोब वाहुन जाण्यासाठी या चेंबरामुळे सोपे जाते आणि लहान मोठया गल्या असल्याने कनेक्शन घेण्यास अवघड जाते. यासाठी चेंबर व्यवस्थित करणे आवश्यक आहे.

**श्री. कचरु नवपुते, श्री. महादेव सुर्यवंशी** : संजयनगर भागात प्रत्येक घरासमोर ५-५ फुटावर चेंबर दिलेले आहेत.

**श्री. गौतम खरात** : एका मेनहोलचा खर्च एकूण किती येतो. माझ्या माहितीप्रमाणे जवळपास २५०/- रु खर्च एका मेनहोलचा होतो.

**कार्यकारी अ. पा. पु.** : अंदाजे खर्च रु. १७००/- एका मेनहोलचा येतो.

**श्री. कचरु नवपुते** : याबाबत स्थळ पाहणी करावी.

**मा. सभापती** : ठिक आहे. स्थळ पाहणी करावी.

**श्री. महादेव सुर्यवंशी** : या ठिकाणी पुर्ण लाईन पडलेली आहे असे म्हटलेले आहे.

**श्री. हमीद ताबा :** १. डेव्हलपमेंट प्लॅट बाबत १६-२० तारखेच्या दरम्यान बैठक होणार आहे काय? (तसेच शहानुरवाडी ड्रेनेज
२. लाईन बाबत आपण संबंधित फाईल सभागृहात दाखवित असे म्हटलेले होते. त्याचे काय झाले?
३. पृष्ठ क्र. ५० विषय क्र. ५२३/१५ मध्ये अंदाजपत्रक रु. १५,३२,३६०/- यामध्ये शासकीय अनुदान रु. ६.०० लक्ष म्हणजे उर्वरित रु. ९,३२,३६०/- असे
४. पृष्ठ क्र. १७ मध्ये जकात विभागातील पावती पुस्तक ॲटी करफानचे कार्यालयाने नेले त्याबाबतची माहिती दयावी.
५. औरंगपुरा येथील नाल्यावर एका संस्थेने लिजवर जागेची मागणी केलेली होती. त्याचे काम झाले.

**उप आयुक्त-१ :** जकात विभागातील पावती पुस्तकाबाबत येथील उद्योग सहसंचालक यांनी विभागीय चौकशीसाठी ते पावती पुस्तके ठेवलेले आहेत. त्याची चौकशी त्यांची चौकशी पुर्ण झाल्यानंतर पावती पुस्तक परत करणार आहेत असे लेखी कळविली आहे.

**श्री. हमीद ताबा, श्री. अब्दुल रशिद खान (मामू) :** शाळेच्या मुल्याकंनाबाबत काय कार्यवाही झाली.

**उप अभियंता (बां) :** शाळेच्या मुल्याकंनाबाबत सर्व्हे करुन सार्वजनिक बांधकाम विभागाने तयार करुन दिलेला आहे. व मुल्याकंनासाठी शासनाकडे पाठविण्यात येणार आहे.

**विषय क्र. १ :**

दिनांक १८-१२-९६ रोजी संपन्न झालेल्या स्थायी समिती सभेचे इतिवृत्त कायम करणे.

**ठराव :**

१. नविन शिक्षक भरती प्रकरणातील सर्व शिक्षकांना विधी सल्लागार यांनी दिलेल्या मता नुसार त्यांना लागलेल्या तारखेपासूनचा पगार देण्यात यावा. चौकशी चालू राहील.
२. इतिवृत्तातील पृष्ठ क्र. ५ मध्ये स. स. श्री. डॉ. कराड यांचे वाक्यात प्लॅस्टिक सर्जरी कॅम्पसाठी रु. १.०० लाखाचे असे आहे. त्याऐवजी रु. २०.०० लाख खर्च अपेक्षित आहे. अशी दुरुस्ती करण्यात येते.
३. पृष्ठ क्र. ६ मध्ये स. स. श्री. रशिद मामु व मा. सभापती यांच्या उद्‌गारात " उल्लू " असा शब्दप्रयोग आला तो इतिवृत्तातून वगळण्यात येते.
४. पृष्ठ क्र. ९ मध्ये स. स. श्री. कुंवरसिंग बैनाडे यांच्या वाक्यात संबंधिताचे पतीचे नांव ऐवजी सौ. काळे यांच्या पतीचे नांव दुरुस्ती व्हावी.
५. इतिवृत्तातील पृष्ठ क्रृ ३३ विषय क्र. ५०२/७ मध्ये स्थळपाहणी करीता ठेवावे. अशी दुरुस्ती करण्यात येते.
६. या व इतर दुरुस्तीसह दि. १८-१२-९६ च्या इतिवृत्तास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ५३१/२ :**

कार्यकारी अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला की, हिराखॉन हाऊसिंग सोसायटी रेल्वेस्टेशन भागात १५०, २५० मी. मी. व्यासाची आर. सी. ड्रेनेज लाईन टाकणे बाबत परिसर अभियांत्रिकी यांच्या सन १९९५-९६ च्या दरसुची नुसार र. रु. ४,९९,२००/- चे अं. प. तयार करण्यात आले आहे. सदरील खर्च हा " मेनसीव्हर लाईन जलनि:सारण " ह्या आर्थिक शिर्षका खाली करण्यात येईल.

तरी प्रस्ताव मंजुरीस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्यानुसार, हिराखॉन हाऊसिंग सोसायटी रेल्वेस्टेशन भागात १५०, २५० मी. मी. व्यासाची आर. सी. ड्रेनेज लाईन टाकणेचे कामासाठी परिसर अभियांत्रिकी यांच्या सन १९९५-९६ च्या दरसुची नुसार तयार करण्यात आलेले र. रु. ४,९९,२००/- चे अंदाजपत्रकास तसेच सदरील खर्च " मेनसीव्हर लाईन जलनि:सारण " ह्या आर्थिक शिर्षका खाली करण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ५३२/३ :**

कार्यकारी अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला की, रेल्वेस्टेशन गांधीनगर येथे १५०/२५० मी. मी. व्यासाची ड्रेनेज लाईन टाकणे बाबत परिसर अभियांत्रिकी विभागाचे सन ९५-९६ च्या दरसुची नुसार अं. प. रक्कम रु. २,१५,०००/- चे तयार करण्यात आले आहे. सदरील खर्च हा " भांडवली कामे " जलनि:सारण ह्या आर्थिक शिर्षकाखाली करण्यात येईल. तरी अंदाजपत्रक मंजुरीस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्यानुसार, रेल्वेस्टेशन गांधीनगर येथे १५०/२५० मी. मी. व्यासाची ड्रेनेज लाईन टाकणेच्या कामासाठी परिसर अभियांत्रिकी विभागाचे सन ९५-९६ चे दरसुची नुसार तयार करण्यात आलेले र. रु. २,१५,०००/- चे अंदाजपत्रकास तसेच सदरील खर्च " भांडवली कामे " ह्या आर्थिक शिर्षकाखाली करण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ५३३/४ :**

कार्यकारी अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला की, भरतनगर श्री. घोंडे पाटील यांचे घरापासून ते जयनगर पर्यंत १५० मी. मी. व्यासाची एस. डब्ल्यू. जी. ड्रेनेज लाईन टाकणे बाबत परिसर अभियांत्रिकी विभागाचे सन ९५-९६ च्या दरसुची प्रमाणे र.रु. ४,७१,५००/- चे अ. पत्रक तयार करण्यात आले आहे. सदरील खर्च " जलनि:सारण देखभाल व दुरुस्ती " ह्या शिर्षकाखाली करण्यात येईल.

तरी प्रस्ताव मंजुरीस्तर सादर.

**मा. सभापती** : एस. डब्ल्यु जी. ड्रेनेज लाईन ऐवजी आर. सी. सी. लाईन अशी दुरुस्ती वाचावी व शॅर्ट टेंडर काढुन कार्यवाही करावी. प्रस्ताव मंजुर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्यानुसार, भरतनगर श्री. घोंडे पाटील यांचे घरापासून ते जयनगर पर्यंत १५० मी. मी. व्यासाची एस. डब्ल्यू. जी. ड्रेनेज लाईन टाकणेचे कामासाठी परिसर अभियांत्रिकी विभागाचे सन ९५-९६ च्या दरसुची नुसार तयार करण्यात आलेले र.रु.

४,७१,५००/- चे अंदाजपत्रकास तसेच सदरील खर्च " जलनि:सारण देखभाल व दुरुस्ती " ह्या शिर्षकाखाली करण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ५३४/५ :**

कार्यकारी अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला की, सिल्कमील कॉलनी येथे १५०, २५० मी. मी. व्यासाची आर. सी. सी. ड्रेनेज लाईन टाकणे बाबत परिसर अभियांत्रिकी यांच्या सन ९५-९६ च्या दरसुची नुसार अंदाजपत्रक र. रु. ४,५२,३२०/- चे तयार करण्यात आले आहे. सदरील खर्च हा भांडवली कामे जलनि:सारण ह्या आर्थिक शिर्षकाखाली करण्यात येईल. तरी प्रस्ताव मंजुरीस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्यानुसार, सिल्कमील कॉलनी येथे १५०, २५० मी. मी. व्यासाची आर. सी. सी. ड्रेनेज लाईन टाकणेचे कामासाठी परिसर अभियांत्रिकी यांच्या सन ९५-९६ च्या दरसुची नुसार तयार करण्यात आलेले र. रु. ४,५२,३२०/- चे अंदाजपत्रकास तसेच सदरील खर्च भांडवली कामे जलनि:सारण ह्या आर्थिक शिर्षकाखाली करण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ५३५/६ :**

कार्यकारी अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला की, सादतनगर (स्लम) भागात १५० व २५० मी. मी. व्यासाची आर. सी. सी. ड्रेनेज लाईन टाकणे बाबत अं. प. रक्कम रु. ४,०२,०००/- यास ठराव क्र. २०९/१९ दि. ३०-०८-९६ द्वारे मान्यता मिळाली होती. त्यानंतर निविदा सुचना प्रसिध्द करुन निविदा मागविल्या असता एकूण अकरा निविदा विक्री झाल्या होत्या. त्यापैकी सात निविदा प्राप्त झाल्या असून, खालील प्रमाणे दर दर्शविले आहेत.

| | | |
|---|---|---|
| १. | श्री. बसरा कंन्स्ट्रक्शन | १६.९९ % अं. प. च्या दरापेक्षा कमी |
| २. | श्री. एस. ए. देशमुख | १३% अं. प. च्या दरापेक्षा कमी |
| ३. | श्री. कुसेन अली | २१.८५% अं. प. च्या दरापेक्षा कमी |
| ४. | श्री. निसार अहेमद | २३.६६% अं. प. च्या दरापेक्षा कमी |
| ५. | विपुल कंन्स्ट्रक्शन | २१.२% अं. प. च्या दरापेक्षा कमी |
| ६. | श्री. बदरबीन सालम | २३.७०% अं. प. च्या दरापेक्षा कमी |
| ७. | श्री. एस. एन. हुसेनी | १०.२९% अं. प. च्या दरापेक्षा कमी |

वरील दर पाहता तुलनात्मकदृष्ट्या कमी दराने व अं.पत्रकाच्या दरापेक्षा २३.७०% कमी दराचे श्री. बदरबीन सालम यांचे दरपत्रक आहे.

तरी प्रस्ताव मंजुरीस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्यानुसार, सादतनगर (स्लम) भागात १५० व २५० मी. मी. व्यासाची आर. सी. सी. ड्रेनेज लाईन टाकणेच्या कामासाठी तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी व अंदाजपत्रकीय दरापेक्षा २३.७०% कमी दराचे गुत्तेदार श्री. बदरबीन सालम यांचे दरपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ५३६/७ :**

कार्यकारी अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला की, कोकणवाडी केसरसिंगपुरा येथे १५०, २५० मी. मी. व्यासाची आर. सी. सी. ड्रेनेज लाईन टाकणे बाबत अंदाजपत्रकीय रक्कम रु. १,३५,३००/- यास ठराव क्र.----- दि.-------- द्वारे स्थायी समितीमध्ये मान्यता

मिळाल्यानंतर निविदा सुचना प्रसिध्द करुन निविदा मागविल्या असता एकूण अकरा निविदा विक्री झाल्या होत्या. त्यापैकी दर भरलेल्या तीन निविदा प्राप्त झाल्या असून, त्या खालील प्रमाणे दर दर्शविलेले आहेत.

| | | |
|---|---|---|
| १. | शे. सलिम अहमद | १५.१ % अं. प. च्या दरापेक्षा कमी |
| २. | स. रफिकोद्दीन | १८.१५% अं. प. च्या दरापेक्षा कमी |
| ३. | हुसेन अली | २३.५% अं. प. च्या दरापेक्षा कमी |

वरील दर पाहता तुलनात्मकदृष्ट्या कमी दराची निविदा अं.पत्रकाच्या दरापेक्षा २३.५% कमी दराची श्री. हुसेन अली यांची निविदा आहे. तरी प्रस्ताव मंजुरीस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्यानुसार, कोकणवाडी, केसरसिंगपुरा येथे .१५०, २५० मी. मी. व्यासाची आर. सी. सी. ड्रेनेज लाईन टाकणे बाबतचे कामासाठी तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी व अंदाजपत्रकीय दरापेक्षा २३.५% कमी दराचे गुत्तेदार, श्री. हुसेन अली यांचे निविदापत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ५३७/८ :**

कार्यकारी अभियंता पाणी पुरवठा व जलनि:सारण यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, मो. गितानगर, स्लम येथे नविन २५० मी. मी. व्यासाची आर. सी. सी. ड्रेनेज लाईन टाकणेच्या कामाकरीता र. रु. १,४३,५३८/- चे तयार करण्यात आले आहे.

सदरील काम लेखा शिर्षक " झोपडपट्टी सुधारणा " ९६-९७ या लेखा शिर्षकाखाली प्रस्तावित केले आहे. सदरील कामास मा. आयुक्तांनी दि. १३-१२-९६ ला प्रशासकीय मंजुरी दिलेली आहे. तरी अंदाजपत्रक र. रु. १,४३,५३८/- ला स्थायी समितीच्या मंजुरीस्तव व विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्यानुसार, मो. गितानगर, स्लम येथे नविन २५० मी. मी. व्यासाची आर. सी. सी. ड्रेनेज लाईन टाकणेच्या कामाकरीता तयार करण्यात आलेले र. रु. १,४३,५३८/- चे अंदाजपत्रकास तसेच सदरील काम " झोपडपट्टी सुधारणा " ९६-९७ या लेखा शिर्षकाखाली करण्यास सर्वानुमे मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ५३८/९ :**

कार्यकारी अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला की, काझीवाडा येथे १५० मी. मी. व्यासाची ए. सी. जलवाहिनी टाकावयाची आहे. त्यासाठी परिसर अभियांत्रिकी विभागाची सन ९५-९६ च्या दरसुची नुसार र. रु. १,६६,०९७/- एवढयाचे अंदाजपत्रक तयार करण्यात आले आहे. सदर कामाचा खर्च हा भांडवली कामाची तरतुद मधुन करण्यात येणार आहे.

तरी अंदाजपत्रक मंजुरीस्तव प्रस्ताव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्यानुसार, काझीवाडा येथे १५० मी. मी. व्यासाची ए. सी. जलवाहिनी टाकणेच्या कामासाठी परिसर अभियांत्रिकी विभागाची सन ९५-९६ च्या दरसुची

नुसार तयार करण्यात आलेले र. रु. १,६६,०९७/- चे अंदाजपत्रकास तसेच सदर कामाचा खर्च भांडवली कामाचे तरतुदी मधुन करण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ५३९/१० :**

कार्यकारी अभियंता, पाणी पुरवठा व जलनिःसारण यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, मो. संजयनगर येथे २५० मी. मी. व्यासाची ड्रेनेज लाईन टाकणेच्या कामाकरीता र. रु. १,४२,७९५/- चे अंदाजपत्रक तयार करण्यात आले आहे.

सदरील काम लेखा शिर्षक झोपडपट्टी सुधारण ९६-९७ ह्या मधुन प्रस्तावित केले आहे, सदरील अ. पत्रक मा. आयुक्तांनी दि. ०२-११-९६ ला मंजुरी दिलेली आहे. यामधुन अं.पत्रकीय र.रु. १९.९०० चे काम मा. आयुक्तांनी मंजुरी घेऊन तातडीचे असल्यामुळे करण्यात आले आहे. तरी उर्वरित र. रु. १,२२,८९५/- च्या कामास अं. प. स्थायी समितीच्या मंजुरीस्तव व विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्यानुसार, मो. संजयनगर येथे २५० मी. मी. व्यासाची ड्रेनेज लाईन टाकणेच्या कामासाठी तयार करण्यात आलेले र. रु. १,४२,७९५/- चे अंदाजपत्रकास तसेच सदरील काम झोपडपट्टी सुधारणा ९६-९७ या लेखा शिर्षकामधुन करण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

**विषय क्र. ५४०/११ :**

कार्यकारी अभियंता पा. पु-१ यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, पाणी पुरवठा देखभाल दुरुस्ती करीता विविध व्यासाचे स्लुस व्हॉलची खरेदी करण्याची गरज आहे. सदरील विविध व्यासाचे स्लुस व्हॉल खरेदीसाठी अं.पत्रक रक्कम रु. ४,८७,५९३/- एवढयाचे तयार करण्यात आले असून, प. अभियांत्रिकी विभागाच्या सन ९५-९६ दरसुची नुसार प्रस्तावित करण्यात आले आहे. सदरील खर्च हा पाणी पुरवठा भांडवली कामाच्या तरतुदी मधुन करण्यात येणार आहे. सदरील साहित्य खरेदीसाठी दैनिक पत्रकात निविदा प्रसिध्दी करुन डी फॉर्मवर अधिकृत विक्रेते किंवा अधिकृत पुरवठाधारक यांच्याकडुन निविदा मागविण्याबाबत तसेच अंदाजपत्रक र. रु. ४,८७,५९३/- चे मंजुरीस्तव प्रस्ताव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्यानुसार, पाणी पुरवठा देखभाल दुरुस्ती करीता विविध व्यासाचे स्लुस व्हॉलची खरेदी करणेसाठी तयार करण्यात आलेले र. रु. ४,८७,५९३/- चे अंदाजपत्रकास तसेच सदरील साहित्य खरेदीसाठी दैनिकात निविदा प्रसिध्द करुन डी. फॉर्मवर अधिकृत विक्रेते किंवा पुरवठा धारक यांचे कडुन निविदा मागविण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ५४१/१२ :**

शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, मो. भावसिंगपुरा गांव येथील रस्त्याचे डांबरीकरण करणे बाबत कामाकरीता सा. बा. खाते यांच्या वर्ष ९५-९६ च्या दरसुची नुसार रु. ६,४८,६७७/- चे अंदाजपत्रक तयार करण्यात आले आहे. सदरील " अठरा खेडी विकास योजना " या शिर्षकातुन करण्यात येईल. सदरच्या अंदाजपत्रकास मा. आयुक्त साहेबांनी दि. ०६-०७-९६ ला प्रशासकीय मान्यता दिली आहे आणि दि. १९-०८-९६ रोजी सर्वसाधारण सभेम मंजुरी मिळाली आहे.

प्रस्तावित कामासाठी निविदा मागविण्यात आले असता एकूण चार निविदा विकल्या गेल्या व अंतिम तारखेपर्यंत एकूण चार निविदा प्राप्त झाल्या व दि. ०५-११-९६ रोजी उपस्थित गुत्तेदारासमक्ष उघडण्यात आल्या.

| | | |
|---|---|---|
| १. | आदिनाथ कंन्स्ट्रक्शन | १७.९९% कमी |
| २. | मास्कॉट कंन्स्ट्रक्शन | १७.८६% कमी |
| ३. | आर. बी. देशमुख | १२.८७% कमी |
| ४. | डी. अजित सिंग | ५% कमी |

तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी म्हणजेच अं. प. दरापेक्षा १७.९९% कमी दराची निविदा श्री. आदिनाथ कंन्स्ट्रक्शन यांची आहे. तरी अंदाजपत्रकीय दरापेक्षा १७.९९% कमी दराची असलेली श्री. आदिनाथ कंन्स्ट्रक्शन यांचे निविदेस मान्यतेचा प्रस्ताव विचारार्थ तथा मंजुरीस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्यानुसार, मो. भावसिंगपुरा गांव येथील रस्त्याचे डांबरीकरण करणे बाबत कामाकरीता तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी व अंदाजपत्रकीय दरापेक्षा १७.९९% कमी दराचे गुत्तेदार, आदिनाथ कंन्स्ट्रक्शन यांचे निविदा पत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

वैधानिक कार्यवही व्हावी.

**विषय क्र. ५४२/१३ :**

शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, घाटी जयभिमनगर येथे संरक्षित भिंत बांधणेबाबत कामाकरीता सा. बा. खाते यांचया वर्ष ९५-९६ च्या दरसुची नुसार रु. ५,७८,३००/- चे अं. प. तयार करण्यात आले आहे. सदरील काम " खुली गटार " या शिर्षकातुन करण्यात येईल. सदरच्या अंदाजपत्रकास मा. आयुक्त साहेबांनी दि. ०६-०७-९६ ला प्रशासकीय मान्यता दिली आहे. तसेच दि. १७-०८-९६ रोजी सर्वसाधारण सभेत मंजुरी मिळाली आहे.

प्रस्तावित कामासाठी निविदा मागविण्यात आल्या असता एकुण आठ निविदा विकल्या गेल्या व अंतिम तारखेपर्यंत एकुण चार निविदा प्राप्त झाल्या व दिनांक ०५-११-९६ रोजी उपस्थित गुत्तेदारासमक्ष उघडण्यात आल्या.

| | | |
|---|---|---|
| १. | श्री. कुलवंतसिंग | ३.७% जास्त |
| २. | श्री. बदर बिन सालम | ७% जास्त |
| ३. | सिद्यीकी एम. झेड | ९% जास्त |
| ४. | शेख उमर | १०% जास्त |

तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी म्हणजेच अंदाजपत्रकीय दरापेक्षा ३.७% जास्त दराची निविदा श्री. कुलवंतसिंग यांची आहे. तरी अंदाजपत्रकीय दरापेक्षा ३.७% जास्त दराची असलेली श्री. कुलवंतसिंग यांची निविदेस मान्यतेचा प्रस्ताव विचारार्थ तथा मंजुरीस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्यानुसार, घाटी जयभिमनगर येथे संरक्षित भिंत बांधणेबाबतचे कामासाठी तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी व अंदाजपत्रकीय दरापेक्षा ३.७% जास्त दराचे गुत्तेदार, श्री. कुलवंतसिंग यांचे निविदा पत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ५४३/१४ :**

शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला की, मो. मोगलपुरा स्लम येथील रस्त्याचे पुर्नडांबरीकरण व नविन डांबरीकरण करणे बाबत कामाकरीता सा. बा. खाते यांच्या वर्ष ९५-९६ च्या दरसुची नुसार रु. ४,६४,१२८/- चे अंदाजपत्रक तयार करण्यत आले आहे. सदरील काम डांबरी रस्ते या शिर्षकातुन करण्यात येईल. सदरच्या अंदाजपत्रकास मा. आयुक्त साहेबांनी दि. ०३-०७-९६ ला प्रशासकीय मान्यता दिली आहे. तसेच दि. ०९-०८-९६ रोजी स्थायी समितीची अंदाजपत्रकास मंजुरी मिळाली आहे.

प्रस्तावित कामासाठी निविदा मागविण्यात आल्या असता एकुण चार निविदा विकल्या गेल्या व अंतिम तारखेपर्यंत एकुण तीन निविदा प्राप्त झाल्या व दि. ०५-११-९६ रोजी उपस्थित गुत्तेदारासमक्ष उघडण्यात आल्या.

| | | |
|---|---|---|
| १. | आदिनाथ कंन्स्ट्रक्शन | १७.९९% कमी |
| २. | मास्कॉट कंन्स्ट्रक्शन | १७.८६% कमी |
| ३. | आर. बी. देशमुख | ९.८८% कमी |

तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी म्हणजेच अंदाजपत्रकीय दरापेक्षा १७.९९% कमी दराची निविदा श्री. आदिनाथ कंन्स्ट्रक्शन यांची आहे. तरी अंदाजपत्रकीय दरापेक्षा १७.९९% कमी दराची असलेली श्री. आदिनाथ कंन्स्ट्रक्शन यांचे निविदेस मान्यतेचा प्रस्ताव विचारार्थ तथा मंजुरीस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्यानुसार, मो. मोगलपुरा स्लम येथील रस्त्याचे पुर्नडांबरीकरण व नविन डांबरीकरण करणे बाबतचे कामाकरीता तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी व अंदाजपत्रकीय दरापेक्षा १७.९९% कमी दराचे गुत्तेदार, आदिनाथ कंन्स्ट्रक्शन यांचे निविदापत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ५४४/१५ :**

शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला की, मो. हर्सुल मे. पिसादेवी पर्यंत रस्त्याचे डांबरीकरण करणे बाबत कामाकरीता सा. बा. खाते यांच्या वर्ष ९५-९६ च्या दरसुची नुसार रु. १,२२,९८,००५/- चे अं. पत्रक तयार करण्यात आले आहे. सदरील काम नविन डांबरीकरण या शिर्षकातुन करण्यात येईल. सदरच्या अंदाजपत्रकास मा. आयुक्त साहेबांनी दि. १७-०७-९६ ला प्रशासकीय मान्यता दिली आहे. तसेच दि. २०-०८-९६ च्या सर्वसाधारण सभेत मंजुरी मिळाली आहे.

प्रस्तावित कामासाठी निविदा मागविण्यात आल्या असता एकुण ६ निविदा विकल्या गेल्या व अंतिम तारखेपर्यंत एकुण ४ निविदा प्राप्त झाल्या व दिनांक ०५-११-९६ रोजी उपस्थित गुत्तेदारासमक्ष उघडण्यात आल्या.

| | | |
|---|---|---|
| १. | आदिनाथ कंन्स्ट्रक्शन | १७.९९% कमी |
| २. | मास्कॉट कंन्स्ट्रक्शन | १७.८६% कमी |
| ३. | डी. अजितसिंग | ११% कमी |
| ४. | आर. बी. देशमुख | १५.८८% कमी |

तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी म्हणजेच अंदाजपत्रकीय दरापेक्षा १७.९९% कमी दराची निविदा श्री. आदिनाथ कंन्स्ट्रक्शन यांची आहे. तरी अंदाजपत्रकीय दरापेक्षा १७.९९% कमी दराची असलेली श्री. आदिनाथ कंन्स्ट्रक्शन यांचे निविदेस मान्यतेचा प्रस्ताव विचारार्थ तथा मंजुरीस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्यानुसार, मो. हर्सुल मे. पिसादेवी पर्यंत रस्त्याचे डांबरीकरण करणे बाबतचे कामाकरीता तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी व अंदाजपत्रकीय दरापेक्षा १७.९९% कमी दराचे गुत्तेदार, आदिनाथ कंन्स्ट्रक्शन यांचे निविदा पत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ५४५/१६ :**

शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला की, मो. इंदिरानगर, बायजीपुरा स्लम येथे रस्त्याचे डांबरीकरण करणे बाबत कामाकरीता सा. बा. खाते यांच्या वर्ष ९५-९६ च्या दरसुची नुसार रु. २५,७२,७६७/- चे अंदाजपत्रक तयार करण्यात आले आहे. सदरील काम " डांबरी रस्ते " या शिर्षकातुन करण्यात येईल. सदरच्या अंदाजपत्रकास मा. आयुक्त साहेबांनी दि. ०६-०७-९६ ला प्रशासकीय मान्यता दिली आहे. तसेच दि. १७-०८-९६ रोजी सर्वसाधारण सभेत अंदाजपत्रकास मंजुरी मिळाली आहे.

प्रस्तावित कामासाठी निविदा मागविण्यात आल्या असता एकुण पाच निविदा विकल्या गेल्या व अंतिम तारखेपर्यंत एकुण चार निविदा प्राप्त झाल्या व दिनांक ०५-११-९६ रोजी उपस्थित गुत्तेदारासमक्ष उघडण्यात आल्या

| | | |
|---|---|---|
| १. | आदिनाथ कंन्स्ट्रक्शन | १७.९९% कमी |
| २. | मास्कॉट कंन्स्ट्रक्शन | १७.८६% कमी |
| ३. | डी. अजितसिंग | ११% कमी |
| ४. | आर. बी. देशमुख | १०.८८% कमी |

तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी म्हणजे अंदाजपत्रकीय दरापेक्षा १७.९९% कमी दराची निविदा श्री. आदिनाथ कंन्स्ट्रक्शन यांची आहे. तरी अंदाजपत्रकीय दरापेक्षा १७.९९% कमी असलेली श्री. आदिनाथ कंन्स्ट्रक्शन यांची निविदेस मान्यतेचा प्रस्ताव विचारार्थ तथा मंजुरीस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्यानुसार, मो. इंदिरानगर, बायजीपुरा स्लम येथे रस्त्याचे डांबरीकरण करणे बाबतचे कामाकरीता तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी व अंदाजपत्रकीय दरापेक्षा १७.९९% कमी दराचे गुत्तेदार, श्री. आदिनाथ कंन्स्ट्रक्शन यांचे निविदापत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ५४६/१७ :**

शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला की, मो. संजयनगर, बायजीपुरा स्लम येथील रस्त्याचे डांबरीकरण करणे बाबत कामाकरीता सा. बा. खाते यांच्या वर्ष ९५-९६ च्या

दरसुचीनुसार रु. १२,५१,२००/- चे तयार करण्यात आले आहे. सदरील काम " डांबरी रस्ते " या शिर्षकातुन करण्यात येईल. सदरच्या अंदाजपत्रकास मा. आयुक्त साहेबांनी दि. २६-०८-९६ ला प्रशासकीय मान्यता दिली आहे. तसेच दि. २०-०९-९६ ला सर्वसाधारण सभेत अंदाजपत्रकास मंजुरी मिळाली आहे.

प्रस्तावित कामासाठी निविदा मागविण्यात आल्या असता एकूण दोन निविदा विकल्या गेल्या व अंतिम तारखेपर्यंत एकुण दोन निविदा प्राप्त झाल्या व दि. २०-११-९६ रोजी उघडण्यात आल्या.

| | | |
|---|---|---|
| १. | मास्कॉट कंन्स्ट्रक्शन | १७.८६% कमी |
| २. | आदिनाथ कंन्स्ट्रक्शन | १५% कमी |

तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी व अंदाजपत्रकीय दरापेक्षा १७.८६% कमी दराची निविदा श्री. मास्कॉट कंन्स्ट्रक्शन यांची आहे. तरी अंदाजपत्रकीय दरापेक्षा १७.८६% कमी दराची असलेली मास्कॉट कंन्स्ट्रक्शन यांची निविदेस मान्यतेचा प्रस्ताव विचारार्थ तथा मंजुरीस्तव सादर.

**मा. सभापती** : स्थळ पाहाणी करण्यात यावी.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविलेल्या कामाची प्रत्यक्ष स्थळ पाहणी करण्यात यावी. असे सर्वानुमते ठरले.

**विषय क्र. ५४७/१८ :**

शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला की, शांतीनिकेतन कॉलनी (शनि मंदिर जवळ) येथील महापालिकेच्या खुल्या जागेवर उद्यान विकसित करणे बाबतचे अंदाजपत्रक सा. बा. खात्याचे सन ९५-९६ च्या दरसुची अन्वये रक्कम रु. २,८२,३००/- चे तयार करण्यात आले. त्यास मा. आयुक्त साहेब यांनी मंजुरी दिलेली आहे. सदर कामाचे खर्च नविन उद्याने या तरतुदी मधुन करण्यात येणार आहे. करीता प्रस्ताव विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्यानुसार, शांतीनिकेतन कॉलनी (शनि मंदिर जवळ) येथील महापालिकेच्या खुल्या जागेवर उद्यान विकसित करणे बाबतचे कामासाठी सा. बा. खात्याचे सन ९५-९६ चे दरसुची अन्वये तयार करण्यात आलेले रक्कम रु. २,८२,३००/- चे अंदाजपत्रकास तसेच सदर कामाचा खर्च नविन उद्याने या तरतुदीमधुन करण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ५४८/१९ :**

शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला की, मो. किलेअर्क स्लम येथे नविन खांडकी बसविणे बाबत कामाकरीता सां. बा. खाते यांच्या वर्ष ९५-९६ च्या दरसुची नुसार र. रु. २,७७,७३९/- चे अंदाजपत्रक तयार करण्यात आले आहे.

सदरील काम ५% कमी कमकुवत घटक कल्याण योजना या शिर्षकातुन करण्यात येईल. सदरच्या अंदाजपत्रकास मा. आयुक्त साहेबांनी दि. १३-१२-९६ ला प्रशासकीय मान्यता दिली आहे. तरी सदरील कामासाठी तयार करण्यात आलेले अंदाजपत्रक र. रु. २,७७,७३९/- यास मान्यतेचा प्रस्ताव विचाराथ तथा मंजुरीस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्यानुसार, मो. किलेअर्क स्लम येथे नविन खांडकी बसविणे बाबत कामाकरीता सां. बा. खात्याचे वर्ष ९५-९६ च्या दरसुची नुसार तयार करण्यात आलेले र. रु. २,७७,७३९/- चे अंदाजपत्रकास तसेच सदरील काम ५% कमकुवत घटक कल्याण योजना या शिर्षकातुन करण्यास व सदर कामाकरीता शॉर्ट टेंडर काढण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ५४९/२० :**

शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला की, गणेश कॉलनी प्रा. शाळे समोरील जागेची लिव्हलींग करणे व पिचिंग करणेच्या कामासाठी सा. बा. खात्याचे सन ९५-९६ चे जिल्हा दरसुची नुसार र. रु. ४,०२,३५०/- चे अंदाजपत्रक तयार करण्यात आले असून, प्रस्ताव मा. स्थायी समिती समोर सादर करण्यासाठी मा. आयुक्तांनी दि. १३-१२-९६ अन्वये शिफारस केली आहे. सबब सदर कामाचे र. रु. ४,०२,३५०/- चे अंदाजपत्रक मंजुरीचा प्रस्ताव विचारार्थ सादर सदरचा खर्च विकास इमारती शाळा व दवाखाने बांधणे या लेखा शिर्षा मधुन सन ९६-९७ या वर्षात करण्यात येईल.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्यानुसार, गणेश कॉलनी प्रा. शाळे समोरील जागेची लिव्हलींग करणे व पिचिंग करणेच्या कामासाठी सा. बा. खात्याचे सन ९५-९६ चे जिल्हा दरसुची नुसार तयार करण्यात आलेले र. रु. ४,०२,३५०/- चे अंदाजपत्रकास तसेच सदरचा खर्च विकास इमारती शाळा व दवाखाने बांधणे या लेखा शिर्षा मधुन सन ९६-९७ या वर्षात करण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ५५०/२१ :**

अतिरिक्त शहर अभियंता यांनी प्रस्ताव दिला की, उस्मानपुरा ते रेल्वे स्टेशन रस्त्याचे मधोमध सोडियम व्हेपर दिले लावण्याचे कामासाठी व विद्युतीकरण करण्याच्या करीता पुर्वी विषय क्र. ३६२/२१ अन्वये रु. ६,०३,४१३/- चे खर्चास ठराव द्वारे मंजुरी मिळालेली असून, सदर कामामध्ये पोल रस्त्याचे दुभाजकात टाकण्यासाठी पोलचे अंतर कमी केल्याने वाढीव पोल व फोटींग संख्या वाढते. त्यासाठी सदर कामात रु. १,४७,२६३/- ची वाढ होते. करीता, प्रस्तावित खर्चास मा. आयुक्तांनी मान्यता दिल्यानुसार रु. १,४७,२६३/- चे वाढीव खर्चास मंजुरी देण्याचा प्रस्ताव विचारार्थ तथा मान्यतेस्तव सादर.

**संवाद :**

**मा. सभापती** : मंजुर प्रस्ताव याच सभेत कायम करण्यात येतो.

**श्री. अब्दुल रशिद खान (मामू) :** स्विमिंग पुलच्या ठिकाणी लाईट कधी पर्यंत लागणार?

**उप अभियंता विद्युत :** कार्यवाही चालु आहे.

**श्री. गौतम खरात :** लिटल प्लॉवर स्कुल ते विद्यापीठ गेट येथील पोल मधोमध लावणे पिरबाजार ते उत्सव मंगल कार्यालया पर्यंत लाईट चालु नाहीत.

**मा. सभापती** : प्रस्ताव मंजुर सोबत कायम करण्यात येते.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्यानुसार, उस्मानपुरा ते रेल्वे स्टेशन रस्त्याचे मधोमध सोडियम व्हेपर दिले लावणे व विद्युतीकरण करण्याच्या कामात पोलचे अंतर कमी केल्याने व वाढीव पोल व फोटींग संख्या वाढल्यानुसार तयार करण्यात आलेले रक्कम रु. १,४७,२६३/- चे

वाढीव खर्चाचे अंदाजपत्रकास तसेच सदर कामाचे प्रस्तावास याच सभेत कायम करण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ५५१/२२ :**

अतिरिक्त शहर अभियंता यांनी प्रस्ताव दिला की, लेखा परिक्षक गृह निर्माण संस्था, हर्सुल येथील रस्त्याचे खडीकरण करणे या कामासाठी तयार करण्यात आलेल्या र. रु. ७,३८,२००/- च्या अंदाजपत्रकास सर्वसाधारण सभा विषय क्र. ९३/७ दि. १९-१०-९६ अन्वये मंजुरी प्राप्त झालेली आहे. त्यानुसार सदरील कामाकरीता निविदापत्रके मागविली असता निविदापत्रके विक्रीच्या अंतिम तारखे पर्यंत एकुण १६ कोरी निविदा पत्रके विकल्या गेली व निविदापत्रके स्विकृतीच्या अंतिम तारखे पर्यंत यापैकी फक्त १० (दहा) निविदापत्रके दर भरुन प्राप्त झाली. प्राप्त निविदा पत्रके दि. -------- रोजी उघडण्यात आली त्याचा तपशील खालील प्रमाणे आहे.

| | | |
|---|---|---|
| १. | श्री. आर. बी. चव्हाण | ३३.००% कमी दराने |
| २. | श्री. सुखबीरसिंग | ३१.००% कमी दराने |
| ३. | श्री. शेख शरीफ | ३०.९९% कमी दराने |
| ४. | सय्यद रफिकोद्यीन | २७.८०% कमी दराने |
| ५. | श्री. एस. एम. मंडोरे | २७.१०% कमी दराने |
| ६. | श्री. शेख मसुद | २८.९२% कमी दराने |
| ७. | बदरबिन सालम | २४.६०% कमी दराने |
| ८. | श्री. मे. एस. एम. असोसिएटस | २२.७२% कमी दराने |
| ९. | श्री. अब्दुल सलाम | १९.१०% कमी दराने |
| १०. | श्री. महंमद रफीक महंमद युनूस | १८.००% कमी दराने |

तरी प्राप्त निविदा पत्रकापैकी श्री. आर. बी. चव्हाण यांच्या निविदापत्रकाचे दर तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी व अंदाजपत्रकीय दरापेक्षा ३३.००% कमी आहेत. तरी श्री. आर. बी. चव्हाण यांचे अंदाजपत्रकीय दरापेक्षा ३.००% कमी दर मंजुरी बाबतचा प्रस्ताव विचारार्थ तथा मंजुरीस्तव सादर.

**संवाद :**

**मा. सभापती** : मंजुर याबाबत संबंधित अधिकाऱ्यांनी जबाबदारी घ्यावी.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्यानुसार, लेखा परिक्षक गृहनिर्माण संस्था, हर्सुल येथील रस्त्याचे खडीकरण करणेच्या कामासाठी तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी व अंदाजपत्रकीय दरापेक्षा ३३.००% कमी दराचे गुत्तेदार, श्री. आर. बी. चव्हाण यांचे निविदापत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ५५२/२३ :**

अतिरिक्त शहर अभियंता यांनी प्रस्ताव दिला की, विभाग क्र. १, २ आणि ३ अंतर्गत रोडचे पॅचवर्क करण्यासाठी पॅचवर्क मटेरिअलचा पुरवठा करण्याच्या कामासाठी सा. बा. खात्याचे सन ९५-९६ च्या दरसुची नुसार अंदाजपत्रक रक्कम रुपये ४,९४,६२०/- चे तयार

करण्यात आलेले आहे. सदरील कामाचा खर्च रस्ते देखभाल व दुरुस्ती पॅचवर्क सन ९६-९७ या लेखा शिर्षकाअंतर्गत उपलब्ध असणाऱ्या तरतुदी मधुन करण्यात येईल.

तरी सदरील कामासाठी तयार करण्यात आलेले अंदाजपत्रक र. रुपये ४,९४,६२०/- चे मंजुरी बाबतचा प्रस्ताव मा. स्थायी समितीचे विचारार्थ तथा मंजुरीस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्यानुसार, विभाग क्र. १, २ आणि ३ अंतर्गत रोडचे पॅचवर्क करण्यासाठी पॅचवर्क मटेरिअलचा पुरवठा करण्याच्या कामासाठी सा. बा. खात्याचे सन ९५-९६ च्या दरसुची नुसार तयार करण्यात आलेले रक्कम रुपये ४,९४,६२०/- चे अंदाजपत्रकास तसेच सदरील कामाचा खर्च रस्ते देखभाल व दुरुस्ती पॅचवर्क सन ९६-९७ या लेखा शिर्षका अंतर्गत उपलब्ध असणाऱ्या तरतुदी मधुन करण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ५५३/२४ :**

शिक्षणाधिकारी यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, महुनगर या वस्तीमध्ये सर्व गरीब लोक राहतात, या परिसरातील बालकांना बालवाडीत प्रवेश घेण्यासाठी महानगरपालिकेतर्फे एक बालवाडी सुरु करण्यात यावी. या भागाचे सर्वेक्षण केले असून, सध्या ४५ विद्यार्थी प्रवेश पात्र आहेत. तसेच बनेवाडी गांव येथे एक बालवाडी सुरु करणे योग्य वाटते.

तरी प्रस्ताव मान्यतेसाठी सादर.

**संवाद :**

**मा. सभापती** : मंजूर.

**श्री. गौतम खरात :** सर्व शाळेतील बालवाडीतील विद्यार्थ्यांना यावर्षी खेळण्या द्याव्यात.

**मा. सभापती** : येत्या शैक्षणिक वर्षात सर्व्हे करुन कार्यवाही करावी. प्रस्ताव मंजुर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्यानुसार, महुनगर या वस्तीमध्ये सर्व गरीब लोक राहत असून, या परिसरातील बालकांना बालवाडीत प्रवेश घेण्यासाठी या भागाचे सर्वेक्षण केल्यानुसार सध्या ४५ विद्यार्थी प्रवेश पात्र असल्यामुळे महानगरपालिकेतर्फे एक बालवाडी सुरु करण्यास तसेच बनेवाडी गाव येथे सुध्दा एक बालवाडी सुरु करण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ५५४/२५ :**

कार्यकारी अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला की, जालना रोड येथे १५० मी. मी. व्यासाची ए. सी. जलवाहिनी टाकावयाची आहे. त्यासाठी परिसर अभियांत्रिकी विभागाची सन ९४-९५ व ९५-९६ च्या दरसुचीनुसार र. रु. २,९४,०३३/- एवढयाचे अंदाजपत्रक तयार करण्यात आले आहे. सदर कामाचा खर्च हा भांडवली कामाची तरतुद मधुन करण्यात येणार आहे.

तरी अंदाजपत्रकास मंजुरीस्तव प्रस्ताव सादर.

**संवाद :**

**मा. सभापती** : स्पेसिफिक लोकेशन दाखववावे. प्रस्ताव मंजुर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्यानुसार, जालना रोड येथे १५० मी. मी. व्यासाची ए. सी. जलवाहिनी टाकाण्याच्या कामाकरीता तयार करण्यात आलेल्या र. रु. २,९४,०३३/- च्या अंदाजपत्रकास व सदरील खर्च भांडवली कामाची तरतुद मधुन करण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ५५५/२६ :**

शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला की, मो. चिकलठाणा येथील झोन नं. ५ च्या समोरील जुने सार्वजनिक शौच्यालय तोडुन त्या जागेवर वाचनालय बांधणे, ज्यामध्ये एक हॉल, जिना, स्वच्छतागृह, संरक्षित भिंत इत्यादी बांधण्यासाठी सा. बा. खात्याचे सन ९५-९६ चे जिल्हा दरसुचीनुसार र. रु. ५.०० लक्ष (पाच लक्ष) चे अंदाजपत्रक तयार करण्यात आले असून, त्यास मा. आयुक्तांनी दि. २०-१२-९६ अन्वये मंजुरी दिलेली आहे. सबब सदर कामाचे र. रु. ५,००,०००/- चे अंदाजपत्रक मंजुरीचा प्रस्ताव विचारार्थ सादर.

सदरचा खर्च सन ९६-९७ या वर्षात " इतर वाचनालय " या लेखा शिर्षामधुन भरण्यात येईल.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्यानुसार, मो. चिकलठाणा येथील झोन नं. ५ च्या समोरील जुने सार्वजनिक शौच्यालय तोडुन त्या जागेवर वाचनालय बांधणे, ज्यामध्ये एक हॉल, जिना, स्वच्छतागृह, संरक्षित भिंत इत्यादी बांधणेच्या कामाकरीता तयार करण्यात आलेल्या र. रु. ५,००,०००/- च्या अंदाजपत्रकास तसेच सदर खर्च ९६-९७ या वर्षात " इतर वाचनालय " या लेखा शिर्षामधुन करण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी. सदर कामी शॉर्ट टेंडर काढण्यात यावे.

**विषय क्र. ५५६/२७ :**

शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला की, मो. बौध्दनगर स्लम येथे शरद प्रोव्हिजन्स गल्लीत फरशी बसविणे बाबत कामाकरीता सा. बा. खाते यांच्या च्या वर्ष ९५-९६ च्या दरसुची नुसार रु. १,३१,३००/- चे अं. प. तयार करण्यात आले आहे. सदरील काम ५% कमकुवत घटक कल्याण योजना या शिर्षकातुन करण्यात येईल. सदरच्या अंदाजपत्रकास मा. आयुक्त साहेबांनी दि. २०-१२-९६ ला प्रशासकीय मान्यता दिली आहे.

तरी सदरील कामाकरीता तयार करण्यात आलेले रु. १,३१,३००/- चे अंदाजपत्रकास मान्यतेचा प्रस्ताव विचारार्थ तथा मंजुरीस्तव सादर

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्यानुसार, मो. बौध्दनगर स्लम येथे शरद प्रोव्हिजन्स गल्लीत फरशी बसविणेच्या कामाकरीता तयार करण्यात आलेल्या र. रु. १,३१,०००/- अंदाजपत्रकास तसेच सदर खर्च ५% कमकुवत घटक कल्याण योजना या शिर्षकातुन करण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ५५७/२८ :**

शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला की, काली मस्जिद नवाबपुरा काब्रास्थान येथे संरक्षित भिंत बांधणे, चौकीदार निवासस्थान बांधणे, लोखंडी कमान उभारणे इ. कामाचे

अंदाजपत्रक सन ९५-९६ चे सा. बा. खात्याच्या दरसुची अन्वये र. रु. १,५२,०००/- चे तयार करण्यात आले. त्यास मा. आयुक्त यांची मंजुरी झालेली आहे. सदर कामाचा खर्च स्मशान भुमी या तरतुदी मधुन करण्यात येणार आहे. करीता प्रस्ताव विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्यानुसार, काली मस्जिद नवाबपुरा काब्रास्थान येथे संरक्षित भिंत बांधणे, चौकीदार निवासस्थान बांधणे, लोखंडी कमान उभारणे इ. कामाकरीता तयार करण्यात आलेल्या र. रु. १,५२,०००/- च्या अंदाजपत्रकास तसेच सदर खर्च स्मशान भूमी या तरतुदी मधुन करण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ५५८/२९ :**

शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला की, बारी कॉलनी येथील मनपा खुल्या जागेवर संरक्षित तार कुंपण व भिंत बांधणे कामा करीता सन ९५-९६ चे सा. बा. खात्याच्या दरसूची अन्वये अंदाजपत्रक र. रु. १,३५,८७५/- चे तयार करण्यात आले आहे. त्यास मा. आयुक्त यांनी मंजुरी झालेली आहे.

सदर कामाचा खर्च विकास योजना अंतर्गत भुखंडाचे संरक्षण या तरतुदी मधुन करण्यात येणार आहे. प्रस्ताव विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्यानुसार, बारी कॉलनी येथील मनपा खुल्या जागेवर संरक्षित तार कुंपण व भिंत बांधणेच्या कामाकरीता तयार करण्यात आलेल्या र. रु. १,३५,८७५/- च्या अंदाजपत्रकास तसेच सदर खर्च " विकास योजना अंतर्गत भूखंडाचे संरक्षण " या तरतुदीतुन करण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ५५९/३० :**

शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, मो. कबीर नगर स्लम वॉर्ड क्र. ६५ भागात जुनी प्रिकॉस्ट व्ही टाईप गटार दुरुस्त करणे व नियोजीत ३०० मी. मी. व्यासाची अर्धगोलाकार प्रिकॉस्ट सरफेस गटाराचे काम करणे र. रु. ६,६०,०००/- चे अंदाजपत्रक सा. बा. विभाग औरंगाबाद यांची दरसुची ९५-९६ प्रमाणे तयार करण्यात आले असून, मा. आयुक्त यांनी दि. ०६-०३-९६ रोजी प्रशासकीय मान्यता दिली आहे. तसेच स्थायी समितीच्या विषय क्र. ____________ दि. १८-०३-९६ रोजी मान्यता मिळाल्यानंतर रितसर वृत्तपत्रात प्रसिध्दी देऊन कार्यालयाची प्रगट निविदा सुचना क्र. मनपा/लेखा/नि/८०/९६ दि. २१-०६-९६ अन्वये निविदा मागविण्यात आल्या असता निविदा विक्रीच्या अंतिम दि. ०५-०७-९६ पर्यंत एकूण सहा (६) कोऱ्या निविदा विकल्या गेल्या व स्विकारण्याच्या तारखेस १६-०७-९६ रोजी फक्त (२) दोन मोहरबंद निविदा प्राप्त झाल्या त्या निविदा उपस्थित ठेकेदारासमक्ष दि. २४-०७-९६ रोजी उघडण्यात आल्या. असता ठेकेदारांनी दिलेले दर खालील प्रमाणे आहे.

| | | |
|---|---|---|
| १. | श्री. ए. एम. फारुकी | अंदाजपत्रकीय दराने |
| २. | श्री. कुलवंतसिंग | अंदाजपत्रकीय दरापेक्षा ५% जास्त |

तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी व अंदाजपत्रकीय दरापेक्षा निविदा श्री. ए. एम. फारुकी यांची निविदा आहे. परंतु मा. आयुक्त साहेबांना सदरील दर मान्य नसल्या

कारणाने संबंधित गुत्तेदारास वाटाघाटीसाठी समक्ष बोलावुन चर्चा केली असता ठेकेदारांनी अंदाजपत्रकीय दराऐवजी अंदाजपत्रकीय दरापेक्षा २% कमी दराने सदरील काम करण्याची हमी दिली आहे. करीता मान्यतेस्तव विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्यानुसार, मो. कबीर नगर स्लम (वॉर्ड क्र. ६५) भागात जुनी प्रिकॉस्ट व्ही टाईप गटार दुरुस्त करणे व नियोजीत ३०० मी. मी. व्यासाची अर्धगोलाकार प्रिकॉस्ट सरफेस गटाराचे काम करणेकरीता प्राप्त झालेल्या निविदापैकी वाटाघाटी अंती ठरल्याप्रमाणे अंदाजपत्रकीय दरापेक्षा २% कमी दराची श्री. ए. एम. फारुकी यांनी निविदा स्विकारण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ५६०/३१ :**

औरंगाबाद शहर मंजुर विकास योजनेनुसार ८० फुट रुंद रस्ता बिबीका मकबरा ते हनुमान टेकडी या रस्त्याचे सर्व्हे क्र. ४५/२ व ४६/२ अंशतः बाधित असून, बाधित क्षेत्र अनुक्रमे ०.३५ गुंठे व ०.११ गुंठे आहे. सदर रस्त्याचे बाधित जमिन खाजगी वाटाघाटीने संपादन करण्यास मिळकतधारक श्री. किसन बालाजी यांनी संमती दिल्यावरुन सदर जमिनीचे मुल्यांकन रु. ६,६९,६२५/- इतकी निश्चित करण्यात आली. दर मोबदल्याची रक्कम घेण्यास मिळकतधारकाने मान्य केले आहे.

तसेच सदर जागेची रजिस्ट्री करुन घ्यावयाची असल्याने रजिस्ट्रीसाठी रुपये १,४५,०००/- (रु. एक लाख पंचेचाळीस हजार फक्त) येते. त्यावेळी ५०% खर्च महानगरपालिका करत असुन ५०% खर्च मिळकतधारक करण्यास संमती दिली आहे. परंतु सदर खर्च मोबदल्याच्या रक्कमेतून वळती करुन घेण्यास मिळकतधारकाने विनंती केली आहे. करीता मिळकतधारकांच द्यावयाची मोबदल्याची रक्कम रु. ६,६९,६२५/- (रु. सहा लाख एकोणसत्तर हजार सहाशे पंचवीस फक्त) मधुन रु. १,४५,०००/- च्या ५०% कमी म्हणजे रु. ७२,५००/- वजा जाता मोबदला र. रु.५,९७,१२५/- (रु. पाच लाख सत्याण्णव हजार एकशे पंचवीस फक्त) अदा करण्यास आणि खरेदीखत (रजिस्ट्री) चा खर्चा र. रु. १,४५,०००/- (रु. एक लाख पंचेचाळीस हजार) अग्रीम म्हणुन श्री. डी. डी. काळेले, शाखा अभियंता नगररचना विभाग महानगरपालिका औरंगाबाद यांना देण्यास सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्यानुसार, औरंगाबाद शहर मंजुर विकास योजनेनुसार ८० फुट रुंद रस्ता बिबीका मकबरा ते हनुमान टेकडी या रस्त्याने बाधित क्षेत्र अनुक्रमे ०.३५ व ०.११ गुंठे खाजगी वाटाघाटीने ठरल्याप्रमाणे श्री. किसन बालाजी मिळकतधारक यांना मोबदल्याची रक्कम देण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

रजिस्ट्री खर्च एकुण र. रु. १,४५,०००/- इतका असून, पैकी ५०% रक्कम मिळकत धारकाने देय रक्कमेतुन वजा करण्याची विनंती केली आहे. त्यानुसार रु. ७२,५००/- वजा जाता मोबदला रु. ५,९७,१२५/- अदा करण्यास तसेच खरेदी खताचा खर्च रक्कम रु. १,४५,०००/- अग्रीम श्री. डी. डी.काळेले, शाखा अभियंता, नगर रचना विभाग, मनपा यांना देण्यास्तव सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. तसेच एकुण खर्च रक्कम रुपये (६,६९,६२५/७२,५००) = ७,४२,१२५/- अशी दुरुस्ती व्हावी.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ५६१/३२ :**

मुख्य लेखा परिक्षक यांनी माहे जुन, जुलै, ऑगस्ट, सप्टेंबर, ऑक्टोबर व नोंव्हेबर ९६ चा लेखा परिक्षण अहवाल सादर केलेला आहे.

तरी विचारार्थ सादर.

**संवाद :**

**मा. सभापती** : सदरील अहवालावर गोपनियता ठेवावी व यावर मंजुरी मिळाल्यानंतर ६/२ प्रमाणे सर्वसाधारण सभेसमोर ठेवावे.

**ठराव :**

सादर करण्यात आलेल्या आहे जुन, जुलै, ऑगस्ट, सप्टेंबर, ऑक्टोबर व नोंव्हेबर ९६ चा लेखा परिक्षण अहवालास सर्वानुमते मान्यता देण्यात येते व सर्वसाधारण सभेस शिफारस करण्यात येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

## पुरवणी विषय पत्रिका

**विषय क्र. ५६२/१ :**

अतिरिक्त शहर अभियंता यांनी प्रस्ताव दिला की, मो. कबाडीपुरा येथील बारुदगर नाल्यावर फुटब्रिज बांधणे या कामासाठी तयार करण्यात आलेल्या र. रु. ४,२०,२००/- च्या अंदाजपत्रकास स्थायी समिती विषय क्र. ५९७/२९ दि. २४-०३-९६ अन्वये मंजुरी प्राप्त झालेली आहे.

त्यानुसार सदरील कामाकरीता निविदापत्रके मागविली असता निविदापत्रके विक्रीच्या अंतिम तारखेपर्यंत एकूण तीन कोरी निविदापत्रके विकल्या गेली व निविदापत्रके विक्रीतीच्या तारखेपर्यंत यापैकी फक्त दोन निविदापत्रके दर भरुन प्राप्त झाली. प्राप्त निविदापत्रके दि. ०९-१०-९६ रोजी उघडण्यात आली. त्याचा तपशील खालील प्रमाणे.

| | | |
|---|---|---|
| १. | श्री. सय्यद फैजुल हक्क | ०.५०% कमी दराने |
| २. | मे. शिबा कन्स्ट्रक्शन | ४.००% जास्त दराने |

वरील प्राप्त निविदापैकी श्री. सै. फैजुल हक्क यांच्या निविदापत्रकाचे दर तुलनात्मकदृष्ट्या कमी व अंदाजपत्रकीय दरापेक्षा ०.५०% कमी दर आहेत.

तरी श्री. सै. फैजुल हक्क यांची अंदाजपत्रकीय दरापेक्षा ०.५०% कमी दर मंजूरी बाबतचा प्रस्ताव विचारार्थ तथा मंजुरीस्तव सादर.

**संवाद :**

**श्री. हमीद ताबा :** मो. बारुदगरनाला फुटब्रिज बांधणे असा प्रस्ताव कसा. कारण बारुदगरनाला व कबाडीपुरा या दोघात अंतर आहे. मग नेमका पूल कोठे बांधणार आहात?

**अति. शहर अभियंता :** ३० मिटरचा फुटब्रिज आहे. बारुदगर नाल्यावर नाही.

**मा. सभापती** : तशी दुरुस्ती करावी. प्रस्ताव मंजुर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे मो. कबाडीपुरा येथील नाल्यावर फुटब्रिज (३० फुट) बांधणेच्या कामाकरीता प्राप्त झालेल्या निविदापैकी तुलनात्मकदृष्ट्या कमी व अ. प. दरापेक्षा ०.५०% कमी दराची श्री. स. फैजूल हक्क यांची निविदा स्विकारण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ५६३/२ :**

शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, आरेफ कॉलनी येथे प्रा. शाळेची इमारत बांधणेच्या कामासाठी ठराव क्र. २७४ दि. २४-०४-९५ अन्वये र. रु. ३,५०,०००/- चे अंदाजपत्रकास मंजूरी प्राप्त झालेली आहे. सदरचे काम हाती घेण्यासाठी प्रशासकीय ठराव क्र. ३३६ दि. २८-०४-९५ अन्वये श्री. जी. आर. माने गुत्तेदार यांचे अंदाजपत्रकीय दरापेक्षा ३.१०% जास्त ऐवजी दराचे वाटाघाटी नुसार अंदाजपत्रकीय दराचे निविदेस मान्यता मिळालेली आहे. काम सुरु करण्यात आलेले असतांना जागेवर बांधकाम करतांना तीन वेळेस साईट बदल्याण्यात आल्या. कारण सदर सोसायटीच्या जागेमध्ये वाद असल्याने मा. आयुक्तांनी प्रत्यक्ष स्थळ पाहणी करुन जागा निश्चित केली. सदरची जागा जमिन लेव्हलपेक्षा बरीच खोल असल्यामुळे तांत्रिकदृष्ट्या सदर शाळेचे लेव्हल रोड लेव्हलला घेणे गरजेचे होते. म्हणुन मुळ कामाच्या काही बाबीमध्ये वाढ झाली व काही बाबीचा मुळ अंदाजपत्रकात समावेश नव्हाता. म्हणुन सदर कामास वाढीव र.रु. १,४६,६२१/- वाढ झालेली आहे. व कामही दि. २४-०६-९६ पर्यंत पूर्ण झालेले आहे.

सदर कामाचे सुधारीत अंदाजपत्रक र. रु. ४,९६,६२१/- ला अतिरिक्त बाबीसह सदरचे काम करणारी मुळ एजन्सी यांचेकडुन वाढीव कामासह कुळ काम करुन घेण्यासाठी स्थायी समितीकडे शिफारस करण्यासाठी मा. आयुक्तांनी दि. २३-१२-९६ अन्वये मंजुरी दिलेली आहे. सबब सदर कामाचे सुधारीत अंदाजपत्रक र. रु. ४,९६,६२१/- ला तसेच सदर काम मुळ एजन्सीकडुन बी-१ निविदेनुसार १२५% पर्यंतची परिमाने ( ) निविदेतील प्राप्त दराने व १२५% परिमाने सन १९९५-९६ च्या सार्वजनिक बांधकाम खात्याच्या सन १९९५-९६ च्या जिल्हा दरसुचीनुसार अंदाजपत्रकीय दराने करुन घेण्यात आलेले आहे. कार्योत्तर मंजूरीस्तव प्रस्ताव विचारार्थ सादर.

सदरचा खर्च विकास इमारती शाळा व दवाखाने बांधणे या लेखाशिर्षामधुन सन ९६-९७ या वर्षात करण्यात येईल.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्यानुसार, आरेफ कॉलनी येथे प्रा. शाळेची इमारत बांधणेच्या रु. ३,५०,०००/- च्या कामामध्ये झालेल्या वाढीव बाबीमुळे वाढीव रक्कम रुपये १,४६,६२१/- म्हणजेच वाढीव अंदाजपत्रक एकुण र. रु. ४,१६,६२१/- ला तसेच वाढीव काम मुळ गुत्तेदार श्री. जी. आर. माने यांचेकडुन पुर्वीच्याच दराने करुन घेण्यास कार्योत्तर मंजुरी देण्यात येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ५६४/३ :**

शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला की, मसनतपुर येथील नविन वाढीव बांधलेल्या खोल्यांना प्लींग प्रोटेक्शन पॅरापेट वॉलच्या कामासाठी सार्व. बांधकाम विभागाचे सन ९५-९६ चे जिल्हा दरसुची नुसार र. रु. ९७,८५०/- चे अंदाजपत्रक तयार करण्यात आले असून, सदर शाळेची मा. आयुक्त सदर वार्डाचे स. नगरसेवक, वास्तुशास्त्रज्ञ

यांच्यासमवेत प्रत्यख स्थळ पाहणी केली असता सदर शाळेच्या शेजारी जी जुनी शाळेची इमारत आहे. त्यास तडे गेले असल्यामुळे तसेच प्रकार पुन्हा उदभवू नये. म्हणुन दक्षतेच्या दृष्टीने नविन बांधलेल्या शाळेच्या दोन खोल्याच्या इमारतीत प्लींथ प्रोटेक्शन व पॅरापेट वॉल बांधणेचे काम त्वरीत सुरु करण्याचे व पावसाळयापुर्वी पूर्ण करण्याचे सूचना स्थळावर मा. आयुक्तांनी दिल्यामुळे मालमत्तेचे नुकसान होऊ नये. या दृष्टीने उपलब्ध गुत्तेदार श्री. एस. झेड. सिद्यीकी यांचेकडुन सदरील काम सन ९५-९६ च्या दरसूचीच्या अंदाजपत्रकीय दराने करुन घेण्यात आले.

त्यासाठी कार्योत्तर मंजुरीस्तव स्थायी समितीची मान्यता घेण्यासाठी लेखाधिकारी-१ यांनी शिफारस केल्यानुसार व त्यास मा. आयुक्तांनी दि. ३१-०८-९६ अन्वये मान्यता दिल्यानुसार सबब सदर कामाचे अंदाजपत्रक र. रु. ९६,८५०/- ला व सदरील काम श्री. एस. झेड. सिद्यीकी यांचे मार्फत अंदाजपत्रकीय दराने करुन घेण्यात आले असल्यामुळे प्रस्ताव कार्योत्तर मंजुरीस्तव सादर.

सदरचा खर्च ९६-९७ च्या इमारत व देखभाल या लेखा शिर्षामधून करण्यात येईल.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्यानुसार, मसनतपुर येथील नविन वाढीव बांधलेल्या खोल्यांना प्लींग प्रोटेक्शन पॅरापेट वॉलच्या कामासाठी तयार करण्यात आलेल्या र. रु. ९७,८५०/- च्या अंदाजपत्रकास व सदर काम अंदाजपत्रकीय दराने श्री. एस. झेड. सिद्यीकी यांच्याकडुन करुन घेण्यास कार्योत्तर मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ५६५/४ :**

शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला की, नागसेन कॉलनी (कैसर कॉलनी) येथे समाज मंदिराचे क्षेत्रफळ वाढवुन बांधकाम करण्याचे कामासाठी स्थायी समिती ठराव क्र. २१३/८ दि. ०४-१२-९५ अन्वये र. रु. २,८५,०००/- चे अंदाजपत्रकास मंजुरी मिळालेली आहे. तसेच सदरील काम हे पास कन्स्ट्रक्शन गुत्तेदार यांना ४% जास्त दराने करण्यास कार्यालयीन आदेश क्र. एएमसी/एमईबी/२१८/९६ दि. ११-०३-९६ अन्वये देण्यात आले आहे. सदर काम बी-१ निविदे प्रमाणे पूर्ण होत आलेले आहे. परंतु सदरील जुन्या व वाढीव समजा मंदिरावर पहिला मजला जिन्यासह बांधण्यासाठी संबंधित वार्डाचे नगरसेवक यांनी पत्राद्वारे मागणी केली आहे व त्यानुसार सदर कामासाठी मुळ कामाची बचत लक्षात घेता रक्कम रु. १,७६,०७०/- चे तयार करण्यात आलेले आहे. सदर कामाची पाहणी करुन सदर कामाची आवश्यकता आहे व त्यामुळे इमारत चांगली दिसेल तसेच तरतुदी उपलबध आहे व सदर वाढीव कामास दि. ३०-०९-९६ अन्वये मान्यता दिली आहे.

सबब सदर कामाचे सुधारीत अंदाजपत्रक र. रु. ४,६१,०७०/- ला तसेच वाढीव काम मुळ एजन्सी मे. पारस कन्स्ट्रक्शन कडुन पहिल्या मजल्याचे काम असल्यामुळे मंजुर दरावर करुन घेण्याचा प्रस्ताव मंजुरीस्तव व विचारार्थ सादर. सदरचा खर्च इतर वाचनालय या लेखा शिर्षातुन ९६-९७ वर्षात करण्यात येईल.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, नागसेन कॉलनी (कैसर कॉलनी) येथे समाज मंदिराचे क्षेत्रफळ वाढवुन बांधकाम करणेच्या कामाकरीता वाढीव अंदाजपत्रक र. रु. ४,६१,०७०/- च्या अंदाजपत्रकास तसेच सदर काम मुळ गुत्तेदार मे. पारस कन्स्ट्रक्शन यांचे कडुन मंजूर पुर्वीच्याच मंजूर दराने करुन घेण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ५६६/५ :**

शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला की, सिध्दार्थ उद्यान प्राणी संग्राहालय येथील निलगाय व सांबराचे प्रस्तुत घरे तोडुन मागील बाजूस बांधणेच्या कामासाठी सा. बा. खात्याच्या ९५-९६ चे जिल्हा दरसुचीनुसार र. रु. ८७,८९०/- चे अंदाजपत्रक तयार करण्यात आले होते. व सदरील कामासाठी मा. आयुक्तांनी प्रत्यक्ष स्थळांवर दिलेल्या तोंडी आदेशानुसार काम तातडीचे व जनावरांच्या आरोग्यांच्या दृष्टीने अत्यावश्यक असल्याने उपलब्ध गुत्तेदार श्री. शुजात अली हाश्मी यांचेकडुन सुरु करुन घेण्यात आले होते. व सदर कामाचे अंदाजपत्रक व एजन्सीचे नावांस मा. आयुक्तांनी दि. ०१-०६-९६ अन्वये मंजुरी दिली होती. प्रस्तुत कामात निलगायीचे शेड जुन्या शेडची साईज लहान असल्याने नवीन दोन मोठया साईज चे बांधणे तसेच २) सध्या सांबराचे शेडीच साईज ६.० X ४.० मी आहे. तरी जनावरांची संख्या वाढल्यामुळे कमी पत्रा असल्याने साईज वाढवुन देणे बाबत पशुधन विकास अधिकारी यांनी पत्राद्वारे मागणी केली असल्याने ९.३० X ४.५० बांधावयाची असल्याने तसेच नविन शेडच्या समोर जनावरे जाण्याकरीता जाळीचा रस्ता करणे इ. कामासाठी र. रु. ३७,११०/- वाढीव खर्चाची गरज आहे. त्यामुळे सदर कामाचे सुधारीत अंदाजपत्रक र. रु. १,२५,०००/- होत असून, त्यास मा. स्थायी समितीसमोर सादर करण्यासाठी मा. आयुक्तांनी दि. १३-१२-९६ अन्वये मंजुरी दिलेली आहे.

सबब सदर कामाचे सुधारीत अंदाजपत्रक र. रु. १,२५,०००/- ला तसेच सदरचे काम मुळ एजन्सी श्री. सौ. शुजाता हाश्मी यांचे कडुन अंदाजपत्रकीय दराने करुन घेण्याचा प्रस्ताव मंजुरीस्तव सादर. सदरचा खर्च सिध्दार्थ उद्यान विकास कार्यक्रम या लेखाशिर्षामधुन करण्यात येईल.

**ठराव :**

सदर कामाची स्थळ पाहणी करण्यात यावी. असे सर्वानुमते ठरले.

**विषय क्र. ५६७/६ :**

सर्व्हे क्र. १२० मौजे सातारा या मिळकतीतून महानगरपालिकेने ड्रेनेज लाईन टाकलेली आहे. सदर कामासाठी ८ X १० चौ. मी. क्षेत्र उपयोगात आलेली आहे. मिळकतधारक श्री. फैजुल अहेमद पिता कादर मोहीयोद्यीन खॉन यांनी वरील जमिनीचा मोबदला मिळण्यासाठी अर्ज केले असता मोबदल्याची र. रु. ४३,४००/- (रु. त्रचाळीस हजार चारशे फक्त) निश्चित केलेली आहे. वरील रक्कम घेण्यास मिळकत धारकाने मान्य केले आहे.

महानगरपालिका व मिळकतधारक खरेदी खताचा खर्च निम्मा निम्म करणार आहे.

सबब मोबदल्याच्या रक्कमेतुन खरेदीखताचे खर्च निम्मा रु. ११,०००/- (रु. अकरा हजार) वजा करुन उर्वरित रक्कम रु. ३२,४००/- (बत्तीस हजार चारशे फक्त) मिळकत धारक श्री. फैजेल अहेमद खान पिता कादर मोहीयोद्यीन खॉन यांना देणेसाठी आणि खरेदीखत करुन घेण्यासाठी अग्रीम र. रु. २२,०००/- (रु. बावीस हजार फक्त) श्री. डी. डी. काळेले शाखा अभियंता यांनी देण्यासाठी प्रस्ताव मंजुरीस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्यानुसार, मौजे सातारा स. न. १२० या मिळकतीतून टाकलेल्या ड्रेनेज लाईनच्या क्षेत्रफळाचा मोबदला मिळकतधारक श्री. फुजेल अहमद पिता कादर मोहीयोद्यीन खॉन यांना र. रु. ४३,४००/- देण्यास त्याचप्रमाणेसदर रक्कमेतून खरेदी

खताचा अर्धा खर्च रु. ११,०००/- वजा आता रु. ३२,४००/- संबंधितास अदा करण्यास आणि श्री. डी. डी. काळेले, शाखा अभियंता यांचे नांवे अग्रीम रु. २२,०००/- देण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ५६८/७ :**

अतिरिक्त शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला की, एम. आय. डी. सी. सिडको येथील गरवारे स्टेडियमच्या इमारती करीता विद्युत पुरवठा करावयाचा असलेल्या कामासाठी निविदा सुचना क्र. मनपा/लेखा/नि/१००/९६ दि. ०९-१०-९६ प्रमाणे मोहरबंद निविदा मागविण्यात आल्या असता आठ कोऱ्या निविदा विक्री होऊन त्या स्विकृतीचे अंतिम तारखेपर्यंत एकुण चार निविदा खालील प्रमाणे प्राप्त झाल्या.

| | | |
|---|---|---|
| १. | मे. इगल इलेक्ट्रीकल | ५% जास्त दराने |
| २. | मे. हिंद इलेक्ट्रीकल | १०% जास्त दराने |
| ३. | मे. आदित्य इलेक्ट्रीकल | १% कमी दराने |
| ४. | मे. शाम इलेक्ट्रीकल स्टोअर्स | १०% जास्त दराने |

वरील निविदापैकी मे. आदित्य इलेक्ट्रीकल यांची निविदा सर्वात कमी दराची म्हणजेच अंदाजपत्रकीय दरापेक्षा १% कमी दराची निविदा सिल सदर निविदाचे दरास मा. आयुक्तांनी मंजूरी दिली आहे.

तरी मे. आदित्य इलेक्ट्रीकल यांचे १% कमी दराची निविदा स्विकारण्याचे विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्यानुसार, एम. आय. डी. सी. सिडको येथील गरवारे स्टेडियमच्या इमारती करीता विद्युत पुरवठा करण्याच्या कामाकरीता प्राप्त झालेल्या निविदापैकी सर्वात कमी दराची व अंदाजपत्रकीय दरापेक्षा १% कमी दराची मे. आदित्य इलेक्ट्रीकल यांची निविदा स्विकारण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ५६९/८ :**

अतिरिक्त शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर दिला की, शहरातील स्ट्रीट लाईट दुरुस्तीचे काम करण्यासाठी दोन ९.८ मीटर उंचीच्या हायड्रोलिक लॅडर खरेदी करावयाच्या आहेत. याकरीता वृत्तपत्रात जाहिरात प्रसिध्द करुन दुसऱ्यांदा दरपत्रके मागविली असता एकुण दोन दरपत्रके प्राप्त झाली. प्राप्त दरपत्रके दि. १४-११-९६ रोजी उघडण्यात आली असता त्याचा तपशील खालील प्रमाणे आहे.

| अ. क्र | पुरवठादार | हाय. प्लॅटफॉर्मची पुल किंमत | उत्पादन शुल्क | विक्रीकर | एकूण रक्कम रुपये. |
|---|---|---|---|---|---|
| १. | एअरटेक प्रा. लि. गाझीयाबाद | २०००००.०० | २००००.०० | २२०००.०० | २४२०००.०० |
| २. | यु. टी. लिमीटेड मुंबई | ३०००००.०० | ३००००.०० | २६४००००० | ३५६४००.०० |

वरील प्राप्त दरपत्रकापैकी मे. एअरटेक प्रा. लि. गाझीयाबाद यांचे दरपत्रकाचे दर तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी असून, एका हायड्रोलिक प्लॅटफॉर्म करीता रक्कम रुपये २,४२,०००.०० इतके आहेत. या दरानुसार र. रु. ४,८४,०००.०० इतका खर्च येणार आहे. वरील प्राप्त दर हे जकात कर वगळून आहेत. तसेच वाहतुक खर्चाचा यात समावेश नाही. त्यासाठी वाहतुक खर्च वेगळा करावा लागेल.

तरी एअरटेक प्रा. लि. यांच्याकडुन दोन हायड्रोलिक प्लॅटफॉर्म रु. ४,८४,०००/- मध्ये खरेदी करण्याचा (जकात कर व वाहतुक खर्च वगळुन) प्रस्ताव विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्यानुसार, शहरातील स्ट्रीट लाईट दुरुस्तीचे कामाकरीता ९.८ मीटर उंचीच्या हायड्रॉलिक लॅडर खरेदी करण्याकरीता प्राप्त झालेल्या दरपत्रकापैकी कमी दराचे दरपत्रक धारक मे. एअरटेक प्रा. लि. गाझीयावाद यांचेकडुन प्रत्येकी रु. २,४२,०००/- या दराने दोन हायड्रॉलिक लॅडर खरेदी करण्यास व यासाठी येणाऱ्या र. रु. ४,८४,०००/- च्या खर्चास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. तसेच या प्रस्तावास याच सभेत स्विकृती देण्यात येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

## दि. ०७-०१-९७ चे स्थायी समितीमध्ये ऐनवेळचे विषय

**विषय क्र. ५७०/१ :**

शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला की, विभाग क्र. १ मधील सर्व प्रकारच्या इमारतीची (पिरसरासहीत) वार्षीक पध्दतीने दुरुस्त्या करण्यासाठी स्थायी समिती दि. २१-०९-९६ ठराव क्र. २६८/४७ अन्वये र. रु. ५,००,०००/- चे अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजूरी प्राप्त झालेली आहे. सदरचवे काम हाती घेण्यासाठी कार्यालयीन निविदा सूचना क्र. मनपा/लेखा/नि/१३४/९६ दि. १८-१२-९६ अन्वये वृत्तमानपत्रात जाहिरातीद्वारे बी-१ नमुन्यात निविदा मागवल्यिा असता कोऱ्या निविदा विक्रीच्या तारखेपर्यंत एकूण (६) निविदा विक्री झाल्या. निविदा स्विकारणेच्या अंतिम तारखेपर्यंत एकुण (३) निविदा दर भरुन प्राप्त झाल्या. त्या दि. ३०-१२-९६ ला उघडण्यात आल्या. त्याचा तुलनात्मक तक्ता खालील प्रमाणे

| | | |
|---|---|---|
| १. | श्री. आंबावाला ए. एच. एन | ७.८६% जास्त दराने |
| २. | श्री. शुजात अली हाश्मी | अंदाजपत्रकीय दराने |
| ३. | मे. शिवा कन्स्ट्रक्शन | ५.५५% जास्त दराने |

तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी व अंदाजपत्रकीय दराची श्री. शुजात अली हाश्मी यांची निविदा असून, त्यास मा. आयुक्तांनी दि. ०६-०१-९७ अन्वये मंजुरी दिलेली आहे. सबब सदर कामाचा अंदाजपत्रकीय दराची श्री. शुजात अली हाश्मी यांची निविदा मंजूरीचा प्रस्ताव विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्यानुसार, विभाग क्र. १ मधील सर्व प्रकारच्या दुरुस्त्या करण्यासाठी प्राप्त झालेल्या निविदापैकी तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी व अंदाजपत्रकीय दराची श्री. सुजात अली हाश्मी यांना निविदा स्विकारण्यास सर्वानुमते मंजूरी देण्यात येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ५७१/२ :**

शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला की, विभाग क्र. २ मधील सर्व प्रकारच्या इमारतीची (परिसरासहित) वार्षीक पध्दतीने दुरुस्त्या करण्यासाठी स्थायी समिती दि. २१-०९-९६ ठराव क्र. २६९/४८ अन्वये र. रु. ५,००,०००/- चे अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजूरी प्राप्त झालेली आहे.दसदरचे काम हाती घेण्यासाठी कार्यालयीन निविदा सूचना क्र. मनपा/लेखा/नि/१३४/९६ दिनांक १८-१२-९६ अन्वये वृत्तमानपत्रात जाहिरातीद्वारे निविदा मागविल्या असता कोऱ्या निविदा विक्रीच्या तारखेपर्यंत ४ निविदा विक्री झाल्या. निविदा स्विकारणेच्या अंतिम तारखे पर्यंत एकुण ३ निविदा दर भरुन प्राप्त झाल्या. त्या दि. ३०-१२-९६ ला उघडण्यात आल्या त्याचा तुलनात्मक तक्ता खालील प्रमाणे.

| | | |
|---|---|---|
| १. | श्री. अब्दूल सलाम | ०.०३% कमी दराची |
| २. | मे. शिवा कन्स्ट्रक्शन | ५.५५% जास्त दराने |
| ३. | मे. आंबावाला ए. एच. एन | ७.८६% जास्त दराने |

तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी व अंदाजपत्रकीय दरापेक्षा ०.०३% कमी दराची श्री. सलाम यांची निविदा असून त्यास मा. आयुक्तांना दि. ०६-०१-९७ अन्वये मंजूरी दिलेली आहे. सबब सदर कामाची अंदाजपत्रकीय दरापेक्षा ०.०३% कमी दराची श्री. अ. सलाम यांची निविदा मंजूरीचा प्रस्ताव विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्यानुसार, विभाग क्र. २ मधील सर्व प्रकारच्या इमारतीची (परिसरासहीत) वार्षीक पध्दतीने दुरुस्त्या करण्यासाठी प्राप्त झालेल्या निविदापैकी तुलनात्मकदृष्टया सर्वात कमी व अंदाजपत्रकीय दरापेक्षा ०.०३% कमी दराची श्री. अब्दुल सलाम यांची निविदा स्विकारण्यास सर्वानुमते मंजूरी देण्यात येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ५७२/३ :**

शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला की, विभाग क्र. ३ मधील सर्व प्रकारच्या इमारतीची (परिसरासहित) वार्षिक पध्दतीने दुरुस्त्या करण्यासाठी स्थायी समिती दि. ३१-०९-९६ ठराव क्र. २७०/४९ अन्वये र. रु. ५,००,०००/- चे अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजूरी प्राप्त झालेली आहे. सदरचे काम हाती घेण्यासाठी कार्यालयीन निविदा सुचना क्र. मनपा/लेखा/नि/१३४/९६ दि. १८-१२-९६ अन्वये वृत्तपत्रात जाहिरातीद्वारे बी-१ नमुन्यात निविदा मागविल्या असता कोऱ्या निविदा विक्रीच्या तारखेपर्यंत एकुण ७ निविदा विक्री झाल्या. निविदा स्विकारणेच्या अंतिम तारखेपर्यंत एकुण ४ निविदा दर भरुन प्राप्त झाल्या. त्या दि. ३०-१२-९६ ला उघडण्यात आल्या. त्याचा तुलनात्मक तक्ता खालील प्रमाणे आहे.

| | | |
|---|---|---|
| १. | मे. शिवा कन्स्ट्रक्शन | ५.५५% जास्त दराने |
| २. | एस. ए. नवाब | ०.०३% कमी दराने |
| ३. | शेख शराफ | ६% जास्त दराने |
| ४. | आंबावाला ए. एच. एम. | ७.८६% जास्त दराने |

तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी व अंदाजपत्रकीय दरापेक्षा ०.०३% कमी दराची श्री. एस. ए. नवाब यांची निविदा असून, त्यास मा. आयुक्तांना दि. ०६-०१-९७ रोजी मंजूरी

दिलेली आहे. सबब सदर कामाची अंदाजपत्रकीय दरापेक्षा ०.०३% कमी दराची श्री. एस. ए. नवाब यांची निविदा मंजूरीचा प्रस्ताव विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, विभाग ३ मधील सर्व प्रकारच्या इमारतीची (परिसरासहित) वार्षिक पध्दतीने दुरुस्त्या करण्यासाठी प्राप्त झालेल्या निविदापैकी तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी व अंदाजपत्रकीय दरापेक्षा ०.०३% कमी दराची श्री. एस. ए. नवाब यांची निविदा यांची स्विकारण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ५७३/४ :**

शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला की, विभाग क्र. ४ मधील सर्व प्रकारच्या इमारतीची (परिसरासहित) वार्षिक दुरुस्त्या करण्यासाठी स्थायी समिती दि. २१-०९-९६ ठराव क्र. २७१/५० अन्वये रु. ५,००,०००/- चे अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजुरी प्राप्त झालेली आहे. सदरचे काम हाती घेण्यासाठी कार्यालयीन निविदा सूचना क्र. मनपा/लेखा नि/१३४/९६ दि. १८-१२-९६ अन्वये वृत्तमानपत्रात जाहिरातीद्वारे बी-१ नमुन्यात निविदा मागल्यि असता कोऱ्या निविदा विक्रीच्या तारखेपर्यंत एकुण ८ विक्री झाल्या निविदा स्विकारण्याच्या अंतिम तारखेपर्यंत एकुण ३ निविदा दर भरुन प्राप्त झाल्या. त्या दि. ३०-१२-९६ ला उघडण्यात आल्या. त्याचा तुलनात्मक तक्ता खालील प्रमाणे.

| | | |
|---|---|---|
| १. | मे. ट्री स्टार कंपनी. | ८% जास्त दराने |
| २. | मे. विपूल कन्स्ट्रक्शन | ४.५०% जास्त दराने |
| ३. | श्री. कुलवंतसिंग | ०.१०% कमी दराने |

तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी व अंदाजपत्रकीय दरापेक्षा ०.१०% कमी दराची श्री. कुलवंतसिंग यांची निविदा असून, त्यास मा. आयुक्तांनी दि. ०६-०१-९७ रोजी मंजूरी दिलेली आहे. सबब सदर कामासाठी सर्वात कमी व अंदाजपत्रकीय दरापेक्षा ०.१०% कमी दराची श्री. कुलवंतसिंग याची निविदा मंजूरीचा प्रस्ताव विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, विभाग क्र. ४ मधील सर्व प्रकारच्या इमारतीची (परिसरासहित) वार्षिक पध्दतीने दुरुस्ती करण्यासाठी प्राप्त निविदापैकी तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी व अंदाजपत्रकीय दरापेक्षा ०.१०% कमी दराची श्री. कुलवंतसिंग याची निविदा स्विकारण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ५७४/५ :**

शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला की, विभाग क्र. ५ मधील सर्व प्रकारच्या इमारतीची (परिसरासहित) वार्षिक पध्दतीने दुरुस्त्या करण्यासाठी स्थायी समिती दि. २१-०९-९६ ठराव क्र. २७२/५१ अन्वये र. रु. ५,००,०००/- चे अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजुरी प्राप्त झालेली आहे. सदरचे काम हाती घेण्यासाठी कार्यालयीन निविदा सूचना क्र. मनपा/लेखा/नि/१३४/९६ दि. १८-१२-९६ अन्वये वृत्तमानपत्रात जाहिरातीद्वारे निविदा मागविल्या असता कोऱ्या निविदा विक्रीच्या अंतिम तारखेपर्यंत एकुण ७ निविदा विक्री झाल्या.

निविदा स्विकारणेच्या अंतिम तारखेपर्यंत एकुण ३ निविदा दरपत्रके भरुन प्राप्त झाल्या दि. ३०-१२-९६ रोजी उघडल्या असता त्याचा तुलनात्मक तक्ता खालील प्रमाणे

| | | |
|---|---|---|
| १. | श्री. देशमुख एस. ए. | अंदाजपत्रकीय दराने |
| २. | श्री. आंबावाला ए. एच.एस | ७.८६% जास्त |
| ३. | श्री. शिवा कन्स्ट्रक्शन | ५.५५% जास्त |

तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी व अंदाजपत्रकीय दराची श्री. देशमुख एस. ए. यांची निविदा असून, मा. आयुक्तांनी दि. ०६-०१-९६ रोजी मंजूरी दिलेली आहे. सबब सदर कामाची अंदाजपत्रकीय दराची श्री. देशमुख एस. ए. यांची निविदा आहे. निविदा मंजूरीचा प्रस्ताव विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्यानुसार, विभाग क्र. ५ मधील सर्व प्रकारच्या इमारतीची (परिसरासहित) दुरुस्ती वार्षीक पध्दतीने करण्यासाठीच्या कामाकरीता प्राप्त झालेल्या निविदापैकी तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी व अं. प. दराची श्री. एस. ए. देशमुख यांची निविदा स्विकारण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ७७५/६ :**

शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला की, विभाग क्र. ६ मधील सर्व प्रकारच्या इमारतीची (परिसरासहित) वाषिक पध्दतीने दुरुस्त्या करण्यासाठी स्थायी समिती दि. २१-०९-९६ ठराव क्र. २७३/५२ अन्वये र.रु. ५,००,०००/- चे अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजुरी प्राप्त झालेली आहे. सदरचे काम हाती घेण्यासाठी कार्यालयीन निविदा सूचना क्र. मनपा/लेखा/नि/१३४/९६ दि. १८-१२-९६ अन्वये वृत्तपत्रा जाहिरातीद्वारे निविदा मागविल्या असता निविदा विक्रीच्या तारखेपर्यंत एकुण ९ निविदा विक्री झाल्या. निविदा स्विकारणेच्या अंतिम तारखे पर्यंत एकुण ५ निविदा दर भरुन प्राप्त झाल्या. त्या दि. ३०-१२-९६ रोजी उघडण्यात आल्या. त्याचा तुलनात्मक तक्ता खालील प्रमाणे.

| | | |
|---|---|---|
| १. | मे. विपूल कन्स्ट्रक्शन | ६.२५% जास्त दराने |
| २. | सै. अथर अली | ०.०१% कमी दराने |
| ३. | ट्री. स्टार कंपनी | ८% जास्त दराने |
| ४. | आबावाल ए. एस. एम. | ७.८६% जास्त दराने |
| ५. | मे. शिवा कन्स्ट्रक्शन | ५.५५% जास्त दराने |

तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी व अंदाजपत्रकीय दरापेक्षा ०.०१% कमी दराची श्री. सै. अथर अली यांची निविदा असून, त्यास मा. आयुक्तांनी दि. ०६-०१-९७ रोजी मंजूरी दिलेली आहे. सबब सदर कामासाठी सर्वात कमी दराची व अंदाजपत्रकीय दरापेक्षा ०.०१% कमी दराची श्री. स. अथर अली यांची निविदा मंजूरीचा प्रस्ताव विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्यानुसार, विभाग क्र. ६ मधील सर्व प्रकारच्या इमारतीची (परिसरासहित) दुरुस्ती वार्षिक पध्दतीने करण्याच्या कामासाठी प्राप्त झालेल्या निविदापैकी

तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी व अं. प. दरापेक्षा ०.०१% कमी दराची श्री. स. अथर अली यांची निविदा स्विकारण्यास सर्वानुमते मंजूरी देण्यात येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ५७६/७ :**

शहर अभियंता यांना प्रस्ताव सादर केला की, विभाग क्र. ७ मधील सर्व प्रकारच्या इमारतीची (परिसरासहित) वार्षिक पध्दतीने दुरुस्त्या करण्यासाठी स्थायी समिती ठराव क्र. २७४/५३ अन्वये र. रु. ५,००,०००/- चे अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजुरी प्राप्त झालेली आहे. सदरचे काम हाती घेण्यासाठी कार्यालयीन निविदा सुचना क्र. मनपा/लेखा/नि/१३४/९६ दि. १८-१२-९६ अन्वये वृत्तमानपत्रात जाहिरातीद्वारे बी-१ नमुन्यात निविदा मागविल्या असता निविदा विक्रीच्या अंतिम तारखेपर्यंत एकूण ५ निविदा विकल्या गेल्या. निविदा स्विकारणेच्या अंतिम तारखेपर्यंत एकूण ३ निविदा प्राप्त झाल्या. त्या दि. ३०-१२-९६ ला उघडण्यात आल्या. त्याचा तुलनात्मक तक्ता खालील प्रमाणे.

| | | |
|---|---|---|
| १. | मे. शिवा कन्स्ट्रक्शन | ५.५५% जास्त दराने |
| २. | आबावाल ए. एस. एन. | ७.८६% जास्त दराने |
| ३. | सिद्यीकी एस. झेड | ०.०५% कमी दराने |

तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी व अंदाजपत्रकीय दरापेक्षा ०.०५% जास्त दराची श्री. सिद्यीकी एस. झेड यांची निविदा मंजुरीचा प्रस्ताव विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्यानुसार, विभाग क्र. ७ मधील सर्व प्रकारच्या इमारतीची (परिसरासहित) वार्षिक पध्दतीने दुरुस्त्या कामासाठी प्राप्त झालेल्या निविदापैकी तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी व अंदाजपत्रकीय दरापेक्षा ०.०५% कमी दराची श्री. एस. झेड सिद्यीकी यांची निविदा स्विकारण्यास सर्वानुमते मंजूरी देण्यात येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ५७७/८ :**

शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला की, मोगलपूरा (बारापुल्ला) स्लम येथे नविन खांडकी बसविणे व जूनी खांडकी दुरुस्त करणे व खडी रस्ते तयार करणे कामाकरीता सा. बा. खाते यांच्या ९५-९६ च्या दरसूचीनुसार रु. ४४६३७७/- चे अंदाजपत्रक तयार करण्यात आले आहे.

सदरील काम खांडकी रस्ते या शिर्षातुन करण्यात येईल. सदरच्या अंदाजपत्रकास मा. आयुक्त साहेबांनी दि. २६-०८-९६ ला प्रशासकीय मान्यता दिली आहे. तसेच दि. २१-०९-९६ रोजी स्थायी समितीत अंदाजपत्रकास मंजूरी मिळाली आहे. प्रस्तावित कामासाठी निविदा मागविण्यात आले असता एकुण १८ निविदा विकल्या गेल्या व अंतिम तारखेपर्यंत एकुण ८ निविदा प्राप्त झाल्या व दि. २०-११-९६ रोजी उपस्थित गुत्तेदारासमक्षात उघडण्यात आल्या.

| | | |
|---|---|---|
| १. | सरवदे एस. पी. | ३३% कमी |
| २. | ए. एम. फारुकी | ३०% कमी |
| ३. | आर. बी. चव्हाण | २८% कमी |

| | | |
|---|---|---|
| ४. | पी. के. कन्स्ट्रक्शन | २७.१६% कमी |
| ५. | अंसारी कन्स्ट्रक्शन | २६.८८% कमी |
| ६. | स. रफिकोद्यीन | २६.८८% कमी |
| ७. | विपूल कन्स्ट्रक्शन | २२% कमी |
| ८. | ट्री स्टार कन्स्ट्रक्शन | २१.२% कमी |

तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी म्हणजे अं. प. दरापेक्षा ३३% कमी दराची निविदा श्री. सरवदे एस. पी. यांची आहे. एवढया कमी दराने काम स्पेसिफिकेशन होणे अशक्य आहे. करीता याबाबत गुत्तेदाराकडून दरपृथःकरण मागविण्यात आले असता त्यांनी ०५-१२-९६ च्या पत्राद्वारे खालील कारणे दिली आहेत.

१. स्वतःचे मालकीची दगडी खदान आहे व तेथे खांडकी तयार करणे.
२. माझील स्वतःची ट्रॅक्टर आहे व कामगार वर्ग महिन्यावरील आहे.

त्यामुळे मला सदरील काम कमी दरात परवडते व काम करण्यास संमती दिली आहे. या दरात काम करुन घ्यावयाचे असल्यास कामाची गुणवत्ता व प्रत राखणेस्तव वाढीव कर्मचारीची कामाचे निगराणास्तव आवश्यकता आहे. तरी वाढीव कर्मचारी देऊन सदरील कामाचा प्रस्ताव मंजूर करणे योग्य राहील.

तरी अंदाजपत्रकीय दरापेक्षा ३३% कमी दराची असलेली श्री. एस. पी. सरवदे यांची निविदेस मान्यतेचा प्रस्ताव विचारार्थ तथा मंजूरीस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्यानुसार, मोगलपूरा (बारापुल्ला) स्लम येथे नविन खांडकी बसविणे व जूनी खांडकी दुरुस्त करणे व खडी रस्ते तयार करणेच्या कामाकरीता प्राप्त झालेल्या निविदा पैकी तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी व अंदाजपत्रकीय दरापेक्षा ३३% कमी दराची श्री. एस. पी. सरवदे यांची निविदा स्विकारण्यास सर्वानुमते मंजूरी देण्यात येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ५७८/९ :**

शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला की, जवाहर कॉलनी येथील मनपा शाळेची जूनी तार कुंपन काढुन त्या जागेवर संरक्षित भिंत बांधणेच्या कामासाठी सा. बा. खात्याचे सन ९५-९६ चे जिल्हा दरसुचीनुसार र. रु. १,७१,०८०/- चे अंदाजपत्रक तयार करण्यात आले असून, त्यास मा. आयुक्तांनी दि. २१-१२-९६ अन्वये मंजुरी दिलेली आहे. सबब सदर कामाचे र.रु. १,७१,०८०/- चे अंदाजपत्रक मंजूरीचा प्रस्ताव विचारार्थ सादर.

सदरचा खर्च विकास इमारती शाळा व दवाखाने या लेखा शिर्षा मधून करण्यात येईल.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्यानुसार, जवाहर कॉलनी येथील मनपा शाळेची जूनी तार कुंपन काढुन त्या जागेवर संरक्षित भिंत बांधणेच्या कामाकरीता तयार करण्यात आलेल्या रक्कम रु. १,७१,०८०/- च्या अंदाजपत्रकास व सदर खर्च विकास इमारती शाळा व दवाखाने बांधणे या लेखा शिर्षामधुन करण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ५७९/१० :**

शहर अभियंता यांनी प्रस्तावसादर केला की, शिवराज सहकारी गृहनिर्माण संस्था या मंजूर रेखांकनातील मोकळया मनपाने खुल्या जागेवर बहुउद्देशीय हॉल बांधणेचे कामासाठी सार्वजनिक बांधकाम खात्याच्या सन १९९५-९६ चे जिल्हा दरसुची नुसार रक्कम रु. २,४२,९१०/- चे अंदाजपत्रक तयार करण्यात आले असून, त्यास मा. आयुक्तांची दि. १९-१२-९६ अन्वये मंजुरी दिली आहे.

सबब सदर कामाचे र. रु. २,४२,९१०/- चे अंदाजपत्रक मंजुरीचा प्रस्ताव विचारार्थ सादर. सदर खर्च विकास इमारती शाळा व दवाखाने बांधणे या लेखाशिर्षा मधुन करण्यात येईल.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, शिवराज सहकारी गृहनिर्माण संस्था या मंजूर रेखांकनातील मोकळया मनपाने खुल्या जागेवर बहुउद्देशीय हॉल बांधणेच्या कामाकरीता तयार करण्यात आलेल्या रक्कम रुपये २,४२,९१०/- च्या अंदाजपत्रकास तसेच सदर खर्च " विकास इमारती शाळा व दवाखाने " या लेखा शिर्षामधुन करण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ५८०/११ :**

शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला की, इंदिरानगर (बायजीपूरा) येथील मनपा शाळेच्या उर्वरित संरक्षित भिंतीचे बांधकाम करण्याचे कामासाठी सा. बांधकाम खात्याचे सन ९५-९६ चे जिल्हा दरसुचीनुसार रक्कम रुपये २,९९,०७०/- चे अंदाजपत्रक तयार करण्यात आले असून, अंदाजपत्रक मंजुरीचा प्रस्ताव स्थायी समितीसमोर सादर करण्यासाठी मा. आयुक्तांना दिनांक १३-१२-९६ अन्वये मंजुरी दिलेली आहे. सबब सदर कामाचे रक्कम रुपये २,१९,०७०/- चे अंदाजपत्रक मंजुरीचा प्रस्ताव विचारार्थ सादर.

सदरचा खर्च विकास इमारती शाळा व दवाखाने या लेखा शिर्षामधुन सन ९६-९७ या वर्षात करण्यात येईल.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्यानुसार, इंदिरानगर (बायजीपूरा) येथील मनपा शाळेच्या उर्वरित संरक्षित भिंतीचे बांधकाम करण्याकरीता तयार करण्यात आलेल्या रक्कम रुपये २,१९,०७०/- च्या अंदाजपत्रकास तसेच सदर खर्च " विकास इमारती शाळा व दवाखाने बांधणे " या लेखा शिर्षा मधुन करण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ५८१/१२ :**

औरंगाबाद शहर मंजूर विकास योजनेनुसार ४० फुट रुंद रस्ता किराणा चावडी पोलीस चौकी ते चौराहा या रस्त्याचे न. भू. क्र. ७९०० अंशतः बाधित आहे. सदर रस्त्याचे रुंदीकरण विशेष भूसंपादन अधिकारी विशेष घटक औरंगाबाद यांचे मार्फत झालेली आहे. परंतु सदरील मिळकत अधिसूचति न झाल्याने निवाडयामध्ये समाविष्ठ झाली नाही. सदर मिळकत संपादन करणे, आवश्यक असल्याने आणि मिळकत धारक सौ. विमला भ्र. कैलासचंद्र सेठी यांनी बाधित क्षेत्र खाजगी वाटाघाटीने देण्यास संमती दिलेला आहे.

त्यानुसार मोबदल्याची रक्कम रु. ३,०५,८५३/- इतकी निश्चित केली आहे. सदर रक्कम घेण्यास मिळकत धारकाने मान्य केले आहे. परंतु रजिस्ट्रीचा संपूर्ण खर्च महानगरपालिकेने करावा अशी विनंती केली आहे. सदर मोबदला हितसंबंधितास अदा करण्यास व रजिष्ट्रीचा संपूर्ण खर्च मनपाने करण्यास मा. आयुक्तांनी मान्य केले आहे.

तरी हितसंबंधित सौ. विमला कैलासचंद्र सेठी यांना मोबदला रक्कम रुपये ३,०५,८५३/- (रु. तीन लाख पाच हजार आठशे त्रेपन्न फक्त) अदा करणेस्तव व रजिस्ट्री करुन घेण्यासाठी अग्रीम रु. ३१,९००/- (एकतीस हजार नऊशे फक्त) श्री. डी. डी. काळेले, शाखा अभियंता यांना देणेस्तव सादर.

**संवाद :**

**मा. सभापती** : मंजूर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्यानुसार, औरंगाबाद शहर मंजूर विकास योजनेनुसार ४० फुट रुंद रस्ता किराणा चावडी पोलीस चौकी ते चौराहा या रस्त्याचे न. भू. क्र. ७९०० अंशतः बाधित आहे. सदर रस्त्याचे रुंदीकरण विशेष भूसंपादन अधिकारी विशेष घटक औरंगाबाद यांचे मार्फत झालेली आहे. परंतु सदरील मिळकत अधिसूचति न झाल्याने निवाडयामध्ये समाविष्ठ झाली नाही. सदर मिळकत संपादन करणे, आवश्यक असल्याने आणि मिळकत धारक सौ. विमला भ्र. कैलासचंद्र सेठी यांनी बाधित क्षेत्र खाजगी वाटाघाटीने देण्यास संमती दिलेला आहे. त्यानुसार मोबदल्याची रक्कम रु. ३,०५,८५३/- इतकी निश्चित केली आहे. सदर रक्कम घेण्यास मिळकत धारकाने मान्य केले आहे. परंतु रजिस्ट्रीचा संपूर्ण खर्च महानगरपालिकेने करावा अशी विनंती केली आहे. त्यास मा. आयुक्त यांनी मान्य केले आहे.

तरी सौ. विमला कैलासचंद्र सेठी यांना मोबदला रक्कम रुपये ३,०५,८५३/- अदा करण्यास व रजिष्ट्री करुन घेण्यासाठी अग्रीम रु. ३१,९००/- श्री. डी. डी. काळेले, शाखा अभियंता याना देण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ५८२/१३ :**

कार्यकारी अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला की, गजानन नगर (उस्मानपुरा) येथे दगडी गटार बांधणे बाबत परिसर अभियांत्रिकी यांच्या सन ९५-९६ च्या दरसुची नुसार अंदाजपत्रक रक्कम रु. २,८९,०००/- चे तयार करण्यात आले आहे. सदरील खर्च " झोपडपट्टी व शहरातील इतर भागात खुल्या गटारी बांधणे " या आर्थिक शिर्षकाखाली करण्यात येईल.

तरी प्रस्ताव मंजुरीस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्यानुसार, गजानन नगर (उस्मानपुरा) येथे दगडी गटार बांधण्याच्या कामाकरीता तयार करण्यात आलेल्या र. रु. २,८९,०००/- च्या अंदाजपत्रकास तसेच सदर खर्च " झोपडपट्टी व शहरातील इतर भागात खुल्या गटारी बांधणे " या आर्थिक शिर्षकाखाली करण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ५८३/१४ :**

शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला की, मिटमिटा येथील प्राथमिक शाळेला पहिला व तळ मजला बांधणेच्या कामासाठी प्रशासकीय ठराव क्र. ५६ दिनांक ०२-०२-९५

अन्वये रक्कम रु. ८,६६,१२५/- चे अंदाजपत्रकास मान्यता मिळालेली आहे व सदरील काम करण्यासाठी प्रशासकीय ठराव क्र. १९२ दि. २३-०३-९५ अन्वये निविदेस मंजूरी प्राप्त झालेली होती. परंतु एजन्सीने कामात कसूर केल्यामुळे सदरच्या एजन्सीचे काम रद्द करण्यात आले असून, सदर कामाच्या फेर निविदा दि. ०६-०५-९५ मागविण्यत आल्या होत्या व निविदा मंजूरीसाठी प्रस्ताव स्थायी समितीमध्ये सादर केला होता. त्यानुसार सदर कामास ठराव क्र. ३८०/२ दि. १९-०१-९६ अन्वये मंजुरीही मिळालेली आहे. परंतु सदर उर्वरीत काम हे ७,४०,०००/- रु. अंदाजपत्रकाचे असून, अनावधानाने सदर कामाची रक्कम रु. ४,९५,०००/- अशी इतिवृत्तांत नोंद नोंदविण्यात आलेली आहे. सदर बाबतीत इतिवृत्तात उर्वरित अंदाजपत्रकीय रक्कम रु. ४,९५,०००/- ऐवजी ७,४०,०००/- अशी पाहिजे होती.

सबब ठराव क्र. ३८०/२ दि. १९-०१-९६ मधील इतिवृत्तांत सदरील काम रु. ४,९५,०००/- ऐवजी ७,४०,०००/- रु. खर्चास दुरुस्ती होण्याच्या विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्यानुसार, मिटमिटा येथील प्राथमिक शाळेला पहिला व तळ मजला बांधणेच्या कामासाठी दि. १९-०१-९६ च्या स्थायी समिती सभेमध्ये ठराव क्र. ३८०/२ अन्वये मंजुरी मिळाली होती. सदरील कामाचे अंदाजपत्रकाची रक्कम रुपये ७,४०,०००/- ऐवजी रु. ४,९५,०००/- अशी इतिवृत्तांत नोंद झालेली आहे. तरी ठराव क्र. ३८०/२ अनवधानाने झालेल्या रु. ४,९५,००/- ऐवजी रु. ७,००,०००/- खर्चास मंजूरी अशी दुरुस्ती करण्यास सर्वानुमते मंजूरी देण्यात येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

याबरोबरच " जन गण मन " या राष्ट्रगिताने सभा संपल्याचे मा. सभापती यांनी घोषीत केले.

स्वाक्षरित/-
नगरसचिव,
महानगरपालिका, औरंगाबाद.

स्वाक्षरित/-
स्थायी सभापती,
महानगरपालिका, औरंगाबाद.